# आगरकरांशीं-
# ☆ओळख

★

पु. पां. गोखले.

# आगरकरांशीं-
# ☆ओळख


लेखक

**पु. पां. गोखले,** बी. ए.

कराड.



दिनांक १६–६–४५ ] प्रसिद्धिदिन [ जेष्ठ शुद्ध ६ शके १८६७

**मूल्य पांच रुपये**

प्रकाशक:—
श्री. ल. वि. तारळेकर,
७२१, शनिवार, सातारा.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक:—
श्री. अनंत कृष्ण कुलकर्णी,
आनंद प्रिंटिंग प्रेस,
१८२, सोमवार, सातारा.

स्वार्थाचा संसार नको,
काळाची चिकित्सा नको,
व्यक्तिची छाननी नको,
मात्र
शीलाची संपत्ति हवी,
कर्तृत्वाची कसोटी हवी,
भविष्याची दृष्टी हवी.
मग जग " मस्तक चरणीं ठेवीतसे ".

## आमचें आगामी प्रकाशन

?

हवें काय नि होईल कसें हें त्या ग्रंथांत अचूक दिसेल.

लेखक — पु. पां. गोखले.

# ओळखीचा नमस्कार

वाचक हो नमस्ते. विचारवंत वाचक हो, छाती पुढें, मान ताठ, नजर उफाडी ठेवून मी करीत असलेला हा मानाचा मुजरा घ्या. आतां, आज आणि यापुढें केव्हांही आपण या नि अशाच मानाच्या मुजऱ्याचे भुकेले आहांत, याविषयीं माझी खात्री आहे. कारण आज विवेकयुगाच्या प्रवर्तकाची पुण्यतिथी आहे. मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व राखावें; जागतिक जीवनांतील प्रवाहांचें अभ्यासपूर्वक परीक्षण करावें आणि आपल्या प्रकृतीला नि परिस्थितीला मानवेल तशी " विवेकें क्रिया आपुली पालटावी; " मात्र स्वतांची नि राष्ट्राची प्रतिष्ठा जगाच्या जमान्यांत खडीखंब व तारीखतागायत सांभाळावी असा टाहो महाराष्ट्राच्या कानीं कपाळीं फोडणाऱ्या गोपाळराव आगरकरांची आज पुण्यतिथी. सांप्रदायिक सभासंमेलनांच्या नि स्तुतिस्तोत्रांच्या स्मृतिपूजेनें ती साजरी करण्यापेक्षां कृतीच्या कृतांजलीनें, कृतज्ञ कार्यप्रणालीनें केलेलीच आगरकरांच्या आत्म्यास आणि आगरकरांच्या अभिमान्यांस अधिक मानवेल. म्हणूनच आत्मविश्वासाचा, पीळदारपणाचा, विशाल नजरेचा हा माझा मुजरा तितकाच आपुलकीचा आपणांस वाटेल व तो घेऊनच, आपण यापुढील पानांवर अगोदर मांडून ठेवलेली आगरकरांची स्मरणपूजा आपलीशी कराल असा माझा भरंवसा आहे.

हंसतमुख स्वागतानंतर शीतलागौरीच्या दर्शनाचे निमित्तानें सुवासिनी घरधनिणीची मोडमांडणी कितपत ठाकठीक आहे याचें चतुर विहंगमावलोकन करीत असतात. त्याच गौरवगर्भ कुतूहलानें पुढील पानांतून आपण आगरकरांचें दर्शन घेण्याची इच्छा केलीत, तर त्यांत वावगें तें काय ? असें दर्शन घेणें हा पुण्यतिथी-महोत्सवाचा एक आवश्यक भाग असतो. दिवसांच्या गणतीनें आयुष्य मोजणारांच्या मरणदिवसाला सुतकी कळा येते; पण कर्तबगारीनें आयुष्य मोजणारांचा मरणदिवसही अमृतकला पावतो. कारण कर्तृत्ववन्ताबद्दलच्या कृतज्ञतेनें त्यांचें नांव काळ व इतिहास आपल्या कपाळीं कोरून ठेवीत असतात. अशांच्याच स्मृतिपुजेपासून नवीन पिढीला आत्मविश्वास निर्माण होतो व कर्तृत्वाची स्फूर्ति मिळते. मागील काळाची पानें उलटावयाची, इतिहास वाचावयाचा, 'वडिलांची कीर्ति सांगावयाची' ती नव्या इतिहासाच्या घडणीसाठीं. नवा इतिहास घडविण्याची आकांक्षा जेथें निर्माण होत नाहीं, तेथें कर्तृत्ववन्तांचें सम्यग्दर्शन झालेंच नाहीं. आगरकरांच्या आजच्या पन्नासाव्या पुण्यतिथीच्या दिवशीं नव्या इतिहासाच्या घडणीसाठीं, त्यांचें सम्मग्दर्शन घेण्याची अपेक्षा पूर्ण झालीच पाहिजे. कारण एका पिढीच्या खांद्यावर उभे राहूनच दुसऱ्या पिढीला आपल्या नजरेचा क्षितीज उंचावता येतो; त्यामुळें आपल्या उभारणीचा पाया किती सखोल व खंबीर आहे याचा ठास अंदाज आल्यानें, वडील पिढीबद्दल कृतज्ञता वाटते नि आपल्या कर्तबगारीचें वर्तुळ आत्मविश्वासानें वाढवितां येऊन नव्या इतिहासाची घडण साधतां

येते. दोन पिढ्यापूर्वी " बांधवहो ! विचारकलहाला कां भितां ? " असा जागर सुरू करून चैतन्याचा जो स्फुलिंग गोपाळराव आगरकरांनीं चेतविला आणि श्रीसमर्थांनीं सांगितल्याप्रमाणें " अग्नि तो चेतवावा रे । चेतवितांचि चेततो ॥ " या न्यायानें आगरकरांच्या त्या चैतन्य-स्फूलिंगाचें आजचें स्वरूप कसें विशाल, पवित्र नि अभिमानास्पद झालें आहे, या दोनही गोष्टींचा आढावा बिनचूक घेतां येण्यास आगरकरांचें सम्यग्दर्शन त्यांच्या स्मृतिपूजेच्या फुला-पानांतून निर्विवाद झालेंच पाहिजे.

तथापि हें दर्शन ज्याचें त्यानेंच घ्यावयाचें असतें; दुसऱ्यांनीं द्यावयाचें नसतें. " आगरकर-दर्शन " वाचकांना सादर करण्याची शक्ति निदान माझ्यांत तरी आहे, असा गर्व मी वहात नाहीं. कारण लोकमान्य टिळकांनीं १९१६ सालीं एका प्रसंगानें आगरकरांच्याच पुण्यतिथीस म्हटल्याप्रमाणें " सगळा आगरकर पाहण्याची ताकद फारच थोड्यांत असते; किंबहुना तो पचनी पडणेंच कठीण आहे. " हें जर खरें, तर " दर्शना " ला वैदिक कालापासून जो तत्त्वज्ञानात्मक अर्थ आहे, त्यास अनुसरून " आगरकर-दर्शन " करविण्याची ताकद माझ्या लेखणींत आहे, असें मी कसें मानूं ? शिवाय, ज्या प्रकाश-छायांच्या नि शोभा-स्वाभाविकतेच्या रुबाबांत मी अगरकरांना पाहतों, तसेंच दुसऱ्यांनीं पहावें, अशी तरी अपेक्षा, " विचाराच्या बाबतींत कोणी कोणाची भीड बाळगण्याचें कारण नाहीं. " अशी शिकवण देणाऱ्या आगरकरांच्या पुण्यतिथीलाच नव्हे, तर इतर वेळींही बाळगणें, हा त्या शिकवणीचा अवमान नव्हे काय ? म्हणून पहाणारासारखी दृष्टी, दृष्टीसारखी सृष्टी आणि सृष्टीसारखी सजावट जो तो आपआपल्या अक्कलहुशारीनें करीत असतो, हें जाणून आगरकरांच्या सम्यग्दर्शनाला सर्वस्वी सहाय्यक होईल असें आगरकरांच्या चरित्राचें, चारित्र्याचें नि चैतन्याचें समालोचन साधण्याचा प्रयत्न मी पुढील पानांतून केला आहे. त्यायोगें जुन्या पिढींतील मंडळींना आठवणींनें आगरकरांची ओळख पटेल व नव्या पिढींतील तरुणांना आगरकरांशीं ओळख होऊन ओळखीच्या खुणांनीं आत्मनिरीक्षण करतां येईल व आपल्या आक्रमशक्तीचे अंदाज नि आराखडे बांधतां येऊन नवीन इतिहासाची घडण मार्गी करता येईल अशी मला आशा आहे.

स्वतां आगरकरांनीं आपल्या आयुष्याचा आराखडा आखूनच कार्याचीं पावलें टाकलीं होतीं आणि कर्तव्यपूर्तीचें समाधान भोगलें होतें. द्रौपदीनें " दारिद्र्याची देणगी दे म्हणजे परमेश्वरा तुझें स्मरण मला नित्य राहील " अशी करुणा भाकल्याची कथा आहे. पुनर्जन्मावर व अर्थातच पूर्वजन्मावरही विश्वास नसलेल्या आगरकरांनीं कधीं काळीं अशी प्रार्थना केली असल्याचा संभव नाहीं; पण दैवानें आगरकरांना दारिद्र्यांत जन्माला घातलें, यामुळें आगरकरांना जो अनुभव चाखावा लागला त्यावरून समाज--स्वरूप शक्ति--देवतेची त्यांना ओळख पटली व त्या शक्तीच्या उपासनेसाठीं आणि उठावासाठीं त्यांनीं आमरण दारिद्र्य पतकरलें, एवढें बरीक खरें. उघड्या डोळ्यांनीं आणि

उघड्या कानांनीं जगांत वावरणाऱ्या प्रत्येक जाग्या मेंदूच्या माणसाला समाजाची शक्तिदेवता अनुभवास यावी लागते. तरच तो तिचा सेवक नि सेवेच्या द्वारां उत्थापक होतो. दारिद्र्य पतकरो वा न पतकरो, सेवाव्रताचा हा मनोराय अंतःकरणाच्या श्रीमंतीनें आणि हाताच्या उभारीनें समाजाच्या नि राष्ट्राच्या तेजोवर्धनार्थ सारखा त्याग--स्वार्थाचा यज्ञ करण्यांत आनंद मानीत असतो. आगरकरांच्या चरित्राचा हा बोध आहे. मनुष्य हा आपल्या कानांचा व डोळ्यांचा एक अंश असल्या-कारणानें, उघड्या डोळ्यांच्या नि उघड्या कानांच्या माणसाला जागतिक जीवनाच्या पुस्तकांत जें वाचावयास सांपडतें व प्रमाणपुस्तकांच्या जगांत जें अनुभवास येतें, त्यांतून आगरकरांच्या चरित्राचा वरील बोध पटावयास कांहींच कठीण पडूं नये. आगरकरांच्या समकालीनांचीं व साथ्यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत; त्याच-प्रमाणें श्री. जगन्नाथ धोंडू भांगले (१८९५), श्री. हरि बल्लाळ परचुरे (१८९६), प्राध्यापक माधव दामोदर आळतेकर (१९३०) व प्रथितयश साहित्यिक विष्णु सखाराम खांडेकर (१९३२) यांनीं आगरकरांचीं चरित्रें प्रसिद्ध केलीं आहेत; "त्यांना वाट पुसत पुसत" आगरकरांच्या चरित्राचा 'मागोवा' घेत असतां, माझें तरी निदान वरीलप्रमाणें मत होत गेलें, हें मला प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे.

आणि या मताचीच छाया त्या वाङ्मयाच्या अभ्यासपूर्वक वाचनापूर्वींही माझ्या मनावर पडत होती. माझ्या गांवचे दोन महाभाग महाराष्ट्राचे मानकरी आहेत— एक सुश्लोकराघवकर्ते विठोबाअण्णा वेंद्रे दफ्तरदार आणि दुसरे गोपाळरावजी आगर-कर. अर्थात या दोघांसंबंधीं माझ्या मनांत सादर चिकित्साबुद्धि असणें स्वाभाविक नाहीं काय? प्रत्येक हरिदासाच्या तोंडी ज्यांची कविता बसली ते विठोबा अण्णा दफ्तरदार आपल्या तपस्येनें व पावित्र्यानें जेवढे आदरणीय तेवढेच आपल्या निराळ्या क्षेत्रांतील तपस्येनें व पावित्र्यानें महाराष्ट्राला नवचैतन्य देण्यांत नांव केलेले गोपाळरावजी आगरकर. त्यांतून, ज्या मराठी व इंग्रजी शाळेंत गोपाळरावजी आपलीं पहिलीं पुस्तकें शिकले, त्याच शाळेचे विद्यार्थी होण्याचें भाग्य ज्या माझ्यासारख्यांला लाभलें, त्यांला एकप्रकारच्या सात्विक अभि-मानानें आगरकरांच्या चरित्राचा अभ्यास करावासा वाटला. त्या दिशेनें आगरकरांचे सहाध्याही कऱ्हाडचे कै. गंगाधरनाईक घाटे व शिष्य वाईचे कै. बुवासाहेब देशपांडे नाझर यांच्या सारख्यांशीं आणि उंब्रजचे रहिवासी व गोपाळरावजी आगरकरांचे मेहुणे श्री. केशवरावची फडके वगैरे आगरकरांच्या आप्तेष्टांशीं बोलणें--चालणें करून मी स्वतांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं माहिती घेत गेलों. तसेंच त्यांच्या त्यांच्या संग्रहीच्या टिपणाटापणांचें उतारे करूं लागलों. तेव्हांच आगरकरांच्या चरित्राचा वर उल्लेखिलेला प्रबोध माझ्या मनी मूळ धरूं लागला होता. पुढें, वरील वाङ्मयाच्या अभ्यासानंतर आपल्याला होत असलेला हा प्रबोध कितपत बरोबर आहे हें पडताळण्यासाठीं आगरकर—चरित्राचा एकादा दुसरा पैलू घेऊन मी तो अभ्यासपूर्वक लोकापुढें मांडावयास सुरवात केली; आणि आगरकरांच्या

" शिक्षकत्वाची द्वारका " मी ऐक्यांतून मांडल्याबरोबर वर उल्लेखिलेल्या बुवासाहेब देशपांड्यांनीं अभिनंदनपत्र पाठवून कळविलें कीं, " मला माझ्या विद्यार्थीदशेची उजळणी झाली. " लोकमान्य टिळक नि गोपाळरावजी आगरकर यांची तुलना मी केसरींत प्रसिद्ध केली तर तिचे उतारे अनेक नियतकालिकांनीं केले व गुजराथींत आणि हिंदींत ह्या तुलनेचीं भाषांतरें झालीं. " सम्पादक आगरकर " व " राजकारणी आगरकर " या पुस्तिका प्रसिद्ध होतांच नागपूरच्या महाराष्ट्रानें अभिप्राय व्यक्त केला कीं—

" आगरकरांच्या चारित्र्याचा एक एक पैलू घेऊन व त्यावर आपल्या टीकेचे संस्कार करून ते लोकांचे नजरेस आणावयाचे हा श्री. गोखले यांचा उपक्रम अभिनंदनीय आहे. "

तथापि या लौकिक अभिप्रायापेक्षां प्राध्यापक व इतिहाससंशोधक कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांनीं वरीलसारख्या सर्व संस्कारयुक्त पैलूंचा एक संग्रह केला असतां तो ग्रंथ चांगला उपयुक्त होईल अशी सूचना केली व उत्तेजिलें कीं, " आपण मराठी भाषा मोठी चांगली लिहितां. आगरकरांचें ऋण एका कऱ्हाडवासियानें फेडणें हें अत्यंत योग्य आहे. "

अशा शाबासक्यांनीं माझ्या अभ्यासाला आत्मविश्वासाची जोड मिळाली. आणि जेव्हां कां मी " आगरकर चारित्र व कार्य " ही प्रस्तुत ग्रंथाचा पहिला भाग असलेली पुस्तिका स्वतंत्रपणें प्रसिद्ध केली तेव्हां केसरीनें कौतुक केलें कीं—

" समाजभूषण पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले यांनीं आगरकर-वाङ्मयाचा अभ्यास बरेच दिवस केला आहे. मराठी वाङ्मयाचीही त्यांना फार आवड आहे. या दोहोंचें चांगलें मिश्रण या हृदयंगम पुस्तकांत झालें आहे. आगरकरांचें चरित्र, त्याचें महत्त्व, आगरकरांची कामगिरी चटकदार रीतीनें वर्णिली आहे. ' घरगुती आगरकर ' हा भाग चित्ताकर्षक आहेच. चरित्रकथनाचा भाग तर लेखकानें जणुं काय काव्यमय भाषेंतच लिहिला आहे. " **—दि. वा. दिवेकर** ( नोव्हेंबर १९३९ )

अशा रीतीनें माझ्या अभ्यासाची दिशा बरोबर आहे; आगरकरांच्या प्रतिपक्षियांचे वाभाडे न काढतांही आगरकरांची म्हणून कांहीं स्वतंत्र प्रतिष्ठा आहे व ती आपण नीटनेटकी मांडू शकतों; आणि आगरकरांचा न्याहाळून अभ्यास आपण जसा केला तसाच तो लोकांच्या पुढें मांडला तर अभ्यासपूर्ण चरित्रलेखनाची एक अभिनव मांडणी मराठी सारस्वतांत सुरू होईल — अशा तऱ्हेचे विश्वास नि आकांक्षा माझ्या मनांत उत्पन्न झाल्या. परिणाम म्हणूनच कीं काय, आगरकरांच्या आजच्या पुण्यतिथीदिवशीं त्यांच्या स्मरणपूजेच्या निमित्तानें " आगरकरांशीं ओळख " मी वाचकांस ग्रंथरूपानें सादर करीत आहे.

सदर ग्रंथाच्या अवलोकनानें माझे विश्वास व माझ्या आकांक्षा कोणत्या तोलामोलाच्या होत्या व आहेत हें वाचकांना जसें जोखता येईल तसेंच राष्ट्रीय जीवनांत आगरकरांच्या कामगिरीची प्रतिष्ठा कितपत याचेंही महत्त्वमापन करतां येईल. कारण

आगरकरांच्या हयातीचें सालवार सिंहावलोकन केल्यावर, ज्यायोगें माणसाची खरी योग्यता प्रत्ययास येते, त्या खाजगी–घरगुती जीवनाचा आढावा घेऊन आगरकरांच्या चरित्राची सूत्रमय मांडणी केली आहे आणि या सर्वांला आगरकरांच्याच लेखांतून मिळाले तेवढ्या आत्मचरित्रविषयक उल्लेखांची जोड दिली आहे. अशा रीतिनें पहिल्या भागांत आगरकरांच्या चरित्राची, चारित्र्याची व चैतन्याची रूपरेखा दिल्यानंतर दुसऱ्या भागांत आगरकरांचीं अंगेंप्रत्यंगें रंगढंगासह पृथक्पणें पडताळून प्रत्यय घेतला आहे कीं, आगरकरांच्या जीवनविकासाचें व जीवनविलासाचें केंद्र कर्तव्यदक्षतेंत आहे. याच कर्तव्यदक्ष आगरकरांची त्यांच्या समकालीनांशीं व परदेशांतीलही समानविचारकांशीं तुलना मांडून आगरकरांची एकंदरीनें प्रतिष्ठा "विवेकयुगाचे प्रवर्तक" म्हणून कशी आहे याचें दिग्दर्शन तिसऱ्या भागांत केलें असून "आज आगरकर असते तर ?" या कुतूहलाचें समाधान करण्याचा प्रयत्न शेवटीं केला आहे. आणि हें सर्व शक्य तोंवर आगरकरांच्या शब्दांनीं व धर्तीनें मांडण्याकडे लक्ष पुरवलें आहे. या सर्वांच्या निरीक्षणानें माझ्या अभ्यासपूर्ण चरित्रमांडणींत एका हारांतील फुलांमधून जाणाऱ्या सूत्राप्रमाणें एक धागा आहे आणि त्याचा बळकटपणा म्हणजे मागें उल्लेखलेला आगरकरांच्या चरित्राचा प्रबोध होय, अशी सर्वांची खात्री पटेल. ठीक आहे. समाजस्वरूप शक्तीदेवतेची दृष्टादृष्ट व्हावी, तिची उपासना आणि उठाव जागतिक जमान्यांत विवेकशुद्ध साधावा आणि आपलें हिंदुस्थान हें राष्ट्र स्वयंप्रतिष्ठेनें नांदावें म्हणून वैयक्तिक सुखसर्वस्वाचा यज्ञ करीत रहावें हा आगरकरांच्या चरित्राचा प्रबोध आतां आपल्या अंगवळणीं नसला तरी तोंडवळणीं पडला असून एकजीव मिळणीनें नि विवेकशुद्ध सरणीनें अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं आपापल्या परीनें सामाजिक, राजकीय नि आर्थिक क्षेत्रांत लोकशाही प्रस्थापण्याच्या प्रयत्नांत आपण थोडेफार यशस्वी होत आहोंत. आगरकरांच्या वारसांना शोभेलशा निर्मळ निर्भयतेनें त्यांच्यापेक्षां आपण सवाई कर्तबगारी केली कीं नाहीं हा प्रश्न कालपरिपक्व इतिहास लिहिणाऱ्या चिकित्सकाचा आहे. त्याची सोडवणूक त्याच्याच अधिकारांत सोपवून, आगरकरांपासून गेल्या दोन पिढ्यांच्या कर्तृत्वाच्या निशाण्या आपण न्याहाळूं लागलों तर, परतंत्र राष्ट्रांतील साधनाभावीं जीव धरून राहण्यांतही मेटाकुटीस येणाऱ्या आपणांसारख्या मंडळींनीं राष्ट्रीय बुद्धीचा आपला नंदादीप कर्तव्यनिष्ठेच्या स्नेहानें तेवत ठेवलेला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे, असेंच आढळून येईल.

पण जरा खोल विचारांत शिरलों तर जीवनाच्या लहानमोठ्या क्षेत्रांत समाजशक्तिचा सर्वगामी संचार सुलभ, सुकर नि सुखकारक कसा होईल याची अचूक तत्त्वप्रणाली व तदनुषंगिक कार्यप्रणाली कोणी निर्माण केली नाहीं, हें कबूल करावें लागेल. बर्फासारखा थंड गोळा होऊन पडलेल्या हिंदुस्थानला सर्व बाजूंनीं ऊब आणून त्यांत हालचाल निर्माण करण्याचें कार्य रानडे--पिढीनें केलें आणि चिपळूणकर--आगरकर--टिळक पिढीनें त्यांत चैतन्य–जिवंतपणा खेळवला, खुलवला, फुलवला. याच

चैतन्याला किंवा जिवंतपणाला कार्यप्रवाही करण्याचे प्रयत्न फारच मोठ्या प्रमाणांत गेल्या दोन पिढ्यांत झाले; पण या साऱ्या चारी पिढ्यांची स्फूर्ति, वळण आणि ध्रुवतारा पाश्चिमात्य स्वतंत्र राष्ट्रांतील तत्त्वज्ञान्यांच्या, समाजसेवकांच्या अगर मुत्सद्यांच्या आणि कविंच्या उठावदार प्रतिपादनांतून नि चळवळींतून आत्मसात् केलेला आढळतो. असें करण्यांत कांहीं पाप आहे असें नाहीं. पण हा परधार्जिणेपणा हिंदुस्थानचें जीवनमान नव्हे. हिंदुस्थानच्या पुढें एका जागतिक सेवेचा कार्यक्रम आहे आणि तो हिंदुस्थानच्याच हातून पार पडावयास हवा, अशी हिंदुस्थानची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. अनेक आपत्तींच्या राजकीय नि लष्करी झंझावातांतून हिंदुस्थान आपल्या पूर्वार्जित चैतन्यकर इतिहासासह जगापुढें व जगाच्या डोळ्यावर राहिला आहे, त्यांतील कालसंकेत कदाचित 'हिंदुस्थानच्या हातून मानवजातीची ती चिरकालीन सेवा घडावी' असाच असेल.

[मानवतेचें ऐहिक कल्याण करण्याकरितां स्वार्थाचा यज्ञ करीत रहावयाचें आणि समाजाला "असुनि जिवंतही मेला" अशी अवस्था येऊनच द्यावयाची नाहीं; ज्या दिवशीं अशी सेवा करण्याचा मगदूर आपल्या मनाजवळ, मेंदूजवळ नि मनगटाजवळ उरणार नाहीं त्या दिवशीं, तो मगदूर असणारांच्या स्वाधीन तो सर्व संसार करून आपण त्यांतून निरपेक्ष निवृत्ति घ्यावयाची; मन, मेंदू व मनगट यांच्या मगदुराप्रमाणें समाजाच्या चैतन्याचे संरक्षणाचा नि संवर्धनाचा कर्मयोग आचरीत असतांही इष्ट परिणामांनीं हुरळून 'चढेल' बनावयाचें नाहीं कीं अनिष्ट नि अनपेक्षित परिणाम झाले म्हणून गळून 'पडेल' पहिलवानाचा पाणउतारा स्वीकारावयाचा नाहीं; हें भारतीय आर्यत्व नीट सांभाळण्याची जबाबदारी तर भारताच्या सुपुत्रांवर व सुकन्यांवर आहेच आहे.] पण यापेक्षांही इतिहासानें त्या जबाबदारींत भर घातली आहे. मोंगल साम्राज्यानें नि त्यायोगें येथें झालेल्या सामाजिक स्थित्यंतरांनीं आपणांस हें स्पष्ट शिकविलें आहे कीं, या जगांतील निसर्गानें निर्माण केलेलें आणि मनुष्याकडून निर्माण होऊं शकणारें सौंदर्य, सुख, सोयसाधन यांचा आस्वाद घेऊन मनुष्य आराम न करील तर तो निसर्गाच्या उदारतेचा व मनुष्याच्या उत्पादक नि संशोधक बुद्धिमत्तेचा अवमान आहे, अवहेलना आहे. जगांतील विचारवंताची बुद्धिमत्ता कर्मयोगशास्त्राकडे खेचून आणणारी भगवद्गीता ही जशी हिंदुस्थानची एक अभिमानसंपदा आहे, तशीच, जगाचे डोळे हिंदुस्थानकडे खेंचणारा आग्र्याचा ताजमहाल ही देखील हिंदुस्थानची एक अभिमानसंपदा आहे. या दोनही अभिमानसंपदांच्या विषयीं छातीला माती लावून आपण जगाकडे पहात असतों. या जगाकडे बघण्याच्या आपल्या दृष्टीला दृष्टी भिडवून इंग्रजी राज्याबरोबर आपल्या इकडे जी पाश्चात्य संस्कृति आली, तिनें आपल्या जीवनाचा बाजार केला आणि ज्या आपल्या या भरतभूमींत सोन्याचा धूर निघत होता, त्या भरतभूमीच्या वाटणीला व्यापारी तत्त्वानें धूर तेवढा ठेवून सोनें मात्र लुटून नेलें. पण त्या सोनेमोलानें आपणांस एक जीवनाचें शाश्वत तत्त्व

पद्धरीं बांधलें कीं, मनुष्यसमाजाचें ऐहिक कल्याण व सुखवर्धन करण्यासाठीं वैयक्तिक स्वार्थाचा होम करावयास, जवळ कांहीं खरोखरीचा स्वार्थ, स्वतांच्या सत्तेची संपत्ति हवी. इतकेंच काय, होमावयाची असो वा उपभोगावयाची असो, ती स्वतांच्या सत्तेची संपत्ति सातत्यानें आपल्या हातीं प्रवाही असावी. म्हणून उत्पादन, विभाजन नि मूल्यमापन यांच्या बाबतींतही डोळ्यांत तेल घालून उद्योग करावयास हवा. मरेमरेपर्यंत काम करावें, त्या कामांतून उत्पादन साधावें, त्या उत्पादनाची वाटणी तोलामोलानें करावी आणि उपभोगाच्या सहजतेसाठीं साधन-सामुग्रीही निर्माण करावी, अशी ही पाश्चिमात्यांची संस्कृति उद्योगी आहे. उत्साही उद्योगानें उत्पादन, वाटणी व उपभोगक्षमता वाढवली तरच ऐहिक सुखाची नि उन्नतीची आशा मूळ धरते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या या विशाल दर्शनामुळेंच, तें दर्शन करविणारें इंग्रजी राज्य हें न्यायमूर्ति रानड्यांना ईश्वरी योगाचें वाटलें. कारण त्यामुळें हिंदुस्थानच्या ऐतिहासिक जबाबदारीच्या विकासाचें वाढतें स्वरूप लक्ष्यांत आलें. तें हें कीं पाश्चिमात्यांची उत्पादक उद्योगरति, मोंगलांनीं मुसलमानी संस्कृतीची देणगी म्हणून येथें चिरस्थायी केलेली उत्साही उपभोगरति आणि कर्तव्यबुद्धीनें मानवजातीच्या आटोकाट सुखस्वास्थ्यासाठीं स्वार्थाचा पलिता करूनही येणाऱ्या यशापयशाच्या पलिकडे कर्तव्यपूर्तीच्या समाधानांत राहणारी भारतीय आर्यत्वाची "उदासीनता" यांचा त्रिवेणी संगम साधून जगाला एक नवी संस्कृती देणें आणि जगाला माणुस-कीचा धर्म शिकवणें, हा हिंदुस्थानच्या जीवनाचा मानबिंदू आहे. {उत्पादक उद्योग, उत्साही उपभोग आणि उन्नत वा उदात्त उदासीनता जिच्यांत समाविष्ठ आहेत आणि मानवी जीवनरसांला पोषक होऊन जी आचारशुद्ध राहूं शकेल, अशा संस्कृतीच्या निर्मितीसाठीं हिंदुस्थाननें झटावयाचें तर उद्योगरतांच्या पाश्चात्य संस्कृतीचें भाष्य हिंदुस्थानच्या गळीं उतरावयास हवें होतें. आगरकरांनीं हीच कामगिरी उत्कटत्वानें केली म्हणून पाश्चात्य संस्कृतीचे मराठी भाष्यकार या नात्यानें त्यांचें नांव महाराष्ट्रांत नि मराठी भाषेंत अजरामर राहीलच राहील.} पण त्यापेक्षांही आगरकरांना महाराष्ट्रांत अलौकिकत्व लाभलें आहे, तें हिंदुस्थानच्या जीवनाचा मानबिंदु ब्रिटिश सत्तोत्तर कोणता हें त्यांनीं महाराष्ट्रांत प्रथमच स्पष्टच मांडलें या गोष्टीमुळेंच. आगरकरांनीं बजावलें नाहीं काय, कीं—

"विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हत. हळूहळूं प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे, व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नती होऊं लागली असें म्हणता येऊं लागेल." अशी अवस्था निर्माण करणारी उद्योगी, उपभोगी नि उदात्त संस्कृति निर्माण करण्याचें सामर्थ्य भारतीय, महंमदी नि पाश्चात्य संस्कृतीचें पाणी इतिहासाच्या ओघांत आपल्या अंगीं मुरवून घेतलेल्या हिंदुस्थानलाच करतां येईल. आगरकरांच्या भविष्यदृष्टीला

त्या आगामी संस्कृतीचा प्रकाश दिसला असला तरी आगरकरांनींच काय, पण महाराष्ट्रांतील व इतर प्रांतांतीलही महदाटोपाच्या बुद्धिसागरांनींही, त्या इष्ट व अपेक्षित संस्कृतीचीं आचाररत्नें दाखविलीं नाहींत, ही दुर्दैवाची गोष्ट होय. नाहीं म्हणावयास, महात्मा गांधींनीं त्या दृष्टीनें जीवनाच्या सर्व भागांचें संचालन केलें आहे खरें; पण त्या आभिजात संचालनाला सोज्वळ, सर्वंकष व साहजिक स्वरूप अजून यावयाचें आहे. हीच कामगिरी स्वतंत्र बुद्धीच्या उत्साही तरुणांपुढें आहे. दोन पिढ्यांपूर्वी होऊन गेलेल्या गोपाळरावजी आगरकरांच्या कामगिरीचा नि चैतन्यकर समाजसुधारणेचा वारसा ज्यांच्याकडे आहे ते आपल्या अकलेचा पवाड घालून नि ब्रह्मांडाहून जाड होऊन आपलें जीवितकार्य यशस्वीपणें पार पाडतीलच पाडतील. म्हणून तर आगरकरांच्या समाजसुधारणेच्या आद्यतत्त्वाचें फिरून फिरून स्मरण ठेवणें, तें हें कीं:–" समाजाच्या स्थैर्यास व प्रगतीस जेवढीं बंधनें अपरिहार्य तेवढीं खेरीज करून, प्रत्येक बाबतींत व्यक्तिमात्रास संपूर्ण स्वातंत्र्य हवें." म्हणजेच व्यक्तिव्यक्तींच्या पोशाखादि–साध्यासुध्या गोष्टीपासून सर्वत्र सुख, सौंदर्य, सोय, सोपेपणा आणि साहजिकता याबाबत सर्वथैव स्व–तंत्रतता असली तरी दृष्टी समाजाच्या स्थैर्याची व प्रगतीची पाहिजे, असा आगरकरांचा कटाक्ष होता. तोच कटाक्ष राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारांतही आगरकरांनीं मानला आहे. आगरकर म्हणतात कीं, "आज नाहीं उद्यां ज्यांचें राज्य त्यांच्या हातांत पडणें हेंच इष्ट आहे. कारण, तसें झालें तरच जगांतील द्वंद्वें नाहींशी होऊन त्यास शांतीचा व तज्जन्य इतर सुखांचा उपभोग मिळणार आहे." म्हणजेच जगांत शांतियुग आणि माणुसकीचा धर्म नांदावा म्हणून जेवढीं आंतर्राष्ट्रीय बंधनें अपरिहार्य तेवढीं खेरीज करून बाकी सर्व बाबतींत लहानमोठ्या सर्व राष्ट्रांस संपूर्ण स्वातंत्र्य निखालस मिळालेंच पाहिजे. तेव्हां, स्वयंतंत्र, स्वतंत्र व्यक्तिजीवनांत राष्ट्रीय स्थैर्य नि प्रगतीची दृष्टी व स्वतंत्र, स्वयंपूर्ण आणि स्वयंतंत्र अशा हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांत जागतिक शांतियुगाची, माणुसकीच्या धर्माच्या प्रस्थापनेची आणि मानवजातीच्या प्रगतीची दृष्टी सांभाळणें हिंदुस्थानच्या सुपुत्रांकडे येतें. म्हणूनच विकास–विलास–उल्हासांची, उद्योग–उपभोग–उन्नतीची, काम–आराम–विश्रामाची संस्कृती आचारशुद्ध यशस्वितेनें जगाला देण्याची जबाबदारी आगरकरांच्या समाजसुधारणेचा व धारणेचा वारसा सांगणारांनीं स्वीकारली पाहिजे. तें तेज प्रगट करण्यास पुढें होणाऱ्या तरुणांना आणि त्यांना आशीर्वाद देणाऱ्या अनुभव–वृद्धांना नि सहाय्यकांना मी हा मानाचा व ओळखीचा नमस्कार करीत आहे तो त्यांनीं स्वीकारावा.

हा ओळखीचा मुजरा करण्याचें सामर्थ्य यावयाला आगरकरांच्या अंतरींची खूण पटविणारा त्यांच्या चरित्राचा, चारित्र्याचा नि चैतन्याचा अभ्यास माझेकडून घडावा म्हणून ज्यांचा ज्यांचा आशिर्वाद, पाठिंबा नि मदतीचा हात कारणीभूत झाला, ज्यांच्या ज्यांच्या लेखनांचा नि टीकांचा, अभिप्रायांचा नि आठवणींचा,

चरित्रचित्रांचा व चारित्र्यचमत्कारांचा अनुभव मिळाला, आणि आगरकरांचें मोडी हस्ताक्षर मिळवून देणारे ती. तात्यासाहेब रेठरेकर वकील, टेंभू येथील आगरकरी घाट व देवालयाचे फोटो काढून देणारे चि. कमलाकर गणेश फडके कऱ्हाड, आगरकरांचें तिरंगी चित्र तयार करून देणारे मुंबईचें आर्टिस्ट श्री. दलाल, प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईचें काम करणारी सातारा आनंद प्रेसची सर्व लहानमोठी आस्तेवाईक मंडळी, तिरंगी चित्र छापून देणारे पुण्याचे श्री. राजगुरु, कागद नियंत्रणाच्या आजच्या काळांत लेखक म्हणून माझे सर्व हक्क कायम ठेवून प्रस्तुत ग्रंथ प्रकाशणारे श्री. तारळेकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर प्रभृतींच्या चित्रांचे ब्लॉक देणारे चित्रशाळेचे संचालक, वगैरे वगैरे, ज्यांच्या हार्दिक सहाय्यानें, आज आगरकरांच्या ५० व्या पुण्यतिथीदिवशीं मराठी भाषेची सेवा तशीच आगरकरांची वाङ्मयपूजा मला साधतां आली, त्या त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून श्री समर्थांच्या वाणीनें आळवितों कीं—

देशकाल–वर्तमान । सर्वही अवेधमान ॥
कोणतें विधि–विधान । सावधान सावधान ॥

कऱ्हाड, १६ जून १९४५. —पुरुषोत्तम पांडुरंग गोखले.

# तोंडओळख

ओळखीचा नमस्कार १ ते ९
तोंडओळख १ ते ५

## भाग १ ला—चरित्र—

" जीवा भांबवल्या सुदीपग्रह हा " २

प्र. १ लें:— **मनोमन आगरकर.** एकूणचाळीस सालांतल्या महत्त्वाच्या घडामोडी ३.

प्र. २ रें:— **घरगुती आगरकर.** गोपाळरावांचें " कैसें बोलणें, कैसें चालणें " ८; सरस्वतीबाई आगरकरांची कृष्णाबाई ११; भाऊसाहेब भागवतांची अपेक्षा व " कर्णाला छपरावर ठेवून त्याचें दातृत्व-वर्णन " १२—१३; रोंधे मास्तरांचीं प्रवचनें-अहमहमिका ही स्वर्गीय देवता १४; जगाबरोबर चला—जुन्याच्या जीवावर नवें निशाण उभारतें १५; गोविंदबुवा आगरकरांनीं कऱ्हाडच्या वाचनालयांत १८८९ सालीं प्रतिपादलेला व ' चित्रगुप्त ' कऱ्हाड या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेला पातंजलयोग १६; सनातनी सत्यंकाकूनीं केलेलें सुधारक आगरकरांचें गुणग्रहण १८; सौ. आगरकरांचें ओटीभरण व न्यू इंग्लिश स्कूलचें निशाण १९; सुधारकाचें मराठी व इंग्रजी जन्मटिप्पण २०–२२; टापशी बांधलेला व पंचा नेसलेला सुधारकाचा संपादक २३; " माझा कोठा सर्व रसायनांचा अर्क २४; मधल्या चहाचें बिल—" पेरून ठेव केव्हांतरी उगवेल " २५; झोंप येते म्हणून निजले ते निजलेच—' माझ्या प्रेतदहनार्थ ' अशी चिठ्ठी मारलेली पैशाची पुरचुंडी २६; वाङ्मयतिलांजली २७—२८.

प्र. ३ रें:— **चरित्रकथन.** बच्चाजीपंतांची कर्तबगारी नि बोलबाला २९; ' बारा वर्षांवरी इंग्रजीचीं तीन बुकें ' ३०; कऱ्हाडपासून रत्नागिरीपर्यंत प्रवास व शागीर्दी ३१; " हातानें स्वयंपाक करावयाला राजी हो " ३२; एकीकडून सरस्वतीची एकनिष्ठ सेवा तर दुसरीकडून लक्ष्मीचा गृहप्रवेश ३३; ' मुलाकडे पाहूनच मुलगी पदरांत घ्या, म्हणतों '— लोकशिक्षणाचें निदान ३४; एम्. ए. नापास— केसरीची कोल्हापूरकडे नजर ३५; डोंगरींतील कुदळकाम ३६; नवी विटी नवें राज्य ३७; महाराष्ट्रीय अंतःकरणाचे कढ ३८.

प्र. ४ थें:— **आपल्याच शब्दांत आगरकर.** सार्वजनिक शिक्षणाचें प्रयोजन, महाबळेश्वरी समुद्रदर्शन--भ्रम दूर झाला ३९; महाबळेश्वरी—टिळक आगरकर—केरूनाना छत्रे ४०; नानांचा आनंद— निरोप— गरीबांस मदत ४१; आमचीं लग्नें—माहिती— प्रेतसंस्कार ४२; ग्राज्वेटपंचायतनापैकीं धर्मराजाचा मृत्यु ४३; लोणीकाप्या वस्तऱ्याचें सुख व मित्रांच्या भेटी ४४--४५; पोकळ विद्या व मिथ्या देशाभिमान ४६; केसरींतील न्हाणवली— हॅम्लेटचा हेतु ४७–४८; महाराष्ट्र ॲडिसनचे लेख पुस्तकरूपानें द्या ४९; सुधारकाचा चरितार्थ ५०–५१; पुणेरी जोड्यांत सुधारणा—महाराष्ट्रियांस अनावृत्त पत्र ५२–५४

भाग २ रा विविधदर्शन—

प्र. १ लें:– **विद्यार्थी आगरकर.** आगरकरांची विद्यार्थीदशा म्हणजे पांचालीची प्रतिष्ठा ५७; अडीअडचणींतून ज्ञानाचा पिच्छा ५८; व्यर्थ भाराभर केलें पाठांतर, जोंवर अंतर शुद्ध नाहीं ५९; भागवतापेक्षां गिब्बन वाचा ६०; तुमच्यासारखा एम्. ए. होईन तर नांवाचा आगरकर ६१.

प्र. २ रें:– **शिक्षक आगरकर.** जनकार्याविण मरूं कशास्तव ? ६२. मतभेद झाला असतांही विद्यार्थ्यांविषयीं प्रेम ६३ पांगारकर पेट्रिअट आहे, टिळकाईट आहे. ६४.; मी कांहीं ब्रह्मदेव नाहीं किंवा बृहस्पती नाहीं. ६५; इंग्रजी व्याकरणाच्या कारिका ६६; कोणत्या गुरूचा कोणता गुण उचलला ६७; 'रचिला ज्याचा पाया त्याची भली उभारणि झाली' ६८; विद्यर्थ्यांचा प्रेमळ बाप ६९.

प्र. ३ रें:– **वक्ते आगरकर.** शाबास, वीरांनो शाबास ७०; ग्रीष्म ऋतूंतील ओहोळाइतकेंच वागीश्वर आगरकरांचें वक्तृत्व. ७१

प्र. ४ थें:– **संपादक आगरकर.** पोरांना शाळा तसें थोरांना वृत्तपत्र ७२; वर्तमानपत्रें लोकांचे कोतवाल कीं प्रेमळ गुरु ७३; लोकमत लहरी असतें म्हणून त्याचा तिरस्कार करतां येत नाहीं ७४; जाहिरातींचें शास्त्र व प्रत्येक विषयाचें विवेचन निःपक्षपात बुद्धीनें ७५; चांगल्या लोकांनीं चालविलेलें केसरीइतकें स्वस्त वर्तमानपत्र केसरीच ७६; संपादकाची जबाबदारी मूर्त कीं अमूर्त ७७; प्रजानुरंजन हें वृत्तपत्राचें काम राजदंडाच्या न्यायनिष्ठुरतेनेंच करावें लागतें ७८; पिळदार मन सवंग लोकप्रियतेस हापापलेलें नसतें ७९; घरींच पाहुणेपणा किती चालणार ८०; कोण कोणाला सळो कां पळो करतो, पाहूं ८१; वृत्तपत्रांतील इंग्रजी-मराठी व समाजाच्या निरीक्षणाची करपुतळी ८२; सुधारकाचा देशाभिमान ८३; देशाभिमानी पुरुषाची चिपळूणकरी दीक्षा ८४; सुधारकाला आहेर ८५; पत्रकाराचा धंदा ८६; आमच्यासाठीं आपण कांहीं करीत नाहीं ८७; आगरकर व स्टील ८८.

प्र. ५ वें:– **लेखक आगरकर.** निबंधमालेच्या परंपरेचे विशेष ८९; आगरकर भाषासुंदरी कशी नटवीत ९०; आगरकरांची शद्बसंपत्ति ९२; रेखीव शद्बाबद्दल बेफिकीरी ९३; आगरकरांनी आळवले ते रस ९४; विविधविषयसंग्रह व विकारविलसित ९५; डोंगरींतील एकशे एक दिवस व वाक्यमीमांसा ९६; संस्कृतप्रधान मराठी सरणी ९७; आगरकरांचें अंतःकरण कोणत्या लेखांतून खुलें होतें ९८; आपल्या मतांविषयीं अभिमान व कार्याविषयीं निष्ठा ९९ आगरकरांच्या लेखनांतील 'वाचावाच' असा भाग १००–१०१

प्र. ६ वें:– **धर्मवृत्त आगरकर.** आगरकर खरोखरच धर्मवृत्त होते १०२; पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृती १०३; अद्वितीय कर्मयोग १०४; मानवतेच्या धर्मावर प्रज्ञा स्थिर कशी होते १०५; मनुष्याच्या स्थितीस पूर्णता येईपर्यंत सुधारकाच्या मनाची शांति व्हावयाची नाहीं. १०६; हिंदुधर्माला नोटीस १०७; नम्र झाला भूतां।

तेणें कोंडिलें अनंता ॥ १०८ आवश्यक पारतंत्र्य व पाहिजे तसें वागण्याची मोकळीक १०९; मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन हाच धर्म ११०; चिपळूणकरांना नवी स्मृती हवी होती १११; पूर्वीच्या ऋषींइतकाच आम्हांस अधिकार ११२; आगरकरांनीं नवी स्मृती कां लिहिली नाहीं ११३; छाटीनेंच कांहीं संन्यास होत नाहीं ११४; बुद्धीच्या विशालतेपेक्षां हृदयाच्या उदारतेस जगत्कारण--परमात्मा तावडतोब प्रतीत होतो ११५.

प्र. ७ वें:– **सुधारक आगरकर.** तेजस्वी इतिहासाच्या घडणीची गुरुकिल्ली—विचारप्रामाण्य ११६; नर करणी करील तर नारायण होईल—सुधारकाजवळ दुबळ्या दैववादाला जागा नाहीं ११७; आमचा निभाव कसा लागेल ११८; राजसत्तेची प्राप्ती, तिचें संरक्षण व सदुपयोग म्हणजे मोठमोठ्या राष्ट्रांच्या मालिकेंत भारतानें योग्य जागा पटकवावी ११९; आगरकरांपूर्वींचे सुधारक १२०; समाज तर प्रत्येक दिवशीं पुढें गेलाच पाहिजे १२१; बारीकसारीक गोष्टींनीं व्यक्तीचें जीवन होतें व व्यक्तीव्यक्तींच्या जीवनाचा दृढभाजक म्हणजेच सामाजिक जीवन १२२; जो तो लोकमताच्या बागुलबुवाला भिऊन बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं १२३; भाषाभेदामुळें आगरकरांचा लाभ ज्यास झाला नाहीं ते सामाजिक सुधारणेंत मागासले १२४; सामाजिक सुधारणेस कायद्याचें महत्त्व तितकेंच १२५; विचारी लोक कल्पक सुवर्णकार व समाज हा पैलूदार खडा १२६;

प्र. ८ वें:– **राजकारणी आगरकर.** स्वातंत्र्याची ‘ घाल ’ म्हणून कोणी भीक घालीत नाहीं १२७; कोहिनुरासकट मौल्यवान वस्तू परत आणूं १२८; अन्नास मोताद झालेल्या प्रजेच्या असंतोषामुळें अपाय घडेल १२९; स्वराज्याची भावना कशी रुजली १३०; संस्कृतीच्या संगमाचें सुदर्शन १३१; शास्त्रीबुवांची तालीम १३२; जसे लोक तशी त्यांची राज्यव्यवस्था १३३; जिकडे पहावें तिकडे उत्साहशून्यता दिसते १३४ स्वार्थत्यागाचा परामर्श घेणारे कौशल्य देशांत हवें १३५ इंग्रज खरोखरच हिंदुस्थान सोडतील काय? १३६ इंग्रजी ट्रस्टीशिपचा बाजा १३७; दुही माजवा आणि राज्य करा १३८; आमच्यांतील तंटेबखेडे मोडून टाकण्याचें मुख्य साधन — आम्हांस सत्ता देणें १३९; हिंदुस्थान आपली मुक्तता कां करून घेईल १४०; इंग्रजी राज्यापासून फायदे १४१; जगांतील द्वंद्वें कशानें नाहींशीं होतील १४२; सरकारवरील टीका लोकशिक्षणासाठीं १४३; आगरकरी संप्रदायाचीं लक्षणें १४४; प्रजा कितीही राजनिष्ठ असली तरी जुलूम दुःसह झाला असतां बंड करण्यास प्रवृत्त होते १४५; राजकारणांतही ध्वनीला महत्त्व असतें १४६; आमच्या राष्ट्रास खरें राष्ट्रपण आणण्यासाठीं आमच्या राष्ट्रसभेची स्थापना आहे १४७.

प्र. ९ वें:– **मुसलमानांविषयीं आगरकर.** हिंदु-मुसलमानांनीं भावाप्रमाणें वागण्यांतच उभयतांचें कल्याण आहे १४८; मुसलमानांची भीति १४९; क्रियास्वातंत्र्य राखून एकमेकांशीं व्यवहार होऊं देणारे गुण हिंदु-मुसलमानांत आहेत १५०;

हिंदु-मुसलमान दोघेही एकाच होडींत आहेत १५१; तय्यबजीसारख्यांच्या तंत्रानें वागा १५२.

प्र. १० वें:– **औद्योगिक उन्नतीविषयीं आगरकर.** सुखप्राप्ती व कलाविकास १५३; कारभार देतील पण व्यापार देणार नाहींत; आपली हस्तकला टाकाऊ नाहीं १५४; खरें देशहित महाग देशींत नाहीं; थोडाबहुत तोटा सोसण्यांत आहे १५५; व्यापारासंबंधी आम्हांस राजरोस भांडता येतें १५६; वर्तमानपत्राचा संपादक म्हणजे आपला शद्व न् शद्व आचरणांत आणणारा रामदास नव्हे १५७

प्र. ११ वें:-- **स्त्रीसमाजासंबंधीं आगरकर.** मेन--मेकॉलेनीं स्त्रियांची परवशता कायदेशीर केली १५९; आर्यस्त्रीची प्रतिष्ठा १६०; ज्याला आपण पोर म्हणतो त्यास जपणें हें अवघड काम स्त्रीच करूं शकणार आहे. १६१; उभयतांच्या संमतीनें संततिनियमन साधावें १६२; पुरुषापेक्षां स्त्रियांत कमी काय आहे? १६३; साऱ्या स्त्रिया ज्ञानवती होतील त्यावेळीं पृथ्वीच स्वर्गतुल्य होईल १६४; मनुष्याच्या ज्ञानाचे पंचरस १६५; स्त्रीपुरुषांस सरोस संधि हवी १६६; प्रजेच्या द्वारा राष्ट्राच्या जिवंतपणाची साखळी फिरत असते १६७; सर्वांची योग्यता सारखी म्हणजे छापांतील गणपती नव्हे. १६८; गंगाभागीरथी व राजमान्य राजश्री १६९; समाजाची ध्येयसिद्धी स्त्रीघटकांवर अवलंबून असते. १७०.

प्र. १२ वें:– **कर्तव्यदक्ष आगरकर.** उतावळेपणा छळास कारण १७१; आगरकरांचा ग्रंथ कर्तव्यदक्षतेनें लागतो १७२; आगरकरांचे चित्र उपलब्ध नाहीं. १७३; लोकमताचें गणितशास्त्र १७४; श्रेष्ठतर कर्तव्यासाठीं जाहीर नामुष्की १७५; आगरकरांनीं संन्यासधर्म आचरला आहे; विवेकाची दानत १७७; आगरकरांची सार्वजनिक वंशावळ १७८; समुन्नतीसाठीं विचारक्रांति १७९;

## भाग ३ रा प्रतिष्ठा—

प्र. १ लें:– **लोकहितवादी व आगरकर.** लोकहितवादींचे सार्वजनिक वारस १८३; चालता बोलता विश्वकोश १८४.

प्र. २ रें:– **न्यायमूर्ती व आगरकर.** रानडे–आगरकरांची आपुलकी १८६.

प्र. ३ रें:–**शास्त्रीबुवा आणि आगरकर.** चिपळूणकर–आगरकरांचें बाल्य १८८; आवडीच्या विषयांत दोघेही गॅरिक १८९; लेखणीची धार आठवण ठेवणारी १९०; स्वराज्याखेरीज उपाय नाहीं. १९३; सुधारक बनावयाचें नाहीं तर माणसानें जन्माला तरी यावयाचें कशाला? १९४.

प्र. ४ थें:– **लोकमान्य व आगरकर.** टिळक–आगरकरांचे ग्रंथ म्हणजे पर्वत–पर्वती १९७; नेतृत्वाचा मान एकट्या टिळकांचाच १९८; टिळक–आगरकर एकमेकांची योग्यता जाणीत होते १९९.

प्र. ५ वें:– **गोखले आणि आगरकर.** धारेला लागलेलें पाणी भोंवरा करूं लागलें कीं अकल्पित स्थित्यंतर २००; गोखल्यांच्या लेखनसीमा २०१; मुद्देसूदपणा, प्रमाण-

बद्धता आणि साधार विवेचन हें गोखल्यांच्या वक्तृत्वाचें त्रिदळ २०२; गुरु बहुरंगी, शिष्य एकरंगी २०४ गोखले आगरकरांचा समानधर्म– न्यायनिष्ठुर सत्यप्रीति २०५.

प्र. ६ वें:– फुकुझावा आणि आगरकर. लोकशिक्षणाचें षड्गुणैश्वर्य २०६.

प्र. ७ वें:– ब्रॅडलॉ, मिल्ल, बाळशास्त्री व गॅरिसन आणि आगरकर. मिल्लचा न्याय म्हणजे स्नेहाकर्षण, करुणा व आदर २१०;

प्र. ८ वें:– कार्लाइल आणि आगरकर. प्रवाहपतित कार्लाइल आणि योजनादक्ष आगरकर २१४; नक्ष्यातोल्याचें शास्त्र पारखून घ्या २१७; प्रत्येक ग्रहाला व्यापक कक्षा नाहीं. २१९;

प्र. ९ वें:– साक्रेटिस आणि आगरकर. परार्थांतील परमार्थ परागंदा २२०; साक्रेटीस–आगरकर शिष्यांना वडिलांसमान २२१; छाप बसवावयास उपयोगी निष्कलंक चारित्र्य २२२.

प्र. १० वें:– विवेकयुगाचे प्रवर्तक आगरकर. बुद्धिवादाचें अस्तर भावना २२४ सर्वांगीण राष्ट्रीय स्वातंत्र्य हें आगरकरांचें ध्येय २२५; लोकनायकास उपदेश २२७; लहान थोरें परीक्षून सोडावीं २२८; आगरकरांचा आदेश – अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे २२९.

आज आगरकर असते तर ?

नवमतवादाला आरंभ आगरकरांनींच केला २३२; आगरकरांच्या सुधारणेचें प्राणापान– समता, स्वातंत्र्य, न्याय व नीति २३३, पन्नास वर्षांतील आंदोलनें २३४; मानवतेचें ऐहिक सुखसंवर्धन हा नव्या युगाचा धर्म २३५; विश्वास नव्हे विवेक मार्गदर्शक हवा २३६; अन्यायावर तुटून पडणें एवढेंच आगरकरांस माहित २३७; आपणच आपल्या काळचे आगरकर होणें जरूर २३८.

महत्त्वाची सूची:– २३९ ते २४४

चित्रावली:– आगरकर, आगरकरांचीं हस्ताक्षरें, टेंभू येथील घाट नि लक्ष्मी-नारायणाचें देऊळ, लाल चिंच, श्री. सी. ग. देवधर, प्रा. धों. के. कर्वे, प्रिं. आपटे, लोकहितवादी, शास्त्रीबुवा, लोकमान्य, ना. गोखले, न्या. रानडे आणि अर्पणपत्रिका.

एकूण पृष्ठें....................................................२७५

आगरकर:—

फार थोड्या काळांत पूर्व–पश्चिम सुधारणांतील अत्यंत हितकारी
भाग जींत सामील झाले आहेत अशा एका नामी सुधारणेची
स्थापना होऊन भारतीय आर्य अननुभूत अशा आधि-
भौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग
घेऊं लागतील.


कसल्याही
अन्यायावर तुटून
पडण्याचें असिधाराव्रत,
आकाश कोसळून पडलें तरी,
अखंडपणें चालविणाऱ्या सर्व
ज्ञाताज्ञात समाजसेवकास
सादर समर्पण.
पु. पां. गोखले

for the Sudharak in every district town as
you have secured at Nagar but my
physical & mental weaknesses make me
entirely unfit for such an adventure.

We have been trying our best to
make the paper as interesting and instruc-
tive as possible with a view to secure the
largest possible number of subscribers. It
will be impossible to conduct it on the
reduced rate of subscription unless we are
able to secure not less than 2500 paying
subscribers before the end of December.
The rate at which they are coming in
have not yet given us reason to be disappoin-
ted.

Will you kindly tell me what is the
opinion of R B Pandit about our agen
From the lots of letters that we receive every
week it appears that it is fast becoming popular
among the lower ranks of the Society.


I remain

Yours very sincerely


G G Agarkar

आगरकर यांचे इंग्रजी हस्ताक्षर.

K. JOSHI & Co.



आगरकर यांचे बाळबोध व- मोडी हस्ताक्षर.



# आगरकरांशीं ओळख

## भाग १ ला

अनुक्रमणिका


* मनोमन आगरकर
* घरगुती आगरकर
* चरित्र कथन
* आपल्याच शब्दांत आगरकर

## कै. गोपाळ गणेश आगरकर

सत्याचा ध्वज शांतिचा फडकण्या निर्धास्त देशावरी
बाणेदार पराक्रमी सरसवी तेजस्विनी लेखणी
पुष्पें ना परि कंटका उधळिलें लोकीं तयाचे शिरीं
देहाची निज जेथ वाट करणें, केली जनीं आडणी ॥
होता ओतित जो जितेंपण खरें मेल्या महाराष्ट्रि या
त्याचें प्रेत जित्या शवीं मिरविलें देवोनि पाजी शिव्या
दीपा मालविण्या पतंग झटता हो एक दीपासवें
आकाशीं भिरकावला दगड ये शीर्षा कराया नवें ॥
अन्याया चिरडावयास टपला जो नेहमीं केसरी
ज्याच्या त्या वनगर्जनेस नव्हती कोठेंहि अन्या सरी
सत्तेचा थरकांप होऊनि तिनें त्या दाविला पिंजरा
तो ना पालटला. खऱ्यास कधिं ना ये खोट कोठें जरा ॥

× × ×

मातीच्या मुलऱ्या ! जगास विटल्या, पाहें वरी एकदां
ये भाळीं जरि विस्तवांत बसणें धैर्या न सोडीं कदा
जीवा भांबवल्या सुदीपगृह हा तारा दिशा दावता
हा **गोपाळ** इथें पवित्र चरितें होवोनि बैसे स्वतां ॥

प्रकरण १ लें

# मनोमन आगरकर

१८५६. वे. गणेशपंत व सौ. सरस्वतीबाई आगरकरांचे पोटीं जन्म.

१८६८. पर्यंत कऱ्हाड येथें इंग्रजी तीन इयत्ताअखेर अभ्यास आजोळी भागवतांकडे.

१८६९. कऱ्हाड मुन्सिफ कचेरींत उमेदवारी. ( २ ) रत्नागिरीला पुढील शिक्षणासाठीं पायीं प्रयाण.

१८७१. रत्नागिरीस शागीर्दगिरीनें चवथी व पांचवी अशा इंग्रजी इयत्तांची पूर्णता.

१८७२. कऱ्हाडच्या दवाखान्यांत कंपाउंडरची नौकरी. ( २ ) जूनमध्यें अकोल्यास प्रयाण.

१८७५. प्रवेशपरीक्षा पसार.

१८७६. पुणें वक्तृत्वोत्तेजक सभेचें बक्षीस. ( २ ) "एकत्र हिंदुकुटुंबपद्धति" या निबंधाबद्दल डेक्कन कॉलेजचें बक्षीस. ( ३ ) "वऱ्हाड समाचारा" चे मोबदल्यानें लिहिणारे सहा महिन्यांचे लेखक. ( ४ ) डेक्कन कॉलेजची फी दरमहा दहा रुपयांहूनही कमी असतां व एकंदर खर्च दरमहा पंचवीस रुपयांपेक्षां जास्त नसतां एका सद्र्यावर दिवस काढले; फार काय, परीक्षेला पैसे नाहींत म्हणून नाटक लिहावयास घेतलें असतां तें काढून घेऊन केरुनाना छत्र्यांनीं परीक्षेचे पैसे भागवले. ( ५ ) एक राजकीय निबंध विष्णुशास्त्री चिपळूणकरांस दाखविला, तो पसंत झाला.

१८७७. उंब्रजच्या सौ. कां. अंबुताई फडके यांजबरोबर विवाह.

१८७८. बी. ए. ची परीक्षा पास. ( २ ) डेक्कन कॉलेजांत फेलो म्हणून नेमणूक.

१८७९. एम. ए. चा अभ्यास करीत असतां जुलै–ऑगस्टमध्यें डेक्कन कॉलेजांतच एलएल्. बी. चा अभ्यास करीत असलेल्या बाळ गंगाधर टिळकासमवेत सरकारी नोकरी न पतकरतां स्वतंत्र शाळा काढण्याचा बेत. ( २ ) विष्णुशास्त्र्याशीं संगनमत. [ अत्यंत थोड्या पगारावर म्हणजे ३०।३५।४० रु. जसे परवडतील त्यावर व फार तर ७५ रु. वर काम करावयाचा निश्चय. ] पण ( ३ ) एम्. ए. परीक्षा नापास.

१८८०. जानेवारींत पुणें न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना.

१८८१. एम्. ए. होऊन आगरकर न्यू स्कूलास मिळाले. ( २ ) श्री. नामजोशी यांच्या 'स्टार' पत्राचें रूपांतर 'मराठा' म्हणून तो व 'केसरी' अशीं दोन पत्रें न्यू स्कूलच्या मंडळींनीं काढलीं. मराठ्याचे संपादक टिळक व केसरीचे संपादक आगरकर झाले. ( ३ ) सुप्रसिद्ध बर्वे प्रकरणास कारण झालेले लेख लिहिले गेल्यामुळें ता. १६ डिसेंबर रोजीं त्या प्रकरणाची शेगडी

फुलली. ती अशी–कोल्हापूरचे छत्रपति श्रीमान् राजाराममहाराज १८७१ त वारले. त्यांचे दत्तक चिरंजीव शिवाजीराव महाराज १८७९ च्या आक्टोबरांत राजकोटहून आपलें शिक्षण संपवून करवीरकडे आले. त्याच्या अगोदरपासूनच रा. ब. बर्वे हे कोल्हापूरचे ब्रिटिशसरकारनियुक्त कारभारी होते. त्यांचे आणि शिवाजीरावमहाराजांच्या आईचे नेहमीं खटके उडत. शिवाय, शिवाजीराव कोल्हापुरीं आल्यावर ते "वेडे" असल्याचें जाहीर झाले. इतकेंच नव्हे, त्यांना "कोरड्याखालीं झोडण्यांत येत असल्याच्या" बातम्या पसरल्या. त्यामुळें न्यू स्कूलच्या चालकांनीं महाराजांच्यावरील अन्यायास ता. १५ जानेवारीच्या मराठ्यांतील लेखानें तोंड फोडलें. केसरीनेंहि आपल्या सदर्प गर्जना सुरू केल्या. केसरी–मराठ्यांच्या संपादकांना कोल्हापूरची एतद्विषयक माहिती कोण पुरवीत असावें याचा विचार करतां रा. ब. बर्व्यांना सदाशिव पांडुरंग ऊर्फ नाना भिडे आणि दरबारच्या न्यायखात्याकडील बळवंतराव जोशी यांचा संशय आला. या मंडळीचा कल बर्वे वा रेसिडेंट यांचेपेक्षां शिवाजीमहाराजांच्याकडे व त्यांच्या आईच्याकडे झुकता असे. पैकीं जोशी हे टिळकांचे मित्र. पुणें न्यू स्कूलचे सुपरिंटेंडंट श्री. वामनराव आपटे हे कोल्हापुरास वार लावून शिकल्यामुळें त्यांना तेथील माहिती. या सगळ्या धाग्यांचें जाळें विणून रा. ब. बर्व्यांनीं कयास बांधला कीं, द्वेषबुद्धीनें आपल्याविरुद्ध हा सारा कट आहे. म्हणून त्यांनीं ता. १६ डिसेंबरला तार व २७ डिसेंबरला अर्ज करून गव्हर्नरसाहेब सर जेम्स फर्गुसन यांजकडे केसरी–मराठ्यांवर फिर्याद करण्याची परवानगी मागितली.

१८८२. ता. ४ जानेवारीला तार व १८ जानेवारीला फिरून अर्ज देऊन परवानगी आल्याबरोबर ता. २४ जानेवारी रोजीं सॉलिसिटर लिट्ल यांच्यामार्फत मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. वेब यांचे कोर्टांत टिळक–आगरकर व त्यांचे सहाय्यक यांवर खटला उभारला. सदर खटला ता. १५ मार्च रोजीं सुरू झाला. टिळक–आगरकरांचे वकील फेरोजशहा मेहता होते. रा. ब. चे व्हिव्हॅनिटी होते. (२) ता. १७ मार्च रोजीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांस परलोकवास घडला. (३) ता. १३ जुलै रोजीं बर्वेप्रकरणांत टिळक–आगरकरांवर चार्ज ठेवला. (४) तथापि ता. १५ रोजीं "द्वेषा"च्या आरोपांतून मुक्त झाले, तरी टिळक–आगरकरांस अविचारानें लेख लिहिल्याबद्दल चार महिने साधी कैद झाली. (५) ता. २६ आक्टोबरपर्यंतच्या १०१ दिवसांच्या तुरुंगवासांत आगरकरांनीं हॅम्लेट नाटकाचा मराठींत उतारा केला.

१८८३. न्यू इंग्लिश स्कूलनें आपल्या बहिणींस मागें टाकलें. (२) टिळक आगरकरांनीं ज्यांचा कैवार घेतला ते कोल्हापूरचे दुर्दैवी छत्रपति शिवाजीराव यांचा अहमदनगरचे किल्ल्यांत मृत्यु.

१८८४. ता. २ जानेवारी रोजीं फर्ग्युसन कॉलेजची स्थापना. (२) ता. १३ फेब्रुवारी रोजीं फर्गुसनसाहेबांनीं शाळेस भेट दिली. (३) ता. २४ आक्टोबर रोजीं दिवाळीच्या सुमुहूर्तानें डेक्कन एज्युकेशन सोसायटी नांवारूपास आली. (४) सोसायटीच्या स्थापनेमुळें केसरी–मराठा पत्रें खाजगी म्हणून गणण्यांत आलीं. (५) मलबारी शेट हे एक मुंबईचे हिंदुसमाजसुधारक म्हणून वर्तमानपत्रीं गाजलेले पारशी गृहस्थ होते. त्यांचें सरकारदरबारीं वजन असल्याच्या भ्रमामुळें बडेबडे संस्थानिकहि त्यांच्या मागें असत. या गृहस्थांनीं हिंदु मुलींच्या वैवाहिक वयोमर्यादेचा प्रश्न वृत्तपत्रीय वातावरणांत घुमविल्यामुळें व सरकारनें त्याबाबत कायदा करावा असा अभिप्राय व्यक्त केल्यामुळें केसरी–मराठा चालकांत वादविवाद. त्यामुळेंच १६ डिसेंबरच्या केसरीच्या अंकांत आगरकरांना स्वतांच्या सहीनें पहिला लेख लिहावा लागला.

१८८५. डेक्कन कॉलेजचे संमेलनप्रसंगीं न्यायमूर्ति रानड्यांशीं टिळक–आगरकरांचा शाब्दिक सामना. (२) आगरकर न्यू स्कूलचे सुपरिंटेंडेंट. (३) वा. शि. आपटे यांचेबरोबर राष्ट्रीय सभेचे पुणेंकर प्रतिनिधी आगरकर. (४) ता. २० आक्टोबर रोजीं सोसायटीच्या नव्या-जुन्या आजन्मसेवकांत उचनीचभाव नांदूं नये; जुन्या सभासदांनीं कार्यारंभीं वर्षभर विनमोबदल्यानें काम केलें असलें तरी तेवढाच एक मुद्दा पुढें करून, मागाहून आलेल्या सालस पण पहिल्या इतक्याच स्वार्थत्यागी मंडळीच्या मनांत "कमीपणा" बोचूं नये, म्हणून समतेचें तत्व प्रस्थापित झालें. असें करतांना मुळापासून त्या काळापर्यंत ज्याची जशी उचल होती तशी तिची वजावाट घालूनच रकमा आदा करण्यांत आल्या.

१८८६. दीडवर्षांपूर्वींपासूनच्या सामाजिक बाबतींतील मतभेदामुळें छापखान्याचे हिशेब या वर्षाच्या मध्यास तयार झाले, ते आक्टोबरच्या २२ व्या तारखेस त्राटिकाकर्ते वासुदेवराव केळकरांचे हातीं आले. (२) होळकरांनीं शाळेस भेट दिली व ७०० रु. ची देणगी दिली; पैकीं ३०० रु. सोसायटीस आणि 'वाक्यमीमांसा' पुस्तकाच्या प्रती मोबदला करून ४०० रु. आगरकरांस देऊन टाकले. पण अशा मजकुराचें खुलाशाचें पत्र शिवाजीराव होळकर शाळा पाहून गेल्यावर सोळा तासांनीं आलें. त्यामुळें तें आणविण्यांत आलें असा टिळकांचा ग्रह झाला. कारण महाराजांचे खाजगी चिटणीस श्री. गुते हे आगरकरांचे मित्र होते. त्यामुळें "वाक्यमीमांसा" पुस्तकाच्या मोबदल्याचे पैशांचा वाद निघाला, तसे ते पैसे आगरकरांनीं सोसायटीकडेच जमा करवले. (३) प्रत्यक्ष भेटींत महाराजांनीं आगरकरांस पांचशें रुपये दरमहाची नौकरी संस्थानांत देऊं केली होती. पण "मला ती नको" असें आगरकरांनीं उत्तर दिलें.

१८८७. ता. २५ आक्टोबर रोजीं आगरकरांनीं केसरी सोडला.

१८८८. रा. ब. गोविंदराव कानिटकर प्रभृति मंडळींनीं " सुधारक काढण्याची जरूर काय ? " म्हणून विचारलें असतां त्यांची सयुक्तिक रीतीनें खात्री पटवून श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सहकार्यानें आगरकरांनीं दसऱ्याचे दिवशीं " सुधारक " पत्र काढलें.

१८८९. ता. ७ फेब्रु. पासून टिळकांनीं डे. ए. सोसायटीची रजा घेतली.

१८९०. टिळकांनीं सोसायटीचा राजिनामा दिला. ( २ ) शारदासदन वाद सुरू.

१८९१. दोन वर्षांचा सुधारक जेथें जेथें केसरी जाई, तेथें तेथें जाऊं लागला. ( २ ) श्री. सीताराम गणेश देवधर, बी. ए. हे सहसंपादक म्हणून सुधारकांत राहिले होते. त्यांना पगार मिळूं लागण्याइतकी सुधारकाची सांपात्तिक स्थिति सुधारली. ( ३ ) चहाग्रामण्य--प्रकरण. ( ४ ) संमतिवयाचा वाद.

१८९२. श्री. रामचंद्र भिकाजी जोशी यांच्या बहिणीनें रा. परांजपे, फॉरेस्ट ऑफिसर, नागपूर यांच्याशीं पुनर्विवाह केला, त्यास आगरकरांनीं आशीर्वाद दिला. ( २ ) ता. ९ आगस्ट रोजीं संस्कृतचे सुप्रसिद्ध विद्वान वामनराव आपटे कालवश झाले. त्यांच्या पाठीमागें प्रिन्सिपाल म्हणून फर्ग्युसन कॉलेजचें काम आगरकर पाहूं लागले. ( ३ ) आगरकर मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो झाले. ( ४ ) वर्षाच्या आरंभींच फर्ग्युसन कॉलेजच्या इमारतींस लॉर्ड हॅरिस यांचे हस्तें सुरवात. ( ५ ) ता. १४ नोव्हेंबरचे सुधारकांत " वेळेवर सूचना " असा अग्रलेख आला. त्यांत— " रा. टिळकासही आमचें तेंच सांगणें आहे. ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनवरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेस्मनच्या हातचा भात व बिस्कुटें झोडून श्री शंकराचार्यांशीं वर्दळ घालीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. " असा मजकूर आला. ( ६ ) हें मेस्मनच्या हातच्या भाताचें प्रकरण टिळक--आगरकरांत इतकें धुमसलें कीं, आगरकरांवर टिळक अब्रु-नुकसानीची फिर्याद करावयास निघाले. कारण आगरकर कांहीं आपला शब्द माघारी घेईनात. पण याच वेळीं न्या. रानडे हे श्री शंकराचार्यांच्या-कडून शास्त्रीसभेच्या द्वारां पुनर्विवाहाला संमति मिळविण्याच्या विचारांत असल्यानें टिळकासारखा मोहरा सुधारकपक्षानें गमविलेला नसावा, म्हणून त्यांनीं आगरकरांना " मेस्मन–भात " प्रकरणांत टिळकांची माफी मागण्यास सांगितलें. आगरकरांनीं न्यायमूर्तींच्या शब्दास मान देऊन ता. ५ डिसेंबर-च्या सुधारकांत " बोलणें फोल झालें " म्हणून माफी मागितली.

१८९३. ब्राह्मण वधू व सारस्वत वर यांचा मिश्रविवाह. ( २ ) मार्चमध्यें प्रो. कर्वे यांचा पुनर्विवाह. या दोहोंबद्दल आगरकरांस आपुलकी होती. पण ( ३ ) रामचंद्र सखाराम किर्लोस्कर यांनीं प्रथम पत्नी हयात असतां पुनर्विवाह केला त्याविषयीं आगरकरांनीं स्पष्ट नापसंती दाख-

विली. (४) आगरकरांनीं आपली भाची शारदासदनांतून काढून आणली.

१८९४. न्यू स्कूलचें बोर्डिंग सुरू होऊन त्यांत प्रारंभींच पसतीस विद्यार्थी आले होते.

१८९५ दम्यानें प्रकृति फारच बिघडल्यामुळें ता. १५ फेब्रुवारी ते १५ मार्चपर्यंत अकोल्यास हवा पालटून आगरकर आले. (२) ता. २७ मार्च रोजीं म्हणजे पाडव्याचे दिवशीं लॉर्ड सँढर्स्ट यांचे हस्तें फर्ग्युसन कॉलेजचा उद्घाटन समारंभ झाला. (३) मे महिन्यांत त्राटिका नाटकाचे कर्ते प्रो. केळकर स्वर्गवासी झाले. त्या दिवशीं आपलाही अंतकाळ समीप आला, असें वाटल्यामुळें दम्याच्या शमनार्थ मिरजेकडे हवा पालटण्यासाठीं आगरकर जाणार होते, तो बेत रद्द झाला; आणि (४) सोमवार ता. १७ जून रोजीं सुधारकाच्या सातव्या वर्षाचा ३६ वा अंक सकाळीं बाहिर पडला, त्याच्या अगोदरच सुधारकाचे जनक गोपाळ गणेश आगरकर या मृत्युलोकांतून अंतर्धान पावले.

प्रकरण २ रें

# घरगुती आगरकर

## १ व्यक्तिविषयक.

गोपाळराव आगरकरांची अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. त्यांची शेंडी मोठी होती; पण घेरा मोठा नव्हता. भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें खालच्या ओठापर्यंत येणाऱ्या पावशेर मिशांतून बाहेर पडत असें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगी पडणारा असा होता. बुद्धि चपल व ग्राहक होती. स्मृति मध्यमावर होती. शब्दापेक्षां अर्थाकडे लक्ष फार. वेळ फुकट दवडावयाचा नाहीं. उसनें काढावयाचें नाहीं. दुसऱ्याच्या जिवावर जगावयाचें नाहीं, असें त्यांचें व्रत होतें. लहानपणीं स्वभाव हूड होता. वडील माणसांचा मान ठेवण्यांत ढिलाई होती; पण अनुभव व अभ्यास यांच्यायोगें ही वृत्ति पालटली; चीनमधील वृद्ध माणसांना त्या देशांत किती मानतात हें त्यांनीं एकदां ' सुधारकांतून ' मुद्दाम मोठ्या गौरवानें सांगितलें आहे. तथापि मनाला खरें वाटे तें स्पष्ट स्पष्ट बोलण्याची संवय गुरुगौरवार्थही कमी झाली नाहीं!

( २ ) काळी पगडी, पांढरा अंगरखा–क्वचित् बनातीचा काळा अंगरखा, शुभ्र कांठाचें उपरणें, हातांत दीड इंच व्यासाचा महाबळेश्वरी सोटा व पायांत ब्राह्मणी चढाऊ जोडा—हा खरा आगरकरांचा पोषाख. हा सारा स्वदेशी असावयाचा.

( ३ ) गोपाळरावांचें जागतिक घडामोडींसंबंधाचें वाचन मुंबईचा टाइम्स, मराठा, केसरी व ज्ञानप्रकाश येवढ्यापुरतें मर्यादित असे.

( ४ ) पुण्यांत ओंकारेश्वराचे बाजूला तांबे यांच्या वाड्यांत आगरकर कांहीं दिवस राहात होते व पुढें ते त्याच बाजूला मेहेंदळे यांच्या बागेंतील लहानशा बंगल्यांत राहूं लागले. मध्यंतरीं ते भाटवडेकरांच्या बंगल्यांतही होते. १८९५ च्या मार्च महिन्यांत फर्ग्युसन कॉलेज शहराबाहेर सध्यांच्या जागीं गेलें व आगरकरही ' प्राचार्य ' या नात्यानें कॉलेजजवळ बांधलेल्या बंगल्यांत ( सध्यांची आगरकर रेसिडेन्सी ) राहूं लागले. सदर बंगल्यांत समोरून आंत शिरल्यावर व्हरांड्याच्या उजव्या बाजूकडील खोलींत त्यांचा अंत झाला.

( ५ ) गोपाळराव लहानपणीं कऱ्हाडास असल्यावेळची गोष्ट. तेथें रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर मुन्सफ दर रविवारीं एक सभा भरवीत. त्या सभेंत जो मुलगा सगळ्यांत चांगला निबंध लिहून आणील, त्यास रावसाहेब रुपाया दोन रुपये बक्षीस देत. एकदां आपल्या गोपाळानें समाधानकारक निबंध लिहून वाचला व वाहवा मिळविली. त्या वेळीं तेथील मामलेदार कृष्णाजी वासुदेव ऊर्फ आप्पासाहेब जोशी यांनीं बरेंच कंटाळवाणें भाषण करून सांगितलें कीं 'असला चांगला निबंध मुलांना कोठून लिहितां येणार?' मामलेदारांचें हें भाषण गोपाळरावांस खपलें नाहीं.

देवविला तितका सणसणीत जबाब देऊन गोपाळरावांनीं धिटाईनें मामलेदारांस सवाल केलाः—" रावसाहेब, आपल्याला पाहिजे असल्यास वाटेल त्या विषयावर मी येथल्या येथें या निबंधाइतकाच चांगला निबंध लिहून दाखवितों. "

( ६ ) गोपाळरावांच्या बरोबर कऱ्हाड कोर्टांत माहुलीचे नारायणबुवा घमंडे हेही उमेदवार होते. गोपाळरावांप्रमाणेंच त्यांनाही नागपूरकर मुन्सफांनीं गुणग्राहकतेनें उच्च शिक्षणाकरतां उत्तेजन दिलें. तेव्हां वक्तृत्व, कीर्तन आणि निरूपण यांत घमंडे तरबेज झाले. आगरकरांनीं बुवांच्या या गुणांचा फायदा मित्रप्रेमानें फर्ग्युसन कॉलेजच्या इमारतफंडासाठीं प्रारंभीं प्रारंभीं फार घेतला.

( ७ ) गोपाळराव बी. ए. च्या वर्गांत असतांना त्यांना दमा झाला. त्यांचा हा आनुवंशिक पाठीराखा गोपाळरावांचा पाठपुरावा करण्यासाठीं त्यांना सलामी द्यावयास आला. भगवती चिंतेनें जोहार करण्यापूर्वींच, तिची रिकामी पडणारी जागा भरून काढण्यासाठीं हा कुटुंबाचा बंदा खडा होता. गणूअप्पांचा हा स्वकष्टार्जित कुणगा होता, कीं ती वडिलार्जित मिळकत होती, हें नक्की माहीत नाहीं. पण सरस्वती-काकूंना बरीक तें " देणें वडिलांचें " होतें. स्वजनभक्तिपरायण गोपाळरावांनीं पितरांचा हा " सहजप्रसाद " जिवापलीकडे जपला असला तर नवल काय ? " मित्र जयास म्हणविलें सुझें त्याशीं करूं नये कपट। " या कव्युक्तीप्रमाणें मिल्लस्पेन्सरांच्या बुद्धिवादास अनुसरून आमरण या दमदार गड्याची बरदास्त गोपाळरावांनीं राखली. एकदां तर रंगांत येऊन, दारिद्र्याला चारुदत्त म्हणाला त्याप्रमाणें ते उद्गारले—

" मित्रा दम्या रे वससी शरीरीं।
माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी॥
परंतु वाटे मज दुःख मोठें।
मेल्यास मी जाशिल सांग कोठें?॥ "

( ८ ) मुंबई येथें जी पहिली राष्ट्रीय सभा भरली, तीमध्यें पुण्याच्या वतीनें कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, सीताराम हरी चिपळूणकर, वामन शिवराम आपटे व गोपाळराव आगरकर उपस्थित होते.

( ९ ) किर्लोस्कर कंपनीच्या हस्तपत्रिकेवर टिळकादिकांच्या सारखीच आगर-करांचीही सही असे. गोपाळरावांना नाटकाचा शोक लहानपणापासून. मुलांनीं केलेल्या प्रयोगांत त्यांनीं कधीं कधीं भूमिकाही घेतल्या होत्या. असें असतां असा एक प्रसंग घडला. " शापसंभ्रम [ ? ] " नाटक लागलें होतें. एक मित्र त्यांना म्हणाला, " चला आपण नाटक पहायला जाऊं!"

**गोपाळरावः**—मज जवळ पैसे नाहींत

**मित्रः**—मी देतों.

**गोपाळरावः**—दुसऱ्यांच्या पैशावर मी मजा मारणार नाहीं.

( १० ) " सर्व लोकांत हा महार काय तो कीर्तन संपेपर्यंत मन लावून ऐकत होता. " असें सर्टिफिकेट तुळशीबागेंतील कीर्तनश्रवणासंबंधांत आगरकरांना धर्म-मार्तंडांनीं दिलें होतें, असें डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे सांगतात.

( ११ ) भारतीय महिला विद्यापीठाचे संस्थापक श्री. धोंडो केशव कर्वे यांनीं पुनर्विवाह करण्याचें ठरविलें. त्या वेळीं त्या विवाहपत्रिकेवर गोपाळरावांची सही घ्यावी म्हणून मंडळी गेली. आगरकरांनीं सही दिली, आणि लागलीच एकाद्या बागडणाऱ्या मुलाप्रमाणें धांवत धांवत कर्वे होते तेथें जाऊन त्यांना आगरकर कड-कडून भेटले. न्यू इंग्लिश स्कूलमधील ही गोष्ट.

( १२ ) गोपाळरावांची तरुण पिढीवरील छाप या वेळींही दिसून आली. श्री दा. र. करंदीकर ( मालदोली ) लिहितात कीं, " प्रो. कर्वे यांचे पुनर्विवाह–समा-रंभास आम्ही त्रिवर्गबंधु हजर होतों. इतकेंच नव्हे तर त्या समारंभांतील प्रयोजनांत बुंदीचे लाडूही खाल्ले आहेत. तें सर्व गु० आगरकरांच्या स्फूर्तीनेंच. "

( १३ ) जशी विद्यार्थ्यांवर तशीच सामान्यतः कोणाही व्यक्तींवर आगरकरांची सामान्यतः छाप बसे. पुणें येथें शनिवारांत " काकूबाईची खानावळ " असे. या काकूंनीं टिळक–आगरकर डोंगरीच्या तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यांना आदरानें जेवा-वयास बोलावलें. आपल्या देशभक्तीचा आदर करणारी खानावळीणबाई पाहून आगरकरांना कौतुक वाटलें. म्हणून त्यांनीं केसरींत तिला " आर्यभूषण काकू " म्हणून संबोधिलें. पुढें तेंच नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें.

( १४ ) तांबे यांचे वाड्यांत आगरकर पुण्यास राहात असतां त्यांच्याकडे एकदां चोरी झाली. सिटी पोलिस इन्स्पेक्टर मि. स्मिथ यांनीं चौकशी केली, पण पत्ता नाहीं. तेव्हां चोरीस गेलेल्या मालापैकीं १५० रु. चा माल आगरकरांचे स्नेही रा. सा. मेहेंदळे एंजिनिअर यांचा असल्यामुळें, ठेवीचा रक्षक या नात्यानें आपल्या नैतिक जाबबदारी-साठीं आगरकरांनीं मेहेंदळ्यास त्याची भरपाई केली.

## २ आई.

गोपाळरावांच्या पणजोबांनीं म्हणजे बचाजीपंतांनीं टेंभूस लक्ष्मीनारायणाचें देऊळ बांधलें होतें. पण त्याचा सभामंडप गणूआप्पांच्या कारकीर्दींत आला मोडकळीला. तो नीट करण्याचा घोष गणूआप्पा आणि सरस्वतीकाकू दोघांनींही घेतला. पण दारि-द्र्याच्या सहाऱ्यांत पैशाचें पाणी कोठून पैदा होणार ? तथापि इतकें मात्र खरें कीं, अंतःकरणाच्या ओलाव्याइतका कांहीं पैशाच्या पाण्यांत दम नाहीं. म्हणूनच सरस्वती-काकूंनीं स्वतांच्या हातच्या सात तोळ्याच्या सोन्याच्या पाटल्या सभामंडपाच्या तन्दु-रुस्तीसाठीं मोठ्या आनंदानें काढून दिल्या.

( १६ ) या सालस बाई रिकामपणीं आळींतल्या आयाबायांच्या उखाळ्या–पाखाळ्या काढून कधींच करमणूक करून घेत नसत. तर देवादिकांचीं गाणीं रचण्यांत व म्हणण्यांत त्यांचा तो वेळ जाई. नमुना म्हणून त्यांनीं रचलेलें हें गाणें पहा.

## कऱ्हाड कृष्णाबाईचें स्तवन.

ऐका कृष्णाबाईचें स्तवन ॥ धृ ॥
रत्नखचित सिंहासन, दशभुजांवरी ध्यान।
पायीं साखळ्या पैंजण, शुक्रवारीं हो पूजन॥
दर्शनासि जाती हो जन, तिरकस केली मान।
तुमचें हर्षें हो वंदन, पुराणांतरीं वर्णन॥
हस्तीं त्रिशूळ घेऊन, दैत्य मर्दन केला तिनं ॥ १ ॥
गोट पाटल्या हातसरे, रवे दोरे गजरे।
पट्टयानें शोभते कंबर, वाक्या बाजुबन्द दंडावर ॥
बाळ्या ग बुगड्यांची कुसर, तानवड झळकती फार।
मोती कापाला अनिवार, वेणीमध्यें मूद बोर॥
नाग केवडा चन्द्रकोर, गंगावन सोडलें पाठीवर।
बाई तूं मोत्यांनीं भांग भर, बिजवरा शोभतो निढळेवर॥
नाकींच्या नथेला सजे फार, रूप लावण्य सुकुमार॥ २ ॥
रथामध्यें हो तुमची स्वारी, अलंकार भारी।
साडी नेसुनियां जरतारी, चोळी ग बुट्टेदारी॥
टिका, ठुशा, तन्मणि वरी, मंगळसूत्र हे गळेसरी।
हिरवी डाळ गालावरी, ढाल देते कुंकवाची चिरी॥ ३ ॥

(१७) या बाईचें माहेरचें नांव ठकूताई. कऱ्हाड येथील विष्णुपंत भागवतांच्या त्या वडील कन्या. त्यांना तीन मुलगे व तीन मुली होत्या. गोपाळराव हे त्यांचे दुसरे चिरंजीव. ते व वडील बंधु गोविंदराव आजोळींच वाढले.

(१८) गोविंदराव पुण्यास सोमेश्वराचे देवळांत माटेबुवामुळें "गोविंदबुवा" झाले. त्यायोगें सुखाचे चार दिवस यायची आशा आईला गोपाळरावांकडूनच. तुलनेनेंच बोलावयाचें तर ते तसे थोडे आलेही. पण दसरा-दिवाळीची अपेक्षा केली आणि "नव्याची पूर्णिमा" झाली! गोपाळराव बी. ए. झाले. आणि फेलो असतांच जन्मदात्रीस पत्र लिहिलें कीं,—

"आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी मिळेल आणि आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई तूं करीत असशील. पण मी आतांच सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची हाव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ पराहितार्थ खर्च करणार."

## ३ थोरले मामा

गोपाळराव बारा वर्षांपर्यंत इंग्रजी तीन इयत्ता कऱ्हाडास शिकले. थोरले मामा रामचंद्र विष्णु ऊर्फ भाऊसाहेब भागवत यांनीं आपल्या धाकट्या भावाच्या म्हणजे दत्तोपंतांच्या पुढील शिक्षणाची सोय केली. पण दत्तोपंताबरोबरीचा भाचा गोपाळराव त्याच्या शिक्षणाची सोय केली नाहीं. एक कारण असें होतें कीं, भाऊसाहेब त्या वेळी "ताजे" च वकील होते; तेव्हां भावाच्या व भाच्याच्या शिक्षणाला पुरेसा पैसा परगांवीं ते कोठून पुरविणार? शिवाय त्यांनीं आपला थोरला भाचा गोविंदराव यांस मॅट्रिकपर्यंत शिकवूनही तो 'बुवा' झाला होता. तेव्हां भाऊसाहेब आगरकरमंडळीवर किंचित नाखुषच होते. तथापि त्यांनीं नागपूरकर मुन्सिफाकडे शब्द टाकला आणि गोपाळरावाच्या निबंधलेखनांतील हुशारीवर खूष असलेल्या नागपूरकरांनी त्या शब्दाला मान देऊन गोपाळरावास उमेदवारी दिली. पुढें रत्नागिरीहून परत आल्यावर कऱ्हाडच्या दवाखान्यांत गोपाळराव 'कंपाउंडर' झाले, ते देखील भाऊसाहेबांच्याच वजनानें.

(२०) भाऊसाहेब भागवत गरीबींतून स्वकष्टानें कर्तेसवरते झाले होते. त्यांनीं संस्कृताचे अध्ययन चांगलें केलें होतें. आणि ज्ञानेश्वरीविवेचन तर त्यांचें हातखंडा काम होतें. कर्मठ पण तापट तीर्थरूपांच्या हाताखालीं वाढले होते, तरी वडिलांच्या कितीतरी पटीनें ते सहनशील होते. कुटुंब मोठें, दोन बहिणी घरीं आलेल्या, तिसरी (ठकूताई) गरीब, तिचीं सर्व मुलें अंगावर पडलेलीं, धाकटे तीन भावापैकीं दोन विवाहित, वृद्ध तीर्थरूप नि मातोश्री, एवढा गाडा चालविण्यास काय कमी यातायात पडते?

(२१) भाऊसाहेब रात्रौ भागवताचें निरूपण घरच्या मंडळींत करीत. तेव्हां भागवतांतील विषय आगरकरांच्या कानावरून गेलेला. पण गिब्बनचें ग्रंथ वाचल्यावर आगरकरांना भागवतापेक्षां गिब्बनचे ग्रंथ श्रेष्ठ वाटत.

(२२) गिब्बनच्या वाचनानेंच आपल्या इकडील कालविपर्यस्त रूढींवर बेफाम हल्ला चढविण्याचा आगरकरांचा सांप्रदाय असे. हा हल्ला टाकानें, तोंडानें व हातानेंहि होई. असा एक सुप्रसिद्ध प्रसंग भाऊसाहेब भागवतांसंबंधांत एकदां घडून आला. आगरकरांच्या मातुश्री वारल्या, त्या वेळीं ते कऱ्हाडास गेले होते. तेव्हां भाऊसाहेबांनीं "क्षौरविधि करा" म्हणून सांगितलें.

**आगरकर**:—हा वेडगळ विधि मी करणार नाहीं.

**भाऊसाहेब**:—(संतापून) तर मग चालता हो.

गोपाळराव मुकाट्यानें उठले आणि कऱ्हाडहून रातोरात पुण्यास निघून गेले. पुढच्याच सुधारकांत "वडीलपणाचा हक्क" असा लेख येऊन जुन्या नव्यांचें भांडण अनिवार्य आहे; नव्यानें पड घेतां कामा नये; जुन्यावर संताप न करतां आदर नसला तरी त्याची किंव करावी, अशा अर्थाचा लेख आला. तो भाऊसाहेबांना थोडा माफीदाखल वाटला. तेव्हां त्यांनीं गोपाळरावास पत्र लिहिलें कीं, "आम्ही जुन्या मतांच्या अमलाखालीं वाढलों, ती आमच्या हाडीमासीं खिळली, तीं आम्हाला सोडवत नाहींत; त्याबद्दल आम्ही हट्ट धरून बसलों तर तुम्ही रागावूं नये. सत्य वाटते तसें वागण्याचा

तुमचा कृतनिश्चय आहे हें पाहून एकपरि आम्ही तुमची स्तुति करावी खरी; पण मनाला कसेसेंच वाटते! आमचे थोडे दिवस राहिलें आहेत. आम्हांला सांभाळून घ्यावें."

( २३ ) दैवयोग मात्र असा कीं, भाऊसाहेब आगरकरांच्या मागें एक तपाच्यावर वर्षे जगले. १८९५ सालीं गोपाळराव वारल्यावर अकोल्यास श्री. विष्णु मोरेश्वर महाजनी यांस भाऊसाहेबांनीं लिहिलें कीं, "गोपाळराव आमच्याहून थोर. या युगांतील ते ऋषीच."

( २४ ) गोपाळरावासंबंधीचा आदर एवढ्यावरच थांबला नाहीं. गोपाळरावांनीं लोकहितार्थ आयुष्य वेंचलें, हें लक्षांत आणून त्यांच्या दत्तोपंतमामानीं जसा त्यांच्या कुटुंबाचा परामर्श घेतला, तसेंच भाऊसाहेबांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें बक्षीस ठेवलें.

( २५ ) आगरकरांच्या हयातींतच भाऊसाहेब भागवतांचा थोरला मुलगा यज्ञेश्वर म्हणून होता तो वारला. त्या वेळीं त्याच्या नांवें फर्ग्युसन कॉलेजला १२०० रु. देऊन एक स्कॉलरशिप भाऊसाहेबांनीं सुरू केली होती, ती गोपाळरावांच्या मसलतीनेंच.

( २६ ) मामाभाच्यांची बोलाचाल किती मोकळी होई याचा एक नमुना आढळतो तो असा. आगरकर एम्. ए. चा अभ्यास करीत असतां एकदां भागवतांच्या वाड्यांत गोपाळराव, कोंडो केशव ऊर्फ नाना सहस्रबुद्धे मास्तर, कृष्णाजी आबाजी गुरुजी वगैरे मंडळी फराळ करीत बसली होती. नाना मास्तरांनीं आगरकरांस विचारलें:— "आपण पुढें काय करावयाचें ठरवलें आहे?"

**भाऊसाहेब भागवतः—** सबजज्जाची जागा याला योग्य आहे. कारण याला लिहिण्याची तशीच बोलण्याची हौस आहे. या साऱ्या हौशी या जाग्यावर आल्यानें साधणार आहेत. मामलेदारींत साधणार नाहींत. शाळाखात्यांत कोठें प्रोफेसर अगर हेडमास्तर झाल्यास मात्र साधतील. पण तें काय, रडवें खातें!

**आगरकरः—** हूं! कर्णाला छपरावर ठेवून कर्णाचें दातृत्व वर्णन करण्यासारखेंच आहे हें! ज्यांच्यापासून चांगले मुन्सीफ, मामलेदार, वकील, बॅरिस्टर निपजावयाचे, तेंच जर रडवें खातें, तर मग माळावर ऊंस लावण्यास काय हरकत आहे? माझी शिक्षक होण्याची इच्छा आहे. पण ती हल्लीं चालू असलेल्या रमण्यांत दक्षिणा उपटण्यासाठीं नाहीं. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसूं लागतील अशा प्रकारच्या शिक्षकाचें काम मला करावयाचें आहे.

## ४ गुरुजींचीं प्रवचनें

( पाश्चिमात्य सुधारणेचे मराठी भाष्यकार म्हणून ज्यांची प्रसिद्धी ते गोपाळ गणेश आगरकर हे कऱ्हाड येथें इंग्रजी पहिल्या तीन इयत्ता शिकले. त्यावेळीं त्यांना रोंघे मास्तर होते. या मार्मिक शिक्षकांनीं आपल्या विद्यार्थ्यांस दोन वेळां दिलेलीं दोन सुन्दर उपदेशपर प्रवचनें कै. गंगाधर नाईक घाटे यांचेकडून आमच्या हातीं आलीं मूलमनाची विकास–वाढ करण्याच्या दृष्टीनें आजचे शिक्षक देत असलेल्या वर्गीय प्रवचनाशीं रोंघ्यांच्या प्रवचनांची तुलना मोठी रमणीय होईल. )

## प्रवचन १ लें

## अहमहमिका

" गोड आणि स्वर्गीय देवताच ती ! समाजाचा पाया, जगाचें खरें अस्तित्वसूत्र. ' आंधळ्याला एक पैसा दे बाप्पा ' करणारा गटार गणोजी असो, नाहींतर ' जो भूतमात्राचे ठायीं । आपपर नेणेंचि कांहीं ' म्हणणारा पंडित पुराणिक असो, दोघेहि एक सुरानें अहमहमिकेचें पुरश्चरण करीत असतात. या दोन्हींचा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं ध्रुव–प्रल्हादांनीं मुठीच्या मापानें सव्वा मणाचा प्रसाद सारुन सत्यनारायण नाहीं ना साधला ? एरवीं, चढाओढ–जीवनकलह म्हटला कीं साधेल त्या प्रमाणांत हव्या त्या साधनांनीं माणसांनीं माणसांना खायचें, त्या खाणाऱ्या माणसाचें डोकें तिसऱ्याच माणसानें मारलेलें असावयाचें असें दृश्य दिसतें खरें !! जग वेडें झालें आहे काय ? निदान फाजील शिक्षणानें तरारलेले मेंदू तरी वेडे झालेले दिसतात. जीवनासंबंधीं विकासाऐवजीं कलहाची कल्पना रक्ताच्या बिंदूबिंदूंत मुरल्या-कारणानें–काय, आपला नाश काय कमी होत आहे ? जीवनकलह सुटला कीं तुकडे पडले; बेकी झाली; प्रत्येकाचा सवतासुभा सुरू झाला. दरेकजण आपल्या भावाच्या उरावर बसायला लागला. आपल्या पायांपुरतीच वहाण कापायला लागला. समजावेंच असें. शंका नको अगदीं. तेंच जीवनाला विकासाच्या सरोवरांत उमलायला सांगा कीं सहानुभूतीच्या देठावर सहकार्यांच्या सहस्र दलांनीं संगतीच्या केसरांतून सहयज्ञांचा सुगंध दरवळून सोडणारें सूर्यकमळ उगवलेलें आढळेल. सडक्यांतून, शिसारींतून असें सरस्वतीचें सरोवर उभारावयाचें असेल, तर आपल्यापैकीं कांहींजणांना तरी आपलें हाड न् हाड चिंबवून काढलें पाहिजे. जीवित आणि मालमत्ता यांच्या संरक्षणाची हमी ' सरकार ' घेतें. पण दुभंगलेल्या व दुभंगणाऱ्या अंतःकरणाची हमी–अंतःकरणांच्या संरक्षणाची हमी आहे कोठें ? जग देवाचें आहे, सैतानाचें नाहीं. या भावनेंत ती हमी आहे. "

## प्रवचन २ रें

## जगाबरोबर चला

" पुढें गेलेंच पाहिजे. तुम्हांला कल्पना नसली तरी परमेश्वराला ठाऊक आहे, कोठें तें. जातिवंतपणा विसरणारा रूढींचा रडतराव असो; मनाला बोंचणाऱ्या वस्तुस्थितीला बिचकणारा भावभगत असो; स्वतःच्या खुशालीवर गदा येते म्हणून कसलाहि फरक म्हटला कीं कपाळाला आंठ्या घालणारा एकादा आळशांचा राजा असो; आपले कान म्हणजे इकडून तिकडे वारा जावयाच्या सोनारकामीं नळ्या आहेत आणि डोळे म्हणजे शरीराला बसविलेल्या बारीक कांचा आहेत असें समज–णारा एकादा उनाड असो; या सर्वांनीं ' मला एक दम तरी टाकूं द्या ' अशी कितीहि काकुळती केली तरी किंवा घराचीं छपरें उडविलीं तरी ऊं हूं !! जग क्षण-

मात्र थांबणार नाहीं. त्याच्या जन्मीं त्याला कधीं तें ठाऊकच नाहीं. आणि म्हणून शाहणा आहे तो आपल्या बुद्धि-कृतींच्या जोरावर जगाची गति भरमसाट वाढली किंवा पुढचा मार्ग धुक्यानें धुंदकारल्यासारखा वाटला तरी डरत नाहीं. डगमगत नाहीं. कारण त्यानें मनाशीं गांठ बांधलेली असते कीं सत्त्व, स्वातंत्र्य आणि ज्ञान हीं परमेश्वराचीं अंगें असून त्यांना आणि केवळ त्यांनाच अनुसरणें हें आपलें कर्तव्य आहे. अशांच्याच धीरोदात्त आधारावर समाज झाला तरी नित्य बदलणाऱ्या जगांत टिकत असतो. म्हणून रसरसत्या रक्ताच्या तरुणांनो, तुम्हांला जर खरोखर प्राज्ञ व्हावयाचें असेल, लोकविश्वासाचे पुतळे व्हावयाचें असेल, चारित्र्याचें आदर्श व्हावयाचें असेल, लोकसंग्राहक व्हावयाचें असेल, देवानें वांटयाला दिलेल्या कर्तव्य-क्षेत्रांतील कर्तबगार म्हणून नांदावयाचें असेल, आणि प्रत्येक सत्कार्यांत आपला हात आघाडीला असावा, वा दुर्बल जीवाकरितां आपण पाऊलवाट तरी पाडून ठेवलेली असावी, अशी महत्वाकांक्षा असेल, तर काळाच्या कराल दाढा हातांत धरून बेफिकीर छातीनें आपल्या मनगटाची खेच मुळींच कमी पडूं न देतां, या जगाच्या फिरत्या चक्रांत उभे रहा,......, मात्र तुमचा स्वाभिमान वाढता राहिला पाहिजे; तुमच्या शिक्षकांशीं तुम्ही मनमोकळेपणानें चाललें पाहिजे; वांढतें स्वातंत्र्य व विचारांची उदात्तता, स्वयंसुधाराची अंतःस्फूर्ति आणि प्रगतीचा ध्यास हीं तुमच्या-जवळ जय्यत हवींत. लक्षांत ठेवा. ' जुन्या 'च्या जीवावर ' नवें ' निशाण उभारतें आणि स्थान, स्थिरता, स्थितप्रज्ञता व सामर्थ्य यांच्या समुच्चयानेंच कोणत्याहि गोष्टीला चिरंजीवित्व येतें."

## ५ बंधुचें व्याख्यान

फार प्राचीनकाळीं जे प्रसिद्ध ६ शास्त्रकार झालें, त्यांमध्यें पंतजली ऋषीची गणना आहे. हा महायोगी व मोठा विद्वान असल्यामुळें हा शेष देवतेचा अवतारच होता. अशी श्रद्धा या ऋषीविषयीं आहे. ऋषीपतंजलीनें योग शास्त्रावर योगसूत्र म्हणून प्रसिद्ध ग्रंथ रचिला आहे. योगसूत्राचे भाग चार केले आहेत. व त्या प्रत्येक भागास पाद अशी संज्ञा दिली आहे. त्या पादांचीं निरनिराळीं नांवें ठेविलीं आहेत. तीं अशीः— १ समाधि पाद. २ साधन पाद. ३ सिद्धी पाद. ४ कैवल्य पाद. प्रथम पाद किंवा समाधिपाद यामध्यें समाधि किंवा योग म्हणजे काय ? याचा विचार सांगून त्यांतील भेद व उपभेद यांचा विचार पुढें केला आहे. पुढें योगाभ्यासी जो, याला समाधीचा अभ्यास करितांना जीं विघ्नें येतात त्यांचा विचार करून त्या विघ्नांचा उपशम कसा होईल हाही विचार पुढें केला आहे. समाधी साधण्याचीं अंतरंग साधनें कोणतीं हाही विचार पुढें आणिला आहे. इतका विचार समाधिपादांत घातला आहे. त्याचाही विस्तार थोडासा करून दाखवूं. पतंजली ऋषिनी समाधीचे मुख्य भेद दोनच केलें आहेत. त्यांचीं नांवें:— १ असंप्रज्ञात समाधी २ संप्रज्ञात समाधी. दुसरें कांहीं उपभेद केले आहेत. त्यांचीं नांवें:—

सवितर्क समाधी निर्वीतर्क समाधी, सानंद समाधि. व सास्मित समाधि. या सर्व समाधींचीं लक्षणें व पूर्वी सांगितलेल्या सर्व शब्दांच्या व्याख्याही त्या त्या वेळीं स्पष्ट दिल्या आहेत. असंप्रज्ञात समाधीचें लक्षण असें सांगितलें आहे कीं, ज्या अवस्थेंत सर्व–कल्पनाशून्य चित्त असतें व अशी अवस्था या वेळेस चित्ताला आली आहे असेंहि भान ज्यावेळेस रहात नाहीं, ती अवस्था असंप्रज्ञात समाधी होय. संप्रज्ञात समाधी म्हणजे सर्व–कल्पनाशून्य चित्त असून अशी अवस्था आहे असें भान असणें. समाधिच्या अभ्यासांत जीं विघ्नें येतात तीं मुख्य चार सांगितलीं आहेत. त्यांचीं नांवें:— १ लय, २ विक्षेप, ३ कषाय, ४ रसास्वाद. या शब्दांचे पुढें सांगितल्याप्रमाणें अर्थ समजावेत. लय म्हणजे तमोगुण–प्रधान स्तब्धावस्था. विक्षेप म्हणजे एकाएकीं पूर्व संस्कारानें नाना प्रकारच्या कल्पना व इच्छा उत्पन्न होणें. कषाय म्हणजे दुश्चित्तपणा, कंटाळा प्रपंच परमार्थाचा. त्रास व नाना प्रकारच्या न समजलेल्या सूक्ष्म कल्पना इत्यादि विकार. रसास्वाद म्हणजे परब्रह्माचा वृत्तीला स्पर्श होऊन ज्या एकाएकीं आनंदाच्या उकळ्या येतात त्या. हीं चार विघ्नें दूर करितां आलीं म्हणजे समाधी अवस्था प्राप्त होते. त्या समाधीच्या अभ्यासाचीं अंतरंग साधनें म्हणजे ईश्वर प्रणिधान – प्रणव, जप इत्यादि समजावीं. ईश्वर म्हणजे कसा याचा विचार पुढें सांगितलेल्या सूत्रांत लिहिला आहे. “ क्लेश कर्म विपाकैरपरामष्टः पुरुष विशेष ईश्वरः ” सूत्राचा अर्थ असा कीं, क्लेश–कर्म–विपाक ( फलभोग ) यांनीं अगदीं न स्पर्शिलेला तो पुरुष ईश्वर म्हणावा. समाधी पक्क होण्यास मुख्य उपाय हा सांगितला आहे. “ सतु दीर्घकाल नैरं वच सत्कार सेवितो दृढ भूमिः ” म्हणजे फार वेळपर्यंत खंड होऊं न देतां मोठ्या आदरानें अभ्यास केला असतां तो समाधी–दृढ होतो; इतका विषय प्रथम पाठांत आहे.

आतां दुसरा म्हणजे साधनपाद. यामध्यें जे अनधिकारी म्हणजे पूर्व परंपरेनें सांगितलेल्या साधना करण्याविषयीं जे असमर्थ त्यांच्या करितां बहिरंग साधनांचा विचार केला आहे. बहिरंग साधनें म्हणजे बाहेरील साधनें. करितां करितां अधिकार प्राप्त होतो. त्या सर्व साधनांच्या समूहाला ‘ अष्टांग योग ’ अशी पारिभाषिक संज्ञा आहे. तीं अष्टांगें येणेंप्रमाणें:— १ यम, २ नियम, ३ आसन, ४ प्राणायाम, ५ प्रत्याहार, ६ धारणा, ७ ध्यान, ८ समाधि. यमामध्यें बारा प्रकार आहेत त्यांचीं नांवें:– १ अहिंसा २ सत्य ३ अस्तेय ४ असंग ५ न्हीः ६ असंचय ७ आस्तिक्य ८ ब्रह्मचर्य ९ मौन १० स्थैर्य ११ क्षमा १२ अभय.

तसेंच नियमाचेही बारा प्रकार आहेत. त्यांची नांवें– १ शौच २ जप ३ तप ४ होम ५ श्रद्धा ६ अतिथ्य ७ ईश्वरार्चन ८ तीर्थाटन ९ परार्तेहा १० तुष्टि ११ आचार्यसेवन ( शौच २ प्रकारचे. अंतरंग, व बाहिरंग ) मिळून बारा प्रकार झाले. आसन विचारांत आसने नाना प्रकारची सांगितली आहेत. त्यांत मुख्य तीन आहेत. त्यांची नांवें:—१पद्मासन २ स्वस्तिकासन ३ सिद्धासन. ह्या आसनांची रचना कशी करावी व ह्यापासून मुख्य उपयोग काय ? व ह्या अभ्यासाची अवांतर फलें कोणतीं

ह्या सर्व गोष्टींचा विचार त्या त्या ठिकाणीं स्पष्ट दाखविला आहे. या संबंधानें अशीं सुत्रें आलीं आहेत. "आसनजये प्राणजयः" "प्राणजये मनोजयः" म्हणजे निरनिराळ्या आसनांची रचना केली असतां त्या त्या ठिकाणचा प्राणवायू स्वाधीन होतो व प्राणवायू स्वाधीन झाला असतां मन स्वाधिन होतें. प्राणायामाचे ३ प्रकार सांगितले आहेत त्यांचीं नांवें:— १ पूरक, २ कुंभज, ३ रेचक. प्रत्याहार म्हणजे काय? हेंहीं पुढें सांगितलें आहे. प्रत्याहार म्हणजे त्या त्या विषयावर ती ती वृत्ति उन्मुख होऊं न देतां स्वाधिष्टांनींच स्थिर करणें. धारणा म्हणजे कोणत्याही वस्तूच्या समग्र अवयवांवर चित्त स्थिर करणें. ध्यान म्हणजे कोणत्याही वस्तूच्या एकाच अवयवावर चित्त स्थिर करणें इत्यादिक विषय दुसऱ्या पादांत आहेत.

आतां तिसरा म्हणजे सिद्धिपाद यामध्यें सिद्धि विषयीं विचार आहे. एकंदर सिद्धि पुष्कळ आहेत. परंतु त्यांत मुख्य २४ आहेत. त्या चोविसामध्यें पहिल्या आठांना अष्टमहासिद्धि म्हणतात. दहांना मध्यम सिद्धि म्हणतात. अवशिष्ट सहांना क्षुल्लक सिद्धि म्हणतात. अष्टमहासिद्धींचीं नांवें अशीं आहेत. १ अणिमा, २ महिमा ३ गरिमा, ४ लघिमा, ५ ईशित्व, ६ वाशित्व, ७ प्राकाम्य, ८ प्राप्ति. अणिमा सिद्धि म्हणजे शरीर मोठें असतां अणुपेक्षांहि सूक्ष्म करण्याची शक्ति प्राप्त होणें. महिमा म्हणजे शरीर लहान असतां अति मोठें मोठें करण्याची शक्ति प्राप्त होणें. गरिमा म्हणजे हलकें असतां अति जड करण्याची शक्ति प्राप्त होणें. लघिमा म्हणजे शरीर जड असतां अति हलकें करण्याची शक्ति प्राप्त होणें. वाशित्व म्हणजे सर्वांनीं आपल्याला अनुकूल वागावें अशी शक्ति प्राप्त होणें. ईशित्व म्हणजे सर्वांचें नियमन करण्याची शक्ति प्राप्त होणें. प्राकाम्य म्हणजे जसा संकल्प उत्पन्न होईल तशी गोष्ट घडून येणें. प्राप्ति म्हणजे प्राणिमात्राच्या इंद्रियांशीं तादात्म्य करून त्यांचे भोग आपल्याला प्राप्त होणें अशा ह्या अष्टमहासिद्धी आहेत. आणि कांहीं याशिवाय ज्या सिद्धि आहेत त्या अशाः— १ स्वच्छंद मृत्यु, २ परकाया प्रवेश, ३ दुरश्रवण दर्शन, ४ मनोजव इत्यादि पुष्कळ आहेत. ह्या सर्व सिद्धि— जितेंद्रिय, स्थिरचित्त, जितश्वास, ब्रह्मनिष्ट अशा योग्यालाच मिळतात. इतराला मिळत नाहींत. कोणती सिद्धि कोणत्या धारणेनें मिळतें हेंही सर्व वर्णन केलें आहे. इतका विषय तृतीयपाद म्हणजे सिद्धिपादांत वर्णन केला आहे. आतां चवथा म्हणजे कैवल्य पाद यांत कैवल्य म्हणजे काय याचा विचार केला आहे. प्रथम ऋतंभरा प्रज्ञा उत्पन्न होते. तिच्याच दृढतेचा अभ्यास योग्यानें फार दिवस केला म्हणजे कैवल्य प्राप्ति. कैवल्य म्हणजे केवलपणा आत्म्याला प्राप्त होतो. देश काल अवस्थेचे प्रतिबंध व अविद्येपासून उत्पन्न होणारे क्लेश, कर्म विपाक या सर्वांतून योगी मुक्त होतो. निरंतर वासना रहित स्वात्म सुखांतच रमणारा निर्भय अशी स्थिति योग्यास प्राप्त होते. यालाच कैवल्य म्हणावें. हाच परम पुरुषार्थ हीच कृत कृत्यता, हीच परम शांति, हेंच परम सुख, हेंच जन्माचें सार्थक, हाच परम योग. हीच अखंड समाधि असें वर्णन करून चवथा पाद समाप्त केला आहे. याप्रमाणें पातंजल सूत्रांत सारांश आहे.

## ६ गृहिणी.

स्वतांची पत्नी शिकलेली नव्हती म्हणून स्त्रीशिक्षणाभिमानी गोपाळरावांनीं तिला हिडीस फिडीस केलें नाहीं. जुन्या बाळबोध घराण्यांत वाढलेल्या, नव्या काळाचें वारें अंगावरून न गेलेल्या धर्मभोळ्या यशोदाबाईंना गोपाळरावांच्या संसारांत निखालस स्वातंत्र्य होतें. अगदींच अपरिहार्य कारणाशिवाय गोपाळरावांनीं स्वशक्त्यनुसार आपल्या पत्नीचें कोडकौतुक पुरवावयास कमी केलें नाहीं, कीं तिला कधीं अंतर दिलें नाहीं. गोपाळराव लग्नाची जबाबदारी पुरी ओळखून होते. म्हणूनच सहेतुकपणेंच त्यांनीं आपल्या निरक्षर पत्नीस दोन अक्षरें शिकवलीं. "मी आधीं मेलों तर हिच्या चरितार्थाकरितां काय ठेवणार? तेव्हां दोन अक्षरें हिला आलीं तर मुलींना शिकवून ही आपलें पोट भरील." रा. महाजनी मास्तरांच्याजवळ असले कर्तव्यदक्ष उद्गार आगरकरांनीं एकदां काढले.

(२८) गोपाळरावांची "लिट्ल् गो" ची परीक्षा झाली. त्या वेळीं त्यांच्या पत्नी माहेरास होत्या. आगरकरांनीं कांहीं पुस्तकें सासुरवाडीस म्हणजे उंब्रजेस पाठवून पत्नीस शिकवा म्हणून सासऱ्यांस विनंती केली. पण सासरे खमंगच. "पत्नीच्या जुनेरी लुगड्यांची व्यवस्था नको करायला तुम्ही?" असें लिहिलें त्यांनीं. तेव्हां गोपाळरावांनीं ताबडतोब आठ रुपये पाठविले.

(२९) सातारा येथील माचीचे श्री. राघो गंगाधर जोशी यांच्या पत्नी 'सत्यंकाकू' या यशोदाबाई आगरकरांच्या मावशी. या बाईंनीं आपल्या एकुलत्या एक भाचीच्या घरीं मातृवात्सल्यानें फार कष्ट उपसले. गोपाळराव त्यांना फार आदरानें मानीत. गोपाळरावांचीं मतें मावशींना पसंत नसलीं तरी गोपाळराव एक थोर पुरुष आहेत एवढें त्यांना पटे. गोपाळराव वारले तेव्हां आपल्या भाचीला त्या म्हणाल्या, रडतेस कसली? पुढच्या पिढीची, मुलांची निगा तूं केली नाहींस तर कर्तव्यदक्ष गोपाळरावांची कसली तूं बायको? आला प्रसंग कठीण खराच. पण कसल्याही प्रसंगांत कर्तव्य विसरावयाचें नाहीं, हें तर गोपाळरावांचें ब्रीद! तूं अशी रडत बसलीस अन् अंगावरचें दूध आटलें तर या छोट्या मुलीचें कसें व्हायचें?" त्यावर रडणाऱ्या यशोदाबाईंनीं जे डोळे पुसले ते पुसलेच. मन घट्ट करून, मुलांच्या देखत त्या सहसा रडल्याच नाहींत. वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षांत त्यांच्यावर वैधव्याचा प्रसंग आला होता. तेव्हां त्यांना तें व्रत आचरणें किती कठीण गेलें असेल बरें?

(३०) गोपाळरावांना कर्तव्यदक्षतेइतकीच व्यक्तिस्वातंत्र्याची चहा होती. हें स्वातंत्र्य अर्थातच पत्नीला परिपूर्ण असे. त्यासंबंधींचा एक संस्मरणीय प्रसंग असा. पुण्याचें न्यू स्कूल, शनिवारचा दिवस, आगरकरांचा तास आला. विद्यार्थी उत्सुकतेनें वाट पाहूं लागले. घंटा झाल्यावर थोड्या वेळानें आगरकर वर्गांत आले आणि आतां अभ्यासाला सुरवात करणार तर वेलणकर आपला उभाच!

"सर, मला कांहीं विचारायचं आहे!"

'खुशाल विचार. What do you want ?'

"पण सर, तुम्ही रागावणार नाहीं ना? Matter जरा private आहे—"

'अरे मला कळूं दे तर खरं! इतका चिचकतोस कां'

"सर, काल जोगेश्वरीच्या देवळांत मिसेस आगरकरांनीं सुवासिनींच्या खणानारळांनीं ओट्या भरल्या..."

'हो, भरल्या.'

"पण सर, तुम्ही तर सांगतां नेहमीं कीं मूर्तिपूजा अन् हें सगळं थोतांड आहे. ...अन् मग हें कसें?... सर जरा..."

'खुळा कुठला! मी म्हणजे कांहीं मिसेस आगरकर नव्हे. नवरेपणाच्या जोरावर मी माझीं मतें त्यांच्यावर लादूं कीं काय? छट्!!'

"सर, पण खणानारळांना पैसे आपणच दिले कीं नाहीं?"

"जरूर! त्यांचें मत जोंपर्यंत मला बदलतां आलें नाहीं तोंपर्यंत त्यांच्या Honest conviction प्रमाणें त्यांना चालूं दिलंच पाहिजे. आणि त्याकरतां जर कांहीं खर्च लागला तर मला तो करायला नको कां? हिंदु समाजांत स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी असतांना त्यांच्या Honest conviction ची गळेचेपी होऊं नये म्हणून कुटुंबाच्या नेत्यानें दक्षता नको कां घ्यायला?'

"स्वतःचें मत त्या Honest conviction च्या विरुद्ध असलें तरी?"

'तरी सुद्धां. तरच स्वतंत्र विचारांचा परिपोष होईल; व्यक्तीचा व्यक्तीवरील विनाकारण जुलूम टळेल आणि सामाजिक नीतीची शुद्धता राहील.'

मग पुढें सरळ तास सुरू झाला.

(३१) दुसरी गोष्ट अशी. एका दसऱ्याला श्री. विष्णु मोरेश्वर महाजनी सहकुटुंब पुण्याला होते. गोपाळरावांचे हे गुरु. साहजिकच सर्व मंडळींना आगरकरांनीं आपल्याकडे जेवावयास बोलाविलें. सौ. महाजनींना सौ. आगरकर आमंत्रण द्यावयास गेल्या होत्या. यशोदाबाईंचें कुंकू लावून झाल्यावर, सौ. महाजनी म्हणाल्या,—

"काय हो, उद्यां तुमच्या इथं जाकीट घालून जेवायला यायचं कां? नुकतंच सुधारकांत बायकांनीं जाकिटं घालायला पाहिजेत असं लिहिलं आहे, म्हणून विचारतें!"

यशोदाबाई—"पुराणांतलीं वांगीं पुराणांत. पत्रांतलीं मतं माझ्यावर दिखील लादायचीं नसतात, मग तुमच्यावर कसा त्यांचा जुलूम होणार?"

## ७ शिक्षक.

आपल्या सरकारी नौकरीला ठोकर मारून निबंधमालाकार पुण्यास आले होते, आणि एखादी नवी शाळा काढण्याच्या विचारांत होते. तेव्हां अशा परिस्थितींत आपण नवीन शाळा काढण्याचें ऐवजीं आपणच त्यांना जाऊन मिळावें अशी टिळक

आगरकरांना कल्पना सुचली व लगेंच त्यांनीं ती अमलांतहि आणिली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनींहि या दोघा उत्साही तरुणांचें हार्दिक स्वागतच केलें. त्यांना या दोघांचे विषयीं काय वाटत होतें हें त्यांच्या एका पत्रांत स्पष्ट होतें. आपल्या बंधूस लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं लिहिलें होतें, "··टिळक आगरकर इत्यादींनीं आपण होऊन मजकडे [शाळा काढण्याच्या] माझ्या धाडसांत सामील होण्याचें स्वतःच्या खुशीनें कबुल केलें आहे. ता. १ जानेवारी हा दिवस आमचें निशाण उभारण्याला आम्ही मुक्रर केला आहे. अशा तोफखान्यापुढें [सरकारी] हायस्कूल किती वेळ टिकाव धरणार? तें ताबडतोब मोडकळीस आलेंच पाहिजे."

## ८ संपादक.

### सुधारकाचें जाहीर पत्रकः—

ज्यांना हिंदुस्थानचा इतिहास यत्किंचित अवगत असेल, त्यांना येथें इंग्रजांचा अंमल कायम होण्यापूर्वी आमची स्थिति कशी होती, व तो झाल्यापासून तींत किती बदल झाला आहे आणि पुढें किती होण्यासारखा आहे, हें स्वल्प विचाराअंतीं समजण्यासारखें आहे. मोंगलांच्या तीनचारशें वर्षांच्या, किंवा मराठ्यांच्या दीडदोनशें वर्षांच्या अमलांत ज्या राज्यविषयक, समाजविषयक, नीतिविषयक व शास्त्रविषयक विचारांचा लोकांत आविर्भाव झाला नाहीं, ते विचार इंग्रजलोकांचें राज्य सर्वत्र स्थापित झाल्यापासून पुरतीं शंभर वर्षें झालीं नाहींत तोंच चोहोंकडे पसरून जाऊन, हिंदुस्थानच्या स्थितिस्थापकताप्रिय लोकांस एक प्रकारची अज्ञातपूर्व अशी जागृतावस्था झाल्यासारखी दिसत आहे, व आज मित्तीस हिचा अनुभव येथील लोकसंख्येच्या मानानें तिच्या अगदीं स्वल्प अंशास होत आहे, हें जरी खरें आहे, तरी थोड्या वर्षांत, विद्याप्रसाराचा क्रम प्रस्तुतप्रमाणें अव्याहत चालल्यास, हा अनुभव बहुतेक लोकांस होऊं लागेल हें उघड आहे. तेव्हां आतां असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ह्या नूतन जागृदवस्थेचा परिणाम होणार तरी काय? ज्यांची चालू घटकेवर दृष्टि असेल व ज्यांना मागेंपुढें पाहण्याची दगदग नको असेल, त्यांना हा प्रश्न सुटण्याचा संभव नाहीं, आणि तो त्यांस कोणी सुचविला तरी ते त्यास उत्तर देण्याच्या कटकटींत पडणार नाहींत. पण ज्यांना राष्ट्रास अधोगति, दुर्गति किंवा उन्नति कशी येते, हें थोडेंबहुत समजलें आहे, त्यांना अशा प्रकारचें औदासीन्य धरतां येत नाहीं. मुसलमान लोक आह्मांहून म्हणण्यासारखें सुधारलेले नव्हते, म्हणून त्यांच्या अंमलांत आम्ही अगदींच नष्ट झालों नाहीं. पण सध्यां ज्या लोकांचा अंमल आपणांवर आहे, त्यांच्या आमच्या सुधारणेंत बहुतेक बाबतींत जमीनअस्मानाचें अंतर असल्यामुळें, त्यांच्यांतील अनुकरण करण्यासारख्या गोष्टी आम्ही लवकर उचलल्या नाहींत, व जें जुनें व घरचें तें सारें चांगलें, हा हेका धरून बसलों तर, उत्तरअमेरिकेंतील इंदिअनलोकांप्रमाणें आमची दशा होईल. हा भयंकर प्रसंग आपणांवर न यावा व भारतीय आर्यत्व अगदीं नष्ट न व्हावें हें इष्ट असेल तर जपानचीनाप्रमाणें आम्ही आपले डोळे नीट उघडूं लागून,

व जीवनार्थकलहांत आमचा निभाव कसा लागेल हें शोधून काढून, तदनुसार वर्तन करण्यास प्रवृत्त झालें पाहिजे; आणि हा स्थूल विचार पुढें ठेवून तदनुरोधानें साऱ्या समंजस लोकांचें लिहिणें व बोलणें चाललें पाहिजे. पण अलीकडे याहून बराच उलट प्रकार कित्येक शिकलेल्या लोकांच्या भाषणांत व लेखांत दिसूं लागला आहे. हा प्रकार दिवसेंदिवस अधिकाधिक फैलावत जाऊं न देण्यास व आपलें पाऊल पुढें पडण्यास्तव राजकीय, सामाजिक, नैतिक व शास्त्रीय विषयांत आम्हांस कोणत्या प्रकारचें वळण लावून घेतलें पाहिजे हें लोकांच्या नजरेस वारंवार आणण्यास प्रस्तुत स्थितींत वर्तमानपत्रासारखें सोईचें दुसरें साधन नाहीं; असें वाटल्यावरून सुधारक नांवाचें नवीन साप्ताहिक वर्तमानपत्र आम्ही सोमवार ता. १५ आक्टोबरपासून काढणार आहों.

या पत्राच्या नामार्थाला शोभतील असेंच लेख यांत येतील, हें सांगायला पाहिजे असें नाहीं. वर सांगितलेला हेतु मनांत धरून कोणत्याही व्यक्तीस किंवा वर्गास विनाकारण न दुखवितां ज्या मार्गानें आपलें पाऊल पुढें पडून आपणांस सुदिन येईल, तो मार्ग शुद्ध अंतःकरणानें दाखवावयाचा असा आमचा निश्चय आहे.

एकदां सर्वच पत्र मराठींत काढावें असें वाटलें होतें; पण तसें केलें असतां ज्या गोष्टीविषयीं पत्राचा असेल तसा अभिप्राय सरकारपुढें ताबडतोब येणें अवश्य असतें त्या गोष्टीविषयीं तो तसा व तितक्या जलदीनें येऊं शकत नाहीं, असें कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून सुधारकांत एक इंग्रजी आर्टिकल व दोनतीन लहानसें स्फुट लेख घालण्याचा विचार केला आहे. इंग्रजी मजकुरानंतर फार जपून लिहिलेलें असें निदान एक मराठी आर्टिकल, व त्यानंतर चालू विषयावर आर्टिकलवजा बरेच स्फुट लेख येतील. पत्रांतील वाचनांगाचा अर्धा भाग बहुशः अशा प्रकारचा असेल. बाकी राहिलेल्या भागांत सारी मौज! थोड्याशा जागेंत पुण्याची हालहवाल, कामदारांच्या नेमणुका, बदल्या, बडतर्फा वगैरे झाल्यावर पुढें इंग्रजी व मराठी पत्रांतून फार परिश्रमानें काढलेलें अतिशय निवडक वर्तमानसार येत जाईल. हें झाल्यावर कधीं मजेदार विनोद, कधीं बोधपर सुरस गोष्ट, कधीं एखाद्या विख्यांत पुरुषाचें मनोवेधक चरित्र, कधीं अत्यंत उपयुक्त व मनोरंजक शास्त्रीय माहिती, कधीं आश्चर्यजनक वस्तूची हकीकत, व कधीं अद्भूत गोष्टींचीं वर्णनें—ह्याप्रमाणें स्थलावकाशानुरूप घालवेल तितका मजकूर घालून, सुधारकास जितकी उपयुक्तता व मनोरंजकता आणितां येईल तितकी आणण्याचा आमचा हेतु आहे. शिवाय कित्येक विद्वान व नांवाजलेल्या ग्रहस्थांनीं या पत्रास मधून मधून लेखनद्वारें मदत करण्याचें वचन दिलें आहे. ठिकठिकाणाहून वेळोवेळीं बातमीचीं पत्रें आणण्याचा आमचा विचार आहे. सुशिक्षित स्त्रियांनां स्त्रीशिक्षणादि विषयांवर आपले विचार प्रकट करितां यावे, व आमच्या वाचकांसही ते वाचण्यास मिळावे, म्हणून स्त्रीलिखित लेखांकरितां स्वतंत्र स्थल राखून ठेवण्याची आम्ही योजना केली आहे. सारांश, हें पत्र हातीं धरलें असतां शेवटपर्यंत वाचल्याशिवाय तें खालीं ठेवण्याची बुद्धि वाचकांस होऊं

नये, असें स्वरूप त्याला आणावें अशी आमची इच्छा आहे. सध्यां यापलीकडे लिहीत सुटण्यांत अर्थ नाहीं.

सर्व गोष्टींचा विचार करून पत्राचा सांचा तूर्त केसरीएवढा धरला आहे, व किंमत दोन रुपये ठेविली आहे. बाहेरच्या वर्गणीदारांस किंमतीशिवाय १३ आणे टपालहशील पडेल. ज्यांना घेण्याची इच्छा असेल त्यांनीं आपली वर्गणी म्यानेजर, आर्यविजय छापखाना, बुधवार पेठ पुणें या पत्त्यावर पाठवावी. ज्यांना हें पत्र घ्यावेंसें वाटत असेल, पण तें बाहेर पडल्याशिवाय वर्गणी भरण्याचें धाडस होत नसेल, त्यांनीं वरील पत्त्यावर सध्यां आपलीं नांवें कळविलीं तरी बस होणार आहे.

पुणें तारीख १ ऑगस्ट १८८८.　}　गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए.
　　　　　　　　　　　　　　　गोपाळ कृष्ण गोखले, बी. ए.

## A New Anglo-Vernacular Weekly Journal to be called
## THE SUDHAKAR or REFORMER.

Sheer physical force, as an instrument of political, social or moral conversion, has ceased to exist; and the days of intellectual persuasion have come. Those therefore that want to contribute what little they can to a right understanding of the many problems lying before the Indian public, need offer no apology for availing themselves of one of the best means of intellectually reaching the people—the Newspaper.

The Sudharak or Reformer, a weekly Anglo-vernacular paper, will make its first appearance on Monday the 15th of October 1888. The very name of the journal sufficiently indicates its nature and its purpose. Even countries like China,—so well known for ultra-conservative tendencies-have begun to realize the fact that if they want to hold their own in the unversal struggle for survival, they must adopt the essential principles as also the methods of work of European Civilization. After so many years of liberal English education, this sense should have been more awakened in us than in any other Asiatic people. But unfortunately there has, of late, become visible a tendency not only to conceal or cover our national defects, but also to misinterpret and misrepresent even what is best in Western Civilization. It is to combat this tendency, to point out our faults, and to impress upon the minds of our countrymen the idea that in a modified adoption of many of the essential elements of Western Civilization lies the real salvation of our country, that we are going to start our paper. Many learned and distinguished friends have not only expressed their sympathy with our object but also promised occasional contributions.

The Sudharak will, for the present, be of the size of the 'Kesari'. It will contain one English article written with great care and thought, and two or three notes in English on current topics. The rest of the matter will be given in Marathi. The annual price will be Rs. 2, or Rs. 2-13 annas including postage.

Poona　　　　　}　GOPAL GANESH AGARKAR, M.A.
1st August 1888.　}　GOPAL KRISHNA GOKHALE, B.A.

( ३२ ) सुधारक पत्रांत धार्मिक म्हटल्या गेलेल्या बाबींवर टीका मोठी कडक आली, आणि तिचा परिणाम असा झाला कीं, कांहीं माथेफिरूंनीं " आम्ही तुमचा खून करूं ! " अशा धमकीचीं आगरकरांना पत्रें पाठवलीं.

आगरकरांचे सहसंपादक गोपाळराव गोखले यांना या पत्रांची अर्थातच माहिती होती. ते दोघेहि त्या वेळीं भाटवडेकरांच्या वाड्यांत रहात असत. तेव्हां नित्यनियमाप्रमाणें चतुःशृंगीकडे फिरायला जाण्याच्या बेतांत आगरकर असतांना गोखले म्हणाले,– " निदान कांहीं दिवस तरी तुम्ही संध्याकाळीं फिरायला जायचें सोडून द्या; तुम्ही परतण्याचे वेळीं अंधार पडलेला असावयाचा. तेव्हां कांहीं माथेफिरूंनीं मनांत आणलें तर...... "

**आगरकर—** हें काय भलतेंच सांगतां तुम्ही मला ? अहो, या माथेफिरूंच्या धमक्यांना भिऊन जर मी फिरायला जायचें बंद करूं लागलों, तर उद्यां सुधारक लिहायचें सुद्धां सोडून द्यावें लागेल मला !

असें म्हणून छडगा घेऊन आगरकरांनीं चतुःशृंगीचा रस्ता सुधारलासुद्धां.

( ३३ ) सुधारकांतून पाश्चात्य संस्कृतीचें भाष्य करतांना अगदीं " क्रांतिकारक " मतें आगरकर प्रतिपादन करतात असें वाटे. तेव्हां हा सुधारकाचा कर्ता आहे तरी कसला, म्हणून एक गृहस्थ आगरकरांना ' पहायला ' आले. आगरकर त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजजवळील बंगल्यांत रहात होते. तेथें फाटकाजवळ त्यांनीं आपल्याला लिहायला-वाचायला एक स्वतंत्र खोली बांधवली होती. वरील गृहस्थ आले तेव्हां आगरकर याच खोलींत होते.

फाटकाजवळच्या खोलींतच गृहस्थ प्रथम डोकावले. तों त्यांना धाबळीची बाराबंदी घातलेला, पंचा नेसलेला, दुसऱ्या पंचानें टापशी बांधलेला आणि चिलीम ओढीत बसलेला एक मध्यम वयाचा गृहस्थ दिसला. तेव्हां ते विचारतातः—

" सुधारकाचे संपादक आगरकर कोठें आहेत ?"

" आपलें त्यांच्याशीं काय काम आहे ?"

" कांहीं विशेष नाहीं. त्यांची कीर्ति ऐकून त्यांना एकदां मला पहायचं आहे."

त्या मध्यम वयाच्या गृहस्थांनीं चिलीम बाजूला केली आणि म्हटलें, ' सुधारकाचा संपादक आगरकर तो मीच.' त्यासरसा भेटीला आलेल्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर विस्मय व विरस तांडव करूं लागलें. ते म्हणाले, "उगीच अशी थट्टा कां करतां ?"

" मी आपली थट्टा करीत नाहीं. खरोखर मीच तो आगरकर.'

" स्त्रियांनीं जाकिटें घातलीं पाहिजेत, असें प्रतिपादणारे सुधारकाचे संपादक आगरकर इतक्या साध्या राहणीचे असतील ही मला कल्पनाच नव्हती !"

( ३४ ) "आगरकर हे खास ब्राह्मणबीजाचे नाहींत." असे तारे पुण्याच्या एका संपादकांनीं एकदां तोडले. सुधारकांतील ब्राह्मण समाजावरील हल्ल्यामुळें सदर संपादक चिडले होते. पण त्यांनीं तें किळसवाणें विधान करतांच आगरकरांच्या स्नेह्यांचा संताप झाला. ते आगरकरांना म्हणूं लागले कीं, " खेंचा या नरपशूला कोर्टांत."

तेव्हां शांतपणें आगरकर म्हणतात–

" पुणें वैभवकाराचा माझ्याशीं व्यक्तिदृष्ट्या कोणताही हेवादावा नाहीं ...... हा पत्रकर्ता ज्या परिस्थितींत लहानाचा मोठा झाला, त्याच परिस्थितींत दुर्दैवानें मला काळ कंठावा लागला असता व शिक्षणानें मनावर होणाऱ्या सुसंस्कारांना मला पारखें व्हावें लागलें असतें, तर मला वाटतें कीं, या बाबतींत कदाचित् त्याच्यावरही मीं ताण केली असती. तेव्हां अशा मनःस्थितीबद्दल त्याची कींव करून सहिष्णुता धारण करण्यानेंच परिणामीं सुधारणापक्ष विजयी होण्याचा जसा संभव आहे, तसा कायद्याचा धाक दाखवून त्यांचीं तोंडें बंद करूं पाहण्यानें नाहीं. असल्या लेखकांचा हा बेतालपणा म्हणजे सुधारणाप्रेमाची पाहिली पायरी. मला राग येतो तो या लोकांचा नाहीं. तर कोणी आमच्या गतानुगतिकत्वाला नांवें ठेवो, त्याची यत्किंचितही फिकीर न करतां जे उदासीन राहतात त्यांचा मला राग येतो !!"

तथापि हें झालें आगरकरांचें खाजगी उत्तर व समाधान. एकदां हातीं लेखणी धरल्यावर स्वतः आगरकर एकपरी उतावीळ; दुसरें त्या बेताल पत्रकाराचे कान मोडण्याबद्दल मित्रांचा लकडा; आणि तिसरें, अकारण लोकभ्रम तरी कां राहूं द्यावयाचा ? म्हणून सरतेशेवटीं आगरकरांनीं सदर निरर्गल टीकाकार पत्रकारास आव्हान दिलेंच कीं, " पुरावा जाहीर करा. "

त्यासरसा तो पत्रकार वरमलाच. त्यानें जाहीर दिलगिरी प्रदर्शित केली.

## ९ सज्जन

( ३५ ) गोपाळराव मोठे विनोदी होते. आपल्या " पाबशेर मिशा आपल्याला फिल्टरसारख्या उपयोगी पडतात." असें ते म्हणत.

( ३६ ) दम्याचा स्वताला अत्यंत त्रास होत असतांही त्याचें वर्णन ते मंडळींत मोठ्या विनोदानें करीत. दम्यामुळें भरून येणारी छाती मोकळी करण्यासाठीं वैद्याच्या सल्यानें कांहीं औषधि मिसळून ते मधून मधून तंबाखू ओढीत. शिवाय पोटांतही ते औषध घेत. त्यामुळें माझा कोठा म्हणजे सर्व रसायनांचा अर्क आहे" असें ते केव्हां केव्हां म्हणत.

( ३७ ) संपादक आगरकरांना पहायला आलेल्या तरुण गृहस्थाच्या भेटीची नकल आगरकर हाटकून करायचे व हंशा पिकवायचेच. त्यांच्या विनोदी स्वभावाला आनंदी चेहऱ्याची जोड असल्याकारणानें आगरकरांच्या बैठकीला मोठा रंग भरत असे. त्यामुळें त्यांचें भाषण सारखें ऐकत रहावें असेंच वाटे. त्यांच्या गप्पांचे विषय देखील काव्य, स्त्रीपुरुषांचे परस्पर संबंध, शेक्सपीअरचीं नाटकें, सिजविक्, मिल, स्पेन्सर–कांट यांचे ग्रंथ, स्त्रीशिक्षण, क्राफर्ड प्रकरण असे श्रोत्यांच्या मगदुराप्रमाणें असावयाचे.

(३८) मुलांशीं मूल होऊन खेळण्यांत देखील गोपाळरावांना कमीपणा वाटत नसे. एकदां महाबळेश्वरास सहकुटुंब गेले असतां, आगरकर संध्याकाळचे वेळीं आंगणांत आपल्या मुलांच्या हातांत दोन दोऱ्या देऊन त्याला घोड्यासारखें पळवीत

होते. जरा वेळानें चिरंजीवांची लहर फिरली. तसें ते बनले चाबुकस्वार व गोपाळराव झाले घोडा. पण हा घोडा पडला दमेकरी. त्यामुळें त्याला पळवत नव्हतें. तेव्हां मागच्या स्वारानें उडवला चाबूक अन् काय! श्री. गोविंद वासुदेव कानिटकर तेथें उभे होते. त्यांच्याकडे पाहून गोपाळराव हंसले व म्हणाले—

"सामाजिक सुधारणा लवकर व्हाव्या म्हणून शब्दांचे चाबूक मी समाजाला मारतों आणि त्याची प्रतिकृतिच हा यशवंत माझ्या पाठीवर करीत आहे."

(३९) प्रा. गोळ्यांचा "प्यारा प्यून" कोंडीबा नाफड. हा शिक्षकमंडळीचें 'मधल्या चहाचें' बिल महिन्याच्या महिन्यास वसूल करी. आगरकर चहा न घेणारे; पण त्यांच्याकडूनही पठ्ठ्यानें दोनदां वसुली केली! आगरकरांनीं तें फारसें मनावर घेतलें नाहीं. पण आगरकरांची आई मृत्युशय्येवर असल्याचें कळल्यावर त्यांनीं सदर्न मराठा रेल्वेवर ताबडतोब जाण्यासाठीं कोंडीबास टांगा आणावयास धाडला. पण त्या बहादुरानें इतका उशीर केला कीं, आगरकरांनीं धडपड करून पुण्याचें स्टेशन गांठलें. पण कऱ्हाडकडे येणारी त्यांची ती गाडी हुकलीच! त्यामुळें आईची गांठ होऊं शकली नाहीं. आगरकर त्यामुळें कोंडीबावर रागावले. पुण्यास परतल्यावर त्यांनीं कोंडीबास एक रुपया दंड केला अन् पुढें विचारांतीं तो माफही केला.

(४०) १८८६ सालीं आगरकर न्यू इं. स्कूलमध्यें शिक्षक होते. त्यांचें डॉ. गर्दे यांच्या दवाखान्यांत नेहमीं जाणेंयेणें असे. डॉक्टरांचे कंपाउंडर गोविंदराव देवधर यांचा त्यामुळें आगरकरांशीं परिचय. गोविंदरावांची स्थिति गरीबीची असल्यामुळें त्यांनीं त्या परिचयाचा फायदा आपले धाकटे बंधु गोपाळराव देवधर यांच्या शिक्षणासाठीं घेतला. त्यांनीं विनंती केल्याप्रमाणें आगरकरांनीं गोपाळराव देवधरांना नादारी व कांहीं पुस्तकेंही मिळवून दिलीं. पुढें सदर देवधर मॅट्रिक झाल्यावर पैंचाच्या परिस्थितीनें त्यांना कॉलेजांत शिकणें अशक्य होतें. तेव्हां आगरकरांनीं पुढें होऊन गोविंदराव देवधरांची समजूत घातली व आपण शक्य ती मदत करण्याचें अंगावर घेऊन कॉलेजमध्यें जावयास गोपाळराव देवधरांना वडील बंधूंची संमति मिळवून दिली. "पेरून ठेव, केव्हां उगवेल याचा नेम नाहीं." असें आगरकर गोविंदराव देवधरांना म्हणाले होते; आणि सेवासदन व सहकारी चळवळ यांच्या रूपानें तें उगवलें.

## १० शेवट.

गोपाळराव आगरकरांची तब्येत १८९५ च्या उन्हाळ्यांत विशेष बिघडली. दमा दम काढून देईना. तेव्हां कोरड्या हवेंत मिरजेला जाण्याचा बेत ठरला. पण शेवटीं 'उदरा'चाही प्रादुर्भाव झाल्याचें निदर्शनास आल्यामुळें तितकेंच राहिलें. शेवटीं १६ जून १८९५ रोजीं आगरकरांची प्रकृति खाडकन् कोसळली. त्या रात्रीं त्यांना झोप नाहीं. घरांतील माणसें जागत होतीं. पहाटे ते उठले, त्यांना एक जुलाब झाला. चाराचा सुमार होता तो. त्या वेळीं ते मंडळींना म्हणाले, "झोंप येते, मी स्वस्थ निजतों; तुम्हीहि निजा." असें म्हणून गोपाळराव निजले ते निजलेच!!

त्यांची पत्नी, 'मावशी', केशवराव फडके सात वाजतां उठलीं; तो काय, गोपाळरावांचें प्रेत!!!

(४२) आगरकरांना आपल्या हयातींतच विम्याचे पैसे मिळाले होते. त्याचें असें झालें कीं, डे. ए. सोसायटीच्या नियमाप्रमाणें आजीव सेवकाचा विमा उतरावयाचा म्हणून आगकरांचा विमा उतरणें क्रमप्राप्त. पण ओरिएंटल कंपनीचे पदमजी दमेकरी आगरकरांचा विमा उतरेनात. तेव्हां सोसायटीनें प्रिं. आपट्यांचेच तीन तीन हजारांचे दोन विमे उतरले. त्यांत एक आगरकरांसाठीं होता. प्रिं. आपटे वारले, तेव्हां आगरकरांना ३१०० रु. मिळाले, असें ऐकिवांत आहे.

## ११ पश्चात.

अडीअडचणीला उपयोगी पडावे म्हणून दहा रुपये व एक रुपयाची मोड आगरकर बाळगीत. आपलें कितीहि दारिद्र्य असलें तरी आपल्या प्रेतसंस्काराबद्दल आपल्या मित्रांवर खर्च पडूं नये म्हणून गोपाळरावांनीं आपल्या पेटींत वीस रुपयांची एक परचुंडी बांधून ठेवली होती. तीवर एक चिठ्ठी मारली होती कीं, "माझ्या प्रेतदहनार्थ!" आगरकरांच्या मरणोत्तर गोपाळराव गोखल्यांना जेव्हां ही पुरचुंडी दिसली, तेव्हां त्यांना रडूंच कोसळलें!

(४४) प्रिं. आगरकर दिवंगत ( शरीरानें, कीर्तीनें नव्हे ) झाल्यावर, त्यांच्या नांवाचा म्हणजे "आगरकर-क्लब" स्थापन झाला होता.

( श्री. दा. र. करंदीकर यांचें पत्र मालदोलीहून ता. २८-९-३४ चें श्री. पु. पां. गोखले, कऱ्हाड यांसी. )

(४५) "कै. प्रिन्सिपलसाहेब, ज्या अज्ञान देशबांधवासाठीं आपल्या कुटुंबाची मित्रांची, ज्ञातीची व प्रसंगीं त्या देशबंधूंची इतराजी तुम्ही आनंदानें, खुशीनें दृढनिश्चयानें सहन केली, तथापि त्यांना म्हणून सोडले नाहीं, शत्रूहि बोलणार नाहीं असें शब्द आपल्या निकट मित्रांनीं सार्वजनिकरीत्या आपणांवर टाकिले तरी आपण डगमगला नाहीं, पतित मनुष्याची जी अवस्था करूं नये ती आपल्या मूर्ख विद्यार्थ्यांनीं व दुराग्रही प्रतिपक्षीयांनीं पुण्यासारख्या शहरांत केली तरी त्या लोकांच्या हिताकडे आपण किंचितहि दुर्लक्ष केलें नाहीं, ज्या स्वार्थबुद्धीचा आपणांस जन्मांतहि स्पर्श झाला नाहीं, तिचाच आरोप करण्यास जरी कोणी फारसे कचरले नाहींत तरी, आपण त्यांस चिकटून राहिला, दारिद्र्यावस्थेंत विद्याभ्यास करून तारुण्यावस्थेंतहि निष्कांचनतेच्या पदरीं जो पडला आणि हजारों रुपये प्रातीची सुंदर आशा पुढें असतां ज्यानें तिला लाथाडलें, त्याची निरपेक्षता किती असेल? ज्यानें आपल्या विचारांची दिशा थोडी तरी बदलली असती तरी लोकांनीं प्रीतीनें मेहेर नजर दाखविली असती, अशा स्थितींतहि ज्यानें मनाला चांगलें वाटेल तेंच लिहून व करून कांहीं काळ तरी समाजद्वेष संपादून स्वसुखावर पाणी सोडलें त्याची लोकहितैकनिष्ठा किती तीव्र असेल बरें."

—एक विद्यार्थी

विष्णुशास्त्रीबोवांच्या मागें मराठी भाषेमध्यें इंग्लिश विचार उत्तम रीतीनें उठवून देणारे, मार्मिक लेख लिहिणारे, मराठी भाषेस अभियुक्त भाषांच्या वर्गांत नेऊन बसविणारे एक आगरकरच होते. ...मित्रांना साहाय्य होऊन मंडळींतील सौजन्य व प्रेम वाढविणें ही कला त्यांच्या अंगांत उत्तम तऱ्हेनें वास्तव्य करीत होती.

—जगद्धितेच्छु ( पुणें )

त्यांच्या मृत्युनें फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांसच नव्हे, तर सर्व महाराष्ट्रास एक अत्यंत श्रेष्ठ शिक्षक नाहींसा झाला. ...स्वार्थत्याग, परार्थपरायणता, निर्भय लेखनशैली आणि निर्मल चरित्र हे चारी गुण त्यांचे ठिकाणीं एकवटलेले होते. 'नवीन महाराष्ट्रा'चा इतिहास लिहितांना त्यांचे चरित्रासाठीं पहिल्याच भागांत पानें राखून ठेवावीं लागतील.

—करमणूक ( पुणें )

लोकांना जागृत करणारे पुरुष राष्ट्राचे खरे उद्धारक होत यांत शंका नाहीं. प्रपंचांत राहून परोपकाराचेपायीं सर्वस्व खर्च करणाऱ्या अशा व्यक्ति फारच दुर्मिळ असतात. अशा दुर्मिळ व्यक्तींत प्रिन्सिपॉल आगरकर यांची गणना होती
......गोपाळरावजींनीं सामाजिक सुधारणेची एकेक बाब हातीं घेऊन त्याचें विवेचन इतक्या सुंदर, मनोरंजक व चटकदार भाषेंत करण्यास प्रारंभ केला कीं, सुधारणा-विरुद्ध पक्षाचे लोक देखील सुधारकाचा अंक केव्हां हातीं येईल याची मोठ्या उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत.........

—ज्ञानप्रकाश ( पुणें )

हा महाविद्वान्, अद्वितीय धैर्यशाली, निःस्पृह, शांत, निरीच्छ, सुधारक म्हणविण्यास खरा पात्र, खरा देशहितेच्छु व अनेकांचा मित्र व गुरु, असा मोठ्या योग्यतेचा अलौकिक पुरुष आपल्याला टाकून गेला, त्याला आपण सर्वांनीं शेवटचें पाहून घ्यावें.

—स्मशानभूमींत चार हजारांच्या समूहांत
पुणें हायस्कूलचे दुसरे असिस्टंट मास्तर
रा. रा. विनायक सखाराम देशमूख, बी. ए.

जें जें वाटे तुजसि बरवें, निश्चयें तेंच केलें ।
लोकारोपा कधिं न गणिलें हें जना दाखवीलें ॥
राहूनियां निशिदिनिं बहू दक्ष कर्तव्य कर्मी ।
कित्ता साऱ्या सुमति अनुजा घातला फार नामी ॥
वाटे तूंतें बहुत जड ती शृंखला राजसेवा ।
धिःकारूनी तिजसि धरली गौरवें देशसेवा ॥
होता अंगीं तव विनय तो काय वर्णूं तयाला ? ।
विद्यादाता तुजसम नसे आर्य लोकांत झाला ॥

—ना. सि. जोग ( कोल्हापूर )
२१-६-९५

जो का स्वामी स्वमतविजयी अल्प जे त्या नरांचा ।
किंवा वैरी दृढतर रुढीपाशबद्धा खरांचा ॥
कीं जो मोठा प्रबल जगतीं लोकलज्जा विघाती ।
हा ! हा ! गेला अगरकर तो ! दुःख या कोण घातीं ॥

—सुधारणाभिमानी (सातारा)
२०–६–९५

By dint of energy and perseverence and that stern purpose which was all through so prominent a feature of his carear, he achieved for himself in course of time, a distinguished place among the scholars and educationists of the Presidency. ...Mr. Agarkar was nothing, if not heroic. ... He always placed before himself high ideals and always tried his utmost to live up to those ideals. His sense of duty and his love of truth and of discipline were as great as his courage was unbending and his will undowntable. In private life he was extremely simple and gentile. This example must animate and sustain the collegues who remain to mourn the loss.

– Hon. Mr. **G. K. Gokhale.**

## प्रकरण ३ रें

# चरित्रकथन

### १ टेंभूस

" आपदि स्फुरति प्रज्ञा यस्य धीरः स एव हि ॥ "

गरुडावर बसलेले कृष्णपाषाणाचे रमणीय लक्ष्मीनारायण, त्यांचें उंच चुनेगची तटाचें देऊळ, त्या देवळाचा विस्तीर्ण सभामंडप, त्याच मंदिराचें रेखीव काम केलेलें उंच शिखर, महाद्वारावरील नगारखाना, मजल्यामजल्यावरील अनेक कमानींतून बसवलेल्या निरनिराळ्या पौराणिक मूर्ति—अशा थाटाचें देऊळ बांधून त्याला दरसाल पाऊणशें रुपयांचें उत्पन्न लावून दिलें असेल तर तें, टेंभूसारख्या कृष्णाकांठच्या 'टिकल्या' गावांत मोठ्या मानमान्यतेचेंच काम गणलें जाईल यांत शंका कसली ! भरीला उंच तटबंदी असलेला राहता वाडा असेल तर हें सर्व करणाऱ्याच्या कर्तबगारीला बऱ्याच ठाकठिकीचें बस्तान म्हणावयास कांहींच चिंता नाहीं.

बस्स ! टेंभूस अगदीं हेंच वैभव श्री. बच्चाजीपंत आगरकरांचें होतें. यांच्या-पूर्वी कोणत्या वासिष्ठगोत्री दातार रावानीं रत्नागिरी जिल्ह्यांतील आगरी कां सोडली आणि काय हिशेबीं सातारा जिल्ह्यांतील ( कऱ्हाड तालुक्यांत ) टेंभूस ठिय्या दिला, हें कांहीं फारसें माहीत नाहीं. पण टेंभूमध्यें आगरकर मंडळी मोठी सालस व सात्त्विक म्हणून गणली जात; आणि बचाजीपंत आगरकरांचें वैभव घराण्याच्या सात्त्विकतेला खुलविणारेंच होतें.

बच्चाजी पंताचे चिरंजीव विष्णुपंत यांनीं आपल्या वडिलांचा जामानिमा जेमतेम राखला. पण पुढें लक्ष्मीला आगरकरांचें घर मानवेना. विष्णुपंताच्या वडील चिरंजीवांनीं—लक्ष्मणरावांनीं—कारकुनीच्या काटेतोल कामावर राम राखायाला कमी केलें नाहीं. पण वारेवेगानें पळत्या लक्ष्मीला हाताच्या अडसरानें कसें अडवितां येणार ? लखूनानांनीं आपल्या हातानेंच आपल्या धाकट्या बंधूंना म्हणजे गणूआप्पांना चतुर्भुज केलें होतें. पण आप्पा म्हणजे " आळसाचे आश्रित ", त्यामुळें नानांच्या मागें लक्ष्मीनें काढतां पाय घेतला असला तर आश्चर्य काय ?

एवढें बरीक खरें कीं, लक्ष्मीच्या कृपाछत्राचा जर तेवढा अपवाद केला, तर गणूआप्पा आणि त्यांच्या पत्नी सरस्वतीकाकू हें आगरकरदांपत्य निर्मळ सुख भोगीत होतें. त्यांचें एकमेकांवर निरतिशय प्रेम असे. उभयतां सरळ स्वभावाचीं व देवभक्त होतीं. देवाची पूजाअर्चा करावी अगर त्यासाठीं लागणारें साहित्य जमवत बसावें, असाच दोघांचाही बहुधा दिनक्रम होता. जुन्या वळणाप्रमाणें गणूआप्पांना संथा मिळाली होती आणि थोडाफार संस्कृतचा अभ्यासही झाला होता. त्या पुंजीवर ते कधीं पुराण सांगत तर कधीं कीर्तनही करीत. सरस्वतीकाकूंच्या जिभेवर तर प्रत्यक्ष सरस्वती नाचत असल्याचा भास त्यांच्या काळच्या स्त्रियांना होई. बोलबोल म्हणतां त्या देवासंबंधानें गाणीं रचत.

## २ कृष्णाकोयनांच्या संगमावर

सरस्वतीकाकूंनीं सात वेळ पाळण्याची दोरी हलवली. पण घरच्या गरीबीमुळें आणि कौतुकाच्या आईच्या प्रेमळ बोलावण्यामुळें प्रत्येक खेपेला माहेरींच. काकूंचें माहेर कऱ्हाडास भागवतांकडे. तिथलीं १८५६ ची गोष्ट. काळाला कलाटणी मिळण्याच्या या ऐन सुमारासच कऱ्हाड येथें सरस्वतीकाकू आगरकरांला एक पुत्ररत्न झालें. तेंच गोपाळ गणेश आगरकर होत.

गोपाळराव आजोळींच जन्मास आले व लहानाचे मोठे झाले. बोबडकांद्या वाणीच्या व रांगत्यापळत्या चालीच्या लडिवाळ चिमणाईत, काय गोजिरवाणे चाळे गोपाळरावानें केले असतील तेवढेच; बाकी त्यांच्या पुढच्या आयुष्यांतला फारच थोडा काळ स्वतःच्या गांवीं म्हणजे टेंभूस गेला! धूळपाटीवर श्रीगणेशा शिकण्याच्या वयांत आईच्या मांडीचा लोभ अजिबात कसा सुटणार? पण गरिबीच्या साम्राज्यांत पश्चिमेलाही सूर्य उगवतो. टेंभूस शाळेचा गंध नाहीं, म्हणून अगदीं जवळची सोय काढली. सोय जाणील तो सोयरा हें भागवतांनीं उदाहरणानें सांगितलें होतें. त्यांच्याकडेच गोपाळास ठेवण्यांत आलें. बरोबरीचा "दत्तूमामा" कोडकौतुकाची आजी आणि कऱ्हाड म्हणजे टेंभूपासून फार दूर नाहीं. अशा सोईमुळेंच चिमण्या गोपाळाला आईबापांचा विरह बोंचला नाहीं.

दत्तू भागवत आणि गोपाळ आगरकर हे प्रेमळ मामाभाचे शिकूं लागलें आणि "बारा वर्सांवेरी इंग्रजीचीं तीन बुकें झालीं." पण नुसतें बुक एके बुक करून बरीक नव्हे. शाळेचे हेडमास्तर रा. नारायण मनोहर रोंधे मोठे हुषार आणि मेहनती. हंसत खेळत गमतीगमतीनें मुलांना अभ्यासाशीं कसें एकरूप करावें, ही विद्या त्यांना चांगली साधलेली. त्यांनीं विनोदानें प्रश्न विचारावा आणि गोपाळानें हुशारीनें व विनोदानेंच उत्तर देऊन त्यांच्या कसास उतरावें. त्यामुळें त्यांची व इतर देखील शिक्षकांची गोपाळावर मर्जी बहाल. पण एवढ्यानेंच काय झालें? शाळेच्या चार भिंतीबाहेरही गोपाळाची चलाखी दरवळत होती. दर रविवारीं नागपूरकर मुन्सिफाच्या आश्रयाखालीं एक सभा भरे. त्या सभेंत विद्यार्थी लिहून आणून निबंध वाचीत. ज्याचा निबंध उत्तम ठरे, त्याला रावसाहेब दोन रुपये बक्षीस देत. गोपाळानें या वाहत्या गंगेंत हात धुवून घेतला होता. परंतु या सोनेरी किरणाच्या ताफ्यांतच गोपाळ पटाईत होता असें नव्हे, तर सूर्योदयींच्या डोंगरचढाईंतसुद्धां तो हार जाणारा नव्हता. हूडपणा सदा हात जोडून गोपाळाच्या सेवेला हजर. सुट्टीची, फुरसतीची, करमणुकीची वेळ सांपडायचा अवकाश, कीं गोपाळ झाडावर तरी चढायचा, वाळवंटांत सख्यासोबत्यांनिशीं हुतूतू तरी घालावयाचा किंवा कृष्णाकोयनांच्या संगमांत पोहत डुंबत तरी बसायचाच.

अशा आनंदाच्या वाटिकेंत गोपाळाची प्रभा फांकत असतां त्याला दैवाची दृष्ट झाली! ती काढणार कशानें? प्रयत्नांची वज्रमुष्टि उभारली तरी दैव सात वेळां

घाव चुकवितें. तें गोपाळाला दाद कोठून देणार ? इंग्रजी तीन बुकें झाल्यावर कऱ्हाडचें शिक्षण संपलें. सरस्वतीला फल्गुपणा प्राप्त झाला आणि गोपाळराव खुंटले, तेव्हां धरली गोपाळरावांनीं मुन्सिफकोर्टांतली उमेदवारी ! लागले मांडी ठोकून खर्डे घासायला ! पण समाधान ? ढीम नाहीं. बरोबरीची मंडळी दौडत चालल्यावर कांटेवोंच झाली म्हणून हिय्येबाज काय रखडत बसेल ? गोपाळराव आगरकर म्हणजे कांहीं मद्दड मेंदूचा, गोलंकार स्वाभिमानाचा आणि आला दिवस कसा तरी खर्ची घालणारा रेम्याडोक्या आत्मा नव्हता. अंतःकरणाच्या तळमळीनें मेंदूंतही खळबळ सुरू झाली, अन् गोपाळरावांनीं एक नामी तोड काढली. रत्नागिरीस रा. वामन कृष्णाजी आगरकर डेप्युटी एज्युकॅशनल इन्स्पेक्टर होते. एकाद्या "चुलीची" मध्यस्थी नाहीं, तर गोपाळरावांच्या घरचेच ते. तिकडे जाण्याचा गोपाळरावांनीं विचार केला, आणि वाहिलें गंध फूल उमेदवारीला !! ही पूजा खुद्द नागपूरकर मुन्सिफांनीं सांगितली आणि रोख पाऊणशें रुपयांचा प्रसादही पदरांत टाकला.

## ३ पुन्हा पूर्वस्थळावर

नागपूरकर मुन्सिफांचा प्रसाद घेऊन कऱ्हाड ते रत्नागिरीचा प्रवास गोपाळरावांनीं पायीं केला आणि आपल्या आप्तांचें घर गांठलें. तथापि या अवघड जगांत कल्पनेचा प्रत्यक्षाशीं आणि आशेचा ' अस्ति– 'त्वाशीं सोळा आणे मेळ कधींच जमत नाहीं. कित्येकदां तर ' पांढऱ्यावर अक्षरओळख पटण्याऐवजीं शाईसारव मात्र विचकवते. ' गोपाळरावांची तशीच देना झाली. रत्नागिरीस त्यांना मृगजलाचा अनुभव झाला. कटु शब्दाच्या गारगोट्या बसल्या आणि शागीर्दाईच्या चपराकी खाव्या लागल्या. पण प्रखर ओजाचे गोपाळराव अशानें लटपटणारे नव्हते. "क्षणशः कणशश्चैव" त्यांना विद्या साधावयाची होती, म्हणून गिळले त्यांनीं अपमान ! रेटलें, पडलें तें काम; माधुकरीची मशाली केली व वारांचें वारें प्याले, पण दोन इयत्तांचे टप्पे चढले.

हरहर ! पुढें दम छाटेना, तेव्हां गोपाळराव टेकले पुन्हा कऱ्हाडास. कऱ्हाडच्या दवाखान्यांत ते आतां बनले कंपाउंडर आणि लागले बाटल्या भरायला ! पण उगवला दिवस मावळे, तरी गोपाळरावांच्या अतृप्त मनाची रखरख लवमात्र कमी झाली नाहीं. उदात्त व सर्वव्यापी शिक्षणाचा संस्कार होण्यासाठीं ते चातकासारखे तिष्ठत होते. अशा स्थितींतच एक दिवस दवाखान्यांतील प्रेतफाड पाहून गोपाळरावांना किळस आली नी फिरवली त्यानीं कंपाउंडरीकडे पाठ ! पण अशानें शिक्षणाचें तूप नाहीं, नौकरीचें तेल नाहीं अन रिकामपणाचें धुपाटणें मात्र......पण ही स्थिति नामधारी ठरली. उषःकालापूर्वीच्या सरत्या रात्रीचा तो काळाकुट्ट क्षण होता.


## ४ प्रवेशपरीक्षेंत पास

कारण लवकरच सदाशिवराव भागवतांची बदली वऱ्हाडांत झाली. ते लोकलफंड–ओव्हरसीअर होते आणि आगरकरांचे मधले मामा होते. त्यांची "मंडळी"


घेऊन गोपाळरावांनीं अकोल्यास दौड मारली व १८७२ च्या जूनमध्यें तेथील हायस्कुलांत ते लागले शिकायला. पण दैवाला हें कोठून सहन व्हायला ? त्यानें दाखवली चुणूक ! गोपाळरावांच्या मामीची आई अंथरुणाला खिळली आणि शेवटच्या भेटीसाठीं तिनें बोलावलें आपल्या लेकीला. आईकडे लेक किती दिवस राहाणार हें अशा कठीण प्रसंगीं कोण सांगणार ? तेव्हां गोपाळरावांस करून घालावें कोणी ? सदाशिवरावतात्यांना फिरतीचें काम, तेव्हां त्यांनीं गोपाळरावांस फिरून कऱ्हाडकडे तोंड फिरवण्यास सांगितलें. कऱ्हाड ! कऱ्हाडचें नांव निघालें कीं, शंकराच्या जटेंत गुप्त झालेल्या गंगेची मनधरणी गोपाळरावांस सुचावयाची ! पण गोपाळरावांनीं आतां ' तिसराच पंथ ' काढला. घेतली त्यांनीं अकोला हायस्कुलांतील विष्णु मोरेश्वर महाजनींचीं पत्रें आणि सुधारला पुण्याचा रस्ता. पण पाणी लागेना. कारण खुद्द महाजनींची प्रभा नुकती कोठें चमक मारूं लागली होती, " गुरु म्हणून लौकिक झाला नव्हता. " तेव्हां गोपाळराव पुण्यास गेले तसेच हात हालवीत फिरले परत अकोल्यासच ! तेथली अडचण ? गोपाळरावांचा स्वभाव हूड, आणि वडीलधाऱ्यांचा मान ठेवण्यांत ढिलाई, त्यामुळें सदाशिवरावांना त्यांचा राग होता. पण भाच्याबद्दल मामाजवळ रदबदली महाजनींनीं केली; शिवाय त्यांनीं " गोपाळरावांना बोध केला. नम्रपणानें वाग असें म्हटलें. घरीं ब्राह्मण नसला तरी तात्या बाहेर गेल्यावर हातानें स्वयंपाक करायला राजी हो–कारण मामा घरीं एकटे असतांना स्वतांच चुलीची आराधना मोठ्या हौशीनें करीत. " या अटी गोपाळरावांनीं पत्करल्या आणि गाडी लागली रुळाला. ती तीन वर्षें संथपणे चालली आणि १८७५ त गोपाळराव चांगल्या रीतीनें विश्वविद्यालयीन प्रवेशपरीक्षेंत पास झाले.

## ५ एका सदऱ्यावर

कष्टसायासांनीं जो पा केलेला आम्रवृक्ष पालवला व आगरकरांच्या आप्तेष्टांचा जीव हायसें वाटून खालीं पडला. पण खुद्द त्यांचें मन गरुडावर ताण करून पदवीधर होण्याकडे उड्या मारीत होतें. तथापि त्यांचे पाय घट्ट आवळून धरण्याची धडपड परिस्थिति करीत होती. दत्तोपंत भागवत आदल्या वर्षींच डेक्कन कॉलेजांत डेरे देऊन बसलेले; त्यांना वीसपंचवीस रुपयांची मासिक रसद तात्या भागवत पोंचवीत. अर्थातच गोपाळरावांसाठीं त्यांचा हात मोकळा होता कोठें ? कऱ्हाडला वकील असलेले थोरले मामा भाऊसाहेब भागवत; त्यांच्यावर तर मुख्य कुटुंबाचा भर. त्यांना इकडे तिकडे पाहीन म्हटलें तर फुरसतच नाहीं ! तेव्हां दिला सल्ला आप्तेष्टांनीं कीं, " गोपाळराव, कॉलेजचा नाद द्या सोडून. " सळसळती महत्त्वाकांक्षा अशानें मुरडणार ? महत्वाकांक्षेच्या कानूंत अशक्यतेला हद्दपारीची शिक्षा सांगितलेली असते. गोपाळरावांनीं ती ताबडतोब अमलांत आणली आणि खोगीर आवळलें. गोपाळरावांचा तो बेदरकार उत्साह पाहून विष्णु—मोरेश्वरादि गुरुमंडळींनीं गोपाळरावांच्या हातीं दिला लगाम, पन्नास रुपये जमवून ! त्याच्या जोरावर गोपाळरावांनीं डेक्कन कॉलेजचे



आगरकरांनीं वानराशीं झटापट
केली ती लाल चिंच



टेंभूचा आगरकरी घाट

देवळाची पिछाडी





लक्ष्मी-नारायणाचा सभामंडप



गरुडस्थ लक्ष्मी-नारायण टेंभू

मैदान तर गांठलें. पण मैदान चोंपणें किंवा करणें महाकर्म कठीण ! काटेरी लगाम झाला तरी ढिल्या हातीं अवखळ घोडा कसा आवरणार ? कॉलेजांत नांव घातल्यावर वद्यपक्षीय चंद्राची कळा गोपाळरावजींच्या पुंजीवर चढूं लागली. " प्रकाश गेला, तिमिर हारपला " अशी स्थिति मिणमिणूं लागली; इतक्यांत गोपाळरावांच्या हातांत एक जाहिरात पडली. ती पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेची होती. तिचा फायदा गोपाळरावांनीं घेतला. तयारी बेमालूम केली आणि वक्तृत्वाचा विषय असा खुलवला कीं, गोपाळरावांना पहिलें चाळीस रुपयांचें बक्षीस मिळालें. या चाळीस रुपयांच्या चकाऱ्या पकाऱ्या पाहण्याची वेळ येण्यापूर्वीच गोपाळरावांनीं आणखी एक पन्नास रुपयांचें पारितोषक मिळविलें. " एकत्र हिंदुकुटुंबापासून फायदे व तोटे " या विषयावर डेक्कन कॉलेजच्या गॅदरिंगनें निबंध मागविला होता. त्यांतही गोपाळ-रावजींचा कस शंभर नंबरी लागला आणि त्यांना वरील बक्षीस लाभलें. असल्या अवांतर प्राप्तीशिवाय थोडीशी शिष्यवृत्तिही ( ज्यूनिअर स्कॉलरशिप ) गोपाळरावांना पुढें मिळूं लागली. आणि त्यांचा लाडका दत्तूमामाही त्यांना थोडाफार हातभार लावी. पण गुलाबदाणीच्या शिंपडण्यानें स्नान कसें होणार ? हा महिना गेला, पुढच्याची काय वाट ? या टर्मची फी दिली, पुढें कशी भागवावयाची ? असली विवंचना गोपाळरावांच्या पाठची बिलकुल सुटली नाहीं. म्हणून याचना ? स्वप्नांत नाहीं ! जातिवंत पीळ तोंड वेंगाडत नसतो. अस्सल स्वाभिमान रड गात नाहीं. दुसरा सदरा करायला कूस सांपडेना. तेव्हां गोपाळरावांनीं ढकलले कित्येक दिवस एकाच सदऱ्यावर ! रात्रीच्या वेळीं गुपचूप सदरा धुवावा आणि वाळत टाकावा; सकाळीं उठलें कीं चढवावें त्याला अंगांत, असा त्यांचा क्रम असे. एकीकडे सरस्वतीची एकनिष्ठ सेवा, तर दुसरीकडून लक्ष्मीचा ' गृहप्रवेश ' असा दुरंगी सामना त्या वेळीं गोपाळरावजीस करावा लागे. एफ्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं गोपाळरावांजवळ फीपुरतेसुद्धां " राणीछाप " नव्हते. तेव्हां त्यांनीं नाटक लिहून पैसे मिळविण्याचें ठरवलें. आगरकरांचा मानस तो ! ठोकली त्यांनीं मांडी आणि मानेवर खडा ठेवल्यासारखें, ' मध्यान – दिवा ' तेवत, लागले गोपाळराव नाटक लिहायला. पण भिंती बोलल्या, नि विद्यार्थ्यांवर पोटच्या पोराप्रमाणें ममता करणाऱ्या प्रो. केरूनाना छत्र्यांच्या कानीं गोपाळरावांचें रहस्य गेलें. केरूनाना म्हणजे मूर्तिमंत परोपकार. त्यांनीं भरले स्वतांच गोपाळरावांच्या फीचे पैसे आणि घेतलें काढून आगरकरांच्या हातचें नाटक ! अशा थाटांत गोपाळरावांचा कॉलेजांतील अभ्यास झाला व ते १८७८ त बी. ए. झाले.

## ६ चतुर्भुज गोपाळराव

गोपाळराव बी. ए. झाले, आणि प्रिं. डॉ. सेल्बी यांनीं त्यांना डेक्कन कॉलेजांत एक फेलो नेमलें. "चिंताज्वर" सुटला व इतिहास आणि तत्वज्ञान घेऊन गोपाळराव एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. पण ते बी. ए. चा घाट चढत असतांच चतुर्भुज

झाले होते. सुनमुख पाहण्याची तत्कालीन मातापितरांची उत्सुक घाई लक्षांत घेतां, गोपाळरावांचा विवाह उशीराच झाला असें म्हटलें पाहिजे. अंशत: हा दारिद्र्याचा कृपाकटाक्ष खराच; पण गोपाळरावांचे वडील बंधू गोविंदराव यांच्या वृत्तीची छाया कमी जबाबदार नव्हती. मुलगा चांगला संस्कृत पढलेला आणि प्रवेशपरीक्षेपर्यंत अभ्यास केलेला. पण पुण्याच्या सोमेश्वराच्या देवळांत रामकृष्णबुवा माऱ्यांचें पुराण ऐकून "गारवड्याचें राममंदिर" गाठून बसला! त्यामुळें गोपाळरावांचें नांव काढा-वयासही कोणी मुलीचा बाप प्रथम धजला नाहीं. पण मग, स्वावलंबनानें गोपाळराव बी. ए. पर्यंत चढलेले पाहतांच हवा बदलली आणि बहुजनहितवादी मिल्लचे चहाते गोपाळराव स्वखुषीनें "संसारांत पडले."

त्याचें असें झालें कीं, गणूअप्पांचें उंब्रजास वरचेवर जाणेंयेणें असे. तेथील विनायकरावजी केळकर हे त्यांचे मामा. अर्थातच केळकरांकडे राहणाऱ्या रामभट फडक्यांचा आणि गणूअप्पांचा दाट परिचय होता. या परिचयाचा परिणाम म्हणूनच कीं काय, रामभटांचे चिरंजीव मोरभट यांनीं आपली कन्या अम्बुताई गोपाळरावजींस देऊं केली. स्वत: द्वारकेहून हात हालवीत परतलेल्या सुदामजींना पत्नीच्या हातांतील पंचारती पाहून जो विस्मय वाटला नसेल, तो विस्मय गणुअप्पांना त्या वेळीं वाटला. पण, "बाकीचा विचारच करूं नका, मुलाकडे पाहूनच मी मुलगी पदरांत घ्या म्हणतों आहे." असें मोरभटांनीं सांगतांच अप्पांना रुकार देणें भाग पडलें आणि कु. अंबुताई फडके सौ. यशोदाबाई आगरकर झाल्या.

## ७ शाळा सोडल्यावरचा उद्योग

यशोदाबाईची जोड जशी आगरकरांनीं विद्यार्थिदशेंतच मिळवली, तसाच शाळा सोडल्यावरचा उद्योग त्यांनीं शाळेंत असतांनाच ठरविला होता. डेक्कन कॉलेजांत आपल्या सहाध्यायांशीं वाटाघाट करून आपल्या परतंत्र देशाची गोपाळरावजींनीं चिकित्सा केली आणि "लोकशिक्षण" हें निदान ठरविलें. इतकेंच नव्हे तर त्या लोकशिक्षणासाठीं स्वतांस आमरण वाहून घेण्याचा संकल्प सोडला.

## ८ चालून आलेली संधि

संकल्पाप्रमाणें आगरकर आणि त्यांचे परमस्नेही बाळ गंगाधर टिळक यांनीं विद्यालयाला विद्यार्थी म्हणून शेवटचा कुर्निसात केल्यावरोबर शिक्षकाचा पेशा पत्करून नवीन विद्यालय काढण्याचें ठरलें. पतंगाचीं पंखें झाडून फुलाच्या पाकळ्या पेहरण्याचा मनसुबा ठरला. आणि इष्ट कालाच्या आगमनार्थ चातकाच्या नजरेनें खोळंबा झाला. अवस्थांतराचा हा संधिकाल रमणीय उष:काल ठरला. नेमके याच सुमारास सरकारी नौकरीच्या रुपेरी बेडीला ठोकर मारून निबंधमालाकार पुण्यास उतरले होते. मोर्चे कोणीकडे फिरवावे याचा विष्णुशास्त्री चिपळोणकर तळ काढीत होते. ही बातमी डेक्कन कॉलेजांतील नवीन विचारांच्या उत्साही तरुणांना कळतांच शास्त्रीबुवांच्या चरण-कमळाजवळ नवी शाळा काढण्याचा आपला संकल्प त्यांनीं निवेदन केला.

स्वधर्मप्रसाराच्या निमित्तानें का होईना, तत्कालीन परिस्थितींत शिक्षणप्रसाराचें काम खिस्ती मिशनरी अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक करीत होते. तें वळण डोळ्यांपुढें ठेवून अत्यंत थोड्या पगारावर शिक्षकत्वाचा कित्ता गिरवण्याचा आपला बेत टिळक-आगरकरांनीं नवयुगचैतन्यमहर्षि माधवरावजी रानडे यांस पत्रद्वारें कळवला होता आणि न्यायमूर्तींनीं दूरदर्शी सल्ला देऊन त्यांस उत्तेजनही दिलें होतें. टिळक–आगरकरांनीं हा उमदा चित्रपट शास्त्रीबुवांच्या पुढें उभा केला आणि त्याचा पक्का वेध शास्त्रीबुवांनीं घेतल्यावर १८८० च्या जानुआरींत पुण्यास " न्यू इंग्लिश स्कूल " ची प्राणप्रतिष्ठा करण्याचें नक्की झालें.

## ९ ठेंच लागली !

अशा प्रकारें लोकशिक्षणाच्या जपयज्ञाची कडेकोट तयारी गोपाळरावजींनीं केली खरी, पण परीक्षेला त्यांच्यासारखा चिकट उमेदवार हातून दवडावयाचा धीर होईना. एम्. ए. च्या परीक्षेंत त्यांना त्या सालीं पड खावी लागली. या पडीची ठेंच गोपाळरावांस इतकी झणझणली कीं, १८८० च्या जानेवारींत न्यू स्कूलच्या बळिराण्याचे वेळीं टिळक-चिपळूणकरांबरोबर त्यांना हजिरी लावतां आली नाहीं. तत्रापि बोलला बोल खिळखिळला तर ब्रीदाला बोल लागतो व तो मराठी मगदुराला खपत नाहीं. त्यामुळेंच पुढल्या वर्षीं परीक्षा पास झाल्याबरोबर गोपाळरावजी न्यू स्कूलला न्हाऊं माखूं घालावयास आले.

## १० केसरीचा संचार

गोपाळरावांनीं आतां आपल्या खाजगी चात्रिरावर उदकच सोडलें आणि त्यांनीं लोकशिक्षणाची कास धरली. त्या दृष्टीनें शिक्षकत्वाचें अंग कसदार धार देणारें असतें तरी वृत्तपत्राप्रमाणें सद्यःफलदायी नव्हे. तेव्हां शाळेला जोड म्हणून ज्ञानप्रसारार्थ एक इंग्रजी व एक मराठी अशीं दोन साप्ताहिकें काढण्याचें घाटून " मराठा केसरी " चा जन्म झाला.

निबंध लिहिण्यांत पटाईत म्हणून गाजलेल्या आगरकरांकडे केसरीचें संपादकत्व आलें. शाळेंत शिक्षकाचें काम करावें आणि घरीं आल्यावर केसरीचे रकानेच्या रकाने भरून काढावे व या दोन्ही इष्ट हेतूंच्या सिध्यर्थ अवश्य तें ग्रंथावलोकन करावें; तिसरा उद्योग म्हणून आगरकरांनीं करूं नये. या एकनिष्ठ उद्योगाचा परिणाम असा झाला कीं, गुरु म्हणून गोपाळरावांची छाप विद्यार्थ्यांवर पडूं लागली आणि केसरीची कीर्ति शुक्लपक्षीय चन्द्राप्रमाणें कलाकलांनीं वाढत चालली.

केसरी सदर्प गर्जना ठोकूं लागला. " वर्षट " सुद्धां झाला नाहीं, तोंच केसरीची नजर करवीरच्या बाजूस वळली. छत्रपति शिवाजीमहाराज यांच्यासंबंधीं करवीरचे तत्कालीन कारभारी रा. ब. माधवराव बर्वे यांच्यावर मराठा–केसरींनीं मोहरा केला. लगेच भोंवतीं सरकारी जाळें पसरण्यास दम लागला नाहीं; आणि ज्यांच्या इशारतीनें

मोहरा केला ते संस्थानी साक्षीदार आयत्या वेळीं कामास न आल्यामुळें मराठा–केसरीच्या संपादकांना म्हणजे टिळक–आगरकरांना बर्व्यांसमोर नाक घासण्याची पाळी आली. छे छे! हें प्रकरण तेवढ्यावरच भागलें नाहीं. तर टिळक–आगरकरांना डोंगरीच्या तुरुंगांत सरकारी पाहुणचारासाठीं जावें लागलें.

## ११ छिद्रेष्वनार्थाः

पण या डोंगरीच्या आपत्तीपूर्वीच न्यू स्कूलच्या तरुण चालकांवर काळानें करडी नजर केली होती. महाराष्ट्राच्या स्वाभिमानपूर्वक पुनरुद्धाराचे अग्निहोत्री विष्णुशास्त्री चिपळोणकर स्वर्गवासी झाले. " छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति " असें म्हणण्याची हताश मनावर पाळी आली. पण लोकशिक्षणाचें कंकण बांधलेले न्यू स्कूलचे स्थापक डगमगणारे नव्हते. "विघ्नैःपुनःपुनरपि प्रातिहन्यमानाः। प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति।" संस्कृतकोशकार आपटे वगैरे टिळक आगरकरांच्या सहकारी मंडळींनीं शाळेकरतां व मराठा–केसरीकरतां खस्ता खाऊन बोज जाऊं दिला नाहीं.

## १२ तुझें माझें जमेना.

डोंगरीच्या तुरुंगांत तरळाचें, रकस्याचें, लोणीकाप्या वस्तऱ्यानें सुख अनुभवीत असतां, हातीं घेतलेल्या कार्याच्या दृष्टीनें, काय काम झालें आणि काय काम व्हायला पाहिजे, याची कसून वाटावाट बाळगोपाळांनीं ( टिळक-आगरकरांनीं ) केली. एकशें-एक दिवसांच्या त्या अनध्यायांत आत्मसंशोधनाची श्रावणी करून, वाढत्या उत्साहानें पुनश्च " हरिः ॐ " म्हणण्याची तयारी या जोडीनें केली असेंही म्हटलें असतां चालेल. वैशिष्ट्येंकरून या वेळची गोपाळरावजींची कामगिरी सांगावयाची म्हणजे त्यांचें सुप्रसिद्ध ' विकारविलसित ' नाटक होय. हें शेक्स्पीअरच्या " हॅम्लेट " चें मराठींतील सरस रूपांतर होय.

डोंगरीच्या तुरुंगांतील कांहींबाही कुदळकाम करीत असतांच बाळ–गोपाळांच्या सुटकेसाठीं वर्डस्वर्थ, मंडलीकसारखे हिरे रदबदली करीत होते. पण उपड्या घड्यावरील पाण्याइतकाच त्याचा उपयोग होऊन शिक्षेचें माप पुरें भरल्यावरच टिळक–आगरकर मोकळे झाले. डोंगरीच्या तुरुंगांतून बाहेर पडल्यावर लोकांनीं त्यांची मिरवणूक काढली आणि मानमरातब केला.

जमिनीवर पडलेल्या चेंडूसारखी उसळी घेऊन १८८२ च्या उत्तरार्धापासून या तरुणांचीं कामें धडाडीनें सुरू झालीं. केसरीनें आयाळ झाडली आणि नव्या अवसानानें आरोळी ठोकली. जेथें जेथें अन्यायाचा वास येईल, तेथें तेथें केसरीनें बिनचूक झांप टाकावयाचीच. मग त्या कचाट्यांत सरकार गवसो, लोक सांपडोत, नाहींतर कधीं थोर पुरुष येवोत. आत्मप्रत्ययानें मुसमुसलेली कसरत केसरी करीत गेला, तसतसें त्याचें प्रस्थ वाढत गेलें आणि तो लोकांचा कलिजा होत चालला.

तशीच शाळेची प्रगतिही मनोरम होती. १८८३ मध्येंच तिनें बाकीच्या बहिणींस मागें सारलें. आपटे यांच्या श्रमांनीं दोनही संस्कृत शिष्यवृत्त्या शाळेस मिळाल्या.

१८८४ मध्यें फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली आणि ' डेक्कन एज्युकेशन सोसायटी ' नांवारूपास आली.

पडतील त्या खस्ता खाऊन, लागेल ती झीज सोसून, आडवें येईल तें कापून काढून आपल्या ध्येयस्वरूप ध्रुवाच्या दिशेनें हे तरुण दर्यावर्दी आपल्या कार्याची नाव नेटानें हांकत असतां त्यांना वादळानें घेरलें. देशाच्या दिवाळीची झालेली होळी टिळक–आगरकरांच्या मनाला जाळत होती. पण ही परकी सत्तेच्या पाय–चेपीनें रचली, असा कयास करून तिला कुल्पी करण्याचा चंग लोकमताच्या पाठिंब्यावर टिळकांनीं बांधला; तर उलट, दोनशें वर्षांनीं तरी दिवाळीची मजा निर्धास्त भोगतां यावी म्हणून लोकांच्या अंगीं बदलत्या काळाचें पाणी मुरलें पाहिजे, अशी मीमांसा करून, तत्प्रीत्यर्थ त्यांचा रोष झाला तरीहि अप्रिय पण पथ्यकर सल्ला बेधडक देण्या–साठीं आगरकरांनीं कंबर कसली. लोकशिक्षणाच्या गौरीशंकरावर एकत्र झालेलीं हीं महान् तीर्थें कांहीं काळ एकाच दिशेनें व एकरूप वाहिलीं, पण आतां त्यांना फाटे फुटून एकाला राजकीय तर दुसऱ्याला सामाजिक वळण लागलें. हळूहळू हीं वळणें इतकीं अंगवळणीं पडत चाललीं कीं, निर्लेप अशा शाळेसारख्या समान भूमिकेवर देखील दिलसाफ एकोपा व्हावयाचा एकीकडेस राहून तेथेंही खळबळाटाला सुरवात झाली. परिणामीं टिळक-आगरकर पांगले. दरेकाचा सवता सुभा सुरू झाला. डे. ए. सोसायटीचा निरोप टिळकांना घ्यावा लागला व आगरकरांनीं केसरी हातावेगळा केला.

## १३ नवी विटी नवें राज्य

लोकशिक्षणाच्या वर्तमानपत्रीं पटांगणावर पुन्हा " नवी विटी नवें राज्य " आगरकरांनीं सुरू केलें. रा. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जोडीनें आगरकरांनीं " सुधारक " वर्तमानपत्र काढलें. अन्याय, अनीति, जुलूम म्हणून जेथें जेथें दिसेल अगर डोकावील तेथें तेथें बिनादिक्कत तुटून पडण्याचा सपाटा आगरकरांनीं चालवला. पण मुळांत " सुधारक " या शब्दाचीच त्या वेळीं समाजांत चीड असल्याकारणानें आगरकरांच्या सुधारकी हल्ल्याफेरहल्ल्याचा मारा इतक्या थराला गेला कीं, एका शिमग्यांत जिवंतपणींच आगरकरांची प्रेतयात्रा निघाली व " तुमचा खून करूं " म्हणून धमक्याही मिळाल्या. पण असल्या गोष्टींना भीक कोण घालणार ? आगरकर ? सदसद्विवेकाच्या मिठाला जागून तहहयात त्यांनीं आपली लेखणी मराठी मर्दाप्रमाणें चालविली आणि " सर्वतोमुखीं निंदा होत असलेल्या सुधारणेचा व सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असलेल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच सर्वत्र साम्राज्य होणार असें युक्तिवादानें सिद्ध करून " दिलें.

शाळेंतही आगरकरांचा हाच क्रम. पुस्तकी ज्ञानाच्या ठराविक रिंगणांत विद्या-र्थ्यांनीं घिरट्या घालाव्या ही वृत्ति आगरकरांस खपलीच नाहीं. म्हणून स्वतंत्र विचा-राचा युक्तिवाद ते आपल्या विषयानुषंगानें विद्यार्थ्यांस पढवीत. आगरकरांच्या या शाळेनें डे. ए. सोसायटीच्या वाढत्या भरभराटीस स्वप्नस्वप्नांतरींसुद्धां कलती कळा

लागली नाहीं. फार काय, खुद्द आगरकर आपल्या कर्तबगारीनें सोसायटीबरोबर चढत्या-वाढत्या पदवीला चढले. न्यू स्कूलमध्यें ते शिक्षक होते, ते त्याचे सुपरिंटेंडेंट झाले; आणि फर्ग्यूसनमध्यें पंडित होते ते वामनरावजी आपट्यांचे मागें त्या कॉलेजचे प्रमुख बनले.

वामनराव आपट्यांचे मागें फार दिवस तग धरूं अशी खात्री नसतांही आगर-करांनीं फर्ग्युसन्चें प्रमुखत्व पत्करलें व वाढत्या व्यापाच्या आपल्या कार्याचें कंकण ढिलें पडूं दिलें नाहीं. परंतु १८९५ च्या उन्हाळ्यांत आगरकरांची प्रकृति अतिशय बिघडली.

## १४ अखेर

आगरकर बी. ए. च्या वर्गांत असतानांच आनुवंशिक दम्यानें त्यांना दृढालिंगन दिलें होतें. प्रतिकाराचे अनेक उपाय योजून देखील आगरकरांचा दम त्या दम्यापुढें छाटला होता. त्यांत १८९५ मध्यें त्यांचे सहकारी त्राटिका नाटकाचे कर्ते वासुदेवराव केळकर वारल्याची दुर्वार्ता ऐकल्यावर उन्हाळ्यांत बिघडलेली तब्येत अगदींच खचली. काळजापर्यंत भिडलेल्या रोगापुढें त्यांचा उपाय चालेना आणि म्हणून सोमवार ता. १७ जून १८९५ रोजीं उजाडतां उजाडतां ते कालवश झाले. त्या वेळीं महाराष्ट्र हळहळला, आगरकरांचा अनुयायी व आप्तेष्टवर्ग कळवळला, आगरकरांच्या वत्सल-लतेनें त्यांच्यावर भुंग्यासमान फिदा असलेला शिष्यजनसमूह तळमळला. ह. भ. प. पांगारकरांसारखे भिन्नसांप्रदायी शिष्य रडले व बाळगंगाधर टिळकासारखे प्रसंगवशात् सामान्यासामन्याला उभे राहिलेले धैर्याचे हिमालय दुःखावेगानें गंगायमुना ढाळूं लागले.

महाराष्ट्रीय अंतःकरणांना असे कढ येणें साहजिक होते. मांडी मोडतां येत होती तोपर्यंत विद्यार्थी पढविण्याचें व "टाकांतून अर्थबोधक अक्षरें निघत होतीं तोंपर्यंत" लेख लिहिण्याचें, "लोकशिक्षणाचें" व्रत आगरकरांनीं निष्ठेनें आचरिलें होतें. मत-भिन्नता सोडून द्या, पण आगरकर म्हणजे "स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः" आहे, अशी महाराष्ट्राची खात्री होती.

## प्रकरण ४ थें

# आपल्याच शब्दांत आगरकर

### १ सार्वजनिक शिक्षणाचें प्रयोजन

" कुटुंब सुखी राहाण्यास त्यांतील सर्व माणसास चांगलें शिक्षण मिळालें पाहिजे व त्यास योग्य स्वतंत्रताहि असली पाहिजे व या दोघांचा अभाव हेच आमच्या प्रस्तुतच्या दोषांचें मूळ बीज होय. " आणि म्हणून

" अवनत राष्ट्रांचे भौतिक, नैतिक आणि धार्मिक पुनरुज्जीवन करून, धिम्मेपणानें आणि शांततायुक्त क्रांतीच्या मार्गानें त्यांना बहुतेक पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला आणून बसविणें हें कार्य मानवजातीय संस्कृतीच्या अखिल साधनांपैकीं केवळ शिक्षणानेंच घडून येतें असें आम्हांस पूर्ण पटलें आहे आणि म्हणूनच सार्वजनिक शिक्षणाचें हें कार्य आम्ही अंगावर घेतलें आहे.

### २ महाबळेश्वरीं समुद्रदर्शन

आकाश निरभ्र असल्यास मौंट वाल्कम येथील बंगल्याच्या गच्चीवरून सूर्यास्ताच्या सुमारास पश्चिम समुद्राचा किनारा आणि बदकाप्रमाणें त्याच्या पृष्ठभागावर क्रीडा करणारीं जहाजें स्वच्छ दिसतात, असें येथें नेहमीं राहणारे लोक सांगतात. धुकें नसल्यास मोठ्या दुर्बिणींतून सुमारें पन्नास मैल लांबीची अर्धचंद्राकृति समुद्ररेषा स्पष्ट दिसते, असें कित्येक आंग्ल प्रेक्षकांचें म्हणणें आहे, तेव्हां तें खरें मानल्याखेरीज गत्यंतरच नाहीं! आमच्या दुर्दैवामुळें आम्ही मात्र जेव्हां जेव्हां हें समुद्रदर्शन घेण्याचा प्रयत्न केला तेव्हां तेव्हां क्षितिजाच्या जवळच्या वातावरणांत कांहींतरी विघ्न उत्पन्न होऊन तो काळ निष्फळ झाला, आणि त्यामुळें आम्ही निराश झालों, हें सांगण्यास आम्हांस फार वाईट वाटतें! तथापि पुन्हां एकादे प्रसंगीं एकाद्या उंच पॉइंटावर उभे राहून आरबी समुद्रांतील क्षारोदकाचा भव्य विस्तार आम्ही पाहूं शकूं अशी आशा धरून आम्ही आपलें दिवस कंठीत आहों!

—महाबळेश्वरवर्णन.

### ३ भ्रम दूर झाला

जांभळीसारखेंच " पिसा " या नांवाचें दुसरें एक झाड आहे. पुष्कळ दिवस याचा जळणाशिवाय दुसरा कांहीं उपयोग होत असेल, असें आम्हांस वाटलें नाहीं. केव्हां केव्हां असा तर्क मात्र करावासा वाटे कीं, याच्या स्पर्शानें किंवा रससेवनानें वेडेपण येत असेल. म्हणूनच यास " पिसा " हें नांव देण्यांत आलें असेल! पण नुकताच आमचा हा भ्रम दूर झाला. मुंबईचे एक प्रसिद्ध डॉक्टर प्रकृतीच्या आरामासाठीं गेल्या मे महिन्यांत येथें आले होते. त्यांचें घरीं या झाडाच्या पानांच्या

बंग्या करून मुंबईस रवाना करण्याची धूम तारांबळ जेव्हां आम्हीं पाहिली, व रा. ब. महादेव वासुदेव बर्वे यांसारख्यांसही या पानांच्या बंग्या करून बाहेर पाठवाव्या लागतात, असें आमच्या नजरेस आलें, तेव्हां मात्र या टाकाऊ दिसणाऱ्या 'भिकार' झाडांत कांहीं औषधिगुण असावा असें आम्हांला वाटलें; आणि सृष्टींतील कोणतीही वस्तु निरुपयोगी असण्याचा संभव नाहीं, ती निरुपयोगी समजणें आपलेंच अज्ञान होय, हा तत्त्वविचार मग आम्हांस सुचला! चौकशीअंतीं असें समजून आलें कीं, पिशाचीं पानें वाळवून त्याचें चूर्ण करून ठेवलें, आणि त्याची थोडीथोडी नित्य लापशी करून घेतली, तर शक्ति वाढविण्याचें कामीं तिची बरीच मदत होते. पिशाच्या ओल्या पानांच्या रसाची भेंडीच्या रसासारखी तार निघते, हाताला तो चिकट लागतो, आणि चवीलाही भेंडीच्या रसासारखाच तो गिळगिळीत व बेचव आहे!

—महाबळेश्वरवर्णन.

## ४ महाबळेश्वरीं टिळक–आगरकर

आणखी दोघा गृहस्थांवर एके दिवशीं असाच प्रसंग गुदरला होता. ते दोघे दीक्षितांचे घरीं उतरले होते. रात्रीचे आठ वाजून गेले तरी परत येत नाहींत, असें पाहून दीक्षितांच्या अनुभवशीर वृद्ध मातुश्रीस चैन पडेनासें झालें, आणि तिनें आपल्या दोनही मुलांस व घरच्या गड्यास या भटकणाऱ्या पुणेकर पाहुण्यांच्या शोधाकरतां कंदील घेऊन बाहेर पाठविलें. पण त्यांचा कोठेंही पत्ता लागेना. आगरकर आणि टिळक रा. ब. महादेव वासुदेव बर्वे यांच्या बंगल्यावर सांपडण्याचा कांहीं तरी संभव? पण वेडावलेल्या दत्तोपंतानें ( दीक्षित ) त्यांचा तेथें जाऊनसुद्धां तपास केला! अखेरीस निराश होऊन ही शोधक मंडळी घरीं परत आली! इकडे आमचे भटकणारे दोघे प्रोफेसोरिअल एडिटर्स किंवा एडिटोरिअल प्रोफेसर्स वादाच्या भरांत वाघाच्या घळींत जाऊन पडण्यापूर्वी किंवा एकाद्या कड्यावरून घसरण्यापूर्वी शुद्धीवर आले आणि मोठ्या प्रयासानें नऊ वाजण्याच्या सुमारास दीक्षितांच्या ओटीवर येऊन दाखल झाले.

—महाबळेश्वरवर्णन.

## ५ रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे

कैलासवासी झाले ही दुःखद वार्ता लोकांत प्रथम प्रसिद्ध करण्याचें दुर्घट काम आम्हांवर येऊन पडलें नाहीं हें कांहीं अंशीं आमचें भाग्य होय असें आम्ही समजतों. कारण ज्या आमचा या महात्म्याशीं शिष्यत्वाचा अनेक वर्षांचा निकट संबंध होता व त्यामुळें ज्या आम्हांस या अलौकिक पुरुषाची खरी योग्यता ठाऊक झाली होती, त्या आम्हांस दुःखभरांत आमच्या अत्यंत पूज्य व प्रिय गुरुविषयीं मृत्युलेख लिहवताना. केरोपंतांनीं देह टाकल्यास आज सात दिवस झाले तरी त्यांच्यासंबंधानें आम्हांस पहिल्या दिवसाप्रमाणें वाईट वाटत आहे, व त्यामुळें या थोर पुरुषाविषयीं आमच्या मनांत

जें लिहावयाचें आहे, किंवा जें लिहावयाला पाहिजे आहे तें कागदावर नीटनेटकें पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि पत्रकर्त्याच्या नात्यानें सर्व दुःख क्षणभर गिळून टाकून या प्रसंगीं दोन शब्द लिहिणें हें कर्तव्यकर्म होय, असें समजून या आमच्या परलोकवासी प्रिय गुरुविषयीं चार ओळी लिहितों.

—कै. कैरो लक्ष्मण छत्रे.

## ६ नानांचा आनंद

प्लेटो, अरिस्टाटल्, आरकीमेडिस, केप्लर, गॅलिलिओ, कोपरनिकस, न्यूटन, टिंडाल, जूल, पाणिनी, कणाद, भास्कराचार्य यांसारख्या जगद्धितकर्त्या विद्याव्यसनी पुरुषांस आपआपल्या विषयांत गर्क होऊन राहणें व शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुख–वृद्धीचा अभिलाष धरणें याहून कांहींही इष्ट नसतें. असे पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात, त्यांत गुंग होऊन गेले म्हणजे त्यांस कशाचेंही भान रहात नाहीं. या गोष्टीची प्रतीति केरोपंतांच्या आचरणांत आम्हांस अनेक वेळां आली होती. एकदां एक कठीण उदाहरण त्यांच्या मनांत पांच दिवस घोळत होतें. त्या पांच दिवसांत त्यांना अन्नाची चव समजली नाहीं किंवा स्वस्थपणें त्यांचा डोळा लागला नाहीं. रात्रंदिवस डोळ्यापुढें ब्राकेट्स ! सहावें दिवशीं सकाळीं एकाएकीं उदाहरण सुटल्या-बरोबर त्यांना जो अवर्णनीय आनंद झाला त्याची हकिकत सांगतांनासुद्धां त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येत व त्यांचा कंठ गहिंवरानें दाटून जाई. सूर्यावरील ठिपके आणि पाऊस यांच्यांत कांहीं कार्यकारणाचा संबंध असेल असें वाटल्यावरून तो सिद्ध करण्यासाठीं मी तीन चार वर्षें एकसारखी खटपट करीत होतों व तींत जरी मला यश आलें नाहीं, तरी ती चालली असतां मला जें गणित करावें लागलें तें दुसऱ्या विषयाच्यासंबंधानें उपयोगी पडलें, असें तें आम्हांस वारंवार सांगत.

—कै. केरो लक्ष्मण छत्रे.

## ७ नानांचा निरोप

नाना पेन्शन घेऊन ( डेक्कन ) कॉलेजांतून बाहेर पडले, त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहिंवर न सांवरल्यामुळें, ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें, त्या आम्हांस व त्या दिवशीं कॉलेजांत येण्यास घर सोडल्या-पासून रडून रडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा अनुभव आला. भांडारकर, आक्सनाम, चाटफील्ड, पील वगैरे प्रेक्षक प्रोफे-सर मंडळीस त्याचें स्पष्ट स्वरूप दिसून आलें.

—कै. केरो लक्ष्मण छत्रे.

## ८ गरिबास मदत

गरिबगुरिबांस मदत करण्याविषयीं त्यां–( केरूनाना ) ना मागें सारणारा अली-कडील विद्वानांत तर आम्हांस कोणी दिसत नाहीं.

—कै. केरो लक्ष्मण छत्रे.

## ९ आमचीं लग्नें

आम्हांपैकीं बहुतेकांचीं लग्नें अकराच्या आंतील वयाच्या मुलींशीं झालीं.

## १० आम्हांस विशेष माहिती नाहीं

ज्या धर्मपुस्तकांस तुम्ही प्रमाण मानतां, तीं पुस्तकें तरी डोळे उघडून पहा, आणि त्यांत सांगितलें असेल त्याप्रमाणें आचरण करा. आम्हांस त्या ग्रंथांची विशेष माहिती नाहीं हें आम्ही कबूल करतों; पण त्यासंबंधानें कित्येक शास्त्र्यांशीं आमचें जें बोलणें झालें आहे व विशेषतः रा. वामनशास्त्री मराठे यांनीं आम्हांस जी माहिती दिली आहे, तीवरून सध्यां चालू असलेला ( पंचहौद प्रकरणीं ) बहिष्कार फारच अप्रयोजकपणाचा आहे असें आम्हांस वाटतें.

—आपल्या हातानें आपल्या पायांवर दगड.

## ११ बोलते सुधारक

खुद्द आम्हांस पागोटेंच नापसंत आहे, तेव्हां त्याची गचाळ प्रतिमा जी पगडी ती मुळींच पसंत असण्याचा संभव नाहीं, हें सांगावयास नकोच. यावर कोणी असा प्रश्न करतील कीं, तुमचें असें मत असेल तर त्या तुम्ही वापरतां कशासाठीं? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, आम्हांस नापसंत किंवा अमान्य अशी हीचशी काय, पण आणखी शेंकडो गोष्टी आम्ही करतों! आम्ही बोलके सुधारक आहों, कर्ते सुधारक नाहीं!!......विचारांतीं अमुक गोष्ट बरी दिसते व अमुक वाईट दिसते, एवढेंच सांगण्याचा पतकर आम्हीं घेतला आहे.

—पुरुषांचा पेहराव

## १२ हंगामांतील प्रेतसंस्कार

शात्यांनीं मूढांच्या तब्यतीप्रमाणें वागणें आणि त्यांना ग्रासून टाकणाऱ्या शारीरिक व मानसिक रोगांचा आपल्या शक्तीप्रमाणें परिहार करण्याचा निर्भीडपणें प्रयत्न न करणे हें अधिकच अश्लाघ्य आहे, असें आम्हांस वाटतें; आणि म्हणूनच सध्यां 'पांचजन्याचा हंगाम' चालू आहे हे ठाऊक असतां व गतवर्षी याच हंगामांत पुण्यांतील सुबंधूंनीं आपला प्रेतसंस्कार केला हें ध्यानांत असतां, ( आमचे प्रेतसंस्कार ) या अप्रिय विषयाची चर्चा करण्याचें धैर्य आम्ही करीत आहों.

—शहाण्यांचा मूर्खपणा.

## १३ शास्त्रीबुवांचा मृत्यु

आतां आतां ( १८८२ ) कोठें शास्त्रीबोवांच्या परिपक्व बुद्धिमत्तेचीं फळें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं, तों त्यांस करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग!! गेल्या वर्षीच आम्ही एकत्र होऊन एकदिलानें उद्योग

आरंभिला, तेव्हांची वीरश्री कोणीकडे, आणि केसरी-राजाच्या नैसर्गिक उद्धत वृत्तीला अननुरुप अशी सांप्रतची खिन्नावस्था कोणीकडे? असो...... गतवर्षी बाबाजी बापूजी साने व चिंतामण सखाराम चिटणीस यांची मृत्युवार्ता कळविण्याचें दुःखाचें काम केलें; आज आम्हांपैकींच एकाच्या संबंधानें मृत्युलेख लिहिण्याचें आमच्या कपाळीं आलें आहे......

१८७९ च्या एप्रिलांत विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेतानें आपलें चंबूगबाळें आटोपून पुण्यास आले. चार-पांच महिने काय करावें, कोणता धंदा काढावा अशा विचारांत गेले. या सुमारास डेक्कन कॉलेजांतील दोनतीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करतां स्वतंत्रपणें लोकोपयोगी एकादें काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गांवांत शास्त्रीबोवा येऊन बसले आहेत असें कळल्याबरोबर सदरहू मंडळी त्यांस जाऊन भेटली, व उभयतांचे विचारें एक शाळा काढण्याचा विचार झाला; त्याप्रमाणें १८८० च्या जानेवारी महिन्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' या नांवानें मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यांत शाळा घातली;...... शाळेस पुरें वर्ष झालें न झालें तोंच तिला आणखी एक दोन गृहस्थ येऊन मिळाले. पांचसहा मंडळी एका विचारानें व एका मतानें वागत असल्यामुळें शाळेचें काम आटोपून आणखीही कांहीं करतां येईल असें वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठी अशीं दोन वर्तमानपत्रें काढण्याचा विचार झाला, व त्याप्रमाणें ८१ च्या जानेवारींत मराठा व केसरी बाहेर आले......

...कोणी हितचिंतक मित्र विनोदानें आमच्या गट्टीस ग्राज्वेट पंचायतन, ग्राज्वेट पांडव असें म्हणत ...प्रथम लोकांना आम्हांविषयीं अशी भीति होती कीं, द्रव्यसंबंधानें आमच्या आपआपसांत कलागती लागून आमची जूट फुटेल. पुढें बरें प्रकरण येऊन धडकलें तेव्हां तर कित्येकांना असें वाटलें कीं, या ग्राजुएटांची फटफजिती होते! आणि आतां तर आम्हांपैकीं एकानें परलोकास प्रयाण केलें; तेव्हां आम्हांविषयीं लोकांच्या मनांत नाना तऱ्हेचे तरंग येऊं लागले आहेत यांत नवल नाहीं. पण सर्वांनीं एक गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं, आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रडतरावाची मनोवृत्ति धारण करून आरंभला नाहीं......शास्त्रीबोवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर राहिला, तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेले उद्योग अविछिन्नपणें चालविण्यास होईल तितकी खटपट करील.

कै. विष्णु कृष्ण चिपळोणकर.

## १४ तुरुंग

कोल्हापूर प्रकरणाच्यासंबंधानें लोकांना वाटत होतें कीं, पत्रकर्ते निदान दंडावर तरी सुटतील! पत्रकर्त्यांना मात्र अशा प्रकारची भुरळ पडली नव्हती; कोल्हापूरास काढलेल्या कमिशनाचें 'ऑफस' होऊन टाळ्या वाजवीत मंडळी परत आली त्याच वेळीं आपल्या खटल्याचा काय निकाल होणार हें पत्रकर्त्यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें.

कैद्यांना 'द्वेषाच्या' चाजांतून मुक्त करून अविचारानें लेख लिहिल्याबद्दल शिक्षेची सुनावणी केल्यानंतर हायकोर्ट उठलें. नंतर आम्हांला माडीवरून खालीं आणून तळमजल्याच्या एका कोठडींत ठेवलें. सहा वाजण्याच्या सुमारास घोड्याच्या दोन गाड्या आणवून त्यांत आम्हांला व्यवस्थेनें बसवलें; व आमच्या बंदोबस्ताकरतां बरोबर शिपाई लोकांचा पहारा देऊन बिनभाड्याच्या घराकडे आमची रवानगी केली.

माझी प्रकृति जात्या शैत्यखोर असल्यामुळें मला वारंवार पडसें येई; तेव्हां जमादाराच्या परवानगीनें शिंप्यापासून नाक पुसण्यासाठीं मी एक वीत दीडवीत फडकें मिळविलें, तें माझ्यापाशीं आम्ही सुटेतोंपर्यंत होतें.

पहिल्या दिवशीं अन्न पुढें आल्याबरोबर त्याचा अमंगळ दर्प आम्हांस दुःसह वाटला व तोंडांत दोनतीन शितें जाण्याबरोबर ओकारी आली...पहिले पंचवीस दिवस आम्हांस पराकाष्ठेचे जड गेले...कांदा, लसूण खाणेची ज्यांना संवय नाहीं, त्यांची तुरुंगांत फार उपासमार होते व त्याचमुळें १०१ दिवसांत टिळकांचें २४ पौण्ड आणि माझें १६ पौण्ड मांस नाहींसें झालें!...पहिले कांहीं दिवस संध्याकाळीं कांद्याबटाट्याची पातळ भाजी मिळे; पण पुढें एकदां जो मुळ्यांचा पाला लागला, त्यानें आमची बाहेर पडेपर्यंत पाठ पुरविली. ही भाजी इतकी खराब असते कीं, ती आम्ही कधींच तोंडांत घातली नाहीं. सकाळच्या डाळीपैकीं कांहीं डाळ एका मडक्यांत राखून ठेवून त्याबरोबर संध्याकाळच्या भाकऱ्या किंवा रोट्या खात असूं. तुरुंगांत गेल्याबद्दल आम्हांस कधींच वाईट वाटलें नाहीं. पण तेथलें अन्न पुढें आलें म्हणजे मात्र वाईट वाटे. आम्हांपैकीं प्रत्येकास हगवणीची पाळी द्यावी लागली...पहिल्या पंचवीस दिवसांत टकोरें घासण्याशिवाय दुसरा कांहीं व्यवसाय नव्हता. पांचसात दिवस लोटल्यावर एकसारखी मांडी ठोकून बसण्याचा इतका कंटाळा आला कीं, आम्हांस सक्तमजुरीची शिक्षा होती तरी आनंदानें दिवस गेला असता, असें वाटूं लागलें!...मग एके दिवशीं आम्हीं फारच विनवणी केली, तेव्हां सुपरिंटेंडंटनें आमच्याकडून एक लेखी अर्ज घेऊन आपल्या वरिष्ठांकडे पाठविला. जनरल सुपरिंटेंडंट ऑफ जेल्स, डॉक्टर क्रुकशांक यांनीं सदय होऊन आम्हांस पुस्तकें वाचण्याची, व कागद, शाई वगैरे घेऊन भाषांतरें करण्याची परवानगी दिली. त्यामुळें कारागृहवास म्हणून जो म्हणतात तो आम्हांला पहिल्या पंचवीस दिवसानंतर फारसा भोंवला नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाचण्यांत किंवा लिहिण्यांत वेळ जाई व दिवसा मानसिक श्रम झाल्यामुळें रात्रीं चारपांच तास तरी चांगली झोंप लागे. पण पुढें पुढें जसजशी मेंदूची व शरीराची शक्ति क्षीण होत चालली, तसतसें वाचण्यावर देखील मन लागेनासें झालें व शेवटल्या आठ दिवसांत हवीं तितकीं पुस्तकें व हवे तितके कागद जवळ असतांही मी एक ओळदेखील वाचली नाहीं किंवा एक टांकदेखील ओढिला नाहीं.

टिळकांचा व माझा नानातऱ्हेच्या विषयांवर वाद करण्यांत पुष्कळ वेळ जाई. कित्येकदां तर आम्ही रात्रीच्या रात्री बोलत घालविल्याचें मला आठवतें. मी 'एम. ए.' करतां व टिळक 'एलएल. बी.' करतां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों

असतां सरकारी नौकरी न पत्करतां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्ही जें जें बोललों चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला कँपमध्यें भेटायला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसे येऊन ठेपलों; शाळेच्यासंबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गावांत गेलों असतां कॉलेजला परत येतांना थंडीनें किती तरी कुलकुडलों; वचन दिलें असतां शाळा व छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें, असल्या फंदांत न पडणारे कोण कोण मनुष्य घेरतां आले; आपले मूळचे हेतु कोणते व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबोवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगास केवढा धक्का बसला; आम्हीं आरंभलेलीं कामें आमच्या हयातींत व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिती काय होईल; नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी; शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावें; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती, आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस कोणकोण मित्र उपयोगी पडले; व पुढें कोणाकोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहतां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी ठेवली पाहिजे; फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या; वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ जोरानें वाद चाले...व बोलतां बोलतां रात्र निघून जाई.

पाठीमागें कामाचा त्रास नसल्यामुळें आम्हांला पाहिजे तर बाहेरच्याप्रमाणें आठव्या दिवशीं आरास करून घेतां येती; पण तेथला तो चतुर कैदी कारागीर, तें थंड खारें पाणी, ते दिव्य लोणकापी कंट्री वस्तरे वगैरे थाट पाहून श्मश्रु वाढूं देणेंच आम्हांस बरें वाटे; शिवाय अंगांतील रक्त एकदां नाहींसें झाल्यावर त्या बिचारीची वाढच खुंटली !...चांगल्या स्थितीच्या लोकांना तुरुंगांतील इस्पितळ म्हणजे या पृथ्वीवर अवतरलेल्या यमसदनाप्रमाणें वाटतें. आमच्यापैकीं वामनराव रानड्यांस एकदां आवेचा फार उपद्रव झाला होता म्हणून ते तिकडे गेले होते, पण चवथ्या पांचव्या दिवशींच मोठ्या संतोषानें आमच्यांत पुनः येऊन पडले !

एके दिवशीं आम्ही जेवावयास बसलों असतां सुपरिंटेंडेंटसाहेबांची स्वारी आली, त्यासरशीं टकोरें एकीकडे सारून आम्ही उभे राहिलों नाहीं म्हणून साहेब मजकूर फारच खप्पा झाले व त्यांनीं आम्हांस ऑफिसांत नेऊन मी यंव करीन त्यंव करीन अशी बरीच ताकीद दिली, व दुसरे दिवशीं हाटलीवर घातलें ! तेथें आम्ही सुटेतोंपर्यंत

होतों. आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत डॉक्टर क्रुकशांक हे तुरुंगाची पहाणी करण्यास आले होते, त्या वेळेस त्यांनीं आमच्या संबंधानें बरीच चौकशी केली, आमच्याशीं दोन गोड शब्द बोलले, व आम्हांला सगळ्या दिवसभर बराकींत कोंडून न घालतां कांहीं वेळ मोकळेपणीं इकडे-तिकडे फिरूं द्यावें असें सुपरिंटेंडेंटसाहेबांस सांगितलें; तेव्हांपासून सव्विसाव्या आक्टोबरपर्यंत सुपरिंटेंडेंटसाहेबांनीं आम्हांला फारच ममतेनें वागविलें. आम्ही तुरुंगांत गेल्यासून सुटेपर्यंत कोणीही मित्र महत्त्वाच्या कामासाठीं भेटावयास कितीकदां जरी आले तरी त्यांनीं आम्हांस भेटूं दिलें, व त्यांच्याशीं स्वस्थपणें बोलूं दिलें. तसेंच कामकाजाच्या संबंधानें जरूर पडे तेव्हां कोणत्याही प्रकारची घिसघिस किंवा जिकीर न करतां पत्रें लिहूं दिली, हव्या त्या वेळीं पाहिजे तीं पुस्तकें आंत आणूं दिलीं......

— डोंगरींतील आमचे १०१ दिवस.

## १५ प्रस्तुतची स्थिति

जिकडे पहावें तिकडे पोकळ विद्येला, मिथ्या देशाभिमानाला व लज्जास्पद अधिकारवर्गाला पूर आल्यासारखा दिसतो. अधिकारमदानें बेफाम होऊन नानाप्रकारें लोकांस पीडा देणारे, किंवा स्वोन्नतीसाठीं श्वानाप्रमाणें श्रेष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचे हातपाय चाटणारे आमच्यांतील मोठमोठ्या हुद्यांवरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हपापलेले विद्वान, पोटाला मिळवण्यांत व दोन पैसे मिळाल्यास कॉलेजचें विद्येसाठीं केलेलें कर्जपाणी फेडून बाकीची माया बँकेत टाकण्यांत, किंवा बायको बाहेर पडली म्हणजे ती अकडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग! राहतां राहिलीं कांहीं म्हातारीं खोडें! त्यांना तुमच्या विद्यावृद्धीची व देशोन्नतीची कल्पनासुद्धां नाहीं!

पूर्वीं जेथें लोकांस अन्नवस्त्राची कधींच ददात नसल्यानें त्यामध्यें निरंतर संतोष व समाधानवृत्ति वास करीत असे, तेथें आतां त्याच अन्नवस्त्राची दुर्मिळता होऊन, लोक अगदीं कंगाल स्थितीस येऊन पोचले आहेत. पूर्वीं जेथें स्वराज्य असल्यानें देशाची समृद्धि देशांतच खेळत असे, तेथें आतां परराष्ट्रीयांचा अंमल झाल्यानें अनेक परदेशीय लोकांस उत्तम प्रकारें पोसण्याची जबाबदारी या देशावर पडून, एतद्देशीयांचें त्यायोगें नाना प्रकारचें नुकसान होत आहे. जेथें पूर्वीं लक्षावधि लोक हस्तकौशल्यानें आपला निर्वाह करीत असत, तेथें आतां दहापांच कारागिरांचाही केवळ हस्तकौशल्यानें चरितार्थ चालविण्याचें कठीण झालें आहे; आणि याप्रमाणें पूर्ण दरिद्रावस्थेचीं जितकीं चिन्हें आहेत, तितकीं सांप्रत या देशांत आविर्भूत झालीं आहेत.

## १६ स्थूल औपपत्तिक सिद्धांत

मनुष्याच्या बुद्धिमत्तेचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीनें ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्त्व

मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; नीतिप्रसार, संपत्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालवलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे; स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यांत जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे.

## १७ केसरींतील न्हाणवली

जेव्हां देशसुधारक कोणत्याही रूढीस दोष देतात, त्यावेळीं लोक त्यांस भ्रमिष्ट ठरवतात; व त्यांनीं धर्माधार काढल्यास 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं' इत्यादि वाक्यांनीं त्यास आडवितात; व देशसुधारणेच्या कामीं वरच्यापैकीं कोणताही मार्ग अंगिकारल्यास सुधारकास सारखीच अडचण पडते...... 'न्हाणवली'च्या लेखानें आमच्या कांहीं वाचकांचा जो केसरीवर अकारण क्षोभ झाला, तो ज्यांच्या ध्यानांत असेल, त्यांस वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ अधिक उदाहरणें देण्याचें कारण नाहीं.

—स्वदेशाभिमान.

## १८ ( हॅम्लेट ) विकारविलसिताचा जन्म

कोल्हापूर प्रकरणास सुरवात होऊन पैशाची चणचण झाली, त्या वेळेस आपलें आपल्यास कांहीं साहाय्य करतां आलें तर पहावें व तें करण्यास एखादें नाटक लिहिण्याशिवाय उपाय दिसेना, म्हणून १८८२ च्या एप्रिल महिन्यांत प्रस्तुत ( विकार-विलसित ) पुस्तकास मीं प्रारंभ केला, व आगष्ट महिन्यांत डोंगरीवर असतां तें तडीस नेलें. पुस्तककर्त्याच्या मनाला जी शांतता असावी ती गेल्या वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत आमच्या मनाला न मिळाल्यामुळें हें पुस्तक माझ्या हातून जितकें वठेल असें मला वाटलें होतें तितकें वठलें नाहीं, हें माझें मीच क़बूल करतों. शिवाय, हें भाषांतर अशा अडचणींत करण्यांत असा हेतु नव्हता कीं तावडतोब छापून त्यापासून पैसा उत्पन्न करावा; तर आर्योद्धारक मंडळीकडून त्याचे चारदोन प्रयोग करवून त्याचें जें उत्पन्न होईल तें केसरी फंडाकडे लावावें असा होता. यामुळें भाषांतर करण्यास हवा तितका वेळ मिळाला नाहीं, इतकेंच नाहीं, तर परक्या भाषेंतील नाटकांचीं भाषांतरें कोणत्या रीतीनें करावीं याविषयीं माझीं जीं मतें आहेत, तीं माझीं मला हवीं तशीं अमलांत आणतां आलीं नाहींत. या कारणानें व भाषांतर करीत असतां ज्या पुस्तकांची मदत पाहिजे होती ती न मिळाल्यानें फार त्रास पडला. तथापि तें छापूं लागण्यापूर्वी माझ्यानें जितकें दुरुस्त करवलें तितकें मीं केलें आहे. या कामांत आमचे मित्र रा. रा. नारायण गोपाळ फाटक, बी. ए. एल्एल्. बी. यांनीं मला

अंतःकरणपूर्वक पुष्कळ साहाय्य दिलें, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. तसेंच रा. म. शि. गोळे, बी. ए.. व रा. बा. गं. टिळक, बी. ए. एल्एल्. बी. यांनीं वेळोवेळीं ज्या सूचना केल्या त्यांबद्दल मी त्यांचाही आभारी आहें.

हें पुस्तक करण्याचा मुख्य हेतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्याचा प्रयोग करण्याचा असल्यामुळें नांवें फिरवूनच भाषांतर करण्यांस आरंभ केला. पुढें मी प्रथम दिलेलीं नांवें कित्येक मित्रांस बरीं न वाटल्यामुळें त्यांनीं दुसरीं सुचविलीं, व ती घालतांना मोठी खबरदारी ठेवली होती तरी एक दोन ठिकाणीं पहिलींच राहिलीं आहेत. कित्येकांचें असें म्हणणें पडलें कीं, ज्या ठिकाणीं मूळांत गाण्याजोगीं पद्यें आहेत त्या ठिकाणीं भाषांतरांतही तसलीं पद्यें करून घालावीं. ही सूचना मला बरी वाटली; परंतु कवितादेवीचा वरदकर तर राहिलाच, पण करांगुलिसुद्धां मस्तकावर नसल्यानें ज्यास ती अत्यंत प्रसन्न असे आमचे मित्र रा. शंकर मोरो रानडे, बी. ए. यांची आराधना केली. त्यांच्याकडे त्याबद्दल पत्र पाठवितांच त्यांनी ती मेहरबानी करून दिलीं याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पद्यांत ग्रीक व रोमन पुराणांतील देवादिकांची नांवें न घालतां आपल्या इकडील पुराणांतील नांवें घातलीं आहेत. कांहीं ठिकाणीं शब्दश्लेषांचें किंवा अर्थश्लेषांचें भाषांतर नीट होईना म्हणून वाक्य दोन वाक्यें सोडलीं आहेत. हे आणि यासारखे दुसरे किरकोळ फरक केले आहेत, नाहींत असें नाहीं. तरी कोणत्याहि महत्वाच्या ठिकाणीं शेक्सपिअरला काडीएवढें सुद्धां दुखवलेलें नाहीं......तीव्रजय, शालेय, मल्लिका व प्रियाळ यांच्यासंबंधानें माझ्या मनांत पुष्कळ लिहावयाचें होतें. पण बोलतां बोलतां ही प्रस्तावना फार वाढत चालल्यामुळें व दमा अधिक होऊन तो शरीराला व मनाला पीडा करूं लागल्यामुळें येथेंच थांबणें भाग पडत आहे. नाटकासारख्या विषयाकडे माझ्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति नाहीं व तें तिकडे लावल्यानें त्याच्यापासून मला व दुसऱ्यांना विशेष फायदा होईलसें वाटत नाहीं; तथापि प्रसंगविशेषीं या मनोरंजक विषयाकडे मी थोडा वेळ आनंदानें वळेन.

—पुणें, ता. २९ जून, सन १८८३ इ.

## १९ केसरींतील निवडक निबंध

केसरींतील कांहीं निबंध पुनः पुनः वाचण्यासारखे आहेत असें ज्यांस वाटत आहे, अशा आमच्या कित्येक मित्रांनीं ते फिरून छापून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याबद्दल आमच्या पाठीमागें पुष्कळ वर्षें टुमणें लावलें होतें ! पण आजपर्यंत त्याच्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. आम्हांस असें वाटे कीं, आमचे हे हितचिंतक असल्यामुळें त्यांनीं हा आग्रह धरला आहे. पण पुढें कांहींनीं असें साफ लिहिलें कीं, "ज्या अर्थी शास्त्रीबोवांसारख्या हातचे निबंध आम्हांस किंवा आमच्या पुढल्या पिढीस वाचण्यास मिळण्याचा संभव नाहीं, त्या अर्थी या आमच्या महाराष्ट्र ॲडिसनाच्या व त्याच्या साथ्यांचा हातून केसरीरूप स्पेक्टेटरांत जे चांगले चांगले निबंध आले असतील, ते तुम्ही तरी फिरून छापून काढा, नाहीं तर आम्हांस तरी ते छापण्याची परवानगी द्या.

पण ते तुमचे तुम्ही छापावे हें विशेष योग्य आहे; कारण तें काम तुमच्या हातून थोड्या खर्चानें व स्वल्प सायासानें होण्याजोगें असल्यामुळें त्यांत वाचकांना फायदा होण्याचा संभव आहे.

महाराष्ट्र भाषेंत राजकीय, सामाजिक इत्यादि विषयांवर तरुण वाचकांच्या हातांत टाकण्यासारखीं पुस्तकें मुळींच झालीं नाहींत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही उणीव अंशतः तरी दूर करावी या हेतूनें या निवडक निबंधांची ही आवृत्ति काढली आहे व प्रत्येक बुभुक्षित वाचकास तिची निदान एक प्रत तरी स्वतःच्या संग्रहीं ठेवतां येऊन द्रौपदीच्या स्थालीप्रमाणें तिचा उपयोग करतां यावा यासाठीं तिची किंमत खर्चाचे मानानें बेताचीच ठेवली आहे.

—के. नि. नि. पुस्तक १ लें, प्रस्तावना.

'केसरींतील निवडक निबंध'— पुस्तकरूपानें छापण्यास जेव्हां आम्हीं निश्चय केला, तेव्हांच त्याचे दोन भाग करावे लागतील असें आम्हांस वाटलें होतें; व म्हणूनच पहिला भाग छापतांना दुसरा भाग त्याच्याइतका मनोरंजक व बोधप्रद होईल अशा प्रकारें निबंधांची वाटणी दोहोंत करून टाकण्याचा व्यवस्था केली होती. पण पहिला भाग बाहेर पडला नाहीं तोंच त्याला इतक्या मागण्या येतील व दुसरा भाग लौकर काढण्याविषयीं वाचकांकडून पत्रें येऊं लागतील असें वाटलें नव्हतें......

......या दोन्ही भागांत मिळून १८८६ अखेरपर्यंत केसरींत आलेल्या 'निवडक निबंधांची' सारखी वाटणी केली आहे......हीं पुस्तकें फायद्यासाठीं काढलेलीं नाहींत...

—के. नि. नि. पुस्तक २ रें, प्रस्तावना.

## २० मराठी भाषा

मराठी भाषेस उत्तरोत्तर उन्नतावस्था येत जाणार आहे अशी खातरी झाली असल्यामुळें व दुसरें सध्या दुसऱ्या एखाद्या विषयापेक्षां (व्याकरण) याच विषयावर चार पानें बरीं लिहितां येतील असें वाटल्यामुळें मराठी वाक्याची थोडीबहुत मीमांसा करून त्यांचें पृथक्करण करण्याच्या कामास मी हात घातला. या विषयासंबंधानें आजपर्यंतच्या मराठी व्याकरणकारांच्या ग्रंथांत कांहींच विचार आलेला नाहीं असें नाहीं; परन्तु माझ्या समजुतीनें यावा तितका आलेला नाहीं. कै. दादोबा पांडुरंग, कै. कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं यासंबंधानें जें लिहिलें आहे तें मला अपुरें वाटल्यावरून मी हीं पुढलीं शंभर सव्वाशें पानें महाराष्ट्रभाषोन्नतीच्छूंस अर्पण करीत आहें......मीं आपल्याकडून तीं होतील तितकीं वाचनीय केलीं आहेत. तीं तयार करण्यांत पूर्व व्याकरणकारांपासून होण्यासारखी मदत मीं घेतली आहे व तीबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. तथापि या कामांत मला जें विशेष साहाय्य मिळालें तें मराठी व्याकरण-कारांपासून नव्हे, तर इंग्रजी व्याकरणकारांपासून व त्यांतही विशेषतः बेनपासून. या व्याकरणकारांचें व्याकरण माझ्या हातीं न पडतें व तें शिकवण्यासाठीं त्याचा बारकाईनें अभ्यास मला न करावा लागतां, तर प्रस्तुतसारख्या विषयावर लिहिण्याची इच्छा

मला कधींच होती ना......वेनशिवाय मेझन, ऑरनॉल्ड, व्हिट्ने, मोरेल, हायले वगैरे इतर इंग्रजी व्याकरणकारांपासून मला जो फायदा झाला त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

—प्रस्तावना, वाक्यमीमांसा.

## २१ सुधारक बंद होणार !

कित्येकांनीं तर अशीही शंका घेतल्याचें आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, ( धर्मविचारांची उन्नतावस्था ) या विषयावर लिहीत असतां एकदोन ठिकाणीं जीं वादग्रस्त स्थळें आलीं व ज्यांविषयीं निदान अप्रत्यक्ष रीतीनें तरी जो थोडा स्पष्टपणें अभिप्राय देणें आम्हांस भाग पडलें, तो पुष्कळांस न रुचण्यासारखा असल्यामुळें व तसें झाल्यास या नवीन वर्तमानपत्रास धक्का पोंचण्याची भीति वाटल्यामुळें आम्ही कांहीं एक न बोलतां हळूच त्याची वाट सोडून दिली, व बाकीच्या पत्रकर्त्यांप्रमाणें वाचकसमुदायास रुचतील असे सामान्य विषय घेऊन त्यांवर लिहूं लागलों ! ही दिव्य कल्पना कांहीं अंशीं सुधारक थोड्या महिन्यांनीं अजिबात बंद होणार, किंवा दुसऱ्या एकाद्या पत्राच्या बगलेंत शिरणार म्हणून जी कंडी उठली होती, व कंडीखोरांच्या कृपेनें जी कंडी पुनःही उठण्याचा संभव आहे, तिच्या मालेंतीलच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं ! नेहमीं लोकांस आवडतील, म्हणजे ज्यांतील अभिप्राय सर्वथैव व सर्वदा सर्वांस पसंत पडतील असेच लेख सुधारकांत येत जातील, असें आम्ही कधीं कोठें लिहून किंवा बोलून गेल्याचें आम्हांस स्मरत नाहीं; व तसें करण्यापासून सुधारकाच्या नामार्थास सार्थकत्व येईल असेंहि वाटत नाहीं.

—अन्य सामाजिक प्रवृत्तीचा कल.

## 22 The Sudharak—

......... When the Kesari was started, large placards were printed and stuck up against the walls in some of the District towns and the same thing may again be done for the Sudharak. Something on this line has been already done at Bombay by our agent there to the same end...... Had my health permitted and business allowed, I should have myself paid visits to most of the District towns, lectured and tried to secure some subscribers in each of them. But my Asthma makes it impossible for me to be away from my medical advisers, and the weakness of my lungs has made me quite unfit to give lectures,

( 30 th October, 1888. )

× × ×

( a ) The income of the last year exactly covers the cost for the year, leaving no balance whatever.

The accounts stand as follows:—

Total number of paid up subscribers for 1888-1889 was 650 Rs. 1300. For advertisements Rs. 300.

| Income | Expenditure | |
|---|---|---|
| Rs. 1600. | Rs. 720 | printing and management. |
| I have taken no account of the postage, because it comes and goes without affecting us in any way. | Rs. 560 | Paper. |
| | Rs. 100 | Sundry expenditure such as pattas (addresses), receipt books. |
| | Rs. 150 | Original advertising. |
| | Rs. 40 | Furniture. |
| | Rs. 30 | Balance. |
| | Rs. 1600 | |

(b) From this you will see that we have been no gainers and there is no hope of our ever being so. We must depend for our maintenence on our school remuneration.....

(c) I have been writing for papers for the last five years (either for the Marhatta or the Kesari and now the Sudharak) without receiving a single pie from their proceeds. I have done the work so far with disinterested motives; why not continue to do it hereafter was the question we put to ourselves. And I and my good friend Mr. Gokhale resolved to make the writing in the Sudharak 'Labour of Love' This done, we thought whether we could not make lit selfsupporting by reducing its price... We, therefore, made up our mind to stand unrivalled in that respect. We hope that by the end of the year, the circulation will run up to three thousand. ...... When we write with all our heart, and to write only for a few hundreds was most displeasing to me ......... moreover in order that our views may produce some effect on the society at large, it is necessary that they should reach the remotest corner of the country.

(2 nd October, 1889.)

We have been trying our best to make the paper as interesting and instructive as possible with a view to secure the largest possible number of subscribers. The rate at which they are coming in has not yet given reason to be disappointed. From the lots of letters we receive every week, it appears that our organ is fast becoming popular among the lower ranks of the society.

( 1 st November, 1889 )

—Letters to Mr. S. G. Deodhar, B. A.

## २३ पुणेरी जोड्यांत सुधारणा

जोडा कसा असावा याविषयीं आम्ही कांहीं सूचना केल्या... त्या सूचना प्रसिद्ध केल्यापासून आम्हांकडे जीं पत्रें व जे जोडे आले आहेत त्यांवरून जोड्यांची सुधारणा पुष्कळांच्या मनांत पुष्कळ दिवस घाटत आहे हें उघड दिसतें... मुंबईच्या एका सन्मान्य गृहस्थानें जो जोडा तयार करून पाठवून दिला आहे, त्यांत आम्ही सुचविलेल्या बहुतेक सुधारणा घडवून आणल्या आहेत.

—फिरून एकदां जोडे.

## २४ महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें **सुधारकांत** अलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यावर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थाची स्थापना व उत्कर्ष, त्याचप्रमाणें मराठा आणि केसरी पत्रांचा अवतार, प्रसार आणि करवीरप्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इसम बरींच वर्षें एकमेकांशीं कसे वागत होते, हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना सुधारकासारख्या नवीन पत्राचें जनन, रा. टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेष, व प्रस्तुत वादांत **सुधारक** आणि **केसरी** पत्रांच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडिमार, या उभयतांच्या बेबनावास व फाटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें, विषाद वाटणें फार स्वाभाविक आहे...... दोघांचा बेबनाव व फाटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते, त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनाविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला, व याच मतभेदामुळें प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां आपआपल्या मतांचा आणि पक्षाचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं!........पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं व प्रसारासाठीं भांडत आहों, असें प्रत्येका-

ऱ्या मनांत वागत राहील, तोंपर्यंत न्यायसभेंत पक्षकाराचें भांडण मांडणाऱ्या वकीलाच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं, व आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असें निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिकच होत जाण्याचा जरी संभव आहे, तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल, तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल व मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून, एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल !

......लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत, त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें लोकच्छंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे; इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय पण पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीवितांचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोहोंचलें आहे; व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान ह्या कामांत सरकारचें किंवा कायद्याचें साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या श्रद्धाळू पंडितमन्य देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां, श्रीशिवाजीरावमहाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पांचशें रुपयांची नौकरी ज्यानें "मला नको" म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां आज दहा अकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां, ज्यानें सात-आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचे बऱ्यावाईट रीतीनें 'रकाने' भरून काढले, इतकेंच नाहीं, एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, एवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधिशांस अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा ज्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल तें लिहून देत नाहींत असें दिसून आल्या-बरोबर त्यांच्या धमकावण्यांकडे बिलकूल लक्ष न देतां समान शीलाच्या विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखी निंदा होत असलेल्या **सुधारणेचा** व **सुधारकांचा** पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बळ नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नसत्या उठाठेवींत जो जाणून बुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोका-चारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्या-मुळें देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांतून होत असलेला शिव्यांचा व

शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाच काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर व खांद्यावर खेळवून ज्यांनीं लहानाचें मोठें केलें अशा अत्यंत ममताळु व पूज्य आप्तांचाही दीर्घरोष ज्यानें आपणावर करून घेतला आहे......अशा मनुष्याच्या लेखांत कितीहि प्रमाद होत असेल व केवढीही कटुता असली तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनुकंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. "हा वेडापीर इतके हाल, संकटें व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे, त्या अर्थी ती अंतीं लोकांस हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी." असा विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे. पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं; कारण सारें जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम ।<br>
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥<br>
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा ।<br>
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥ १ ॥

# आगरकरांशीं ओळख

## भाग २ रा

### अनुक्रमणिका

* विद्यार्थी आगरकर
* शिक्षक ,,
* वक्ते ,,
* संपादक ,,
* लेखक ,,
* धर्मवृत्त ,,
* सुधारक ,,
* राजकारणी ,,
* मुसलमानांविषयीं आगरकर
* औद्योगिक उन्नतिविषयीं आगरकर
* स्त्रीसमाजासंबंधीं आगरकर
* कर्तव्यदक्ष आगरकर

Society of any magnitude must, in order to exist, be made up of couples and families, which may be regarded as original cells. As in the human body, there are not only conjunctive and epithetial tissues but also the more complex nerve-cells uniting all the others, so I believe we must think of society as made up of families which eventually put forth delicate extentions into several others at once, drawing them together; and we may conceive of friendship and admiration as the more complex nerve cells. So spiritual love weaves among the threads of of freshly love a weaker, more delicate weft, but one without which human society could not exist.

## प्रकरण १ लें

# विद्यार्थी आगरकर

" विद्यार्थिनः कुतः सुखम्। "

कै. गोपाळ रावजी आगरकरांची विद्यार्थीदशा म्हणजे सती सीतेचें अग्निदिव्य होतें, पांडवांचा अज्ञात-वास होता, पांचालीची प्रतिष्ठा होती. " विद्यार्थीनः कुतः सुखम् " या सुभाषिताच्या जन्मकालीं त्याच्या जनकाच्या डोक्यांत घोळत असलेलें अत्युत्कट कल्पनाचित्र आगरकरांच्या विद्यार्थी-दशेहून फारसें भिन्न असेल असें वाटत नाहीं. किंबहुना आंग्लाई-खालील महाराष्ट्रांत त्या संस्कृत वचनाची परिपूर्तता करण्यासाठींच गोपाळराव आगरकरांस परमेश्वरानें जन्माला घातलें होतें कीं काय अशीही शंका येतें.

नाहीं पैशाचें पाठबळ, नाहीं आप्तेष्टांचा आधार; गरीबी म्हणजे हात धुवून गांजायला बसलेली, आणि हरघडी परिस्थितीनें ' आ ' वासलेला. आईच्या ओच्याला धरून हट्टानें खाऊ मागण्याइतक्या चिमणाईपासून, वडीलधाऱ्या छत्रापासून वेगळे सरण्याची पाळी, आणि आपली आपण मारवेल तितकी मजल मारायची ! कोणी वाटेंतील कांटे वेचायचा नाहीं कीं फोफाट्यावर ओलेतें करायचा नाहीं. एखाद्या वेळीं क्षणभर कोणीं हाताला हात दिला तर दिला, पण कोणी पादत्राणाची विचारपूसही नाहीं करावयाचें ! पण गोपाळरावांचा हिय्या जात्याच दांडगा होता, ओज स्वभावतःच प्रखर होतें. नैसर्गिक कुरीच तडफेचा होता; त्यामुळें ओलांडले अडचणींचे समुद्र, आणि तुडविल्या संकटाच्या कडेकपारी, पण आकंठ विद्यामृतपान केलें. खर्डे घासले, बाटल्या धुतल्या, धोतरें बडविलीं, मैलच्या मैल रखडले, निबंध खरडलें, नाटकाला हात घातला, पट्टीचें वक्तृत्व केलें, एकाच सदऱ्यावर दिवसच्या दिवस काढलें, पण विद्या-देवी प्रसन्न होईतोपर्यंत गोपाळरावांनीं तिचा पिच्छा पुरवला. धन्य विद्यादेवी ! धन्य गोपाळराव !

विद्यादेवीचे एवढे भक्त गोपाळराव नुसते पुस्तकी पोपट नव्हते. हॉवर्डची तीन बुकें गोपाळराव कऱ्हाडच्या एक नंबरच्या शाळेंत शिकलें. त्यांच्या हुशारीची बिजली एव्हांपासूनच चमक मारूं लागली होती. जसा प्रश्नाचा झोंक तसा उत्तराचा कल ठेवणें गोपाळरावांच्या हातचा मळ ! त्यामुळें रोंध्यांच्यासारखा कडक पण वाकब-गार आणि मार्मिक शिक्षकही गोपाळरावांवर खूष ! रोंधेच काय, पण गोपाळरावांची हुशारी ज्यांच्या ज्यांच्या प्रत्ययाला आली ते ते गोपाळरावांवर खूषच होते. प्रत्येक रविवारीं सभा भरवून उत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांस बक्षिसें देणाऱ्या रा. सा. अमृत श्रीपत नागपूरकर मुनसिफांना गोपाळरावांची हुशारी पटल्यामुळेंच त्यांनीं गोपाळराव रत्नागिरीस गेले तेव्हां पदरचें पंचाहत्तर रुपये काढून दिले; परिस्थिती सर्वथैव प्रतिकूल असतांहि कॉलेजांत जाण्याचा गोपाळरावांचा निश्चय पाहून रा. विष्णु

मोरेश्वर महाजनीआदि शिक्षकवर्गानें गोपाळरावांस ६० रुपये जमवून दिले, ते गोपाळरावजींच्या हुशारीमुळेंच; आणि पुढें कॉलेजांत एफ्. ए. परीक्षेची फी भरायला पैसे नसल्यामुळें त्यासाठीं गोपाळरावांनीं लिहावयाला घेतलेलें नाटक काढून घेऊन गोपाळरावांच्या फीचे पैसे केरूनाना छत्र्यांनीं भरले ते केरूनानांचें गोपाळरावजी सारख्या विद्यार्थ्यांवर पोटच्या पोरांसारखें प्रेम होतें म्हणूनच ! या प्रेमांत गोपाळरावांच्या आजन्म दारिद्र्याबद्दलची करुणा नसेल असें म्हणणें नाहीं; पण या करुणेला सुदामदेवाच्या पुरचुंडीनेंच तोलावें लागेल, आणि गोपाळरावांच्या हुषारीला वासुदेवाच्या वैभवानें कळसवावें लागेल. तसें नसतें, करुणेवर हुषारीनें शह ठेवला नसता तर दरिद्री गोपाळरावांचा निर्भिड स्पष्टवक्तेपणा विद्यार्थी–दशेंत निभला नसता ! भर सभेंत आप्पासाहेब जोशी मामलेदारांना गोपाळरावांनीं रोकडें उत्तर दिलेलें ऐकूनही नागपूरकर मुनसिफांनीं गोपाळरावास हात दिला आणि आकोल्याच्या हायस्कुलांत कधीं कधीं खटका उडविणाऱ्या गोपाळरावांतर्फे महाजनींनीं मध्यस्थी केली, यांत त्या दोघां महाभागांच्या मनाचा दिलदारपणा दिसून येतो, तितकीच गोपाळरावांच्या हुषारीची त्यांच्या मनावरील पकडही आढळून येत नाहीं काय ?

पण गोपाळरावांची हुषारी नुसत्या गुरुप्रेमाच्या कारंज्याखालीं न्हाली नाहीं. पारितोषकांच्या आणि शिष्यवृत्यांच्या कुंडांतही तिनें अभ्यंगस्नान केलें. "एकत्र हिंदु–कुटुंब पद्धतीपासून फायदे व तोटे" असल्या विषयावर विद्यार्थी आगरकरांनीं भरीव निबंध लिहिला, आणि पहिल्या प्रतिचें पारितोषक कमावलें. वक्तृत्वोत्तेक सभेंत असा विषय खुलवला कीं सारी सभा डोलली आणि "अग्रहार" आगरकरांना मिळाला; इतकें कशाला ? वऱ्हाडसमाचारकर्त्यांनीं, सहा महिनें कां होईना, गोपाळरावाकडून लेख लिहवून नियमित तनखा दिला. आगरकरांचीं हुशारी कशी पैलुदार होती हें यावरून चांगलें कळतें. त्याचप्रमाणें त्या हुशारीला कसकसल्या दिव्यांतून सुलाखून निघावें लागलें हेंही प्रत्ययाला येतें. "अडीअडचणींतून ज्ञानाचा पिच्छा" या क्रेकच्या ग्रंथांत दिलेल्या उदाहरणापेक्षांही, निदान तितक्या दर्जाचें तरी गोपाळराव आगरकरांचें उदाहरण हृदयद्रावक नाहीं काय ? पण "क्षुच्चितेचा क्षुद्र गारठा थिजवी तेज हिऱ्याचें । आपत्तिच्या हिमें नांवही करपें हृज्योतीचें" असा वज्रप्राय प्रसंग गोपाळरावजीवर आला नाहीं, याचें कारण त्यांच्यावरील श्रीसरस्वतीची बहाल मर्जी हें तर खरेंच पण चांगुलपणाचा एखादा खडा गोपाळरावांच्या लहानपणांतील दांडगेश्वरी खेळकरपणाला द्यावयास नको काय ? व्रतें वैकल्पें करीत आणि वाणें वाटीत डेक्कन कॉलेजांत आलेल्या गोपाळराव आगरकरांची प्रकृति दांडगी असल्याबद्दल खुद्द प्रो. सेल्बीसाहेबांनीं साक्ष भरली आहे, मग ती मुळांत किती दणकट असेल बरें ? कऱ्हाड कृष्णाकोयनांच्या संगमांत गोपाळराव तासतास पोहले होते, वाळवंटांत त्यांनीं कमालीचा हुतुतू घातला होता आणि सुरपारंब्या खेळण्यांत व झाडांवरून बागडण्यांत त्यांच्याइतकी धिटाई कोणालाच नव्हती. एकदां चिंचेच्या झाडावर चढून गोपाळराव वानराला पिटाळून लावित असतां तो हुपट येऊन त्यानें गोपाळरावांची शेंडी धरली,

पण तो निघून जाईपर्यंत वस्ताद गोपाळरावांनीं त्यांच्याशीं झगडा करावयास कमी केलें नाहीं !

वरील तऱ्हेच्या मनगटास साजेसाच गोपाळरावाचा मेंदू होता. मेंदू व मनगट यांना एकाच वेळीं दणकट राखतां येत नाहीं असें म्हणणारांनीं आगरकरांचें उदाहरण टिळकांप्रमाणेंच जरूर पहावें. आतां, त्यांत अगदींच कूस नव्हती असें नाहीं. गोपाळरावांची बुद्धि चपल होती, तशी ग्राहकही होती, पण स्मृति मध्यमावर होती. अर्थातच मेहनतींत मागें पाय कोठून असणार? गोपाळरावांचें अभ्यासावर लक्ष्य बेसुमार. वेळ फुकट दवडावयाचा नाहीं हा बेफाट निश्चय. त्यामुळेंच त्यांना परिस्थितीच्या कोळशांत हिरे-वेंच करतां आली. त्यांत देखील अकोल्यास विष्णू मोरेश्वर महाजनीसारख्या शिक्षकाच्या निकट सान्निध्याचा आणि सहवासाचा गोपाळराव आगरकरांना कल्पनातीत फायदा झाला. किंबहुना अकोल्यास धरलेल्या धरणामुळेंच गोपाळरावांच्या उभ्या आयुष्याचें शेत जोपासलें असेंही म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. गोपाळरावांच्या वर्गांत कधीं दहाच्या वर विद्यार्थी नव्हतेच; त्यामुळें पुष्कळ सोयी होत. घरपाठ–चोपड्याची [ Exercise Books ] तपासणी वेळच्या वेळीं होई. साताहिक तपासणी रेंगाळायची नाहीं, व व्हायची ती सर्वांसमक्ष. त्यामुळें कोणाच्या काय कारणानें कशा चुका होतात हें कळे, आणि चूक होते आहे कीं काय हें पाहण्यांत जो तो दक्ष असे. खोल मननाची आणि चिकित्सक छाननीची दिशा गोपाळरावजींच्या मनास लागावयास शिक्षणाची हीच पद्धत मुळांत कारण असावी. असल्या पद्धतींत लष्करी कवायतीची शिस्त नसते हा दोष कबूल; पण प्रश्नोत्तरें शंका यांनीं सवड दिल्यावाचून विद्यार्थ्यांच्या मानसिक व नैतिक गुणांचा पूर्ण विकास होणार नाहीं अशी शिक्षणपटूंची एकवाक्यता आहे. हें विसरून कसें चालेल? पुढें स्वतः शिक्षक झाल्यावर हातच्या विषयाचा लगाम खेंचून टांच देतांच भिमथडीची घोडी अटकेला नेऊन आगरकर आणीत, त्याचें मूळ पाणी स्वतः शिकलेल्या आगरकरांच्या अकोल्याच्या वर्गांतच मुरत असलें पाहिजे. आगरकरी लेखणीचा खंदेपणाही विद्यार्थीदशेच्या खांद्यावरच वाढला आहे. नागपूरकर मुनसफांच्या कऱ्हाडे सभांतील निबंधांत आणि वऱ्हाडसमाचाराच्या सहामाही उमेदवारींत खतपाणी आणि खुरपणी झाली खरी, पण आगरकरी हातोटीची बिनचुक मशागत झाली ती अकोल्याच्या शाळेंत इंग्रजीचें मराठी भाषांतर करतांना.

" व्यर्थ भाराभार केलें पाठांतर, जोंवर अंतर शुद्ध नाहीं. " कोणतेही विषयाचें अंतरंग शुद्ध स्वरूपांत ठसण्यासाठीं मननावर आगरकरांचा धडाका असल्यामुळें विद्यार्थीदशेंतही आगरकरांचें वाचन त्या मानानें बेतासबात असे. तथापि आगरकरांच्या वेळीं वऱ्हाडच्या हायस्कूलांतून मातृभाषेसाटीं शिष्यवृत्ति असल्यामुळें ' नवनीत, नाटकें, गद्यग्रंथ इत्यादि ग्रंथांचें अध्ययन सहज होई. ' गोपाळरावांनीं दोन वर्षें ही शिष्यवृत्ति मिळवली होती, अर्थात् त्यांचेंही तें वाचन झालें होतें. शिवाय गोपाळरावांच्या अंगीं अभिजात रसिकता असल्यामुळें काव्यें व नाटकें वाचण्याचा आणि

त्यांतील श्लोक पाठ करण्याचा नाद त्यांना विशेष. ते कंटाळा करायचे संस्कृत व्याकरणाच्या घोक्याचा; पण चंद्रावरील डागाप्रमाणें स्वतःच्या अभ्यासक्रमांत शिंकलेली ही माशी त्यांनीं अन्य तऱ्हेनें भरून काढली होती. कारण त्यांची गति कोणत्याही विषयांत बऱ्यापैकीं चाले. इतिहासाची गोडी त्यांना लहानपणापासूनच होती. एम्. ए. ला तर इतिहास आणि तत्वज्ञान हा त्यांचा ऐच्छिक विषय होता. तत्कालिन उपलब्ध ऐतिहासिक ग्रंथांत ग्रीक व रोमन लोकांच्या इतिहासावरील पुस्तकें गोपाळरावांना विशेष वाचावीशीं वाटत. मराठ्यांच्या अगर रजपुतांच्या तेजस्वी इतिहासाबद्दल आगरकरांचें अंतःकरण आदरानें उचंबळून येत असे यांत शंका नाहीं. परंतु हिंदुस्थानच्या अलीकडील घोर महानिद्रेंत इतिहासाचा तो भाग गोपाळरावांना सुखस्वप्नासारखा भासे. 'रोमचा ऱ्हास व नाश' हा गिब्बनचा ग्रंथ तर ऐतिहासिक ग्रंथांत गोपाळरावांचा प्यारा होता. गिब्बनचे गोपाळराव इतके वेडे होते कीं भागवताचीं पारायणें करण्यापेक्षां गिब्बनचीं पारायणें करणें अधिक श्रेयस्कर असें त्यांचें एककल्ली पण प्रामाणिक मत होतें. ऐतिहासिक वातावरणांतून तात्विक वातावरणांत शिरल्यास मिल्ल, स्पेन्सर आणि काट यांच्या ग्रंथांचीं छत्रचामरें आगरकरांच्या मनावर ढाळलेलीं आढळतात.

विद्यार्थी या दृष्टीनें आगरकर कोणत्याही विषयाचे चहाते बनोत अगर कोणत्याही ग्रंथकाराचे भगत बनोत, पुस्तकी पोपटपंचीचेंच पुण्य ते पदरीं बांधून होते काय, हा मुख्य प्रश्न आहे. आणि त्याचें सरळ उत्तर इतकेंच कीं, पुस्तकी ज्ञानाच्या खडकावर त्यांनीं स्वतंत्र विचारांचा झेंडा उभारला होता. चार मंडळींत उभे राहून बोलावयाची संवय बालपणापासून त्यांना असल्यामुळें, नटाप्रमाणें घोटीव बडबड करून वक्तृत्वाचीं बक्षिसें मारणें शक्य नव्हतें. हें तर एक झालेंच, पण शिवाय आपल्या पुढील विषयांचे कानेकोपरे झाडून सारें बघण्याची संवय आगरकरांना होती. तसें करण्यास छाननीची, चर्चेची व वाद विवादाची पुष्कळ मदत होते. आगरकरांचे असे वादविवाद नेहमीं, आपल्या सोबत्यांशीं विशेषतः कॉलेजमध्यें चालत. हातीं येणाऱ्या पुस्तकांचें छाननी करून वाचन चाललें असलें म्हणजे आपल्या परिस्थितीच्या तबकडीवर त्यांचें गाणें कसें व कितपत घेतां येईल हा विचार येत असतो. त्यामुळेंच स्वदेशोन्नतीचे विषय चर्चेसाठीं कॉलेजच्या वातावरणांत यावयाचे, आणि बरीच भवति–न–भवति व्हावयाची. या बाबत आगरकरांचे सवंगडी मिरजकर म्हणून असत. या मिरजकरांना देशी विरुद्ध विदेशी कापडाचा वाद खाजवून काढण्याची लकब होती. आणि त्यावेळीं आगरकर मोठ्या तावातावानें स्वदेशीचा पुरस्कार करीत, असें सांगतात.

असल्याच स्वतंत्र छाननीच्या बनावामुळें टिळक, भागवत, करंदीकर यांचा विचारविनिमय होऊन शिक्षणप्रसारार्थ आयुष्य वेचण्याचा मनसुबा आगरकरांनीं केला, व अमलांत आणला. स्वधर्मप्रसाराच्या ध्येयानेंच प्रेरीत होऊन कां असेना, पण पाद्री लोकांनीं अगदीं अल्प वेतनावर व स्वतःला चट्टा लावून घेऊन येथें त्या वेळीं

शाळा चालवल्या होत्या. तेंच उदाहरण टिळक आगरकरादिकांच्या डोळ्यापुढें होतें. तशा वृत्तीनें एतद्देशीयांनीं शिक्षणप्रसार हातीं घेतल्यास, सुशिक्षित समाजाला लागलेल्या पाश्चिमात्य वळणाचा कोस जाईल व ओघ बदलेल, आणि शिवाय राष्ट्राचा आर्थिक फायदा होईल तो वेगळाच ! अशा सुविचारींनीं प्रेरीत होऊनच टिळकांबरोबर आगरकरांनीं आपली ध्येयनिश्चिती केली होती. वादाविवादात्मक उत्साहाच्या वाऱ्यावर ही मोट बांधली नव्हती. कारण एक तर आगरकरांचें वचन आत्मप्रत्ययानें आणि दृढनिश्चयानें मुसमुसलेलें असे, शिवाय आपल्या भावी आयुष्यक्रमाचें चित्र ते आईला पत्रद्वारें दाखवून मोकळें सुद्धां झाले होते; ही 'बनावट' सुद्धां वारे भरल्या उत्साहांत झाली म्हणावें, तर शाळेच्या प्राणप्रतिष्ठेसाठीं विष्णूशास्त्री चिपळूणकरांकडे ते टिळकाबरोबरीनें पुढाकार घेऊन गेले, आणि त्यांच्या अगोदर आपल्या संकेतासंबंधांत सल्ला घेण्यासाठींही न्यायमूर्ती रानड्यांना त्यांनीं पत्र लिहिलें होतें. एवढ्यानें समाधान न होणाऱ्या चिकित्सेला असा आहेर करतां येईल कीं, एम्. ए ची वारी फिरून करण्यासाठीं शाळेपासून एक वर्षभर बाजूला बसण्याचें ठरविणाऱ्या आगरकरांनीं हातावर हात मारल्यावरच वामनराव आपटे शाळेस मिळाले. तथापि फाजील शंकेखोर वृत्तीला आगरकरांनीं केलेला विचारपूर्वक निश्चय दिसण्याऐवजी, काळाच्या वाहतुकीवर सावधपणानें आधारलेली 'झाकली मूठ' दिसण्याचा संभव असल्यामुळें एवढें बजावल्याशिवाय राहवत नाहीं कीं, एम. ए. झाल्यावाचून आगरकरी शिक्षकत्वाचें अनुष्ठान बसायला त्यावेळीं तरी बिलकूल अडचण नव्हती. पण तुमच्या हातून काय होणार ? या अकोला हायस्कुलांतील महाजनींच्या सवालाला "तुमच्या सारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर" असा रोखठोक जबाब देणाऱ्या ओजस्वी गोपाळरावांना एम्. ए. झाल्याशिवाय चैन पडणेंच शक्य नव्हतें.

लोकांत ज्ञानाचा प्रसार करावा, हा गोपाळरावांचा निश्चय क्षणांत झाला नाहीं. त्याला आणखी एक खात्री पटविणारे प्रत्यंतर असें आहे कीं, तद्विषयक चर्चा डेक्कन कॉलेजांत उजळ माथ्यानें वावरावयाच्या अगोदर कितीतरी दिवस, तो विचार आपले तिसरे मामा अनंतराव भागवत यांस दत्तोपंत भागवतासमक्ष गोपाळरावांनीं टेंभूस कृष्णेच्या आगरकरी घाटावर बोलून दाखविला होता व त्यामुळेंच त्याला निश्चयाचें बळ होतें. या बळावरच त्यांना झेप टाकतां आली, ती सफाइची टाकतां आली. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें 'विरळा शिष्यजनप्रिय गुरु' होण्याचें भाग्य आगरकरांना लाभलें तें उपकारकर्त्या गुरुजनांविषयीं गोपाळरावांजवळ असलेल्या सादरकृतज्ञतेपेक्षांहि, पंचपतीव्रतांच्या दिव्यांतून सुलाखून निघालेल्या त्यांच्या विद्यार्थी-दशेचेंच प्रसादफळ म्हणतां येईल.

प्रकरण २ रें

# शिक्षक आगरकर

एकोणिसाव्या शतकाची शेवटची पंचविशी म्हणजे सरकारी नौकरीचा सुवर्ण-महोत्सव होता, आंग्लाईची बरसात झाल्यापासून 'इंग्रजी' झालेल्यांना 'पगाराची पंचाईत' कधींच पडली नव्हती, मग आगरकरांसारख्या विद्वानांच्या पायीं मानमान्यतेसह लक्ष्मी त्यावेळीं लोळण घेत असेल यांत नवल काय? पण गोपाळराव आगरकर त्या मोहिनीला बळी पडले नाहींत. वास्तविक त्यांच्या मातृदेवतेनें जीव टांगून ठेवल्यासारखें गोपाळराव पदवीधर होईतों कशाबशा काढलेल्या हालअपेष्टाचें आणि दारिद्र्य दुखाचें पारणें सुटायची ती मंगल वेळा, व हातानें पालवतांच अगदीं हाताशीं लक्ष्मी हात जोडून तयार! पण अशा समयासही चांद्रायणी व्रत करण्याचें गोपाळरावांनीं ठरविलें. कां? त्यांना स्वतांला सुख नको होतें कीं आईला सुखवूं नयेसें त्यांना वाटत होतें? यापैकीं कांहींच नव्हतें. तर त्यांना आपल्या देशबांधवांची हलाखी पाहून पीळ पडत होता. म्हणून पायांशीं लोळण घेणाऱ्या लक्ष्मीला त्यांनीं हातावेगळी केली, आणि ज्या दारिद्र्याच्या निर्जळ्या ते पदवीधर होईतों करीत आले, त्यांतलाच एक मऊ असा चांद्रायणी व्रताचा पर्याय पत्करून ते खाजगी शाळेचे शिक्षक बनले.

कऱ्हाडची शाळा सुटल्यानंतर बरोबरीचे लोक पुढें शिकावयास गेले या ईर्षेनेंच कदाचित त्यावेळीं गोपाळरावांनीं पुढें शिकण्याची महत्वाकांक्षा धरली असेल! पण स्वतां उच्च शिक्षण घेतल्यावर आंग्लाईचा अंमल चढलेल्या आपल्या देशाला कालानुरूप उदार शिक्षणाची अवश्यकता आगरकरांना भासूं लागली, आणि फाटक्या खिशांच्या आपल्या देशबांधवांना सरकारी संस्थांच्या तोडीचें पण स्वस्त शिक्षण देण्याची धडपड करणें जनमदतीवर शिकलेल्या आगरकरांना आपलें कर्तव्यच वाटलें.

"जनीं जन्मुनी जन–मदतीनें जगलों जर जगती!
जन कार्यांविण मरूं कशास्तव? नकोच अन्य गति!"

Born of people, brought up with peoples' bread,
for whom shall I did but for the people!

अशी जिव्हाळ्याची जाणीव कृतज्ञ आगरकरांना होणें साहजिकच होते. या जाणीवेनेंच ते शिक्षक बनले. पुस्तकी नकला तयार करवून परीक्षेची नाटकें सजवावयाची आणि त्यांचा उपयोग रुपेरी, बेड्यांची शृंखला लांबवण्यांत करावयाचा, हा आगरकरांच्या शिक्षकत्वाचा हेतु नव्हता. हा तत्कालीन रुळलेला राजमार्ग खुद्द आगरकरांनीं सोडून दिला होता आणि राष्ट्राचे भावी आधारस्तंभ त्यांना अगदीं स्वतंत्र व स्वावलंबी असे निर्माण करावयाचे होते. या सिद्धीसाठीं विचारजागृतीचा भरभक्कम पाया खचून भरणें जरूर, आणि विचारजागृति होण्यास, पुढें आलेल्या

विषयांच्या निरनिराळ्या बाजू समजणें अवश्यक. अर्थात् चर्चा व वादविवाद ओघानेंच आले. तो गोपाळरावांना फार आवडे आणि अशा वेळीं विद्यार्थ्यांनीं झटून झोंब्या घ्याव्या, आणि गोपाळरावांनीं "वस्ताद मुलाला कुस्ती खेळायला शिकवितो तसें—वादपटुत्वाच्या नाना तऱ्हा" शिकवाव्या असा क्रम चाले. विचारजागृतीच्या असल्या धडाडीच्या पाकसिद्धींत, "नावडतीचें मीठ अळणी" म्हणून मतभिन्नता घाण करण्याचा संभव पुष्कळ, आणि "लहान तोंडीं मोठा घास" झाल्यानें एखाद्या वेळीं ओकारीहि यावयाची! पण विचारस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आगरकर या सगळ्यापासून आलिप्त होते. वादविवाद करतांना मुलांनीं कितीही आक्षेप घेतले, आणि कशींही प्रत्युत्तरें दिलीं तरी ते सहसा रागवत नसत. मुलांना स्वतंत्र विचार करण्याची संवय लागावी हें त्याचें मुख्य धोरण. त्यामुळें शिष्य वादप्रवीण झाला म्हणजे त्यांना पुरे; ते त्याच्या मतांकडे पहात नसत. या संबंधांत ह.भ.प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर असा स्वानुभव लिहितात कीं, "आमच्या शिक्षकांपैकीं ज्यांचें अद्यापहि सप्रेम स्मरण होतें त्यांपैकीं गोपाळराव आगरकर हे एक होत. त्यांची साधी रहाणी, निगर्वी वृत्ति, शिकवण्याची कळकळ, विद्यार्थ्यांनीं कितीही वेळां, कोणत्याही प्रकारच्या कितीही शंका विचारल्या तरी न रागावतां समाधान करण्याची उत्सुकता, मतभेद झाला असतांही विद्यार्थ्यांविषयीं प्रेम अबाधित ठेवणारी मनाची उदारता इ. त्यांचे गुण ज्यांच्या प्रत्ययाला आले त्यांना त्यांना गुरुवर्यांविषयीं प्रेम व आदर वाटल्यांवाचून रहात नाहीं. त्यांच्या हाताखालीं शिकत असतां सहांपैकीं शेवटच्या दोन वर्षांत असा एखादाच दिवस गेला असेल कीं, ज्या दिवशीं आमचा आणि या गुरुजींचा कोणत्या तरी विषयावर वाद झाला नाहीं! त्यांना वाद फार प्रिय असे व वाद करतांना त्यांच्या मनाची समता सहसा ढळत नसे......त्यांच्या आमच्यांत स्वाभाविक विचारप्रवृत्तींचा जरी ३६ चा आंकडा होता तरी त्यांच्याविषयीं आमच्या मनांत निरंतर प्रेमादर असे व आम्हांला नक्की सांगतां येते कीं, मतभिन्नतेमुळें त्यांच्या मनांत आमच्याबद्दल गढूळपणा उत्पन्न झाला नाहीं. इतकेंच काय पण त्यांचें शुद्ध प्रेम केव्हांही कलुषित झालें नाहीं."

शिक्षक म्हणून आगरकरांचें ८० टक्के वर्णन पांगारकरांच्या वरील उताऱ्यांत सांपडेल. विचार जागृतीसाठीं वादविवाद करतांना, "विद्यार्थ्यांना नवीन मतें, तत्त्वें व विचार सांगतांना त्यांना विलक्षण स्फुरण चढे, व त्यांच्या चेहऱ्यावर सात्विक आनंदाची लकेर झळके." तत्राप मनुष्यस्वभावाप्रमाणें वर्गांत त्यांना कधीं राग आला नाहीं, असें कसें म्हणतां येईल? गोपाळराव सटीसहामाही एखादेवेळीं रागवतही! पण फार फार रागावले तर बुक्की मेजावर आपटून "तुला या गोष्टी आज समजत नाहींत, पण पुढें कळून येतील" असें म्हणून क्षणभर गंभीर होत, "पण दोन मिनिटाच्या आंतच आपल्या विशाळ मिशांतून फार गोड हंसत व त्याबरोबर सर्व मुलांचें हास्य मिसळलें जाऊन जो क्लासभर निर्भेळ आनंद पिके त्याची कल्पना गोपाळरावांच्या विद्यार्थ्यांवाचून इतरांस होणें कठिण!"

विचारजागृतीसाठीं वादविवाद, वादविवादासाठीं मताभिन्नता, मतभिन्नतेसाठीं मनमोकळेपणा अशी परंपरा लागणें क्रमप्राप्तच; व हीं सर्व आगरकरांच्या वर्गांत मूर्तिमंत होतीं. अर्थात् अदबी किंवा मर्यादा यांचा विचका उडत असे असा बिलकुल अर्थ नव्हे. पण मर्यादा राखून कां होईना, आगरकरांशीं विद्यार्थी इतक्या मोकळे-पणानें वागत कीं, एखादेवेळीं आगरकरांच्या घरगुती गोष्टीचीही चिकित्सा होई. जोगेश्वरीच्या देवळांत गोपाळरावांच्या कुटुंबांनीं सुवासिनींच्या ओट्या भरल्याबद्दल वेलणकर नांवाच्या विद्यार्थ्यानें आगरकरांशीं वर्गांत वाटाघाट केली, ती जशी तत्वान्वेषणाच्या कुतुहलानें, तसेंच गोपाळरावांनीं त्यांचें केलेलें शंकासमाधानही प्रेमळ कौतुकानेंच. " जिभेच्या तात्विक गर्जनेला हातानें प्रत्यक्ष ठेका धरला नाहीं, निदान पक्षीं पडसाद उठवला नाहीं, तर दातांना सावध असावें लागतें. " ही अर्थपूर्ण चिनी म्हण गोपाळरावांना प्रत्यक्ष ठाऊक होती कीं नाहीं, हरी जाणें! पण त्यांच्या वर्तनांत ती पुरी उतरली नव्हती असें कोण म्हणेल? असो.

वर्गांतील मनमोकळ्या विषयचर्चेचा साहाजिक परिणामच असा होई कीं रा. कृष्णाजी नारायण भणगे लिहितात, " मुलें त्यांच्याशीं थोरल्या भावाप्रमाणेंच बोलत. " गुरुशिष्यांमधील असल्या अत्युत्कट आपुलकीचा परिपाक मतमतांतराच्या आड येईल कशाला? " पांगारकर पेट्रिअट आहे, टिळकाईट आहे! " असें बजावून त्याला नादारी देण्याचें कारण नाहीं असा कोलाहल चालला असतां, " तो होतकरू उत्साही आहे " असा निर्वाळा देऊन पांगारकांस आगरकरांनीं नादारी दिली हें मत-भेदांनीं विरसलेल्या गुरुशिष्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

" एकयोक्त्या पुष्पवन्तौ दिवाकरनिशाकरौ. " हातच्या विषयाबरोबर भूगोल-खगोलांचें परिभ्रमण आगरकरांच्या वर्गांत चालें; त्यामुळें विद्यार्थ्यांस पुष्कळ माहिती मिळे व ती थोडक्या श्रमांत कशी पैदा करावी याची किल्लीही हातीं लागे. आगर-करांच्या असल्या 'व्यापक शिक्षा' पद्धतीचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारांत वकिलीसारख्या अगर संशोधनासारख्या चिकित्सक धंद्याला फार होत असेल यांत शंकाच नाहीं. पण या पुढल्या गोष्टी सोडून दिल्या तरी, प्रत्यक्ष वर्गांत ज्या अनेक विविध विषयावर चर्चा चालत त्यांत धर्म, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, मुलामुलींना एकत्र शिकवणें, जातिभेद हे विषय हटकून असायचेच! इंग्रजी झाल्यापासून रंग बदललेल्या काळाला अनुरूप हे विषय असल्याकारणानें विद्यार्थ्यांच्या अंगीं बहुश्रुतपणा जसा येई, तशीच गोपाळरावांच्या अंगीकृत कार्यालाही ती शिक्षणपद्धति पोषक होई. "राष्ट्रांची रचना शाळेंतलि वर्गांत होत असते" (Nations are built in their school rooms) उद्यांच्या राष्ट्रीय रहिवाशांची मनोभूमिका नांगरून, कुळवून, मेहनत मशागत करून विद्यार्थीदशेंतच निकोप राखली पाहिजे. किंबहुना राष्ट्रहितबुद्धीच्या वृक्षाचें बीजा-रोपण विद्यार्थी दशेंत जसें कसदार होतें तसें कोठेंच होत नाहीं. गोपाळराव आगर-करांना हें तत्व नितांत पटलेलें होतें म्हणूनच आपल्या मनोदयाप्रमाणें स्वदेशी नागरीक तयार करण्याकरितां नवीन व दमदार विचारांचे वारे ते वर्गांत सोडीत होते.

आगरकरांच्या शिक्षेचा तात्कालिक गुण म्हणजे बुद्धीची संचालना हा तर खराच, पण पुस्तकी ज्ञानाच्या दृष्टीनें केवळ गुडघाभर पाणी. तत्त्वज्ञानाचे पंडित म्हणून कॉलेजमध्यें शिकवायला लागल्यावर आगरकर म्हणजे हिंदी महासागर; पण इंग्रजी गद्यासारखा विषय शिकवावयाला लागले कीं उरमोडी नदीचा मासला ! स्त्रीशिक्षणावरील निबंध असोत नाहींतर मेकॉलेचीं व्याख्यानें असोत, त्यांतील वाक्यावाक्यागणिक आगरकरांच्या वाग्गंगेचा झोत असा कांहीं खवायचा कीं, बघत रहावें ! उभ्या वर्षांत मेकॉलेच्या व्याख्यानांचीं अकरा पानें आगरकरांनीं एकसाल शिकवलीं होतीं; मग रासेलसच्या "धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रेसारख्या एका वाक्यावर एक सबंध आठवडा खपला !!" तर नवल कसलें ? चांगल्या भरदार वाक्याला कमींत कमी पाव तास तरी इतर माहिती मिळावयाचीच, त्यांत अंतर पडावयाचें नाहीं. या सांगोवांगीच्या सराईत, परीक्षेचे पापड भाजून काढण्यापुरताच शाळेचा विटाळ करून घेणारांस मात्र चुळबुळ करावयाची पाळी येई. एरवी आगरकरांचा तास म्हणजे विद्यार्थ्यांना बौद्धिक मेजवानीच असे. तौलनिक पद्धतीनें शिकवण्यावर आणि अगदीं आपल्याकडील उदाहरणें देण्यावर त्यांचा भारी कटाक्ष. 'मानुषीकरणा' (Personification) ची व्याख्या समजावून सांगतांना अण्णासाहेब किर्लोस्करांचा 'अरसिक किति हा शेला' आगरकर ठेवणीचें उदाहरण म्हणून काढायला चुकायचे नाहींत. विष्णु मोरेश्वर महाजनींच्या हाताखालीं इंग्रजीचें मराठी भाषांतर करायला सरावलेले आगरकर, स्वतः भाषांतर शिकवतांना असें रंगत कीं, "मुळांतील आनंद" वेळेला द्विगुणित स्वादानें विद्यार्थ्यांस भाषांतरांत चाखावयास मिळे. गोपाळरावजी स्वतः रसिक असल्याकारणानें वर्गांत, वाचलेल्या वाङ्मयांतील उत्कृष्ट सृष्टिवर्णनें आणि काव्यगर्भ भाग विद्यार्थ्यांकडून ते मुखोद्गत करवीत. "कलकत्याच्या अंधारकोठडी" संबंधाचा मेकॉलेच्या निबंधांतील उतारा बहुतकरून वरील "पाठांत" असावयाचाच.

विद्यार्थ्यांनी, पटाईत नकलनविसाप्रमाणें, आपल्या निबंधांतून थोरामोठ्यांचे उतारे केलेले बरीक गोपाळरावजीस खपत नसत. उत्कृष्ट भाषा त्यांना आवडे, पण तीपेक्षांही उत्कृष्ट विचार त्यांना मोहून टाकीत. विचाराची हिरकणी असली आणि मग ती विद्यार्थ्यानें पितळी भाषेच्या आंगठीवर जरी बसवली असली तरी त्या विद्यार्थ्याची पाठ थोपटतांना आगरकरांस खंत वाटत नसे. शिकवण्याचें माध्यम इंग्रजीच असल्याकारणानें, 'तत्वज्ञानाचे विद्यार्थी' आगरकर जरा लांब आणि अवघड शब्द वर्गांत उच्चारीत; पण अशा बेतानें कीं संदर्भावरून त्या शब्दाचा अर्थ बहुशः विद्यार्थ्यांच्या गळीं उतरावा. वर, अत्युत्कट आपुलकीच्या भावनेनें विद्यार्थ्यांशीं आगरकर वागत असल्याकारणानें त्यांच्याजवळ लप्पंछप्पं अगर आत्मप्रतिष्ठा औषधापुरतीच असे. पुस्तकामध्यें कोरें पान घालून एखाद्या वेळीं कांहीं टिप्पण्या करण्याचा आगरकरांचा परिपाठ असे, आणि त्याबद्दल त्यांचे विद्यार्थी बुवा देशपांडे यांनीं विचारतांच गोपाळरावांनीं अगदीं खुल्या दिलानें सांगितलें कीं "मी, कांहीं ब्रह्मदेव नाहीं किंवा बृहस्पति नाहीं." पण एकपरीनें यांतही कांहीं विशेष वाटण्यासारखें नाहीं.

गोपाळरावांचा विनयशील मोकळेपणा इतक्या थराला गेला होता कीं, 'इंग्रजी'संबंधीं कांहीं शंका लागल्यास ते आंग्लभाषापटु वासुदेवरावजी केळकर यांच्याकडून फेडून घेत, आणि तसें केल्याबद्दल वर्गांत एखाद्या वेळीं चक्क बोलूनही दाखवीत. तत्रापि इंग्रजी भाषेचें व्याकरण आणि अलंकार शिकविण्याची आगरकरांची विशिष्टच पद्धत होती आणि साधारणपणें 'बेन' च्या अनुसंधानानेंच याबाबत आगरकर घोडे हांकीत.

व्याकरणासारखा—व त्यांतूनही संस्कृताच्या व्याकरणासारखा—विषय तयार करावयाचा म्हणजे स्वतःच्या विद्यार्थीदशेंत आगरकरांच्या जिवावर येई, त्याची पक्की जाणीव त्यांना होती. आणि पाठच करावयाचें तर लक्षांत रहावयास श्लोक चांगले हा स्वानुभव होता. तेव्हां व्याकरणीय कारिका ज्याच्या त्यास करावयास आगरकर सांगत असत. अर्थात—

> " सिमिली झाल्यावरती येते मेटाफर ती जाणा।
> त्यांवर परसोनिफिकेशन तो चवथाऽलेगरी बाणा ॥
> सिनेकडोकी । उपमा–अलंकारच कीं ॥ "

असले वा

> " अँटिथम् प्रथमं चैव, एपिग्रं तु द्वितीयकं ।
> तृतीयं हैपरबोलं च क्लायमॅक्सं तु चतुर्थकं ॥ "

असले 'हास्यरसोत्पादक' सांचे तयार होऊन पाठाबरोवर करमणूक होई. भरीला खुद्द आगरकरांच्या विनोदाचा फुलोराही फुलत असे. गोपाळरावांनीं एकदां Foot–ball हा शब्द उच्चारला असतां तो Food–ball असें वाटून पाटणकरांनीं त्याचा अर्थ "लाडू कीं पिंड ?" म्हणून विचारलें. त्यासरशीं आपण उच्चारलेला शब्द पुन्हां स्पष्ट उच्चारून समजाऊन सांगून आगरकरांनीं हंसत हंसत म्हटलें "सर्वत्रौदारिकस्याभ्यवहार्यमेव विषयः।" अशा तऱ्हेनें हंसतखेळत थट्टाविनोद करीत व गारोड्याच्या पोतडीप्रमाणें नवी नवी चीज दाखवीत, आगरकर हातचा विषय मुलांच्या इतक्या आटोक्यांत आणून सोडीत कीं तासाचा टोल पडल्याबरोबर "इतक्यांत तास कसा संपला" म्हणून विद्यार्थी आश्चर्य करीत. उत्तर रामचरित्रांतील 'अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत्' सारखा अनुभव आगरकरांच्या तासाला आल्याचें त्यांचे शिष्य सांगतात.

वरील हकिकतीवरून गोपाळराव आगरकर हे विद्यार्थ्यांशीं किती समरस झाले होते याची कांहींशी कल्पना येईल. पण या रसिक एकतानतेबरोबर एक दोषही पदरांत पडत असतो आणि तो म्हणजे अनियमितपणाचा! नाहीं म्हणावयास आरंभींच्या तासाला तेवढे आगरकर वर्गांत वेळेवर शिरावयाचे; पण पुढें शिकवावयाच्या विषयापासून दोरी सारी गुंडाळून ठेवलेली! तासाचा टोल पडल्यापासून

आगरकर एका वर्गातून दुसऱ्या वर्गांत पंधरा मिनिटांच्या आंत गेले तर सर्वांस नवल वाटे आणि यदाकदाचित् तासाचा टोल पडल्याबरोबर आगरकर उठलेच तर ' त्यांचें कांहीं तरी दुखत असावें अशी सर्वांस धास्ती वाटे. ' मुलांच्या चालीनें चालून आणि बोलून, " जें जें कांहीं आपणासि ठावें " तें तें शिकवतांना स्वतःच्या प्रकृतीचें भानही न उरणाऱ्या आगरकरांच्या आनंदस्वरूप अनियमितपणाचा त्रास विद्यार्थ्यांस चुकूनही वाटला नाहीं; पण शिस्तीला जिकीर होत असे यांत शंका नाहीं. नियमित वेळीं नियमित पाठ घेणाऱ्या वामनरावजी आपट्यांना आगरकरांच्या अनियमितपणाचा संसर्ग पोंचल्याबरोबर त्यांनीं आपला तास बदलून घेतला. आगरकरांचे असले कांहीं क्षुल्लक दोष किंवा त्यांचीं त्यावेळीं " क्रांतिकारक " वाटणारीं मतें कोणास आवडलीं नाहींत तरी " आगरकर फार आवडत " याचें बीज " मनष्य चुकला असला तरी प्रामाणिक होता " या तात्यासाहेब केळकरांच्या मीमांसेंत नसेल काय ?

" आपल्यावरून जग ओळखावें " या न्यायानें, दारिद्र्यवशात् जगाच्या दऱ्याखोऱ्यांतून मार्ग काढणाऱ्या आगरकरांनीं शिक्षकाच्या खुर्चीवर आसन मांडतांना स्वतःच्या तिघा गुरूंचें वळण आपल्यापुढें ठेवलें होतें असें दिसतें. रोंघे मास्तरांपासून हंसत खेळत व मजेंत शिकवण्याची कला आगरकरांनीं उचलली तर केरूनाना छत्र्यांपासून विद्यार्थ्यांस हरएक प्रकारची मदत करण्याची सहृदय उदारता त्यांनीं घेतली. महाजनि मास्तरांच्या वर्गांतील वाटाघाट, चिकित्सा व छानना यांचा स्वीकारही आगरकरांनीं केला होता. प्रत्येकापासून हंस-क्षीर न्यायानें लाभला तेवढा ' थोडा गुण ' कमवून आगरकरांनीं आपल्या शिक्षकत्वाची सजावट आपल्या परिस्थित्यनुरूप ध्येयाला धरून केली आणि त्यामुळें जे जे विद्यार्थी त्यांच्या हातांखालून जात, त्यांच्या मनावर आगरकरांची थोडीफार छाप बसल्याखेरीज रहात नसे. " हें खरें आहे, कीं इतर देशांत प्रतिभासंपन्न शिक्षकांची जितकी छाप त्यांच्या विद्यार्थ्यांवर बसलेली दृग्गोचर होते, तितकी आगरकरांची छाप बसली नाहीं. पण याचा दोष आगरकरांकडे नसून विद्या शिकण्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांकडेच होता. आमच्या देशांत बरेचसे विद्यार्थी पाश्चात्य विद्या शिकतात, पण ती निर्वाहाचें साधन म्हणून शिकतात; त्या विद्येचा चांगुलपणा किंवा खरेंपणा याकरितां ते शिकत नाहींत. अशा विद्यार्थ्यांची अर्थातच पोपटपंचीकडे प्रवृत्ति फार असते, व म्हणून शिक्षण किंवा ज्ञान हीं मनामध्यें बरोबर मुरून जात नाहींत. अशा पोपटपंची ज्ञानाचा विद्यार्थ्यांच्या दानतीवर, स्वभावावर किंवा मनोविकारांवर ( मनावर ) व्हावा तसा स्पष्ट व शुद्ध परिणाम होत नाहीं. शिवाय सर्व ज्ञान व विचार परकी भाषेंतून ग्रहण करावयाचे असल्यामुळें ते चांगले पचनी पडत नसतात. या विलक्षण परिस्थितीमुळेंच आगरकरांच्या मतांचा व विचारांचा पगडा शिष्यवर्गावर जितका पडावयास पाहिजे होता तितका पडत नसे, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. "

आगरकरांचे शिष्यप्रमुख श्री. गो. चि. भाटे वरील उताऱ्यांत म्हणतात त्याप्रमाणें पाश्चिमात्य प्रतिभासंपन्न शिक्षकांशीं तुलना करतांना आगरकर तोकडे पडत असले

तरी हातीं असलेला "कर्मण्येवाधिकार" ते एकनिष्ठपणें बजावीत होते हें तर झालेंच; पण शिवाय 'श्री' ची गांठ अगदीं नवीन तऱ्हेनें फोडतांना खडकावरील पेरणीचा अनुभव लिपिसुधारकांस आरंभीं न यावा तर काय व्हावें ? तथापि त्यायोगें आगरकरांचे अंतःकरणांत वसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बद्दलचे कळकळीला काय कमी पडणार ? शाळेचें व कॉलेजचें स्वरूप डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होण्यांत परिणत होऊन संस्था लोकांच्या डोळ्यांत भरण्यास वामनरावजी आपट्यांची टापटिपीची शिक्षणपद्धति बहुतांशीं कारण झाली यांत शंकाच नाहीं. पण अन्य तऱ्हेच्या सरबराईत आगरकरांचा हात प्रामुख्यानें असे हें विसरून चालणार नाहीं. शाळेच्या विद्यार्थीवसतिगृहाच्या किंवा सोसायटीच्याही व्यवस्थेचें तारूं न्या. मू. रानड्यांच्या पोक्त आणि वि. मो. महाजनींसारख्यांच्या अनुभाविक सल्ल्यानें हांकारण्याची दक्षता आगरकर बाळगीत. "नियंता सामान्यतः सर्व गुरूंना मार्गदर्शक होईल अशी त्यांची विद्वत्तेच्या, आचरणाच्या व स्वभावाच्या दृष्टीनें योग्यता असली पाहिजे. नियंत्याचें पद निर्ढावलेल्या विद्वानाला देणें रास्त आहे." हा महाजनींनीं आगरकरांस दिलेला सल्ला अमलांत आल्याची साक्ष खुद्द महाजनींनीं दिली आहे. आगरकरांचें आपल्या सहकारी बंधूवर कसें वजन असें ह्याचें हें आणि स्वतः आगरकरांची चढती वाढती पदवी हीं चांगलीं खात्रीलायक प्रमाणें आहेत. गोपाळरावजी आगरकर आरंभीं साधे शिक्षक म्हणून न्यू इंग्लिश स्कूलमध्यें काम करीत, मागाहून ते तेथेंच सुपरिंटेंडेंट झाले आणि फर्ग्यूसन कॉलेजमध्यें पंडित म्हणून काम बघत, ते आयुष्याच्या शेवटीं शेवटीं त्या कॉलेजचे प्रमुख झाले. गोपाळरावांच्या तेजाचें असें चीज त्यांचे सहकारी सादर कौतुकानें व प्रेमभावानें करीत याचें आणखी एक कारण म्हणजे सोसायटीवर आगरकरांचें मातृवत् प्रेम होतें हें होय.

अशा आगरकरांस भेटीला बोलावून श्रीमंत शिवाजीमहाराज होळकरांनीं तीनशें रुपये देऊं केले ( व तेही, आगरकर तसे घेणार नाहींत तेव्हां त्यांच्या व्याकरणाच्या कांहीं प्रती मोबदला घेऊन ) पण त्याबाबत वाद उपस्थित होतांच आगरकरांनीं पैसे सोसायटीला देऊन टाकले. एकपरीनें कोणास यांत विशेष नवल वाटणार नाहीं; पण पुढें श्रीमंतांनीं आगरकरांस पांचशें रुपयांची नोकरी देऊं केली असतांही आगरकरांनीं आपल्या सोसायटीवरील प्रेमामुळेंच श्रीमंतांना सविनय नकार दिला हें पाहून तरी गोपाळरावांस धन्यवाद दिल्याशिवाय कोणी राहणार नाहीं. सोसायटीवरील आगरकरांच्या प्रेमाचें पाणी भेदक बुद्धीच्या किलकिल्या नजरेंत भरण्यासाठीं एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं, प्रकृति कमालीची खालावली असतां, आणि आपण फार दिवस जगूं अशी खात्री नसतां प्राचार्य वामनरावजी आपट्यांचे मागें फर्ग्युसनच्या प्रमुखत्वाचें काम गोपाळराव आगरकरांनीं अंगावर घेतलें, इतकेंच नव्हें तर चतुःशृंगीकडील मैदानावर म्हणजे प्रस्तुतचे जागेंत फर्ग्युसन कॉलेज स्वतःचे मृत्यूपूर्वी सरासरीनें महिनाभरच अगोदर भरलेलें पाहून, गोपाळरावजी आगरकरांच्या नेत्रांतून कार्यसार्थक्याचे आनंदाश्रू आले. 'रचिला ज्याचा पाया त्याची भली उभारणि झाली'

असें उद्गारही त्यांनीं काढल्याचें सांगतात. अशा तऱ्हेनें आपल्या संस्थांचें कांहीं कमी पडूं न देण्यासाठीं आगरकर आईसमान झिजत होते; अर्थात् एखादेवेळीं, कळवळ्याचा जुळा भाऊ जो उतावळेपणा, त्याच्या आहारीं जाऊन आगरकर थोडे घसरतही. असला सुप्रसिद्ध प्रसंग म्हणजे ते १८८५ सालीं न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट असल्या वेळचा! वर्गवारीनें देखरेख करीत हिंडत असतां, एकदां एक शिक्षक चुकीचें शिकवित आहेत असें दिसल्यामुळें, आगरकरांनीं तेथल्या तेथें चुकीचें परिमार्जन केलें. निर्भ्रांत शुद्ध हेतूनेंच कां होईना, पण विद्यार्थ्यासमोर शिक्षकाचा पाणउतारा आपल्या हातून झाल्याचें कळून चुकल्याबरोबर आगरकरांनीं आपल्या हातांखालीं काम करणाऱ्या त्या शिक्षकाची प्रांजल मनानें क्षमा मागितली. वरिष्ठपणाच्या तोऱ्यांत न जातां, हातांखालच्या माणसाशीं आगरकर किती दिलसाफ वागत व त्यामुळेंच त्यांची छाप कशी बसे हें यावरून चांगलें पटतें. इतक्या तत्परतेनें शक्य तर माणसें राखण्याची काळजी वागविणाऱ्या आगरकरांच्या 'सामाजिक मतभिन्नतेचा' पल्लेदार परिणाम म्हणून कां असेना, टिळकांसारख्या मोहऱ्याला सोसायटी मुकली ही गोष्ट वाईट झाली; आणि तेवढ्यापुरता, यव–गुंज काय असेल तो दोष न्यायनिष्ठुरता आगरकरांच्या पदरांत बांधायला कमी करणार नाहीं.

सरळ बाजारभावांत माप घालायचें, म्हणजे टिळकांच्या राजिनाम्याबाबत आगरकरांचा हात धरतां येणार नाहीं असें व्यवहार सांगेल. तथापि असल्या बुद्धिवादाच्या खोल पाण्यांत शिरलें असतां, अभ्यासू मनाला पुष्कळ वेळां तारेवरचा नाच करण्याची पाळी येऊन त्रिशंकूची स्थिति प्राप्त होतें, हे लक्षांत घेऊन, आगरकरी शिक्षकत्वाचा साकल्यानें विचार केला तर खात्री पटेल कीं 'शिक्षक आगरकर' सर्वांचें आदरास पात्र होते. शिक्षकत्वाची खरी कसोटी शिष्यजनप्रेमावर लागत असते. त्या दृष्टीनें पाहतां, ह. भ. प. पांगारकर लिहितात—"इतका शिष्यजनप्रिय गुरू विरळाच सांपडेल." १८९५ सालीं त्यांचें देहावसन झालें. त्यावेळीं "त्यांचे प्रेतयात्रेला जमलेला विद्यार्थीसमूह आपला प्रेमळ बाप गेला असें समजून ढळढळा रडला." विद्यार्थ्यांच्या त्या प्रेमळ अश्रूंतच आगरकरांच्या शिक्षकत्वाची द्वारका विराजत नव्हती काय? वि. मो. महाजनींचीं पत्रें घेऊन आपल्या शिक्षणाची कांहीं सोय पुण्यांत लागते कीं काय हे पाहण्याकरितां आलेले व निराश होऊन गेलेले गोपाळरावजी आगरकर, आणि विद्यार्थ्यांच्या प्रेमळ हृदयसिंहासनावर आधिष्ठित झालेले, व पुण्याला 'विद्येचें माहेरघर' करण्यांत भाग घेणारे फर्ग्युसन कॉलेजचे प्रमुख आगरकर–अशीं दोन चित्रें डोळ्यापुढें आलीं म्हणजे वाळूच्या पायावरही कर्तबगारी कडेकोट कसा उभारते, तें पटतें. पोराला खांद्यावर टाकून माद्रिद शहरांत "ॐ भवति" म्हणून दारें पूजणारा कोलंबस 'अमेरिका शुद्धी'नंतर गौरवाच्या जिरेटोपाला लायक ठरला, त्याचीच पुनरावृत्ति जरा निराळ्या स्वरूपांत येथें झाली, म्हटलें तरी चालेल.

## प्रकरण ३ रें

# वक्ते आगरकर

लोकशिक्षणासाठीं आयुष्य-वेंच करावयाचा असा आगरकरांनीं संकल्प केल्या-बरोबर, पुढील पिढीच्या ऊर्फ मुलांच्या शिक्षणासाठीं ते पंतोजी बनले. तथापि लोक-शिक्षणाबाबत वक्तृत्वाचें नाणें मन मानेल तसें छिनतां येतें ही गोष्ट आगरकरांच्या डोळ्यापुढून गेली नव्हती. आपल्या इष्ट कार्याच्या चालनेस वक्तृत्वाची वाफ पुढें प्रसंगवशात् आगरकरांचे सहकारी लो. टिळक यांनीं कमालीची लावली देखील! पण आरंभीं तरी लोकशिक्षणार्थ वक्तृत्वाचा विडा न्यू स्कूलचे चालकांनीं उचलण्याचें ठरविलेलें आढळत नाहीं; अर्थात् गोपाळराव आगरकरही त्याला कोठून अपवाद असणार ?

शिवाय वक्तृत्व आगरकरांना शक्यही नव्हतें. विद्यार्थीदशेंत पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेकडून वक्तृत्वाबद्दल पट्टीचीं बक्षिसें मिळवून आपल्या उच्च शिक्षणाची तरतूद करणाऱ्या आगरकरांना वक्तृत्व शक्य नव्हतें असें म्हणणें म्हणजे फुलणाऱ्या झाडाला पान नाहीं असें म्हणण्यापैकींच ! परंतु दुर्दैवाची गोष्ट इतकीच कीं, आगर-करांचें अभिजात वक्तृत्व अनुवंशिक दम्यानें वठलें होतें. त्यामुळें मनांत असून व मनांत आलें तेव्हां गोपाळरावांना आपल्या या पुराण-कीर्तनकार वाडिलार्जित देणगीचा सढळ हातानें उपयोग करतां आला नाहीं. पंधरा वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत गोपाळरावांनीं बोटांवर मोजण्या इतकींच भाषणें केलीं, पण विद्यार्थी दशेंतीलही छाप नव्हती असे त्यांचे विद्यागुरु महाजनी यांनीं अनुभवानें सांगितलें आहे.

प्रसंगाला साजेसा बावटा फडकविण्याची कला त्यांचें वक्तृत्व विसरलें होतें असें मात्र यत्किंचित् समजण्याचें कारण नाहीं. संमतिवयाच्या बिलाच्या रणकंदनाच्या वेळीं पुणेरी क्रीडाभुवनांत भरलेल्या शंभर सुधारकांच्या सभेची वाताहत करण्याच्या हेतूनें 'शेजारील कौलांवर शेण, विटांचे तुकडे वगैरे आयुधानिशीं सज्ज झालेल्या पुराणमताभिमानी वीरांचे जमाव' पाहून स्वतःला थोडी दुखापत झाली असतांही आगरकरांनीं ठणकाविलें कीं, "शाबास ! वीरांनो शाबास !! तुम्ही केवळ चालतीं-बोलतीं प्रेतें आहां, असें मला वाटत होतें; पण तुमच्या या आजच्या सज्जतेवरून तुम्हांला मन आहे, तुम्हांला रागद्वेषादि मनोविकार आहेत, हें उत्तमप्रकारें सिद्ध होतें. आणि आतां आमच्या या हतभागी देशाचा अभ्युदयकाल फार दूर नाहीं, अशी मला आशा वाटूं लागते."

प्रासंगिक म्हणून वरील भाषणावर अक्षद टाकली तरी डोंगरीचा एकशेंएक दिवस सरकारी पाहुणचार चापून आल्याबरोबर उमरावतीचे वाचनालयांत झालेलें गोपाळरावांचें भाषण लक्ष खेंचतेंच. "दोन राष्ट्रांच्या संघट्टणाचे परिणाम"

( ' हिंदुस्थानपासून इंग्लंडास फायदे ' केसरी वर्ष १ अंक २८ ) या विषयावर विचारपरिप्लुत भाषण करतांना जगाच्या इतिहासांतील हृदयंगम दाखले देऊन, जित-राष्ट्रापेक्षां जेतृराष्ट्र कमी, अधिक अगर तितकेंच सुधारलेलें असतां कसकसे फेर-परिणाम होत जातात यांचें मुद्देसूद विवेचन आगरकरांनीं केलें होतें. तथापि दम्याच्या प्रभावामुळें, ग्रीष्मऋतूंतील ओहोळाइतकेंच वागीश्वर आगरकरांचें वक्तृत्व सामान्य माणसास मनोहर वाटलें.

हें कांहीं असलें तरी आगरकरांच्या एरवीच्या भाषणापासूनसुद्धां ऐकणारास बहुश्रुतता प्राप्त होत असे; मग व्याख्यानापासून होत असेल हें काय सांगावयास हवें? आगरकरांनीं वक्तृत्वाचा कोठें अभ्यास केल्याचें ऐकिवांत नाहीं. किंबहुना त्यांच्यावेळीं तशीं साधनेंही उपलब्ध नव्हतीं. परंतु श्रोत्यांना आकर्षून बोलण्याची लकब जी आगरकरांना साधली होती ती गणुआप्पांचें म्हणजे स्वतांच्या वडिलांचें आगरकरांना 'देणें' होतें. गणुआप्पा पोथी सांगत असत तेव्हां गोपाळराव नियमानें ऐकत असत असें नव्हे; पण लहानपणीं अधून मधून जो योग आला त्यानें परिणाम केल्याशिवाय सोडला नाहीं. अर्थात श्रोत्यांच्या वृत्तीची ठेवण नजरेसरशीं ओळखून, त्यांच्या बुद्धीला हलवीत हलवीत हृदयाला हात घालून आपला प्रतिपाद्य विषय, तद्विषयक आपल्या माहितगारीसह श्रोत्यांचे मनांवर ठसविण्यासाठीं आवाजाचा चढउतार, मुद्रादर्शन वगैरे अभिजात वक्तृत्वास लागणारे गुण आगरकरांनीं प्रसंगाप्रसंगानें वाढविले होते. कऱ्हाडास नागपूरकर मुन्सिफांचे समोर दर आठवड्यास एकाद्या विषयांवर निबंध लिहून आणून विद्यार्थी वाचीत आणि बक्षीस मिळवीत. गोपाळराव या साप्ताहिक चढाओढींत जरूर भाग घेत आणि वक्तृत्वपूर्ण लेखन व शुद्धलेखनपूर्वक वक्तृत्व यांच्या पुस्त्या लहानपणीं आगरकरांनीं पुष्कळच काढल्या म्हटलें तरी चालेल. त्या पुस्त्यामुळें येणाऱ्या आत्मविश्वासावर धर धरणारें वक्तृत्व आपल्या स्वयंपूर्ण वाढीनें आगरकरांचें, महाराष्ट्राचें आणि मराठी भाषेचें नांव करतांना राहतें ना. पण—पण " लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः ! "

## प्रकरण ४ थें

# संपादक आगरकर

" In my judgment, it is a crime to let things go in default "

--L. Lajpat Rai.

" When once thou hast conceived and determined thy mission within thy soul let naught arrest thy steps. Fulfil it with all thy strength, fulfil it whether strengthend by others or in the sad solitude that almost always surrounds the martyrs of thought.

The path is clear before us, we are cowards unfaithful to our future if in spite of sorrows and delusions we do not persue it to the end."

*Mazini*

आपली आपण लोकशिक्षणाची सुपारी घेऊन एम्. ए. झाल्याबरोबर गोपाळराव आगरकर न्यू इंग्लिश स्कूलमध्यें जेठा मारून बसले, पण शाळा झाली तरी लोकशिक्षणाचें एक अंग होतें; दसरा–दिवाळीचा आनंद भोगण्यासाठीं मृगावरची पेरणी अगर आक्रोडाची लावणीही म्हणतां येईल. चालू घटकेला त्याला शिक्षकत्वाचा उपयोग क्वचितच होतो. तेव्हां चालू घटकेला काय करावयाचें ? हा प्रश्न कळकळ सारखी टाकीत होती. " जाते घडी ही अपुली साधा " असा टाहो अंतःस्फूर्ति सारखा फोडीत होती. तेव्हां "पोरां' ना शिकवायला शाळा, तसें "थोरां"ना वृत्तपत्र काढण्याचें न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनीं ठरविलें.

लोकशिक्षणास वाहिलेले आगरकर 'केसरी'च्या खुर्चीवर बसले ते आपलें निबंधलेखनाचें पटाईत कलम हातीं घेऊन बसले. "त्यावेळीं लोकशिक्षणाचा प्रसार फारसा नव्हता, व सामाजिक, औद्योगिक वगैरे अनेक महत्वाच्या बाबींसंबंधानें सामान्य जनतेचें ज्ञान अगदीं अल्प होतें. लोकांच्या बौद्धिक उन्नतीची अशी अवस्था असल्यामुळें ज्वालामुखीपर्वत, तंबाखू, पाऊस वगैरे किरकोळ विषयांवरही आगरकरांनीं लेख लिहिले आहेत. " पण ' केसरी–किशोर ' जसजसा एक एक आठवडा आक्रमूं लागला, तसतशी ' रोकडी प्रबोधशक्ति ' त्यांत संचरूं लागली. उपहार–गृहाप्रमाणेंच वृत्तपत्राची चलतीही गरमागरम मालमसाल्यावर अवलंबून असते. तो पुरविण्याचें सत्र आगरकरांनीं सुरूं केलें. लोकांच्या अंतःकरणांत ठाव घेणारे लिखाण निबंधमालेच्या मागें ' केसरी ' नेंच महाराष्ट्राला पुरविलें. त्यायोगें ' केसरी ' हळू हळू लोकादरास पात्र होत चालला. आणि ज्यावेळीं अन्यायावर तुटून पडण्यासाठीं केसरीनें आपली आयाळ झाडली व करवीरकर छत्रपतींची कड घेऊन केसरी ' बर्वे प्रकरणाच्या जाळ्यांत ' कमकुवत वाटाड्यांच्या भीरूपणामुळें सांपडला, त्यावेळीं

केसरीच्या सदर्प गर्जनेबद्दल महाराष्ट्राला जिव्हाळ्याचा कळवळा आला आणि केसरीवरील संकट हें महाराष्ट्राला स्वतांवरील संकट वाटलें.

महाराष्ट्राशीं इतका एकदिल झालेला केसरी जेथें जेथें अन्यायाचा वास येईल तेथें तेथें ' उत्साही झडप ' घालण्यास कसा टपलेला असे ! अन्यायिताची कड घेऊन लढण्याची परंपरा निबंधमालेपासून केसरीनें उचलली होती. तिनें अन्यायाचें परिमार्जन व्हावयाचेंच हा कांहीं सिद्धांत नव्हे; पण " कर्मण्येवाधिकारस्ते " हें समाधान कांहीं कमी नाहीं. शिवाय निष्णात धन्वन्तरी भेटावयास दुखणें वेशीवर टांगावयास नको काय ? " पत्रकर्त्यांच्या हातून दुसरें कांहीं न झालें तरी नुसती तोंडपाटिलकी करण्यास तर हरकत नाहीं ! वर्तमानपत्रें हीं लोकांचे कोतवाल होत, असें कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर नेहमीं म्हणत असत. या कोतवालांनीं सर्वत्र गस्त घालीत असावें, आणि कोठें जुलमाचा, अन्यायाचा, अडचणीचा किंवा त्रासाचा प्रकार दिसून आल्यास लोकांच्या, सरकारच्या आणि विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेस आणावा आणि त्यास मोठमोठ्यानें हाका मारून जागें करावें व सावध राहण्याविषयीं इशारा द्यावा हें त्यांचें काम आहे. हें काम त्यांचेकडून नीट होत गेल्यास, जरी कोणतीही अवश्य सुधारणा त्यांस आपण होऊन एकदम करतां आली नाहीं, तरी कालगतीनें परंपरया त्यांस ती घडवून आणतां येईल यांत शंका नाहीं. कारण, कोणतीही क्रिया करण्यास उद्युक्त होण्यापूर्वी, ती करण्याविषयीं मनांत दृढ इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. ही इच्छा सरकारच्या, लोकांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या मनांत उत्पन्न करणें, हें बऱ्याच अंशीं पत्रकर्त्यांस साधण्यासारखें काम आहे. "

वास्तविक विचार करतां, वर्तमानपत्रांची कर्तव्यमर्यादा एवढ्यांतच कोठें संपते? इंग्लंडसारख्या राजवटींत वृत्तपत्रांना आज अग्रहार प्राप्त झाला आहे तो त्यांच्या नुसत्या विवेकी कोतवालीमुळें नव्हे ! उपस्थित प्रश्नासंबंधी कांहीं इतिहास असल्यास तो आजीबाईच्या पोक्तपणानें साभिप्राय सांगण्याचें काम वृत्तपत्रांस करावें लागतें; प्रचलित लोकमत सदोष असल्यास त्यास प्रेमळ पण शिष्यहिततत्परगुरूच्या रागीटपणानें निर्दोष करावें लागतें; अभिनंदनीय जनप्रवृत्तिचें कोडकौतुक आईच्या वात्सल्यानें करावयाचें असतें; निराशा आणि निरुत्साह यांची हुरेवडी उडवून आशा, आकांक्षा, आणि उत्साह यांचा तजेलदार संचार मैत्रीच्या प्रोत्साहनानें वृत्तपत्रांत करणें भाग पडतें; आणि इंद्रधनुष्याप्रमाणें बहुरंगी असलेलें हें काम कधीं तुटून पडून तर कधीं लगट करून, कधीं रुसून फुगून तर कधीं कुरवाळून, कधीं रंजनानें तर कधीं तुसटपणानें, कधीं मवाळीनें तर कधीं टवाळीनें वृत्तपत्रें बजावित असतात. " दुकानदाराप्रमाणें आपल्यापाशीं असतील त्या चिजा गिऱ्हाईकापुढें मांडून ठेवणें हें पत्रकर्त्याचें काम आहे ! " " ज्ञानावीण जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा " या समर्थोक्तीप्रमाणें ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें पुढें येईल त्या विषयासंबंधीं ' सज्ञान जागृति ' उत्पन्न करणें वृत्तपत्रांस कर्तव्य होतें. इतकेंच नव्हे तर " सर्व मोठेपणाचा पाया शहाणपणा होय " हें जाणून कित्येक प्रसंगीं लोकांच्या डोळ्यावर अनपेक्षीत विषयसुद्धां

आणावे लागतात. " ज्याप्रमाणें अनेक वस्तूंनीं शृंगारलेल्या ताटांतील प्रत्येक वस्तु प्रत्येक जेवणारास आवडणें अशक्य आहे, त्याप्रमाणें या पत्ररूपी ताटांत वाढलेल्या साऱ्या वस्तु प्रत्येकास आवडणें हेंही अशक्य आहे. तेव्हां दुकानदाराप्रमाणें किंवा मेजवानी देणाऱ्या मालकाप्रमाणें सर्व वस्तु पुढें कराव्या आणि गिऱ्हाइकास किंवा जेवणारास त्या कशा काय रुचतात हें उत्कंठेनें पहात बसावें, हेंच पत्रकर्त्यास योग्य आहे. "

याचा अर्थ असा नव्हे कीं पत्रकर्त्यानें खुषमष्करी करावी ! राष्ट्राची उन्नति, सार्वजनिक कल्याण, मानवी सुधारणा, असले कांहीं तरी ध्येय डोळ्यापुढें ठेवून वृत्त-पत्रानें आपले ' डेरे दिलेले असतात. ' अर्थात् " कोणी केवढाही पराक्रमी झाला तरी त्याला त्याच्या पराक्रमाचा फाजील गर्व होऊं नये, म्हणून सृष्टिकर्त्यानें प्रत्येकांत एकेक गोम ठेवून दिलेली आहे " हें जाणून, विशिष्ट तत्त्वांवर ठिया देणें वृत्तपत्रास भाग असतें. लोककल्याणाच्या कळवळ्यानें तत्त्वनिष्ठा दाखवीत असलेली दिशा वृत्तपत्रानें पतकरली म्हणजे विचारी लोक डोक्यावर घेऊन नाचले नाहींत तरी त्याचा ' अना-दर ' करीत नाहींत; मग तें पत्र प्रचलित लोकमताविरुद्ध केवढाही टाहो फोडो ! रंगभूमीवरील पात्राप्रमाणें वृत्तपत्रासही लोकपसंतीचें पारितोषिक हवें असतें, नाहीं असें नाहीं. पण तेवढ्यासाठीं सुरांत सूर मिसळून लोकछंदानुवर्तित्व केलेंच पाहिजे असा सिद्धांत नाहीं. " साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें लोकांची पर्वा न करतां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें. " कारण " लोकमत लहरी असतें; लोकमता-च्या गणितशास्त्रांत दोन आणि दोन चारच होतात असें नाहीं ! तें कधीं तीनही होतात व कधीं पांचही होतात; परंतु तें लहरी असतें म्हणून त्याचा तिरस्कार करतां येत नाहीं. तें सुधारण्याविषयीं धिमेपणानें प्रयत्न केला पाहिजे. "

म्हणजे ' ऊठ सोट्या, बैस पाटींत ' असेंही करावयाचें नाहीं. तत्त्वनिष्ठा जो प्रामाणिक सल्ला देईल तोच आचरला पाहिजे. फुकट्या प्रतिष्ठेचा उल्लूपणा किंवा ओढाळ ओरड यांपासून लोककल्याणेच्छूनें अलिप्त राहिले पाहिजे.

" ज्या प्रश्नाविषयीं विरोध नाहीं त्या विषयीं तो आहे असें बुद्ध्याच प्रतिपादणें, व ज्या विषयीं एक मत नाहीं त्या विषयीं तें आहे असें दाखविणें, या दोन्हीही गोष्टी अप्रामाणिकत्त्वदर्शक आहेत. वर्तमानपत्र काढण्यांत चरितार्थासाठीं कांहीं तरी धंदा चालवितां यावा येवढाच ज्यांचा हेतु असेल त्यांशिवाय इतरांच्या हातून वरच्यासारखें अप्रामाणिकपणाचें वर्तन सहसा होणार नाहीं. तात्पर्य बहुजनाच्या कळवळ्यानें स्वार्थ-निरपेक्ष तत्त्वावर वृत्तपत्रानें आपला संचार चालविला पाहिजे; म्हणजे मतमतांतराचीं तत्त्वनिष्ठ वांगीं संपादकीय पुराणांतच राहिलीं तरी आपल्या अनुषंगिक वैभवानें वृत्त-पत्रानें आपल्याकडे जनता आकर्षून घेतली पाहिजे.

वर थोडक्यांत वर्णिलेल्या वृत्तपत्राचा विराट संसार चालावयास पहिली-वहिली मर्यादा पैशाची पडते. ती दोन तऱ्हांनीं. संपादकीय भांडवल ज्यामानानें जबरदस्त, त्यामानानें वृत्तपत्राचा आकार आणि आकर्षकपणा वाढवितां येतो; उलटपक्षीं, वृत्तपत्रें

लोकांनीं वाचण्यासाठीं लिहिलीं असल्याकारणानें लोकांच्या सांपत्तिक मगदुराला झेपेल अशीच त्यांची किंमतही हवी. शक्य तितक्या सुंदर सजावटीनें, साधेल तेवढ्या थोड्या किंमतींत, जास्तींत जास्त वाचकांच्या नजरसेवेस तत्पर राहणें वृत्तपत्रास क्रमप्राप्त होत असतें. त्यासाठीं अनेक खटपटी कराव्या लागतात. जाहिराती लावून, हस्तपत्रकें वाटून, नमुन्याचे अंक धाडून, वेळप्रसंगीं व्याख्यानें देऊन आणि समक्ष भेटून लोकांना आपल्या पत्राबद्दल गोडी उत्पन्न करावयाची असते, याच्यावरच म्हणजे वृत्तपत्राच्या प्रसारावरच बहुतांशीं अवलंबून असलेला अचूक पैसा देणारा उपाय म्हणजे पत्रांत प्रसिद्ध होण्यासाठीं जाहिराती मिळविणें. एतावता वृत्तपत्राच्या संपादनाला जाहिरातीचें शास्त्र म्हणजे हाताचा टाक पाहिजे, येवढें सांगितलें म्हणजे, वृत्तपत्रावरील हे अनुषंगिक पुराण येथेंच आवरावयास हरकत नाहीं.

तथापि शिक्षणक्रमाच्या बाशिंगबळावर लोकशिक्षणाचें कंकण बांधलेल्या आगरकरांची संपादकीय दृष्टी, तरारलेल्या लेखणीच्या टवटवीत भरदारपणापुरतीच केसरीच्या जन्म वेळीं असेल! या विधानाला थोडासा आधारही आहे. श्री. आप्पाजी विष्णु कुलकर्णी एके ठिकाणीं लिहितात—

"केसरी काढण्याची कल्पना त्यावेळीं न्यू स्कूलचे जे प्रवर्तक होते त्या सर्वांची असली तरी त्यांत मुख्य भर कै. आगरकर व कै. नामजोशी यांची होती......आगरकरांना लिहिण्याची हौस असल्यामुळें वर्तमानपत्र काढून कांहीं तरी देशसेवा करावी असें त्यांच्या मनानें घेतलें, व नामजोशी हे पूर्वीं "किरण" पत्र चालवीतच होते व वर्तमानपत्राच्या कामांत पूर्वींपासूनच ते मुरलेले होते."

नामजोशांच्या टिपेनें कां होईना, न्यू स्कूलच्या चालकांनीं केसरी व मराठा, हीं पत्रें काढण्याचें ठरविल्यावर, त्याचा 'श्रीमन्महागणाधिपतये नमः' केला तोच धडाडीनें केला. १८८० च्या दसऱ्यास टिळक, आगरकर चिपळूणकर वगैरे सहा–जणांच्या सहीनीं केसरीची जी उद्देशपत्रिका प्रसिद्ध झाली तींत संपादकीय धोरणाचा नाद खालीलप्रमाणें उमटला आहे:—

"या पत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचे तें केवळ निःपक्षपात बुद्धीनें व आम्हांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृतसंकल्प आहे. अलीकडे बादशाही अमलाच्या सुरवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होय, हें कोणीही मनुष्य प्रांजलपणें कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेवलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें."

आणि मागें एके ठिकाणीं उल्लेखिल्याप्रमाणें आरंभीं आरंभीं कांहीं किरकोळ विषयावर लिखाण येत असलें तरी, एकंदरीनें विचार करतां, सदर उद्देशपत्रिकेंत म्हटल्याप्रमाणें—

"केसरींत आरंभापासूनच राजकीय प्रकरणें, व्यापारासंबंधीं माहिती, लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका, विलायतेंतील राज्यप्रकरणांची वाटाघाट' वगैरे विषय

येऊं लागले; व आगरकर यांना लिहिण्याची विशेष हौस असल्यामुळें त्यांच्या लेखां–चाच त्यांत जास्त समावेश होऊं लागला. देशी भाषेंतील ग्रंथ किंवा वाङ्मयात्मक चर्चा यासंबंधीं कै. चिपळूणकर यांनीं १८८१ च्या केसरींत म्हणजे पहिल्या वर्षाच्या अंकांत बरेच लेख लिहिले आहेत व स्थानिक सभा किंवा चळवळी यांवरही यांनीं मधून मधून मार्मिक टीका केली आहे. आगरकर हे राजकीय, सामाजिक, धार्मिक, वाङ्मयात्मक अशा अनेक विषयांवर लेख लिहित असत. विष्णूशास्त्री चिपळूणकर हे केसरी निघाल्यावर सव्वा वर्षाच्या आंतच वारल्यामुळें त्यांच्या लेखांस केसरी आंचवला ! तरी आगरकर व टिळक यांनीं लेख लिहिण्याचें काम सुरू ठेवलें व पुढें प्रो० गोळे, आपटे, केळकर, नामजोशी, भानू यांनीं मधून मधून केसरीस हातीं धरल्यामुळें या विद्वान व बुद्धिमान माणसांच्या हातून केसरीचा पाया भरभक्कम करण्यांत चांगलीच मदत झाली. केसरी सुरू झाल्यापासून त्यांत कोणत्याही विषयाचे भार–दस्त रीतीनेंच विवेचन होऊं लागलें. क्वचित् प्रसंगीं एखाद्या लेखकानें विनोदाचा आश्रय केला तरी विषयाचें महत्त्व किंवा स्वारस्य वाचकांच्या मनांत चांगल्या रीतीनें बिंबेल अशा रीतीचीच त्याची योजना असे." याहीउप्पर रा. सीतारामपंत देवधरांसारख्या त्रयस्थ माणसांचे विचारपरिप्लुत लेख आगरकरांनीं अग्रलेखाचे जागीं प्रसिद्ध केले व त्यायोगेंही केसरीची सर्वांगीण व दूरदृष्टि व्यापकता त्यावेळीं प्रत्ययास आणली.

केसरीच्या जन्मकाळीं खुद्द पुण्यांत ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षु, पुणेंवैभव व शिवाजी अशीं चार मराठी वृत्तपत्रें चालू होतीं, पण त्यांची वर्गणी दोन रुपयांपेक्षां जास्त आणि शिवाय केसरीचा पीळदार वक्रूत्र नव्हता ! 'चांगल्या लोकांनीं चालविलेलें केसरीइतकें स्वस्त वर्तमानपत्र केसरीच !' त्यामुळें व केसरीच्या एकंदर धोरणामुळें "त्याला भराभर वर्गणीदार मिळून त्यांची संख्या दोन वर्षांच्या आंतच एक हजारा-वर आली व हळूं हळूं ती सारखी वाढत चालली." केसरीची ही वाढती लोकप्रियता आगरकर पहिल्या पानावर "अग्रभागीं मोठ्या टाइपांत" छापीत. असें करण्यांत आगरकरांचा आत्मप्रत्ययात्मक अभिमान होता यांत शंकाच नाहीं; पण सद्यःकालीन जाहिरातीच्या जगांत जनतेचें लक्ष आपल्या पत्राकडे वेधून घेण्याचा तो एक मार्ग होता.

अशा तऱ्हेनें न्हाऊं माखूं घालून, जिवाच्या जपणुकीनें संगोपिलेला केसरी १८८७ सालापर्यंत आगरकरांच्या करवीं उत्तम प्रकारें वाढला. नुसता वाढला, इतकेंच नव्हे, तर लोकांच्या डोळ्यांत असा भरला कीं १८८७ सालीं केसरीचा खप ४७०० वर गेला, आणि केसरी 'सर्वत्र प्रसिद्ध' झाला. पण या सालच्या आक्टोबर १८ नंतर केसरी आगरकरांकडे राहिला नाहीं ! निरलस तल्लीनतेनें आगरकर केसरीसाठीं झटत होते खरे, पण त्या दोघांच्या वियोगाची हंडी प्रारंभापासूनच शिजत होती ! लोकशिक्षणाचें ध्यान लागून सहकार्यासाठीं हातांत हात घालणाऱ्या महाभागांचीं पावलें सगळ्याच वेळां एकसारखीं पडलीं नाहींत, तरी शिस्त सुटून चालत नाहीं.

शिस्त सुटून पावलांच्या तिरकसपणाचा कोन वाढतां वाढतां १८० अंशावर गेला कीं कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत उरत नाहीं.

तथापि वेळ पडेल तशी होणारी हमरीतुमरी सद्हेतुप्रेरीत असल्याकारणानें सिद्ध-साधक संवादाप्रमाणें लोकांस कल्याणकारकच ठरते. हेंच योगदर्शन आगरकरांच्या केसरीवियोगांत आहे. प्रत्येक विषयाचें विवेचन निःपक्षपात बुद्धीनें व जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें आणि बादशाही अमलापासून वाढत चाललेल्या तोंड-पुजेपणाच्या अश्लाघ्य प्रकाराला आळा घालावयाचा असा उद्देश केसरीच्या सलामीसच जाहिर झाला होता. पण त्याची व्याप्ति व कक्षा केसरी–चालकांच्यामध्यें स्पष्ट झाली नव्हती. वास्तविक वृत्तपत्राचा संपादक ही अमूर्त व्यक्ति असते. पत्राच्या रकान्यांत नमूद झालेल्या प्रत्येक मतामजकुराची कायदेशीर जबाबदारी संपादक म्हणून नांव असलेल्या मूर्त व्यक्तीवर असतेच असते; तथापि नैतिकदृष्ट्या 'संपादन मंडळाचा प्रमुख प्रतिनिधी' इतक्यापुरतीच त्या मूर्तव्यक्तीवर वृत्तपत्रीय मतांची जबाबदारी पडत असते. अर्थात हे शास्त्र आणि व्यवहार यांच्या पेठेंतील बाजारभाव झाले. याबद्दल आगाऊच स्पष्ट खुलासा केसरीच्या चालकांत झाला असता तर बरे झाले असते! पण उत्साहाच्या पाहिल्या सलामीला पुढें कोठल्या खडकाशीं गांठ आहे हें कळतें तर मतमतांतरांचे भोंवरे कोठून होते? वृत्तपत्रीय संपादकत्वाबद्दलची लोकनजर विवेकसेवक आगरकरांस बिलकुल पसंत नव्हती. अंतः-करण आणि प्रवचन यांत गुलाबी आणि भगव्या रंगाइतकी तफावत दाखविणें आगर-करांच्या सत्यानिष्ठ मनास मंजूर नव्हतें. अर्थात लोकशिक्षणार्थ वृत्तपत्रांत जी लेखमांडणी असावयाची ती संपादकीय सदराखालीं असतां आपल्या मतास सोडून असतां कामा नये असा आगरकरांचा कटाक्ष होता. त्यामुळें खुद्द विष्णुशास्त्री चिपळोणकरांच्या लेखांतही एकदां आगरकरांनीं कांहीं फिरवाफिरव केली! अर्थातच त्यावर शास्त्रीबोवा रागावले! असें होणें साहाजिक होतें. आगरकरांस स्वमताचा अभिमान होता आणि शास्त्रीबोवांस तो काय नव्हता? अर्थात् जी गत चिपळूणकर–आगरकरांची तीच टिळकादि इतर मंडळींची. विषयविशिष्ट वैयाक्तिक मतांचा खल करून जेवढी एकतानता हातीं लागेल तेवढ्यापुरताच त्या विषयाचा वृत्तपत्रीय योगक्षेम संपादक व्यक्तीनें चालवावयाचा असा शिरस्ता होता, तर स्वतंत्र बुद्धिमत्तेची हेळसांड होऊन राहती! पण ती होऊं नये म्हणून सहकार्यासाठीं हातांत हात घातल्यानें बोटचेपीची अगर कोपरदाबीची पाळी! स्वाभिमानाला ती कोठून सहन व्हावयाला?

संपादकीय मतांची जबाबदारी मूर्त कीं, अमूर्त हा जसा एक तसाच दुसरा प्रश्न लोकाश्रयाचा! वृत्तपत्रांचा योगक्षेम लोकाश्रयावर! तेव्हां, "साच आणि मवाळ। मित आणि रसाळ ॥" अशा अमृतोपम शब्दांनीं लोकशिक्षण चालवावें आणि जेथें आपल्या आश्रयदात्यांच्या मनास दुखविण्याचा प्रश्न नसेल तेथें सुरीसारखें तीक्ष्ण असावयास हरकत नाहीं; असा मनाचा कल सहजच होणार नाहीं काय? पण याही बाबत आगरकरांचें मन सामान्य प्रवृत्तीविरुद्ध होतें. "रांजी राखणें सकल लोक।

कठिण आहे. " इतकेंच नव्हे, तर " लोक हा ओक, धरितां धरवेना। " असा अनुभव असल्याकारणानें ' टाकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल व तीं वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोंपर्यंत ' आपलें विवेकस्पष्ट कर्तव्य संपादकानें करीत रहावें असा आगरकरांचा बाणा होता.

रेमॉंट यानें म्हटल्याप्रमाणें:— An intelligent member of his community, sharing in its ideals and aspirations, proud of its past, actively interested in its present, and hopeful of its future. " समाजाचीं ध्येयें आणि महत्वाकांक्षा यांत समरस झालेला, त्याच्या सद्यःस्थितिबद्दल सक्रीय कळकळ बाळगणारा आणि त्याच्या भविष्याची आशा धरून बसणारा असा जागत्या बुद्धिचा घटक " मनुष्यास बनविणें हें लोकशिक्षणाचें प्रधान अंग होय. तें सर्वांसच पाहिजे होतें; इतकेंच काय, पण भूतकाळचा अभिमान म्हणजे भूतकालीन चांगल्या गोष्टींचाच तेवढा अभिमान हें प्रत्येकजणास मान्य होतें. पण बादशाही अंमलापासून बोकाळलेल्या तोंडपूजेपणावर कोरडे ओढावयाचे म्हणजे " अधिकारमदानें बेफाम होऊन नानाप्रकारें लोकांस पीडा देणारे किंवा स्वोन्नतीसाठीं श्वानाप्रमाणें श्रेष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचे हात-पाय चाटणारे आमच्यांतील मोठमोठ्या हुद्यावरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हापापलेले विद्वान् " यांनाच तेवढें वेठीला धरावयाचें, आणि स्वतां तोंडपूजेपणा करून लोकांना त्यांच्या एखाद्या " कालविपर्यस्त " चालीबद्दलही इषारा द्यावयाचा नाहीं, हें आगरकरांस प्रशस्त वाटत नसे. राजाप्रमाणेंच " प्रजानुरंजन " हें वृत्तपत्राचें काम आहे खरें, पण तें ' राजदण्डा ' च्या न्यायनिष्ठुरतेनेंच करावें लागतें. पारतंत्र्यांत सांपडलेल्या आपल्या देशांतील लोकांस ' शिक्षण,' देतांना केसरीला आपल्या नांवाप्रमाणें जी गर्जना करावयाची ती एखाद्या तालमीच्या वस्तादाप्रमाणें करावयास पाहिजे, अशी आगरकरांची भावना होती. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या झगड्यांत परकीय नोकरशाहीशीं झगडा करतांना वेळ प्रसंगीं तिखट बोलूनही लोकपक्षाला तयार राखले पाहिजे व जेथें न्यायनीति सोडून नौकरशाही वागेल तिथें तिलाहि ठणकावली पाहिजे असें आगरकरांचें मत होतें. न्याय, नीति, समता व स्वातंत्र्य या चतुःसुत्रीवर राजकीय, सामाजिक, औद्योगिक कसला कां विषय असेना, घासून तो स्पष्टपणानें व धाडसानें मांडणें पत्रकर्त्याचें काम आहे असा आगरकरांचा विश्वास होता. " मनुष्यांच्या अंगीं खरी योग्यता असेल व लोकांच्या कल्याणाबद्दल त्याला खरी कळकळ वाटत असेल तर लोकांच्या रागाची पहिली लाट निघून गेल्यावर ते त्यांच्या बोलण्याचा शांतपणें विचार करूं लागतात " असा आगरकरांचा सिद्धांत असल्यामुळें ते सरकाराप्रमाणेंच लोकांचाही तोल सांभाळण्याची पर्वा करणारे नव्हते.

पण ही विचारसरणी त्यांच्या सहकाऱ्यांस पटत नव्हती. लोकशिक्षणाचें ध्येय त्यांना मान्य होतें. आणि लोकांचे दोष लोकांना दाखवायला पाहिजेत हें तेही जाणत होते. तथापि तसें करावयाचें तर तें लोकांच्या बोलीनें बोलून करावें असें त्यांचें मत

होतें. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं परकीय सत्तेवर मोहरा करावयाचा तर तो लोकपक्षाच्या पाठिंब्यावर केला पाहिजे, तरच तो नेटानें करतां येईल हें एक; शिवाय, आगरकरी वळणाचे लेख म्हणजे जहाल तेजाब! त्यामुळें लोकमत प्रक्षुब्ध झालें म्हणजे राजकीय विचाराच्या प्रचारास पायबंध लागेल! कारण आगरकरी कडकडीतपणा शांतबुद्धिनें पचनी पाडण्याइतकी जनता भक्कम नव्हे. अर्थात् सरकार व जनता या दोघांच्या क्रोधास कारण होऊन त्या दुहेरी कात्रींत सांपडल्यानें कार्याचा "सर्वनाश" होऊं देण्यापेक्षां, पंडितमान्य 'अर्धें' साधावें असा त्यांचा बेत झाला. त्यासाठीं सामाजिकसुधारणाविषयक निर्भीड लेखांची आणि केसरीची फारकत केली नाहीं तरी, ते संपादकीय म्हणून नसावेत असा होरा ठरला. अर्थातच "लोकांना अप्रिय होतील असे लेख तुह्मी स्वतांच्या सहीनें पाहिजे तर प्रसिद्ध करावे, पण ते संपादकीय लेख म्हणून केसरींत येता कामा नयेत," अशी आगरकर यांना नोटीस मिळाली.

जाहीर संपादक म्हणून केसरीवर आपलें नांव असतां, केसरींत आपलीं कांहीं मतें त्रयस्थ पत्रव्यवहाऱ्याप्रमाणें सहीनें प्रसिद्ध करणें अभिमानी आगरकरांस मान्य होणें शक्य नव्हतें. संपादकीय जबाबदारी मूर्त वा अमूर्त, वृत्तपत्राची कडकडीत वृत्ति सर्वगामी कीं कांहींशीं मर्यादित, वगैरे बाबतींत आगरकर आणि त्यांचे सहकारी यांच्यांत आमूलाग्र वृत्तिभेद असल्याकारणानें, वरील तऱ्हेची नोटीस स्वाभिमानी आगरकरांस मिळतांच केसरीच्या मालकीचा रोकडा प्रश्न दत्त म्हणून पुढें आला. सामाजिक मतप्रतिपादनासाठीं त्रयस्थ पत्रव्यवहाऱ्याचा परकेपणा तरी पत्करावा, नाहीं तर केसरीचा बोजा सर्वस्वी सांभाळावा असा पेंच आगरकरांस होता. पीळदार मनाच्या आगरकरांनीं पहिला पर्याय पतकरणें शक्यतेच्या पलिकडचें होतें. तत्कालीन प्रचलित वृत्तपत्रापेक्षां केसरीनें उभारलेल्या झेंड्यांत एक तऱ्हेचें वैशिष्ट्य असल्याकारणानें तें जरा सुद्धां सुटूं नये, आणि केसरीचा संचार सर्व विषयांत आजपर्यंतच्या सारखाच निर्बंध असावा, असा पराकाष्ठेचा प्रयत्न आगरकरांनीं करून पाहिला पण तो टिकला नाहीं. तो न टिकण्याचें कारण म्हणजे त्यांच्या सहकाऱ्यांची "सवंग लोकप्रियतेची लालसा" हें मात्र खास नव्हे. आपलीं मतें स्पष्ट बोलून दाखविण्याचें धैर्य, देशाकरितां स्वार्थत्याग करण्याची तयारी आणि राष्ट्रप्रेम हे गुण आपल्यांतील मोठमोठ्या लोकांच्याही अंगीं दिसून येत नाहींत; एकंदरीनें राष्ट्रकार्याविषयीं औदासिन्य आणि नैराश्य हीं सर्वत्र पसरलीं आहेत, या गोष्टी साऱ्यांनाच दिसत होत्या. त्याचप्रमाणें या औदासिन्याचा, नैराश्याचा आणि कर्तव्यपरांङ्मुखतेचा नाश करण्यास स्वतःच्या उज्वल चारित्र्याच्या उदाहरणाखेरीज दुसरें साधन नाहीं, याविषयींही मतभेद नव्हता. पण तसें करतांना जेथें फुंकरीनें अगर फार तर सुईनें काम भागावयाचें तेथें नाचकण नको, असें आगरकरांच्या सहकाऱ्यांचें, विशेषतः टिळकांचें मत होतें; तर नाचकणाशिवाय काम भागणारच नाहीं असें आगरकरांचें मत. आधुनिक पाश्चात्य राष्ट्रांच्या भरभराटीचें कारण पंधराव्या शतकांत तिकडे जें रोमन व ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन झालें तेंच होतें आणि त्याचप्रमाणें आपल्या मृतप्राय

झालेल्या राष्ट्रवृक्षावर आपल्या पौराणिक व वैदिक संस्कृतीनें सिंचन केल्यानें त्यांत नवचैतन्य येऊन स्वाभिमान, स्वत्व व कार्यनिष्ठा अशीं फळें येतील असा टिळकादिकांचा विश्वास होता. तत्वनिष्ठेचा आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा आविर्भाव राष्ट्रवृक्षांत भरदार प्रमाणांत न झाल्यामुळें नीच सहनशीलता आणि भ्याड नम्रता यांच्या योगें त्यांत कांहीं त्राण उरलें नाहीं. त्यांत चैतन्य आणावयाचें असेल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयास पाहिजे असें आगरकरांचें निदान होतें. या व्यासाभिन्न चिकीत्सामुळेंच आगरकरांस केसरी सोडावा लागला. केसरी हातावेगळा केल्यावर "लोकमत सुशिक्षित करण्याचा आपला हेतु तडीला नेण्याला काय करावे, हा प्रश्न आगरकर यांच्यापुढें अजूनही तसाच होता." केसरीच्या हातीं तें राजकारणी सुशिक्षित होण्याबद्दल आगरकरांस एकप्रकारें खात्री होती. पण स्वजनदोषपरिमार्जनार्थ तें कसें करावयाचें ? जात्याच कमीचलनशील असलेल्या आगरकरांना त्याचें स्पष्टीकरण तत्क्षणीं होणें शक्य नव्हतें. म्हणून केसरीची संपादकीय खुर्ची सोडल्यावरही आगरकरांनीं केसरींत "लिहून आलेला मजकूर" या सदरांत कांहीं लिखाण केलें आहे. मालकी हक्कानें मिरविलेल्या घरांत पाहुणा म्हणून वावरावयाचें आगरकरांच्या स्वाभिमानावर येत असलें, तरी लोकशिक्षणाची त्यांची कळकळ स्वाभिमानापेक्षांही जास्त प्रभावशाली होती यांत शंका नाहीं.

इतर सहकाऱ्यांच्या मानानें जात्या कमी चलनशील असलेले आगरकर कर्जी असलेली केसरीची मालकी संपादित लोकमताच्या पाठिंब्यावरही पतकरण्यास तयार झाले नाहींत आणि केसरींतच त्यांनीं एकाद्या वेळीं पाहुणचार पतकरला, तरी ती निरंतरची स्थिति नव्हे हें सर्व जाणून होते. चमचमीत कल्पना आणि आराखडा काढण्याची कुवत स्टीलप्रमाणें आगरकरांच्या जवळ आहे हें देव बोलून चुकला होता. तेव्हां, आपल्या तिखट लेखणीनें केसरीच्या मालकीचे कदाचित् सोळावारा करण्यापेक्षां 'नवी विटी नवें राज्य' हांकण्यास आगरकर कसूर करणार नाहींत याबद्दल प्रत्येकाची खात्री होती. त्यांच्या दृष्टीनें चुकीच्या मार्गानें चाललेला गाडा, वेळेला नवी चाकोरी दाखवून, सरळ चाललेला पाहिल्याशिवाय त्यांच्या आत्म्याचें समाधान नव्हतें. वस्तुस्थितीची गैरवाजवी वाहतुक उघड्या डोळ्यांनीं पाहत बसणें पाप होय, अशी आगरकरांची प्रवृत्ति होती.

"अर्वाचीन पाश्चात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थळें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनः पुनः दाखवावें" अशी तळमळ वर दिग्दर्शित केलेल्या अंतरीच्या जाणीवेनें आगरकरांस लागली होती व लोकशिक्षणाचें कंकण हातीं बांधूनच त्यांनीं आपल्या विद्यार्थीदशेचा निरोप घेतला होता. फार काय, केसरीच्याद्वारें त्यादिशेनें आतांपर्यंत त्यांनीं कांहीं पावलें टाकलींही होतीं. "ज्या तत्वांचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत

चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्याला आम्ही आनंदानें तयार झालें पाहिजे." त्या तत्वांचें प्रतिपादन हेंच आगरकरांच्या लेखणीचें आतां जीवितकर्तव्य निश्चित झालें होतें. अशा जिव्हाळ्याचे आगरकर आपल्या लेखणीला दुसऱ्यांच्या रकान्यांकडे धांव घ्यावयास लावून सदैव तिची कुचंबणा करतील हें शक्यच नव्हतें. केसरीवियोगाबरोबर आगरकरांचे जे प्रतिपक्षी म्हणून उभे राहिले त्यांना आगरकरी लेखणीच्या आक्रमशक्तिइतकीच आगरकरांच्या करारी चिकाटीची जाणीव होती. अर्थातच नवीन पत्राची जुळवाजुळव आगरकर करण्याच्या नादांत आहेत असें पुढें आढळून आल्यावर साप्ताहिक संचारापेक्षां आगरकरांनीं आपल्या लेखणीला मासिकसंचार करावयास लावावें अशी शिष्टाई झाली असल्यास, तें अगदींच अशक्य म्हणतां यावयाचें नाहीं. पण तिला हरताळ बसल्यावर प्रकरण बोलाबोलीवर आलें. "We will make it too hot for you [आम्ही तुम्हांला सळो कां पळो करून सोडूं.]" या प्रतिपक्षाच्या दटावणीला "We shall, soon see who makes it too hot for whom [कोण कुणाला सळो कां पळो करतो तें तें आपण लवकरच पाहूं]" असें कुरेबाज उत्तर आगरकरांनीं केलें आणि आपलें नवें पत्र ठरल्याप्रमाणें १८८८ दसऱ्याला काढावयाचें तें काढलेंच.

शिव्यांचा एक सभ्य प्रकार म्हणून ज्यावेळीं "सुधारक" या शब्दाची किंमत समाजांत केली जात होती, त्यावेळीं आपल्या पत्राला तें नांव देणें व आपलें पत्र लोकांनीं गोडीनें वाचावें अशी अपेक्षा करणें खरोखरच विलक्षण धाडसाचें होतें. सुधारक व सुधारणा जितक्या तुच्छतेनें समाज पाहतो त्याच्या अगदीं उलट स्थिति असून त्यांचेंच सर्वत्र साम्राज्य होणार आहे, असा विजयेष्णु आत्मविश्वास, आगरकरांनीं आपल्या पत्रास "सुधारक" हें नांव देऊन प्रगट केला. न्यू स्कूलच्या चालकांनीं मराठा–केसरी हीं जशीं इंग्रजी मराठी पत्रें काढलीं होतीं त्याचप्रमाणें सुधारकांतही त्या बाजू चमकत होत्या. किंबहुना महाराष्ट्रांत नवीन उत्पन्न होणाऱ्या पत्रांचा तो रिवाजच होता. इंदुप्रकाश–ज्ञानप्रकाशांत देखील इंग्रजी मराठी रकान्या-शिवाय शोभा मानली जात नव्हती. आंग्लाईच्या पायरोवणीनंतर रानड्यांची पहिली पिढी आपलें खाजगी व सार्वजनिक लिखाण इंग्रजींतूनच करीत असे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या दुसऱ्या पिढींत सार्वजनिक लिखाण मराठींत तर खाजगी पत्रव्यवहार इंग्रजींत राहिला. महाराष्ट्राची ही मनोरचना त्यावेळच्या वृत्तपत्रांतून दृग्गोचर होत होती असें म्हटल्यास अतिशयोक्तीची भीति नको. रकान्यांच्या या वाटणीबरोबर विचारांचीही इंग्रजी–मराठी त्यावेळच्या वृत्तपत्रांतून दृष्टीस पडे. एकाच विषयावर इंग्रजी रकान्यांतून जो अभिप्राय व्यक्त केलेला असे त्याचें खंडण मराठी रकान्यांत वाचावयास सांपडे. कित्येकदां हीं पगडीं उलटीं पडलेलीं आढळत! आणि ही सारी मजा त्याच पत्राच्या एकाच अंकांत असावयाची. ज्ञानेंदुप्रकाशांचें हें लेणें सुधारकाच्या वाट्यास आलें नाहीं ही भाग्याची गोष्ट होय! तथापि सुधारकाच्या इंग्रजी विभागामुळें, मराठी विभागाची ओढघस्त झाली हें नाकबूल करण्यांत बिलकूल अर्थ

नाहीं. राजविद्येची मोहनी सुशिक्षित समाजाच्या मनावर आणि डोळ्यांवर इतकी कांहीं विलक्षण होती कीं अधिकारी विद्याविलसितांना मराठी वृत्तपत्रें वाचणें कमीपणाचें वाटे! त्यांची तरतूद गोपाळ कृष्ण गोखल्यांसारख्या फर्ड्या इंग्रजी लेखकाच्याकडे सोंपवून प्रचलित राजकारणाचें कंकणही आगरकरांनीं बहुशः त्यांच्याच हातीं बांधलें होतें. तथापि या सुंदर सजावटींत इतकीच गैरसोय उत्पन्न झाली कीं आगरकरांच्या अप्रतिहत लेखणीची भरधांव कित्येकदां मोकळ्या रकान्याच्या अभावीं मधल्यामध्येंच थबकून आठवड्याचा आठवडा अडकून पडली. एवढ्या एका अडचणीशिवायं, सुधारकाचा मराठी विभाग संपादितांना आगरकरांस दुसरें कांहींच अडखळण्यासारखें नव्हतें. पाश्चिमात्य सुधारणेचीं तत्त्वें प्रतिपादितांना जारी असलेल्या लोकमताचा होणारा त्रास ते कःपदार्थ समजत होते. त्यामुळें एकपरी कसलीच अडचण नव्हती. पण वृत्तपत्राची खुर्ची मांडल्यावर काय लागत नाहीं?

"हिंदू लोक रानटी अवस्थेंतून निघाल्यावर कांहीं शतकेंपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांहीं शास्त्रें, वेदांत, न्याय, गणितादि कांहीं विद्या, व काव्य, गीत, नर्तनवादनादि कांहीं कला–यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली. तेव्हांपासून इंग्रजी होईपर्यंत ते कसें तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले. त्यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटांहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीति–सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें, किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठीण झालेल्या लांकडासारखे, किंवा हडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे." ........

"एकाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेप्रमाणें आम्हां भारतवर्षीयांची स्थिति झाली आहे, असें आम्हांस वाटतें. पतिनिधनामुळें नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणें असलेल्या अपत्यांचें वारंवार दृढालिंगन करून 'आमचे पुरुष असे होते, आमच्या पुरुषांनीं असें केलें, आमच्या पुरुषांनीं तसें केलें, अशा प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच आपलें समाधान मानून घेते, व आपल्या जीविताची कृतार्थता समजते, त्याप्रमाणें जुन्या पुरुषांचे गुणानुवाद गाण्यांतच आमच्या पुरुषार्थाची परमावधि होऊन बसली आहे."

भोंवतालच्या समाजस्थितीच्या स्वयंनिरीक्षणांत अशा तऱ्हेची करपुतळी आगरकरांस आढळल्यामुळें, समाजाच्या दैनंदिन प्रगतीसाठीं स्थिरप्रकृति हिंदुसमाजाच्या चालीनें चालण्यांत आणि बोलीनें बोलत राहण्यांत आगरकरांस स्वारस्य वाटत नव्हतें. "देशाच्या, कालाच्या, व व्यक्तीच्या विवक्षित स्थितींत सौम्योपायांचें अवलंबन न करतां तीव्रोपाय करणेंच विशेष श्रेयस्कर असतें;" आणि म्हणूनच "सभ्यपणाची

मर्यादा न सोडतां, समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्यानें उघड-पणें बोलून दाखवणें यांतच समाजाचें कल्याण आहे. " या न्यायानें सत्याच्या पायरीवर अधिष्ठान ठेवून, पाश्चात्य सुधारणेच्या तत्त्वावर इकडील समाजस्थिति घासून पुसून विचारांतीं जीं मतें निश्चित झालीं तीं विक्षिप्त वाटलीं तरी, शिलावस्थ हिंदू-समाजास प्रगमनशील करण्यासाठीं त्याच्या डोळ्यांवर मारणें आगरकरांस कर्तव्यप्राप्त वाटलें ! कारण ते पूर्णपणें जाणून होते कीं " ज्या मतांस आपण तऱ्हेवाईक मतें असें म्हणतों, तीं त्यांच्या नवीनत्वामुळें बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. तीं पुनः पुनः कानावर पडूं लागलीं म्हणजे त्यांचा धाक वाटेनासा होऊन, हळूहळूं त्यांतील गुणावगुणांचा विचार करण्याची बुद्धि होऊं लागते, आणि अखेरीस ह्यांपैकीं जीं पसंत पडतील तीं अंगिकारण्याची इच्छा होते. "

तेव्हां 'महाराष्ट्र लोकांपुढें वारंवार' पाश्चिमात्य सुधारणेचीं तत्त्वें मांडण्याकरितां, " बांधवहो ! विचारकलहाला तुह्मी इतके कशासाठीं भितां ? " असा सवाल करणारा सुधारक, " लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं, त्यांच्या दोषाचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मुंडण करण्या "चें ' अत्यंत लज्जास्पद ' काम करणार " नव्हताच नव्हता ! " पण एवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्यांचा आम्ही अभिमान मानावा किंवा ज्यांच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं " असेंही सुधारकानें स्पष्ट म्हटलें आहे. " नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्राचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धी झाली होती कीं त्यासंबंधानें आजमित्तीससुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं " असा स्वाभिमान प्रसंगवशात् सुधारकानें प्रगट केला आहे. तात्पर्य " इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार " हें सुधारकाचें ब्रीदवाक्य सर्वसंचारी होतें. हिंदुसमाजाच्या दोषाविष्करणाप्रमाणें गुण-ग्राहकतेंत सुधारक रतिभर मागें नव्हता. किंबहुना प्रेमळ व कोमल अंतःकरणाच्या आगरकरांचा सुधारक सामाजिक दोषाविष्करण उजळ माथ्यानें करीत असला तरी अंतर्यामी आपल्या " प्रियतम पण सांप्रत दुर्दैवी " देशबांधवांबद्दल इतका सद्गुणा-भिमानी होता कीं, परक्यांनीं त्यांच्यावर हल्ला केल्यास सुधारक त्यांच्यावर तुटून पडत असे. मद्रासच्या इंडियन रिव्ह्यूमध्यें ॲशबर्नर साहेबांनीं हिंदु विधवांबद्दल कुत्सित लेख लिहितांच असल्या उकिरड्याला आपल्या मासिकांत स्थळ दिल्याबद्दल संपा-दकांची हजेरी घेऊन ॲशबर्नर साहेबांना सुधारकानें दिलेला:—

" तुमच्या मडमांनीं हिंदु स्त्रियांचें चरणोदक घेऊन शुद्ध व्हावें इतक्या हिंदु स्त्रिया नीतिमत्तेंत श्रेष्ठ आहेत ! "

हा झणझणीत आहेर, सुधारकाबद्दल मन निर्मळ केल्याशिवाय खास रहात नाहीं.

पण एवढ्यानेंच काय झालें ? सुधारकाचा मराठी विभाग सामान्यतः सामाजिक सुधारणेसाठीं सवतासुभा असला तरी प्रसंगवशांत त्यांत राजकीय प्रकरणांना प्रवेश मिळणें अपरिहार्यच होतें. बादशाही अमलापासून चालत आलेल्या तोंडपूजेपणावर शस्त्रसंधान करीत रहावयाचें, हें संपादकीय सूत असल्याकारणानें राजकीय प्रकरणें त्या तडाक्यांतून कशीं निसटावीं ? अर्थात ह्यूमसाहेबांनीं राष्ट्रसभेच्या द्वारां हिंदुस्थानांत चेतना उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांच्यावर अँग्लोइंडियन व इंग्रजी वृत्तपत्रांनीं हल्ला करतांच, आमच्यांतील स्वयंप्रतिष्ठितानीं जी कोल्हेकुई आरंभली तिला चपराक लगवावयास सुधारकानें कमी केलें नाहीं ! ओघानेंच प्रस्थापित सत्तेनें उर्फ नौकरशाहीनें धिंगाणा घातल्यास त्यावर सुधारकानें बेधडक कोरडे ओढले हें काय सांगावयास पाहिजे ? भांडवल गेलें, व्यापार गेला ! इंग्रजी राज्याची उलटी बाजू, यांना कोणी विचारता नाहीं काय ? लोकशिक्षणावर गदा, हिंदुस्थानास क्षय लागला ! वगैरे सुधारकांतील राजकीय प्रकरणें त्यांच्या सामाजिक लेखाइतकीच तिखट आहेत.

" खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानी पुरुष म्हटला म्हणजे त्याचे ठायीं पराकाष्ठेची निस्पृहता वागत असली पाहिजे, तो वचनाचा धड असला पाहिजे, व कसलींही संकटें आलीं किंबहुना जीवितसंशयाचा जरी प्रसंग येऊन ठेपला, तरी त्यानें डगमगता उपयोगी नाहीं. "

विष्णु कृष्ण चिपळोणकरांनीं दिलेल्या या दीक्षेप्रमाणें नुसत्या राजकीय व सामाजिक बाबतींतच नव्हे, तर आगरकरांना देशकल्याणाच्या वाटलेल्या प्रत्येक बाबतींत–मग ती पतपेढ्यासारखी आर्थिक असो अगर अन्य औद्योगिक असो–सुधारकानें आपलें वर्तन आटोकाटीनें निर्बाध ठेवण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. त्याचा, विशेषतः सामाजिक विषयावरील जलाल लेखांचा परिणाम त्यावेळच्या स्थितींत व्हावयाचा तोच झाला; आणि एकदां आगरकरांची प्रेतयात्रा शिमग्याच्या दिवसांत त्यांच्या डोळ्यादेखत काढावयास लोकांनीं कमी केलें नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांना कित्येकांकडून खुनाच्या धमकीचींही पत्रें आलीं.

" हंसो यथा क्षीरमिवांबुमध्यात् " माणूस कोणत्याही विषयांत विरळाच सांपडावयाचा. वर्तमानपत्रास तरी त्या नियमाला वाचकांच्या बाबींत अपवाद होऊन कोठून निभाव लागावयाला ? नीतिशतकांतील–

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना ।
दावी धन्यास जठरार्थ कसे पहाना ॥
दे आळवूनि जरि हस्तिप बाप–भाई ।
घेतोच घास गजराज कशी बढाई ॥

या श्लोकांतील हशीलाप्रमाणें " टाकांतून अर्थबोधक अक्षरें निघत आहेत व तीं वाचण्यास एक तरी वाचक भेटतो आहे" तोंपर्यंत आपलें न्याय, नीति, समता व स्वातंत्र्य या चतुःसूत्रींचें रहस्य समाजाच्या मनावर उत्कृष्टपणें व उत्कटत्वानें ठस-

विण्याचें ब्रीद लवमात्र सोडावयाचें नाहीं असा सुधारकाचा बाणा होता. "परम कल्याणकारक असा संदेश आपण लोकांना सांगत आहोंत ही भावना त्यां (आगरकर)च्या मनांत वागत असल्यामुळें, विशिष्ठ कल्पना, विचार किंवा शब्दयोजना समाजाला रुचेल कां अप्रिय होईल हा हिशोब त्यांच्या ध्यानांत येत नसे. अप्रिय पण पथ्यकर असाच उपदेश समाजाला करण्याचा जेथें मूळ संकल्प, तेथें चांचपडत विचार व्यक्त करण्याची शक्यताच उरत नाहीं. आगरकरांचे लेख वाचतांना, "आली सिंहस्थ पर्वणी" वगैरेसारख्या अभंगांनीं समाजाच्या डोळयांत झणझणीत अंजन घालणाऱ्या तुकोबारायांची आठवण झाल्यांवाचून रहात नाहीं.

अर्थात आगरकरांनाही मंबाजीबुवा भेटलेच. आगरकरांच्या लेखांवरून चिडून जाऊन पुणें-वैभवकारांनीं असा शोध लावला कीं, "आगरकर हे ब्राह्मण बीजाचेंच नाहींत!" मग त्यांना खुनाच्या धमकीचीं पत्रें आलीं, अगर त्यांची जिवंतपणीं प्रेत-यात्रा काढून आगरकरांच्या काल्पनिक प्रेतावर सुधारकाचे अंक अंथरलें, यांत नवल करण्यासारखे काय आहे!! तथापि या त्यांच्या अनादराबरोबर समाजानें दाखविलेल्या आदराचीही उदाहरणें सांगितलीं पाहिजेत. १८९५ सालीं आगरकरांचा परलोकवास झाल्यावर दख्खनसमाचारकारांनीं सुधारकाच्या संपादकांना "शिवाजीपेक्षां श्रेष्ठ" ठरविलें होतें. हा गौरवातिरेकाचा भाग लक्षांत घेऊंच नये. पण आगरकरांच्या मृत्युलेखांत केसरीकार लोकमान्य टिळकांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, "देशी वर्तमानपत्रास हल्लीं जर महत्व आलें असेल तर तें बऱ्याच अंशीं आगरकर यांच्या विद्वत्तेचें व मार्मिकतेचें फल होय, यांत शंका नाहीं." तथापि मृत्यूनंतरचा हा गौरव सांगण्यांत मोठें स्वारस्य आहे असें नाहीं. कारण दुर्मिळतेमुळें किंमत कळूं लागते. म्हणून आगरकरांच्या जिवंतपणींही संपादक या नात्यानें त्यांचा जो गौरव झाला तोच समाजाला व त्यांना दोघानाही अधिक भूषणास्पद. असा मासला त्यांनीं "चढाऊ जोडा" मागवला असतां, त्यांच्या पसंतीला उतरेल असा जोडा त्यांच्याकडे पाठ-विण्यांत जी थोडीच पण समंजस अहमहमिका झाली, त्या उदाहरणांत पहावयास सांपडतो. त्याच्याहीपेक्षां सुधारकाच्या प्रगमनशील धोरणावर खूष होऊन एका अज्ञात मित्रानें एका पाकिटांत घालून "पसतीस रुपयांच्या नोटा" पावत्या केल्या, यांत खरोखर आगरकरांच्या लेखणीची सरशी आहे. या सगळ्या गोष्टीवर जर खरोखर ताण कशानें झाली असेल, तर आखिल भारतीय गोपाळराव देवधर, स्त्रियांच्या विश्वविद्यालयाचे जनक अण्णासाहेब कर्वे आणि सेवासदनाचे संस्थापक यांना आपल्या सुधारकत्वाची स्फूर्ति आगरकरांच्या सुधारकानें दिली, या गोष्टीनें आगरकरांच्या संपादकीय यशाची ताण झाली आहे.

काफीखान म्हणतो त्याप्रमाणें बादशाही दरबारासाठीं असलेल्या 'वाका' अगर लोकासाठीं असलेल्या "अखबार" सारख्या मोंगलाईत असलेल्या वृत्तपत्रापासून सुधारकापर्यंत किती हिंदी वृत्तपत्राचें नशीब वरच्यासारखें असेल परमेश्वर जाणें! कारण श्री. के. नटराजन म्हणतात कीं,—

"Of all professions Journalism is at once the most fascinating and the most dreary. It is fascinating because of the wide vareity of interests it constantly presents and because, if one happens to have some great cause at heart, it gives him the opportunity of striking a blow for it at the right time. It is dreary because unlike other professions such as law and medicine where the results of ones efforts are known sooner or later, the Journalist may never know what the results of his efforts are. Sometimes however the Journalist also has the gratification of knowing that whatever he wrote has produced some effect. There is no moment in his life so exhilarating as when he is told by some distant and unknown reader that his writing stirred in him some abiding thought or emotion."

"धंद्यात धंदा पत्रकाराचा – मुलखाचा वेड लावणारा व मुलखाचा उदासवाणा. वेड लावणारा अशाकरतां कीं पहावें तेव्हां मन गुंतविणाऱ्या विविध विषयांचा तेथें आपला मुलुख मोकळा; जर एकाद्या महत्कार्याची खूणगांठ बांधून ठेवली असली तर, योग्य वेळीं ताव मारायला त्या धंद्यांत संधि मिळते. आतां सदर धंदा उदासवाणा अशासाठीं कीं तो कांहीं वकिलीसारखा अगर दाक्तरीसारखा धंदा नव्हे,–कीं केल्या श्रमाचा मोबदला काय झाला हें उशीरा–लवकर तरी पहावयास मिळेल; आपल्या परिश्रमाचें काय झालें हें पत्रकर्त्याला जन्मभरही समजण्याची पंचाईत! एखाद्यावेळीं बरीक असा योग येतो खरा कीं, पत्रकर्त्याला आपले लिखाणाचा कांहीं उपयोग झाला आहे हें समजून येण्याचें भाग्य लाभतें. "तुमच्या लिखाणानें माझ्या मनांत अशी अशी शाश्वत भावना अगर विचारसरणी निर्माण झाली" असें एकाद्या दूरच्या व बिन माहितीच्या वाचकाकडून कळल्यावर पत्रकर्त्यास जो आनंद होतो त्याची योग्यता काय विचारावी ?"

असल्या दुर्मिळ भाग्याचे वाटेकरी आगरकर होते, हें मागील परिच्छेदावरून थोडेसें प्रत्ययाला येईल. शब्दावडंबर, द्विरावृत्ती व मेघनाद या दोघांचे वारेही फिरकूं न देतां अस्खलित, रसाळ, गंभीर व अमोघ अशी भाषेची वाकबगारी, नियमित स्थळांत व्यवस्थित मांडणी, विषयाची पूर्ण माहिती, जबाबदारीची जाणीव, स्वाभिमान आणि कार्यप्रवर्तक टीका हे संपादकाच्या अंगीं जरूर गुण असावे लागतात. आगरकर या सर्व गुणांनीं परिपूर्ण होते असें म्हणण्याचें धाडस त्यांचा एखादा अंधळा अनुयायीही करणार नाहीं. मग दुसऱ्या कोणाची गोष्ट कशाला बोलवावयास हवी ? कांहीं गोष्टींचा त्यांना पिच्छाच पुरवावयाचा असल्यामुळें सुधारकांत द्विरावृत्ति आहे, लेखनाच्या ओघांत वाहून गेल्यामुळें नियमित जागेंत त्यांचें लिखाण आटपलेलें नाहीं, विषयाची माहिती त्यांनीं कित्येक वेळां दुसऱ्याकडून घेतल्यामुळें एकांगीं आहे आणि असें असूनही बाकीच्या गुणांमुळें सुधारकाचें तेज फाकलें. तरी पण खुद्द आगरकर सुधारकाचें श्रेय आपल्या सहाय्यकासच देत, पहाः—

" Not being able to know how to thank you sufficiently for your obligations, I and my friend Mr. Gokhale sometimes grow desperate and begin to think that we need not thank you at all ! for, you are not doing anything for us ! You are doing much and you may do much more for your beloved but at present unfortunate countrymen and country ! we are only co-operaters or co-workers and as long as you find no reason to suppose that the work we are doing has at its bottom personal interest, studiously concealed from you, we need not thank you ! This is however intellectual casuistry and in our hearts we cannot but feel grateful to you for the invaluable service that you have been rendering to the enterprize of which we have been only the mere starters, but the success of which entirely depends upon the sympathetic succour of disinterested friends like you " [ Extract from the letter, Dated 21 st January 1889 of Mr. Agarkar to S. G. Deohar. ]

आपल्या उदार मदतीबद्दल आपले पुरेसें उतराई कसें व्हावें हें लक्ष्यांत न आल्यानें, मी आणि माझे मित्र श्री. गोखले कधीं कधीं वैतागतों आणि आपलें उतराई होण्याचें आम्हांस मुळींच कारण नाहीं असा बेत करतों ! कारण, आमच्यासाठीं आपण कांहीं करीत नाहीं ! आपण पुष्कळच करीत आहांत आणि पुष्कळच कराल तें आपल्या प्रिय पण सांप्रत दुर्दैवी असलेल्या देशबांधवांसाठीं आणि देशासाठीं ! आम्ही फक्त सहभागी वा सहकारी आहोंत आणि जोंपर्यंत आम्ही करीत असलेल्या कामांत आमचा कांहीं वैयक्तिक स्वार्थ आहे व तो आम्ही जाणून बुजून छपवीत आहों अशी शंका घेण्यास आपणांस जागा नाहीं, तोंपर्यंत आपले उतराई होण्याचें आम्हांस कारण नाहीं ! तथापि ही सारी बौद्धिक कसरत आहे आणि आम्ही निमित्तमात्र होऊन सुरू केलेल्या साहसांत आपण जी बिनमोल मदत करीत आला आहांत त्याबद्दल आमचे अंतःकरणांत कृतज्ञता वाटतेच वाटते. कारण आमच्या साहसाचें सारें यश आपल्यासारख्या निरपेक्ष सहाय्यकांच्या मदतीवरच अवलंबून आहे.

सदर उताऱ्याच्या पूर्वार्धांत दाखविलेल्या निरपेक्ष वृत्तीनेंच जसा आगरकरांनीं सुधारक लिहिला तसाच केसरीही लिहिला. केसरीपासून आगरकरांना पैसा मिळाला नाहीं म्हणून ते जसे दुर्मुखले नाहींत, तसेच लोकप्रवाहाच्या विरुद्ध मतप्रतिपादन करण्याकरतां जाणून बुजून काढलेल्या सुधारकानें, अनेक सहाय्यकांच्या मदतीनें कां होईना, वर्षाअखेर " चार रुपये दरमहा " दाखवला म्हणून आगरकर हुराळले नाहींत. कारण सुधारकाच्या मागें कृतसंकल्प होता. जोसेफ माझिनीनें म्हटल्याप्रमाणे " आपलें कार्य कोणतें याची एकदां कां कल्पना आली आणि मनाशी तशी गांठ बसली म्हणजे कशानेंही माणसांचें पाऊल अडकून पडतां कामा नये. असेल नसेल ते सामर्थ्य कामीं लावून, दुसऱ्यांचा पाठिंबा मिळो, किंवा विचारक्षेत्रांतील हुतात्म्यांच्या बहुशः नेहमींच

वाटणीला येणारा कष्टकर एकलकोंडेपणा पतकरावा लागो, माणसानें आपलें ध्येय तडीला नेलेंच पाहिजे. ध्येयाचा रस्ता डोळ्यापुढें कसा स्पष्ट असतो. दुःखें आणि दुर्दशा यांना भीक न घालतां, माणसानें जर तो रस्ता शेवटपर्यंत चोखाळला नाहीं, तर स्वतांच्याच भविष्याशीं हराम असा तो भेकड ठरेल." माझिनीच्या या वचनाला धरूनच आगरकरांचे संपादकीय वर्तन झालें; आणि म्हणूनच "लोकांना मला काय सांगावयाचें होतें तें सांगितलें" असे समाधानाचें उद्गार आगरकरांना आपल्या मृत्युपूर्वी काढतां आले.

सुधारक आणि आगरकर, व टॅटलर आणि स्टील यांचीं साम्यें अभ्यासू डोळ्यापुढें वरील सर्व अवलोकनानंतर कां होईना उभीं राहिल्याशिवाय रहात नाहींत. सुधारकाप्रमाणेंच टॅटलरचाही मोटा प्रसार होता. सुधारकाप्रमाणें त्याला चहाते तसेच शत्रूही बरेच होते आगरकराप्रमाणें स्टीलही नव्या नव्या कल्पना काढण्यांत पटाईत होते. श्री. वासुदेवराव पटवर्धन, सीतारामपंत देवधरांसारखे सहाय्यक भेटले म्हणून आगरकरांचे आराखडे जसे यशस्वी ठरले, तसेच ॲडिसनचा हातभार नसता तर स्टीलचे कित्येक बेत जागच्या जागींच जिरले असते. सुधारकांत आगरकर जसे परिणत दिसतात तसाच स्टीलही आपल्या पत्रांत होता. स्त्रीजातीचा गौरव व कौतुक करणारा पहिला लेखक म्हणून स्त्रीजातीनें स्टीलला धन्यवाद दिले पाहिजेत असें थॅकरे म्हणतो. आगरकरांच्या संबंधानेंही अगदीं तेच उद्‌गार महाराष्ट्राचा थॅकरे काढल्याशिवाय रहाणार नाहीं. शेवटीं आपल्या काळच्या स्वैर नीतिरीति ॲडिसननें मोठ्या प्रमाणांत शुद्ध केल्या असे उद्‌गार स्वीफ्ट यानें काढले आहेत, तेच आगरकरांच्या संबंधीं तितकेच खरे आहेत असें सांगून स्वीफ्टच्या शद्बांत आगरकरांसंबंधीं म्हणतां येईल कीं:—

"That man had virtue enough to give reputation to an age."

"त्या पुरुषाचें शील एवढें होतें कीं एका कालखंडाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी."



प्रिं. वा. शि. आपटे



श्री. सी. ग. देवधर

☆

☆



प्रो. धों. के. कर्वे

प्रकरण ५ वें

# लेखक आगरकर

" अंतरीं निर्मळ। वाचेचा रसाळ "

—तुकाराम

वर्तमानपत्री लिखाण म्हणजे हिरवळीवर पडलेले दवाचे थेंब; फार तर आनंदाचे अश्रु. झाडें आणि ओढे हिवाळ्याच्या कडाक्यांत आणि उन्हाळ्याच्या रखरखींत जसें आपलें वासंतिक व वर्षाकालीन वैभव आठवत नाहींत, त्याचप्रमाणें वर्तमानपत्री लिखाणाची गत असते. तथापि जगांत 'ध्वनि थोडे तर प्रतिध्वनि फार,' हा न्याय असल्याकारणानें आजकालच्या सार्वजनिक प्रश्नांचा उहापोह मराठींतून ज्यांनीं पहिल्या प्रथम केला, त्यांच्या वर्तमानपत्री लिखाणाकडेसुद्धां अचूक लक्ष लागल्यावांचून रहात नाहीं.

त्यांतून आगरकरांच्या लिखाणाला वैशिष्ट्य आहे. " श्रमांतीं सत्य " तें शास्त्र, असें म्हणतात. शेले म्हणतो कीं, हालअपेष्टांनीं शिकतात तें कवी काव्यांनीं शिकवतात. " आगरकरांच्या लेखनांत या दोनही गोष्टींचा समन्वय झाला होता असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. हालअपेष्टा तर त्यांच्या पांचवीलाच पुजल्या होत्या. त्यामुळें जगाचा कडवट अनुभव आगरकरांनीं बराच घेतला होता. अनुभवासारखा दुसरा गुरु कोण ? सहजच अनुभवामुळेंच आगरकरांना झाली तरी लोकशिक्षणाची तळमळ लागली. त्या तळमळीबरोबरच, हातीं आलेल्या पाश्चात्य संस्कृतीच्या ग्रंथाचें परिवर्तन आपल्या भोंवतालच्या परिस्थितीवर घेण्याची लकब लागली. आणि या दोहींचा संकलित परिणाम म्हणूनच, लोकशिक्षणासाठीं आगरकरांच्या टाकांतून जें वर्तमानपत्री लिखाण उतरलें, तें बुद्धिभावनांचा गोड गोपाळकाला होऊन बसलें.

न्यायमूर्ति रानड्यांच्या पिढीपासूनच महाराष्ट्रीय विद्वानांना अशी संवय होती कीं, परकी देशाचे इतिहास वाचा, तत्त्वज्ञान चाळा अगर सामाजिक क्रांत्युत्क्रांतीचें अवलोकन करा, प्रत्येकांतील सिद्धांतावर आपली अवस्था कसून पहावयाची. अर्थात् आगरकरांच्या पिढीला ती संवय हटकून होतीच. तीमुळें शेजाऱ्यापेक्षां स्वतांच्या विवेकबुद्धीचीच कदर लेखक बाळगतो. लेखकाच्या या वृत्तीलाच आत्मप्रत्यय म्हणतात. आगरकरांचें बोलणेंच मुळीं आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें. मग लिहिणें असेल, हें काय सांगावयास पाहिजे ? शिवाय, अन्यायितांची कड, अन्यायाची चीड, किंवा रोखठोक न्याय हीच ज्या लिखाणाची हृदयक्रिया, तें लिखाण छातीठोक मिरवलें तर साहाजिकच नाहीं काय ?

निबंधमालेनें निर्माण केलेल्या परंपरेचे हेच विशेष. येथें भावनेबरोबर तर्कसंसार थाटावयाचा आणि न्यायाचें निशाण खांद्यावर मिरवून लेखणीच्या लपेटी चालल्यामुळें सहसा माघार माहीत नसावयाची. त्यांत आगरकरांचें लिखाण सामाजिक जिवंतपणासाठीं झालेलें. " आईचा हात, धुई मुलाचे दांत " इतक्या प्रेमळपणाचें. आणि बारीक नजरेचें म्हणूनच गोड गजराचें. अशामुळेंच आगरकरांच्या

लेखांत " प्रतिपक्षीयाला कांहीं काल विरोधवृत्ति सोडून देण्यास लावणारी जादू आहे. " 'संततीची आतुरता' दाखवितांना आगरकरांची ती ओघवती भाषा, 'तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा' सांगतांना आगरकरांच्या लेखणीचा आवेश, 'हिंदुधर्मास नोटीस' देतांना वीरभयानकांचा अगर 'विधवावपना 'वर लिहितांना त्यांनीं साधलेला करुण–उपहासांचा रस–विप्रलंभ, स्वयंवरांतील 'पाणिग्रहणा 'नें आगरकरांनीं नटविलेला शृंगार, 'अन्नान्नदशेचे परिणामां 'त आगरकरांनीं उभा केलेला करुण अवलोकिल्यावर जगन्नाथपंडितांची आठवण होते.

कै० प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन लिहितात कीं, " आपल्या इच्छेप्रमाणें ते भाषासुंदरी कशी नटवीत, सजवीत, किती भिन्न सोंगें तिला देऊन तिच्या सदा चंचल स्वरूपानें प्रेक्षकांस कसें मोहून टाकीत; त्यांच्या हातीं मराठी भाषा कधीं सालंकार, तर कधीं सहजसुंदर, कधीं तरुण युवती, तर कधीं वृद्ध प्रौढ गृहिणी, कधीं रुष्ट बाला तर कधीं हृष्ट पत्नी–अशीं सदा नवीं रूपें घेऊन रंगभूमीवर नाचत असे. " भाषेचें असलें सव्यसाचित्व हेंही कांहीं काळ विरोधकास आपला विरोध विसरावयास लावतें. निबंधमालेच्या निशाणाचे सगळे लेखक बहुशः असलें सव्यसाचित्व बाळगून असलेले आढळतील. भूगोल आणि कालक्रम हे जसे इतिहासाचे डोळे, तसेच अंतःकरणाची निर्मळता आणि वाचेची रसाळता हे निबंधमालेच्या सांप्रदायाचे. " दिवस बुडाला अन् मजूर उडाला " असलें सांगकाम निबंधमालेच्या संप्रदायांत बसतच नाहीं. अंतःकरणाच्या तळमळीनें कागदावर प्रत्येक अक्षर उमटावयाचें. वाऱ्याच्या प्रत्येक हेलकाव्यानें 'ओक' झाडाचीं मुळें खोल खोल जातात असें सांगतात. एकतानतेनें लिहिलेल्या लिखाणाची गोष्ट तशीच असते. त्यामुळेंच भाषेची मोडमांडणी ही लेखकाला "हत्तीनें शुंडादंडावर हार घेण्या"सारखी वाटते, आणि अतिक्षुद्र विषयदेखील बेकनसारखाच अतितेजस्वी रंगतो.

'हजामत,' 'स्वच्छतेकरतां घाण विषय,' 'जोडे,' वगैरे आगरकरांचे लेख वरील विधानाच्या पुष्ट्यर्थ उदाहरणें म्हणून पुढें करतां येतील. 'सुधारक' काढण्याचा हेतु, 'महाबळेश्वर वर्णन,' 'महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र' या लेखांतून अंतःकरणाची निर्मळता, 'गुलामांचें राष्ट्र,' 'शहाण्यांचा मूर्खपणा ऊर्फ आमचे प्रेतसंस्कार,' 'इंग्रजी राज्याची उलटी बाजू अथवा आमचे घोर दारिद्र्य' वगैरे लेखांतून अंतःकरणाची तळमळ; 'कै. रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे' 'कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर' अगर 'कै. प्रो. वा. ब. केळकर' या लेखांतून भावनाप्रधानत्व; 'सृष्टयवलोकन,' 'कवि, काव्य आणि काव्यरति,' 'डोंगरींतील १०१ दिवस,' विकारविलसिताची प्रस्तावना वगैरे लेखांतून सुहृदय मार्मिकता आणि कित्येक गुणांची ओळ त्यांच्या लेखांतून निरीक्षकाला लावतां येईल. तथापि अनेक देवतांमधून जसें एका विश्वात्मक देवाकडे लक्ष लागतें, त्याचप्रमाणें एकमेकांच्या सीमारेषांवर ठिय्या देऊन बसणारे आगरकरांच्या लिखाणांतील बहुरंग जर एकाच कोणत्या गोष्टीवर केंद्रीभूत होत असतील तर 'नीतिशुद्ध प्रवृत्तिमार्गाच्या मंडणा' वर होत.

निबंधमालेची परंपरा अथवा प्रथा नीतिशुद्ध प्रवृत्तिमार्गाच्या मंडणाचें सूत्र बांधूनच मिरवते, हें खरें; पण त्याची खरी मख्खी समजावयास निरनिराळे धागे पाहिले पाहिजेत. विश्वात्मक देशाबद्दल जणों बंड उठविल्यासारखें उपनिषदांनीं जसें केलें, तसाच हा कांहींसा प्रकार आहे. निबंधमालास्फूर्त मराठी लेखनप्रथेला ज्या कलमपट्टूंचीं नांवें आधारभूत आहेत, त्या नामशेष महाभागांत आगरकरांचें नांव पहिल्याप्रथम घ्यावें लागेल. मराठी वाङ्मयामधील आजकालच्या मनोज्ञ व प्रफुल्ल वाटिकांचीं बीजें विष्णु कृष्ण चिपळूणकरांच्या खालोखाल गोपाळ गणेश आगरकरांच्या लिखाणांतून आढळतात. कालक्रमानें पाहतां, आगरकर शास्त्रीबुवांचे पश्चात् त्यांच्या लेखणीचा सार्वजनिक वारसा सांगणारे हें खरें; पण शेक्स्पीअरपेक्षां इब्सेन हा नाटककार अधिक प्रसिद्ध आहे, इतकाच शास्त्रीबुवा आणि आगरकर यांच्या लेखनस्फूर्तींचा संबंध. 'ओ हेन्री' या टोपण नांवानें लिहिणारा लघुकथासम्राट् विल्यम सिडने पोर्टर हा जसा स्वयंसिद्ध, तसेंच आगरकरही स्वयंसिद्ध. किंबहुना, निबंधमालेचे अंकानुअंक निघत असतांच वऱ्हाडसमाचारांत आगरकर मोबदल्यानें (सहा महिने) लिहित होते, व "एकत्र हिंदुकुटुंबपद्धति" निबंध लिहून बक्षीस मिळवीत होते. छे! छे! निबंधमालेच्याही अगोदर कऱ्हाड येथें नागपूरकर मुन्सिफांसमोर निबंध लिहून आगरकर वाचीत होते. कऱ्हाड–निबंधांनीं आगरकरांच्या लिखाणाला लागलेलें वळण वऱ्हाडच्या भाषांतरानें (वऱ्हाडच्या शाळेंत इंग्रजीचें भाषांतर विद्यार्थ्यांस करावें लागें) सुधारलें होतें, तें सुद्धां निबंधमालेच्या प्रसववेदना चालू असण्याच्या अगोदर, वा फारतर त्या बेतांत. तात्पर्य, आगरकरांना हातीं लेखणी धरावयास निबंधमालेनेंच स्फूर्ति दिली असा मामला नाहीं. तथापि लिओनार्डो व्हिन्सी, मायकेल अँजेलो, टिटिअन रेंब्रॉंडट हे नामांकित चित्रकार आपआपल्या परी स्वतंत्र असूनसुद्धां जसे अग्रभाग आणि पार्श्वभूमि यांबाबत एकाच तोलानें जोखले जातात, त्याचप्रमाणें चिपळूणकर–आगरकर स्वयंतंत्र–स्वयंसिद्ध असून देखील एकाच मुशींतून निघाल्यासारखे वाटतात. आतां 'रीडर' या चित्राचा सुप्रसिद्ध फ्रेंच रेखक जीन–जेक्स–हेनर हा जसा नग्नचित्रें चितारण्यांत दिक्कत मानीत नाहीं, तसेंच आगरकरही ग्राम्य शब्दप्रयोग अथवा शिवराळ वाक्यें आपल्या लिखाणांत आलीं म्हणून क्षिति करणारे नव्हते.

आणि असें असूनही "शरलॉक होम्स व डॉ. वॉट्सन्" या चिरंजीव ग्रंथांचा कर्ता कॉनन् डॉइल् हा आपल्या देशपर्यटनाबद्दल जितका विख्यात, तितकेच चिपळूणकर–आगरकर मराठी लेखनाच्या संस्कृतप्रधान सरणीसाठीं विख्यात. "पतिपत्नींचा झगडा। रौरव नरक तगडा" असें म्हणतात, पण त्या झगड्यांत त्यांची भाषा रानदांडगेपणानें तरी जिवंत राहते. पण पारतंत्र्य ही अशी चीज आहे कीं, येथें हिऱ्याचे कोळसे होतात. मराठी रियासतीस मुकून इंग्रजी राजवटीखालीं महाराष्ट्र सांपडल्याबरोबर, तुकाराम—रामजोशांची जातिवंत मराठी, क्रिकेटपटु धुलीपासिंगाच्या टोलेबाजीप्रमाणेंच इंग्रजीच्या धुमधडाक्याबरोबर, कोठल्याकोठें जाऊन बसली! इंग्रजी

राजवटींतील पहिले पाहिले विद्वान आपलें सार्वजनिक किंवा खाजगी लिखाण मराठीं-तून करण्यांत कमीपणा मानीत. त्यावेळचें 'लोकहितवादी' वगैरेचें जें मराठी लिखाण दृष्टीस पडतें तें टेनिसपटु 'कोशे' च्या खेळासारखेंच हळुवार आहे. ही इंग्रजीची मोहनी महाराष्ट्रीय सुशिक्षितांवर इतकी जबरदस्त होती कीं, न्यायमूर्ति रानड्यांनीं आपला "मराठी सत्तेचा उत्कर्ष" हा निबंध इंग्रजींत लिहिला. पण चिपळूणकरांनी मराठीं भाषेवरील इंग्रजी अरेरावीला कलाटणी दिली. सर जॉन हरचेल पेक्षांही "वाचनाचे वेडे" असलेल्या चिपळूणकरांच्या अंतःकरणांत देशभक्तीचे विचार रसरसूं लागल्याबरोबर चिपळूणकरांनीं "मराठी गद्याचा इंग्रजी अवतार" संपविला आणि मराठीचा संस्कृतप्रधान संप्रदाय सुरू केला. मनांत येणारे विचार मराठींत सुस्पष्टपणें मांडावयाचे, तर मराठी भाषाच तोकडी पडते, हा मराठीवरील सुशिक्षितांचा आक्षेप चिपळूणकरांनीं संस्कृत शब्दांच्या भालाइतीवर फोल करून सोडला. संस्कृत काव्यनाटकें वाचावयास विद्यार्थीदशेंत सरावलेल्या आगरकरांनीं तोच मार्ग आक्रमिला. अर्थात् गाडींत बसून रोग्यांच्या घरीं जातां जातां जें वाचन व विचार केले त्याचें फळ म्हणून प्रख्यात प्राणिशास्त्रज्ञ डॉ. कुईव्हिएर यानें जसा शरीरशास्त्रावरील एक मोठा ग्रंथ जगाला दिला, तशींच शब्दालंकारांचीं लेणीं मराठीच्या अंगावर आगरकरांनींही घातलीं."

जसें:— हाटली (hard labour yard), लोखंडाची फणी (वस्तरा), घरचा शिक्षक (खाजगी शिकवणीसाठीं ठेवलेला शिक्षक), वीरतृषा (ईटीज नदी), शरस्पंती (झरेफशान नदी), लोकशिक्षण (Public education), वक्तृत्व-विशिष्ट (Specialist in oratory), दुही माजवा व राज्य करा (Divide and rule), सनदी स्वेच्छाचारी (Licenced libertines), झगेदार बायका (Gowned women), मृताक्षर (Dead letter), हतपुंसव (Sterile), तारुण्यांतील (Post youth), लिंगविशिष्ट नीति (Sexual morality), स्खलनशील (Falliable), ऋतूत्तर-कन्याप्रदान (Post puberty marriage), वर्मसचिव्य (खुशामतखोरी), अनुसंकेत (मुग्ध करार), क्षीरपथ (milky ways), उत्पन्नशक्ति (productivity), राष्ट्रसभा (congress), शार्मण्य (Germany), तांबडें पाणी (दारू), श्रेष्ठायत्त कुटुंबें (Patriarchal families), यक्षसारी (जग्झारटीज नदी), चंचल (तरतरीतपणें उरक असणारे), "क्रियाप्रवृत्ति (Incentive), कार्यकर (effective), बुद्धिवैचित्र्य (Versatility of Intelligence), समीक्षता (Impartiality), सेवाकुल (उत्सुक उमेदवारीचा), अमानुष (Superhuman), चंचलता (Transition), मनोलाघव (मनाचा हलकटपणा), सामाजिक संनिधान (Social Organisation), स्वप्रचोदित (Voluntary), परप्रचोदित (Involuntary), विश्लेष (Disintegration), प्रकृति (Character), अस्तित्वतत्त्व (Law of life), नग्नचक्षु (Naked eye),

स्वत्व, कृतिवैशिष्ट्य ( Originality ), सूक्ष्मवेदित्व ( Sensitiveness ), असल्या तऱ्हेचे शब्द प्रसंगपरत्वें आगरकरांनीं वापरले आहेत. उत्क्रांति ( evolution ), संपादक ( Editor ) अगर संस्था ( Insitution ) " हीं आगरकरी नाणीं मराठीच्या दरबारीं सर्वमान्य झालीं आहेत; आणि सर्वत्र चालू आहेत. तरीही आगरकरांच्या वाङ्मयांत मागील पिढींतील इंग्रजी वळणाचे अवशेष नसतातच, असें मात्र शपथेवर सांगतां यावयाचें नाहीं. " सरमन्, प्रुफें, रपोट, व्हाल्में, आर्टिकल, क्यांप, फोटोग्राफ, ग्राज्युएट–ग्राज्वेट, नेटिव, हपीशीयल, डॉक्टर, फाइलें, कोर्ट, प्रोफेसर, मास्तर, नोटी, बुक, क्लोरोफार्म, टेबल, डायरेक्टर, म्युनिसिपालिटी, फी, इन्कमटॅक्स, कॉंग्रेस, गव्हर्नर जनरल, कॉंपेन्सेशन, बाप्तिस्मा " वगैरेसारखे इंग्रजी शब्द मराठी मोडणींत मांडावयासही आगरकरांनीं कमी केलें नाहीं. घासून, पुसून, तोलून आपल्या भावनेचा नेमका प्रतिनिधि असा शब्द तेवढा वापरण्याची धर्ती मराठी वाङ्मयांत आगरकरांच्या काळीं तर नव्हतीच नव्हती ! ! आगरकरांच्या वाङ्मयांतही निवडक शद्बांच्या कांतीवपणासंबंधीं बेफिकीरीच आढळते. त्यामुळेंच " वामनरावांपासून विनाकारण बी. ए पर्यंत, " परीक्षक इन्स्पेक्टर, हपीशिअल सर्कल, प्रांतिक कौन्सिल, शाळामास्तर, चान्सेलरगिरी, नॉन्–हपीशिअल, यांसारखे चमत्कार आगरकरी वाङ्मयांत आढळतात. आगरकर ' विकारविलसिता 'च्या प्रस्तावनेंत लिहितात—

" आपली महाराष्ट्रभाषा अद्यापि बाल्यावस्थेंत असल्यामुळें तींत नाना तऱ्हेचे मनोधर्म, मनोव्यापार, व तदनुरोधी बाह्यक्रिया व्यक्त करण्याजोगे शब्द नसल्यामुळें कित्येक ठिकाणीं साधारण शब्दांस विशिष्ठ अर्थ द्यावा लागला आहे, व कित्येक ठिकाणीं त्यांचा अर्थ विस्तृत करावा लागला आहे. " तरी पण इंग्रजी वाङ्मयांतून मराठींत आगरकरांनीं उतरलेल्या कांहीं शब्दप्रयोगांचें परकेपण कळणारें देखील नाहीं. पहा कीं, साम आणि संग्राम, स्थिति आणि प्रगति, नियामक आणि नियत, दर्दुरानुकारी वैदिक, गेंग्या लढवय्या वगैरे.

वर्तमानपत्री लिखाणांत ठरीव आणि घडीव अशी शास्त्रीय परिभाषा तयार करण्याचा आगरकरांचा हेतुच दिसत नाहीं. ज्या प्रसंगीं जो शब्द अर्थवाहक होण्यासारखा त्यांना वाटला त्याप्रसंगीं तो योजून त्यांनीं आपलें कार्य करून घेतलें आहे. आपल्या मनांतील अभिप्राय वाचकांस कळेल एवढीच खबरदारी त्यांनीं घेतली आहे. उदाहरणच द्यावयाचें तर " स्त्रैण " शब्दाचें देतां येईल. स्त्रियांच्या संबंधीं आगरकरांची वृत्ति किती उदारमनस्क होती याचा बरोबर कयास ज्यांना आहे त्यांना हें सांगण्याची जरूर नाहीं कीं " नादान " या अर्थानें " स्त्रैण " शब्द वापरणें आगरकरांच्या स्त्रीविषयक सादर वृत्तीला खपणारें नाहीं. तरीपण त्या अर्थानें आगरकरांनीं तो शब्द लिहिण्याच्या आवेशांत वापरला आहेच. पहा—

" कोण स्वस्थ बसणार ? सुधारक अं ! टाकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल, व ती वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोंपर्यंत तरी

हें **स्त्रैणकर्म** सुधारकाला स्पर्श करूं शकणार नाहीं ! "— ( होऊंच द्या तर दोन हात ! )

एलिड बुरीट या लोहाराची अशी गोष्ट सांगतात कीं, कामाच्या ऐन तडाक्यांत त्याला जे फुरसतीचे किरकोळ क्षण सांपडत तेवढ्यांत तो अठरा भाषा व बावीस उपभाषा शिकला. आगरकरांच्या लिखाणाजवळ असलेंच वैभव आहे. वर्तमानपत्रांतलें लिखाण अगोदर लौकिक, त्यांत भावनांचा आणि अभिनिवेशाचा भाग अधिक असावयाचा. तशांतही अंतःकरणाच्या तळमळीनें आवेशादिकांचा आविष्कार असा व्हावयाचा कीं, आगरकरांचा लेख म्हणजे जहाल तेजाब भासावयाचा ! तेथें शास्त्रीय ग्रंथास अवश्यक असणारा संथपणा कोठून सांपडणार ? तरीपण आगरकरांच्या लेखांतून इतक्याही धांदलींत असे सुंदर शब्द बाहेर पडले आहेत कीं, आगरकरांचे पश्चात् समाजशास्त्रावर लिहिणाऱ्या मंडळींनीं केलेले यत्न पहातां "आगरकरांची कला त्यांपैकीं कोणांतही नाहीं " असें प्रो॰ दत्तो वामन पोतदारांनीं नमूद केलें आहे.

नुसत्या शब्दांचीच गोष्ट कशाला ? पाथरवट ह्यू मिलरप्रमाणें वेळांत वेळ काढून शास्त्रीय ग्रंथरचना आगरकरांनीं केलीच असती तर ती त्यांना प्रसादपूर्ण साधली असती, असें मात्र खात्रीनें म्हणतां येतें. " आमचें काय होणार " मध्यें आगरकरांनीं केलेलें ' तरुण रावसाहेबांचें ' दैनिक वर्तन वाचलें किंवा " आमचें घोर दारिद्र्य " मधील ऐहिक कुबेर नगरी ऊर्फ मुंबापुरी आगरकरांच्या शब्दांनीं अवलोकिली, म्हणजे आगरकरांच्या लेखणींत ' कादंबरी'चीं बीजें होतीं याची खात्री पटते. आगरकरांनीं ' सुधारक काढण्याचा हेतु ' मध्यें केलेलें भारताचें महिम्नस्तोत्र, नायगरानदीचें वर्णन, त्यांनीं वर्णिलेला ' आक्टोबरांतील महाबळेश्वर, ' हे त्यांचे सवर्णीय गद्यकाव्याचे नमुने म्हणून मराठीच्या जामदारखान्यांत जमा आहेत. " हिंदु लोकांची अविश्वसनीयता " या लेखांत त्यांनीं समाजाचें दिलेलें बारीक स्वभाववर्णन, पेहरावांची केलेली चिकित्सा आणि वेळोवेळीं लिहिलेल्या मृत्युलेखांतून आगरकरांच्या हातून उतरलेलें गुणग्रहण हीं आगरकरांच्या सूक्ष्म निरीक्षणाची ग्वाही देतात. " ब्राह्मणी पगडी " सारख्या धावत्या विनोदापासून तों "हिंदुस्थान देश ठार बुडाला हो, ठार बुडाला !!" मधील ' हे रानडे आणि हे भांडारकर !' या ' शालजोडींतील शहाजोग हुंडीपर्यंत ' विनोदाचे सर्व बारकावे आगरकरांच्या कोटीबाज लिखाणांतून आढळून येतात. " महाबळेश्वरवर्णनांत " सांगितलेल्या अगर लेसेप्सच्या वगैरे अधूनमधून सांगितलेल्या गोष्टी पाहिल्या म्हणजे लघुकथांचें सालंकृत कन्यादान आगरकरांना साधलें नसतें तरी कथाबुद्धि त्यांजवळ होती, याविषयीं संशय उरत नाहीं. आगरकरांनीं केलेली शनैश्वराची आरती नजरेखालून टाकली म्हणजे कवि नसले तरी "पद्यगुंफाकार" होण्यास आगरकरांना नड पडली असती असें वाटतच नाहीं. " सृष्ट्यवलोकनापासून फायदे, " " ज्ञान, " " वडीलपणाचे हक्क, " " कवि, काव्य, आणि काव्यरति " हे आगरकरांचे निबंध आगरकरांचा " निबंधकार " म्हणून गौरव कायम राखतील. आणि विकारविलसिताची दुर्दैवानें अपुरी राहिलेली पण मराठी वाङ्मयाला भूषणभूत

असलेली प्रस्तावना रसिक टीकाकार म्हणून आगरकरांचा मान तिळमात्र कमी पडूं देणार नाहीं.

ज्याप्रमाणें कवि कर्कव्हाइट हा आपल्या कचेरींतून घरीं जातां येतां ग्रीकभाषा शिकला, त्याप्रमाणेंच आगरकरांच्या वर्तमानपत्री लिखाणाचीं पानें चाळतां चाळतांच वाचकाला वरील गोष्टी लक्षांत येत जातात. तथापि एका रोग्याकडून दुसऱ्याकडे जातां जातां मिळे तेवढ्या रिकामपणांत डॉक्टर मेसनगुड यानें एका लातिन काव्याचें उत्कृष्ट भाषांतर केल्याचा जसा दाखला आहे, तसाच आगरकरांनींही वेळांत वेळ काढून चार पुस्तकांचें कर्तेपण आपणांकडे घेतले आहे. पैकीं "विविधविषयसंग्रह" म्हणजे केसरी–सुधारकांतून आगरकरांनीं वेळोवेळीं लिहिलेल्या ललित निबंधांचें आगरकरांनींच केलेलें संकलन असून, त्यावरून आगरकरांची ललित वाङ्मयासंबंधीं मार्मिक नजर जशी प्रतीत होते, त्याचप्रमाणें वर्तमानपत्री धांवत्या लिखाणांत देखील आपल्याला प्रथित यशस्कर निबंध लिहितां येतात, हा आगरकरांचा आत्मविश्वासही प्रगट होतो. याच अनुषंगानें येथें हें सांगावयास हरकत नाहीं कीं, आगरकरांच्या लिखाणाला "स्नाना" प्रमाणें विनोदानें, "होऊं द्या तर दोन हात" प्रमाणें किंचित् कथानकी स्वरूपांत, अगर "हिंदुस्थान देश ठार बुडाला हो, ठार बुडाला" सारख्या उपहासात्मक वक्तृत्वानें जरी आरंभ झाला असला तरी त्याचें पर्यवसान गंभीर निबंधांतच व्हावयाचें. लोखंडी कारखान्याचें बादशाहीपण जसें निश्चितपणें क्रुप या जर्मन कर्तबगाराकडे, तसेंच आगरकरांच्या विविधरंग लिखाणाचें स्वामित्वही त्यांच्या नैबंधिक गुणसमुच्चयाकडेच.

आगरकरांचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'विकारविलसित.' विसाव्या शतकांतील हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या जागतिक विचारवंतांमध्यें बर्ट्रांड रसेल यांना जसें प्रमुख स्थान आहे, त्याचप्रमाणें आगरकरांच्या वाङ्मयसृष्टींत 'विकारविलसिता' लाही आहे. जीवन म्हणजे दृष्टिकोन, तसेंच इंग्रजी वाङ्मय म्हणजे शेक्स्पीअर, असा आगरकरपूर्व व आगरकरकालीन सुशिक्षितांचा समज होता. तो व्यर्थ होता असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. 'इंग्लंड वाटेल तें गमावील पण शेक्स्पीअर गमावणार नाहीं,' असा जर इंग्रजांचा बाणा, तर इंग्रजी संस्कृतीचा एकमेवाद्वितीय प्रतिनिधी शेक्स्पीअरला समजून रसिकतेनें इंग्रजी वाङ्मयाचें मधुपान करणारांनीं शेक्स्पीअर कायमपणें मराठींत उतरण्याची आकांक्षा धरली तर आश्चर्य काय ? जगांतील सर्व रोमांचरंगेल गोष्टींत स्मृतिसंवेदनासारखी रोमांचरंगेल गोष्टच नाहीं, तशी शेक्स्पीअरच्या छत्तीस नाटकांत हॅम्लेटसारखी कृति नाहीं. अर्थात् हॅम्लेटचा मराठी अवतार सोळा आणे साधण्यासाठीं कलमकरामत्यांनीं खटपट केली तरी अगदीं साहजिक आहे. म्हणूनच जवळपास एकाच काळीं शेक्स्पीअरचा हॅम्लेट तीन रूपांनीं मराठींत अवतरला. श्री. बव्यांनीं त्याला "हिंमतबहादर" बनविलें, श्री. कानिटकरांनीं त्याला "वीरसेना"चा साज चढविला तर आगरकांनीं हॅम्लेटला "विकारविलसितां"त चंद्रसेन करून सोडलें. सद्गुणावरील स्वर्गीय शिक्का म्हणजे सौंदर्य अशी एक व्याख्या आहे. किंवा आगरकरांचा

आवडता ग्रंथकार गिब्बन म्हणतो ' जातिवंत दर्यावर्दीला दर्या आणि वारे नेहमींच अनुकूल असतात. ' या दोनही तंत्रांनीं हॅम्लेटच्या मराठी अवतारांचें परीक्षण केल्यास रमणीयतेच्या दृष्टीनें आगरकरांचा ' चंद्रसेन ' निर्विवाद श्रेष्ठ ठरला आहे आणि लोकप्रिय झाला आहे. शस्त्रापेक्षां प्रेम प्रबळ असतें, तसेंच नाटककारापेक्षां नटावर नाटकाचें यश अधिक अवलंबून असतें; आणि म्हणून " विलायतचा प्रवास " कर्ते रा. सा. पावगी यांनीं म्हटल्याप्रमाणें त्याकाळीं हॅम्लेटची भूमिका करणाऱ्या सर हेनरी आयर्व्हिंग याच्या तोडीचा अभिनयसम्राट् गणपतराव जोशी ' चंद्रसेन ' रंगवूं लागला म्हणूनच आगरकर भाग्यशाली ठरले. ही गोष्ट कबूल केली तरी, शेक्सपीअरचा हॅम्लेट आगरकरांच्या चंद्रसेनांत बऱ्याच अंशानें उतरल्यामुळेंच आयर्व्हिंग आणि गणपतराव जोशी यांच्यांत पावगीना साम्य दिसलें नाहीं काय ? लॉर्ड स्टॅन्लेनें म्हटल्याप्रमाणें " सुटसुटीतपणें सामावेल तेवढेंच पुढची पिढी जपत असते, " हें जर खरें असेल तर शेक्सपीअरच्या हॅम्लेटनें धारण केलेल्या मराठी पेहेरावांत ' चंद्रसेन ' सर्वोत्कृष्ट आहे आणि विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत आगरकरांनीं हॅम्लेटची सूक्ष्म चर्चा केल्यावरून, " प्रत्येक अंग पाहतो तोच खरा कवि " या शॉच्या व्याख्येप्रमाणें आगरकरांची मार्मिकताही सर्वमान्य आहे. तरीपण, ' हत्तीसारखा कारागीर नाहीं, ' तसा शेक्सपीअरच्या हॅम्लेटसारखा त्याचा कोणताच अवतार नाहीं. एकतर विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत खुद्द आगरकरांनीं म्हटल्याप्रमाणें भाषांतरकारांनीं मूळ नाटकाच्या चालीरीतींत फरक करूं नये; तो आगरकरांनीं कांहीं ठिकाणीं तरी केलाच. शिवाय हरिभाऊ आपट्यांनीं टीका केल्याप्रमाणें शेक्सपीअरच्या पात्ररेखनाचा किंचित् विपर्यास, एकदोन ठिकाणीं अकारण कोट्या, क्वचित् शेक्सपीअरच्या भावनोत्कटतेचा अपुरा आविष्कार, असेहि दोष आगरकरांच्या विकारविलसितांत राहून गेले आहेत; आणि ते दाखवून दिल्याबद्दल आगरकरांनीं हरिभाऊ आपट्यांचें कौतुकही केलें आहे.

प्लेगजंतुसंशोधक म्हणून जपानच्या ' कितासाटो ' ला जितकें श्रेय तितकेंच मराठींत तुरुंगाच्या व्यवस्थेवर व तुरुंगांतील कैद्यासंबंधीं पुस्तक लिहिण्याचें श्रेय आगरकरांस आहे. जाटाला मुसलमान अगर खिस्ती मुलीशीं लग्न करून सुद्धां बहिष्कृत व्हावें लागत नाहीं, त्याप्रमाणें आगरकरांनीं डोंगरीच्या तुरुंगांतील आपला व टिळकांचा १०१ दिवसांचा अनुभव सांगतांना, तुरुंगांत येणारे " गुन्हेगार " हे गुन्हेगार कां होतात याची मीमांसा करून त्या सामाजिक प्रश्नाकडे समाजाचें लक्ष वेधलें असलें तरी, कोल्हापूरच्या बर्वेप्रकरणाच्या सुरवातीपासून विकारविलसिताला जन्म देऊन डोंगरीबाहेर आल्यावर देखील लोकांनीं जो सन्मान केला त्याबद्दल जनतेचे कृतज्ञ आभार मानण्याचें सूत्र आगरकरांच्या लेखणीकडून सुटलेलें नाहीं.

" लोकमत टाक नी छातिठोक ठाक " असें मार्क्स अॅरेलिअन म्हणत असे. जवळजवळ तशाच वृत्तीच्या आगरकरांचें लिखाणही त्याच धर्तीचें असणें अगदीं स्वाभाविक वाटतें; महाराष्ट्रीय लिखाणाची मोडमांडणी संस्कृतप्रधान सरणीनें सुद्धां स्पेन्सर–मेकॉले–शेक्सपीअरांच्या डौलावर जाते आहे असें दिसतांच मराठींतील

तत्कालीन प्रचलित व्याकरणें मागें सारून आगरकरांनीं बेनच्या रोखावर मराठी " वाक्यमीमांसा " केली. ब्रिटिश रियासतीनंतर मराठीला जें इंग्रजी डौलाचें वळण लागलें त्याचें शास्त्रीय पृथक्करण करणारें व्याकरण पाहिजेच होतें. आगरकरांच्या पुस्तकानें ही कामगिरी केली. शिवाजीराव होळकरांनीं सदर पुस्तकाच्या चारशें प्रति घेतल्या होत्या एवढी एकच गोष्ट आगरकरांच्या त्या पुस्तकाची योग्यता पटविण्यास पुरेशी आहे.

आगरकरांचें यापेक्षां सार्वजनिक लिखाण म्हणजे त्यांनीं ' मराठा ' पत्रांत लिहिलेले कांहीं इंग्रजी लेख होत. पण ते लेख किंवा आगरकरांचा साधारणपणें इंग्रजींत असलेला खाजगी पत्रव्यवहार हें आगरकरांच्या मराठी लिखाणाच्या मानानें अल्प आहे. हा पत्रव्यवहार म्हणजे रानडे पिढीचा चिपळूणकर पिढीनें राखलेला वारसा होय. पण एवढ्याच बाबतींत कशाला ? एकंदर लेखनाचा साकल्यानें विचार करतां इंग्रजी ग्रंथकारांची मराठी लेखकांवरील पकड चिपळूणकर–आगरकर पिढीलाच काय, पण अजूनही पुरी सुटलेली नाहीं. विष्णुशास्त्री यांच्या मराठी लेखनावर मेकॉलेच्या भाषाशैलीची दाट छाया पसरली असली तर आगरकरांच्या लेखनावर गिबनची आहे इतकेंच. ललित वाङ्मयांत शेक्सपीअर, तत्त्वज्ञानांत मिल, पण विशेषतः स्पेन्सर, आणि भाषाशैलींत कोणीतरी आवडता ग्रंथकार डोळ्यांपुढें असल्याचा " चिपळूणकरांची मराठी लेखकपिढी " नजरेसरशीं निर्वाळा देते. तथापि वक्तृत्वपूर्ण असा संस्कृतप्रधान सरणीचा मराठी संप्रदाय चिपळूणकरांच्या निबंधमालेनें प्रस्थापित केला; आणि तो चिरस्थायी करण्यासाठीं ज्या महाभागांनीं आपल्या लेखण्या शिणवल्या त्यांत पहिल्याप्रथम आगरकरांचें नांव सांगितलें पाहिजे. इंग्रजी संस्कृतीचे मराठी भाष्यकार म्हणून लेखणी चालवितांना इंग्रजी विचार आगरकर यांनीं इतक्या हृदयंगम रीतीनें पुढें मांडले आहेत कीं, ते वाचतांना उसनेपणाचा किंवा परकेपणाचा कोठें वाससुद्धां येत नाहीं. इतक्या समरसतेनें आगरकरांनीं आपलें प्रासंगिकही लेख लिहिले असल्याकारणानें ( फ्रेंच ग्रंथकार Torgot च्या लेखांशीं " नवीन जात कां करांना " तोलून पहा ) ते लेख होतकरू लेखकांना सूक्ष्म अभ्यासासाठीं प्रौढ वाङ्मयाचे आदर्श होऊन राहिले आहेत. असा सूक्ष्म अभ्यास करणारांना सहज कळून येतें कीं, पाश्चात्य संस्कृतीच्या भाष्यकाराची भूमिका आगरकरांनीं समरसतेनें पत्करली असल्यानें पुनरुक्तीचा दोष त्यांच्या लेखनांत उत्पन्न झाला आहे. तथापि तो दोष क्षम्य नाहीं काय? प्रसंग उत्पन्न करण्यांत नव्हे, तर प्रसंगाचा फायदा घेण्यांत राजकारणाची तशीच मत–प्रसाराची कुशलता असते. म्हणून पाश्चात्य संस्कृतीचें कलम हिंदी मनोवृत्तीला करण्याचें ध्येय बाळगणाऱ्या आगरकरांना पुनरुक्तीबद्दल फारसा बोल लावतां येणार नाहीं. तथापि घरच्या शिस्तीच्या प्रमाणांत राष्ट्राची इज्जत जशी जगांत रहात असते, त्याप्रमाणेंच विचारामागून विचार सुचत जाऊन डोक्यांत गर्दी करूं लागले, तरी शिस्तीनें त्यांची निवड करून आपल्या लेखन मर्यादेंत त्यांना बसवून प्रतिपाद्य विषय

वाचकांच्या मनावर लेखकाला ठसवायचा असतो. आगरकरांचें हें धोरण बहुत वेळां सुटलेलें आहे आणि वाचकांचा आठवडेच्या आठवडे खोळंबा झालेला आहे. स्वतःच्या या दोषाची जाणीव खुद्द आगरकरांना होती व त्यांनीं ती विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत शेवटीं बोलूनही दाखविली आहे.

अशा तऱ्हेचे दोष आगरकरांच्या लिखाणांत असले तरी ते कांहीं मुसोलिनीसारखे अधिकांत अधिक प्रसिद्ध पण अगदीं कमींत कमी उलगडा झालेले नाहींत. मंत्रतंत्रांच्या बाह्य भपक्यांनीं विवाह होत नाहीं, तर अंतर्यामींच्या संस्कारानें खरा विवाह जसा होतो, त्याचप्रमाणें आगरकरांचीं तीं पल्लेदार वाक्यें, त्यांचा तो शब्दावेग, त्यांची ती विलक्षण तळमळ, त्यांच्या मार्मिक कोट्या, किंवा रम्य विनोद,— एकंदरीनें पुन्हां पुन्हां वाचनाचा मोह पाडणारें विलक्षण मोहक व अलौकिक ठाणमाण यांच्यामध्यें आगरकरांनीं वृत्तपत्रांच्या व्यवसायाला जो प्रतिष्ठितपणा आणून दिला त्याचें बीज नाहीं, कीं मराठी भाषेचा गौरव आगरकरांनीं वाढविला त्याचा मुळवा नाहीं; तर वॉल्ट विट्मन् म्हणतो, त्याप्रमाणें जो आगरकरांच्या लेखनाला हात लावतो, तो त्यांच्या अंतःकरणालाच स्पर्श करतो, या गोष्टींत आगरकरी श्रेष्ठतेचें श्रेय सांठविलें आहे. वाचकांविरुद्ध केलेला बेमालुम कट म्हणजे सुंदर ललितकथा; तसाच आगरकरांच्या वाङ्मयाचाही प्रकार आहे.

आगरकरांचीं उत्कृष्ट सृष्टिवर्णनें, काव्यगर्भ भाग, उत्कृष्ट भाषेपेक्षां उत्कष्ट विचारांवरील लक्ष, पल्लेदार वाक्यांच्या पोटींहि मुख्य मुद्यावरील अढळ रोख, अपवादात्मक शिवराळपणापेक्षांही सणसणीतपणा, बुद्धिवादाच्या क्वचित् डोकावणाऱ्या एककल्लीपणाबरोबर आगरकरांच्या अंतःकरणाचा सरळपणा, त्यांची कळकळ, कुशलता, विनोद आणि त्याचबरोबर मिलच्या अनुयायाला न शोभणारा आगरकरांचा उतावीळपणा—हीं वाचकाच्या मनाची पकड सोडीत नाहींत.

स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना, सामाजिक स्थित्यंतरें, करून कां दाखवीत नाहीं? उद्योगवृद्धि, देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता, होऊंच द्या तर दोन हात, पुण्याचें लोकांनो सावध व्हा, सामाजिक सुधारणापरिषदेचे निंदक, गुलामांचें राष्ट्र, लोकशिक्षणावर गदा, हिंदुस्थानास क्षय लागला, इंग्रजी राज्याची उलटी बाजू, अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन, बहिष्कार, स्वदेशाभिमान, यांना कोणी विचारतां नाहीं काय? अनाथाचा वाली कोणी नाहीं?, भांडवल गेलें व्यापार गेला, इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार, वल्लभोपासना, चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें? प्रियाराधन, हे तुमचे पुढारी नव्हत, समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने, बोलके सुधारक व सुधारणानिंदक, महाराष्ट्रियास अनावृत्त पत्र, नेटिव लोकांस इंग्रजासारखें धाडस कधीं येईल? बंधनें कोण व कोणतीं घालणार? व्यापाराखेरीज तरणोपाय नाहीं, हिंदुस्थानापासून इंग्लंडास फायदे, आमच्या निकृष्ट स्थितीस कारण कोण? सोंवळेंओंवळें, ग्रामण्यप्रकरण, सुधारक काढण्याचा हेतु, समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक व्यापारवृद्धि, वाचाल तर चकित व्हाल, इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत

नाहीं, राज्यतृष्णा, भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन, हिंदुस्थानांतील अन्नान्न दशेचे दुष्परिणाम, मि. अॅशबर्नर व हिंदु विधवा, आणखी एक शहाण्याचा कांदा, हिंदु लोकांची अविश्वसनीयता, सणांचा व खेळांचा ऱ्हास, इंग्रजी राज्यांत खावयास मिळत नाहीं, लोभमूलानि पापानि, शास्त्राभ्यास वगैरे लेखांतून आगरकरांचें अंतःकरण खुलें झालेलें आहे.

डार्विन आणि स्पेन्सर हे जसे विकासवादाचे प्रवर्तक तसेच संस्कृतप्रधान मराठी गद्यसरणीचे प्रवर्तक चिपळूणकर व आगरकर होत. धडधाकट प्रकृति आणि गडगंज संपत्ति यांच्या आसऱ्यानें नवें ज्ञान मिळवतां मिळवतां नांव गाजवावें अगर कीर्ति कमवावी हें स्पृहणीय नाहीं असें म्हाताऱ्या माणसाला देखील म्हणतां यावयाचें नाहीं. मग वरील वैभवाच्या भरीला तारुण्य असलें तर तो दिमाख काय विचारावा ? चिपळूणकर आगरकरांनीं आपलें वैभवशाली वाङ्मय तारुण्याच्या धडाडीनें लिहिलेलें आहे. महाराष्ट्राच्या आधुनिक पंचप्राणांत आगरकरांना जें स्थान आहे, तें पाश्चात्य संस्कृतीचे मराठी भाष्यकार म्हणून केवळ नव्हे; तर ती भाष्यकाराची भूमिका आगरकरांनीं महाराष्ट्रांत नवचैतन्योत्पादनाच्या दृष्टीनें पतकरली होती म्हणून आहे. " मी एका ना दुसऱ्या वर्तमानपत्रासाठीं ( मराठा, केसरी व आतां सुधारक ) लेख लिहीत आहे, आणि त्याबद्दल त्या पत्रांच्या उत्पन्नांतून मला एका पैचीही प्राप्ती झालेली नाहीं. . .मी हें काम निष्कामबुद्धीनें करीत आलों आहे " असें जे उद्गार आगरकरांनीं कै. सीतारामपंत देवधरांना लिहिलेल्या पत्रांत काढले आहेत, त्यांतील रहस्य लक्षांत घेतलें आणि मृत्यूच्या अगोदर थोडेच दिवस आगरकर जें म्हणत कीं, " मला जें लोकांना सांगावयाचें होतें तें मी सर्व सांगितलें आहे. आतां केव्हांही मरण्याची माझी तयारी आहे. " हें त्यांचें सूक्ष्म सूत्र पाहिलें, तर समाज अंगावर उलटून पडण्याइतपत विचारकलह चेतविणाऱ्या आगरकरांच्या लिखाणांतील " आपल्या मतांविषयीं अभिमान व कार्याविषयीं निष्ठा, " आणि त्या दोहोंच्या पार्श्वभूमीवर आशीर्वादाचे हात करून राहिलेला देशाभिमान ठसठशीतपणें डोळ्यांत भरल्याशिवाय रहात नाहींत. गंगाजलसदृश अशा विशुद्ध अंतःकरणांतून तुफानवेगानें उचंबळून आलेल्या भावनांचा वक्तृत्वपूर्ण आविष्कार आगरकरांच्या वाङ्मयांत कित्येक वेळां अमर्याद झाला असला तरी त्यांतील तेजस्विता नेहमींच आदरणीय वाटते. ( शहाण्यांच्या मूर्खपणांतील " हिंदुधर्मास जाहीर नोटीस " पहा. )

कोणत्याही राष्ट्राचा अभ्युदय कधीं काळीं होणाऱ्या महात्म्याच्या अवतारावर अवलंबून नसतो; तर एकाच ध्येयानें प्रेरित होऊन काम करीत राहणाऱ्या मुत्सद्यांच्या अखंड साखळीवर अवलंबून असतो. आगरकरांच्या वाङ्मयाचें धवल यश देखील त्यांनीं आपल्या काळीं प्रतिपादिलेल्या " अभिनव " मतांवर अवलंबून नसून, लोकांमध्यें " चैतन्य " उत्पन्न करण्याच्या एकाच बुद्धीनें कोणत्याही लेखाच्या शीर्षकापासून तो पर्यवसानापर्यंत आगरकरांनी जीं आपली लेखनकलेचीं अंगें उपयोजलीं त्यांच्यावर आगरकरी वाङ्मयाचें यश विराजमान झालेलें आहे.

# गोपाळ गणेश आगरकर

| वाचावाच असा भाग | मूळ लेखन |
|---|---|
| १ गंध<br>२ बायकांचें गोंदणें | गंधलेपन |
| ३ व्यक्तीचा अंमल | राजकीय संस्थांविषयीं सामान्य विचार |
| ४ जातीभेदापासून फायदे | सामाजिक स्थिति व गति |
| ५ जातीभेदाचे तोटे | जात कां करीत नाहीं ? |
| ६ वर्तमानपत्र<br>७ " " | १ सरकार व रेल्वे कंपन्या<br>२ के. नि. नि. १ लें पु. प्रस्तावना |
| ८ हिंदुस्थानची शेतकी | आमचा व्यापार वाढणार काय ? |
| ९ सुधारणा व समाज<br>१० समाजाची सुधारणा<br>११ सामाजिक व राजकीय सुधारणा<br>१२ खऱ्या सुधारणेची दिशा | करून कां दाखवीत नाहीं ?<br>फेर जमाबंदी व लष्करी खर्च<br>गुलामांचें राष्ट्र |
| १३ विचारशक्तीचा कमीपणा | स्पृहणीय चूक |
| १४ सण | सणांचा व खेळांचा ऱ्हास |
| १५ सत्यान्नास्ति परोधर्मः | हिंदू लोकांची अविश्वसनीयता |
| १६ हिंदूंची उणीव | अशानें निभाव कसा लागेल ? |
| १७ सृष्ट्यवलोकनाचे फायदे | सृष्ट्यवलोकन |
| १८ शास्त्रीबुवा | कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर |
| १९ कवि<br>२० कवि व कोशकार | कवि, काव्य, काव्यरति |
| २१ लोकाग्रणी | सुधारकाचें साध्य |
| २२ शिक्षणाचा उपयोग | समाजोत्कर्षाचा एक घटक |
| २३ प्रगति | सामाजिक स्थित्यंतरें |
| २४ शोचनीय स्थिति<br>२५ हिमालयावरील ढग | हिमालय वर्णन |
| २६ तुरुंगांतील कैदी<br>२७ सत्याचा जय | डोंगरींतील १०१ दिवस |
| २८ स्त्रीशिक्षण | हिंदुस्थान देश ठार बुडाला हो बुडाला ! |

| | |
|---|---|
| २९ आमचा इतिहास | भारतीय कलांचें पुराणत्व |
| ३० ऐहिक कुबेरनगरी | आमचें घोर दारिद्र्य |
| ३१ ब्राह्मणी पगडी | पुरुषांचा पेहराव |
| ३२ माशाची मशाल | पेट घेणारा मासा |
| ३३ नाटक पहाणें व वाचणें | विकारविलसित प्रस्तावना |
| ३४ शेक्स्पीअर | |
| ३५ महाकवीची कल्पना | |
| ३६ जगणें व मरणें | विकारविलसित अंक ३ प्र. १ |
| ३७ अभिनय | " " " २ |
| ३८ म्हातारे चिनी | चीन देशाविषयीं कित्येक गोष्टी |
| ३९ नायगारा नदी | नायगाराचा धबधबा |
| ४० आक्टोबरांतील महाबळेश्वर | महाबळेश्वर वर्णन |
| ४१ किल्ले प्रतापगड | |
| ४२ ब्रह्मारण्य | |
| ४३ चंद्र व सूर्य | सूर्यावरील ठिपके |
| ४४ केरूनाना | कै० रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे |
| ४५ हिंदुस्थानचा त्रिकोणाकृति चित्रपट | सुधारक काढण्याचा हेतु |
| ४६ विचारी | " " |
| ४७ पशु | आमचें काय होणार ? |
| ४८ धर्मवृत्ति | " " |
| ४९ निरपेक्ष बुद्धि | स्त्रियास चारितार्थाचें शिक्षण देण्याची आवश्यकता |
| ५० जुलूम | सामाजिक स्थित्यंतरें |
| ५१ ग्रंथ | वाचन |
| ५२ विश्वप्रदर्शन | ज्ञान |
| ५३ भारतीय वैभव | भारतीय कलांचें पुराणत्व |
| ५४ पेकीन | पेकीन शहराचें वर्णन |
| ५५ लेसेप्सचा उद्योग | स्वेझचा कालवा |
| ५६ महाराष्ट्रावर स्त्रैणत्वाचा आरोप | आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा |
| ५७ संताप | विकारविलसित अं. १ प्र. २ |
| ५८ उपदेश | " " " ३ |

## प्रकरण ६ वें

# धर्मवृत्त आगरकर

स्टॉक्लीज या ग्रीक मुत्सद्याची अशी गोष्ट सांगतात कीं, तीव्र स्मृतिमुळेंच "विस्मृती"चा उपाय तो विचारीत फिरे. आगरकरासंबंधीं बाह्य गोष्टींचा पगडा समाजाच्या मनावर एवढा आहे कीं, धर्मदृष्ट्यातरी आगरकर पारखावयास स्टॉक्लीज-सारखीच प्रार्थना करीत बसावें लागेल. पौर्वात्य सुधारणेचा वृक्ष वठलेला आहे म्हणून तो पुष्कळसा खची करावा, त्यावर पाश्चिमात्य सुधारणेचें कलम चढवावें वगैरे गोष्टी सांगून युरोपियन संस्कृतीचे मराठी भाष्यकार आगरकर बनले, त्यांनीं हिंदुधर्माला जाहीर नोटीस दिली, प्रेतसंस्कारापासून मूर्तिपूजेपर्यंत सगळ्या हिंदू चालींची टवाळी केली वगैरे गोष्टीच तेवढ्या आगरकरांच्या नांवाबरोबर इतक्या झपाट्यानें उच्चारल्या जातात कीं, इलियड आणि आडेसी हीं काव्यें अवघ्या एकवीस दिवसांत पाठ करणारा फ्रेंच पंडित जोसेफ स्कॅलिगर फिक्का पडावा !

फिरून फिरून एकाच क्रमानें दोन हजार शब्द म्हणणाऱ्या ग्रीक पंडित सेने-काप्रमाणें, आगरकरांच्यासंबंधी कांहीं गोष्टी कोणीही कितीदां जरी सांगितल्या, तरी "सर्व यशे प्रतिष्ठितं" ची शिकवण देणाऱ्या हिंदुधर्माला आगरकरांनीं देशसेवेसाठीं आमरण दारिद्र्य पतकरून मान दिला होता यांत शंका नाहीं. आपल्या हेन्रीयड काव्याची समाप्ति जशी व्हाल्टेअरनें स्वप्नावरून केली, तशी आमरण त्यागाच्या देशसेवेची दृढ स्फूर्ति आगरकरांना तत्कालीन मिशनऱ्यांच्या उदाहरणावरून झाली, असें कोणी म्हणो !! पण वस्तुस्थिती अशी आहे कीं, फेलिक्स प्लॅटर झोपेंत सतार वाजवी, तशीच आगरकरांनीं विद्यार्थीदशेच्या सुखनिद्रेंतच आपल्या आयुष्याची सतार लावून ठेवली होती. तर मग ( ग्रीक ) डेल्फीच्या देवळांतील पुजारणीच्या कौलाप्रमाणें आगरकरांच्या वडिलार्जित लेण्याचा भाग होता काय ? नाहीं.

बेकन म्हणतो त्याप्रमाणें रात्रीं काम करण्यापासून आयुष्य कमी होतें, हें जर खरें, तर अंगीं योग्यता नाहीं म्हणून काढावें लागलेलें दारिद्र्य हें अंगीं धडगच्च संपत्ति मिळविण्याची योग्यता असतांना देशसेवेसाठीं पतकरलेल्या दारिद्र्यापुढें कवडी-मोल ठरतें, हेंही खरें नाहीं काय ?

तात्पर्य, फ्रेंच ज्योतिषी लॅकेल हा आपल्या कुबडीवरून तारे न्याहाळी, तसें आगरकरांच्या धर्ममतांचें जर आपण निरीक्षण केलें, तर निराळाच प्रकाश पडेल, आणि समकालीनांचे शेरे लक्षांत घेतां आगरकर जितके नाठाळ नास्तिक वाटतात, त्याऐवजीं ते खरोखरच धर्मवृत्ति होते अशी खात्री पटेल. आपल्या टोपीमध्यें मेणबत्ती ठेवून तिच्या उजेडांत चित्रें काढणाऱ्या फ्रेंच गिरोडेटचा दक्षता मात्र आपण राखली पाहिजे.

सिसिलीचा मँगिओमिली धनगर तोंडानें हिशेब करी, तसें थोडक्यांत बिनचूक बोलावयाचें तर "मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव।" असें सांगणाऱ्या आमच्या संस्कृतीचें अधिष्ठान विविध तऱ्हांच्या "ऋण" वर आहे. कार्डिनल मेसोफँटप्रमाणें छप्पन भाषांत बोललें तरी काळाच्या प्रत्येक रंगपालटीला तोंड देण्याकरितां तयार झालेल्या निरनिराळ्या स्मृतीचे कर्ते 'देवांच्या, पितरांच्या व समाजाच्या ऋणावर' नजर देऊन होतें एवढी एकच गोष्ट अढळ आहे. "जगतः स्थितिकारणं साक्षादभ्युदयानिः श्रेय सहेतुर्धः सधर्मः" ही आचार्यांची काळकरूव्याख्या वा समर्थांचा महाराष्ट्रधर्मध्वनी मानवी ऋणें लक्ष्यांत घेऊनच बौद्ध व इस्लामी धर्म पचनी पाडले.

रोमचा सहावा पोप क्लीमंट याच्या डोळ्यास इजा झाल्यामुळेंच त्याची धारणाशक्ति वाढली, तसाच दाखला बौद्धधर्मासंबंधांत आहे. हिंदुधर्मांतील यज्ञहिंसेला बैतागूनच बौद्धधर्मानें अवतार घेतला असल्यामुळें त्याची ऋणमूळ संस्कृति सुटली नव्हती. आणि वाडिलार्जित मिळकतींत भावासारखाच बहिणीचा भाग ठेवणारा इस्लाम धर्महि ऋणमूळ संस्कृतीवरच अधिष्ठित होता. या समरूप अधिष्ठानामुळेंच त्या त्या धर्मावर छाप ठेवतांना आर्यधर्मास जड गेले नाहीं. पाश्चात्य संस्कृतीची तशी गोष्ट नाहीं. "हक्क व त्याची बजावणी" या तत्त्वावर पाश्चिमेच्या संस्कृतीचें आधिष्ठान आहे. विचारच केला तर "हक्क आणि त्याची बजावणी" ही ऋणापासून फारशी दूर नाहींत. कारण स्वताच्या हक्क बजावणींत दुसऱ्याच्या हक्क जपणुकीचाही अंतर्भाव होतो. या दुसऱ्याच्या हक्क जपणुकीच्या योग्यतेनुरूप भावनेंतच ऋणांचा अंतर्भाव होतो.

मात्र हक्काच्या मागें "काढलेली छाती आणि उत्तान नजर" तर ऋणाच्या मागें "कृतज्ञतेची सरळ नजर" असत. तेव्हां पाश्चात्य संस्कृतीचें पाणी येथें लागू लागल्याबरोबर हक्कबजावणीची त्याची मर्यादा राखून ऋणमूळ संस्कृतीला काळाचा लगाम हातीं धरावयाचा होता. ब्राह्मो–प्रार्थना–आर्य समाज यांचे प्रयत्न आपल्या परी या ध्येयासाठींच धडपडत होते. सबलत्वानें अगर दुर्बलत्वाने या ध्येयासाठींच धडपडत होते. तथापि आपला प्रभाव म्हणून कसला तो आगरकरांच्या वेळेपर्यंत एकानेंही दाखवला नव्हता. त्यामुळें हक्कप्रधान पाश्चात्य संस्कृतीशीं मेळ घालणारी आचारप्रणाली भिन्नभिन्न संस्कृतींचा 'प्रयाग' साधूं पहाणाऱ्या प्रयत्नांत आगरकरांस सांपडली नाहीं. प्रचलित कर्मठपणांतील वैय्यर्थ ओळखून बसलेले आगरकर पश्चिमेकडून आलेली हक्कमूळ संस्कृती येथें आपला प्रताप गाजवल्याशिवाय राहणार नाहीं हें जाणून होते. तथापि—

"स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते

सुधारणा करीत नसून केवल शृंखलांतर करतात! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींही सुटायची नाहीं."

असें आगरकरांचें अंतःकरण बोलत असल्याकारणानें, "धर्मवृत्त आगरकर" हे शब्दच एके ठिकाणीं बसूं शकत नाहींत असा शेरा मारण्यापूर्वी तीनदां विचार करावा लागेल. या मर्त्यलोकांत जन्माला आलेल्या जीवाचें अंतिम ध्येय मोक्ष असलें, तरी त्या मोक्षाला जाण्याच्या अनेक पायऱ्या हिंदुधर्मानें सांगून दिल्या आहेत. "सर्वांस संधि, कुणा न वंदी" अशा उदार वृत्तीचा हिंदुधर्म "कृण्वन्तो विश्वमार्यम्" असा आदेश आपल्या अनुयायांस देत असतां "स्वधर्मांत आणि स्वाचारांत" राहूं इच्छिणाऱ्या आगरकरांना हिंदुधर्माच्या दरबारांत "नास्तिक्याच्या" कोपऱ्याशिवाय स्थान नाहीं, असें तरी कसें होईल?

पहा, आगरकर लिहितातः—

"विचारानें क्षुद्रबुद्धि निरस्त होऊन मन विस्तृत झालें, आणि 'वसुधैव कुटुंबकम्' अशी वृत्ति त्यांत उत्पन्न झाली म्हणजे जो आनंद होतो तो कांहीं अनिर्वाच्य असतो."

धर्माचें नांव कोणतेंही असो, मनुष्याच्या आत्मिक उन्नतीच्या दृष्टीनें धर्माचें ध्येय सच्चिदानंदच होय. हा अनिर्वाच्य आनंद ज्याच्या वाट्याला आला तो अशी कांहीं कर्तबगारी करतो कीं, पायांपुरतेंच पाहणारी भोळी नजर त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार समजते.

"बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति आनंदमय होऊन एकप्रकारें ज्याचें देहावसान सुटतें असा एकादा महात्माच, आईबापांची, गणगोताची, जातीची, देशाची किंवहुना सर्व मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अंतरोत्थित अमर्याद प्रेरणाबलाच्या भरंवशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तडीला नेतो."

अद्वितीय कर्मयोग्याची ही योग्यता एकाएकी प्राप्त होत नाहीं.

"प्रकृति आणि पुरुष किंवा परब्रह्म आणि माया यांचा संयोग झाला तेव्हां जगदुत्पत्ति झाली व जें समागमत्व जगाच्या आद्योत्पत्तीस कारण झालें, तेंच त्याच्या चैतन्योत्पत्तीस कारण होत आहे."

किंवा पदार्थमात्र अविनाशी असून निसर्गाचे नियम अबाधित चालतात–आधुनिक शास्त्रांचा हा सिद्धांत ज्या मनाला ज्ञानेंकरून पटला, त्याचीच वृत्ति 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं...मम तेजोंशसंभवम्' हें ओळखूं लागतें आणि त्या मनाचा माणूस 'यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति' असा बनतो. अस्सल वेदान्ती म्हणतात ते अशालाच. 'अहं ब्रह्मास्मि' हा चोखाळलेला अनुभव याच्याजवळ असतो, मग त्याची त्याला बोलून दाखविण्याइतकी खळबळती जाणीवही नसेल!"

'ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी॥' असा मनाचा मगदूर बनून अंतरोत्थित प्रेरणाबलाच्या जोरावर महत्कार्यें तडीला नेणारा हा वेदांतीच, अस्सल संन्यासधर्म आचरीत असतो. हा संन्यासी "अहं ब्रह्मास्मि" म्हणो अगर

न म्हणो; किंबहुना, अंतिम दृष्टीनें बोलावयाचें तर त्या तीन संस्कृत शब्दांत प्रगट झालेल्या भावाची त्याला पुसट जाणीवही नसो ! " ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या " असें म्हणत तो आपलें कार्य करीत असतो. " या विश्वांतील कोणतीही सचेतन किंवा अचेतन वस्तु स्थिर नाहीं; प्रत्येक क्षणास प्रत्येकींत दृश्य किंवा अदृश्य फेरफार होत आहेत, असें एकदां कळून येणें फार महत्वाचें आहे. "

ज्ञानानेंच मोहवश होणाऱ्या मानवी मनाला प्रत्येक क्षणीं पालट खाणाऱ्या सर्व वस्तूंत अबाधित असणाऱ्या चैतन्याचा आनंदानुभव घ्यावयास सांपडतो. या आनंदापुढें ' संसारसुखाची कहाणी । ऐकिजेल श्रवणीं ॥' तेव्हां बृहदारण्यक उपनिषदामध्यें म्हटल्याप्रमाणें ' इयं पृथिवी भूतांना मधु, एष प्राणः भूतांनां मधु......मधु स्रवन्ति सिंधवः, माध्वीर्नः संतु औषधीः ' इतक्या आनंदीवृत्तीनें मोहरून निघालेला जीव–सच्चिदानंदाचा हा क्वचित संधि धर्माच्या व्यक्तिनिष्ठ बाजूची बेफाट उडी आहे.

" धारणाद्धर्म इत्याहुर्धर्मो धारयते प्रजाः " म्हणून " जगतः स्थिति " कारणा–करितां प्रत्येक धर्म अवतरला असला तरी, किंवा कालखंडोचित त्याची पुनः पुनः संस्थापना झाली असली तरी ती तत्कालिन ज्ञात अगर दृष्ट्यंतर्गत जगापुरतीच होती.

धर्मसंस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ॥
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥

हें समर्थवचन लक्षांत घेतल्यास, विशिष्ट–धर्म–मर्यादित अशा जगाच्या प्रत्येक विशिष्ट भागांत सच्चिदानंदानें देहबुद्धि सांडून अंतरोत्थित प्रेरणा–बलाच्या जोरावर विशिष्ट धर्मदृष्ट मानवतेंत महत्कार्यें तडीस नेलेलीं आढळतील. पण चराचर वस्तूंनीं भरलेल्या जगाचा निःश्रेयसभ्युदय साधणारे कार्य कोठें आढळेल ? धर्मदृष्टीचा हाच पल्लेदार टप्पा विचारकक्षेंत आला असला तरी कार्यकक्षेंत अजून आला नाहीं, इतकेच नाहीं, तर यच्चयावत् मानवतेलाहि त्या कार्यकक्षेंत अजून प्रमुख स्थान नाहीं. एक मानवसमाज संस्कृतिभिन्न अशा दुसऱ्या मानवसमाजाच्या संघटन-सरहद्दींत जोपर्यंत आला नव्हता तोपर्यंत ज्या त्या धर्माच्या संस्थापनेचे नर पूज्यतम वाटले तरी संस्कृतिसंमेलनानें विकासणाऱ्या दृष्टीला ते तोटके वाटूं लागतात. ' प्रेमाचा आणि दयेचा देव ' नीत्सेला वरील विकसित दृष्टीमुळेंच सांदीकोपऱ्यांत टाकण्याच्या लायकीचा वाटला. भिन्न भिन्न संस्कृतीच्या धर्मांची छाननी केल्यावर–

" यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनः ।
बौद्धा बुद्ध इति हयूहूर इति वा झोरास्टरस्यानुगाः ॥
माशीहेति यहूदिनो जिन इति ध्यानस्थ तीर्थंकराः ।
ख्रैस्ता येशुरिति प्रभुः स विजयेत् तुर्कस्य पैगंबरः ॥ "

असा प्रज्ञेचा सिद्धांत होतो आणि मानवतेच्या धर्मावर प्रज्ञा स्थिर होते.

" जगाची सुधारणा म्हणून मनुष्य जातीचें कांहीं एक कर्तव्य आहे. तें त्यांच्या बुद्धिश्रमानें होतें " हा सिद्धान्त अशा तऱ्हेनें पटतो. तथापि जागतिक सुधारणेचा कर्तव्यपाठ

प्रज्ञा घेत जाईल तशी " काम्यानां कर्मणां न्यासा " च्या योगानें ती असा सच्चिदानंद भोगत असते कीं कित्येक वेळीं त्या भोगाचें अगर सच्चिदानंदस्वरूप जगत्कारणाचेंही तिला भान रहात नाहीं. संस्कृतीसंघटनाचा सूक्ष्म अभ्यास असें दाखविल्याशिवाय सोडत नाहीं कीं—

" धर्मसंबंधानें चोहोंकडे आतां ज्या समजुती आहेत त्या समूळ बदलून, किंवा त्यांत फेरफार होऊन, आतांहून अगदीं भिन्न असा धर्म शब्दाचा अर्थ लोक समजूं लागतील. न जाणो; ईश्वरावरील श्रद्धा नाहींशी होऊन निरीच्छ बुद्धीनें मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीं झटणें हेंच धर्माचें खरें तत्त्व होऊन बसेल ! " संस्कृतिसंघटनाच्या तोंड ओळखीनें अगर हृदयाच्या अभिजात व्यापकतेनें बुद्धीला हे वारे लागल्यावर, मंत्रांच्या शब्दपांडित्यानें आणि तंत्रांच्या कवाईतीनें प्रज्ञाहत-अर्थात् सुभाषितकाराच्या म्हणण्याप्रमाणें सुहृत म्हणजे जिवंत प्रेत होऊन राहणें न मानवणेंच साहजिकच नाहीं काय ? ज्या धर्माच्या संस्कृतींत, आचारप्रणालींत अगर मंत्रसिद्धींत हें सामर्थ्य नसेल तो धर्म मानुषानंदाच्या बाबत लंगडा पडल्याशिवाय खास राहणार नाहीं. " युवा स्यात् साधु युवा स्यात् आशिष्ठो द्रदिष्ठो बलिष्ठः, तस्य इयं सर्वा पृथ्वी वित्तेन पूर्णा स्यात् ...... स एको मानुषानंदः ॥ " अभ्युदयाची ही विचारसरणी तैतरीय उपनिषदानें मांडली असल्याकारणानें मानुषानंदाचें सामर्थ्य हिंदुधर्माच्या आटोक्याबाहेर नाहीं हें सुस्पष्ट होईल. स्वातंत्र्य, संपत्ति, पराक्रम व नीति हे चतुष्टय अगर सर्वांगीण उन्नति म्हणजेच अभ्युदय असा बुद्धियोगाधिष्ठित भगवद्गीतेचा आशय आहे. हिंदुधर्माची ही विजयिष्णु बाजू संघटन–सरहद्दींत आलेल्या कसल्याही संस्कृतीला आत्मसात केल्याशिवाय सोडणार नाहीं अशीच आहे. ऋणमूळ हिंदु संस्कृति हक्कमूळ पाश्चात्य संस्कृतीशीं संगम साधून प्रभावशाली ठरेल ती वरील कारणामुळेंच.

"मनुष्याच्या स्थितीस पूर्णता येणें बहुधा अशक्य आहे, पण ती येईपर्यंत सुधारकाच्या मनाची शांति व्हावयाची नाहीं. " असा निर्वाळा देणाऱ्या आगरकरांना आशा होती कीं, " मनुष्याच्या अंतःकरणांत परमेश्वरानें प्रेरिलेल्या न्यायवासनेमुळें, पुढेंमागें जगास असा दिवस खास येणार आहे कीं, ज्यावेळेस राष्ट्रा–राष्ट्रांमधला किंवा मनुष्यामनुष्यांमधलाचसा काय पण स्त्रीपुरुषांमधला प्रत्येक व्यवहार एकमेकांच्या संमतीवाचून चालणार नाहीं. " अभ्युदयाची ही आत्यंतिक कल्पना म्हणजे " पूर्वपाश्चिम–सुधारणांतील अत्यंत हितकारी भाग जीत सामील झाले आहेत— "

अशी एक नामी सुधारणा होय. ही सुधारणा घडवून आणण्याचें सामर्थ्य हिंदुधर्माच्या उपरिनिर्दिष्ठ विजगीषु अंगांत असल्याची जाणीव मात्र आगरकरांस दिसली नाहीं. किंबहुना सदर भागच त्यांच्या अवलोकनांत आला नसेल !

" ज्यानें खऱ्या ज्ञानाचा लोप केला व घोकंपट्टीस उत्तेजन दिलें; धर्मविचारांची व मनाची फारकत करून टाकली; व त्यांचें सारें रहस्य शरीराच्या बाह्य कवायतींत आणून सोडलें " असा कर्मठपणाच धर्माभिमानी म्हणविणारांमध्यें आगरकरांच्या वेळीं वावरत असल्याकारणानें आणि हिंदुधर्माच्या प्रमाणग्रंथाचें आगरकरांचें पुष्कळसें

ज्ञान न्याय-मूर्ति तेलंग, रा. सा. मंडलीक अगर डॉ. भांडारकर यांच्या सारख्यांच्या इंग्रजी पुस्तकांवरून असल्याकारणानें, आगरकरांच्या मननशील वाचनाची स्वतंत्र गांठ हिंदुधर्म ग्रंथाशीं झालीच नाहीं. शिवाय,

" ज्या देशांत प्रतिवर्षी कोट्यवधी मनुष्यप्राणी जन्मास येत आहेत व परलोकास जात आहेत, त्या देशाच्या एखाद्या कोपऱ्यांत एखाद्या शतकांत एखाद्या व्यक्तीनें किंवा लहानशा व्यक्तिसमुदायानें थोडीशी चळवळ केली तर तेवढ्यावरून एवढें विस्तीर्ण राष्ट्र वास्तविकपणें सचेतन असून त्याची प्रगति होत आहे असें म्हणतां येत नाहीं. चंद्रगुप्तापासून रावबाजीपर्यंत जो आमचा लांबच्या लांब इतिहास आहे किंवा जो आम्ही लांबच्या लांब काळ घालविला त्यांत तोडरमल्ल पूर्णय्या, किंवा भवभूती यांसारखे कांहीं पुरुष होऊन गेले, अथवा रजपुतान्यांतील रजपुतासारखे किंवा महाराष्ट्रदेशांतील मराठ्यासारखे कांहीं लढवय्यें होऊन गेले, असें सांगितल्यानें आमच्या ऐतिहासिक शून्यतेस विशेष बाध येतो असें आम्हांस वाटत नाहीं. "

भारतीय इतिहासाचें हें स्पष्ट सिंहावलोकन स्वातंत्र्य, संपत्ति, पराक्रम आणि नीति यांच्या समुच्चयाचा वासमुद्धां देण्यास नाकारीत असतां, वर्तनीं विपरीत दिसणाऱ्या हिंदु संस्कृतीचा पाश्चात्य संस्कृतीशीं झगडा सुरू झाल्याबरोबर, " हिंदुसुधारणेच्या बऱ्याच भागास पड खावी लागून रणांगणांतून आपला पाय काढून घ्यावा लागेल, आणि तिच्या जागीं विजयशाली पाश्चिमात्य सुधारणेचा भाग प्रस्थापित होईल. " असें अनुमान आगरकरांनीं काढलें असलें तर त्यांत अनैसर्गिक कांहीं नाहीं. फार काय, दया, प्रेम, न्याय स्वातंत्र्य हीं जीं धर्माचीं मूळ अंगें त्यांचा सप्पा खून पाडणाऱ्या कित्येक कालविपर्यस्त रुढीवरून —" जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणें आम्हां साऱ्या अज्ञ लोकांस त्वां मारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळें, आज कित्येक युगें अशक्य गोष्टी आम्ही शक्य मानीत आहों व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरतां तीं बेलाशक करीत आहों ! पण ध्यानांत ठेव; या तुझ्या अश्लाघ्य निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदीं समीप येऊन ठेपला आहे ! आजपर्यंत त्वां आह्मांस ज्या असह्य यातना भोगण्यास लावलें आहे व अनन्वित कर्में आम्हांकडून करवलीं आहेस त्यां सर्वांबद्दल तुझीं पाळेंमुळें खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्होळांत तुझी आहुती देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे! तेव्हां जर तुला आपल्या अस्तित्वाची आकांक्षा असेल तर शुद्धीवर ये आणि आमच्या सर्व शरीरभर कांचत असलेले तुझे पाश काढून घे; नाहींतर भरतखंडांत तुझें नांव देखील उरणार नाहीं ... तूं वृत्तीवर आलास आणि काळास उचित असें वर्तन करूं लागलास तर ठीकच आहे; नाहींतर तुझें नशीब तुझ्याबरोबर !"

अशी अंतःकरणाच्या तळमळीनें आगरकरांनीं हिंदुधर्मास नोटीस दिली असली तरी तें त्यांच्या हृदयविशालतेस साजेसेंच नाहीं काय ?

पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचे हात एकमेकांस लागून जो झगडा सुरू झाला त्यांत हिंदुसंस्कृतीची अभ्युदयसाधक अशी व्यवहारी बाजू दिसत नाहीं, ती पाश्चिमात्य

सुधारणेंत दृष्टीस पडते असें आगरकरांच्या मनानें घेतल्यामुळें ते पाश्चिमात्य सुधारणेचे मराठी भाष्यकार बनले. कारण संस्कृतींच्या झगड्यांचा परिणाम म्हणून त्यांनीं स्पष्ट पाहिलें होतें कीं मानवी सुखांची परमावधि हेंच संस्कृतिसंघटनाचें ध्येय असणार आहे. तेव्हां:—

" मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हेंच त्यांस उचित होय " असें उपदेशणाऱ्या आगरकरांनीं तसेंच केलें हें काय सांगावयास हवें ?

" संसारीं खोटा, तो परमार्थीं खोटा " या न्यायाप्रमाणें मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन ऊर्फ नेटक्या संसारावर आगरकरांनीं भर दिला असला तरी त्यांतूनच परमार्थविवेक उत्पन्न होतो असें त्यांचें म्हणणें होतें.

" ज्यांना थोडीबहुत विद्या प्राप्त झाली आहे, त्यांचीं मनें कधीं ना कधीं तरी प्रापंचिक विचारांना सोडून जगदुत्पत्ति, जगदात्मा, जीवात्मा, परमात्मा, पुनर्जन्म— यांसारख्या गहन विषयांत भ्रमण करीत राहतात. "

अर्थात्—

" जों जों बुद्धीचा विकास होऊन कार्यकारणांचा संबंध चांगला कळूं लागतो तों तों प्राथमिक व पौराणिक कल्पना मिथ्या भासूं लागून भूतपिशाच्च, देवदानव वगैरे शुद्ध कल्पनेनें उत्पन्न केलेल्या शक्तींची असत्यता प्रत्यायला येते, पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते, व कांहीं वेळ सर्व ब्रह्मांडास उत्पन्न करून त्याचें परिपालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढें वेदान्तविचाराच्या कुंडांत पेटलेल्या अग्नींत हें द्वैतही खाक होऊन जातें आणि अहं ब्रह्मास्मि एवढा अनिर्वचनीय विचार मागें राहतो. व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या विचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व धर्म तुच्छ आहेत. "

यालाच तुकारामांच्या भाषेंत " नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता " असें म्हणतात. पण भूतमात्रांस नम्र व्हावयाचें म्हणजे मनुष्यमात्रास नम्र व्हावयास नको काय ? त्यासाठीं—

" प्रत्येक मनुष्याला आपल्या आवडीनावडीप्रमाणें, चाहील त्या सुखाचा यथेच्छ उपभोग घेतां येण्यास, सार्वजनिक गोष्टींकडे त्याच्या चित्ताचा कांहीं भाग निदान मधून मधून तरी वेधला पाहिजे. "

अशी हक्कमूळ संस्कृतीची शिफारस आहे. या शिफारशींत समाजव्यवस्थेच्या निर्बंधनासाठीं व्यक्तीकडून त्यागाची अपेक्षा आहे. उलट असला त्याग एक कर्तव्य आहे अशी ऋणमूळ संस्कृतीची शिकवण " त्यजेदेकं कुलस्यार्थे " वगैरे श्लोकद्वारा आहे. त्यागाशिवाय, यज्ञाशिवाय, नम्रपणाशिवाय समाज आणि त्याची धारणा व

प्रगति हींच तेवढीं नव्हेत, पण साध्या दोन व्यक्तींचा सहवासही शक्य नाहीं. हक्कमूळ संस्कृतीच्या समाजशास्त्रानें हें कबूल केलें आहे.

" समाजांत राहणाऱ्या मनुष्यास थोडेंबहुत पारतंत्र्य किंवा परावलंबन भोगण्यास नेहमीं तयार असलेंच पाहिजे. समाज व्यवस्थितपणें चालून, त्याचें पाऊल एकसारखें पुढें पडत जाण्यास जितक्या पारतंत्र्याची आवश्यकता आहे, तितकेंच पारतंत्र्य ज्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीस भोगावें लागतें, व अधिक भोगावें लागत नाहीं, तो देश अत्यंत सुखी आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. " या अवश्यक पारतंत्र्याशिवाय राहिलेलें–

" स्वातंत्र्य म्हणजे मनुष्य वयांत आल्यावर त्यास पाहिजे त्या रीतीनें वागण्याची मोकळीक. " हिंदु संस्कृतीनेंही " मनःपूतं समाचरेत् " या दंडकानें ठेवली आहे. फार काय, " सह नौ अवतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै । " अशी मनुष्यमात्राला मार्गदर्शिका देऊन टाकली आहे. कारण तैत्तरीय उपनिषद् सांगतें त्याप्रमाणें " आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनंदेन जातानि जीवन्ति । आनन्दं प्रयन्त्यभिसंविशंति । तद्विजिज्ञासस्व तद् ब्रह्मेति ॥ " असें विश्वाचें रहाटगाडगें हिंदुसंस्कृतीला मुळांतच आनंदमय दिसलें होतें.

ऋणमूळ संस्कृतीच्या हिंदुधर्माची ही प्रभाविष्णु कांति ' अतिपरिचयादवज्ञा ' पावत गेली आणि काळाच्या प्रत्येक तोंडपालटीला अवश्यक असलेला आचारधर्म प्रवर्तविला जाऊन, मूळ संस्कृति न विसरणाऱ्या स्मृतीच्या ऊर्फ आचारधर्मनियमावलीच्या शब्दांवरच पुढें प्रामाण्य येऊन बसलें. परिणाम असा झाला कीं:—

" पंचामृतानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा प्रशस्त मार्ग नाहीं " असल्या कोत्या समजुती धरणें धरून बसल्या व " धर्माच्या नांवावर पुष्कळ निरर्थक व अहितकारक चाली आल्या. "

त्यामुळें कर्मठपणाच्या शेंदरापलिकडे हिंदुधर्माची मूर्ति दिसेनाशी झाली. भट्ट मोक्षमुल्लरसारख्यांनीं प्राचीन हिंदु तत्त्वज्ञानाची स्तुति केली खरी; पण कालाच्या फेऱ्यांत प्रभावशाली ठरलेल्या पाश्चात्य हक्कमूळ संस्कृतीच्या कसावर येथील प्रत्येक गोष्ट घासली जात असतां, न्यायमूर्ति रानडे यांच्या विशाल दृष्टीला दिसलें कीं, हिंदुस्थानच्या पुनरुत्थानांत राष्ट्रीय शाळा–पत्रांप्रमाणेंच राष्ट्रीय धर्मपीठ स्थापणें अत्यंतावश्यक आहे. पहिल्या दोन कल्पनांप्रमाणें तिसरी कल्पना आगरकरांनीं उचलणें शक्य नव्हतें. कारण राष्ट्रीय धर्मपीठ अस्तित्वांत आणतांना जुन्या पायावर नवी इमारत रचावी लागते. पाश्चात्य–पौर्वात्य संस्कृतींच्या संघटनसमरांत आगरकरांना त्याची आवश्यकताच भासली नाहीं. त्यांच्या तर्ककर्कश चिकित्सेला स्पष्ट दिसत होतें कीं:—

" लोकसंख्येच्या मानानें धर्मविषयीं जगांत आज जो उदासीनता आहे, तेवढी गेल्या हजार पांचशें वर्षांत कधींही नव्हती. त्यावेळेस लोकांच्या आचार–विचारांवर व अन्योन्य संबंधावर धर्माचें जें प्राबल्य होतें, तें आतां बिलकुल राहिलें नाहीं. "

आणि अशाच क्रमानें विशिष्ठ धर्म सगळे मागें पडून एक मनुष्यतेचा धर्म तेवढा ठाणें देऊन बसणार आहे, असा आगरकरांचा पूर्ण कयास होता तरी त्यांस पक्कें ठाऊक होतें कीं, विशिष्ठ "धर्माचें खूळ फार दिवसांपासून चालत आलेलें आहे" इतकेंच नव्हे, तर "जगाच्या इतिहासावरून असा सुमार दिसतो कीं, धर्माचें वेड लोकांच्या डोक्यांतून आणखी हजार दोनहजार वर्षें तरी खाचित जात नाहीं."

आणि हें जर खरें, तर जगाच्या प्रवृत्तीला हिंदुस्थान तरी कोठून अपवाद असणार ? म्हणून "जोंपर्यंत दुसरे लोकांचीं डोकीं धर्मवेडांनीं भणभणून गेलीं आहेत तोंपर्यंत त्यांच्याशीं संबंध पडणाऱ्या लोकांतही धर्माभिमानाचें थोडेसें वारें असलें पाहिजे. नाहींतर त्यांच्या हातून स्वधर्माचें संरक्षण व्हावयाचें नाहीं. हिंदुलोकांचा धर्माभिमान इतक्यापुरता आहे व तो श्लाघ्य आहे."

मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन हा हजार दोन हजार वर्षांनीं आस्तित्वांत येणारा आगरकरदृष्ट धर्म म्हणजे जगांतील सर्व विशिष्ट धर्मांच्या उज्वल स्वरूपांचा लघुतम साधारण भाज्य असणार. विशिष्ठ धर्मांच्या अनुयायांनीं आपलें वैशिष्ठ्य या लघुतम साधारण भाज्याशीं समरूप केल्याशिवाय त्याची प्राणप्रतिष्ठा तरी कशी व्हावी ? हें समरूप साधण्यासाठीं प्रत्येक धर्मांतील लोक वाढत्या संख्येनें "परोपकारस्तु पुण्याय पापाय परपीडनम्" या बाणीनें "महत्संख्येचें महत्कल्याण" करीत असल्याचें आगरकरांस आढळलें होतें आणि त्यांचाच मार्ग स्वतां आगरकरांनीं आक्रमिला होता. याच मार्गाकडे आपल्या देशबांधवांचीं मनें वळवण्याकरतां जेव्हां आगरकर लेखणी चालवूं लागले तेव्हां त्यांनीं स्पष्टच सांगून टाकलें कीं:—

"आम्ही ज्या धर्मकल्पनांची चर्चा करीत आहोंत त्या चालू घटकेला आमच्या लोकांना कितीही हिडीस अथवा असंबद्ध वाटत असल्या तरी कालांतरानें त्याच प्रशस्त व आदरणीय आहेत अशी त्यांची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं असा आमचा पक्का भरंवसा आहे. तो दिवस लवकर येणें हें ज्या झपाट्यानें व ईर्षेनें त्यांची चर्चा होत राहील त्यावर अवलंबून राहील. आमच्या व अस्मत्समधर्मी लोकांच्या परिश्रमामुळें पुढल्या पिढींत आमच्या विचारांचे अनेक तरुण लोक निघाले आणि त्यांनीं तोंडांनीं व हातांनीं या विषयाची सारखी टाकी चालविली तर थोड्या वर्षांत......तुमच्या धर्माचारांतही प्रचंड क्रांति होऊन तुमचें वर्तन पराकाष्ठेचें साधें व फक्त नीतीच्या नियमांनीं चालणारें असें होईल; संध्या ब्रह्मयज्ञ, श्रावण्या, साधे यज्ञ श्राद्धें वगैरे चालू धर्माचार पूर्णपणें लयास जाऊन त्यांचे जागीं आधिक उपयुक्त व समंजसपणाचे आचार प्रचारांत येतील आणि सत्यपरायणता, न्यायरति, परोपकृति, आणि शहाणपणा इत्यादि सद्‌गुणांची वृद्धि होऊन लोकांना आतांपेक्षां शतपट अधिक सुख मिळूं लागेल."

इतक्या स्पष्ट भाषेचा खरोखर हेतु असा कीं केवळ युक्तीनें विचार करण्याचा प्रघात पूर्णपणें प्रथम पडण्याची आशा जर आगरकरांस कोठें असली तर ती 'व्यावृत्ति' हा प्रशंसनीय गुण अंगीं असणाऱ्या आपल्या हिंदुधर्मांतच !

मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या धर्मावर अचल दृष्टि ठेवणारे, आणि "मानवी सुधारणेचा अपरिहार्य फल त्या दिशेला असल्यामुळें उगीच आढेवेढे न घेतां ही गोष्ट अनिवार्य आहे असें समजून घेऊन, ती आनंदमय स्थिति मनुष्यतेला जितक्या थोड्या काळांत प्राप्त होईल, अशा रीतीचें वर्तन करणें हें प्रत्येक समंजस व स्वजातीचें कल्याण चिंतणाऱ्या मनुष्याचें कर्तव्यकर्म होय" असें उपदेशणारे आगरकर, "ज्या देशांत आपले शेकडों पूर्वज जन्माला आले, वाढले, व मरण पावले; ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टांनीं केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस ऐतेंच प्राप्त झालें — अशा देशांतील धर्माचा, रीतिरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधींही शोभणार नाहीं." असें जें सांगत तें केवळ ऐतिहासिक भावनाप्रधानत्वामुळें मात्र नव्हतें, तर त्यांचें निरीक्षणच असें होतें कीं "हिंदुधर्मांत वरींच व्यंगें आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगिकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा देतां येणार नाहीं."

कारण हक्कमूळ संस्कृतीच्या चिकित्सकतेनें प्रत्येक गोष्ट न्यहाळणाऱ्या आगरकरांस हिंदुधर्मांतर्गत आचार-प्रकरणांत जसे दोष दिसत होते तसेच इतर धर्मांतही स्पष्ट दिसत होते आणि एकेश्वरी मताची घमंडी मारून, एक वा अन्य तऱ्हेनें मूर्तिपूजा हरघडी चालवितांना सगळे सुधारलेले व उदार धर्म आगरकरांस आढळत; इतकेंच नव्हे तर या नव्या धर्मांच्या आचारांतही हिंदुधर्माच्या प्रमाणेंच भाबडेपणा त्यांस दिसे. पहा-" ताज्या ताज्या सुधारलेल्या धर्मांची स्थापना करण्याविषयीं ज्यांनीं विडा उचलला, असे अर्वाचीन शंकराचार्यही लोकसमाजांत आले म्हणजे 'खादाड गणपति,' 'व्यभिचारी कृष्ण,' आणि 'तापट गोसावडा' यांस ज्या अज्ञानमय धर्मांत पुजितात तद्धर्मानुयायांप्रमाणें वर्तन करतात!! वास्तविक रीतीनें अशा धर्मसंस्थापकांस जरीकांठी पीतांबराची, गळ्यांतील कापसाच्या धाग्याची किंवा पानाबाहेर लोटावयाच्या भाताची पर्वा कां असावी?" तात्पर्य, आर्यब्रह्मोप्रार्थना समाजांनीं पाश्चात्य संस्कृति आत्मसात् करतांना जें आचारप्रकरण सुरू केलें तेंही आगरकरांस कालोचित दिसलें नाहीं; आणि ह्मणूनच कीं काय ऐतिहासिक कालापूर्वीच राज्यधर्म व समाजसंस्था यांची अभिवृद्धि करणाऱ्या हिंदुधर्मानेंच कालोचित वर्तन करूं लागावें, हेंच आगरकरांस श्लाघ्यतर वाटत होतें.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनींही नव्या आचारप्रणालीची आवश्यकता प्रतिपादिली होती. ते म्हणतात:- "एकादें जहाज तुफानांत सांपडून त्याची जशी दुर्दशा व्हावी— डोलकाठी पडावी, सुकाणूं सुटून जावें, नांगर नाहींसा व्हावा, आणि लाटांचे तडाखे खात त्यानें पाहिजे तिकडे भडकत सुटावें, किंवा कोठें तरी रेंदाळांत अडकून राहावें— त्यासारखी हल्लीं हिंदुधर्माची अवस्था झाली आहे. धर्माचा आणि देशस्थितीचा जो मेळ असावा तो नसल्यामुळें एक अगदींच धर्म ×× तरी व्हावें किंवा अंधपरंपरेनें तरी चालावें, ही पाळी येऊन ठेपली आहे. मागें वेळोवेळीं एतद्देशीय धर्मास

तत्कालानुरूप जसा संस्कार मिळत गेला, तसें अलीकडे दीर्घकालपावेतों न झाल्यामुळें धर्म, आचारविचार, रीतिरिवाज हा सारा एकच गप्पागोंधळ होऊन राहिला आहे. " आतां, पूर्वकालीन दूरदृष्टी ऋषींच्या स्मृतीबाहेर अक्षराचें वांकडे-तिकडे करावयाचें नाहीं असें म्हणण्यांत व त्याप्रमाणें आचरण करण्यांत, " सर्वत्र विजयमिच्छेत् शिष्यादिच्छेत् पराजयम् " अशा उदात्त वृत्तीच्या ऋषींच्या उज्वल उपदेशाचा अपमान करणें आहे. आगरकर तर सडेतोडपणेंच लिहितात—

" कोणतेही आचार घालण्यास पूर्वींच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे. पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे. व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाईटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्याचेंच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार "

अर्वाचीन सुधारकांचा जो विचार कीं " हिंदुधर्मांचें संशोधन करून त्यास निर्विकल्प स्वरूप आणणें " त्याचेंच प्रतिबिंब आगरकरांच्या वरील ठशठशीतपणांत नाहीं काय ? तथापि हें संशोधन कूपमंडूकवृत्तीनें होतां कामा नये.

" हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत, आणि संस्कृत ग्रंथाच्या बाहेर विद्या आहे. " इतकेंच नाहीं तर, त्या देशांचा आणि विद्येचा परिणाम हिंदुधर्मानुयायांवर होत आहे, हें लक्षांत वागवून तें संशोधन करणें जरूर. अर्थात् " हिंदू लोकांच्या कमाईत जेवढा म्हणून चांगला भाग आहे तेवढा गमावण्याची कोणासही भीति नको. जें चांगलें आहे तें कोणीही टाकीत नाहीं. " " जगतः स्थितिकारणं साक्षादभ्युदयानिःश्रेयसहेतुर्यः स धर्मः " या व्याख्येप्रमाणें " यावज्जीवेत्सुखं जीवेत् " या दृष्टीनें साक्षादभ्युदयाची मार्गक्रमणा जर आखली नाहीं, व ती आखावयास जागतिक वारे जर लक्षांत घेतलें नाहींत तर काय उपयोग ? उघडच, अशा विस्तृत पायावर संशोधन सुरूं झाल्याबरोबर कालविपर्यस्त शास्त्रार्थाला आणि त्याच्या पुरस्कर्त्या शास्त्र्यांला " मोडून काढणारे शास्त्रार्थ आणि शास्त्री लौकरच दृष्टीस पडूं लागणार आहेत आणि नियमाला नियम, वैदिकाला वैदिक, शास्त्र्याला शास्त्री, गृहस्थाला गृहस्थ आणि बहिष्काराला बहिष्कार—अशा प्रकारचें द्वंद्वयुद्ध सुरू होणार आहे. " हें आगरकरांना स्पष्ट दिसत होतें. आणि म्हणूनच " ज्या धर्मपुस्तकांस तुम्ही प्रमाण मानतां तीं धर्मपुस्तकें तरी डोळे उघडून पहा, आणि त्यांत सांगितलें असेल त्याप्रमाणें आचरण करा " असा इशारा त्यांनीं कर्मठांना दिला होता; कारण त्यांची खात्री होती कीं, " प्रत्येक आचाराचा मूळ उद्देश व प्रत्येक मंत्राचा अर्थ जाणून घेण्याची एकदां इच्छा उत्पन्न झाली

कीं सध्याचा वेडगळ धर्माचार राम म्हणणार." तत्राप ही आशा आगरकरांना तावडतोब्रीची नव्हती.

"कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें उहापोह करण्यांत फायदा आहे, नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धती म्हणजे काय, हें मुळींच ठाऊक नाहीं. त्यांना असें वाटतें कीं जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्याबाहेर चहूंकडे अंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशीं स्वाभाविकही आहे. ज्या अर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञानभांडारांचा गंधही त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार ?"

मग, यांतून मार्ग काय ? आगरकर लिहितात "अनेक युगांच्या रूढ आचारामुळें दशदावस्था प्राप्त झालेल्या जुन्या धर्माच्या अवयवांत लवचिकपणा असेल अशी कल्पना करून त्याला अर्वाचीन तर्काच्या व बुद्धिवादाच्या दाबाखालीं वांकविण्याचा प्रयत्न कधींही फलप्रद होणार नाहीं. आमच्या या जुन्या धर्मखोडांत विचाररुधिराचें अभिसरण बिलकूल चालेनासें झालें आहे. सबब, त्याची सुधारणा करून तें कोणत्याही चांगल्या उपयोगास लावण्यासारखें होण्याचा संभव नाहीं." तेव्हां, "एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषी हुडकीत बसण्यांत व साऱ्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं." स्वतांच्या काळापुरतें हें आगरकरांचें ठाम मत झालेलें दिसतें. आणि म्हणूनच अशाहि स्थितीत स्वतःस कालविपर्यस्त अतएव त्याज्य भासणाऱ्या कित्येक आचारांवर जुन्यापुराण्या लोकांचा खरा विश्वास असेल अशी स्वतांची खातरी असल्यामुळें, त्यांचा तो विश्वास उडण्यास जरूर असलेलें 'अर्वाचीन पद्धतीचें शिक्षण' त्यांस "मिळून त्यांचीं मनें सुसंस्कृत होईपर्यंत, सर्वसामान्य अशीं कांहीं बंधनें करुन घेण्यास आम्ही राजी आहों" असाही निर्वाळा आगरकरांनीं दिला होता. कारण समाजाची प्रगति सर्वसाधारण मनोवृत्तींच्या दृढभाजकानें चालत असते.

खरें; पण मग नव्या स्मृतीची अवश्यकता प्रतिपादून तिची नुसती दिशा दाखविण्यापेक्षां आगरकरांनींच ती नवी स्मृति कां तयार केली नाहीं ? "इष्ट असेल तें बोलणार" हें जर त्यांचें ब्रीद तर ती इष्ट स्मृति त्यांनीं कां न बोलावी ? एकतर, एकोणिसाव्या शतकाची शेवटची पंचविशी म्हणजे हातहलवणीपेक्षां डोळेउघडणीचा काळ होता; दुसरें असें कीं, नव्या स्मृतीचा ऊस धर्माच्या जुन्या मळ्यांत लावला तर तो चांगला उतरतो. आणि हिंदुधर्माच्या प्रमाणग्रंथासंबंधीं बोलावयाचें तर "आम्हांस त्या ग्रंथांची विशेष माहिती नाहीं हें आम्ही कबूल करतों" असें आगरकरांनींच एके ठिकाणीं सांगितलें आहे. आदर्श विचार, प्रशस्तोत्तम कर्माचें दिग्दर्शन, त्यांतूनच उत्पन्न होणारा यज्ञाधिष्ठित असा सच्चिदानंद जगत्कारणाच्या उपासनेचा मार्ग आणि "अहं ब्रह्मास्मि" ही पायरी चोखाळण्यास गुरुकिल्ली, अनुक्रमें हातीं देणाऱ्या ऋग्, यजु, साम, अथर्ववेदांची 'विशेष माहिती जर मननशील आगरकरांना असती तर "वेद जर आमच्याच सारख्या माणसांनीं केले आहेत, तर आम्ही त्यांचेंच का

ऐकावें ? आम्हांस योग्य वाटेल त्या मार्गाचा आम्ही कां अंगीकार न करावा ?" असे उद्गार त्यांच्यानें काढवले नसते, आणि साक्षात् अभ्युदय व मानवतेचें ऐहिक सुखसंवर्धन साधण्यासाठीं त्यांनीं " स्मृति " करण्याचा चंग बांधला असता. जगत् आनंदमय आहे असें ठासून प्रतिपादणारा, अभ्युदय–निःश्रेयसावर लक्ष देऊन यज्ञ ऊर्फ त्यागवृत्तीवर अधिष्ठान ठेवून कर्तव्यबुद्धिवर भर देणारा वैदिक धर्म असला तरी, त्याला अभिप्रेत असलेल्या 'वि–नया'चा विपर्यास स्वाभिमानशून्यतेच्या पल्ल्याला तेव्हां पोहोंचतो कीं जेव्हां मंत्र–तंत्र–प्रणालींतील रहस्यापेक्षां बाह्यांगालाच मन चिकटून बसतें. आणि अशी स्थिति आली कीं ' प्रयत्नवाद ' कोठल्या कोठें लुप्त होऊन दैववादानें समाज घेरला जातो. या दैववादाचा अतिरेक आगरकरांच्या काळीं झाला होता आणि " ज्याची त्याची वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टी " लागून राहिली होती. अशा स्थितींत हक्कमूळ पाश्चात्य संस्कृतीच्या जोरदार भाप्यानें हिंदु संस्कृतीवरील शेंदराचे लपेटे पार ढासळून पाडण्यास आगरकरांनीं महाराष्ट्रास मदत केली हा कमी फायदा नाहीं.

हक्कमूळ संस्कृतीच्या चढाऊ धोरणाचा चढेलपणांत व्यतिरेक होतो ही गोष्ट खरी; पण आपल्या धर्माचे देखील अन्वयार्थ समजून न घेतां चालत जाणाऱ्यांना हक्कमूळ संस्कृतीच्या पुरस्कारानें शुद्धिवर आणलें हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं.

आगरकरांची ही धार्मिक कामगिरी कोणी कबूल करो, न करो; आगरकर हिंदुधर्मापेक्षित संन्यासधर्म पूर्णपणें आचरत होते, हें कोणासही स्पष्ट दिसेल. छाटीनेंच कांहीं संन्यास होत नाहीं. " काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः । " हें जर खरें, तर " स्वसुखानिरभिलाषः खिद्यते लोकहेतोः । " हें वर्णन सर्वथैव लागूं असणारे ( देशसेवेपायीं आणि लोकशिक्षणासाठीं आमरण हातावरचा प्रपंच करणारे ) आगरकर लोकप्रियतेची सुद्धां आशा धरीत नव्हते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आतां, त्यांनीं भवभूतीप्रमाणेंच कोणी समानधर्मा पुढें मागें भेटेल अशी आशा धरली होती, पण ती " श्री " पदावरील संन्याशाला तरी कोठें सुटली आहे.

" जगाचें कल्याण होण्यासारखीं कृत्यें मनुष्याच्या हातून होत असावी, आणि त्याबद्दल त्याला कांहींच वाटूं नये; निदान तीं मनुष्यमात्रास कल्याणप्रद आहेत असा विचार देखील त्याच्या मनांत येऊं नये— अशा रीतीनें कोणाच्याही हातून कोणतेंही सत्कृत्य या पृथ्वीतलावर घडणें शक्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं; आणि जर कोणाच्या हातून तसें होत असेल, तर त्याला शुद्ध पाषाण किंवा शुद्ध ईश्वर असेंच म्हटलें पाहिजे."

तात्पर्य धर्माचें एक कार्य जर अभ्युदय, तर तो आपल्या राष्ट्राचा साधण्यासाठीं आगरकरांनीं आपल्यापरी धारण केलेली वृत्ति " धर्मवृत्तिच " नव्हती काय ? " काम, क्रोध, मद, मत्सर, दया, अनुकंपा, लोभ वगैरे बऱ्या-वाईट मनोवृत्ती जशा मनुष्यांत नैसर्गिक आहेत, तशी धर्मवृत्ति ही नैसर्गिक आहे." हें आगरकरांचें वचन वरील दृष्टीनेंच लक्षांत येईल. तत्राप त्यांच्याच एका वचनाप्रमाणें, विचारवंताच्या मनांत जीवाविषयीं व जगत्कारणाविषयीं मधून मधून विचार आल्याशिवाय रहात नाहींत; तर तत्संबंधीं तुरळक असले तरी आगरकरांचे कांहीं विचार होते काय ? तेंच आतां थोडक्यांत पाहूं.

ईश्वराची कल्पनाच, त्याचें अस्तित्वच धुडकावून लावणारे आगरकर नव्हते, हें त्यांच्या आतांपर्यंत आलेल्या वचनांरूवनंही म्हणतां येईल. तथापि त्यासंबंधीं व त्या ईश्वराच्या पूजेसंबंधींच्या आगरकरांच्या कल्पना ठिसूळ होत्या. पहाः– "जो अनादि, जो अनंत, जो सृष्टीचें आदिकरण, जो सर्वगामी व सर्वज्ञ, जो निर्गुण व निराकार, ज्याच्या इच्छामात्रेंकरून कोट्यवधि ब्रह्मांडें निर्माण होतात व लयास जातात जो सूक्ष्म वस्तुहून सूक्ष्म व स्थूल वस्तुहून स्थूल; जो अग्नीनें दग्ध होत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं, वायूनें शोषत नाहीं, आणि बुद्धीस ज्याचें खरें स्वरूप गम्य होण्याचा संभव नाहीं — अशा एका सृष्टिचालक जगदात्म्याची कल्पना मनुष्यास फार काळानें व पुष्कळ विचारानंतर प्राप्त झाली आहे. "

विकसित बुद्धीचा हा सिद्धांत पिशाच्चयोनीपासून देवतोत्पत्ति मानणाऱ्या हक्कमूळ पाश्चात्य संस्कृतीचा आहे. इतिहासाचीं पानें उलटतां येतात तितक्या मर्यादेनें बोलावयाचें तर वेदाधिष्ठित संस्कृतीनें अनादि परमेश्वराची कल्पना मूलभूत धरूनच सहजगुण–विकसनार्थ मूर्तिपूजेचा श्री·ग·णे·शा अनुयायांच्या हातीं दिला आहे. "फार काळानें व पुष्कळ विचारानंतर" 'अनंता'ची कल्पना जी वैदिक ऋषींना प्राप्त झाली ती त्यांनीं जगताच्या कल्याणासाठीं, वैदिक ऋचांवर आपल्या कर्तृत्वाचा नाममात्रही हक्क न ठेवतां, जगताच्या स्वाधीन केली. वेद जगताचे म्हणजे स्थूलांतील स्थूलांचे व सूक्ष्मांतील सूक्ष्मांचे आणि म्हणूनच ते परमेश्वराचीं निश्वसतें. बुद्धीच्या विशालतेपेक्षां हृदयाच्या उदारतेस जगत्कारण परमात्मा ताबडतोब प्रतीत होतो, हा स्वामी विवेकानंदांचा संदेश वैदिक संस्कृतीची पहिल्यापासूनच अशा तऱ्हेनें प्रचीति आहे. तथापि यज्ञाधिष्ठित संस्कृतीच्या विजगीषु आर्यांनीं जित अनार्यांना आत्मसात् केल्यावर कांहीं पिशाच्चसंभव देवता हिंदू देव्हाऱ्यांत बसल्या हें ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाहीं. तथापि हक्कमूळ संस्कृतीच्या हृदयविकसित बुद्धीनें अगर ऋणमूळ संस्कृतीच्या हृदयविकसनानें प्रतीत होणारें जगत्कारण गोचर होणें ही अवस्था मनुष्यास महत्प्रयासानें प्राप्त होऊन, मगच मनुष्य एकप्रकारें "देहबुद्धि सुटून अंतरोत्थित प्रेरणाबलाच्या जोरावर महत्कार्यें तडीला नेतो" अगर ज्ञानयज्ञानें त्या जगत्कारणाची उपासना करतो.

ज्ञानयज्ञाच्या या उपासनेव्यतिरिक्त जीवाच्या 'गति' संबंधी आगरकरांच्या जवळ कांहीं एक नव्हतें. "हा लोक सोडून गेल्यानंतर, परलोकांत प्रत्येक मनुष्याची संस्था नीट व्हावी, हें प्रत्येक धर्माचें बीज होय; मग आवडीच्या किंवा मताच्या वैचित्र्यामुळें त्यांत पाहिजे तेवढे प्रकार होवोत." असें आगरकरांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे खरें! तथापि स्वर्गादिक कल्पना त्यांच्या लिखाणांतून आलेल्या असल्या तरी त्याचा मतितार्थ तेवढा घ्यावयाचा आहे. ज्या परलोकची स्पष्ट कल्पनाच नाहीं, त्याबद्दल येथें शिदोरी बांधत बसून येथें उत्पन्न झालेल्या काळाच्या दंडकाला विपरीत असें वर्तन करणें आगरकरांच्या बुद्धीला मानवणारेंच नव्हतें.

## प्रकरण ७ वें

# सुधारक आगरकर

"हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीहि भीति नाहीं! मनु आणि पराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे! पण जें कांहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्याच्या स्थितींत ज्याच्या अपकारित्वाबद्दल संशय नाहीं, तें सारें पाश्चात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार! एखाद्या दुसऱ्या मनूची किंवा पराशराची कथा काय? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटू लागल्या आहेत, त्यांना शेंकडो मनूंचें व सहस्त्रावधि पराशरांचें आधार दाखवले, व त्यांचा प्रसार न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यावधी लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान आणि उठावणीचें आरडे यांचे अडथळे आणून घातले, तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या मध्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडू लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या धार्मिक समजूतींना लागलेला वणवा कोट्यावधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळीच संभव नाहीं! उलट हेच त्यांत होरपळले जाण्याचा संभव आहे"

—कै. गो. ग. आगरकर.

ज्याला इतिहास नाहीं, त्याला इतिहास करतां येत नाहीं. अर्थात इतिहास करणाराला पूर्वजांच्या इतिहासापासून स्फूर्ति, आत्मविश्वास आणि तीरासारखी तडफ प्राप्त होतात. पण तो इतिहास तेजस्वी असेल, तरच हें सर्व खरें. पण पूर्वजांचा इतिहास हा बेंगरूळ अगर किळसवाणा असेल तर त्याचा नांवापुरता तरी अभिमान कोण बाळगील? शिवाय, परिस्थितीच्या पलटीबरोबर साधनसामुग्री, विचारसरणी आणि शक्याशक्यता भिन्न स्वरूपें धारण करतात. तेव्हां ऐतिहासिक परंपरेची साखळी तेजस्वीपणाच्या एका दुव्यानेंच अखंड ठेवावी लागते. उघडच आहे कीं, चालू काळाला पुरून उरण्यासारखें जेवढें कांहीं 'वडिलांचें लेणें' असेल, त्याच्या व्यतिरिक्त सर्वांवर पडदा पाडूनच आपल्या काळच्या भौगोलिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक संघटनसरहद्दींच्या परिपूर्ण विचारानेंच मनुष्याला नवीन इतिहासाची घडण करावी लागते; आणि तेजस्वी इतिहासाच्या घडणीची गुरुकिल्ली 'विचारप्रामाण्य' होय.

विचारप्रामाण्य म्हटलें कीं, स्वताची बुद्धि चालवावी लागते. बुद्धि चालविली कीं, 'बाबावाक्यं प्रमाणं' 'समुद्रास्तुप्यंतु' होतें व 'तातस्य कूपोऽयामिति ब्रुवाणो क्षारं जलं का पुरुषा पिबंति' असा निर्णय होतो. प्रत्येक गोष्टीला सारासार, शक्या-शक्यता आणि उपयुक्ततानुपयुक्तता यांची चाळण लावण्याची ताकद कोणत्या बुद्धिला असते? जी बुद्धि जागतिक विचारसरणीच्या वाऱ्याशी तारीखतागायत परिचित असते आणि 'अभ्यासाच्या खोलींत' तरी निदान "मनाची कपाटें सताड उघडीं टाकून वाटेल तो विचार आंत घेण्यास व वाटेल तो बाहेर घालविण्यास" जी बुद्धि डरत नाहीं ती. अशा अभय बुद्धिलाच आत्मविश्वास असतो. आणि आत्मविश्वास हाच कोणत्याही कार्याचा एक चतुर्थांश यशदाता असतो. तारीखतागायत विचारसरणीला ओळखून असलेली अभय व आत्मविश्वासी बुद्धि विचारांचे नेमके काप काढूं लागली म्हणजे ती समाजहितावर अधिष्ठान ठेवते. ती स्वयंनिष्ठ रहात नाहीं. ती वर्त-मानकालाप्रमाणेंच भविष्याकडे दक्षतापूर्वक पहाते आणि आशावादानें हें सर्व चिकि-त्सापूर्वक करतांना तेजस्वी गतेतिहासाचें लोण पुढें चालवते.

१ ज्या गोष्टीपासून त्रास किंवा अडचण होते त्या दूर करणें आणि ज्यापासून सोय व सौख्य होते त्या जवळ आणणें याचेंच नांव सुधारणा.

२ सर्वांना सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें, म्हणजे सुधारणा होत जाणें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

३ मनुष्याच्या सुखास अमुक एकच गोष्ट कारण आहे असें नाहीं. सुख अनेकविध असल्याकारणानें तें प्राप्त करून घेण्याचीं साधनेंही अनेक आहेत. ज्यामानानें हीं साधनें कमी पडत जातील त्यामानानें कमी सुखप्राप्ती होणार आहे. एका प्रका-रचीं सुखें आपण अनुभवित असतां, त्यापासून आपणांस दुसऱ्या सुखांची कल्पना होत जाते. नंतर या नवीन सुचलेल्या कल्पनांची तृती न अनुभवलेला सुखानुभव होऊं लागला, म्हणजे आणखी नवीन सुखांची आकांक्षा उत्पन्न होते; व त्यांच्या प्राप्तीसाठी पुन्हा नवीन साधनें शोधून काढण्यांत आपण पडतो. या रीतीनें मनु-ष्याच्या सुखाच्या कल्पना आणि त्या सफल करण्याचीं साधनें—यांचा एकसारखा विस्तार होत आहे; व या विस्तारालाच आपण सुधारणा असें म्हणतो.

४ मनुष्याच्या स्थितीस पूर्णता येणें बहुधा अशक्य आहे; पण ती येईपर्यंत सुधारकांच्या मनाची शांति व्हावयाची नाहीं.

"नर करणी करील तर नारायण होईल" अशी म्हण आहे. हें नारायणपद ऊर्फ पूर्णता हें आगरकरांच्या सुधारणेचें ध्येय होतें. मनुष्याचें सुख एकांगीं नसून तें बव्हंगी व बहुरंगी आहे. जसा रंग पडेल आणि अंग बाहेर येईल तसा प्रयत्न उभारून, पूर्णपणें नसलें तरी, शक्य तितकें सर्वांना सारखें सुख प्राप्त करून दिलें पाहिजे. येथें दुबळ्या दैववादाला जागा नाहीं. "ज्यानें जो धंदा पत्करला त्यानें त्याबद्दल दुसरे काय म्हणतात याविषयीं फारसा विचार करीत बसतां कामा नये. त्या धंद्यापासून दुसऱ्याचें हित आहे येवढी पक्की खात्री होऊन गेली

असली म्हणजे लोकापवादाची पर्वा न करतां तो त्यानें बेलाशक चालवला पाहिजे."

"सर्व मानवी प्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणें हें केवळ त्यांच्या कमी अधिक बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे. या श्रेष्ठ तत्वाची या जगांत प्रस्थापना करण्याच्या कामीं सर्वकालीन व सर्वदेशीय सुधारकांनीं आजपर्यंत अनेक दिशांनीं प्रयत्न केले आहेत व त्या प्रयत्नास उत्तरोत्तर सिद्धीही मिळत चालली आहे.

आतां ज्यास आपण सुधारणेच्या शिखरावर पोंचलेलीं म्हणून मानतों, त्या राष्ट्रांत जर अद्याप सामाजिक सुधारणेच्या तत्वांचा पूर्ण अंमल झालेला आपणांस दृष्टीस पडत नाहीं, तर आज शेंकडों वर्षे या अज्ञानमूलक आणि अभिमानप्रेरित वैषम्य–कल्पनांचीं पुटें घेत बसलेल्या हिंदुस्थान देशांत तें एकदम होईल ही आशा व्यर्थ आहे. तथापि सुधारणेची विजय–पताका अव्याहत फडकत राहण्यास श्रेष्ठ नीतिप्रणित तत्वांचेंच साम्राज्य झालें पाहिजे, अशी ज्यांची बालंबाल खात्री होऊन गेली आहे, त्यांनीं 'थेंबे थेंबे तळें साचें' या न्यायानें जी जी फांदी त्यांच्या मार्गाआड येत असेल तिच्यावर तरी आपली कुऱ्हाड चालवून साधेल तेवढी गुंतागुंत कमी करण्यास झटलें पाहिजे.

मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे....तें अशासाठीं कीं त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्य सुधारणेच्या अत्यावश्यक तत्वांचा समावेश झाला आहे...समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास ( पुरुषास व स्त्रीस ) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे.

लोकांनीं सुशिक्षित व सदाचरणीं होऊन स्वतःचीं व सार्वजनिक कामें नेकीनें करावी आणि संसारवृक्षाच्या स्वादु फळांचा उपभोग घ्यावा हाच ऐहिक सुधारणेचा मुख्य उद्देश" सर्वभूतहिते रत अशा व्यक्तिस्वातंत्र्याच्या जोरावर साध्य करावयाचा स्वैराचारावर नव्हे. "ज्याच्या त्याच्या तोंडावाटे स्वातंत्र्याच्या वृथा वल्गनांचा अहोरात्र घोष चालला आहे! पण सत्क्रियेच्या नांवानें आवळ्याएवढें पूज्य!" जेथें तेथें आगरकरांना आढळलें, एवढेंच नव्हे, तर "धैर्य नाहीं, उद्योग नाहीं, कला नाहीं, खरा देशाभिमान नाहीं. खरी धर्मश्रद्धा नाहीं, खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची संवय नाहीं! सारांश चांगले असे कांहीं एक नाहीं. ज्याची त्याची अहोरात्र वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टि लागली असल्यामुळें आपल्या विचाराचा आणि आचाराचा भावी संततीवर काय परिणाम होणार, याचा कोणीही विचार करीत

नाहीं." याबद्दल आगरकरांस सारखी तळमळ लागली व तीमुळें चंद्रगुप्तापासून रावबाजीपर्यंत जो एक लांबच लांब काळ भारतीयांनीं "इति-हास" अशा पोकळ अक्षरांचा काढला त्याची तगमग उघड्या डोळ्यांच्या आगरकरांसारख्या विचार-वंताला लागली, तर तें साहजिकच नाहीं काय ?

'हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत भारतीय युद्धाहून जास्ती महत्त्वाची गोष्ट कोणतीच नाहीं. हिंदुस्थानची प्राचीन संस्कृती यावेळेस कळसास पोंचली होती. हिंदुस्थानच्या अवनतीला जो प्रारंभ झाला तो याच वेळेपासून. ही अवनति आज-पर्यंत हळुहळु वाढतच चालली आहे." भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांचे हे उद्गार वाचले म्हणजे इतिहासाच्या उथळ निरीक्षकालाहि आगरकरांचें म्हणणें पटतें कीं ' आम्ही देशाभिमान-धर्माभिमानशून्य, नष्टवित्ताचार, नष्टशौर्य, द्रव्याभिलाषी, निरुद्योगी, लोभी, मत्सरी, डौली, हेकट, टवाळ, लांचलुचपतखोर, हांजीहांजीखोर, चहाडखोर, खाल्ल्या घरचे वासे मोजणारे व हरामखोर झालोत तें पारतंत्र्यामुळें.' हें पारतंत्र्य जसें राजकीय तसेंच सामाजिक, धार्मिक व औद्योगिक क्षेत्रांतीलही असल्या-कारणानें ' जीवनार्थ कलहांत भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागावा हें इष्ट असेल तर ज्या उपायांनीं राज्यसत्ता त्यांच्या हाती येईल तें आपण करीत असलों म्हणजे आपलें कर्तव्य झालें, असें समजून स्वस्थ बसतां कामा नये; तर ज्या उपायांनीं राज्यसत्ता प्राप्त झाली असतां तिचें संरक्षण व तिचा सदुपयोग करतां येईल असें शिक्षण त्यांस अगोदर दिलें पाहिजे, हे ध्यानांत आणून त्या कामास अगोदर लागलें पाहिजे.'

राज्यसत्तेचा सदुपयोग म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना येण्यासाठीं थोडा वेळ ना. गोखल्यांच्या भाषणांतील एक उतारा मननीय वाटेल.

"माझ्या मायभूसंबंधांत माझ्या आकांक्षांना मी मर्यादाच मानीत नाहीं. दुसरे लोक स्वतांच्या देशांत जसे असतात तसे आपले लोकही आपल्या देशांत असले पाहिजेत, हें मला हवें आहे. जातपात वा नेमधर्म यांचा विचारच न करतां आमचे पुरुष व आमच्या स्त्रिया आपआपल्यापरी परिपूर्ण वाढल्या पाहिजेत. त्यांची खुंट होतां कामा नये कीं अनैतिक बंधनांनीं त्यांचा बीमोड होतां कामा नये. राजकीय, औद्योगिक, धार्मिक, वाङ्मयविषयक, शास्त्रीय आणि कलाविषयक बाबतींत जगांतील मोठमोठ्या राष्ट्रांच्या मालिकेंत भारतानें आपली योग्य जागा पटकवावी, असें मला वाटतें."

—ना. गोपाळ कृष्ण गोखले.

जगांत भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागण्यासाठीं म्हणजेच आमचे पुरुष व आमच्या स्त्रिया आपआपल्यापरी परिपूर्ण वाढून जगांतील मोठमोठ्या राष्ट्रांच्या मालिकेंत भारतानें आपली योग्य जागा पटकावण्यासाठीं नुसती राजकीय सत्ता कमावून चालणार नाहीं; तर ती सत्ता टिकण्यासाठीं उपरिनिर्दिष्ट ध्येयानुसार

तिचा सदुपयोग करण्यासाठीं लोकांना तयार ठेवावयास त्यांस तसें शिक्षण दिलें पाहिजे असा आगरकरांचा कटाक्ष होता. हा कटाक्ष व्यवहारतः सार्थ व्हावयाचा म्हणजे इमर्सननें म्हटल्याप्रमाणें "आपली सर्वच्या सर्व समाजरचना, राज्य-कारभार, शिक्षण-संस्कार, धार्मिक आचार, विवाहविधी, औद्योगिक व्यवहार, शास्त्रीय संशोधन यांची फेर तपासणी करून आपल्या प्रकृतीप्रमाणें त्या त्या बाजूंचे पाये डोळ्यांखालून घातले पाहिजेत. प्राचीन लोकांस जग सुखावह होतें एवढेंच पाहून आपला निभाव लागणार नाहीं; तर तें आपणांसही सुखावह आहे अशी दक्षता आपण घेतली पाहिजे. आणि ज्या ज्या आचाराचीं मुळें आपल्या मनोभूमिकेंतच नाहींत त्यांचा कांटा आपण पार काढून टाकला पाहिजे."

अशासाठींच सुधारणेची ध्वजा महाराष्ट्रांत आगरकरांपूर्वीं आपआपल्या मगदुरा-प्रमाणें बऱ्याच महाभागांनीं मिरवली होती. आपल्या अंगच्या धुरीण-गुणामुळें न्या. रानड्यांनीं औद्योगिक व राजकीय चळवळींत जसें अखिल हिंदुस्थान ओढलें होतें, तसें तें सामाजिक परिषदेलाही गुंतवलें होतें, अर्थात् महाराष्ट्रही तींत सामील होताच. तथापि सवत्या महाराष्ट्रापुरतीच दृष्टी ठेवल्यास प्रार्थना-समाजाची चळवळ न्याय-मूर्तींचें नांव पृथक सांगतेच. इंदुप्रकाश पत्राचे प्रसिद्ध संस्थापक विष्णुशास्त्री पंडित यांनीं स्वतांस "वि-धवा-विवाहास" वाहून घेतलें होतें. गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनीं कालविपर्यस्त सामाजिक निर्बंधनावर व लोक-समजूतीवर तडाख्यांची सारखी झोड उठविली होती. सत्यशोधक समाजाचे संस्थापक ज्योतिबा गोविंद फुले यांनीं बहुजन समाजांत व विशेषतां स्त्री वर्गांत "लि-वा-हि" [लिहिणें-वाचणें-हिशेब अर्थात थ्री आर्स अथवा आवश्यकतात्रय] चें शिक्षण द्यावयासाठीं आणि जातिभेद-विध्वंसनासाठीं कंबर आवळलेली होती. या शिवाय रा. ब. विष्णु परशुराम रानडे, डॉ. रामकृष्णपंत भांडारकर, कृष्णाजी लक्ष्मण नूलकर, वामन आबाजी मोडक, नारायण महादेव परमानंद, शंकर पांडुरंग पंडित, न्या. काशिनाथ त्र्यंबक तेलंग, माटे, सार्वजनिक काका जोशी वगैरे मंडळींनीं आपा-पल्यापरी सुधारणुकीला हात घातलाच होता. याशिवाय, हिंदु सामाजिक चालीरीतीं-सुधारणा करणारा आणखी एक वर्ग होता. त्यांत राजा राममोहन रॉय व स्वामी दयानंद सरस्वती यांचा ब्रम्हो समाज, आर्य समाज यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. पैकीं आर्य समाजाचें लोण आगरकरांच्या लौकिक चरित्रापूर्वींच महाराष्ट्रापर्यंत येऊन पोहचलें होतें. तथापि वेदवाक्यावर भर देणाऱ्या आर्य समाजाच्या संस्थापकांचाही प्रभाव महाराष्ट्रांतील बहुजनसमाजावरच काय, पण सुशिक्षितां-वरही पडला नाहीं. मग एकट्या ब्राह्मणसमाजावरच हल्ला चढविणाऱ्या ज्योतिबा फुल्यांच्या कृतीला, आगरकरांनीं त्यांना रेव्हरंड म्हणून संबोधण्याइतका मिशनरी स्फूर्तींचा दर्प येत असतांना, कोणतें यश ताबडतोब येणार? चालत आलेली चाकोरी आजपर्यंत पायमोड करीत नव्हती; आणि ती आपल्या दूरदर्शी पूर्वजांनीं पाडून ठेवल्याकारणानें तिला कलिकाळाची भीति नाहीं अशा भ्रमांत समाज होता.

"जुनें तें सोनें" असलें तरी कालघर्षणानें वरच्या किटणासकट तें उडून जाण्याची धास्ती क्षणभर देखील डोळ्यापुढें उभी राहिली नाहीं. त्यामुळें दे. भ. लजपतरायांनीं म्हटल्या-प्रमाणें "चालू घटकेच्या उठावदार विचाराला आणि आचाराला जेवढा म्हणून भूत–काळ आडसरासारखा होईल तितका सारा वाटेला लावलाच पाहिजे." हें व्यवहारशास्त्र मागें मागें पडलें !! मग नुसत्या दोषाविष्करणांवरच भर देणाऱ्याबद्दल हेतु–विपर्यास झाला असल्यास तोंडांत बोटें घालून बसण्यासारखे कांहीं नाहीं. परधर्मीयांचे, परपृष्टांचे आणि परधर्मातरितांचें हल्ले हे जसे आपमतलबीपणाचे, तसेंच पहिल्यावाहिल्या आंग्लविद्या-विभूषितांनीं आपल्याच लोकांचें केलेलें दोषाविष्करण आणि स्वाधिकारांत चालू केलेलें कार्य अंधानुकरणाचें, आत्मनिष्ठेचें व नसता शहाणपणा मिरवण्याचें द्योतक वाटलें. सुधारकांचा हा मासला सोडून देऊन नूतन धर्मपंथीयांकडे वळवल्यास तिटकाऱ्या-ऐवजीं अनादर वाटे इतकेंच. निराकार निर्विकार परमेश्वराची प्रार्थना अगर सामु–दायिक प्रवचन हिंदुधर्मालाच काय, पण तत्कालीन हिंदुसमाजाला परकी नव्हती. तथापि प्रवचनाची व्याख्यानी पद्धति नवख्या धर्मभोळेपणाची निशाणी वाटल्यास व त्यामुळें अनादर डोकावल्यास अस्वाभाविकतेचा दोष फारसा येणार नाहीं. जुनींच पण नवीं झालेलीं नव्या काळचीं जुनीं शास्त्रेंही विशिष्ट कार्यापुरती कां होईना, अमलांत आणण्याचा प्रयत्न व्हावयास चुकला नाहीं. विधवा–विवाहाच्या बाबतींत जुना शास्त्रार्थ काढून ती सुधारणा समाजाच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न विष्णुशास्त्री पंडितांनीं केला होता. असल्या प्रयत्नांचे पाय पढिक पंडित पाठभेद, अर्थभेद, व्याकरणभेद इत्यादि शस्त्रांनीं तोडित असतात व इतक्यानेंहि नच भागेल तर 'शास्त्रा-द्रूढिर्बलीयसी' हें राखीव हत्यार पाजळतात. जुन्या नव्या विद्वानांच्या या हातघाईंत शास्त्रांच्या हालांनीं बहुजन समाज विव्हळतो, अज्ञानामुळें व पुराणप्रियतेमुळें जुन्या पंडिताकडे कलतो आणि जुन्या शास्त्रांचा आपल्याला अपरिचित असलेला अर्थ लावणाऱ्या नव्या पंडिताला मतलबी म्हणून शेरा मारतो. विष्णुशास्त्री पंडितादिकांचा अनुभवही यापेक्षां निराळा नव्हता. मितविरोधी समाजसुधारणेचा पक्षही जरा जवळचा वाटला, तरी शास्त्रवचनांच्या आधारानें रूढीला फारसा धक्का लावणारा नसेल तरच तेवढ्यापुरती सहानुभूति त्याच्या पदरीं पडायची! समाजाची अशी स्थिती असतांना आणि हिंदी राष्ट्राजवळ अभिमान वाटण्यासारख्या व जगाला शिकवण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत म्हणून स्वाभिमानपूर्वक राष्ट्रीय स्वातंत्र्याचें आंदोलन उत्पन्न करूं इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांच्या लेखा–व्याख्यानांनीं "पुराणमित्येव हि साधु सर्व" असा सर्वत्र ग्रह पसरला असतां, जें जें होईल तें तें पहात बसावयाचें कीं काय ? हा आगरकरांचे पुढें प्रश्न होता. "समाज तर प्रत्येक दिवशीं पुढें गेलाच पाहिजे." जो समाज पुढें जात नाहीं तो मागें जात असतो. समाजाची पुच्छ-प्रगती कोणत्या जाणत्या हृदयाला खपेल ? आगरकरांना तरी ती खपणारी नव्हती. म्हणून "बांधवहो, विचारकलहाला कां भितां ?" असा कळवळ्याचा खडा सवाल ठोकून, "ज्या कोणास चांगल्या मतांचा प्रसार करणें असेल त्यांनीं

आपला सर्व राग आपल्यापाशींच गिळून टाकून लोकांचा तिरस्कार न करतां त्यांच्या पुढें त्या मतांचें नित्य प्रतिपादन केलें पाहिजे. " या आपल्या तत्त्वास अनुसरून इथून तिथून सगळा समाज गदगदवून हलविण्यासच सुरवात केली. गुहेंत निजलेल्या सिंहिणीला कांहीं केलें तरी जाग येत नाहींसें दिसतांच, तिचा छावाच तिच्या तोंडावर फेंकून मारला असतां ती चवताळून उठते. समाजाचें सिंहपण जागें करण्याकरतां आगरकरांनींही " तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा " असें म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर, कालानरुप वर्तन करण्यास " हिंदु धर्मास नोटीस दिली आहे. " ऑस्ट्रेलियाचे डॉ० आर्. एन्. हॉर्नाब्रुक म्हणतात कीं, ' लुसलुशीत शद्बांना त्यांच्यापुरी चांगुलपणा आहे; पण एकदां फाड फाड फाड लाह्या फुटल्या म्हणजे मग त्यांनीं नांदावें. अगोदर नव्हे ! म्हणून काय असेल तें अगोदर स्पष्ट बोला, आणि एकदां तडकाफडकी होऊन गेली म्हणजे मनास आलें तर पदर पसरा. पण पहिल्या प्रथम तडाखा उडवा आणि तो जोराचा उडवा. '

मूलतःच गुलामगिरीची मनोवृत्ती नष्ट करण्याकरितां, चुलीचा धूर, घरांतल्या मोऱ्या, शौचकूप, हजामत, स्नान, गंधलेपन, पुरुषांचे पेहराव, स्त्रियांचे पेहराव, इत्यादि एरवी क्षुल्लक भासणाऱ्या विषयापासून थेट आर्थिक, धार्मिक, राजकीय स्वातंत्र्यापर्यंत यच्चयावत सर्व विषयांत माणसाच्या विचारजागृत वागणुकीची शिकवण आगरकरानीं दिली, इतकेंच नव्हे, तर हातीं धरलेल्या विषयासंबंधीचे देशकालमानानुरूप आपल्याला स्पष्ट दिसले तेवढे आदर्श जनतेपुढें ठेवले. हे आदर्श ठेवतांना " अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः " आदि दैवी संपत्तीचा परीपोष व्यक्ती–व्यक्तीच्या व एकंदर समाजाच्या मनोभूमिकेंत व्हावा असा जागतेपणा येथून तेथें राखला. " मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः " असल्याकारणानें वैयक्तिक, आणि सामाजिक मनाचा मगदूर वाढविण्याचा पाठ देण्यावर आगरकरांचा अव्याहत डोळा होता. भारतवर्षाचा काळपालट झाला तरी आपलें जागतिक स्थान मिळवता व टिकवता यावें म्हणून जगाचे वारे कसे वाहताहेत, त्यांचें संपूर्ण आकलन करून जाणीवेनें प्रत्येक बारीक सारीकसुद्धां गोष्ट करावी असा आगरकरांचा कित्ता होता. बारीक सारीक गोष्टीनींच व्यक्तीचें जीवन होतें व व्यक्तीव्यक्तीच्या जीवनांचा दृढभाजक म्हणजेच सामाजिक जीवन होय. हें जीवन जागतिक चढाओढींत तेजस्वी राखण्यासाठीं नि व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि राष्ट्राच्या प्रगतिकारक राजकीय स्वातंत्र्याचा एकजीव मेळ बसण्यासाठीं जीं कर्तव्यें पार पाडावयाचीं असतात, तीं तत्कालिन आचारप्रभव धर्म असतात. म्हणून पुरुषाचा परमेश्वर होण्याचें ध्येय जें भारतीय मूळ प्रकृतीनें मनुष्याच्या पुढें ठेवलें, तें साधण्यासाठीं बारक्या सारक्या गोष्टीपासून तहत मोठ्या गोष्टीपर्यंत धर्मवचनांच्या शास्त्रीय नियमननाचें अगर सनदशीरपणाच्या संकेताचें शाब्दिक दास्य बुद्धिनें न करतां, बुद्धीशीं त्यांनीं जुळवून घेतले पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता. म्हणून वचनात्प्रवृत्तिर्वचनान्निवृत्ती अशांच्यासाठीं आगरकर लिहितात— ' प्रो. जिनसीवाले उपदेश करतात त्याप्रमाणें प्रत्येक आचाराचा मूळ उद्देश व प्रत्येक मंत्राचा अर्थ

जाणून घेण्याची इच्छा मनांत उत्पन्न झाली कीं सध्याचा वेडगळ धर्माचार राम म्हणणार हे उघड आहे.'

बुद्धीला एकदां विचारांची चालना मिळाली, मेंदूनें बरें वाईट, शाश्वत-अशाश्वत, कल्याणप्रद-अकल्याणप्रद कोणतें अशी चिकित्सा करण्यास सुरवात केली कीं निमिषमात्र निरीक्षणांत त्याला कालानुरूप जुन्याच साधनांचा नव्या ध्येयाला व नव्या सुखसोयीला कसा नि कितपत उपयोग करून घ्यावा अगर त्या जुन्या साधनांत कोणत्या सुधारणा कराव्यात व भर घालावी हें आपोआप सुचत जातें. बुद्धि असें काम करूं लागली कीं, निराशावाद्याचें भूतकालाविषयींचें प्रेम, आशावाद्याची भविष्यकालावरील दृष्टी व वर्तमानकालाकडेच लक्ष देण्याची व्यवहारवाद्याची दक्षता यांचा एकजीव मेळ होऊन समाजाच्या तेजस्वी धारणेसाठीं आचारप्रभव धर्म बुद्धि सांगू लागेल.

श्री. शारदाश्रमस्वामी लिहितात कीं "गतकालाच्या थडग्यावर पुष्पमाला घालितच बसणें व वर्तमान कालाकडे पाठ फिरवणें हें राष्ट्रीय पुरुषार्थ-संपादनाचें लक्षण नव्हे. वर्तमानकालाकडे उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा, व भूतकालाच्या थडग्यावर बसून अश्रू ढाळण्यापेक्षां भविष्यकालाचा सुंदर पाळणा बांधण्याचा मार्गच आगरकरांना पसंत होता." फार काय, "मनाला पटलेल्या गोष्टीचा कोंडमारा करावयाचा आणि तत्त्वाला तडे पाडून ठेवावयाचे ते इतके कीं नुसत्या भुग्याशिवाय हाताला कांहींच लागू नये; त्यापेक्षां अव्यवहारीपणा पदरीं आला तरी पतकरला" या लॉर्ड मोर्ले यांच्या मताचें व्यावहारिक उदाहरण म्हणून आगरकरांकडे बोट करतां येईल. पहा कीं आगरकर म्हणतात—

'आजमित्तीस जे वेगवेगळ्या मार्गांनीं निरनिराळ्या सामाजिक सुधारणा करण्यास झटत आहेत, त्यांचा त्या त्या सुधारणा करण्यापासून व्यक्तिदृष्ट्या आपलें हित करून घ्यावें, हा उद्देश नाहीं. त्या सुधारणांस जर सार्वजनिकता येईल, तरच आपले इष्ट हेतू सिद्धीस जातील ही गोष्ट ते सर्व जाणून आहेत. तुमचा व त्यांचा जन्म एका देशांत झाला असल्यामुळें, तुम्ही त्यांचा कितीही तिटकारा केलात तरी ते तुम्हांस सोडून कधींही दूर जाणार नाहींत. तुम्ही त्यांना कितीही शिव्याशाप दिलेत, त्यांची कितीही निर्भत्सना केलीत व त्यांच्या प्रिय आप्तेष्टांचा उद्धारही केलात, तथापि ते तुमचा आश्रय सोडणार नाहींत. ते तुमच्या कानींकपाळीं असेच ओरडत राहतील व तुमची समजूत पाडून म्हणा, किंवा प्रसंगीं धाक दाखवूनही म्हणा, तुम्हांसहवर्तमान पुढें पाऊल टाकतील.'

"सुधारकाला समाजास प्रसंगीं धाक दाखवावयाचा फाटींगपणा करावा लागतो, याचें कारण असें कीं, "जो तो या लोकमताच्या बागुलबुवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर त्याची चालू स्थिती देखील कायम न राहतां उलट त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणीतरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थळें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांस

अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढें आणण्याचें अनभिमत कार्य करण्यास तयार झालेंच पाहिजे ! असे करण्याचें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्यासुद्धां अंगीं नसेल, त्या समाजानें वर डोकें काढण्याची आशा कधींही धरूं नये !" उलट "जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील त्यांनीं लोकांची मर्जी सांभाळण्यासाठीं अगर त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं त्यांच्या दोषांचें मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय ! असे लोकाग्रणी त्यांना सुमार्ग न दाखवितां केव्हां एकाद्या खड्ड्यांत नेऊन घालतील, याचा भरंवसा नाहीं !"

सुधारक पुढारीपणाच्या सर्व मर्यादा डोळ्यांत तेल घालून आगरकरांनीं पाळल्या म्हणूनच श्री. स. गो. गोगटे लिहितात त्याप्रमाणें " सामाजिक सुधारणांचें पाऊल महाराष्ट्रांत पुष्कळ पुढें पडलें आहे व या गोष्टीचें श्रेय आगरकरांनीं केलेल्या जागृतीसच देणें योग्य आहे. भाषाभेदामुळें त्यांचा लाभ ज्यांस झाला नाहीं असे गुजराथ, मद्रास वगैरे नजीकचे प्रदेश सामाजिक सुधारणांच्या बाबतींत मागासलेले आहेत. "

आणि इतकें असलें तरी हें कबूल केलेंच पाहिजे कीं, आगरकरांचे लोकजागृतीचें मुख्य साधन वर्तमानपत्र असल्याकारणानें प्रसंगोपात त्यांनीं अगदीं पेहेरावापासून विचारपूर्वक प्रत्येक पाऊल सामाजिक सुखसोयींच्या दृष्टीनें टाकण्याची शिकवण दिली असली तरी पांढरपेशा वर्गाच्या जीवनाचा जितका विचार त्यांच्या लिखाणांतून विस्तारानें झाला तितका बाकीच्या समाजासंबंधी झाला नाहीं. " हिंदुस्थानांतलि वर्णव्यवस्था ब्रह्मदेवाच्या योजनेमुळें किंवा भटांच्या स्वहितसाधन-परायणतेमुळें झाली नाहीं. आमच्या देशांतील वर्णव्यवस्था ऊर्फ जातिभेद निर्दोष आहे किंवा त्यांत फेरफार करण्याची किंवा योग्यवेळीं तो अजिबात नाहींसा करण्याची गरज नाहीं, असें आम्ही बिलकूल म्हणत नाहीं." असे अगर "जातिभेदामुळें आपला देशाभिमान किती संकुचित झाला आहे; जातीमुळें ज्ञान, कला, शास्त्रें वगैरे जेथल्या तेथें कशीं कोंडल्यासारखीं झालीं आहेत; जातीमुळें धर्मविचारांत व आचारांत किती मतभेद उत्पन्न होऊन तो परस्पर वैरास, छळास व मत्सरास कारण झाला आहे; जातीमुळें देशांतल्या देशांत किंवा परदेशीं प्रवास करणें कठीण झालें आहे, जातीमुळें अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्या संबंधानें किती गैरसोय झाली आहे; जातीमुळें परद्वीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग रहावें लागत असल्यामुळें केवढें नुकसान होत आहे, जातीमुळें आमची भूतदया, आमचें बंधुप्रेम, आमची उदारता, धर्मबुद्धि, आमची परोपकाररति, आमचे विचार यांचें क्षेत्र किती मर्यादित झालें आहे !!" वगैरे सारखें जळजळीत प्रतिपादन प्रसंग आला त्या त्या वेळीं आगरकरांनीं केलें ही गोष्ट काय खोटी आहे ? पण "जाते घडी ही अपुली साधा" अशा वर्तमानपत्राच्या रकान्यांत आगरकरांना हिंदुसमाजाच्या तळापासूनच्या जीवनांतील बारीक सारीक धाग्यादोऱ्यावर हात फिरवावयास सांपडलें नाहीं हेंही खरें नाहीं काय ? तथापि हिंदु जीवनाच्या कालोचित परीटघडीला कसें रंगरूप आणावयाचें, असा मर्मग्राही उहापोहच आगर-

करांनीं नित्य "टाक चाल्वून" केला असल्याकारणानें आणि आगरकरांचा काळ कार्यतत्परतेपूर्वीच्या विचारजागृतीचा व तपशिलापेक्षां कसदार तत्वांगिरकरणाचा असल्याकारणानें, हिंदु समाजाला जीं जीवनतत्वें आगरकरांनीं सांगितलीं तीं अविनाशी आहेत. म्हणूनच आगरकरांची सुधारक म्हणून योग्यता श्रेष्ठ प्रतीची आहे.

मूळप्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व — अर्थात हिंदुस्थानच्या भौगोलिक स्थानामुळें शारिरिक कणखरपणा आणि आध्यात्मिक मनोवृत्ति यांतूनच उद्‌भवणारी "पशूचा परमेश्वर होण्याची महत्त्वाकांक्षा" आणि श्रेष्ठानुकरण हा बहुजनसमाजाचा गुण वगैरे न टाकतां, कालानुरुप समाजाच्या तेजस्वी धारणेसाठीं जेवढीं बंधनें व्यक्तिमात्रावर अपरिहार्य त्याव्यतिरिक्त पुरुषास काय किंवा स्त्रीस काय, संपूर्ण स्वातंत्र्य हवें, हें सुधारणास्मृतीचें आद्य तत्त्व होय.

समाजाच्या प्रगतीपर धारणेसाठीं व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक असून व्यक्ति-स्वातंत्र्यामुळेंच आचारप्रभव धर्म प्रस्थापित होतो आणि विचारस्वातंत्र्याला संपूर्ण वाव मिळाल्यामुळें समाजाची बौद्धिक प्रगति होत जाते.

तेव्हां बौद्धिक व म्हणूनच वैचारिक स्वातंत्र्याला पूर्ण मोकळें रान सोडून आणि गतेतिहासानें भारतीय आर्यांचें जें वैशिष्ठ्य पटवून दिलें आहे, त्यांतील अभिमानास्पद भाग बिलकुल न सोडता, पाश्चात्य राष्ट्रांनीं आपल्या अभ्युदयासाठीं जे प्रयत्न केले त्यांतील तत्त्वें आणि दिशा यांचा अंगीकार कालोचित प्रगतीसाठीं करावा, पाश्चात्यांचें अंधानुकरण करूं नये. "प्रस्तुतची समाजव्यवस्था सर्व बदलून तिचें ठिकाणीं पाश्चात्य गृहस्थिती आणण्याचा आमचा उद्देश मुळींच नाहीं" असें आगरकरांनीं स्पष्ट सांगितलें आहे. फक्त अशा अनुरोधानेंच नवीन काळांत भारताला आपला आदरणीय इतिहास घडवितां येईल आणि अननुभूत सुखाचा लाभ घडेल.

विचार-स्वातंत्र्य आणि त्यांतून उद्‌भवणारा विचारकलह यानींच समाजाची खरीखुरी प्रगती होणार असें म्हणणाराला तरी कायद्याचा बडगा दाखवून समाजांत एकादी सुधारणा घडवून आणणें शोभणारें नाहीं. आगरकरांना हें मत मान्यच होतें. "आजच्या घटकेस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा आवश्यक वाटतात त्या सर्व कायद्याच्या मदतीनें सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. किंवा त्यापैकीं कांहीं सुसाध्य असल्या तरी त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्ही इच्छित नाहीं." असा निर्वाळा आगरकरांनीं दिला आहे. तथापि त्यांनीं असेंही सांगितलें आहे कीं, "ज्या गोष्टी सध्या सरकारकडून होत आहेत, व त्या सरकारकडून होण्यानें आमचा व्यवहार सुखावह होत असून त्या आम्हांस करतां येण्याचा संभव नाहीं, त्या आम्ही सरकारकडून घेणें पसंत करतों."

कारण "व्यक्तीनें किंवा सरकारनें साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें व्यक्तीस लोकांची पर्वा न करतां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें व सरकारास लोकमताविरुद्ध कायदे करावे लागतात." स्वदेशी सरकार असतांना हें ठीक असलें

तरी परदेशी सरकाराबाबत तें तसेंच मानणें अप्रयोजक नाहीं काय? असा कोणी आक्षेप घेऊं लागेल, तर राजकीय सुधारणा, पारतंत्र्यविनाश, स्वराज्य या गोष्टींची निकड आगरकरांना इतर सर्व गोष्टींच्या आधीं भासत होती; पण बाकीच्या गोष्टींत सरकारनें आपणहून केलेल्या हितकर गोष्टी चालवून घ्यावयाच्या किंवा सरकारकडून हितकर गोष्टी घडवून आणण्याचीही जर खटपट करावयाची, तर सामाजिक सुधारणेच्या संबंधीं तरी तोच न्याय कां मानू नये?

तात्पर्य, "साधनानां अनेकता" आणि त्या अनेकतेनें सहज साधले तर एक न टाकण्याजोगे अंग म्हणून सरकारी कायदा इतकेंच महत्व आगरकर सामाजिक सुधारणेंसंबंधांत मानीत. म्हणूनच 'आतां होणार संमतीचा कायदा' या अग्रलेखांत सुधारकद्वारा आगरकरांनीं कायद्यापेक्षां लोकमताच्या परिवर्तनालाच आपण अत्यंत महत्व देत असल्याचें जाहीर केलें आहे. आणि ते साहजिकच नाहीं काय? आगरकरच एके ठिकाणीं लिहितात कीं, "अमुक गोष्ट आपणाला व दुसऱ्याला आतां व पुढें सुखावह होणार आहे, असे प्रत्येकास समजत असून तदनुसार त्याचें किंवा बहुतेक लोकांचें वर्तन होत असणें ही समाजाची उत्तमावस्था होय."

समाजाला उत्तमावस्था प्राप्त होण्यास संपूर्ण विचारस्वातंत्र्य, सामाजिक प्रगतीस बाध न येईल असें वैयक्तिक आचारस्वातंत्र्य व ऐतिहासिक परंपरेच्या अभिमानास्पद वैशिष्ट्यावर जागतिक वाऱ्यांच्या तारीखतागायत ज्ञानानें आधारलेली आचारप्रणाली आणि ती लोकप्रिय करण्यासाठीं "साधनानां अनेकता" यांची फार आवश्यकता आहे. पहा कीं "समाज हा स्वाभाविकपणे ज्यास अनेक पैलू आहेत अशा खड्यासारखा आहे. असला खडा खाणींतून नुकताच काढला असल्यास विशिष्ट आकार, सफाई किंवा तेज यापैकीं कोणतेच गुण त्यांत नसतात; पण कल्पक सुवर्णकाराकडून जसजसे त्यावर घर्षण होत जातें, तसतसें त्यास मोहक स्वरूप येत जातें. देशातील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत व समाज हा त्यांच्या हातीं दिलेला पैलूदार खडा होय. या खड्यावर सरकारी सहाय्य, स्वताचा प्रयत्न वगैरे हत्यारांनीं ते त्यास मोहकपणा आणतात. ज्या कामास ज्यावेळीं जे हत्यार पाहिजे असेल ते घेतले पाहिजे...सगळे पैलू साफ झाल्याखेरीज समाजखडा कोहिनुराप्रमाणें कधींच चमकूं लागणार नाहीं; हें ज्यानें त्याने ध्यानांत वागवून, आपापल्या पैलूवर होईल तितकी मेहनत करीत असावे आणि मत्सर व क्षुद्रबुद्धि यांचा त्याग करून, दुसऱ्यास होईल तितका हातभार लावावा हाच सुधारणेचा अत्यंत प्रशस्त मार्ग होय." या योगेंच आली तर मनुष्यास पूर्णावस्था होईल.

## प्रकरण ८ वें

# राजकारणी आगरकर

" आगरकरांच्या काळीं हल्लीच्या अर्थानें जहाल पक्ष निर्माण झाला नव्हता; पण लेख, भाषणें, वृत्ति व वर्तन यावरून पहातां आगरकरांची गणना सामाजिक जहालांतच नव्हे तर राजकीय जहालांतही करावी लागेल. "

—वामन मल्हार जोशी.

**पाहोन उमजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें ॥**
**कार्यकर्त्यांच्या गुणें । कार्यभाग होतो ॥** —रामदास.

आगरकरांच्या लेखनांतरंगांत न शिरणाऱ्या कामचलाऊला आगरकरांनीं कधीं राजकारणाचा विचार केला असेल, असेंही वाटत नाहीं. पण वस्तुस्थिती तशी नाहीं. 'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल—सांप्रतचा काल' असें त्यांचें ठाम मत असलेकारणानें सामाजिक सुधारणेवर त्यांनीं 'बेहोष' भर दिला ही गोष्ट खरी; पण त्यांतही त्यांची राष्ट्रीय दृष्टी होती. " उदंड मुंडें असावी । सर्वही एक न करावीं ॥ वेगवेगळीं कामें द्यावीं । सावधपणें ॥ " या दृष्टीनें त्यांनीं स्वतःस सामाजिक सुधारणेस मुख्यतः वाहून घेतलें. एवढ्याचबाबत आगरकरी सुधारणेस राष्ट्रीयत्व निर्माण होत नाहीं, तर दुसऱ्याही एका दृष्टीनें म्हणजे स्वयंसिद्धतेच्या दृष्टीनेंही येतें. आगरकरच एके ठिकाणीं लिहितात—

राजकीय हक्काची, जडसुखाची किंवा स्वातंत्र्याची 'घाल' म्हणून कोणी भीक घालीत नाहीं. या गोष्टी केवळ ज्याच्या त्याच्या अकलेनेंच साध्य होण्यासारख्या आहेत. (नि. सं. भा. २ पा. २४६ ).

अकलमंदीची ही करामत राष्ट्रानें आपल्या पारतंत्र्यांत कशी करावयाची ?

राजकीय स्वातंत्र्य जाणें ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी; हे जाणें म्हणजे शरीरांतील सर्व इंद्रियें आणि त्यांचें व्यापार यांचें पोषक असें चैतन्यसारतत्व तें नाहींसें होणें होय. पण तें गेलें म्हणून रुदन करीत बसण्यांत काय फायदा आहे ? जगावयाचें असेल व जगणें तें चांगल्या प्रकारचें जगणें हवें असेल, तर तें चैतन्यासारतत्व फिरून आपल्या हातीं घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व सांप्रत राष्ट्रसभादि साधनांच्या द्वारें तो जितका होण्यासारखा आहे तितका आम्ही करीत आहों. (नि. सं. भा. १ पा. १३२)

तथापि या कामीं आमची एकजूट होऊन प्रतिवर्षी आमचें पाऊल सपाट्यानें पुढें पडत जाणें, अथवा आमच्यांत फूट होऊन त्या कामाला बरीच मंदी येणें, हें घरच्या घरीं चालू असलेल्या धर्मकलहावर बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. राजकीय गोष्टींत आपआपसांत विशेष मतभेद नाहीं, हें जरी खरें आहे, तरी सर्वांस इष्ट असे

राजकीय हेतु तडीस नेण्यासाठीं धर्मविषयक मतभेद एकीकडे ठेवून, राजकीय प्रकरणांत एकमतानें वागण्याइतकें चांगुलपणही आजमितिस आमच्या अंगांत नाहीं, व सांप्रतकालीं हा देश ज्या स्थितींत आहे तीवरून राजकीय कामें एकदिलानें चालविण्यासाठीं आम्ही धर्मकलहांत पडणार नाहीं, असेंही चिन्ह दिसत नाहीं. जसे युरोप देशांत राज्यकलहापूर्वी धर्मकलह होऊन गेले तसे येथेंही राज्यकलह जोराला लागण्यापूर्वी बरींच वर्षें जबरदस्त धर्मकलह चालत राहील; इतकेंच नाहीं, तर याच कलहापासून आमच्या राष्ट्रांत ज्या सामर्थ्याचा उद्भव होणार आहे, त्यापासूनच येथील भावी राज्यकलहासही पुष्कळ सहाय्य होणार आहे, अशी आमची खातरी झाली आहे. तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं चालू असलेला धर्मसंग्राम किंवा धर्मकलह पाहून आम्हांस वाईट वाटत नाहीं; इतकेंच नाहीं, तर तो जितक्या झपाट्यानें चालेल तितका चांगला, असें आमचें मत आहे. ( नि. सं. भा. ३ पा. ९१–२ )

या धर्मकलहांतून उत्पन्न होणाऱ्या सामर्थ्यावर हिंदुस्थानांत होणारें स्वराज्य हें सामुदायिक स्वराज्य उर्फ होमरूल आहे हें आगरकरांच्या आणि त्यांच्या देशभक्त सहकाऱ्यांच्या नजरेला केव्हांच दिसलें होतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या मृत्यु-लेखांत आगरकर लिहितात—

"एकाद्या वेळीं त्यांचा कल्पनाविहंग पूर्णपंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे." (के. नि. नि. भा. १ पृ. २०७)

विचक्षणेचें समाधान एवढ्यानें होईल काय ? होत नसल्यास आगरकरी अंतःकरणाचा पुढील मासला पहावा—

फार काय सांगावें, उद्यां आम्हांस सीझर, अलेक्झांडर, नेपोलियन किंवा डयूक ऑफ वेलिंगटन यांसारखा पुढारी मिळेल तर इंग्रज लोकांना हिंदुस्थानचा कारभार पाहण्याची जी दगदग पडत आहे ती दूर करूं; इतकेंच नाहीं तर नेलसन–सारखा तांडेल मिळाल्यास ' अजिंक्य आरमारानिशीं ' इंग्लंडवर चाल करून जाऊन कोहिनुरासकट जी जी मौल्यवान वस्तू म्हणून इंग्रज लोकांनीं इकडून तिकडे नेली असेल ती परत आणूं ! तसेंच ग्लॅडस्टनसारखा पुढारी मिळाल्यास हौस ऑफ लॉर्डसची परवा न करतां पांच पंचवीस वर्षांत इंडिया सेल्फ गव्हर्नमेंट बिल हौस ऑफ कॉमन्समध्यें लीलेनें पास करून घेऊं. ( नि. सं. भा. १ )

ज्याची त्याच्या शिरावर जबाबदारी असल्यानें त्याच्या बुद्धीस जें चांचल्य येतें, उद्योगनिमग्नत्वामुळें त्यांच्या वृत्तींत जी प्रफुल्लता असते, कष्टानें जय आल्यास जो अनिर्वचनीय आनंद होतो, तो दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारास कधींही व्हावयाचा नाहीं. मि. ग्लॅडसन यांच्या मनांत हें मत अगदीं खिळून गेलेले आहे आणि म्हणून त्यांच्या हातून आयरिश बिल पार्लमेंटपुढें आलें. ब्रिटीश पार्लमेंटांत आमच्यासाठीं असें बिल आणण्यास ईश्वरानें कोण योजून ठेवला असेल तो असो ! इतकें खरें कीं आम्ही शेदोनशे वर्षें दातीं तृण धरून एकदिलानें परिश्रम केल्याशिवाय तो इसम पुढें येण्याचा संभव नाहीं. — ( के. नि. नि. पु. १ लें पान ५२ )

हिंदुस्थानच्या सैन्याइतकें दुसरें महागडें सैन्य कोणत्याही देशांत नाहीं, व या सैन्यावर होणाऱ्या धिप्पाड खर्चाचा बराच भाग हिंदु लोकांच्या खिशांत पडत नाहीं. जवळ जवळ इतर खात्यांचीही याचप्रमाणें व्यवस्था आहे.''' असा प्रकार एक वर्ष नाहीं, दोन वर्षे नाहीं सुमारें शंभर वर्षें चालला आहे. या वर्षांत हिंदुस्थानचें उत्पन्न सुमारें चाळीस कोटी पडलें असें धरिलें आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षी इंग्लिश लोकांच्या खिशांत अचानक पडला असें मानलें, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले असा हिशोब होतो. ज्या देशाच्या द्रव्याला असा पाझर लागलेला आहे, त्या देशांतील लोकांना अन्नान्नदशा प्राप्त होणें किती स्वाभाविक आहे ! ''''''''' आणखी पांचपंचवीस वर्षें असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील, किंवा भुकेच्या दुःसह यातनामुळें बेफाम होऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचें जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील असें डोळ्यापुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय ? व ज्यांच्या अंतःकरणांत खऱ्या देशाभिनाचा व खऱ्या मनुष्यपणाचा कांहीं अंश आहे, त्याला ही गोष्ट उघडपणें बोलल्यावांचून राहवेल काय ? ( नि. सं. भा. १ पा. २१५ )

लॉर्ड लिटन साहेबासारखे पांच-सात गव्हर्नर–जनरल एकापाठीमागून एक येथें येतील, अफगाणिस्थान, ब्रह्मदेश वगैरे देशांत केलेल्या लढायांप्रमाणें आणखी पांच-चार लढाया उकरून काढल्या जातील, काश्मीरच्या महाराजांप्रमाणें दहा-पांच महाराजांशीं धरसोडीचें वर्तन करण्यांत येईल, आठराशें पंचाहत्तराच्या दुष्काळासारखे एक दोन दुष्काळ पडून लाखो लोक प्राणाला मुकतील व अशा दिवसांत राणीस मोठमोठे किताब देण्यासाठीं दिल्लीदरबारासारखे समारंभ करण्यांत येतील, दुष्काळाकरितां जमविलेला पैसा लष्करी खात्याकडे खर्ची घालून त्याच्या कधींही न भरणाऱ्या गर्तेत लोकशिक्षणासारख्या उपयुक्त खात्यांतून ओरबडून घेतलेला पैसा ओतण्यांत येईल, रुपयाचा भाव उतरला आहे म्हणून, माल्टा येथील आरमार वाढविलें पाहिजे म्हणून, मिसर देशाला किंवा युगांड्याला फौज पाठविणें जरूर आहे म्हणून, किंवा अशाच एखाद्या दुसऱ्या शुष्क कारणास्तव आमच्या खऱ्या स्थितीकडे न पाहतां प्रासविरचा व मिठावरचा कर वाढविण्यांत येईल, आणि नवीन कर बसविले जातील, तर अँग्लो-इंडियन नोकरांच्या असंतोषामुळें पादशाहीस जेवढा अपाय घडणार आहे त्याहून अधिक मोठा अपाय अन्नास मोताद झालेल्या हिंदु प्रजेच्या असंतोषामुळें घडेल असें आम्हांस वाटतें. ( नि. सं. भा. २ पा. ५१ )

आम्ही हिंदू लोक नेहमीं परतंत्रच असलो पाहिजे; कांहीं केलें तरी अधिक राज्याधिकार भोगण्याची पात्रता आमच्या अंगी कधीं यावयाची नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्ही कधीं स्वप्नांतसुद्धां आणूं नये; स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद, कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसंतोषानें शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें हा शुद्ध मुर्खपणा होय. अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रु म्हटले असतां वावगें होणार नाहीं. ( नि. सं. भा. १ पा. ७–८ )

हिंदुस्थानच्या राज्यप्रकरणाचा संबंध इंग्लंडच्या राज्यप्रकरणांपासून जितका तुटेल तितका तोडवून हिंदुस्थानचा राज्यकारभार आमच्या विचारानें, इतकेंच नाहीं पण बहुतेक अंशीं आमचा आमच्याकडून चालविला पाहिजे. असें जर त्यांनीं ( इंग्रजांनीं ) न केलें, व हिंदुस्थानच्या लोकांनी मागेंपुढें तसें करण्यास न लावलें तर हिंदुस्थानची काय स्थिती होईल, हे आज सांगवत नाहीं.

( के. नि. नि. पु. १ लें पा. १७ )

राज्यशास्त्राप्रमाणें व ऐतिहासिक अनुभावाप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांची अक्कल आणि ताकद दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन, व दिवसेंदिवस इंग्रजांची आणि त्यांची अधिकाधिक फाटाफाट होत जाऊन शेवटीं घरची मंडळीं आगंतुकांना धुडकावून लावणार. ही इष्ट गोष्ट आज उद्यां घडून येणार नाहीं; इला शतकेंच्या शतकें लोटलीं पाहिजेत.

( के. नि. नि. पु. १ लें पा. १०२ )

मार्मिक निरीक्षक हो, मागें उल्लेखिल्याप्रमाणें हिंदुस्थानचें राजकीय ध्येय म्हणून सेल्फगव्हर्नमेंट ऊर्फ स्वराज्य आणि तेंही लोकशाहीचें स्वराज्य हें ध्येय तर आगरकरांच्या डोळ्यांपुढें सारखें होतेंच; पण पूर्ण स्वातंत्र्याची कल्पनाही त्यांच्या मनांत मधून मधून तळ देण्यास सोडत नसे, हें मागील उताऱ्यांवरून लक्षांत आल्याशिवाय राहील काय ? राज्यघटनेचा खर्डा तयार करण्याचा, अगर मीमांसक भविष्यवाद्याप्रमाणें नियंत्रित–नियंत्रकाच्या ऐतिहासिक वैशिष्ठ्याची चिकित्सा करून ‘ सनदशीर जिना ’ वर्तविण्याचा आगरकरांचा काळ नव्हता. इ. १८८५ सालीपासून राष्ट्रसभेच्या द्वारें अखिल भारतानें आपलें तोंड उघडावयास सुरवात केली होती ती अर्जविनंत्याच्या द्वारें केली होती. कर्झन साहेबांच्या बड्या लाटशाहीनें १९०५ सालीं वंगभंग करीपर्यंत भारताच्या राष्ट्रीय मुखानें ‘ स्वराज्य ’ हा शब्द उच्चारला नव्हता हें ध्यानी ठेवलें म्हणजे महाराष्ट्रापुरती त्या भावनेची तयारी करणारांत आपल्या हयातीच्या कालांत आगरकरांस बरेंच वरचें स्थान द्यावें लागेल. कोणत्याही गोष्टीचा ‘ राष्ट्रीय विचार ’ म्हणून अधिकृत उच्चार होण्यापूर्वी राष्ट्रांत त्या विचाराचें आंदोलन व मंथन अगोदर बराच काळ व्हावें लागतें. रावबाजीनीं स्वराज्याचें उदक साहेबबहादुरांच्या हातीं सोडून ब्रह्मावर्ताचा मार्ग धरल्यानंतर, इंग्रजी पोतडींतून ज्या एक एक चिजा बाहेर पडल्या त्यांनीं होत्या नव्हत्या राजकीय भावनांचें अदमुरें करावयास सुरववात केली, आणि सत्तावनच्या शिस्तसूट स्वातंत्र्ययुद्धानें त्या भावनांचें उग्र स्वरूप जरी किंचित् काळ दाखविलें तरी पुढच्या वर्षीच्या बादशाहिणीच्या जाहीरनाम्यानें अखिल भारतीय राजकीय भावनेलाच पुरेपुर विरजण घातलें असें म्हणावयास फारसा प्रत्यवाय नाहीं.

थोड्यासाठीं खोटें बोलणें, वरिष्ठाची मर्जी संपादण्यासाठीं तोंडपुजेपणा करणें, कोणी थोडें चापल्याबरोबर मान खालीं घालणें, सारांश भित्रेपणा, खोटेपणा, ओशाळपणा, खोटी स्तुति, वृथा निंदा, हेवा, खुनशीपणा, चिडखोरपणा, वगैरे गुण

जिंकलेल्या लोकांच्या अंगीं तेव्हांच जडतात आणि हाच परिणाम इंग्रज लोकांच्या राज्यामुळें आमच्या प्रकृतींत झाला आहे, हें कोणीही कबूल करील.

( के. नि. नि. पु. १ लें पा. ७ )

अशाप्रकारें राष्ट्रीय जिवंतपणाच्या दृष्टीनें सगळा समाज बर्फाचा गोळा होऊन पडला असतां त्यांत चैतन्याची प्रेरणा करण्याचें काम न्या० रानड्यांनीं केलें. पारतंत्र्याच्या गारठ्यानें मरणप्राय अवस्थेंत पडलेल्या महाराष्ट्रालाच काय पण अखिल भारताला, "पुन्हां सूर्योदय होईल" असा आशापूर्ण संदेश प्रथम रानड्यांनींच दिला.

अलिसुंदर ऊर्फ अलेक्झांडर यानें हिंदुराजांच्या सैन्याचा मोड केल्यापासून, दोन हजार वर्षांवर उत्तरेकडून भारताच्या बोकांडी ज्या परकीयांच्या टोळधाडी आल्या त्यांना टणक यशस्वीपणानें टक्कर देण्याचें सामर्थ्य भारतांत उरलें नाहीं असा युरोपीयन इतिहासकारांचा शोध होता. तथापि शतकानुशतकें होत आलेल्या आघातांचा, इंग्रजी अमदानीच्या शांततेनें, पहिला दुखणभर ओसरल्यानंतर पुनः हुशारीनें संचार करण्याचें सारतत्त्व भारतांत गुप्तायस्थेंत तरी आहे हें अचूकपणें 'महाराष्ट्राच्या महादेवानें' ओळखलें व प्रथम निदर्शनास आणलें. हिंदु व इस्लामी संस्कृतीच्या प्रीतिसंगमांत पाश्चात्य संस्कृतीचा ओघ मिळून जो 'प्रयाग' तयार होईल त्याची गंभीर विशालता रानड्यांनीं आपल्या ज्ञानदृष्टीनें आगाऊच पाहिली आणि तिची ओळख आपल्या लोकांस पहिल्यानें दिली. 'इंग्रजी' महाराष्ट्राच्या पहिल्या ज्ञानर्षिला जें दिसलें, त्याचें जनतेंत बीजारोपण करण्याचें काम विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केलें.

"खऱ्या कारकुनानें जमाखर्चाची चोपडी लपवून न ठेवतां भरचव्हाठ्यावर हिशेब देण्यास जसें नेहमीं सिद्ध असलें पाहिजे, त्याचप्रमाणेंच राज्यकर्त्यांचीही गोष्ट होय. प्रजेपासून कर घेऊन सर्व प्रकारें पालन करण्याचा पतकर जर राजानें घेतला आहे, तर सर्व कामाचा झाडा त्यानें आपल्या यजमानास दिला पाहिजे, व यजमानासही वरील झडती घेण्यास पूर्ण अखत्यार आहे. त्यांतून ज्यांनीं राजदरबारीं अशी प्रतिज्ञा भोगलेली कीं, आम्ही तुह्मांवर अंमल करतों तो फक्त तुमच्या कल्याणाकरितां व तुम्ही कर्तेसवरते झाला कीं आमचें काम आटपलें, आम्ही गाशा गुंडाळून येथून निघालोंच समजा,—त्यांनीं तर या निःसीम निःस्पृहतेच्या सोंगाची बतावणी किती चोख रीतीनें केली पाहिजे हें सांगायला नकोच." ( के. नि. नि. पु. १ लें पा. १९६ )

राष्ट्रसभेच्या जन्मापूर्वींच असल्या तऱ्हेचे विचार शास्त्रीबुवांनीं महाराष्ट्रीयांपुढें मांडलेले होते, किंबहुना असल्या विचारांच्या सार्वजनिक कमी अधिक परिस्फुटतेनेंच राष्ट्रसभेचा जन्म होऊं शकला हेंही कांहीं खोटें नाहीं. तथापि हें शहाणपण इंग्रजीच्या टाकांतून काढून निव्वळ मराठी वाचकांकरितां प्रसृत करण्याचें काम प्रथम शास्त्रीबुवांनीं सुरू केलें हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतीच्या सुंदर मीलनाचा धीरगंभीर प्रवाह रानड्यांना जसा दिसला तसा तो होण्यापूर्वी, त्या संस्कृती एकमेकींत मिळतांना जो खळबळाट उडून लाटांचा कापूस पिंजावयाचा त्याची शोभाही कांहीं कमी नव्हे. इंग्रजी सुखसोयींच्या फैलावानें धुंद झालेल्या

इंग्रजी शिक्षितांत न्यायमूर्तींनीं जें दिव्य भविष्य पाहिलें त्याचा सगुण अवतार येथें व्हावयाचा तर त्याची कल्पना बहुजनसमाजांत रुजून त्या दिशेनें लोकांचे प्रयत्न झाले पाहिजेत हें उघड आहे. आत्मत्व विसरून इंग्रजीनें धुंदलेल्या 'नेत्या' मागून लोक गेल्यास कांहीं उपयोग नाहीं. एवढ्यासाठींच, स्वाभिमानपूर्वक लोकजागृतीचें कंकण शास्त्रीबुवांनीं हातीं बांधून वरच्यासारखे विचार फैलावले.

लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला, त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत सारखा घोळत असे. लोकांत विद्याप्रसार होऊन त्यांना राजकारणांतील तत्त्वें कळावींत, व तदनुसार वर्तन ठेवून या हतभाग्य भारतखंडास त्यांनीं एकदां तरी सुदिन आणावा अशी त्यांची बळकट इच्छा होती. हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं सुखी होण्याचें कोणतेंही साधन असल्यास त्याला ते अडथळा करणारे नव्हते. (के. नि. नि. पु. १ पा. २०७)

महाराष्ट्राच्या पुनरुजीवनांत रानड्यानंतर शास्त्रीबुवांना जें प्रमुख स्थान आहे तें वरील कामगिरीमुळेंच. "भीड कसली मला । आग लागो तिला ॥ कोण स्पष्टोक्तिला । धीर भ्याला ? ॥" हें ब्रीद बाळगून सर्व प्रकरणीं आपली लेखणी तशीच चालविण्याचें व तद्द्वारां लोकशिक्षण देण्याचें श्रेय 'महाराष्ट्र-भाषापति' चिपळूणकरांनाच प्रथम आहे.

आजमित्तीस खुद्द सरकारपासूनच जी आम्हांला पीडा होत आहे तिला कोठें तोडच नाहीं म्हटलें असतां चालेल.··· ज्या कायद्यानें आम्ही बांधलों गेलों आहों, व ज्याच्या चरकाखालीं ही सुवर्णभूमि पिळून निघून अस्थिपंजररूप राहिली आहे, त्याचें स्वरूप एकंदर लोकांस समजून वरील दुर्धर पीडेचा जेव्हां परिहार होईल तेव्हां उपयोग आहे. (के. नि. नि. पु. १ पा. १९७-८)

अशा तऱ्हेच्या स्पष्ट कल्पना चिपळूणकरांनींच सडेतोडपणें मराठी वाचकांस बहाल केल्या. अर्थात् त्यावेळीं कोणी एकदां शास्त्रीबुवांना असा प्रश्न केला होता कीं, असे कडक लेख लिहिण्यास तुम्ही कसे धजतां ? त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं, अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्ही देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली. (के. नि. नि. पु. १ पा. २०६)

गोपाळरावजी आगरकर शास्त्रीबुवांच्याच तालमींतले होत. स्वतां केसरींत लिहिलेल्या शास्त्रीबुवांच्या मृत लेखांत ते लिहितात–

" सर्वांनीं एकच गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं, आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रडतरावाची मनोवृत्ति धारण करून आरंभिला नाहीं. हें काम आम्ही आपल्या आपखुषीनें आणि आपसमजुतीनें आमचें आम्ही आपल्या अंगावर घेतलें, तें तडीला लावण्यासाठीं आमच्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं. देवाच्या किंवा दैवाच्या इच्छेपुढें इलाज नाहीं, अशा रीतीनें मनाची खोटी समजूत घालून अशा लोकहिताच्या कामांत प्रतिपक्षाची क्षमा मागण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं. अधिकार, धन,

वजन यापुढें टिकाव धरणें दुस्तर आहे हें आम्ही कबूल करतों. परंतु सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणारांना कोणत्याही प्रकारची धास्ती बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि असें असूनही प्रसंग येऊन बेतलाच तर तो साहण्यास आम्ही कचरूं अशी कोणीही शंका घेऊं नये.

देशोन्नति, देशकल्याण वगैरे गोष्टी थोडीबहुत अंगास झीज लावून घेतल्याखेरीज फुकाच्या पोकळ गप्पा मारून होत नाहींत हें आम्ही पक्कें समजत आहों. ती लावून घेण्यास आम्ही तयार आहों. प्रयत्न करणें आमचें काम आहे; यश येणें न येणें बाह्योपाधीवर अवलंबून आहे. त्याचा विचार आम्ही करीत नाहीं. "

'माझ्या देशबाधवांच्या सदाकांक्षांस मी मर्यादाच मानीत नाहीं' हे ना. गोखल्यांनीं आगरकरांच्यानंतर किती तरी वर्षांनीं केलेलें ठसठाशित विधान ध्येयस्वरूपाच्या दिग्दर्शननिमित्तानें आगरकरांच्या लेखनांत प्रतिबिंबित झालें नाहीं काय? परिस्थितीप्रमाणें प्रत्यक्ष व्यवहाराचा क्षितिज बदलत असतो, तरी सर्वांगांनीं आपली व आपल्या देशबांधवांची वाढती उन्नति होत राहण्यावर निश्चल दृष्टीच्या ध्येयाचें राजकीय स्वरूप म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानचें प्रजासत्ताक राज्य ऊर्फ सेल्फ गव्हर्नमेंट होतें.

हें ध्येय साध्य होण्यासाठीं शें-दोनशें वर्षें झगडा केला पाहिजे असेंही आगरकरांचें अनुमान होतें, हेंही खोटें नाहीं. आपल्या भोंवतालीं पसरलेल्या परिस्थितीवरून मर्मभेदी दृष्टीनें मनुष्य कोणत्याही गोष्टीचें आपल्या कुवतीप्रमाणें अनुमान काढीत असतो.

अलीकडील राजकीय विचारपद्धतीमुळें कोणत्याही राष्ट्राला राष्ट्रपण येणें म्हणजे त्यावर अंमल करणाऱ्या सरकाराचें नियंत्रण किंवा नियमन त्यांतील लोकांचे हातीं येणें होय. (नि. सं. भा. ३ पा. १२८)

"या दृष्टीच्या नियमनाची किंवा नियंत्रणाची पटण्यासारखी उत्कृष्ट पद्धत म्हणजे प्रजासत्ताक पद्धति. या पद्धतीच्या भूमिकेवरून बहुधा असें आढळून येतें कीं, "राष्ट्राचें सरकार म्हणजे राष्ट्रांतील व्यक्तींचें प्रतिबिंब. राष्ट्राची किंमत, शक्ति आणि योग्यता, माणसांचे स्वभाव व गुणधर्म यापेक्षां संस्थांच्या स्वरूपावर पुष्कळच कमी अवलंबून असतात. कारण राष्ट्र माणसांचेंच झालेलें असतें. आणि राष्ट्राची सुधारणा म्हणजे पुरुष, बायका व मुलें यांच्या वैयक्तिक प्रगतीचें गोड, सुंदर व चित्ताकर्षक एकीकरणच."

स्माइल्स साहेबाच्या 'स्वावलंबन' या पुस्तकांतील हा विशद उतारा आणि " प्रतिनिधिसत्तेंत जसे लोक, तसे त्यांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि असतात. लोक अज्ञ, दारूबाज, हक्कांची जाणीव नसणारे व अशास्त्रज्ञ असले, तर त्यांनीं निवडलेले प्रतिनिधि तज्ज्ञ, सद्गुणी व शास्त्रज्ञ असूं शकणें प्रायः असंभवनीय असतें. "

हें इतिहासाचार्य राजवाडे यांचें सिद्धांतरूप वचन प्रजासत्ताक कारभाराची आमूलाग्र कल्पना देण्यास समर्थ नाहीं काय? मग 'स्वतंत्र हिंदुस्थान प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदावयास' दीर्घ काळ लागेल असें अनुमान निघालें असल्यास पारतंत्र्याच्या पहिल्या प्रखरतेंत नवल काय? सर टॉमस मन्रोनेंही म्हटलें आहे कीं—

" आगंतुक राज्यकारभाराखालीं इतक्या कारणांनीं सत्प्रवृत्तीस खालीं ओढ-ओढण्याचा चंग बांधलेला असतो कीं, तिचा ऱ्हास थांबविणें सोपें नव्हे. फार जुनी म्हण आहे कीं ज्यानें आपलें स्वातंत्र्य गमावलें त्यानें आपला निम्मा सदाचार सांडला. हें जसें व्यक्तींना तसेंच राष्ट्रांनाही लागू आहे. आपल्याच तक्ताधिपतीचा ' हम् करे सो कायदा ' नव्हे पण परकीय राजाची ताबेदारीच राष्ट्रीय सदाचाराची दैना उडविते आणि राष्ट्रीय वृत्ति मालवून टाकते. "

मनुष्य हा जात्या उत्सवप्रिय प्राणी आहे असें सामान्य वचन व अनुभव असून त्याच्या उलट येथील स्थिति दृष्टीस पडावी हें अत्यंत शोचनीय नाहीं काय? इंग्रजी राज्य आणि पाश्चिमात्य विद्या यांचे या देशावर जे अनिष्ट परिणाम घडले आहेत किंवा घडत आहेत त्यांतच आम्ही या ऱ्हासाचा समावेश करतों.... परक्या अमलामुळें एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सारा देश अत्यंत विकल होऊन गेला आहे. मोठमोठ्या हुद्यांची, पुष्कळ किफायतींची व भारी जबाबदारीचीं सरकारी कामें टोपीवाला बळकावून बसला आहे. इतकेंच नाहीं तर आमचा हरएक व्यापारधंदा देखील त्याच्या तब्यतीप्रमाणें व त्याचा फायदा होईल अशा रीतीनें चालूं लागल्यामुळें कोणालाही आपल्या श्रमाचें, कर्तबगारीचें व मर्दुमकीचें मिळावें तसें फळ मिळत नाहीं. शेंकडा नव्वद लोकांना शुद्ध चारितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतें. अशा स्थितींत सर्व देशाच्या मुखश्रीवर खिन्नता दृष्टीस पडावी व कोणास कशांतही गोडी न वाटावी हें अगदीं साहजिक आहे. (नि. सं. भा. ३ पा. १६३)

इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून राजापासून रंकापर्यंत साऱ्यांस सारखी निस्तेजता आली आहे. बुद्धीला उत्तेजन, व्यापाराला खप व कलाकौशल्याला पोशिंदा नाहींसा झाला आहे. जिकडे पहावें तिकडे उत्साहशून्यता दिसते. मोठें औदार्य, मोठें शौर्य, मोठें धाडस, मोठी कल्पकता, सारांश प्रत्येक प्रकारच्या मोठेपणाचा लोप झाल्यासारखा झाला आहे. लढाई किंवा तह करणें, लोकांच्या सुखासाठीं राज्यासंबंधीं किंवा व्यापारसंबंधीं मोठमोठ्या युक्ति काढणें, वित्तसर्वस्व व बुद्धिसर्वस्व खर्ची घालून नवीन शोध करणें, निरपेक्ष बुद्धीनें विद्याव्यासंगांत किंवा लोकोपकारांत गढून राहणें, देशासाठीं किंवा स्वार्थासाठीं अचाट कृत्यें करण्यास तयार होणें, टोलेजंग कारखाने समाईक भांडवलांनीं चालविणें, राज्यविषयक, धर्मविषयक व समाजविषयक सुधारणा करण्यासाठीं मंडळ्या व सभा स्थापून उत्साहपूर्वक कामें करणें–वगैरे सुधारलेल्या स्वतंत्र देशांत दृष्टीस पडणाऱ्या गोष्टी येथें क्वचित दृष्टीस पडतात.

अशा या शोचनीय अवस्थेंतून आम्ही बाहेर कसे पडूं ? हींतच आमचा व आमच्या राष्ट्राचा अंत होणार, यासाठीं होईल तितकी चैन करून घ्यावी, व मरून जावें, असें म्हणणारे व त्याप्रमाणें आचरण करणारे उदास व स्त्रैण लोक जिकडे तिकडे पसरले आहेत. ( के. नि. नि. पु. १ पा. ३७-६८ )

हें आणि असलें हिडीस प्रत्यंतर प्रत्येक परतंत्र राष्ट्रांत येत असतें. पण तेवढ्यासाठीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न कोणी सोडला आहे ? सुदैवानें ज्यांच्या अंतःकरणाला

पारतंत्र्य बोंचत असतें, ते स्वतां नेते बनतात आणि राष्ट्राचें स्वातंत्र्य साधतात. तथापि कोणी नेता बनून वाटेल ती झीज सोसावयास तयार झाला तरी वरीलसारख्या समाजस्थितींत त्याच्या असीम त्यागाचें चीज निदान कौतुक होईल काय?

"नुसत्या एकट्या स्वार्थत्यागानेंच स्वराज्याची व स्वातंत्र्याची उपलब्धि होते, अशी समजूत करून घेण्यांत हंशील नाहीं. स्वार्थत्यागाचा योग्य परामर्ष घेणारें कौशल्य जर देशांत निपजलें नाहीं, तर त्याग गाभटतो व जिवंत स्वातंत्र्याला प्रसविण्यास असमर्थ होतो." —वि. का. राजवाडे

तेव्हां स्वार्थत्यागाचा योग्य परामर्ष घेणारें कौशल्य राष्ट्रांत उत्पन्न होण्याकरतां व खरीखुरी चांगली राजकीय स्थिती ही चांगल्या गृहस्थितीचें फळ आहे म्हणून आगरकरांनीं सामाजिक सुधारणेवर भर दिला हें उघड होत नाहीं काय?

राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यास लागणाऱ्या गुणांचा आम्हांत पूर्णपणें लोप झाला आहे; व त्यांचा फिरून आविर्भाव होऊं लागून त्यांची बरीच वृद्धि होईपर्यंत तें फिरून प्राप्त होण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. (नि. सं. भा. १ पा. १३२)

आपल्या भोंवतालीं पसरलेल्या परिस्थितीचा आगरकरांनीं केलेला मर्मभेद असा असल्याकारणानें सेल्फगव्हर्नमेंट—स्वराज्य व तदंगभूत आणि तद्विकासोद्भव स्वातंत्र्य हिंदुस्थानानें उपभोगावयास शेंकडों वर्षें मोजावीं लागतील असें आगरकरांस वाटलें असलें तर नवल काय? वंगभंगानें 'न भूतो न भविष्यति' असा सारा हिंदुस्थान हलविल्यानंतर पितामह दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास राष्ट्रसभेचें अधिवेशन पार पडल्यावर, ब्रिटिश पार्लमेंटचे मेंबर नेव्हिन्सन् यांच्या बरोबर झालेल्या मुलाखतींत लोकमान्यांनींही सेल्फगव्हर्नमेंट–कलोनियल सेल्फगव्हर्नमेंट, वासाहतिक स्वराज्य 'कदाचित् पिढ्यान् पिढ्या पुढें आहे' असें सांगितलें होतें. पहा—

"Unorganised, disarmed and still disunited, we should not have a chance of shaking British Sugereints. We have all that sort of thing to a distant time. Our object is to obtain eventually a large share in the administration of our country. Perhaps our Home-Rule would take the form of Provincial councils of fifty or sixty members nominated, indiretly elected by popular vote as education becomes more general.

But that ideal also is far ahead of us-- perhaps generations ahead."

"पार्लमेंटरी राज्यसंस्थेची लाट तुर्कस्थान व इराण या पाश्चिम देशांतून जशी हिंदुस्थानच्या पाश्चिम सरहद्दीस येऊन भिडली, तशीच ती चीनच्या महत्वाकांक्षेमुळें हल्लीं हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीस येऊन भिडली आहे. दोन बाजूंनीं येऊन भिडणाऱ्या या प्रगतिसमुद्राच्या लाटा अखेर हिंदुस्थानवरून जाऊन एकजीव होणार किंवा हे

पूर्वपश्चिम समुद्र निरंतर अलग ठेऊन हिंदुस्थान स्वतः कोरडा ठणठणीत पाषाणमय असा मेरूपर्वत ठरणार— हें भविष्य अद्यापि अगाध कालाच्या प्रचंड उदकंदरांतील एक अदृश्य रत्न आहे. "

दे. केळकरांचे हे उद्गार १९०८ सालानंतरचे आहेत हें लक्षांत घेतलें, म्हणजे अर्ज, विनंत्या आणि मेमोरँडमें यांच्या पलीकडे फारसा फेर न धरणाऱ्या राजकीय चळवळीच्या दिवसांत, हिंदुस्थानच्या स्वराज्योदयाची तारीख शेंदोनशें वर्षांच्या अंतरावर आगरकरांना दिसली यांत आगरकरांच्या मननशीलतेस न शोभणारें असें कांहीं नाहीं.

गोपाळरावांच्या काळीं राजकीय क्षितिजावर उग्र भासणारे चळवळीचे मार्ग उदित झाले नव्हते ही गोष्ट खरीच; तथापि हातीं असलेल्या मार्गांची, जरूर पडल्यास, चळवळ कडेलोट तीव्रतेला पोंचविण्याची त्यांची तयारी असे. पहा—

पण लष्करी खातें व मुलकी खातें या दोहोंवरही आम्ही पाहिजे तसा खर्च करूं, व तो भागविण्यासाठीं तुमच्यावर पाहिजे तसले कर बसवूं असें तुम्ही म्हणाल तर मात्र आम्ही तुमच्याशीं एकसारखें भांडल्याशिवाय व आमच्या आरोळ्यांनीं तुमच्या कानाचीं रंध्रें भरून सोडल्याशिवाय राहणार नाहींत! ( नि. सं. भा. २ पा. ५२८ )

असा स्पष्ट इशारा आगरकरांनीं सरकारास दिला. अर्थात् अशा तीव्र स्वरूपाची चळवळ करावयाची किंवा स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यपद्धती स्थापावयाची म्हणजे लोकांत किती तयारी पाहिजे ? ही तयारी ' ट्रस्टी ' म्हणून राज्यकारभार करणाऱ्या इंग्रज सरकारकडून होईल काय ? ही तयारी इंग्रजी हुकमतीनें होईल काय ? आणि यदाकदाचित् झाली तर इंग्रज हा देश हिंदपुत्रांच्या स्वाधीन करून खरोखरच आपलें राजकीय चंबुगबाळें आटोपून चालते होतील काय? या तीनही प्रश्नांचें निश्चयात्मक उत्तर आगरकरांनीं दिलें आहे अगर सुचविलें आहे. तिसऱ्या प्रश्नासंबंधीं ते स्पष्ट म्हणतात कीं, " आमचा सगळा व्यापार आमच्या हातीं पडून देण्यापेक्षां आमचें राज्य ते आम्हांस अधिक आनंदानें परत देतील. "

ही गोष्ट खरी; पण हा तुलावयाच्या दोन गोष्टीपैकीं पसंतीचा पर्याय झाला. एरवीं कितीजरी झालें तरी " हिंदुलोक धनसंपन्न आणि ज्ञानसंपन्न झाले म्हणजे इंग्रजलोक एके दिवशीं आपलें चंबूगबाळें आटोपून चालते होतील असें कोणी मानूं नये."

(नि. नि. पु. १ पा. १०२)

कारण हिंदुस्थानीं इंग्रजांचा तळ राहिल्यानें त्यांना औद्योगिक, राजकीय व अन्यतऱ्हेनेंही अपरंपार फायदा आहे. आणि म्हणूनच एके समयीं बीकन्सफील्डनें म्हटल्याचें प्रसिद्ध आहे कीं ',एक वेळ इंग्रज ग्रेटब्रिटन सोडील परंतु हिंदुस्थान हातचा गमावणार नाहीं.' उघडच या एका गोष्टींत इंग्रजी ' ट्रस्टीशिप ' ची सारी शोभा प्रतिनिविष्ट झाली आहे.

खुद्द बादशाहीण आपला किताब एकीकडे ठेवून लोकमताचा स्वीकार करण्यास एका पायावर तयार असतां तिने नेमलेल्या अधिकारी वर्गाचें आचरण पहावें तों केवळ बादशाही थाटाचें असतें.

( नि. सं. भा. ३ पा. १६७ )

इतकें कीं आमच्या सरकारच्या अंगीं दुर्भेद्य स्थितिस्थापकता आहे. कोणतीही नवीन गोष्ट करण्यासाठीं त्याची उचल करण्यास अतिशय त्रास पडतो.

( नि. सं. भा. ३ पा. ७० )

इथल्या दिव्याचा हा असा प्रकाश, तर त्याच्या बैठकीजवळ किती अंधेर असेल याची कल्पना करणेंच बरें! इंग्लंडस्थ पार्लमेंटच्या पाठबळावर येथील 'युनिअनजॅक' झळकणार, तेव्हां खुद्द पार्लमेंटांत हिंदच्या कल्याणाची कळकळ किती हें पडताळावयास गेलें तर तेथेंही गुडघाभरच पाणी आढळतें. तेथें "इंग्रजांनीं पार्लमेंटाचे ठराव करावे आणि नामानिराळें व्हावें. ते कमीअधिक प्रमाणानें अंमलांत आणतांना हिंदुस्थान सरकारास व हिंदु लोकांस कितीही त्रास पडला तरी त्याबद्दल त्यांना पर्वा नाहीं!" ( नि. सं. भा. ३ पा. २१० )

हिंदुस्थानास घोर लागून त्याच्या नाड्या जोंपर्यंत अगदीं आंखडून गेल्या नाहींत तोंपर्यंत आम्ही त्याच्या हिताहिताची विशेष फिकीर करणार नाहीं; आम्ही आपलें सारे लक्ष इंग्लंडच्या खऱ्या किंवा काल्पनिक फायद्याकडे मात्र पोंचविणार; आणि यापुढें हयगय केली असतां हिंदुस्थान खचित राम ह्मणणार असें जेव्हां खात्रीपूर्वक दिसून येईल, तेव्हां मात्र आम्ही आपली स्वार्थबुद्धी कांहींशीं आवरून धरून हिंदुस्थानच्या तरणोपायाच्या शोधास लागूं! ( नि. सं. भा. ३ पा. २३१ )

अशी कित्येक इंग्रजांनीं जाहीर घोषणा करीपर्यंत! पण एकपरी अशी घोषणा म्हणजे झाडाचा पालाच होय!!

लिबरल व कान्झरव्हेटिव्ह या दोन नांवाखालीं मोडल्या जाणाऱ्या लोकांच्या वृत्तींत इंग्लंडांत कितीही भेद दिसून येत असला, तथापि हिंदुस्थानचा संबंध आला कीं हे सारे आपलें औदार्य खुशाल एका बाजूस गुंडाळून ठेवून वाटेल ती लांछनास्पद गोष्ट करण्यास सहसा मागें सरणार नाहींत असें वाटून हिंदुस्थानचे लोक इंग्लिश राष्ट्राच्या बहुगर्वोच्चारित न्यायबुद्धिविषयीं साशंक झाल्यावांचून राहतील असें आम्हांस वाटत नाहीं. ( नि. सं. भा. ३ पा. २२१ )

म्हणून काय झालें ? या साशंकतेची पर्वा इंग्रजांस कोठें आहे ?

हिंदुस्थान देश काबीज करतांना इंग्रजांनीं केलेलें सारेंच आचरण नीतितत्त्वास धरून होतें असें नाहीं. ( के. नि. पु. १ पा. ५३ )

त्या येगेंच कीं काय प्रतिष्ठितपणाचा आव आणून १८९३ त स्पेक्टेटर या इंग्लंडच्या पत्रानें म्हणून ठेवलें कीं—

हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य हें मानवी कृतीनें उभारलें नसून केवळ एक ईश्वरी चमत्कार आहे; आणि त्यांचें हरप्रयत्नांनीं रक्षण करणें हें आम्हां इंग्रज लोकांचें जरी कर्तव्य आहे, तथापि ईश्वराच्या मनांतूनच त्याचा लय करावयाचा असेल तर तो होईल. परंतु त्याच्या आधीं एक पळभरही त्याचा नाश होणें नाहीं.

( नि. सं. भा. ३ पा. २०२ )

इंग्रजी ' ट्रस्टीशिप ' चा बाजा असा वाजत असल्याकारणानें " दुही माजवा आणि राज्य करा " या तत्वाचा अवलंब इंग्रजी राज्याच्या चिरस्थाइकतेसाठीं करण्यांत येत असतो.

एका जातीस व्यर्थ महति देऊन दुसरीचा नाहक पाणउतारा करणें.

( नि. सं. भा. पा. ३ २२१ )

हें त्या फोडझोडीच्या तत्वांतील मूळ सूत्र असून तें गोऱ्याविरुद्ध काळ्याच्या आणि एका प्रकारच्या काळ्याविरुद्ध दुसऱ्या प्रकारच्या काळ्याच्या गळ्यांत अडकल्यावांचून रहात नाहीं.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या बळकटीस युरोपिअन अधिकाऱ्यांची हल्लीं आहे तितकी संख्या तरी अत्यंत आवश्यक आहे हें महातत्व...... अनेक इंग्रजांच्या डोक्यांत भ्रमण करीत असतेंच असतें; ( नि. सं. भा. ३ पा. २२२ ) आणि

आपल्या अमलाला शाश्वती आणण्यासाठीं आपण होऊन एकाचा दुसऱ्यांशीं तंटा लावून देणें आवश्यक नसलें तरी त्यांचें भांडण आपणांस अपकारक नाहीं इतकेंच नाहीं, तर कांहीं अंशीं उपकारकच आहे असें वाटतें. तसेंच प्रसंगविशेषीं मुसलमान लोक आपल्या उपयोगीं पडण्यासारखे आहेत, तेव्हां विशेष आयासांवांचून त्यांची मैत्री संपादून ठेवतां आली तर तसें करणें आपलें कर्तव्य आहे असें हे समजतात. ( नि. सं. भा. ३ पा. २२५ ).

इतकेंच नव्हे तर वर आपल्या ' ट्रस्टीशिपचा ' दिमाख कायम राखण्याकरतां असें उपदेशण्यात येतें कीं—

" तुमच्यांतील तंटे नाहींसे होऊन तुम्ही प्रत्यक्ष सहोदरांप्रमाणें वागूं लागल्याशिवाय आम्ही तुम्हांस कोणताही विशेष महत्त्वाचा हक्क देणार नाहीं. कारण तुम्ही भांडत आहां तोंपर्यंत त्याचा उपभोग घेण्यास तुम्ही पात्र नाहीं. "

( नि. सं. भा. ३ पा. १८४ )

आणि असें म्हणणाऱ्यांच्या कारभारकुशलतेच्या चकाकीला नेट म्हणून कशाचा म्हणाल, तर ' हातची म्हणून राखलेल्या सत्तेचा. ' " आम्ही कोणाची मुरवत न ठेवतां निःपक्षपातानें न्याय करूं " या सरकारी ग्वाहींत नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं. " रास्त गोष्टीस भितो कोण ? " असेंच प्रश्नात्मक आत्मविश्वासपूर्ण कौतुक आगरकरांनीं सदर सरकारी ग्वाहीचें केलें आहे.

तथापि अधिकाऱ्यांनीं ही गोष्ट नेहमीं लक्ष्यांत वागविली पाहिजे कीं, स्थिति आणि प्रगति ( Order and progress ) यांच्या अन्योन्य संबंधासारखा राजकीय आणि सामाजिक सुधारणांचा परस्पर संबंध आहे. अगोदर जगणें आणि मग चांगल्या रीतीनें जगणें. चैतन्यरक्षण झाल्याशिवाय तें सुखानें घालवितां येणें शक्य नाहीं. मूळ द्रव्य असल्याशिवाय कारागिरी कोठून येणार ? विशिष्ठ प्रकारच्या राजकीय व्यवस्था समाजाच्या अस्तित्वाला अत्यावश्यक आहेत; म्हणजे त्या नसल्या तर समाजाची वाताहात होते. सामाजिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. त्या समाजास

शोभा देतात, किंवा विशेष प्रकारचा आनंद उत्पन्न करतात. तेव्हां त्या मागून झाल्या तरी चालतील. जातिभेद, बालविवाह, असंमत वैधव्य, केशवपन वगैरे दुष्ट चालींपासून आम्हांस पुष्कळ त्रास होत आहे; पण मिठावरील जबरदस्त कर, दर तीस वर्षांनीं आमच्या जमिनीच्या बोकांडीस बसणाऱ्या रेव्हेन्यू सर्वेचा फेरा, व यमोदराप्रमाणें प्रतिवर्षी कोट्यवधि रुपये भक्ष्यस्थानीं पडले तरी फिरून हापापल्यासारखें करणारें लष्करी खातें, इत्यादिकांपासून आम्हांस जो त्रास होत आहे, त्यापुढें सामाजिक शोचनीय दुराचारांपासून होणारा त्रास कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल. ( नि. सं. भा. ३ पा. १११-६ )

एवढी कैफियतच आपल्या प्रभूंना देऊन आगरकर स्वस्थ राहिले नाहींत, तर वर त्यांनीं असेंही चक्क सांगून टाकलें आहे कीं—

प्रजा जशी ममतेनें वळते तशी धाकानें वळत नाहीं. आमच्यासारख्या लोकांस अधिकाधिक महत्त्वाचे हक्क देणें हेंच आमच्यांतील तंटे-बखेडे मोडून टाकण्याचें मुख्य साधन आहे. ( नि. भ. ३ पा. १८५ )

प्रजेचें प्रेम राज्यकर्त्यांवर कसें बसेल आणि ती राजनिष्ठ कशी होईल हें पाहणें आणि तदनुसार वर्तन करणें हेंच आम्ही निदान वर्तमान ब्रिटिश राज्यकुशलतेचें आणि राज्यनीतिचें मुख्यांग समजतों. अशा रीतीनें अंमल करतां करतां ब्रिटिश पातशाहीवर जो प्रसंग गुदरणार असेल त्याचा हवाला दैवावर अथवा देवावर सोंपविणें आम्हांस युक्त दिसतें. ( नि. सं. भा. ३ पा. २२५ )

ट्रस्टीशिपच्या प्रधान अंगाशीं समरूप असलेला असला सल्ला आमच्या प्रभूस मानवणें शक्य नाहीं, याबद्दल बरीक आगरकर खात्री बाळगून होते. म्हणूनच खबरदारीनें त्यांनीं खुली भाषा केली आहे कीं—

पुष्कळ इंग्लिश लोक म्हणतात त्याप्रमाणें हिंदुस्थानची पादशाही ब्रिटिश राज्यवैभवाचा आदिस्तंभ असेल तर हा स्तंभ यत्किंचित् डळमळूं न देण्याबद्दल होईल तेवढी खबरदारी घेणें हें आम्हांहून त्यांसच अधिक हितकर नाहीं काय? एखाद्या नादी मनुष्यास उंच इमारत बांधण्याची बेताल हाव सुटावी, आणि त्यानें तळखांबाचा मगदूर न पाहतां मजल्यावर मजला चढवीत न्यावा त्याप्रमाणें कांहीं अंशीं आमच्या राज्यकर्त्यांची सांप्रत स्थिति झाली आहे. इंग्लिश लोकांनीं आपल्या बहादरीनें आणि आमच्या कमकुवतपणानें हिंदुस्थानचें राज्य आपलेंसें केलें. आमच्यांतील आपसांत तंट्यामुळें आणि त्यांच्या धूर्तपणामुळें तें दृढ झालें. त्यांचें राज्यकौशल्य आणि आमची राजनिष्ठा यामुळें तें अव्याहत चालत आहे. पण जर कधीं काळीं त्यांचा लोभ अमर्याद झाला आणि आमचें दारिद्र्य असह्य झालें तर ही त्यांनीं इतक्या कष्टांनीं रचलेली इमारत ढासळल्यावांचून राहणार नाहीं. ( नि. सं. भा. ३ पा. ५१३ )

इंग्रजी ट्रस्टीशिपच्या पहिल्या व तिसऱ्या प्रश्नांचीं उत्तरें आगरकरांनीं वरीलप्रकारें नकारात्मकच दिलीं असल्याकारणानें दुसऱ्या प्रश्नाचेंही नकारात्मक उत्तर आपोआपच डोळ्यापुढें उभें राहतें. कितीही झालें तरी युरोपियन आणि नेटिव यांचें

अन्योन्य संघटण होणें शक्य नाहीं, राजा आणि प्रजा या नात्यांत तरी बिलकूल होणें नाहीं; आणि अशातऱ्हेनें हिंदुस्थानला राष्ट्रपण प्राप्त होणेंही कल्पनेपालिकडचें आहे, असा आगरकरांचा रोखठोक झोक होता.

The administration of all the departments of a great country by a small number of foreign visitors in a state of isolation produced by differences in religion, ideas and manners, which cuts them off from all intimate communion of the people can never be contemplated as a permanent state of things —Mount S. Elphinston.

माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यानें स्वदेशबांधवांस दिलेला हा इशारा आगरकरांच्या सिद्धांतासच बळकटी आणणारा नाहीं काय ?

समानशीलत्व हें अन्योन्य मैत्रीचें आद्यबीज आणि अनन्यसिद्ध आदिकरण होय. स्वभावविपर्यास जेथें झाला तेथें संघटन होण्याची बिलकूल अपेक्षा राहिली नाहीं. वरील वाक्यांचें याथार्थ्य ज्यांच्या लक्षांत बरोबर उतरेल त्यांना युरोपियन आणि नेटिव यांचें परमसख्य कधींही बनावयाचें नाहीं असें जें आम्ही आग्रहानें म्हणतों त्याचा चमत्कार वाटणार नाहीं.···दुसऱ्या लाखों गोष्टीमध्यें जरी एकता असली तरी "प्रभुप्रजा" या एका भावानें सर्वांवर विरजण पडून एकजीव होण्याचा संभव नाहींसा होतो.···पराजित देश जों जों ज्ञानसंपन्न आणि धनसंपन्न होत जातो, तों तों जिंकणाऱ्या देशांशीं मैत्रीसंबंधानें जवळ जवळ येतो असें आम्हांला वाटत नाहीं.··· हिंदुस्थान देशाचें ज्ञान आणि धन प्रतिवर्षी वाढत जाणार आहेत हें खरें असेल तर, इंग्रज आणि नेटिव यांची उत्तरोत्तर मैत्री वाढत जाणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर दिवसेंदिवस यांच्यांत कलागति लागत जाऊन पारिणामीं हातघाईवर काम येऊन ठेपेल व या रीतीनें हिंदुस्थानला आपली मुक्तता करवून घेतां येईल असें मानल्याखेरीज प्रत्यवाय नाहीं. (के. नि. नि. पु. १ लें पा. १०१)

व्हायकाऊंट पामर्स्टननें देखील अशाच नमुन्याचे काढलेले उद्गार प्रसिद्ध आहेत.

हें सारें खरें. परंतु हिंदुस्थानला राष्ट्रपण प्राप्त होण्यासाठीं त्याचें राजकीय नियमन लोकांच्या हातांत आणावयास जागें असून झोंपेचें सोंग घेणाऱ्या इंग्रजांच्या सत्तावर्तुळांत "हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्वांनीं जारीनें चळवळ करण्यास सुरवात करून आपला इच्छित हेतु तडीस जाईपर्यंत अश्रांत ती चालू ठेवण्याचा निश्चय केला पाहिजे. (नि. सं. भा. ३ पा. २२३)" व वेळेस तो, संकुचित स्वार्थबुद्धीला हात दाखवून पार पाडला पाहिजे हें निर्विवाद. अशा मार्गें बहुत कालांतीं कां होईना यश येण्याची आशा आगरकरांस वाटली यांतलें तरी इंगित काय ?

इंग्रजी अमलानें आम्ही निस्तेज झालों आहोंत खरें; पण त्याच अमलामुळें सतेज होण्याचे उपायही आम्हांस कळूं लागले आहेत....तेव्हां आपल्या मानासिक व शारी-

रिक कमकुवतपणामुळें तुम्हांस जी कुदशा प्राप्त झाली आहे तीबद्दल खेद करीत न बसतां जेणेंकरून प्रतिदिवशीं आपली स्थिति सुधारत जाईल असें वर्तन केलें पाहिजे.
(नि. सं. भा. ३ पा. १६३)

अशा वर्तनास क्षेत्र आहे काय ? होय.

आमच्या प्रस्तुत स्थितीवरून आम्ही पुढें स्वतंत्र होऊं असें मानणें कित्येकांस फार हास्यास्पद वाटत असेल ! देशांत जी प्रबळ राज्यसत्ता आहे, तिच्या विरुद्ध बोलणें किंवा लिहिणें राजद्रोह होय, म्हणून आम्ही ब्रिटिश लोकांच्या राज्यरीतीचा गौरव करतों असें कोणी म्हणेल; अथवा मिथ्या आशापाशांत जखडून जाऊन आम्ही कांहीं तरी बडबडतों, असाहि दोष आम्हांस कोणी देतील. पण असल्या लोकांची पर्वा नाहीं. इंग्लिश लोकांच्या राज्यामुळें आमचें जें नुकसान होत आहे, तें आम्ही पक्कें जाणून आहों. तथापि इंग्लिशांचें राज्य जाऊन दुसऱ्या कोणत्याही लोकांचें राज्य झाल्यास आमची स्थिति रेसभर तरी बरी होईल असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं. इंग्लिश लोकांपेक्षां परक्या देशाचें राज्य अधिक उदारपणानें करणारें दुसरें राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवर आहे असें आम्हांस वाटत नाहीं, व ज्याअर्थी इंग्लिश लोकांशीं लढाई करून स्वातंत्र्य मिळविण्याची व तें राखण्याची आम्हांस ताकद नाहीं, त्याअर्थी त्यांच्या धोरणानें वागून बेताबेतानें पाऊल पुढें टाकणें ही गोष्ट आम्हांस श्रेयस्कर दिसते. दुर्दैवानें इंग्लंडचें राज्य जाऊन दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या अमलाखालीं आम्ही आलों तर आमची सुधारणा हजार पांचशें वर्षें मागें सरेल इतकेंच नाहीं, तर आज ब्रिटिश अमलांस असल्यामुळें पुढें मागें आमचें डोकें वर निघेल म्हणून जी आशा आम्हांस वाटत आहे, ती मुळींच नाहींशी होईल, व कदाचित् आम्हांस पूर्ण दास्य येऊन शेवटीं भारतीयांचें नांवही नाहींसें होईल. ( के. नि. नि. पु. १ पा. ६६ )

आमची प्रस्तुत स्थिति जरी अत्यंत शोचनीय आहे तरी, तींत भावी सुखाची आशा धरण्यास पुष्कळ आधार आहे असें आम्हांस वाटतें. कोट्यवधि रुपये प्रतिवर्षी परदेशांत जात आहेत खरे, पण त्यांच्याबद्दल अननुभूतपूर्व स्वास्थ्याचा आणि शांततेचा उपभोग मिळत असल्यामुळें, पूर्वीपेक्षां राष्ट्रीय संपत्तीचें वार्षिक उत्पन्न वाढलें आहे; एका अंगानें समाजाचे बंध सुटत आहेत, पण दुसऱ्या अंगानें नवीन बंध उत्पन्न होऊन हिमालयाच्या पायथ्याजवळचे लोक कन्या-कुमारीच्या लोकांस मित्रभावानें आलिंगूं लागले आहेत; जुन्या कलाकौशल्याचा ऱ्हास होत आहे, पण त्याच्या जागीं नवें कलाकौशल्य येत आहे; पूर्वीची विद्या आणि शास्त्रें मालवत आहेत, तथापि नवीन विद्यांचा आणि शास्त्रकलांचा उदय होत आहे; पूर्वीची रग आणि पूर्वीचा जोम जरी कुठें दिसत नाहीं तरी हेच गुण अन्यरूपानें क्वचित् क्वचित् बाहेर येऊं लागले आहेत; पूर्वी हिंदुस्थानांतील निरनिराळे लोक माळेंतील विस्कळीत मण्यांप्रमाणें असत, आतां त्यांच्यांत देशाभिमानाचा दोरा शिरूं लागून त्यांची माळ गुंफूं लागली आहे. बापलेक, नवराबायको, स्त्रीपुरुष, गरीबश्रीमंत, व्यक्तिसमाज, नगर–नागरीक व राजाप्रजा यांच्यामधील संबंधांचें उद्घाटन होत असून, एकानें दुस-

त्याशी कसें वागावें याची चर्चा होत आहे, व तिचा परिणाम लोकांच्या आचरणावर घडूं लागला आहे. धर्मस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य अधिकाधिक मिळूं लागल्यानें जुलमाशिवाय ऐक्य होऊं लागलें आहे. यायोगानें समाजसुधारणा होण्यास पुष्कळ वर्षे लागतील खरीं; पण ती पक्क्या पायावर होत असल्यामुळे तिची ढासळण्याची भीति नाहीं. सारांश ब्रिटिश लोकांविषयीं पूर्ण राजनिष्ठा, स्वदेश हिताविषयीं पूर्ण दक्षता, व स्वताविषयीं पूर्ण अभिमान, जर आम्ही टाकला नाहीं, तर थोड्या वर्षांत आमचा भाग्योदय झालाच पाहिजे याबद्दल आम्हांस काडीमात्र संशय नाहीं. (के. नि. नि. पु. १ पा. ६८)

"आमच्या सरकारचें सारें लक्ष स्वतांची पोतडी भरण्यावर" असलें तरी– "आतां ब्रिटिश लोकांपुढें वास्तविक पाहतां असा प्रश्न आहे कीं, हिंदु लोकांस आपल्याप्रमाणें सधन होण्याची गुरुकिल्ली दाखवून देऊन त्यांच्या कृतज्ञतेवर व राजनिष्ठेवर अवलंबून रहावें, किंवा काढवेल तितके त्यास पिळून काढून, निभेल तितके दिवस त्यांवर आपलें स्वामित्व चालवावें! आमच्या मतें इंग्लिश लोकांचें सांप्रत वर्तन सरासरीनें या परस्परविरोधी तऱ्हांच्या मध्यप्रदेशांतून चाललें आहे!"

(नि. सं. भा. ३ पा. ११२)

जेणेंकरून प्रतिवर्षीं नेटिव लोकांचें पाऊल पुढें पडत जाईल, अशा रीतीनें हिंदुस्थानचें राज्य करावें, असें प्रतिपादणारे जे इंग्रज लोक आहेत, त्यांच्या बुद्धीचा असा सिद्धांत झालेला असतो कीं, एका देशानें दुसऱ्या देशाचें निरंतर राज्य करणें अशक्य आहे इतकेंच नाहीं तर तसें होणें त्या दोनही देशास किंवा साऱ्या जगास कोणत्याही प्रकारें परिणामी हितावह होणार नाहीं. आज नाहीं उद्यां ज्यांचें राज्य त्यांच्या हातांत पडणें हेंच इष्ट आहे. कारण, तसें झालें तरच जगांतील द्वंद्वें नाहींशी होऊन त्यांस शांतीचा आणि तज्जन्य इतर सुखांचा उपभोग मिळणार आहे. हीं राज्यतत्वें इंग्रज लिबरल पक्षाच्या, निदान त्याच्या अग्रणींच्या, मनांत लहानपणापासून खिळून गेलेलीं असतात, व त्या पक्षास अधिकार प्राप्त झाला असतां त्यांचें वर्तन थोडेंबहुत तरी या तत्त्वांच्या अनुरोधानें होतें.

......पण 'ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर सर्वथैव अवलंबून असतें' ही सुप्रसिद्ध इंग्रजी म्हण ध्यानांत घेऊन इंग्लंडांत जे खरे उदार पुरुष आहेत त्यांच्या साहाय्यानें आम्ही आपल्या उन्नतीचा मार्ग अहर्निश आक्रमिला पाहिजे.

(नि. सं. भा. ३ पा. ५६२-३-७)

इंग्लंडांत जे खरे थोर पुरुष आहेत त्यांचें साहाय्य आपण घ्यावें, पण असे पुरुष फारच थोडे असल्याकारणानें 'उदारमतवादी' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या पक्षांतही फार करून 'अग्रणी' तेवढेच तसे असूं शकतात; बाकीचे आपल्या इतर बांधवाप्रमाणेंच असतात. एतएव, हिंदपुत्रांनीं आपलें आपल्या पायावर उभें राहून आपल्या नशिबाचें पाणी पडताळलें पाहिजे; इतकें कीं हिंदुस्थानच्या कळकळीनें त्याच्या कल्याणासाठीं श्रम करणाऱ्या ह्यूमसाहेबांसारख्या खऱ्या इंग्लिश थोर पुरुषा-

प्रमाणें– " राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणावर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास " तयार झालें पाहिजे. ( नि. सं. भा. १ पा. २१५ )

आवश्यक कर्तव्यें तेवढीं बजावण्यांत दक्षता बाळगणाऱ्या सरकारचा नीटनेटका शिस्तशीर कारभार पाहून आणि त्यानें स्थापिलेल्या शिक्षणसंस्थांत शिकून जेवढें राज्यकारभाराचें वळण मिळेल आणि ज्ञानाचा लाभ होईल तेवढाच ! ज्ञानाबद्दल ही कथा मग धनाबद्दल काय बोलावयाचें ? इंग्लिशांनीं आपण होऊन इतक्या प्रयासानें व खर्चानें स्थापलेले कारखाने तुमच्या स्वाधीन करावे अशी आशा करणें म्हणजे मनुष्यस्वभावाविषयीं अत्यंत गूढ अज्ञान प्रगट करणें होय.

( नि. सं. भा. २ पा. ४३३ )

तेव्हां " तुमच्यांत धमक असेल तर तुमचा व्यापार तुम्ही काबीज करा आणि त्यांना जें जरूर दिसेल तें ते करतील. " ( नि. सं. भा. २ पा. ४३३ )

लोकांचें लोकांनीं पायांवर उमें राहिलें पाहिजे, हिंदुस्थानच्या राजकीय ट्रस्टीकडून फारसा उपयोग व्हावयाचा नाहीं, हें जर खरें तर त्या ट्रस्टींच्या कारभारावर टाकीं चालविण्यांत काय अर्थ ?

सरकारचे जे दोष दाखविण्यांत येतात ते त्यांच्या नजरेस येऊन त्यांनीं ते दूर करावे, हा एक हेतु असतोच; पण मुख्य हेतु तो नाहीं. लोकांच्या नजरेस ते दोष पडून त्यांस आपल्या विपत्तीची खरीं कारणें समजावीं, आणि तीं दूर करून सुखी होण्याची इच्छा उत्पन्न व्हावी, हा त्यांचा मुख्य हेतु आहे. " सांगितलेली बुद्धी आणि पदरीं बांधलेली शिदोरी कोठवर पुरणार " ? अशी आपल्या भाषेंत म्हण आहे, ती कांहीं वावगी नाहीं. सरकारच्या कृपाळुपणापासून, न्यायतेपासून, किंवा सारासार विचारापासून, आम्हांस मिळणाऱ्या हक्कांचा, व त्यापासून होणाऱ्या सुखांचा, परीघ अत्यंत मर्यादित आहे. तेव्हां...आमच्या राज्यकर्त्यांस दोष दाखविण्यापेक्षां किंवा त्यांच्यापुढें झोळी पसरून त्यांत एकादा तुकडा टाकण्याबद्दल त्यांची प्रार्थना करण्यापेक्षां, लोकांस आपल्या स्थितीचें खरें ज्ञान होऊन, ती सुधारण्याविषयीं उत्साह उत्पन्न व्हावा हा आमचा प्रधान हेतु. ( नि. सं. भा. २ पा. ३४५–६ )

सरकारवरील टीकेंत सुद्धां लोकशिक्षणाचा प्रधान हेतु ठेवणारे आगरकर हीनदीन लोकांकडून डोकें वर उचलण्याची अपेक्षा कशी करीत होते ? पुढाऱ्यांच्या जीवावर. लोकांची अमुक एक तयारी नाहीं, ही दुबळी रड सामाजिक बाबतींप्रमाणेंच राजकीय बाबतींतही आगरकरांस बिलकूल खपत नसे. पुढारी नेटस असेल तर लोक कर्तबगारी वाटेल तशी करूं शकतात असा त्यांचा विश्वास व वृत्ती होती.

हातीं घेतलेलें काम शांततेचें असो किंवा लढाईचें असो, आम्हांस चांगला अग्रणी मिळाला तर आमच्यासारखे अनुयायी मिळावयाचे नाहींत. ( नि. सं. भा. १ ला )

असें त्यांचें निरीक्षण होतें. ओघानेंच ज्या पुढाऱ्यांवर आगरकरांची एवढी मदार त्यांची लायखी त्यांनीं ठरविली होती ती अशी.

त्यांच्यांत ( हिंदुलोकांत ) ज्याची उणीव दृष्टीस पडते असा कोणचा गुण म्हणाल तर ' निश्चयी धाडस ' किंवा ' धाडसी निश्चय ' हा होय. या अवगुणामुळें किंवा गुणाभावामुळें इतर लोकांत त्यांचें पडावें तसें तेज पडत नाहीं. इंग्रज लोक किंवा मुसलमान लोक त्यास वचकत नाहींत याचें बऱ्याच अंशीं हेंच कारण आहे. तथापि हा गुण राष्ट्रांतील साऱ्याच लोकांत असणें अवश्य आहे असें नाहीं. लोकांच्या पुढाऱ्यांत हा गुण भरपूर असला म्हणजे पुष्कळ कामगिरी होते. शिवाजीसारखा धाडसी पुढारी मावळ्यांस न मिळता तर त्यांनीं जो पराक्रम केला तो त्यांच्या हातून कधींही न होता. ( नि. सं. भा. १ ला )

आगरकरांच्या मतें पुढाऱ्यांअंगीं धाडसी निश्चय किंवा निश्चयी धाडस प्रामुख्यानें असलें पाहिजे. शास्त्रीबुवांच्या तालमीचा हा अगदीं पहिला वाहिला विशेष आहे म्हटलें तरी चालेल. या विशेषाचें, हिंमत आणि दृढनिश्चय हे प्राणापान असून स्वार्थत्याग हा त्या दोहोंचा हार्दिक प्रणेता आहे. अशा जिवंत त्रिगुणांनीं मंडित झालेल्या पुढाऱ्यांचा स्पष्टवक्तेपणा लोकांस प्रेरक होऊन पुढाऱ्यांस त्यांचें पाठबळ मिळवून देतो. बादशाही अंमलापासून बोकाळलेल्या तोंडपूजेपणाला पार उडवून लावून मनाला स्वच्छ स्वच्छ वाटेल तें लोकांना सांगणें हा दुसरा विशेष पुढाऱ्यांच्या अंगीं असला पाहिजे असा शास्त्रीबुवांच्या तालमीचा आणि विशेषतः आगरकरांचा कटाक्ष होता.

असें करावयास तीव्र भावनात्मकता लागते. कोरड्या ठणठणीत बुद्धिवादाचा खणखणीत टेंभा मिरवणाऱ्यांच्या हातून समाजाचा उठाव तर होणार नाहींच, पण स्वतांचें जीवितसुद्धां त्यांना असह्य होईल. पूर्ण भावातीत जो झाला तो आगरकरांच्याच भाषेप्रमाणें शुद्ध ईश्वर किंवा शुद्ध पाषाणच असला पाहिजे. म्हणून मातृभूमीच्या उच्चतम सेवेसाठीं बुद्धिदृष्ट ध्येय हृदयाशीं एकरूप झाल्याशिवाय तेजस्वी आक्रमणा कशी होणार ? कारण मेंदूच्या तल्लखपणाला हृदयाच्या रक्तानें रंग भरत असतो. आगरकरांच्या सांप्रदायांतलि भावना उदात्त आणि उद्दीपक आहे. चंपकचमेलीच्या समरस अत्तराप्रमाणें बुद्धीभावांचा गोड गोपाळकाला तेथें आढळतो आणि म्हणूनच तो गरगर फिरणाऱ्या डोळ्यावरही छाप टाकल्याशिवाय सोडत नाहीं.

आगरकरी सांप्रदायांत बुद्धिवादाचें स्पष्ट प्रमेय कळकळीनें मुसमुसून बाहेर पडत असल्याकारणानें तें जितकें उदात्त तितकेंच उद्दीपक ठरतें, यांत नवल तें कोणतें ? स्पष्टवक्तेपणा आणि उदात्तोद्दीपक भावनात्मकता यांची जोडी असल्यावर त्यांचे संवगडी असलेलें निर्भीड वर्तन तितके तजेलदार कीं जितकी कार्यनिष्ठा प्रबल !

अर्थातच आत्मविश्वासाची कार्यनिष्ठेला आधारभूत असलेली कमान यत्किंचितही दुर्लक्षून चालणार नाहीं. आत्मविश्वासात्मक कार्यनिष्ठेनें आणि स्वार्थत्यागात्मक निर्भीडतेनें बुद्धिदृष्ट ध्येय आपल्या व लोकांच्या डोळ्यांपुढें सतत ठेवून लोकमुखी चळवळ देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत करणाऱ्या पुढाऱ्यांचें चारित्र्य उज्ज्वल असावयास हवेंच हवें हें आवर्जून सांगावयास कशास हवें ?

आगरकरांनीं खांद्यावर घेतलेल्या 'शास्त्रीय' निशाणाखालीं पहिले नंबरचे मानकरी आपल्या विशुद्ध चारित्र्याला किती जपून होते हें लोकविश्रुतच आहे. निष्कलंक चारित्र्याच्या जोरावर बुद्धिदृष्ट अंतीम ध्येय सारखें उद्‌घोषित राखून, परिस्थितीच्या मार्मिक आकलनानें व्यवहारदृष्टी न सोडतां, येईल त्या आपदेला तोंड देण्याची तयारी ठेवून आपली चळवळ करणारा एवंगुणविशिष्ट पुढारी काय करूं शकणार नाहीं? उत्तम अनुयायी असलेल्या हिंदु लोकांना असा पुढारी भेटला असतां त्यांचा अभ्युदय फार लांब नाहीं, अशी आगरकरांच्या मननशील चिकित्सेची ग्वाही होती; आणि म्हणूनच व्यावहारिक राजनिष्ठा आणि 'ध्येयात्मक' हिंदुस्थानचें सेल्फगव्हर्नमेंट यांची फाटाफूट त्यांच्या प्रतिपादनांत चुकून दिसत नाहीं !

आणि म्हणूनच स्वतंत्र हिंदुस्थानचें प्रजासत्ताक राज्य सुदृढपणें उत्क्रांतीतत्त्वानुसार विकसित होत जावें, अशीच आगरकरांची मनापासून इच्छा होती. तथापि "जीर्णवाद्यांच्या हट्टीपणामुळें" जशी सामाजिक व धार्मिक त्याप्रमाणेंच राज्यकर्त्यांच्या हटवादीपणामुळें व अदूरदर्शित्वानें राजकीय क्रांती चुकावयाची नाहीं अशी त्यांची मनोदेवता त्यांना साक्ष देत होती.

सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ आणि ते जीं कामें करतात त्यांचा खर्च प्रजेनें दिलेल्या करापासून होत असतो. हे कर जर प्रजेच्या सामर्थ्याबाहेर गेले, किंवा ते तीपासून काढण्याकरतां सरकारी अंमलदार तीस दु:सह पीडा देऊं लागले, तर जिकडे तिकडे मारामाऱ्या, दंगेधोपे व तंटे सुरू होऊन सर्वत्र अनवस्था होणार नाहीं काय? प्रजा कितीही राजनिष्ठ असली तरी अचेतन वस्तूप्रमाणें पाहिजे तसली वागणूक ती हवा तेवढा वेळ सहन करील, असें समजणें हें शुद्ध मूर्खपण होय.······ कोणत्याही देशांतील सरकार आपल्या प्रजेशीं अशा प्रकारचें वर्तन करतें, तेव्हां तीही कितीही सहनशील असली तरी, अंमलदारांचा जुलूम दु:सह झाला असतां, राजनिष्ठा झुगारून देऊन, त्यांस दंड करण्यासाठीं बंड करण्यास प्रवृत्त होते. सरकारी अंमलदारांचा जुलूम असह्य झाल्यामुळें लोकांनीं हत्यारांस हात घालून छळ करणाऱ्या राजास आणि त्याच्या साथ्यांस कंठस्नान घातल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सरकारी अंमलदारांच्या जुलमापासून होणारे दुष्परिणाम या आशिया खंडांतील प्रत्येक देशांत पूर्वीपासून दृष्टीस पडत आहेत.······फ्रान्स देशांत १७८९ सालीं जो भडका पेटला त्याचें इंगित ज्यांस समजून घेण्याची इच्छा असेल, त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, दोनशें वर्षांच्या आंत फ्रेंच राजांनीं आपली जमाबंदी अकरा कोटीपासून तीन अब्ज, अकरा कोटी केली! प्रस्तुत कालींही अशा प्रकारच्या जुलमाचीं उदाहरणें दृष्टीस पडण्यासारखीं नाहींत, असें नाहीं.······ब्रिटिश लोकांनीं कितीहि बढाया मारल्या तरी येथील नेटिव संस्थानांतील प्रजा ब्रिटिश अंमलांतील प्रजेपेक्षां एकंदरीनें अधिक सुखी आहे, असें दाखविणें फारसें कठीण पडणार नाहीं. मि. लिबार्नरसारखे एककल्ली लोक ब्रिटिश राज्याचे कितीही पवाडे गावोत, एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. वड्‌र्सवर्थ यांसारखे विचारी गृहस्थ असें कबूल करतात कीं, 'इंग्लिश

लोकांनीं येथें जी स्वराज्य-व्यवस्था स्थापिली आहे तीबद्दल आम्हां हिंदू लोकांस जबरदस्त किंमत द्यावी लागत आहे. '

...डॉ. हंटरसारख्या...सरकारी प्रमुख स्टॅटिस्टिकवाल्याचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांतील अर्ध्या लोकांस प्रतिदिवशीं अर्धपोटी झोपी जावे लागतें! यावरून टापटिपीचा अंमल हटकून सुखावह असेलच, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. आगगाड्या, तारायंत्रें, गिरण्या, हायकोर्टें, तारऑफिसें, पोष्टऑफिसें, वर्तमानपत्रें, कॉलेजें प्रदर्शनें, टोलेजंग इमारती, प्रचंड बाजार, दरारा उत्पन्न करणारा फौजफाटा हे आणि अशा प्रकारचे सुधारणेचे दुसरे दागिने घालून हिंदुस्थानसारखा परकी अमलांतला देश कितीही नटला तरी तो अंतर्यामीं सुखी असेलच, असें खात्रीनें म्हणवणार नाहीं. एखादे प्रसंगी मयासुरानें निर्माण केलेल्या मायावी बाजारांत खरेदी करून बनलेल्या गिऱ्हाइकाप्रमाणें आमची स्थिति होण्याचा संभव आहे.

(नि. सं. भा. २ पा. १३६-४२)

आमच्या घोर दारिद्र्यामुळें, राजकर्त्यांची द्रव्यतृष्णा किंवा दुसरी जुलूमशाही वेळप्रसंगीं कोणतें प्रसंगवृत्त क्रान्त करील याचें दिग्दर्शनच नुसते वरील उताऱ्यांत आगरकरांनीं केलें नसून, तसा वकत आल्यास त्यांची स्वताची सहानुभूती कोणीकडे हातपाय हालवील हेंही त्यांनीं सुस्पष्टपणें ध्वनित केलें आहे.

राजकारणांतही ध्वनिला महत्व असतें हें लक्षांत घेतलें म्हणजे सरकारवरील टीकेंतूनसुद्धां लोकशिक्षण साधू इच्छिणारे आगरकर कोणत्या ठियावर राजकारणीं पाय देऊन उभे होते, हें निर्विवाद होईल.

तें कांहींही व कसेंही असलें तरी राजकारणाच्या काय किंवा समाजकारणाच्या काय, रोजानिशींत क्रांतीच्या संक्रांतीपेक्षां उत्क्रांतीचें दिनमानच बहुधा नमूद असतें. तेव्हां त्याचें आन्हिक यथासांग उरकण्यासाठीं पुढाऱ्यांनीं लोकसमुदायास मंत्र देऊन अध्वर्युत्व करावें, असें आगरकरांनीं प्रतिपादिलें. त्याप्रमाणें ठिकठिकाणचे लोकसमुदाय आपआपल्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं राजकारणी नीटस झालें तरी, अखिल हिंदुस्थानच्या एकमुखी घोषणेशिवाय, ब्रिटिश रिसायतीच्या बरकंदाजांची बरोबर समजूत घालतां येणें दुर्घट. आगरकरांस ही जाणीव पुरेपूर असल्यामुळेंच भारताच्या एकमुखी राजकीय घोषणेसाठीं सुप्रतिष्ठित झालेल्या 'राष्ट्रसभेला' आगरकर इतकें महत्त्व देत असत कीं तिचे ठराव नुसते दफ्तरांत राहूं न देतां अमलांत आणले पाहिजेत आणि भारतानें आपलें सेल्फगव्हर्नमेंटचें ध्येय हस्तगत होईपर्यंत हरप्रयत्नांनीं राष्ट्रसभेचें कार्य अव्याहत चालविलें पाहिजे, असें ते म्हणत. कां कीं,—

पार्लमेंटानें येथील कायदे-कौन्सिलांच्या सुधारणेंविषयीं कितीही उदारपणाचें बिल पास केलें तरी' 'कौन्सिलदारांस लष्कर, उत्पन्न व खर्च आणि परराष्ट्रांतील संबंध यांच्या वाटाघाटींत आणि निकालांत फारच थोडा अधिकार असणार ज्या सुधारलेल्या देशांतील लोकांच्या हातीं खरी राजसत्ता आली आहे, व त्यांचेकडून त्या देशावर अंमल करणाऱ्या सरकारचें खरें नियमन होत आहे त्या देशांत बहुधा लोकनियुक्त

सभासदांची बरीच मोठी राजसभा राष्ट्रांतील नियामक अधिकाराच्या बऱ्याच मोठ्या वांट्याचा उपभोग घेत असते. हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्यव्यवस्था स्थापित होईपर्यंत अशा प्रकारची पहिली राजसभा स्थापित होईल कां नाहीं, व झाली तरी म्हणण्या-सारखा अधिकार तिचेकडे येईल किंवा नाहीं याची बरीच शंका आहे. ज्याप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य इंग्लंडांतून होत राहील त्याप्रमाणें इंग्लंडच्या धर्तीवर येथें स्थाप-लेल्या राजकीय संस्थांत अधिकाराचा उणेपणा राहिलाच पाहिजे. पण जर यासंबंधानें इंग्लंडचें अनुकरण करणें इष्ट असेल तर तेथील हौस ऑफ कॉमन्ससारखी राजसभा येथें स्थापण्यांत येईतोंपर्यंत राष्ट्रसभेचा कार्यभाग उरकला, असें म्हणणें अप्रयोजक होणार आहे. ( नि. सं. भा. ३ पा. १२९ )

कारण—

आमच्या राष्ट्राला खरें राष्ट्रपण आणण्यासाठीं आमच्या राष्ट्रसभेची स्थापना झाली आहे, असें आम्ही समजतों. ( नि. सं. भा. ३ पा. १२७ )

अभ्यासू सज्जनहो, राजकारणी आगरकर असे होते.

## प्रकरण ९ वें

# मुसलमानांविषयीं आगरकर

हिंदुस्थान प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेखालीं नांदावयाचा तर हिंदु-मुसलमानांचे संबंध कसे राखावयाचे ? आगरकरांचें उत्तर असें:—

" हिंदुंचा द्वेष करून तुमचा कसा निभाव लागेल ? तुम्ही उभयतांनीं सख्ख्या भावाप्रमाणें वागण्यांतच तुमचें कल्याण आहे. " (नि. भा. ३ पा. २०७)

हे उद्गार मुसलमानांना उद्देशून आहेत. एकदां राजकीय संबंधांत लिहितांना ज्या आगरकरांनीं असें लिहिलें होतें कीं—

" जेव्हां आम्ही हिंदू लोक ब्रिटिश पलटणींची पर्वा न करतां ब्रिटिश लोकांच्या हातून आपलें राज्य हिसकावून घेण्यास तयार होऊं, तेव्हां त्याबरोबर त्यांना टेकू देणाऱ्या मुसलमान लोकांचाही समाचार आम्हांस सहज घेतां येणार आहे. "

(नि. भा. ३ पा. २२५)

त्याच आगरकरांनीं वर लिहिल्याप्रमाणें मुसलमानांला उद्देशून उद्गार काढले आहेत. त्यांचा समन्वय घाला कीं, कळेल आगरकर मुसलमानांचे द्वेष्टे नव्हते. राजकीय बाबतींत ते हिंदूंचेच तेवढे पक्षपाती नव्हते. किंबहुना हिंदुपदपादशाही फिरून येथें स्थापन करतां येईल अशी त्यांना अंधुकही कल्पना नव्हती; फार काय, एका विशिष्ट लोकांचें राज्य हिंदुस्थानवर होईल अगर व्हावें अशी त्यांची इच्छाही नव्हती.

कारण आगरकरांच्या म्हणण्याप्रमाणें हौस ऑफ कॉमन्ससारखी लोकप्रतिनिधींची राजसभा एकंदर देशाच्या राजकीय कारभाराच्या नियमनाकरतां स्थापन व्हावयाची म्हणजे हिंदुपदपादशाही नव्हे किंवा दुसरी कोणतीही पादशाही नव्हे. आणि म्हणूनच हिंदूंनीं व मुसलमानांनीं सख्ख्या भावाप्रमाणें वागल्याशिवाय नव्या काळची लोकशाही व्हावयाची ती यशस्वी होणार नाहीं असा आगरकरांचा कयास होता. बऱ्यावाईट कसल्या कां साधनांधारणांनीं असेना, मुसलमान हिंदूंच्या खालोखाल संख्येनें आहेत आणि एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या हितसंबंधाचा विचार नाहीं म्हटलें तरी, जवळ जवळ हिंदूंच्या बरोबरीनें स्वतंत्र लोकशाहींत करावा लागणार; आणि केवळ संख्येनें अल्प म्हणून कोणाचे हितसंबंध जर धुडकावले गेले अगर धुगधुगूं लागले, तर ती यशस्वी लोकशाही कसली ? अर्थात् हिंदुमुसलमानांनीं गुण्यागोविंदानें नांदणूक करण्यांतच भावी काळांत दोघांचेंही हित आहे, हें आगरकरांना स्पष्ट दिसत होतें. मग त्यांनीं मुसलमानांला उद्देशून तसे उद्गार काढले यांत नवल काय ?

" दुही माजवा आणि राज्य करा " या तत्त्वाचा अवलंब इंग्रजी राज्याच्या चिरस्थाइकतेसाठीं करतांना " एका जातीस व्यर्थ महती देऊन दुसरीचा नाहक पाणउतारा करणें " हें नोकरशाहीचें वर्तनसूत्र होऊन बसतें.

आणि म्हणून "हिंदुमुसलमानांच्या तंट्याला गोरक्षणाची चळवळ कारण" असलें पिल्लूं घुसडून देऊन नोकरशाहीचे म्होरके आगरकर म्हणतात त्याप्रमाणें—

"प्रसंग विशेषीं मुसलमान लोक आपल्या उपयोगी पडण्यासारखे आहेत, तेव्हां विशेष आयासांवांचून त्यांची मैत्री संपादून ठेवतां आली तर तसें करणें आपलें कर्तव्य आहे असें समजतात." (नि. भा. ३ पा. २२५)

नौकरशाहीच्या असल्या हिंदविघातक धोरणाला मुसलमान बळी पडत व पडतात. "ज्याची त्याची वर्तमान क्षुद्र स्वार्थावर नजर" असलेल्या आगरकरांच्या काळांत परकी सत्तेच्या कारवाईला–फोडझोडीच्या नीतीला मुसलमान बळी पडत याचें कारण ती सत्ता मुसलमानांत समाज म्हणून जे राष्ट्रीय दृष्ट्या अवगुण असत त्यांचा पुरेपूर फायदा घेण्यास कमी करीत नसे.

"मुसलमान लोकांत प्रतिष्ठेखोरपणा, आळस, चैन करण्याची अतोनात हौस, धर्माचा अतिशय अभिमान आणि क्षुल्लक कारणावरून हातघाईस येऊन जिवावर उठण्याचें खुळें धैर्य इत्यादि अवगुण बऱ्याच अंशानें वसत आहेत."

(नि. भा. ३ पा. २२६)

या अवगुणांच्या मागील मनोवृत्तीची उठावणी आगरकरांनीं अशी रेखाटली आहे—

"ब्रिटिश अमलामुळें आमच्याप्रमाणेंच मुसलमान लोकांचें स्वातंत्र्य नाहींसें होऊन ते व आम्ही त्यांची प्रजा झालों, व या नात्यानें आम्हां दोघांत उचनीचत्वाचा भाग राहिला नाहीं हे खरें आहे. पण ही गोष्ट जशी आम्हांस व आमच्या सरकारास समजते, त्याप्रमाणें ती मुसलमान लोकांस समजत नाहीं......हिंदु लोकांस आपण पादाक्रांत करून चारपांचशें वर्षें त्यांवर सार्वभौम सत्ता गाजविली, इतकेंच नव्हें, तर त्या अवकाशांत त्यांना अनेक प्रकारें छळलें. तेव्हां जरकरतां पुढेंमागें हिंदुलोकांची हिंदुस्थानांत सरशी होईल तर ते आपल्या दुष्कृत्यांबद्दल आपला सूड उगवतील अशी शंका मनांत येऊन आम्हांस ज्या गोष्टी हव्याशा वाटतात त्यांना ते आडवे येत असावे; याशिवाय ते आमच्या राजकीय चळवळीस जो अडथळा करतात त्याचें काय कारण देतां येईल कोण जाणे!" (रास्त गोष्टीस भितो कोण?)

"साऱ्याच मुसलमानांचे विचार किंवा वर्तन अशा तऱ्हेचें आहे असें आम्हीं म्हणत नाहीं; बहुतेकांचें तसें आहे हें निर्विवाद आहे." असें सांगून आगरकर म्हणतात कीं "पण आमच्या मनांत त्या लोकांविषयीं तसा पीळ राहिलेला नाहीं."

असें नुसतें म्हणून उपयोग काय? मुसलमानांला भीति वाटते, तसा पीळ जर हिंदूंत उरला नाहीं, असें आगरकरांस वाटत होतें, तर मुसलमानांची समजूत हिंदूनीं घालावयास नको? आणि मुळांच मुसलमानांनीं भांडण उकरून काढलें तरी हिंदूनीं काय म्हणून भांडावें? आगरकरांच्या जवळ या प्रश्नांचीं उत्तरें जय्यत आहेत. दुसऱ्या प्रश्नासंबंधीं आगरकर लिहितात—

" मुसलमान लोक शूर व धर्मवेडे आहेत...हिंदु लोकांशीं त्यांचें जें भांडण होतें तें त्यांच्या धर्मवेडामुळें होतें...धर्मवेड हा वाखाणण्यासारखा गुण आहे कीं नाहीं याची शंका आहे. पण त्याला शौर्याचें पाठबळ आल्यामुळें जो त्याला विरोध करण्यास प्रवृत्त होतो त्याला जिवावर उदार व्हावें लागतें.

हिंदु लोक जात्या गरीब आहेत; तें आपण होऊन कुणाच्याही अंगावर तुटून पडावयाचे नाहींत; दुसऱ्यावर आपली छाप बसविण्यास किंवा दुसऱ्यांचीं राज्यें घेण्यास ( हिंदु ) धर्माचा म्हणण्यासारखा उपयोग होत नाहीं हें खरें; पण दुसऱ्यावर अंमल गाजविणें हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे असें नाहीं. तथापि जोपर्यंत दुसऱ्यांचीं डोकीं धर्मवेडांनीं भणभणून गेलीं आहेत तोंपर्यंत त्यांच्याशीं संबंध पडणाऱ्या लोकांतही धर्माभिमानाचें थोडेंसें वारें असलें पाहिजे; नाहींतर त्यांच्या हातून स्वधर्माचें संरक्षण व्हावयाचें नाहीं. " ( नि. भा. ३ पा. २०५ )

तंटा आहे तेथें एका हातानें टाळी कधींच वाजत नाहीं. हिंदुमुसलमानांचा तंटा तरी या सामान्य नियमाला अपवाद कसा असावा ? पण सदर तंट्यांत टाळी वाजण्याइतका हिंदूंचा हात वर होतो तो केवळ बचावाचा प्रयत्न म्हणून. मुसलमान हे मुसलमान आहेत एवढ्याच सबबीवर हिंदूंनीं त्यांच्यावर हात कधींच उचलला नाहीं. मग मुसलमानी रियासतीचा सूड घेण्याची कल्पना बिचाऱ्या हिंदूंच्या डोक्यांत ब्रिटिश-रियासतीनंतर सामावण्याची बातच कशाला हवी ? आगरकरांचा कयास असा कीं—

" आमच्या व मुसलमानांच्या विचारांत आणि त्याच्या अनुरोधानें घालून दिलेल्या क्रियापद्धतींत किंवा आचरणमार्गांत कितीहि भेद असला तरी मनुष्यामनुष्यांत सख्य उत्पन्न करणारे किंवा भिन्न प्रकारच्या लोकांत क्रियास्वातंत्र्य राखून त्यांचा एकमेकांशीं व्यवहार होऊं देणारे जे गुण मनुष्याच्या प्रकृतींत सामान्यपणें दृष्टीस पडतात, त्यांचें भेदक गुणांहून बहुधा प्राबल्य असल्यामुळें, मुसलमान प्रबल होते तेव्हां त्यांनीं हिंदूंचा व हिंदू प्रबल झालें तेव्हां त्यांनीं मुसलमानांचा समूळ नाश केला नाहीं. हिंदूंचीं व मुसलमानांचीं घोर रणकंदनें झालीं, व इंग्रज लोक येथें आले नसते तर कदाचित् अजूनही ती होत असती; तसेंच त्यांनीं उद्यां आपला गाशा गुंडाळला अथवा आपला नियामक रज्जू बराच सईल सोडला तर जातां देखील तीं होऊं लागतील; पण ज्या अर्थी येथें इंग्रजी राज्य होण्यापूर्वीं हिंदु व मुसलमान हे शस्त्रधारी असून त्यांनीं एकमेकांचा समूळ उच्छेद केला नाहीं त्या अर्थी कोणत्याही कारणानें इंग्रजी अंमल क्षणभर नाहींसा झाला असें मानल्यास हिंदु मुसलमानांस किंवा मुसलमान हिंदूंस किंवा दोघेही एकमेकांस नामशेष करतील असें मानण्यास कांहींएक आधार आधार नाहीं. " ( नि. भा. ३ पा. १८८ )

नसेल ! दोघेही एकमेकांस नामशेष करणार नसतील. पण हिंदु–मुसलमानांचा सलोखा ? आगरकर म्हणतात—

" उभतांची संसारयात्रा वर्षेंच्यावर्षें बिनबोभाट एकत्र होऊं लागण्यास दोघांतही सुशिक्षणाचा व सुनीतीचा पुष्कळच प्रसार झाला पाहिजे. " ( नि. भा. ३ पा १८८ )

ही जबाबदारी अर्थातच पुढाऱ्यांची. आगरकर लिहितात—

" अलिकडे इंग्लिश व ऐरिश लोकांतील सुशिक्षित पुढाऱ्यांच्या शहाणपणा-मुळें त्यांतील द्वंद्व मिटत आले आहे (?) व कालें करून मुसलमान व हिंदु यांतील रणाचेंही निरसन होईल याविषयीं आम्हास शंका नाहीं. पण तें लौकरच होणें किंवा न होणें हें त्या त्या लोकांतील पुढाऱ्यांच्या अकलेवर, दूरदृष्टीवर, आत्मसंयमनावर आणि लोककल्याणेच्छेवर अवलंबून आहे. प्रसंगविशेषाचें महत्त्व नीटपणें लक्ष्यांत न आणतां व मागचा पुढचा विचार न करितां स्वजातीयांच्या छंदाप्रमाणें वागून व त्यांना रुचेल असें बोलणें बोलून जे पुढारी आपल्या प्रतिपक्ष्यांवर तुटून पडतील आणि त्यांच्या मनास दुःख होईल अशा प्रकारचीं भाषणें करतील किंवा लेख लिहितील ते पुढारी उभयपक्षांचा संधि त्यामानानें कालावधीवर नेतील असें आमच्यानें म्हटल्यावांचूनन राहवत नाहीं. " (नि. भा. ३ पा. २०३)

याप्रमाणें हिंदूंची बाजू सांगून आणि हिंदू पुढाऱ्यांची जबाबदारी पतकरून आगरकर मुसलमानबंधूंची अशी समजूत काढतात कीं—

" दास्य हें दोघांच्याही कपाळीं आलें आहे, व दोघांनाही आपआपल्या उन्नती-चा उपाय करणें जरूर आहे. इंग्रजी म्हणीप्रमाणें दोघेही एकाच होडींत आहेत; तेव्हां ही होडी सुरक्षितपणें तीराला जाऊन लागणें उभयतांच्या सहकार्यावर व मैत्री-वर विशेष अवलंबून आहे....इतउत्तर मुसलमानांनीं पारशी लोकांप्रमाणें हिंदू लोकांचा हेवा करणें सोडून देऊन एकंदर साऱ्या गोष्टींत विशेषतः राजकीय गोष्टींत एकमेकांच्या हातांत हात घालून चालले पाहिजे.... मुसलमान लोकांनीं एक गोष्ट विशेष रीतीनें ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, इंग्रज सरकारनें त्यांच्यावर कितीही मेहेरबानी केली तरी तीपासून त्यांचा विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. "

(नि. सं. भा. ३ पा. १८६)

शिवाय

" तुम्ही पूर्वी राज्यकर्ते होतां तेव्हां स्वजातीकरतां जो पक्षपात करीत असा, तो आतां इंग्रज लोकांनीं आपल्या जातीकरतां केला तर चालणार आहे; पण त्यांनीं तो आपल्याकरतां करावा आणि तुमच्याकरतांही करावा हें कसें जुळणार ? इंग्रजी अंमलाचा भार सध्यां तुम्हां—आम्हांवर आहे; पण तुम्हींही इंग्रज झालां म्हणजे आमच्या डोक्यावर दोन इंग्रजांचें ओझें होणार. आम्हांस ओझें उचलण्याची बरीच संवय आहे हें आम्हीं कबूल करतों. पण तें आम्हांस झेपेनासें झालें म्हणजे तें आपल्याआपण कोसळूनां पडतें; किंवा आमचा जीव वैतागून जाऊन, त्रासून गेलेल्या उंटाप्रमाणें तें आम्हीं फेंकून देण्याचा प्रयत्न करतों! इंग्रज लोकांना ही गोष्ट इतिहासावरून पक्की ठाऊक आहे. तुम्ही त्यांना कितीही आळविलेंत अथवा धमक्या दिल्यात तरी ते निदान स्वाहितास्तव तुमच्या—आमच्यांत फार भेद करूं शकत नाहींत. " (नि. सं. भा. ३ पा. २०७)

आणि हें जर खरें, तर

" हिंदु हा जरी पराकाष्ठेचा कृतज्ञ, राजनिष्ठ व शांतिप्रिय प्राणी आहे, तरी अन्यायाचा अतिरेक झाला असतां त्याचें सुद्धां स्व-स्वामित्व नाहींसें होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. " ( नि. सं. भा. ३ पा. २०६ )

हें हमेश ध्यानांत ठेवून

" शिकलेला आहे असें जरी म्हटलें पाहिजे तरी...अडाणीपणाच्या समजुती, पोकळ अभिमान, निरर्थक वल्गना आणि अप्रशस्त मार्गांनीं सुखसंपादनाची इच्छा इत्यादि दुर्गुणांनीं......सोडलेलें नाहीं. " अशा

" इस्माइलखानासारख्यांचा नाद सोडून आ. मि. बद्रुद्दिन तय्यबजी सारख्यांच्या तंत्रानें वागूं लागा म्हणजे थोड्या काळांत सर्व कांहीं ठीक चालूं लागेल. "

( नि. सं. भा. ३ पा. २०७ )

## प्रकरण १० वें

# औद्योगिक उन्नतिविषयीं आगरकर

" नुसतें धान्यपिकवू आणि रानतोडू राष्ट्र उन्नतीस चढत नाहीं. " तर " सचेतन अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो " अशी जेथें वस्तुस्थिति आहे, तेथें राष्ट्राचा समुच्चयवाचक विचार बुद्धीला केवढे धक्के देत असेल बरें ? " मनुष्याच्या आहारवस्तू कष्टसाध्य आहेत व त्याची उपभोगेच्छा अमर्याद आहे, एवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या म्हणजे त्यास इतर प्राण्यापेक्षां शेकडों पट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हे सहज समजणार आहे. तें ज्यास पक्कें समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वतां उद्योगी होईल इतकेंच नाहीं तर, इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्याचें सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य घालविणें शक्य आहे. पण कोणत्याही कारणानें उद्योगी मनुष्याची गांठ पडल्यास, एक तर त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या आधीन होऊन तो ठेवील त्या स्थितींत राहण्यास तयार झालें पाहिजे. " अर्थात मनुष्यामनुष्यांची जर ही स्थिति तर राष्ट्राराष्ट्रांची अधिकच खरी नाहीं काय ?

"केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते, तो विशेष सुखी असतो. " पण "ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांहीं हौस असली तर नियामक उद्योगाची असे लोक मोठेपणास कधींही चढणार नाहींत. " तथापि हें सारें भाष्य दोनवेळचें चुलखंड थंड नसेल तर ! " ज्या राष्ट्रांतील लोकांस पोटभर अन्न मिळत नाहीं व थंडीवाऱ्यांपासून आपलें रक्षण करतां येत नाहीं, असल्या राष्ट्रांतील लोकांस वरिष्ठ सुखें मिळणें अशक्य आहे." ब्रिटिश रियासतींत हें दुर्भाग्य राशीला बसल्यामुळें हिंदुस्थानचा प्रश्न जागतिक चढाओढीच्या दृष्टीनें मोठा चिंताजनक होऊन राहिला यांत शंकाच नाहीं. कारण वरिष्ठ सुखें कलाविकासाशिवाय व कलाविकास व्यापारवृद्धीशिवाय शक्य नाहीं. "कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थासाठीं अहोरात्र खपावें लागतां कामा नये; शिवाय अशीं कामें करावयास लागणाऱ्या जड द्रव्यांचेंही वैपुल्य असलें पाहिजे.". जडद्रव्याच्या वैपुल्याबद्दल हिंदुस्थानाबाबत स्वप्नस्वप्नांतरीही कोणी शंका घेणार नाहीं. म्हणूनच खाण्यापिण्याची ददात ज्यावेळीं नव्हती त्यावेळीं येथील कलाकौशल्यानें इंग्लंडच्या

राजवाड्यांतील राण्यांचे महाल रंगत हें देखील इतिहासप्रसिद्ध आहे. तथापि इंग्लंडचें राजकीय जोखड हिंदुस्थानच्या मानेवर बसल्यानंतर हिंदी कलाकौशल्याचीं बोटें जीं कलम करण्यांत आलीं, तीं हिंदुस्थानला थोटीं करून बसलीं व त्यायोगेंच हिंदुस्थानच्या नशिबीं निरुद्योगाचें, अस्थानीं उद्योगाचें, किंवा नियामक उद्योगाचें खडतर लेणें येऊन बसलें !

"हिंदुस्थान देश इंग्रज लोकांच्या अमलांत असल्यामुळें त्यांना फायदेशीर असा व्यापार हिंदुस्थानमध्येंच करतां येतो येवढेंच नाहीं, तर या देशाचा कबजा त्यांच्याकडे असल्यामुळें सर्व आशिया खंडावर त्यांची छाप बसून पूर्वगोलार्धाचा बहुतेक व्यापार त्यांनींच आटपला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं." फार काय, "भांडवल फार झाल्यामुळें ज्याला इंग्लंडांत अगदीं हलकें व्याज येतें, तें भांडवल हिंदुस्थान सरकारास कर्जाऊ देतां आल्यामुळें बुडण्याची भीति न राहून चांगलें व्याज नेमल्या वेळीं मिळतें." तात्पर्य "आमचे परके प्रभु आपल्या घरच्या व्यापाराची बढती असावी या हेतूनें आमच्या व्यापारास उत्तेजन देत नाहींत, इतकेंच नाहीं, तर उलट तो खचेल कसा, याच्या उपायाचा अवलंब करतात." परिणाम असा होतो कीं "आम्हीं खंडीच्या खंडी मूळ द्रव्यें उत्पन्न करावीं, दुसऱ्या राष्ट्रांनीं जहाजें भरभरून न्यावीं आणि त्यांवर कुशलतेची करामत करून पुन्हां आम्हांकडे विकण्यास आणावीं, व हवे तसे पैसे मिळवावे !" तथापि असें नुसतें रडून काय उपयोग ? "जोंपर्यंत इंग्रज लोक आमच्यावर राज्य करताहेत, तोंपर्यंत बाहेरचा माल आंत येण्याची बंदी होण्याची वार्ता कशाला पाहिजे ?" एक वेळ आमचे परके प्रभु "आमचा राज्यकारभार आमच्या स्वाधीन करतील, पण व्यापार हातचा जाऊं द्यावयाचे नाहींत." तसेंच हेंही ठरलेलेंच आहे कीं "वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून प्रचंड क्रांति झाली आहे व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दीड फूट लांबीच्या हाडामांसाच्या हाताचें कांहींएक चालेनासें झालें आहे."

हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीसंबंधीं तळमळणाऱ्यांनीं एवढ्या ढळढळीत गोष्टींवरील लक्ष चळूं दिलें नाहीं म्हणजे आपोआपच दिसेल कीं "अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपियन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यापासूनच आम्ही शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों, तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्राविण्याची अवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हांस सर्वांशीं युरोपियन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आम्हांस मान्य नाहीं......आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्ततेला कारणीभूत होईल अशा उपायांची योजना केली पाहिजे." एवढ्यासाठीं जपानप्रमाणें कालमर्यादित नोकरीच्या तज्ज्ञांचा भरणा करण्याची शिफारस आगरकरांनीं कोठें केल्याचें आढळत नाहीं. परदेशाला विद्यार्थी पाठवून तज्ज्ञ बनवून

आणण्याची शिफारस मात्र त्यांनीं एके ठिकाणीं केली आहे. त्याचप्रमाणें असें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादिलें आहे कीं " जे कारखाने आमच्या हातून सहज निघण्यासारखे व निभण्यासारखे असतील त्यांसच आम्ही प्रथम हात घातला पाहिजे, व जो माल हटकून खपण्याचा संभव तोच उत्पन्न केला पाहिजे हें उघड आहे. " या गोष्टीचा ' व्यवहार-शास्त्रें मार्ग ' असा आहे कीं " कापूस, धान्य, लोखंड, तांबें, जस्त, पितळ वगैरे अत्यंत उपयोगी धातु; शेतकीस व इतर साध्या धंद्यास लागणारीं यंत्रें वगैरे पांच चार स्थूल वस्तूंचे व्यापार पूर्णपणें आमच्या हातीं आल्याशिवाय आम्ही आपली कांत टाकून ताजेतवाने होऊं शकणार नाहीं. " असें करावयाचें ठरविलें तरी " या दिवसांत मोठ-मोठाले यांत्रिक कारखाने घालून त्यांत खंडोगणती माल तयार केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. " याला " भांडवलाच्या जवळ जवळ अकलेची गरज आहे, अगोदर भांडवल आणि मग अक्कल. "

सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः या न्यायानें तज्ज्ञतेची अक्कलसुद्धां भांडवलाच्या अभावीं अडावयाची. म्हणून आगरकर म्हणतात— " चांगलें तारण पाहून किंवा विश्वास ठेवण्यासारखीं माणसें हुडकून काढून वार्षिक शिलकेचा कांहीं भाग व्यापा-रांत घालावयाचा असा प्रत्येकानें निश्चय केला, तर प्रतिवर्षी चार दोन कारखाने काढण्यापुरतें भांडवल उभें रहात जाईल ······ लहान लहान भागीदारीनें उभारलेल्या समाईक भांडवलाच्या व्यापारी मंडळ्या प्रांतोप्रांतीं स्थापण्यांत आल्या तर पांच-पंचवीस वर्षांत ज्या व्यापारवृद्धीबद्दल आज आपण इतके धडपडत आहोंत ती स्पष्टपणें चहूंकडे दिसूं लागेल." अशा तऱ्हेनें अक्कल, भांडवल व उत्पत्ति, यांची सांगड घातली तरी जगाच्या चढाओढींत कारखान्याच्या निपजेला उठाव मिळविण्या-साठीं ती सफाईदार, मनोहर व शक्य तेवढी स्वस्त झालीच पाहिजे. "हें देशी मालाचें दुकान; येथें पैशाच्या मालास देशाभिमानास्तव दोन पैसे द्यावे लागतात" असला खाक्या निभणारा नाहीं. " दुसऱ्या देशांतून आलेला माल सवंग मिळत असतां आपल्या देशांतला म्हणून महाग माल विकत घेत बसणें हें देशाचें खरें हित करणें नव्हे " तर " कांहीं वर्षें फायद्याकडे दुर्लक्ष करून किंवा प्रसंगविशेषीं मूळ मुद्द-लांतही थोडाबहुत तोटा सोसण्यास तयार होऊन निरनिराळ्या व्यापारी मंडळ्यांचे पातीदार होणें परिणामी स्वतःला व देशाला फार श्रेयस्कर होणार आहे. "

याबरोबरच गिऱ्हाइकाचीही मनोवृत्ती स्वदेशीच हवी. भांडवलवाले, यंत्रें कामकरी, दुकानदार व गिऱ्हाईक आणि जाहिरात हेच कोणत्याही कारखान्याचे पंचप्राण व बहिश्चर प्राण होत. तेव्हां स्वदेशी मनोवृत्तीचा फैलाव कसा करावयाचा ! तर " जागोजागीं प्रदर्शनें करणें, शेतकरी, सुतार, लोहार वगैरे कारागीर लोकांस आपआपल्या धंद्यास लागणारी लहानलहान यंत्रें घेण्यासाठीं हलक्या व्याजानें किंवा उसनवार रकमा देणें, कच्च्या मालाचें उत्पन्न वाढविण्यासाठीं शेतकीची होईल तेवढी सुधारणा करणें; लहानमोठ्या गांवांत उपयुक्त यंत्रालयें स्थापणें; कारागीर व मजूर लोकांस प्राथमिक शिक्षण, चित्रकला व एखाद्या दुसऱ्या धंद्याविषयीं चांगल्या

प्रकारची यांत्रिक माहिती देणें आणि परस्पर सहानुभूति व स्वाभिमान उत्पन्न करणें" असे उपाय स्वदेशी मनोवृत्तीच्या फैलाव्यासाठीं आगरकरांनीं सुचविले आहेत. इतका सगळा जामानिमा जमला, तरी सरकारचें म्हणून एक कर्तव्य उरतेंच. तें आगरकरांनीं पुढील शद्बांनीं सांगितलें आहे.

" फ्रान्स, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, इटली, रशिया, जपान, स्वित्सलँड, फार तर काय पण खुद्द इंग्लंड वगैरे देशांनीं आपल्या व्यापाराच्या बाल्यावस्थेंत त्याच्या वाढीकरतां सरकारच्यामार्फत काय काय प्रयत्न केले, व अजूनही त्या त्या देशांतील तारुण्याप्रत पावलेल्या व्यापारास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें केवढी मदत मिळत आहे, हें पाहिलें तर इंग्लंडच्या व्यापारास धक्का बसेल या भीतीनें आमचे राज्यकर्ते आमच्या व्यापारास मिल्लसारख्या अर्थशास्त्र्यांनीं ज्या प्रकारच्या उत्तेजनाची अवश्यकता व सयुक्तिकता आपआपल्या ग्रंथांत प्रतिपादिली आहे, व ज्या प्रकारचें उत्तेजन अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या किंवा जपानच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या व्यापारास देऊन त्याची भरभराट करून सोडली आहे त्या प्रकारचें उत्तेजन आमच्या व्यापारास देण्याबद्दल येथल्या किंवा इंग्लंडमधल्या प्रमुख अधिकाऱ्यांपुढें तुम्ही केव्हांही गोष्ट काढलीत तर ते आपल्या दोनही कानांवर घट्ट हात ठेवून दांभिकपणानें शांतं पापं या मंत्राचा जप करीत सुटतील!! जणों काय, लोकांच्या पैशानें, लोक करा म्हणून प्रार्थना करीत असलेली, गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें हें महापातक आहे!" अधिकाऱ्यांना हें कळत नाहीं, असें नाहीं कीं " नवीन वसाहतीच्या जागीं किंवा कांहीं वर्षें मदत दिल्यावरही जोरानें वाढत राहील असें मानण्यास चांगला आधार असेल, अशा ठिकाणीं सरकारानें अशा व्यापारास कांहीं काळ मदत द्यावी असा प्रयोज्य अर्थशास्त्राचा नियम आहे."

अर्थात् अशी माहिती झोपेचें सोंग घेणारांचे जवळ आहे असें म्हणण्यांत स्वारस्य तरी काय? " इंग्लिश लोकांच्या मनोधर्मांत एकाएकी प्रचंड क्रांति झाल्याशिवाय त्यांच्या अंतःकरणांत जपान किंवा युनायटेड् स्टेटस् येथील सरकारांप्रमाणें आमच्या व्यापारवृद्धीविषयीं कळकळ उत्पन्न होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे. अशी क्रांति शेपन्नास वर्षांत होण्याचें कांहींएक चिन्ह दिसत नाहीं." इतक्या मुदतीनंतर तरी तसली क्रांति होईल याचा निर्वाळा काय? एवढाच कीं " ज्या कारणामुळें आम्हीं आपलें राज्य त्यांना दिलें त्याच कारणामुळें आम्ही आपले धंदेही आटोपूं दिले! आणि राज्य परत मिळविण्यासाठीं ज्या प्रकारच्या खटपटींचा उपक्रय आम्ही केला आहे त्याच प्रकारच्या खटपटी व्यापार-धंदा फिरून हातीं येण्यासाठींही चालविल्या आहेत. एक दुसऱ्यांशीं संलग्न आहे, तेव्हां साध्य होणार असतील तर दोन्ही एकाच क्रमानें साध्य होत जातील! भेद इतकाच आहे कीं, व्यापारधंद्यासंबंधीं आम्हांस आमच्या सरकारशीं विशेष राजरोसपणें भांडतां येतें!"

या भांडाभांडींत सगळें साखळीसूत झालें तर ठीकच; नाहींपेक्षां आगरकर लिहितात कीं "ज्यावेळेस येथें एखादा मोठा दुष्काळ पडून, किंवा टाइम्स ऑफ

इंडियानें म्हटल्याप्रमाणें, दारिद्र्यानें पिळून काढलेल्या व भुकेनें गांजून गेलेल्या लोकांचें एखादें प्रचंड बंड होऊन, त्यांच्या व्यापारास एकाएकीं मोठा धक्का बसेल, व कोट्यवधि रुपयांचें नुकसान होईल, तेव्हां कोठें त्यांचे डोळे उघडणार!!" सरकारचे डोळे उघडण्याबद्दलचें आगरकरांचें भविष्य असें कडवट असलें तरी तेवढ्यावरच त्यांची मदार नव्हती; तर 'ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर' असा त्यांचा दंडक होता हेंही वरील विवेचनावरून मार्मिक वाचकांच्या निदर्शनास आलें असेल. अर्थात् आगरकरांनीं आपल्या मताप्रमाणें कितपत हात-पाय हालविले असा विचार साहजिकच येतो; आणि त्या दृष्टीनें पाहूं जातां मोठी निराशा होते. वर्तमानपत्राचा संपादक म्हणजे आपला शब्द न् शब्द आचरणांत आणणारा रामदास नव्हे. "भाषण आणि वर्तन यांतील विरोध हा आमचा राष्ट्रीय दोष" असेल तर संपादक त्या दोषापासून अलिप्त राहूं शकेल असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. औद्योगिक बाबतींत तरी आगरकर या सामान्य नियमाला खास अपवाद नव्हते.

पुढाऱ्यांच्या शुद्धाचरणाचा आणि राष्ट्रीय विचारप्रवर्तनाचाच मुख्यतः आगरकरांचा काळ होता. उमटलेल्या आनुवंशिक दम्यामुळें आणि 'गृहस्थ' होईपर्यंत काढलेल्या हालअपेष्टांनीं चिंबल्यामुळें व लोकशिक्षणाच्या पतकरलेल्या दगदगीमुळें पण त्यापेक्षांही निखालस चारित्र्यदक्षतेपायीं स्पष्टपणें बोलण्याच्या तीव्रतेमुळें, 'शेतकऱ्याच्या उद्धारार्थ पतपेढ्या' चालविण्यास लागणारा निर्मळपणा जवळ असणारे आगरकरही सामुदायिक कार्याच्या प्रत्यक्ष उठावाला साहाजिकच कामाचे नव्हते; आणि आगरकर काय पण कोणताही मानवी प्राणी आपल्या फारच थोड्या कल्पनांचा साकल्यानें व्यवहार करूं शकतो. इतक्या सगळ्या गोष्टी कबूल केल्या तरी उत्पादक उद्योगाची काडीही प्रत्यक्षाप्रत्यक्ष आगरकरांच्या हातून हालली नाहीं ही जाणीव राहतेच. असा व्यक्तिमूलक प्रयत्न आगरकरांच्या हातून जन्माच्या सोबती असलेल्या व केलेल्या दारिद्र्यामुळें झाला नाहीं हें एकवेळ साहाजिक असलें तरी एखाद्या गब्बर मित्राकडून त्यांनीं तसा करवला नाहीं किंवा त्यांच्या स्वतांच्या व्यवहारशुद्ध कल्पनेप्रमाणें 'भागीदारी'नेंही एकादी "मंडळी" आगरकरांनीं काढवली नाहीं. तात्पर्य औद्योगिक क्षेत्रांत संपादक–शिक्षकांच्या परंपरेप्रमाणेंच आगरकरही "सामान्य" च होते. तथापि या सामान्य भूमिकेची राष्ट्रीयदृष्ट्या कमींत कमी येणारी जबाबदारी त्यांनीं अत्युत्कटपणें पार पाडली हें कबूल केलेंच पाहिजे.

राष्ट्राच्या औद्योगिक जीवनाला आवश्यक अशा 'भागीदारी'च्या मंडळ्या आगरकरांच्या काळीं निघत्याच तर त्यांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें त्या मंडळ्यांचे क्वचित् बुडते 'भाग' ही घेतले असते. पण तसा योगच नव्हता. शिवाय, महाराष्ट्रांत अजूनही पावणेशंभर टक्के अनुत्पादक असलेला वर्तमानपत्राचा उद्योग, तत्कालीन बहुजन समाजाची आवडती शिवी होऊन बसलेल्या 'सुधारका'च्या नांवानें आगरकर आपल्या परीनें करण्यांत गुंतले होते. आणि जातिवंत औद्योगिक व उत्पादक क्षेत्राच्या दृष्टीनेंच बोलावयाचें झालें, तर त्याबाबत मार्गदर्शक विचारप्रवर्तन त्यांनीं केलें;

इतकेंच नव्हे तर बक्षीसें लावून हस्तकौशल्याच्या नित्योपयोगी जिनसा त्यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें करवून घेतल्या व त्या प्रचलित केल्या. ( अवशिष्ट उदाहरण म्हणून उभ्या टाचेचा आगरकरी ' जोडा ' देतां येईल ! ) फार काय सांगावें, " देशाभिमानास्तव एका पैशाच्या मालाला दोन पैसे " देऊनही त्यांनीं अखंड स्वदेशी व्रत आचरिलें आणि उत्पादक व औद्योगिक क्षेत्रांत राष्ट्रीयदृष्ट्या स्वतांकडे असणारी गिऱ्हाइकाची भूमिका निष्ठेनें पार पडली.

## प्रकरण ११ वें

# स्त्रीसमाजासंबंधीं आगरकर

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः "—भगवान् मनु.

The angel of the family is woman. Mother, wife or sister, woman is the caress of life, the soothing sweetness of affection shed over its toils, a reffection for the individual of the loving providence which watches over humanity. —Mazzini

" मनुष्याच्या अंतःकरणांत परमेश्वरानें प्रेरिलेल्या न्यायवासनेमुळें, पुढेंमागें जगास असा दिवस खास येणार आहे कीं, ज्यावेळेस राष्ट्राराष्ट्रांमधला किंवा मनुष्या–मनुष्यांमधलाच काय पण स्त्रीपुरुषांमधलासुद्धां प्रत्येक व्यवहार परस्पर संमतीनें चालणार आहे. ' —आगरकर.

समाजांत परस्पर घटकांविषयीं न्यायबुद्धि जागृत राहणें हें त्या समाजाच्या जिवंतपणाचें एक लक्षण आहे. हें लक्षण आगरकरांच्या काळीं आगरकरांना फारच थोडें दिसत होतें. समाजाचा अर्धा भाग स्त्रिया असतांना, जिकडे पहावें तिकडे ' पुरुष स्वामी, स्त्री दासी ' हा भाव दृष्टीस पडे. " कोणतेंहि माणूस दुसऱ्या माणसा-वर सत्ता चालविण्याइतकें सज्जन असूं शंकत नाहीं ' असें अब्राहम लिंकनचें म्हणणें असें. आगरकरांच्या काळीं पुरुषवर्ग ही जाणीव दाखवित नव्हता. उलट स्त्रियांनीं आपण देऊं त्या तुकड्यावर समाधानांत राहिलें पाहिजे अशी अनुदार वृत्ति पुरुष-वर्गांत नांदत होती. फार काय, " बंधु विकी जरि निज भागिनीला शरण कुणा जावें ? " अशा गुलामगिरीची हताश मनोवृत्ति खुद्द स्त्रीसमाजांतच नांदत होती.

अितिहासाच्या कसल्याही घडामोडींनीं नीच मनोवृत्ती भारतवर्षांत मूळ धरून बसलेली असो, ब्रिटिश रिसायतींत कायदे–कलम बांधणाऱ्या मेन–मेकॉले प्रभृतींनीं हिंदु स्त्रिया नितांत परतंत्र आहेत असा सिद्धांत बांधून ठेवल्याकारणानें समाजांत स्थिरस्थावर करावयाच्या शांततेच्या काळांतसुद्धां स्त्रीजातीला न्याय मिळण्याचा राजमार्गही बंद झाला. घरधन्याची ( Pater familias ) अिच्छा हाच कायदा असणाऱ्या रोमन संस्कृतीचा पाया मेन–मेकॉलेच्या संस्कृतीला असल्याकारणानें त्या रोमन संस्कृतीतील स्त्रीपारतंत्र्याचें पिशाच्च मेन–मेकॉले प्रभृतीना आमच्या स्मृतिवचनांतून आढळलें; आणि मूळ रहस्य समजावून ज्यांच्या तोंडाकडे त्यांनीं पहावें, ते स्वयंमन्य शद्बशूर शास्त्रसंपन्न झांपड घातलेल्या ' घाणेकरा ' प्रमाणें चाकोरी–वरून गेले. अर्थात् हिंदूंच्या वैदिक परंपरेचा प्रकाश वेदांच्या पुस्तकांतच राहिला.

युरोपियन राष्ट्रांच्या किती तरी शतकें अगोदर भारतीय आर्यांना स्त्री-गौरवाचें महत्त्व पटलेलें होतें. सौ. सरोजिनी नायडू म्हणतातः—

" India at the beginning of the first century was already ripe with civilization and contributed to the world's progress radient examples of women of the highest genius and widest culture. "

अध्यात्मविद्येच्या गूढ तत्वज्ञानांत तल्लीन होणाऱ्या गार्गीमैत्रेयींच्या योग्यतेच्या वैदिक मंत्रद्रष्ट्या, शिवधनुष्याचा घोडा घोडा खेळणारी जानकी, प्रखर तेजस्विनी द्रौपदी, शकुंतला-विदुलेसारख्या अभिमानी माता अशी कितीतरी उदाहरणें स्त्री-रत्नांपैकीं खिती शकाच्या तोंडालगत दाखवतां येतील! इतिहासाच्या कपाळावर प्रमुखांचीच तेवढी नोंद असते, हें लक्षांत ठेवलें तर एकंदर समाजांत स्त्री-जातीची योग्यता भारतीय काय मानीत याची सहज कल्पना बांधता येते.

ॐ समज्जंतु विश्वेदेवाः समापो हृदयानि नौ।
सं मातरिश्वाज्जाता समुद्वेष्ट्रि दधातु नौ ॥

—ऋग्वेद मं. १० सू. ८

ॐ गृह्णामि ते सौभाग्याय हस्तं मया पत्या जरद्‌वृष्टिर्यथा सः।
भगो अर्यमा सविता पुरन्ध्रिर्मह्यत्वादुर्गार्हपत्याथ देवाः ॥

—ऋग्वेद मं. १० सूत्र ८५ मं. ३६

अशा पाणिग्रहणाच्या मंत्राच्या मंगल स्वरूपावरून आणि फिरून-

ॐ ध्रुवो द्यौर्ध्रुवा पृथिवी ध्रुवं विश्वमिदंजगत्।
ध्रुवास्तुः पर्वता इमे ध्रुवा स्त्री पतिकुले इयम् ॥

या ब्राह्मणभागाच्या एका मंत्रावरून, छे! छे! अशा दर्जाच्या अगणित मंत्रांनीं भारतवर्षांत पति-पत्नींची समानता, त्यांचे समान हक्क, त्यांची परस्पर प्रेमपूर्वक कर्तव्यें, आणि मनोमन एकरूपतेचें पावित्र्य एके काळीं पराकोटीनें नांदत असतां त्याच आर्यांच्या वंशजांनीं आपल्या गृहदेवतेला ' खटलें ' म्हणण्यापर्यंत मजल न्यावी ही खरोखरीच दुर्दैवाची गोष्ट होय!

तथापि वैदिक कालापासून हिंदु समाजानें विवाह हें स्थिर बंधन मानलें असून प्रज्ञापौरुषवंत संतती निर्माण होऊन उज्ज्वल परंपरेच्या चढत्या वाढत्या पराक्रमानें राष्ट्र जगावें अशी शाब्दिक इच्छा मात्र प्रत्येक वेळीं [ अजाणतांहि ] प्रगट आहे. या सुप्त अगर प्रगट इच्छेशिवाय ' पण ' लावून केलेल्या स्वयंवरांचा, सावित्रीसारख्यांच्या वरसंशोधनांचा, सुभद्रा-रुक्मिण्यादिकांच्या प्रीतिविवाहांचा, किंबहुना शंभर शंभर पराक्रमी पुत्र परमेश्वराला मागणाऱ्या विनम्र प्रार्थनांचा वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीनें उलगडा पडत नाहीं.

" इहैव स्तं मा वियौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतम् कीन्डतौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वे गृहे।
समानि वः आकूतिः समानि हृदयानि वः! समानमस्तु वो मनो यथा वः सुहासमिति॥"

किंवा " इह प्रियं प्रजया ते समृध्यतामस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि ॥ अघोरचक्षुरपतिघ्नेधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः वीरसूर्देवकामा स्योना शंनो भव द्विपदे शं. चतुष्पदे ॥" अशा प्रकारचे आशिर्वाद विवाहप्रसंगीं देण्यांत राष्ट्राच्या निर्वंध जिवंतपणाची जपणूक आर्यांनीं किती दक्षतेनें केली होती आणि मातृपदानें स्त्रीच्या जन्माची सार्थकता कां मानण्यांत येत होती, तें उघड होईल.

अशाच धोरणानें स्वातंत्र्य, समता, संमति आणि शिक्षण यांच्या अनुरोधानें व्यक्तीचा विकास, समाजाचें संवर्धन आणि राष्ट्राचें उत्थापन व्हावें असें आगरकरांचें म्हणणें होतें. ते म्हणतात:—

"अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचे, स्वभावाचे व आचरणाचे परिणाम मुलाच्या प्रकृतीवर होऊं लागतात. मुलें स्वावलंबी होईपर्यंत त्यांच्याबद्दल जी अहोरात्र खस्त खावी लागते ती आईला किंवा कारणपरत्वें तत्स्थानापन्न जी स्त्री झाली असेल तिलाच खावी लागते...आपल्या प्राणापेक्षां ज्याला आपण पोर म्हणतों त्यास जपणें हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे."

मातृपदाची ही जबाबदारी पुरुषांच्या हातून निभणारी नसल्यानें, ज्या त्या स्त्रीच्या मगदुराप्रमाणें, इच्छेनुरूप आणि परिस्थितीला धरूनच संतानोत्पति झाली पाहिजे, असा आगरकरांचा योग्य कटाक्ष होता. ते म्हणतात, "प्रत्येक स्त्रीला दहाबारा वेतें झालींच पाहिजेत, असें तरी आपण कां घेऊन चालावें ? सध्यां स्त्रियांना जीं इतकीं मुलें होतात तीं त्यांच्या संतोषानें होतात असें आम्हांस वाटत नाहीं. यासंबंधानें पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे. बाळंतपणाच्या क्लेशांची यत्किंचित् झांक पुरुषांच्या स्वप्रत्ययास येण्यासारखी असती तर त्यांनीं आपल्या मनोविकारास इतकें सईल सोडलें नसतें ! "परदुःख शीतल" या तत्वावर सध्यां त्यांचें वर्तन चाललें आहे. स्त्रियांप्रमाणेंच त्यांनाही कधीं कधीं प्रसूतिवैराग्य होण्याचा संभव असता, तर उभयतांच्या संयमानें बराच भार कमी होता. तथापि हा सांप्रतचा अन्याय फार दिवस चालेल असें दिसत नाहीं. जसजसा पुरुषांत विद्येचा अधिकाधिक प्रसार होत जाईल, तसतसा स्त्रियांतही त्याचा उपक्रम होऊन वाढत जाणार. तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांस आपलें खरें हित कशांत आहे आणि तें साधावें कसें हें समजूं लागणार, आणि तें समजूं लागलें कीं पुरुषांस हा आपला सांततिक जुलूम सोडून द्यावा लागणार ! विवाहाच्या कामीं स्त्रीपुरुषांची संमति जितकी अवश्य आहे तितकीच संमति विवाहाच्या अंमलांतही दृष्टीस पडूं लागली पाहिजे."

मातृपदाची महति मान्य असली तरी तें असंमत मातृपद असतांच कामा नये. तें जसें "पुरुष स्वामी, स्त्री दासी" या जुलूमशाहीनें लादलें जाऊं नये, त्याचप्रमाणें परिस्थितीचा विचार केल्याशिवाय स्वीकारलेंही जाऊं नये अशी आगरकरांची दृष्टि होती. ते सांगतात—

" मागेंपुढें न पाहतां आतांप्रमाणें प्रजा उत्पन्न करण्याचें काम असेंच जारी राहील, तर थोड्या वर्षांच्या आंत जगावर मोठा कठीण प्रसंग येऊन ठेपेल. आज जिकडे तिकडे पुष्कळ पड जमीन आहे म्हणून कोणास कांहीं वाटत नाहीं. पण एकदां पृथिवी माणसांनीं गजबजून गेल्यावर पुढें लोकांचा चरितार्थ कसा चालेल ? केव्हां तरी हा प्रश्न जगापुढें येणारच आहे; केव्हां तरी अन्नोत्पत्ति आणि प्रजोत्पत्ति यांचें समीकरण बसलेंच पाहिजे .....ज्यांच्या खाण्यापिण्याची सोय आपणांस चांगल्या रीतिनें करतां येत नाहीं; व ज्यांना दरिद्री व भुकेकंगाल आईबापांच्या पोटीं आल्यामुळें आयुष्य यातना–कुंडाप्रमाणें भासतें, अशा लोकांच्या विपत्तीबद्दल त्याचें उत्पादक जबाबदार आहेत. " करितां प्रसंगी कृत्रिम साधनानीं पण नित्य तें " उभयतांच्या संयमानें " संततिनियमन साधावें. विपुल वैभवाच्या वेळीं वैदिक आर्यांनीं शंभरशंभर पुत्रांची इच्छा केली आणि राष्ट्राच्या उत्पादन-शक्तिशीं मेळ बसण्याकरतां आगरकरांनीं संततिनियमन प्रतिपादिलें, तरी संख्येइतकाच सकसपणा प्रजेच्या अंगी लागतो, हे साम्य दोन्ही ठिकाणीं सारखेंच आहे.

आईपणा ही स्त्रियांची सर्वश्रेष्ठ जबाबदारी; त्या जबाबदारींतच राष्ट्राच्या प्रजेचा सकसपणा मुरलेला, आणि ते आईपण संमतीनें व संतोषानेंच पतकरलेलें हवें; इतक्या गोष्टी व्हावयाला वय आणि अक्कल यांची पुरी वाढ स्त्रीच्या ठिकाणीं झाली असली पाहिजे, हे ओघानेंच येतें. इतकेंच नव्हे तर पुरुषाबरोबरीनेंच स्त्रियांचा व्यावहारिक हक्कही प्रस्थापित होता. आगरकरांच्या काळीं समाजाच्या आचरणांत वरील प्रमेयांची बिलकूल जाणीव नव्हती. "अष्टवर्षा भवेत् कन्या" हा मंत्र जारीनें अमलांत आणला जात होता. लग्नाला मोठी वधू झाली तरी ती " अकराच्या आंतील " असे. मुलगेहि मोठे असत असें नाहीं. ज्यांच्या अवयवांची अजून पूर्णपणें वाढ झालेली नाहीं अशीं कोवळीं अर्भकें लग्नबंधनानें गुंतविलीं जात असत; इतकेंच नाहीं तर आईबाप होण्याची सक्तीच त्यांच्यावर जणूं काय करण्यांत येई.

नातवंडांचे तोंड बघण्याकरतां " काम " रूप होमकुंडांत उभयतां स्त्री-पुरुषांना प्रौढ समाज अकाली ढकलीत असे; तेवढीच काय ती स्त्री-पुरुषांची बरोबरी आगरकरांच्या काळीं होती. एरवी कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय जीवनाला ज्या विवाहानें सुरवात होते तो विवाह देखील अनुरूप, अनुगुण, अनुध्येय कुमार–कुमारींचा लावण्यांत येत नव्हता. तर जन्मपत्रिकेंतील ग्रहस्थितीच्या बलाबलावरच जोडपी तयार करण्याचा कारखाना उठत असे. स्वामी रामतीर्थांनीं म्हटल्याप्रमाणें " आपल्या अनुकूल स्थानबलाच्या जोरावर विवाहित होणारे कोमल अपरिपक्व जोडपें पाहून आकाशांतील कोणताही ग्रह आपल्या मंगल स्थानांत राहण्यास धजणार नाहीं. असा हा अमानुष प्रसंग पाहतांच तो चळचळा कापतो व स्थानच्युत होतो. आपल्या पायावर उभे राहतां येत नाहीं अशा भ्रष्ट लग्नाला धार्मिक स्वरूप देऊन तें पवित्र करण्याचें काम वैदिक मंत्र करीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर त्यामुळें तें कवडीमोल होतात."

पण अशी जाणीव आगरकरांच्या काळीं होती किती जणांला ? म्हणूनच तर बालविवाहावर सणसणीत शस्त्र आगरकरांना धरावें लागलें.

समाजांत एकंदरीनें स्त्रियांना जी वागणूक मिळत होती तीच आगरकरांना उद्वेगजनक वाटत होती.

' मराठमोळ्याची पुरवणी ' या लेखांत ते मोठ्या तळमळीनें लिहितात कीं, " पुरुषांनीं बायका ह्या केवळ प्रजोत्पादनाचीं हिंडतीं फिरतीं यंत्रें आहेत असें समजूं नये. बायकांना कां बुद्धि नाहीं, कां मन नाहीं, कां रुचि नाहीं, कां बरें वाईट समजण्याची अक्कल नाहीं ? पुरुषांपेक्षां त्यांच्यांत कमी तें काय आहे ?... बायकोला कोंडून ठेवून तिच्या पातिव्रत्याची बढाई मिरविणारा, पौरुषाभावामुळें ब्रह्मचर्याची ऐट मारणाऱ्यासारखा होय.... व्यवहारांत मोकळेपणीं वागत असतां ज्या मोहक गोष्टी वारंवार भेटतात, त्यांना चुकवून किंवा टाळून जी आपल्या नवऱ्याला चिकटून राहिली ती खरी साध्वी आणि अशीच्या साधुत्वाचा अभिमान असणें योग्य आहे. ज्याला आपल्या बायकोनें आंपल्याशीं इमानी रहावें असें वाटत असेल त्यानें तिच्या वर अंतःकरणापासून प्रीति करावी. " सदर उताऱ्यावरून समाजांत स्त्रियांना काय किंमतीनें आगरकरांच्या काळीं लेखीत असत हें सुस्पष्ट होईल. आगरकरांना बरीक काय हवें होतें तें पहा. ते म्हणतात, " स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा, पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी, पाहिजे त्या परीक्षा द्याव्या व पदव्या मिळवाव्या, आणि पाहिजे तेव्हां लग्न करून संसार करावा. "

हें तत्व एकदां स्वीकारलें म्हणजे असंमत असें समाजांत कांहीं चालतांच कामा नये हें उघड होतें; अर्थात कन्यादानापेक्षां स्वयंवर, पत्रिका जुळवणीपेक्षां वल्लभोपासना नि प्रियाराधन आणि दिखाऊ पति-पत्नी परायणतेपेक्षां घटस्फोट अगर विवाहाचें निराकरण हीं ओघानेंच येतात. पण या सर्व गोष्टी ज्याच्या त्यानें अगर जिच्या तिनें करण्यास वय आणि अक्कल यांची वाढ भरपूर प्रमाणांत लागते. आपल्या आर्य पूर्वजांना हें मान्य होतें असें दिसतें. " सोमः प्रथमो विविदे गंधर्वो विविद उत्तरः तृतीयोऽग्निष्टेपतिस्तुरी ये तु मनुष्यजः ॥ " [ ऋ. मं. १०-८५-३९।४० उ. ] या वैदिक मंत्राप्रमाणें रसराशितपणा किंवा सरसता गोड वाणी आणि भावनादर्शन, व शरीरकांति यांनीं युक्त झालेलीच स्त्री पतियोग्य अगर उपवर असते.

अपस्तंभस्मृति अध्याय १ श्लोक ६५ ( " रोमकाले तु संप्राप्ते सोमो भुंक्तेथ कन्यकाम् । रजो दृष्ट्वा तु गंधर्व कुचौ दृष्ट्वा तु पावकः ॥ " ) यानें शरीरदृष्ट्या कन्या उपवर केव्हां होते याची फोड केली आहे. सोमवेदीय गोभिल गृह्यसूत्रांत विवाहप्रकरणीं ( प्र. खं. ३, सूत्र ६ ) असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, विवाहाला ' अनाग्निका ' कन्या श्रेष्ठ होय. गृह्यसूत्रांत " ऋतुमत्यनग्निका " अशी व्याख्या दिली आहे. अशा उपवर कन्येचा विवाह जर वडिलांनीं केला नाहीं, तर तीन वर्षें वाट पाहून आपला आपण स्वयंवर तिनें करावा अशी मनुस्मृतीची देखील आज्ञा आहे. अशी मुलगी पत्नीपदावर आरूढ झाली म्हणजे तिनें गृह-सम्राज्ञीपद-गृह-लक्ष्मीपद

प्राप्त करून घ्यावयाचें असा आर्यांचा दंडक होता. "( गृहान् ) गच्छ गृहपत्नी यथासो वशिनात्वं विदथ मा वदासि। सम्राज्ञी श्वसुरे भव सम्राज्ञी श्वश्रूनां भव। ननांदरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधिदेवृषु ॥ –( ऋग्वेद मं. १०–८५–४६ )" थोडक्यांत, भारतांत म्हटल्याप्रमाणें "अर्धं भार्या मनुष्यस्य, भार्या श्रेष्ठतमः सखा।" एवढेंच नव्हे, तर मुक्तेश्वरांच्या वचनाप्रमाणें "तापत्रयनिवारणाचें छत्र। भार्येपरता नाहीं मित्र।" फार काय, "भार्या सकल श्रमाते हर्त्री। भार्या सकल सुखाते कर्त्री॥ भार्या पवित्र वंशधर्त्री। यशकीर्ती स्त्रीसंगे॥" अशी वस्तुस्थिति होऊन "गृहिणी गृहमुच्यते" याची सार्थकता होण्यासाठीं पुत्रीलाही "पुत्रवत् समा" राखून उपनयन वगैरे संस्कारांनीं तिला सुसंस्कृत करण्याची आर्यांची चाल होती.

शारीरिक, मानासिक, भाविक व बौद्धिक दृष्ट्या उद्यांचें राष्ट्र आणि आजची प्रजा सकस राखण्याची जबाबदारी स्वीकारण्यास आणि आजचें राष्ट्र तेजस्वी राखण्यास म्हणजेच मातृपदाची व पत्नीपदाची जाणीवेनें जबाबदारी पत्करण्यास स्त्रिया योग्य व्हाव्या म्हणून त्यांना सुसंस्कृत करण्याची आर्य दक्षता घेत ती पुरुषांच्या बरोबरीनें घेत. आगरकरांचीहि मनीषा थेट अशीच होती. एकदां ते केसरींत लिहितात कीं, "आमची अशी पूर्ण खात्री आहे कीं, स्त्री आणि पुरुष या उभय जातींत ज्ञानाचा जों जों अधिक प्रसार होत जाईल तों तों मनुष्यजातीची हरएक प्रकारें सुधारणा होईल व ज्यावेळेस या भरतखंडांत गार्गी, वाचक्नवी, वडवा, प्रातिथेयी व सुलभा, मैत्रेयी याप्रमाणें साऱ्या स्त्रिया अत्यंत ज्ञानवती होतील, त्यावेळीं हें भरतखंड स्वातंत्र्यादि ऐहिक सुखांचा पूर्ण अनुभव घेईल. इतकेंच नाहीं तर त्या स्थितींत कोणतीही इच्छा परिपूर्ण न होण्याचा संभव न राहिल्यामुळें या पृथ्वीवर स्वर्गास्थिती अवतरल्यासारखी होईल, किंवा पृथ्वीच स्वर्गतुल्य होईल!" ( हिंदुस्थान देश ठार बुडाला, हो ठार, बुडाला!." )

आतां स्त्रियांना कोणतें शिक्षण द्यावें हा महत्वाचा प्रश्न आहे. वर अनेकवार दाखविल्याप्रमाणें माणुसकीचे हक्क आगरकरांच्या काळीं तरी व्यवहारतः स्त्रीसमाजाला नव्हतेच, मग शिक्षणाच्या बाबतींत देखील "पुत्रवत् समा" असा प्रघात कोठून असावयाला ? आगरकर लिहितात "लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारनें जितकी सक्ति केली पाहिजे, तितकीच किंबहुना त्याहूनही अधिक मुलींच्या शिक्षणाबद्दल केली पाहिजे; अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते; आणि म्हणून स्त्रीस अक्षरशत्रु राहूं देणें हें अत्यंत अहितकर आहे, असें आम्हांस वाटतें. लहापणीं मुलीचें लग्न केलें म्हणून काय होतें ? स्त्रियांना अक्षरशत्रु ठेवलें म्हणून काय होतें ? अशा रीतीचा निरर्गल प्रलाप करणाऱ्या विचारशून्य, मतलबी किंवा मत्सरी लोकांचीं तोंडें एकदम बंद करतां येत नाहींत, याचें कारण असें आहे कीं, राजकीय, धार्मिक व सामाजिक गोष्टींत पदार्थविज्ञानशास्त्रप्रयोगासारखें तत्काल खात्री करून देणारे प्रयोग करतां येत नाहींत. युरोपांत व अमेरीकेंत प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें तरी आतां फारसा मतभेद राहिलेला दिसत नाहीं. मुलींस व मुलांस चवदाव्या वर्षा–

पर्यंत कोणाकडून तरी अमुक ज्ञान प्राप्त झालें आहे, हें पाहण्याची जबाबदारी सरकारनें किंवा संस्थानानें आपल्या शिरावर घेतली पाहिजे." सक्तीच्या शिक्षणाचें स्वरूप काय असावें याविषयींही आगरकरांची कल्पना अगदीं निर्मळ होती. ते म्हणतात, "लहानापासून थोरास व गरीबांपासून श्रीमंतांस नित्याच्या व्यवहाराला घडोघडीं उपयोगी पडणारें असें जें बुद्धिविकासक अत्यंत स्वल्प प्राथमिक शिक्षण त्याचाच सक्तीच्या शिक्षणांत अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या धर्म–मतांशीं या शिक्षणाचा बिलकुल संबंध नाहीं. तसेंच या शिक्षणापासून चरितार्थ चालविण्यास उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही धंद्याचें ज्ञान होत नाहीं. तसेंच अशा प्रकारच्या शिक्षणाविषयीं सक्ति करणें म्हणजे अमुक प्रकारच्या शाळांत, अमुक फी देऊन, अमुक वर्षें मुलें पाठविणें असाच केवळ अर्थ नाहीं, तर अमुक एक शिक्षण अमुक एक वयाच्या आंत प्रत्येक मुलीस व मुलास मिळण्याची खबरदारी घेतलीच पाहिजे; न घेतल्यास ते अमुक दंडास पात्र होतील असा अर्थ आहे. प्रजेचें हित चिंतणाऱ्या प्रत्येक सरकारनें असा नियम करून तो अमलांत आणावा, व त्याकरितां लागेल तेवढा खर्च आनंदानें करावा असें आमचें मत आहे."

इंग्रजींत ज्याला Three Rs म्हणतात किंवा ज्याला मराठींत लि–वा–हि (लिहिणें, वाचणें, हिशेब ठेवणें) शिक्षण म्हणतां येईल, असें शुद्ध व्यवहारोपयोगी शिक्षणसुद्धां बहुतेक त्या मुलांमुलींना शाळेंतूनच सुगमपणें मिळणारें असल्यानें सरकारनें त्याकरितां लागेल तेवढा खर्च आनंदानें करावा असें आगरकरांनीं सांगितलें आहे. तरी पण तें शिक्षकांपेक्षां शिक्षकिणीकडून द्यावें असा ध्वनिही कोठें आगरकरांनीं काढल्याचें आढळत नाहीं. गृहशिक्षण, संगत, अक्कल, अभ्यासक्रम आणि आंदोलनें हे मनुष्याच्या ज्ञानाचे पंचरस आहेत. यांपैकीं शालेय ऊर्फ अभ्यासक्रमात्मक शिक्षणाचाच फक्त आगरकरांनीं विचार केलेला निदान जाहीर रीत्या तरी आढळतो. शालेय शिक्षणाच्या स्थूल चर्चेंत त्यांनीं आत्मीयत्वानें भाग घेतला असला तरी सूक्ष्म चर्चेंत तें कधींच शिरलेलें दिसत नाहींत. प्राथमिकच काय, पण मध्यम आणि वरिष्ठ शिक्षणहि स्त्रीपुरुषांना एकच आणि एकत्र दिलें पाहिजे, असें तें म्हणतात, तें स्त्रीसमाजाचा पुरुषाबरोबरीनें हक्क प्रस्थापित करण्याच्या बुद्धिनेंच होय. "स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें आणि तेंहि एकत्र द्यावें" या आपल्या हृदयस्पर्शी निबंधांत आगरकर ठासून सांगतात कीं;—

"पुरुषांच्या मेंदुपेक्षां स्त्रियांचा मेंदु सरासरीनें कमी वजनाचा आहे, आणि स्त्रीपुरुषांमधील कामाची वांटणी त्यांच्या मेंदूच्या वजनावर अवलंबून असावी हें योग्य आहे असें जरी मानलें, तरी साऱ्या पुरुषांचें मेंदु साऱ्या स्त्रियांचे मेंदूपेक्षां अधिक जड आहेत, असें प्रतिपादण्याचें धाष्टर्य अत्यंत अधिकारलोलुप पुरुषास देखील करतां येणार नाहीं. अनेक स्त्रियांचें मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यांत संशय नाहीं. तेव्हां मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनीं अमुक कामें करावीं, असा निर्बंध करणें शुद्ध अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जें काम साधेल त्यानें तें करावें अशी

प्रत्येकास मोकळीक देण्यांत तें करणाराचा किंवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे. सध्यां पुष्कळ स्त्रियांच्या बुद्धिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामाला जे पुरुष बुद्धिसामर्थ्यानें योग्य नाहींत त्यांच्याकडून तीं कामें होत असल्या-मुळें व स्त्रियांस तीं करण्याची परवानगी नसल्यामुळें एकंदरींत तीं कामें व्हावीं तशीं होत नाहींत, व तसें झाल्यामुळें मनुष्यजातीच्या सुखाला चट्टा बसत आहे. हरएक शास्त्रांत, कलेंत व धंद्यांत स्त्रीपुरुषाची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरुप व्यवस्था लागली पाहिजे."

"सर्वास संधि-कुणा न बंदी" या तत्त्वावर समाजाची घडी बसून व्यक्तित्वाचा संपूर्णाविष्कार होण्यास कसलेही कृत्रिम बंधन-आणि तेही अेका जातीनें अगर व्यक्तीनें दुसरीला कमी लेखण्याच्या हीन मनोवृत्तीचें तर-बिलकुल उपयोगी नाहीं. व्यक्तित्वाचा आविष्कार व्हावयास, "ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरूप व्यवस्था लागण्यास आणि सर्व कामें 'व्हावी तशी' होण्यास 'मनुष्यजातीच्या सुखाला चट्टा बसू नये म्हणून, तात्पर्य, व्यक्तित्वाच्या सर्व गरजा भागाव्या आणि त्यांचा सर्वोत्कृष्ट फायदा राष्ट्राला, किंबहुना सर्व मनुष्यजातीला मिळावा अेवढ्यासाठीं कसलींही बंधनें उच्चनीचत्वाच्या भावावर कृत्रिमपणें लादू नयेत' असा आगरकरांचा सिद्धांत आहे. अर्थात् ज्या ज्या क्षेत्रांत जितक्या मोकळेपणानें पुरुष वावरतो त्या त्या क्षेत्रांत तित-क्याच मोकळेपणानें वावरण्याची संधि स्त्रीला असल्याशिवाय भागणार नाहीं, हेंहि ओघानेंच आलें. स्त्रीपुरुषांचा संमिश्र समाज हाच वरील गोष्टींचा अचूक पाया आहे. कुटुंबांतलि बहिणभावंडें ज्या निर्व्याजतेनें अेकत्र नांदतात त्या निर्व्याजतेनेंच समाजांतील स्त्रीपुरुषांना अेकत्र व्यवहार करतांना संकोच वाटता कामा नये. "चैत्रमासीं हळदी-कुंकवास जाणाऱ्या येणाऱ्या बायका, स्टेशनावर गाड्यांतून जाणाऱ्या बायका किंवा शाळेंत येणाऱ्या मोठ्या मुली, याकडे सभ्य म्हणविणारे लोक वाकड्या नजरेनें व निर्लज्ज लोक बेलाशक टक लावून पाहतात याचें कारण एवढेंच आहे कीं या खंडांतील इतर लोकाप्रमाणें आम्हा हिंदु लोकांस वडोघडी स्त्रीयांचा समागम घडत नाहीं." सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून स्त्रीपुरुषांनीं संमिश्र व्हावयाचे तर ते शिक्षणक्षेत्रांत ओघानेंच आले, आणि म्हणूनच प्राथमिकापासून उच्चतमापर्यंत सर्व शिक्षण स्त्रीपुरुषांना एकार आणि एकच दिले पाहिजे असा आग्रह आगरकरांनीं सहजच धरला.

तथापि हा स्थूल औपपात्तिक सिद्धांत झाला. तो कोणाहि विचारवंतास अमान्य नाहीं. आर्यांनीं तो आपल्या आचरणांनीं आपणास मान्य असल्याचें जगांस पटवून दिलें आहे; हा वैदिक मंत्रदृष्ट्या ऋषिकांच्या सरभा, यमी, शाश्वती, श्री, वाक्, श्रध्दा, मेधा, सूर्या, ब्रह्मजया, विश्वनरा इत्यादि नांवावरून प्रत्ययास येईल. पुढें समाजाच्या कालमानानुरूप प्रगतीसाठीं व धारणेसाठीं आर्यांनीं उच्च बौद्धिक शिक्षणाच्या जागी नृत्य, औचित्य, चित्र इत्यादि १५० कलांची संस्थापना केली. अर्थात अनुकूल-तेप्रमाणें एकाद्या स्त्रीनें बौद्धिक शिक्षण आणि संचार केला तरी त्याला कोणाची हर-कत असण्याचे कांहीं कारण नव्हतें व नाहीं.

कालौघाप्रमाणें जगाच्या चढाओढींत राष्ट्राला तग धरतां यावयास पाहिजे, राष्ट्र तेजस्वीपणानें जगले पाहिजे, एवढ्या एकाच दूरदृष्टीनें कालखंडागणिक शिक्षणक्रम आखण्यांत यावयास हवा. श्रीमती शीलवतीबाई केतकर म्हणतात त्याप्रमाणें हा शिक्षणक्रम गृहशिक्षणाची पुस्ती होऊन तो विनय म्हणजे ज्याचें त्याचें अगर जिचें तिचें व्यक्तिवैशिष्ट्य प्रगट करणारा हवा. व्यक्तिवैशिष्ट्य हा कार्यक्षम नागरिकत्वाचा पाया असून राष्ट्रीयता ही त्याची पार्श्वभूमी आहे. निसर्गानेंच ज्यांची योग्यता बौद्धिक करामतीवर वैशिष्ट्यपूर्ण व कार्यक्षम नागरिकत्व साधण्यासाठीं केली असेल, त्या स्त्रीला किंवा पुरुषाला बौधिक शिक्षणाची शेवटची उडी तूं घेऊ नकोस असें म्हणण्याचा कोणास काय अधिकार? तो तिचा किंवा त्याचा जीवनहेतु–ध्येयच समजलें पाहिजे. पण निर्हेतुक, ध्येयविरहित आणि प्रकृतिनिषिद्ध शिक्षणक्रम बौद्धिक चमचमाटाचा असला तरी कोणावरही लादून काय किफायत? फार काय, नागरिकत्वाचा लघुतम आरंभ जो "लि–वा–हि" शिक्षणक्रम तो सक्तीचा करावयाचा झाला तरी त्यास देखील, बालमनोवृत्तीचा विचार करता, पुरुषशिक्षकापेक्षां स्त्रीशिक्षकांची योजना सर्रास करावी म्हणजे स्त्रीसहज वत्सलतेनें प्रत्येक मुलाच्या वा मुलीच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा बरोबर कयास लागत जाईल. हा कयास लागेल तशा माध्यामिक अगर उच्च शिक्षणासाठीं बौद्धिक चढाओढीनें भाग येण्यासारख्या ज्या मुली असतील, त्यांना मुलांच्या शाळेत पाठविण्यास हरकत नाहीं. पण इतर अनुकूलता जमेस धरून, बौद्धिक वैशिष्ट्याची करामत करून दाखवण्याची सवड असणाऱ्या वंदनीय स्त्रिया सोडून बाकीच्यासाठीं स्वतंत्र शाळा नकोत का?

प्रजेच्या द्वारां राष्ट्राच्या जिवंतपणाची साखळी फिरत राहते; आणि राष्ट्राच्या उत्पत्तिक्षमतेशीं मेळ असणारी 'संख्या' हें एक राष्ट्रीय सामर्थ्य आहे. ज्यापेक्षां मातृपदाखेरीज त्याची सिद्धता नाहीं, तें मातृपद निसर्गानें सत्रीच्याच स्वाधीन केले आहे आणखी त्याची जबाबदारीही तीच पार पाडू शकते, त्यापेक्षां ती जबाबदारी पार पाडण्याची कुवत, देशकालपरिस्थितीचा बिनचूक भेद करून व वेध घेऊन, बहुतशा स्त्रियांच्या अंगी विकास पावेल अशी तरतूद शिक्षणक्रमांत नको काय? एका मुलाला शिकवणें म्हणजे (तो शिक्षकाचा धंदा करणार नसेल तर) एका व्यक्तीला शिकवणें. पण एका मुलीला शिकवणें म्हणजे तिच्या नांवानें भूषणास चढणाऱ्या एका वंशांतर्गत पिढीला शिकविणें होय. शिक्षणतज्ज्ञांचें हें मत स्त्रीच्या मातृपदाची योग्यता लक्षांत घेऊनच झाले आहे. अर्थात् असामान्य बुद्धिमत्तेच्या जोरावर, लैंगिक आकर्षणसहवासस्वादुत्वप्रेमजन्य परावलंबित्व इत्यादि मनुष्यस्वभावावर कडी करून ज्या वंदनीय स्त्रियांना संसाराचा मोह आवरता घ्यावयाचा असेल, तेवढ्याखेरीज करून बाकीच्या बहुसंख्य स्त्री वर्गाच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा राष्ट्रीय किंबहुना मानव्याच्या दृष्टीनें शिरच्छेद होऊं नये. म्हणून त्यांच्यासाठीं स्वतंत्र शिक्षणक्रम आखावयास नको काय? मेंदूच्या जडपणामुळें वा हलकेपणामुळें नव्हे, अगर उत्स्फूर्त आकांक्षा खच्ची करण्याच्या घमेंडखोरीनें नव्हे, तर स्त्रियांचें "सहज

कर्म" सफाईनें व्हावें, म्हणून, शिक्षणक्रमानें ती दिशा उजळण्याचा प्रयत्न करावयास नको काय ? देशकालवर्तमाप्रमाणें राष्ट्राचें सातत्य सकस संततीच्यारूपानें टिकविण्यासाठीं जबाबदारी स्वीकारणाऱ्या स्त्रियांना संगोपन—संवर्धन--शास्त्राची वा फारच जुन्या भाषेंत बोलावयाचें तर- "चूल व मूल" यांची अगर अगदीं अलीकडील भाषेंत "मानस-वैद्यकीय-अर्थ" शास्त्रांची माहिती असणें जरूर आहे.

मुलीची वाढ १३ ते १७ वर्षांपर्यंत होत असते असें स्टॅन्ले हॉल आपल्या ॲडोलिसेन्स या ग्रंथांत व पी. एस. किंग आपल्या "शाळांतील मुलांचें आरोग्य व शरीर" या ग्रंथांत म्हणतात. स्त्रीजीवनांतील हाच काल "राष्ट्रीयदृष्ट्या संसार करण्याच्या पूर्व तयारीचा" असतो. याचवेळीं स्त्रीचें स्त्रीत्व नष्ट होऊन तिचें पुरुषीकरण न होईल याची सामान्यतः काळजी शिक्षणक्रमाच्या दृष्टीनें घेतली पाहिजे. कै. गो. मा. चिपळूणकर यानीं ही गोष्ट ठसविणारा स्वतंत्र ग्रंथच लिहिला आहे. लुसीबे, इला विल् कॉक्स, हॅरिएटपुडेचर, क्लोरा ॲनिस्टील वगैरे विदुषींचाही वरील प्रमाणेंच कटाक्ष आहे. आगरकरांचे लेखनस्फूर्त शिष्य अण्णासाहेब कर्वे यानीं स्त्रीयांच्यासाठीं स्वतंत्र विद्यापीठ उभारलें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. याच्या भरीला एक गोष्ट दक्षतेनें मनांत वागविली पाहिजे ती ही कीं निसर्गानें प्रत्यक्षतः मातृपद पुरुषाला स्वीकारता येत नाहीं, ही गोष्ट सोडून द्या; पण जे मुलगे इतर तऱ्हानीं संगोपनसंवर्धनशास्त्राचें आचरण करण्यास लायक आहेत ( वैशिष्ट्यविशदकिरण हे आतां मानसशास्त्राच्यादृष्टीनें प्राथमिक शिक्षणाचेंही अंग होऊं घातलें आहे ) त्यांना या मुलींच्या शाळेंत जरूरीनें समाविष्ट करून घेतलें पाहिजे.

स्त्रीपुरुषांची योग्यता जर सारखी, तर स्त्रीशिक्षणाचा सवता सुभा काय म्हणून निर्माण करावयाचा ? विशिष्टीकरण म्हणून. स्त्रीपुरुषांची योग्यता सारखी याचा अर्थ त्या सर्वांना छापांतील गणपति करणें नव्हे. तशानें वैयक्तिकच काय, पण राष्ट्रीय जीवनालासुद्धां कांहीं उपयोग नाहीं. आपआपलें जीवन आपल्या मगदुराप्रमाणें व जगांत तेजस्वीतेनें काढीत असतांना, त्या कर्तव्यतत्पर जीवनाची योग्यता, तें जीवन स्त्रीचें म्हणून अगर पुरुषाचें म्हणून कमीजास्त योग्यतेचें नाहीं, कीं कोणत्याही क्षेत्रांत बुद्धिसामर्थ्याप्रमाणें पराक्रम करायला स्त्रीला स्त्री म्हणून बंदी आणि पुरुषाला पुरुष म्हणून मोकळीक बिलकुल नाहीं, एवढाच स्त्रीपुरुषांच्या समानयोग्यतेचा अभिप्रेत अर्थ आणि म्हणूनच पत्नीपदाची व मातृपदाची जबाबदारी स्वीकारून संगोपनसंवर्धन शास्त्रांच्या साहाय्यानें सामान्यतः जी स्त्री राष्ट्रीय सातत्याची काळजी वाहते, ती, जगांतील धकाधकीच्या मामल्यांत टिकाव धरून राहणाऱ्या पुरुषाच्या कर्तबगारीपेक्षां रतिमात्र कमी प्रतीची नाहीं. राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्यप्राण्यास स्वताच्या चरितार्थासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी येतां कामा नये या दृष्टीनें देखील राष्ट्राच्या सातत्यासाठीं शांतपणें घरीं झटणारी स्त्री पुरुषांपेक्षां कमी योग्यतेची ठरत नाहीं. उभ्या संसारांत उत्पादक उद्योगाबरोबरच संग्रहात्मक, संरक्षणात्मक आणि विध्वंसनप्रातिबंधक उद्योगांची आवश्यकता असते. अर्थकारणाच्या बाजारांत या सर्व

प्रकारच्या उद्योगाची मोड घालवायाची तर पत्नीपदाची व मातृपदाची जबाबदारी पतकरून देशकालवर्तमानाप्रमाणें आपलीं कर्तव्यें पार पाडणाऱ्या स्त्रीला कोणत्या तोंडानें कमी लेखतां येईल ?

घाम गाळून पैसे पैदा करणाऱ्या पुरुषानें राष्ट्रीय सातत्याचें संरक्षण करणाऱ्या स्त्रीला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयंपूर्ण राखलें पाहिजे. आर्थिक स्वावलंबन स्वतां साधण्यासाठीं उत्पादक उद्योग स्वतंत्र करणाऱ्या अगर तो करून संग्रहात्मक, संरक्षणात्मक व विध्वंसनप्रातिबंधक असा राष्ट्रीय सातत्याचा उद्योग करण्याचा ज्यांना आवर असेल, त्यांच्याबद्दलचा प्रश्नच नाहीं. पण अशा स्त्रिया अपवादात्मकच असल्या कारणानें " गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते " व " न मातुः परदैवतम् " हें लक्षांत वागवून त्याचप्रमाणें Those also serve, who stand and wait हें मिल्टनचें वचन नैतिक तसेंच आर्थिक दृष्ट्याही सत्य आहे. या गोष्टीचा विसर न करून स्त्रीला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र ठेवणें हें कुटुम्बांतील कर्त्या पुरुषाचें कर्तव्यकर्म आहे.

आगरकरांच्या काळीं बाहुलाबाहुलीसारखी लग्नें होत असल्याकारणानें स्त्रीस चरितार्थसाधनाचें शिक्षण मिळालेंच पाहिजे, असा आगरकरांनीं आग्रह धरला असावा. हातच्या राखून ठेवलेल्या सैन्याचा दबदबा जसा असतो, त्याचप्रमाणें उत्पादक उद्योगाची विद्या जवळ असण्याचा असतो. आपल्या कुवतीप्रमाणें उत्कृष्ट साधेल तो उद्योगधंदा स्वतंत्रपणें करावयाचा नसला तरी, तो वेळप्रसंगीं करावयाची वेळ आल्यास हातीं असावा म्हणून त्याचें शिक्षण प्रत्येक स्त्रीला मिळालेलें असणें जरूर आहे. वैधव्यासारख्या ( अगर क्वचित्प्रसंगीं घटस्फोटासारख्या ) विपत्तीच्या वेळीं तर आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीनें अशा चरितार्थसाधनाची जरूरी फारच असते. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्या तर समाजांत विधवेला पोतेरें होऊन राहण्याची पाळीच येतीना ! ! गंगा--भागीरथीसारखें पावित्र्यदर्शक विशेषण विधवांना लावण्याची प्रथा समाजांत असतांना, " राजमान्य राजश्री " या पुरुषांच्या विशेषणाप्रमाणेंच तें व्यवहारांत इतकें पोकळ व अर्थशून्य होऊन बसलें कीं, विधवांचें साधें दर्शनही अशुभ होऊन बसलें होतें. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं आपल्या " लोकभ्रम निबंधांत यासंबंधीं केवढा संताप व्यक्त केला आहे, तें सुप्रसिद्धच आहे. " मनुष्यजातींत एकानें दुसऱ्यास विनाकारण भ्रष्ट, अपशकुनी, अमंगल असें मानावें हें अत्यंत लज्जास्पद होय " हे शास्त्रीबुवांचे उद्गार मोठे अर्थपूर्ण आहेत. आगरकर तर स्पष्टच लिहितात कीं " जे लोक नीतीच्या, धर्माच्या, सोयीच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही मिषानें पतिमरणोत्तर स्त्रियांवर जुलूम करतात त्यांनीं स्त्रीप्रेमाच्या केवढ्याही वल्गना केल्या, तरी ते लोक स्त्रियांविषयीं अत्यंत निष्ठुर व मत्सरी आहेत, असें मानलें पाहिजे. " विधवा स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नाहीं, तारुण्यसुलभ अशा आकांक्षांची तृप्ति करण्यासाठीं संसार करण्याची त्यांना परवानगी नाहीं; उलट वपनासारखे अगर अपशकुनासारखे जुलूम त्यांच्यावर समाजानें चालविलेले, अशी एकंदरीत करुणास्पद अवस्था विधवा स्त्रियांची आगरकरकालीं होती. ( माधवदास

रघुनाथदास व बाई धनकुवरबाई यांचें गो. ग. आगरकर व सी. ग. देवधर यांनीं लिहिलेलें पुनर्विवाह चरित्र पहा.) तिनें अंतःकरणाला घरें पडूनच प्रचलित हिंदुधर्माला कालानुरुप वर्तन करण्यास वारंवार त्यांनीं बजाविलें आहे. फार काय, "आठदहा वर्षांच्या पोरीस साठ सत्तर वर्षांच्या थेरड्याच्या कबजांत देणाऱ्या, किंवा जिला बारावें वर्ष देखील लागलें नाहीं अशा मुलींच्या विपत्तीचा विचार न करतां, तिच्याशीं संभोग करण्याचा हक्क नवऱ्याला आहे असें प्रतिपादणाऱ्या, अथवा नवऱ्याच्या प्रेता-बरोबर बायकोचे केस जाळले तरच त्याला सद्गति मिळते अशी बडबड करणाऱ्या अमानुष लोकांची " हजेरी घेण्याची एकहि संधी आगरकरांनीं दवडली नाहीं. त्यांनीं स्पष्ट बजावूनही ठेवलें आहे कीं "निर्दय मात्सर्यामुळें वन्यपशूहूनही आह्मी अधिक क्रूर झालों आहों, आणि जोंपर्यंत हा क्रौर्यकलंक नाहींसा करण्याचा प्रयत्न आम्ही करणार नाहीं तोंपर्यंत इतर सुधारलेलीं राष्ट्रें आमची फजिती उडविण्यास आणि आमच्या तोंडांवर थुंकण्यास कधींहीं मागेंपुढें पाहणार नाहींत."

तात्पर्य, माणुसकीच्या मर्यादा राखून न्याय, नीति, समता व स्वातंत्र्य या चतुःसूत्रीवर पुरुषाप्रमाणेंच स्त्रीजीवनही आधारून इस्लामच्या धर्मसंस्थापकानें म्हटल्या-प्रमाणें [ Under the feet of mother lies the paradise ] मायजातीच्या पायाशीं स्वर्ग लोळण घेत असतो, हें व्यवहारांत उतरणें अत्यावश्यक आहे एवढेंच कशाला? समाजाची ध्येयसिद्धी स्त्री–घटकांवर अवलंबून असते. [ The goal of the society depends upon the unit of the woman ] कारण ग्रंथसंग्रहालय, शेतकरी, शिक्षण आणि स्त्रीजीवन हीं जागतिकदृष्ट्या राष्ट्राचा जिवंतपणा पडताळून पाहण्याचीं बिनचूक साधनें होत.

प्रकरण १२ वें

# कर्तव्यदक्ष आगरकर

"Life is a mission, duty therfore its highest law"

—Mazzini.

स्वतःच्या बाजूला न्याय आहे याची पक्की जाणीव असली म्हणजे माणूस अजिंक्य होऊन बसतें. आगरकरांच्या उत्तर आयुष्यांतील लोकछळाचा आणि त्याबद्दल त्यांनीं दाखविलेल्या बेपर्वाईचा विचार करतां, आपल्या मतांचा न्यायपणा आगरकरांच्या अंगीं पुरेपुरा मुरला होता, असें म्हणणें प्राप्त होतें. हीं अवस्था यावयास, पूर्ववयांत आगरकरांनीं निरीक्षणपूर्वक जो सामाजिक जीवनाशीं एकमेळ अगदीं तळापर्यंत घातला, तोच कारण होय. या दृष्टीनें आगरकरांचें वडिलार्जित दारिद्र्य व विद्यार्थिदशेंतील कुत्र्यानिपट हालअपेष्टा उपकारकच ठरल्या म्हणावयाच्या!

**दे टोले परमेश तदा तो क्रुद्ध नसे नेहमीं।**
**प्रियतम अपुले मूर्त शुद्धि ही घेई निखालस हमी॥**

या कविवचनाचा केव्हां केव्हां प्रत्यय येतो तो असा.

तथापि आगरकरांच्या उत्तर आयुष्यांतील छळ हा त्यांच्या लेखनांतील उतावळेपणाचा परिणाम होता. "न जाणों उद्यांचा सूर्य कोणी पाहिलाय ? तेव्हां शहाणपणा शिकावयाचें उद्यांपर्यंत ढकलूं नकोच." हा शिकणाराला उपदेश जितका उतावळेपणाचा, तितकाच लेखनांतील उतावळेपणासाठीं आगरकरांना दोष देणें उतावळेपणाचें. "जें जें कांहीं आपणांसी ठावें। तें तें लोकांसी शिकवावें। शहाणे करोनि सोडावें। सकळ जन॥" म्हणून आगरकरांनीं आपल्या आयुष्याचें कंकण बांधलें, तेव्हां आपल्याजवळ आहे, नाहीं तें सर्व केव्हां एकदां लोकांस सांगून टाकतों, असें लोकशिक्षक आगरकरांस झालें असलें, तर तें काय दोषास्पद होय ? मधेंच तोंड घालणाराला रक्तबंबाळ नाक पुंसत पुंसत परतावें लागतें; त्याप्रमाणें लोकांच्या बोलीनें न बोलल्याकारणानें, आगरकरांना हालअपेष्टा काढाव्या लागल्या; तरी "मला लोकांना सांगावयाचें होतें, तें सांगितलें आहे" असें समाधान आयुष्याच्या शेवटीं तरी लाभलें. तें एरवीं कसें शक्य होतें!

शिक्षकाची उत्कट कळकळ आगरकरांच्या प्रत्येक लेखांत असल्याकाणानें, त्यांच्या उतावळेपणाविषयीं कुणाला कितीहि नाकें मुरडाविशीं वाटलीं, तरी त्या उलट कळकळीमुळेंच त्यांचें लिखाण उत्कृष्ट उतरलें, आणि त्यांच्या कोणत्याही सर्वोत्तम लेखापेक्षां स्वतः आगरकर श्रेष्ठ होते, या गोष्टी विचारवंताच्या ध्यानीं येतील. ॲनाटूल फ्रान्सनें म्हटल्याप्रमाणें—

When one accepts a doctrine, one must accept it in its remotest consequences. When one belongs to a party, one must be in the forefront where the fighting is thickest, at the point which is nearest to the future and which the main body invariably reaches at long last. One must needs be an "extremist" in one direction or another. One must be either for the "right" or for the "Left," for Reaction or for Revolution'.

आगरकरांचा असा खाक्या होता, आणि म्हणूनच त्यांच्याविषयींचा आदर दुणावतो.

देशहितेच्छु अंतःकरणाच्या उत्कट कळकळीनें आगरकरांच्या हातून जो उतावळेपणा झाला, तो अशा तऱ्हेनें कर्तव्यदक्ष बुद्धीचा परिपाक होता, आणि या कर्तव्यदक्षतेच्या सूत्रानेंच आगरकरांच्या आयुष्याचा ग्रंथ लागतो, नाहीं तर नाहीं.

जसा काव्यदृष्टीचा तसाच कर्तव्यदक्षतेचाही गुण आगरकरांस त्यांच्या आजोळाकडून मिळाला होता. थोरले मामा भाऊसाहेब भागवत यांनीं आपला अवाढव्य प्रपंच सावरून वहिणींचा परामर्श घेतला होता, हें गोपाळरावांच्या नजरेपुढें होतें. लक्ष्मीनारायणाच्या मंडपाचे दुरुस्तीसाठीं आपल्या आईनें हातांतील पाटल्या काढून दिलेल्या त्यांना माहीत होत्या; आणि या कर्तव्यदक्षतेच्या अंकुराला पदवीधर होण्याच्या महत्त्वाकांक्षेच्या मार्गावरील हालअपेष्टांतील अनुभवाचें खतपाणी मिळतांच तिला सामाजिक कल्याणबुद्धीचा कोंब फुटला. आगरकर घराण्यांतील स्वाभिमानाच्या चैतन्यानें तो रसरसून निघतांच आगरकर हे ' आगरकर ' होऊं शकले.

स्वतांच्या विद्यार्थिदशेवरून स्वाभिमानी पण गरीब विद्यार्थ्यांचें चित्र स्पष्ट दिसल्यामुळेंच स्वतंत्र शाळा काढण्याचा व चालविण्याचा गोपाळरावांचा विचार सामाजिक घटक या नात्यानें, कदाचित् तत्कालिन मिशनऱ्यांचें उदाहरण अवलोकूनही, झाला असेल; पण विद्यार्थांदशेंत रा. ब. महाजनींना उत्तर दिल्याप्रमाणें एम्. ए. झाले, तेव्हांच ते न्यूस्कूलची जोपासना करावयास आले; त्याच्याही अगोदर लोकशिक्षणार्थ " पोटापुरत्या पैशावर," आयुष्य वेंचण्याचें ठरल्यावर तो निर्धार त्यांनीं ताबडतोब आपल्या आईस कळविला, आमरण पाळला व " त्याकरतां धन, मान व कीर्ति यांवर लाथ हाणली; " शाळेंतील शिक्षकाचें काम सांभाळून केसरी–मराठ्यांचे आणि विशेषतः सुधारकाचे रकाने रामशास्त्रीप्रभुण्यांच्या निर्भीडपणानें भरले; त्या रकान्यांतून प्रतिपादन केलेली स्वतांला देशहिताची म्हणून वाटणारीं मतें आगरकरांना लहानपणापासून कटिखांद्यावर खेळविणाऱ्या व संगोपन करणाऱ्या वडीलधाऱ्यांना आवडलीं नाहींत; म्हणून त्यांचा रोष जाणून बुजून पतकरला; आपण आधीं मेलों तर पत्नीच्या चरितार्थासाठीं काय ठेवणार ? या विचारानें गोपाळरावांनीं यशोदाबाईस " दोन अक्षरें " शिकविलीं; " माझ्या प्रेतदहनार्थ " म्हणून कांहीं पैसे आगरकरांनीं आपल्या पेटींत ठेवले होते. ही आणखी अशींच दुसरीं उदाहरणें आगरकरांच्या रोमरोमीं मुरलेल्या कर्तव्यदक्षतेची निखालस साक्ष होत.

तथापि कर्तव्यदक्ष आगरकरांची छबी वरीक कोठेंच पहावयास मिळत नाहीं. उंच शरीरयष्टी, मध्यमपणें भरदार छाती, केशरकाडी दाढीचा व विशाल मिशांचा लांबट चेहरा, किंचित् खोलगट अशा बारीक डोळ्यांच्या मधील नकटें नाक, एकबोटी साधारण अष्टमीच्या चंद्रासारखें मधोमध तिरपे गंध असलेले रुंद कपाळ, डोक्यावर बहुशः काळी पगडी, अंगांत बनातीचा हरदासी पद्धतीचा अंगरखा, त्यावरून उजव्या खाकेंतून आणि डाव्या खांद्यावरून घेतलेलें रानडेपद्धतीचें उपरणें—असा थाट ज्यांत दाखविला आहे, असे एक दोन "आगरकरांचे फोटो" पहावयास मिळतात; नाहीं असें नाहीं. पण जात्याच दांडगा हिय्या, स्वभावतःच प्रखर ओज, तडफेचा नैसर्गिक कुर्रा, दांडगी प्रकृति, चपल आणि ग्राहक बुद्धि, मध्यम स्मृति पण धळाक्याचें मनन, काव्य नाटक-इतिहास या विषयांतील रसिकता, वादविवादाच्या वेळचा मानसिक समतोलपणा, वचनांतील आत्मप्रत्यय, किंचित् खोडसाळ अशा स्पष्टवक्तेपणांतही साधी राहणी आणि निगर्वी वृत्ति, टीका सोसण्याचा चिवटपणा, वैयक्तिक निस्पृहपणाबरोबर परोपकाराची हौस, अभ्यासू बुद्धिप्रामाण्य व तज्जन्य करारीपणा, मुलांशीं समरस होण्याइतका अंतकरणाचा खेळकरपणा, अभंग नीति, न्यायनिष्ठुर सत्यप्रीति, मताविषयीं अभिमान, कार्याविषयीं निष्ठा, ज्यांत प्रतिबिंबित झालीं आहेत, असें किंवा या सगळ्या गुणांची प्रभावळ ज्या कर्तव्यदक्षतेच्या जीवावर शोभायमान दिसते, ती कर्तव्यदक्षता निदान ज्यांत सूचित तरी केली आहे, असें आगरकरांचें छायाचित्र उपलब्धच नाहीं. किंबहुना, असें चित्र रेखाटणें चितान्याच्या रंग-लपेटी-पलीकडील गोष्ट आहे कीं काय अशीही शंका येते. मात्र, प्रसंगाच्या पार्श्वभूमिकेवरच असें चित्र घेणें शक्य असेल, तर "खुनाच्या धमकीचीं पत्रें आलीं असतां एकटेच फिरावयास जाऊं नका, म्हणून गोपाळराव गोखल्यांनीं विनवले असतांही त्यांना टोलवून आपला छेडगा घेऊन एकटेंच चतुःशृंगीकडे फिरावयास गेले" तो प्रसंग रेखाटून, "शहाण्यांचा मूर्खपणा ऊर्फ आमचे प्रेतसंस्कार" हा लेख लिहावयास घेतल्याबरोबर आदले सालीं 'पांचजन्याच्या हंगामांत' निघालेल्या स्वतांच्या प्रेतयात्रेची आठवण होऊन हिंदुधर्मास जाहीर नोटीस देण्याइतपत आगरकरांनीं लेखणी सरसावली; ती अवस्था चितारून, आणि विशेष तें क्रीडाभुवनांतील शंभर सुधारकांच्या सभेवर कौलाविटांचा मारा होणार हें दिसत असतांना 'शाबास पुणेकरांनो' म्हणून आगरकर बोलावयास उभे राहिले, ती त्यांची अवस्था रंगवून, वरील गुणांनीं मंडित असा आगरकर कुंचल्यानें ध्वनित करणें शक्य आहे; कारण कलावन्ताचें कौशल्य 'उघड उघड दाखवितां येत नाहीं, तेथेंच भेदक असतें' आणि कलाविषय होणाऱ्या व्यक्तीचा अस्सल मोठेपणा असतो.

कर्तव्यदक्षता हा आगरकरांच्या मोठेपणांतील मेरुमणि हाताशीं धरला म्हणजे इंग्रजी राज्याप्रमाणें नागमोडी असलेल्या आगरकरांच्या आयुष्यांतील वळणांचा तेव्हांच उलगडा पडतो. गुणानुरूप यथार्थानें रेखाटलेल्या चित्राची जरूर भासत नाहीं. पहा कीं "इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार" असें आगरकरांनीं जाहीरपणें महाराष्ट्रास सांगून टाकलें होतें. हें सांगण्यांतला मतलब

" लोकां सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडा पाषाण " म्हणून प्रसंगविशेषीं राजरोस मिरवण्याचा नव्हता. " मनुष्याच्या वास्तविक स्थितींत व जाणूनबुजून दुसऱ्यापुढें त्याचें जें बोलणेंचालणें होत असतें त्यांत बरेंच अंतर असतें. हें अंतर नाहींसें होत जाणें व सर्वकाळीं त्याचें एकच स्वरूप दिसूं लागणें हें एक त्याच्या सुधारणेचें व्यंजक होय. " फार काय सांगावें ? " लौकिकाचें दान घेण्यासाठीं ज्यानें एकदां फासा टाकला, त्यानें आपल्या आचरणाच्या प्रत्येक भागावर लोकांची करडी नजर आहे, हें कधींही विसरता कामा नये, " असा सुधारकाचार्य आगरकरांचा दंडक होता. त्याच्या चतुःसीमेंत सार्वजनिक व खाजगी असे कप्पे खुद्द आगरकरांच्याच आयुष्यक्रमांत बसूं लागले, तर " इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार " ही एक आगरकरी गुटलीच होती, असें म्हणणें प्राप्त होईल. " आयुष्याच्या हर एक क्षणीं मनुष्य जें बोलतो तें पूर्ण विचाराअंतीं बोलतो, असें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याच विषयावर जर सार्वजनिक तऱ्हेनें बोलण्याचा प्रसंग आला, तर निराळ्याच तऱ्हेनें तो बोलतो." सामान्य वा परिस्थितीच्या प्रवाहाचा ओघ आलाच म्हणून पुढारीपण प्राप्त झालेल्या महाभागासंबंधींचें हें लोकमान्य टिळकांचें निरीक्षण आगरकरांस लागूंच पडत नाहीं. कारण लोकांना कांहींतरी शिकवावयाचें आहे, समाजाची घडी एका विशिष्ट पद्धतीनें बसली पाहिजे, अशा अंतःकरणाच्या ध्येयभूत तळमळीनें आगरकरांनीं पुढारीपण स्वीकारलें होतें; तें त्यांच्या गळ्यांत येऊन पडलें नव्हतें. शिवाय " लोकमताच्या गणितशास्त्रांत दोन आणि दोन चार होतात, असें नाहीं. तें कधीं तीनही होतात, तर कधीं पांचही होतात. " असें आगरकरांचें प्रेक्षण असल्याकारणानें बोलण्याबाबत म्हणजेच मताबाबत खाजगी व सार्वजनिक असे कप्पे करण्याचें कारणच आगरकरांस नव्हतें. मग काय, भोंवतालच्या परिस्थितीपुढील शरणाई झांकून ठेवण्यासाठींच " इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार " हें सूत्र आगरकरांनीं धरलें काय ? पागोट्यांसंबंधीं लिहितांना " आम्ही बोलते सुधारक आहो, कर्ते सुधारक नाहीं " असें आगरकरांनीं विनयानें म्हटलें आहे; आणि आगरकरांचा काळ तो कृतिपेक्षां कीर्तनाचा, आचारापेक्षां आचार्यत्वाचा वर्तनापेक्षां विवेचनाचाच होता. त्याचा मान कांहीं क्षुल्लक निरुपद्रवी गोष्टींत तेवढा राखला; बाकी " साध्य असेल तें करणार " असें आगरकर सांगत, ती कर्तव्यनिष्ठ मनाची खुली भाषा होती. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्यें मनुष्याला असतात. तीं प्रसंगानुसार तरतम भावानें पार पाडतांना मनुष्याच्या कांहीं मताला एखाद्या जागीं तर मुरड पडते. ही मुरड म्हणजेच आगरकरांचें " साध्य असेल तें करणार."

स्वतां आगरकरांचेंच उदाहरण या संबंधांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. " मेलेल्या बापाचा मुलाच्या मिशाशीं अर्थाअर्थी काय संबंध आहे ? असा जाहीर सवाल टाकणारे सुधारकाचे संपादक आगरकर, वडील आसन्नमरण असल्याचें पत्र आल्यावरून पुण्याहून कऱ्हाडास जावयास निघाले. तेव्हां त्यांच्या एका निस्पृह मित्राला राहवेना. त्यानें " आतां क्षौराचें कसें काय ? " म्हणून गोपाळरावांस

प्रश्न केलाच. गोपाळरावांनीं उत्तर दिलें, " माझ्या वडिलांचें प्राणोत्क्रमण माझ्या देखत होऊन माझ्या क्षौर न करण्यामुळें त्यांच्या प्रेतदहन–विधीलाच अडथळा होतोसें दिसून आल्यास मी त्या बाबतींत आग्रह धरून बसणार नाहीं. पण कदाचित् मी जाण्याच्या आधींच तो विधि होऊन गेला असेल, तर मात्र क्षौराकरतां मी कधींही आपली मान वाकवणार नाहीं. " तात्पर्य पित्याविषयींचें कर्तव्य पुढें उभें राहिल्या-बरोब्बर आपल्या जाहीर विचारांना मुरड घालण्याची तयारी आगरकरांनीं ठेवली होती. पण ही तयारी जाहीर मतांच्या वागणुकींतील कांच ( कोण्या वडीलधाऱ्या माणसाच्या आदराआड लपून ) कमी होण्यासाठीं नव्हती.

उलट मात्र एक उदाहरण आगरकरांच्या चरित्रांत आढळतें. म्हणजे श्रेष्ठ-तर कर्तव्य बजावीत असतां आपल्या जाहीर मतांना मुरड घातल्यामुळें आगरकरांनीं जाहीर नामुष्की मोठ्या धिम्मेपणानें पतकरल्याचें. सुप्रसिद्ध " मेसनचें हातच्या भाताचें प्रकरण " जें टिळक आगरकरांत केसरी–सुधारकांतील शब्दाशब्दीनें रंगलें तें बेअ-ब्रूच्या फिर्यादिधाईवर आलें; तेव्हां न्या. रानडे पुनर्विवाहाला शंकराचार्यांची संमति विद्वच्चर्चेच्या योगें मिळाली तर पाहण्याच्या घांदलींत होते. टिळकासारखा अस्तिपक्षी लाभणारा मोहरा सुधारकांनीं दुखविलेला नसावा अशी न्यायमुर्तींची साहजिकच इच्छा होती. त्यामुळें फिर्याद–धाईवर आलेलें प्रकरण आगरकरांनीं टिळकांची माफी मागून विझवावें, अशी न्यायमूर्तींनीं आगरकरांजवळ इच्छा प्रगट केली. न्यायमूर्तींविषयींचा आदर, बालविधवासंबंधीं करुणा, आणि स्त्रीजातीच्या एका हक्काला शंकराचार्यांचा शास्त्राधार मिळण्याचा रानडे–दृष्ट संभव, इतक्यांच्या विचा-रांनीं वैयक्तिक सचोटीवर मात केली आणि आगरकरांनीं " बोलणें फोल झालें " म्हणून टिळकांची माफी मागितली. माफी मागितली खरीक, " डोलणेंही वायां गेलें " हा टिळकांचा आहेर आला; सुधारकपक्षांतील आगरकरांच्या सहकाऱ्यांनीं नाकें मुरडलीं व ज्या बालविधवांचे साठीं आगरकरांनीं जाहीर नामुष्की पतकरली, त्यांच्या विरुद्धच शंकराचार्यांच्या सभेचा निकाल लागला ! !

" खरा लोककल्याणेच्छु व देशाभिमानी पुरुष म्हटला म्हणजे त्याचे ठायीं पराकाष्ठेची निस्पृहता वागत असली पाहिजे. तो वचनाचा धड असला पाहिजे, व कसलींही संकटें आलीं, किंबहुना जीवित-संशयाचा जरी प्रसंग येऊन ठेपला, तरी त्यानें डगमगतां उपयोगी नाहीं. " विष्णुशास्त्र्यांचा हा दंडक आगरकर कसो-शीनें पाळत असले, तरी जाहीर मतांप्रमाणेंच त्यांच्या निस्पृहतेलाही श्रेष्ठतर कर्तव्या-साठींच थोडी तरी मुरड खावी लागलीच. अहो, " वाक्यमीमांसा " पुस्तकाच्या तीनशें प्रती विकत घेऊन, श्रीमंत शिवाजीराव होळकरांनीं पोंचविलेल्या पैशां–बद्दल वाद उपस्थित होतांच तें पैसे डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे पावते करणारे आगरकर आणि श्री. शिवाजीरावांनीं दरमहा पांचशें रुपयांची नौकरी देऊं केली असतां, " पोटापुरत्या पैशावर लोक शिक्षणाचें पतकरलेलें व्रत पाळावें " म्हणून ती नौकरी ' मला नको ' म्हणून सांगणारे आगरकर, " खाजगी द्वेषाचा " आरोप

केसरींतून येतांच, “ महाराष्ट्रीयांस अनावृत पत्र ” लिहितात; त्यांत घरच्या प्रेमळ वडील-धाऱ्यासुद्धां समाजाचा रोष पतकरून, ‘ निरपराध ’ बायकोमुलांसकट आपल्या निरपेक्ष देशसेवेसाठीं जो आपण छळ सोसतो, त्याचा विचार करण्याबद्दल जनतेला विनवितात; आणि ही विनवणी विफल झाल्यास भवभूतीप्रमाणेंच या विपुला पृथ्वींत आणि निरवधि कालांत कोणी सहधर्मा भेटेल, असा आशावाद बाळगतात. हें सर्व पाहिलें म्हणजे पुढारीपण, देशसेवा किंवा मताभिनिवेश वैयक्तिक मोठेपणासाठीं अगर ‘खाजगी’ द्वेषदोहऱ्यासाठीं नसून शीलवन्त राष्ट्रिय प्रगतीसाठीं असते हें कळकळीनें जनतेला शिकविण्यासाठीं आपल्या आत्यंतिक निस्पृहतेलादेखील आगरकरांना चांगलीच मुरड घालावी लागली, हें स्पष्ट होतें. कोणी ‘ सहधर्मा ’ भेटेल हा व्यावहारिक निस्पृहतेच्या परिसीमेवरील आगरकरांचा आशावाद ‘ संन्याशाचा हीनपणा ’ वाटण्या–इतकी जी दृष्टी थोर असेल, तिच्या समाधानाकरितांच आगरकरांनीं सांगून ठेवलें होतें कीं “ इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार. ” कारण ते “ शुद्ध ईश्वर किंवा शुद्ध पाषाण ” कांहींच नव्हते.

शेजारीं नव्हें, पण सदसद्विवेकच सन्मानणारे आगरकर आपल्या सामर्थ्याचा मर्यादितपणा लक्षांत घेऊन जर “ इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल ते करणार ” असें पथ्य सांभाळीत, तर संसारांत गढून जाणाऱ्या माणसाचेंतें वैशिष्ट्य संजीवन होय, हें काय सांगावयास हवें ? म्हणून सामान्य माणसानें सुधारणेच्या सर्वांगांना हात न घालतां अंतःकरणांत सहानुभूति बाळगून फक्त एकादी दुसरी बाजू हातीं धरावी आणि बाकी समाजाच्या चालीनें चालावें असा सल्ला आगरकरांनीं दिला आहे. आगरकरांचे लेखनस्फूर्त शिष्य अण्णासाहेब कर्वे हे या बाबत सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतींत राजकीय, औद्योगिक फार काय अस्पृश्यता–निवारणासारख्या शुद्ध सामाजिक चळवळीचें महत्त्वमापन गणितप्रवीण कर्व्यांजवळ नाहीं, असें नाहीं. पण स्त्री–शिक्षणाची सर्वांगसुंदर सुधारणा हीच कर्व्यांनी आपली इतिकर्तव्यता मानली असूनहि त्यांना कसे संन्याशासारखें त्यागपूर्ण आयुष्य घालवावें लागलें, हें अवलोकन करणारांस आगरकरांनीं संसारी माणसाला दिलेला सल्ला कसा बिनचूक होता, हें सहज पटेल.

समाजाचा एक स्वावलंबी, स्वाभिमानी, स्वतंत्र विचाराचा आणि शक्य तों स्वयंपूर्ण घटक होऊन जो राहिला, तो संसारी ज्या वेळीं एकंदर समाजाच्या धारण–पोषण–प्रगतीकरतां त्यागमय आयुष्य सुरवाततो, याच वेळीं तो ‘ संन्याशी ’ होतो. छाटीनेंच कांहीं संन्यास होत नाहीं. “ पोटापुरत्या पैशावर ” लोकशिक्षणार्थ काम करण्याचें व्रत अखंड चालवून आणि “ कीर्तिरूप उरण्याविषयींही ” बेपर्वा राहून आगरकरांनीं खरा “ सं–न्यास धर्म ” आचरला यांत शंकाच नाहीं. तरीपण एक रुखरुख आगरकरांच्या मनाला, समाजहितद कर्तव्यपूर्तिनंतरही होतीच. ती म्हणजे आपल्याशिवाय आधार नसलेल्या पत्नीला आणि मुलांना स्वतांच्या पायांवर उभें राहण्याइतकी संसाराची बळकटी आपण करूं शकलों नाहीं, ही होय. ती गोपाळ-

रावांच्या दोघा मामांना कळतांच, त्यांनीं ती राहूं दिली नाहीं. " गोपाळरावांनीं लोक-हितार्थ आपलें आयुष्य वेंचलें, हें लक्षांत आणून. . त्यांच्या कुटुंबाचा चांगला परामर्श घेतला. . .श्रीमंत होळकर सरकारनींही गोपाळरावांच्या वडील मुलाला शिष्यवृत्ति दिली, " हा भाग वेगळा. पण शेवटची निद्रा घेण्यापूर्वी आपल्या कुटुंबाला " झोंप येते, मी स्वस्थ निजतों, तुम्हीही निजा " असें सांगणाऱ्या शांतचित्त आगरकरांच्या संसारांत कर्तव्यपूर्तीच्या दृष्टीनें तो दोष राहून गेला, यांत शंकाच नाहीं. पण अंगिकारलेल्या असिधाराव्रतामुळें तें त्यांना शक्य झालें नाहीं, असें तरी त्याबाबत म्हणतां येईल.

तथापि हाच न्याय सगळीकडे आहे, असें नव्हे. 'गंधा' सारख्या कांहीं बापड्या गोष्टी समाजाच्या सुबुद्ध प्रगतीस निरुपद्रवी असल्यामुळें कांहीं दिवस 'तशाच राहूं' देण्यास आगरकरांची हरकत नव्हती. ब्राह्मणी पागोट्याचें वैय्यर्थ स्वतांला पटलें असून आणि स्वतां तें प्रतिपादिलें असूनही, आपल्या मतें सर्वोपयोगी असलेला रुमाल वापरावयाचें सोडून, 'निरुपाधिक पागोटेंच आगरकर स्वता वापरीत. 'गुळानें मरणाराला विष कशाला ?' अशा जातीचा हा वर्तमानांतील धिमेपणा म्हणतां येईल हे खरें; पण प्रत्येक बारीक सारीक गोष्टींत जाणून बुजून यत्न झाला पाहिजे, असें म्हणणारे आगरकर अंगवळणाच्या आहारीं गेले असें येथें म्हणणें प्राप्त आहे.

चंद्रावरील हरणछापाप्रमाणें कर्तव्यदक्षतेंतील आगरकरांचा वरील सारखा एकादा दोष वगळला तर कोणीहि विचारवंत असेंच म्हणेल कीं " तुझिया गुणा ऐशी कोठें माझी वाणी। मस्तक चरणीं ठेवीतसे ॥ " कारण पास्कल म्हणतो त्याप्रमाणें वय आणि व्यापार यांनीं आत्मोन्नति होत नसून ती विवेकाच्या दानतीनें होते; खरें नीतितत्त्व विवेकाची दानतच होय. ही विवेकाची दानत आगरकरांच्याजवळ वर्त-नांतरित होती. या दानतीचा उपयोग आगरकरांनीं लोकशिक्षणाच्या ध्येयाप्रीत्यर्थ कर्तव्यबुद्धीनें केला आणि प्रारंभीं दिलेलें महाशय माझिनीचें वचन सार्थकीं लावलें. लोकमान्य टिळक म्हणतात, " विद्येनें आणि अंगच्या हुशारीनें आपण इतर लोकां-चाच क्रम स्वीकारल्यास चांगलें यश संपादन करूं, अशी बहुतेक खात्री वाटत असतां केवळ एक लोकोपयोगी हेतु मनांत धरून त्याकरतां आजन्म दारिद्रय, विपत्ती, उपेक्षा अगर निंदा सहन करण्यास तयार होण्याचें ज्यांनीं धैर्य दाखविलें आहे, असें महा-राष्ट्रात किंवा आमच्या विपन्न देशांत सध्या तरी थोडें पुरुष निपजतात. ज्या लोकांच्या पैशावर सरकार विद्याखात्यावर पैसा खर्च करते, तो लोकांचाच आहे, आपणांस पाश्चात्य विद्येचा संस्कार घडला आहे, त्यांचे आपण हल्लीच्या देशकालनुरूप कोणत्या रितीनें उतराई व्हावें याचा कोणीकोणी विचार केला आणि कोण करताहेत हें पाहिलें, म्हणजे रा. आगरकर यांची योग्यता कळून येईल " कृतज्ञतेच्या पोटीं उद्भवलेल्या कर्तव्यबुद्धींत आगरकरांच्या " लोक-शिक्षण " स्वरूपीं ध्येयाचें बीज आहे. या ध्येयापाशींच ते महाराष्ट्रांत पाश्चात्य संस्कृतीचे भाष्यकार बनले. प्रि. भाटे लिहितात " पाश्चात्य संस्कृतीचें ध्येय, त्याचें खरें स्वरूप, त्याचा महाराष्ट्राला सद्यःस्थितींत उपयोग वगैरे गोष्टी त्यांनीं मराठी भाषा बोलणाऱ्या समाजाला समजावून सांगितल्या"

पण असें करण्यतांही आगरकरांनीं पाश्चात्य तत्वज्ञान्यांचा आंधळेपणानें उतारा केला नव्हतां. कारण एकदां प्रतिपक्षाला त्यांनीं खडा सवालसुद्धां टाकला आहे कीं, "तर मग आतां तुमचा स्पेन्सर खरा कीं आमचा ?"

असल्या विवेचक बुद्धीनें "अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे" म्हणून महाराष्ट्राला जीव तोडून सांगणारे आगरकर एक प्रकारें महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचें महत्कार्य घडवून आणीत होते. सत्य, समता, न्याय भूतदया व स्वातंत्र्य यांचा अविष्कार बहुजनसमाजांत करण्यासाठीं आगरकरांनीं जीवाचा आटापीटा केला. "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्ते ऽपि यांति परां गतिम्" असें भगवान् व्यासांचें आश्वासन असल्याकारणानें स्त्रियावैश्यशूद्रांच्या तत्कालीन भाषेंत म्हणजे मराठींत ज्ञानेश्वरांनीं गीतेचें जगदुद्धारक तत्वज्ञान उतरलें. श्राद्धीय अन्न भूकेलेल्या अस्पृश्यांना घालण्यांत पितृ–तृप्तीला यत्किंचितही बाध येत नाहीं, असें 'भूतांचें पालन' हेंच "भांडवल संता" असें श्री एकनाथांनीं प्रत्ययास आणलें. "वेदान्तीचा अर्थ आम्हासीच ठावा। इतरांनीं वहावा भार माथा॥" अशा आत्मविश्वासानें श्रीतुकारामांनीं पंढरीच्या वाळवंटी समाजांतील अठरापगडजात आध्यात्मिक दृष्टया समानभूमिकेवर उभी केली. शाळेंत शिक्षक आणि बाहेर संपादक अशा दोन भूमिका स्वीकारुन ब्रिटिश रियासतीखालीं वरील सारखेंच सामाजिक सन्माननीय सहकार्याची मनोभूमिका नांगरुन ठेवण्याचें कार्य आगरकरांनीं "मनोदेवतेस साक्ष ठेवून" केलें. आणि म्हणूनच वा. ब. पटवर्धन म्हणतात "रा. गोपाळरावजींस महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनाचें महत्कार्य घडवून आणणाऱ्या ऐतिहासिक पुरुषांत आम्ही श्रेष्ठ स्थान देतों. देशाची उन्नति व उद्धार सर्वांशीं तरुण मंडळीवर अवलंबून असतो. त्या तरुण पिढीच्या मनाला पिळदार वळण लावणारे, तिच्या वाढत्या बुद्धीला जोम व दम देणारे, किंबहुना तिच्यांत जीव घालणारे व तिची कर्तव्यदिशा तीस दाखवून देणारे आध्यात्मिक नायक तेच देशाचे भाग्यकर्ते, उद्धारकर्ते, पुरुष होत. कापसाच्या तंतूप्रमाणें सैरवैरा हवेंत तरंगणाऱ्या नवीन विचारांच्या व्यक्ति अटराशें आठ्याऐशीं सालापूर्वी तुरळक असतील. परंतु अठराशें अठ्याऐशीं सालानंतर नवीन मतवाल्याची जी एक अफाटसेना निघाली–एक सबंध पक्ष–एक नवा तट निर्माण झाला; व महाराष्ट्राचा एक हात–उजवा हात–चांगला खंबीरपणें वावरूं लागला; तो गोपाळरावजींच्या अनवरत श्रमांमुळें यांत संशय नाहीं, व म्हणूनच आम्ही गोपाळरावजींना महाराष्ट्राच्या उद्धारकर्त्यांत श्रेष्ठ स्थान देऊन त्यांच्या नांवावाचून महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचें एक पृष्ठही लिहितां येणार नाहीं, असें म्हणतो."

इतकें कोणास रुचो, लोकमान्य लिहितात कीं, "सत्याचा, करारीपणाचा, एकनिष्ठतेचा आणि स्वार्थत्यागाचा महिमा इतका विलक्षण आहे कीं, भरभराटीच्या पाठीस लागलेल्या मनुष्यासही दारिद्र्यांत राहून पूर्ण एकनिष्ठेनें देशसेवेस लागणाऱ्या मनुष्याचा महिमा अखेर गावा लागतो." कारण 'स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकः सतामग्रणीः।'

राष्ट्राची सर्वांगीण उन्नति व्हावी, म्हणून आगरकरांची तळमळ होती, हें त्यांच्या सर्व विषयस्पृष्ट लेखनावरून स्पष्ट होतें. त्यांतल्या त्यांत त्यांनीं पार पोशाखापासून जाति-भेद–विध्वंसनापर्यंत सामाजिक चळवळीवर विशेष तो टाक चालवून आजन्म शैक्षणिक व सामाजिक चळवळींचा रथ प्रगतिपथावर द्रुतगतीनें नेला. पण हें सर्व करण्यांत समाजांत विचारक्रांति घडवून आणणें एवढेंच त्यांचें 'लक्ष्य' होतें. " बांधव हो विचार-कलहाला तुम्ही कां भितां ? " असा आगरकर मोठा मार्मिक प्रश्न करीत असत. विचार कलहाशिवाय बुद्धिनिष्ठ जीवन नाहीं; बुद्धिनिष्ठ जीवनाशिवाय आत्मसंशोधन नाहीं; आत्मसंशोधनाशिवाय स्वाभिमानपूर्वक सुधारणा नाहीं; आणि स्वाभिमानपूर्वक सुधारणे-शिवाय 'इतर राष्ट्रांना होत असणाऱ्या सुखाचा लाभ कसा होणार ?' तात्पर्य कोणत्याही राष्ट्राची अगर मानवी जातीची समुन्नति व्हावयाची असेल तर समाजांत विचारक्रांति व्हावी लागते. शाळेंतील शिकवणीनें, वर्तमानपत्रांतील लिखाणानें आणि घरांदारांतील वर्तनानें आगरकरांनीं ही विचारक्रांति घडवून आणली. त्यांचें कार्यक्षेत्र महाराष्ट्र आणि भाषा मराठी असली तरी, आणि समकालीन वा समवृत्त अशा स्वदेशी वा परदेशी विचार–क्रांतिकारकांशीं तुलना करतां आगरकर व्यक्तिशः उठावदार दिसत असले नसले तरी, बौद्धिक दास्याचें विध्वंसक आणि " जगाच्या कल्याणा. . . . . देह कष्टविणारे संत " म्हणूनच जग त्यांची गणना करील.

# आगरकरांशीं ओळख

## भाग ३ रा

### अनुक्रमणिका


* लोकहितवादी आणि आगरकर
* न्यायमूर्ति ,, ,,
* शास्त्रीबुवा ,, ,,
* लोकमान्य ,, ,,
* गोखले ,, ,,
* फुकुझावा ,, ,,
* ब्रॅडला, मिल्ल, बाळशास्त्री व गॉरिसन ,, ,,
* कार्लाइल ,, ,,
* साक्रेटिस ,, ,,
* विवेकयुगाचे प्रवर्तक आगरकर

समता, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय व स्वोद्योग या पंचप्राणांनीं चेतविलेल्या व्यक्तिजीवनांवर आधारलेला सुखरूप समाजसंसार साधण्यासाठीं विवेक युगाचे प्रवर्तक आगरकर होणें किंवा त्यांचे अनुयायी म्हणविणें "येरा गबाळाचें काम नोहे." आगरकरांच्या इच्छेप्रमाणेंच "ज्याचें नशीब त्याच्या करामतीवर" हे लक्षांत वागवून व्यक्ति व समाज आपल्या वर्तनाचें सुकाणु हातीं धरतील त्याच वेळीं ती वैदिक वाणी सार्थ होणार आहे कीं—

"सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
न कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥"

प्रकरण १ लें

# लोकहितवादी व आगरकर

लोकहितवादी व आगरकर हे म्हटलें तर समकालीन, म्हटलें तर बिलकूल नव्हत! समकालीन अशा अर्थी कीं, १८९२ त देशमूख तर १८९५ त आगरकर वारले, व जवळ जवळ शेवटपर्यंत दोघेही आपली म्हणून कर्तबगारी करीतच होते. तरी पण टोपीवाल्यांच्या मुठींत मराठी राज्याची मनसबदारी देऊन रावबाजी ब्रह्मवर्ताला गेले नाहींत तोंच पांच वर्षांच्या अवधींत जन्मलेले 'गोपाळ हरि' भरपूर एका पिढीनें म्हणजे तेहतीस वर्षांनीं 'गोपाळ गणेश' यांना वडील; अर्थातच, आगरकरांच्या ओठावर मिशीचे खुंट लागावयाचे अगोदरच देशमुखांचा कर्तबगार हात गाजून राहिला असला, तर नवल काय? "समाजाच्या सर्वांगीण सुधारणेंत राजकीय सुधारणा हा महत्वाचा खरा, पण अंश आहे असें प्रतिपादन करणारे पुढील पिढींतील 'सुधारक' हे लोकहितवादींचे पुढल्या पिढीचे वारसदार" असें आचार्य गणपतराव केळकरांनीं लोकहितवादींच्या चरित्रांत उद्गार काढले आहेत. ते अत्यंत सार्थ आहेत म्हणावयाचे!

शिष्य व मुलगा यांच्याकडून जशी पराभवाची इच्छा करावयाची तशीच वारसाकडूनहि. आपल्या काळच्या देशस्थितीच्या दर्शनानें दोघेही महाभाग उद्वेगले होते, आणि पाश्चात्य सुधारणेचा अंगिकार आपण बऱ्याच अंशीं केल्याशिवाय भारताचें डोकें वर निघावयाचें नाहीं असा दोघांचाही सिद्धांत होता. आतां, सत्ताधाऱ्यांची गैरमर्जी होईल या अवास्तव भीतीनें देशमुख–आगरकर यांनीं अशी प्रणाली सुरू केली होती, असें कोणी म्हणणार नाहीं. उलट, "इंग्रजी राज्याची उलटी बाजू अथवा आमचें घोर दारिद्र्य" हा अंतःकरणाला हात घालणारा आगरकरांचा लेख आणि त्याचीं भावंडें लोकांना चटकन आठवतात व १८८३ सालीं लोकहितवादींनीं ग्राम–रचनेसंबंधांत सरकारवर हल्ला केल्याचेंही लोकांना चांगलें स्मरतें. पण दोघांच्याही हयातींत याच्या उलट प्रकार होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं लोकाहितवादींवर निबंधमालेचे अंक खर्ची घातले आणि आगरकरांची प्रेतयात्रा निघाली व त्यांस खुनाच्या धमक्या मिळाल्या. फार काय, जिवलग म्हणून म्हटलेल्या मित्रांच्या वृत्तपत्रांतून भलते दोष उडवले गेले आणि म्हणूनच ना आगरकरांनीं "महाराष्ट्रियास अनावृत्त पत्र" लिहिलें? अगदीं तसाच हृदयाविष्कार लोकहितवादींनाही आपल्या "शतपत्रीं"च्या शेवटीं करावा लागला आहे. ते म्हणतातः—

"लोकहितवादीनें कोणाची मजुरी पतकरली नाहीं, कशाची अपेक्षा, आशा, किंवा इच्छा धरली नाहीं. कोणाचें सांगण्यावरून किंवा शिकवण्यावरून कृत्रिम वर्णन केलें नाहीं. लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ति व्हावी या हेतूनें

लिहिले नाहीं. इतके श्रम जे केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळावी, त्यांनीं सुधारावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकचें साधन घडावें, आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकीं कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावेत किंवा नाहींसे व्हावे."

अशा शुद्ध अंतःकरणानें लोकहितवादींनीं पाश्चात्य सुधारणेच्या मंडनाचें काम स्वाध्याय, इंदुप्रकाश, वृत्त, वैभव, लोकहितवादी वगैरे मराठी व गुजराथीसुद्धां नियतकालिकांतून केलें. आगरकरांनीं आरंभीं केसरींतून व नंतर सुधारकांतूनच काय तें, तें काम पार पाडलें. दोघांचींही मतें प्रतिपादन करण्याची शैली सडेतोडपणाची होतीं यांत शंका नाहीं; तरी पण सरळपणा व कळकळ यांच्याबरोबरच कुशलता आणि विनोद यांची जोड आगरकरांसारखी लोकहितवादींच्या लिखाणांत नव्हती. आगरकरांच्या मानानें पुनरावृत्ति, हेकेखोरपणा व माधुर्याचा अभाव हे दोषही लोकहितवादींच्या लिखाणांत ठळक असत. पण याहीपेक्षां देशमुख व आगरकर यांतील मनावर छाप पाडणारा विरोध म्हणजे आगरकर आपण प्रतिपादिलेल्या मतांप्रमाणें बेधडक आचरण करणार तर देशमुख "व्यवहारशास्त्रे पर्याय" सांगणार. लोक-सुधारणा करतांना लोकांस तेवढें शास्त्र सांगून परस्पर सुधारक होऊन चालत नाहीं, तर पुढाऱ्यानें स्वतः उदाहरण घालून द्यावें लागतें. आणि म्हणूनच, परंपरेंतून स्वतःचा हात सुटत नाहीं. एतदर्थ रात्रौ जप, पहाटेला प्रातःस्मरण, पार्थिवाची पूजा वगैरे करणाऱ्या देशमुखापेक्षां कर्ते सुधारक आगरकर सुधारणुकीच्या दृष्टीनें सरस ठरतात व ठरलेही.

पण, एवढ्याच दृष्टीनें दोघांत विरोध आहे असें नाहीं. साधी व सरळवृत्ति, निस्पृहपणा, कर्तेपणा, परोपकार, तरुण मुलांच्या सहवासाची हौस, वेळ फुकट न दवडण्याची दक्षता इत्यादि बाबतींत कोण कोणाला हार जाईल, हें सांगणें कठीण. तथापि सरकारी मानमरातबांनीं व पदव्यांनीं जसे देशमुख विराजले तद्वत् सरकारी व सामाजिक अवकृपेस पात्र झालेल्या आगरकरांपेक्षां देशमुखांना परमेश्वरानें स्मरणशक्ति दांडगी दिली होती, चौकसपणा चौरस होता आणि शरीरप्रकृति धडधाकट होती. त्यामुळेंच "चालता बोलता विश्वकोश" म्हणवून घेण्याइतकें अगाध वाचन आणि हजरजबाबीपणा त्यांना कमावतां आला. लोकहितवादी सरदार घराण्यांत जन्माला आले, पेशवाईइतक्या नसले तरी नव्या राजवटींत आपल्या घराण्याच्या इतमामानें वाढले, विद्येनें अधिकारावर चढले आणि त्या काळांत रावबहादूर होण्यापर्यंत गाजले! उलटपक्षीं, आगरकर दारिद्र्यांत जन्माला आले, तिच्याच फुलबागेंत शिकलेसवरले, आणि पोटापुरता पगार बांधून घेऊन उमदे शिक्षक म्हणून मिरवले! दोघांच्याही आयुष्याच्या रुळ्या आपखुषीच्या होत्या आणि दोघांनींही एकच अपेक्षा केली कीं:—"ज्यानें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी, किंबहुना तो काय बोलतो हें तरी मनन करावें."



लोकहितवादी



श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर

प्रकरण २ रें

# न्यायमूर्ति व आगरकर

क्रौंचदांपत्याला पाहून वाल्मीकीनें रामायण रामावताराआधीं रचलें. तसेंच पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहासाच्या व संस्कृतीच्या अभ्यासानें भारताची भाग्यशाली भवितव्यता न्यायमूर्तींनीं आपल्या दिव्य दृष्टीनें पाहिली; इतकेंच नव्हे, तर त्या भाग्याच्या लायकीची सर्वांगीण तयारी होण्यासाठीं चोहोंबाजूंनीं सुरवात करून अधुनिक भारताचे आद्याचार्य ही पदवी प्राप्त करून घेतली. न्यायमूर्तींनीं प्रतिपादन केलेल्या सामाजिक सुधारणेस अत्यंत आवश्यक अशा पाश्चात्य संस्कृतीच्या मराठी भाष्यकाराचें काम आगरकरांनीं केलें. या गोष्टी लक्षांत घेतल्या तर रानडे–आगरकरांची तुलना म्हणजे महासागर व उपसागर किंवा बोट व कॅबिन यांचीच तुलना म्हणण्याची पाळी येईल.

तें कांहीं असलें तरी, महाराष्ट्रांत आगरकरांची कामगिरी झाली नसती, तर रानड्यांच्या राष्ट्रीय उत्थापनाची तेवढी बाजू कितीतरी लंगडी पडती!

" With the liberated manhood, with buoyant hope with a faith that never shirks duty, with a sense of justice that deals fairly to all, with unclouded intelletect & lastly with a love that overleaps all bound renovated India will take her proper rank among the nations of the world & be the masters of the situation & of her own destiny. "

न्यायमूर्तींच्या या उद्गारांपेक्षां आगरकरांना अगर त्यांच्या भक्तांनाही सामाजिक सुधारणेचें कोणतें दुसरें ध्येय होतें? अर्थात् रानड्यांना हव्या असलेल्या सामाजिक सुधारणेपायीं आपला जीव लावणारा खंदा वीर म्हणून आगरकरांनीं जी कामगिरी केली ती रानड्यांच्या दृष्टीनेंही कमी महत्त्वाची नव्हती. लोकमान्यांनीं म्हटल्याप्रमाणें "परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव, यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें, तें ज्यांच्या अंगांत आहे; आणि दुःखाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्याठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटींतले होते." ही जाणीव रानड्यांनाही होती आणि म्हणूनच रानड्यांनीं पुनर्विवाह न करतां कुमारिकेशीं लग्न लावलें तेव्हां अगर पंचहौदमिशनप्रकरणीं रानड्यांनीं प्रायश्चित्त घेतलें तेव्हां, आगरकरांनीं आपलें प्रखर टीकास्त्र सोडलें असतांही, रानड्यांचा लोभ रतिभर कमी झाला नाहीं.

उलट 'मेसनच्या हातच्या भाताचें' प्रकरण टिळक–आगरकरांत धुमसत असतांना आगरकरांनीं टिळकांची माफी मागावी असा हट्ट रानड्यांनीं आपुलकीच्या वडीलपणानें धरला आणि आगरकरांनीं तो पुरवला.

रानड्यांच्याबद्दलचा आपुलकीचा आदर त्यांच्यावर टीकास्त्र सोडतांनाही आगरकरांना टाकवत नसे. चहाग्रामण्यप्रकरणीं आगरकर लिहितात– "रावबहादूर इतर सरकारी नोकरांप्रमाणें केवळ एक सरकारी नोकर आहेत, अलिकडील सुशिक्षित लोकांनीं उघडपणें त्यांस आपलें अग्रणीत्व दिलेलें नाहीं हें जरी खरें आहे, तरी आपली नोकरी उत्तम रीतीनें बजावून सांपडेल तेवढ्या अवकाशांत, राजकीय धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपल्या देशाचें पाऊल पुढें पडण्यासाठीं गेलीं वीस पंचवीस वर्षें खाजगी रीतीनें ते जी जीवापाड मेहनत करीत आहेत तीमुळें हे चालू पिढीचे पुढारी असा स्वाभाविक समज झाला आहे. अशा रीतीनें लोकाग्रणीत्वाप्रत पावलेल्या असामान्य पुरुषाच्या वर्तनाची प्रसंगविशेषीं बरीच चर्चा व्हावी, यांत विशेष आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, ज्याची विद्वत्ता, ज्याचे विचार, ज्याचें आचरण, ज्याचें बुद्धिसामर्थ्य, ज्याचा स्वभाव वगैरे गोष्टी लोकांस चांगल्या माहीत झाल्या आहेत त्याचे अमूक प्रसंगीं अमूक प्रकारचें वर्तन होईल अशी अटकळ लोक बांधतात; आणि त्या अटकळीविरुद्ध त्याचें वर्तन झालें म्हणजे त्यांची निराशा होऊन त्यास ते दोष देऊं लागतात." न्यायमूर्तींच्यावर टीका करतांना तिचें कारण सादर करण्याची ही आगरकरांची तऱ्हा पाहिली म्हणजे स्पष्टवक्त्या व किंचित् 'खोडसाळ' म्हणून गाजलेल्या आगरकरांना रानड्यांच्याबद्दल अंतःकरणपूर्वक नितान्त आदर वाटत होता हें स्पष्ट होतें व आपलें विद्यालयीन शिक्षण संपविल्यानंतर लोकशिक्षणास स्वताला वाहून घेण्याचा निश्चय कळवून न्यायमूर्तींचा सल्ला टिळकांच्या बरोबर आगरकरांनीं पत्रद्वारां घेतला; आणि रानड्यांनीं राष्ट्रीय उत्थापनासाठीं राष्ट्रीय सामायिक, राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय प्रार्थनामंदीर यांची आवश्यकता प्रतिपादन केली असतां आपल्या प्रकृत्यनुसार पहिलीं दोन अंगें आगरकरांनीं नेटानें चालविलीं, हें साहजिक वाटतें. फार काय, रानड्यांची गुणशालीनता रागरंगानें माहित असल्यामुळेंच, आगरकरांनीं गोपाळ कृष्ण गोखल्यांना रानड्यांच्या सुपुर्त केलें व भारताचा ग्लॅडस्टन होण्याची अपूर्व संधि देऊन रानड्यांचा गुरुप्रभाव दिगंतरीं गाजविला. यावरून असें समजण्याचें कारण नाहीं कीं, रानड्यांबद्दल आदर ठेवून जसे आगरकर प्रसंगविशेषीं टीका करीत, तसे आगरकरांविषयीं कौतुक असूनही रानडे त्यांना फैलावर घेत नसत. ते जरूर घेत. असा सुप्रसिद्ध प्रसंग म्हणजे १४ मे १८८५ रोजींचा. डेक्कन कॉलेजचें (केसरी वर्ष ५ अंक २० पहा) संमेलन होतें. त्यावेळीं भाषण करतांना "ईश्वर नको" वगैरे प्रतिपादन आगरकरांनीं केलें व टिळकांनीं पाठिंबा दिला. तोंच शांतिसागर रानडे रागावले व उसळले कीं— "तुम्ही अलीकडची मंडळी स्पेन्सर व मिल्ल वाचतां आणि तुमची नीतिमत्ता बिघडते!" या वेळींही रानड्यांना परत आहेर मिळाला नसता, असें नाहीं; पण

वि. मो. महाजनींनीं आगरकरांच्या नीतिमत्तेची साक्ष भरली व तो मामला टळला.

रानडे–आगरकरांच्या आयुष्यांतील हे सार्वजनिक प्रसंग सोडले तर गृहस्थिति हयात, बुद्धिमत्ता, सांपत्तिक स्थिति, लोकादर, सरकारी मानमान्यता, कीर्ति– कोणत्याही तऱ्हेनें विचार केला तरी रानड्यांच्यापुढें आगरकर म्हणजे षड्गुणैश्वर्य नारायणांपुढें ध्रुवबालक होय. सरकार, समाज, रूढी यांच्याशीं लघुतम विरोधाच्या धोरणानें चालणारे 'भले बुद्धीचे सागर' न्यायमूर्ति आणि उपरिउल्लेखित घटकांशीं वेळप्रसंगीं तुसडेपणानें वागणारे "चैतन्यसंचारक" आगरकर या दोहोंचीही गरज राष्ट्राला होती. भांबावलेल्या अर्जुनाला विश्वरूपदर्शनाचा आनंद देणाऱ्या कृष्णाप्रमाणें, हतबुद्ध झालेल्या व निराशेच्या काळोखानें ग्रासलेल्या हिंदुस्थानाला भाग्यशालीपणाचें दर्शन रानड्यांच्या द्रष्टेपणानें करवलें तर आगरकरांनीं सामाजिक सुधारणेंचा जो धूमधडाका उठविला त्यानें हात जोडून बसलेल्या भारताची महाराष्ट्रीय नाडी जिवंतपणाचे तणावे देऊं लागली. तथापि या मोठ्याछोट्या कामगिरींना मूळ असलेलीं अंतःकरणें बरीक सारखींच विशाल, उदार व निष्पाप होतीं. एकच गोष्ट अशी आहे कीं, तौलनिक अभ्यासानें येथें कृतज्ञतांजली जोडावी आणि भविष्यानें आपलें डोळे आशेला लावावे. एवढ्याचकरतां जग म्हणत असतें कीं धन्य रानडे, धन्य आगरकर, धन्य महाराष्ट्र !

प्रकरण ३ रें

# शास्त्रीबुवा आणि आगरकर

" स्वतांचें हित साधणें हा जीवितास शोभण्यासारखा हेतू नाहीं. "

—बेकन

" देशी भाषांवरून ज्यांचा विश्वास उडाला त्यांचा स्वतः आपल्यावरूनच विश्वास उडाला असें म्हटलें पाहिजे. देशी भाषेवरील अप्रीति हें राष्ट्रीय अधोगतिचें लक्षण होय. "

—महात्मा गांधी

स्वामी विवेकानंदानीं म्हटल्याप्रमाणें " बहुजन—समाजांत शिक्षणाचा प्रसार करणें हेंच हिंदुस्थानच्या उन्नतीचें महत्त्वाचें साधन आहे " अशी अंतःकरणाशीं खूणगांठ बांधून आपल्या चरित्राचा ओघ त्या दिशेनें अनिरुद्ध वाहविणाऱ्या महाराष्ट्राच्या कर्तबगार पुत्रांपैकीं चिपळूणकर—आगरकरांच्या चरित्रपटावरून तफावतीचा पट्टाचा पट्टा पसरलेला आढळतो. तत्रापि अभ्यासू मनाच्या चिकित्सक चष्म्याला आणि पाताळयंत्री नजरेला ते दोन्ही प्रवाह क्वचित एकरूप झालेले तर कधीं कधीं संगतीसोबतीने वाहिलेले दिसल्याशिवाय रहात नाहींत.

अगदीं उगमाचेंच छायाचित्र घ्यावयाचें म्हटलें तरी सदर दोन चरित्रपटांची तुलना आशिया—यूरोपखंडावरील जपान—इंग्लंडच्या नकाशाप्रमाणें भासते. दोघांहि महाराष्ट्रीय रत्नांचा जन्म शास्त्रीकुळांत झाला होता खरा, पण चिपळूणकरांच्या येथें प्रसन्न गंभीरतेनें सरस्वती धो धो वहात होती, तर आगरकरांच्या घरीं ती जवळ जवळ अदृश्य झाल्याकारणानें भगीरथ प्रयत्नानें तिला प्रसन्न करून घेऊन त्यांना पावन व्हावयाचें होतें. समृद्धिच्या वसंत ऋतूंत कौतुकाच्या आजोबांनीं सरस्वती कांठची शोभा चिपळूणकरांना दाखवून शिस्तीची चालही लावली होती; पण आगरकरांना गरीबीच्या थंडीनें कुडकुडत कुडकुडत आजीमामांच्या मायेच्या उबाऱ्यानें कसातरी तो रम्य प्रदेश डोळ्यांखालून आणि पायांखालून घालतां आला. प्राचीन संस्कत विद्येला अर्वाचीन आंग्ल विद्येची जोड देऊन मान्यतेचा व्यवसाय पत्करल्यामुळें कृष्णशास्त्र्यांना आपल्या व्यापाराखालीं चिरंजीवाकडे बघण्याला फुरसद नव्हती, तर येथून तेथून सारी फुरसद असतांना देखील मूळापासून सारें गुडघाभर पाणी असल्याकारणानें स्वतःच्या चिरंजीवाची विचारपूस करणें गणुआप्पांना शक्य नव्हतें. तथापि आयुष्यांतील हा पंचपंच उषःकाल चिपळूणकरांनीं जसा जिवाभावाशीं गुजगोष्टी करून हुषारीनें काढला तसाच आगरकरांनींही खेळीमेळीच्या सख्यासंवगड्यानिशीं मोठ्या उत्साहानें घालविला.

विद्यामृतपानाचा माध्यान्हकाळ मात्र डोळ्यांत बोट घालवयास लावतो. म्हणजे धाकट्या बाईसाहेबांच्या ठाकठिकीनें चिपळूणकरांना कल्पवृक्षाची छाया

लाभली होती, तर आक्कासाहेबांच्या कृपाकटाक्षानें आगरकरांचा जामानिमा चालला असल्यामुळें त्यांचें घर उन्हांत बांधलें जाऊन सावलीनें पायाचा आश्रय केला होता; तेव्हां त्यांना पायांपुरतें पहातां पहातांच पुरें झालें! जरा निराळ्या शब्दांनीं बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, "ज्याप्रमाणें डॉक्टर जॉन्सन बापाच्या दुकानावर बसून फावल्या वेळीं अनेक विषयांवरील व्हाल्मेच्या व्हाल्मे फडशा करी त्याप्रमाणें 'दक्षिणा प्रैज कमिटी' किंवा 'नेटिव्ह प्रेसचे रिपोर्टर' या नात्यानें कृष्णाशास्त्र्यांकडे जीं पुस्तकें येत तीं हे भावी शास्त्री वाचून टाकीत. या रीतीनें मॅट्रिक्युलेशन होण्यापूर्वीं विष्णुपंताच्या नजरेखालून अनेक ग्रंथ जाऊन मराठी भाषेवर त्यांचें प्रेम जडलें व तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें." शिवाय स्वतःच्या विद्वान वडिलांकडे येणाऱ्या विद्वदग्रणींच्या विचार–विनिमय–श्रवणाचा योगही चिपळूणकरांना कमी आला नाहीं. या बाबत आगरकरांहातीं तांब्या मूळापासून उपडा होता. कऱ्हाडपासून रत्नागिरी नी अकोल्यापर्यंत त्यांना उन्हातान्हाची पायपीठी करावी लागलीच लागली. आणि वर शागीर्दगिरीचा व खर्डेघासीचा घाम गाळावा लागला. तळ काढणाऱ्या चिकट बुद्धिला बरीक भावी आयुष्याची पडछाया म्हणून एवढेंच हाताशीं लागते कीं, विष्णुपंताप्रमाणेंच गोपाळरावांनाही मराठीचें प्रेम याच वयांत लागलें होतें.

विद्यार्थीदशेचें शिखर चढण्यांतही गोपाळरावांची पहिल्या पायंड्याइतकीच तिरपीट उडाली. कांहीं धांवाधांव करून कसेंबसें लक्ष्मीचें दर्शन त्यांना घ्यावें लागें; हें तर झालेंच, पण एका सदऱ्यावर दिवस निभावून न्यावे लागल्याकारणानें अभ्यासाच्या चढत्या कमानीनें हेळसांडलेल्या तकव्याला ताण बसून अनुवंशिक दम्यानें त्यांच्या डोक्यावर कायमचा वरदहस्त ठेवला. उलटपक्षीं निश्चित स्थळीं विराजमान व्हावयास चिपळूणकरांनीं वाजवीपेक्षां जास्त दिवस घेतले खरे, पण लक्ष्मीची लगाम हातीं असल्याकारणानें ग्रंथालयांतील ज्ञानभांडार लुटण्यासाठीं त्यांनीं मजल दरमजल घोडदौड चालविली होती.

ध्येयाच्या ध्रुवस्थानीं लोकशिक्षणाचा तारा दोघांनींही धरला असल्याकारणानें विश्वविद्यालयाच्या पदवी–बंदरहून सुटलेल्या दोघांच्या आयुष्य नौका त्या दिशेनेंच पाणी कापीत चालल्यास नवल काय? तसें करतांना दोघांनींही शिक्षकत्वाचें शीड उभारलें; पण तेंच खाजगी व सरकारी, नौकरीच्या खिळ्यामोळ्यांनीं प्रारंभीं सजविणाऱ्या चिपळूणकरांना शेवटीं स्वाभिमानपूर्वक स्वार्थत्यागाच्या खंबीरतेवर चढवावें लागलें, तर अगोदरच अंगवळणीं पडलेल्या दारिद्र्याच्या दोरखंडांनीं आरंभापासूनच स्वार्थत्यागाच्या रसायनांत रंगवून त्याची सजावट आगरकरांनीं केली होती. आतां बारीक बघणाराला त्यांतही शास्त्रीबुवांचा हातभार होता हें गुंडाळून कसें चालेल? अर्थात आगरकर–चिपळूणकर वर्गातल्या खुर्चीवर बसलें कीं, अगदीं निराळ्या पंखी. नावडीचा विषय पदरांत पडला तर शास्त्रीबुवा धोतर झाडायला कमी करावयाचे नाहींत, आणि प्रसंग पडला असतां तर आगरकरांनीं तेंच वळण मारलें असतें. पण आवडीच्या विषयांवर दोघेही असे रंगत कीं, 'शेक्सपीयरमध्यें गॅरिकनें काय रंगावें!'

विद्यार्थ्यांविषयीं निर्व्याज प्रेम दोघांच्याही अंतःकरणांत तुडुंब भरलेलें! आणि परीक्षेला 'दादाराम बाबाराम' करण्याची कला दोघांच्याही करड्या कटाक्षाची. इतकेंही करून दोघांची घाटणी निराळ्याच घाटाची. एक आपण बरा की आपला विषय बरा, तर दुसरा आपल्या विषयाच्या अनुषंगानें पृथ्वीप्रदक्षिणा करणारा. नियामितपणानें दोघांत पंक्तीप्रपंच केलेला आणि त्याच्या भरीला एकाच्या वर्गांत महापर्वणीच्या गंभीरतेनें समुद्रस्नान घडे, तर दुसऱ्याच्या वर्गांत दिवाळीच्या हास्यविनोदाचें मंगलस्नान होई. उघडच, हुशारीच्या करामतीस एकामुळें भरती तर लौकिक बुद्धिवादाच्या वेदीवर दुसऱ्याची आरती. बाकी बांधल्या शिदोरीच्या आशाळभूतांची दोघांहीबाबत आपली जितक्यास तितकीच कळी खुलावयाची.

लोकशिक्षणाच्या लागवडींत शिक्षकत्वाचा शेर उशिरा मिळतो. लेखणीच्या ललाटीं मात्र भविष्याच्या भाग्याप्रमाणें वर्तमानाचें वैभवही रेखाटलेलें असतें. प्रसंगविशेषीं कराव्या लागणाऱ्या वाग्युद्धांत वक्तृत्वाचा धूमधडाका जितका परिणामकारक त्यापेक्षांही लेखणीची धार आठवण ठेवविणारी. चिपळूणकर–आगरकरांच्या चिरस्थायी कर्तबगारीचा साकल्यानें विचार करतांना त्यांनीं गाजविलेल्या लेखणीच्या पराक्रमाइतकें दुसरें कांहींच उठावानें विलसत नाहीं. "आमच्या महाराष्ट्रांत आपल्याच लेखणीच्या प्रखर विद्युच्छक्तीनें जीवचेतना ओतणारे धन्वंतरी जर कोणी झाले असतील तर ते कै. चिपळूणकरशास्त्री व त्यांच्यामागें प्रिं. आगरकर होत यांत संशय नाहीं." शब्दसृष्टीच्या ईश्वराची ही योग्यता यावयाला चिपळूणकर–आगरकरांनीं तपही तसेंच केलें होतें. शालापत्रकाच्या सरबराईत शास्त्रीबुवांनीं मराठी मोड घातली होती तर बक्षिसाचे निबंध आणि वऱ्हाडसमाचाराची सहामाही उमेदवारी यांनीं आगरकरांच्या लिखाणाचें 'सूत–उवाच' केलें होतें. अशा मार्गांनीं बसलेल्या वळणानें लेखणीच्या संचाराला सुरवात झाली ती तडफेची, धडाडीची, आवेशाची. आंग्लाईचें आसन स्थिर झाल्यापासून महाराष्ट्रांत मातृभाषेच्या मानेवर साऱ्या सुशिक्षितांनीं इंग्रजीचा खडा दिला होता. "ही अनिष्ट स्थिति नाहींशी करण्याचें श्रेय एकट्या कोणास द्यावयाचें झाल्यास तें शास्त्रीबुवांना दिलें पाहिजे." राजकीय, सामाजिक, औद्योगिक वाटेल त्या वाङ्मयात्मक जंगलांत निवांत वागडणाऱ्या लेखणीच्या वनगर्जनेनें आणि रणगर्जनेनें महाराष्ट्र दणाणून सोडणाऱ्या चिपळूणकरांची योग्यता आगरकरांसारख्या खंद्या लेखकाकडून "महाराष्ट्रवाणीचा पति" म्हणवून घेण्याइतकी होती हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. आगरकरही शास्त्रीबुवांच्या जवळ पाण्याला उतरले होते, म्हणूनच मासिकापेक्षां साप्ताहिकांतील उथळपणाबद्दल आठ्या घालणाऱ्या शास्त्रीबुवांनीं केसरीसारखें नूतन साप्ताहिक पहिल्यापासून आगरकरांच्या हवालीं केलें. आगरकरांनींही आपल्या तालमीचें नांव बरोबर सांगितलें. शास्त्रीबुवांच्या इतक्या तडफदार तेजस्वितेनें आगरकरांच्या जोमदार लेखणीनें बहारीची कसरत केली, आणि शास्त्रीबुवांनीं सुरू केलेला मराठीचा संस्कृतप्रधान सांप्रदाय जोमानें फैलावला. तथापि चिपळूणकर–आगरकरांच्या लेखनकलेची ढब किंवा बैठक एक असली तरी कित्येक ठिकाणीं आरास मात्र

निराळी आहे. उपमेनेंच बोलावयाचें तर शास्त्रीबुवांचें लिखाण म्हणजे मेकॉलेची मुलूख–मैदान. अर्थातच त्यांत भरलेलें अंतःकरण आणि तेजस्वी तडफ यांबद्दल सादर कौतुकानें बोलावेसें वाटतें. तर क्वचित् डोकावणाऱ्या हेकेखोर एककल्लीपणाबद्दल कधीं कधीं मानेला हिसडा बसल्याशिवाय रहात नाहीं. आगरकरांच्यामध्येंहि एककल्लीपणा कमी नाहीं; पण तो बुद्धिवादाचा; त्यामुळें मेंदूला शिणवटा झाल्यावांचून नाक मुरडत नाहीं. दोघांच्याहि लिखाणाजवळ दुसऱ्याच्या अंतःकरणावर मोहिनी टाकण्याचा गुण अजब; आणि म्हणूनच नितांतरमणीय सृष्टीवर्णनें व इतर काव्याचे उत्कृष्ट नमुने एकमेकांच्या नांवावर विकण्याजोगे दोघांच्याही हातून उतरले आहेत. विनोदांत आणि कोट्यांत तर काय एकाला लपवून दुसऱ्याला काढावा. ‘धांवत्या’ विनोदापासून तों ‘गंभीर’ विनोदापर्यंत सर्व रम्य प्रकार दोघांच्याहि लिखाणात सांपडतात. तथापि ‘शालजोडींतून नेमकें मारण्याचें कसब’ शास्त्रीबुवांपेक्षां आगरकरांच्या हातचा मळ! स्वमतमंडनाच्या अभिमानाला पेटून दोघांनींहीं प्रतिपक्षाचें आडवे उभे लंबेचवडे केले खरे; पण पाताळयंत्री परीक्षक असेंच ठासून म्हणणार कीं, शास्त्रीबुवांचे प्रतिपक्षांवरील आघात कित्येक वेळां गनिमीकाव्याचे आहेत तर आगरकरांनीं बहुतकरून धर्मयुद्धाच्या नियमाचा अवलंब केला आहे. तें कसेंही असलें तरी ‘ज्याप्रमाणें प्रख्यात फ्रेंच ग्रंथकर्ता व्होलटेर यानें एकदां कोरडा उचलला म्हणजे स्टाकहोम व रोम, आणि पीतर्सबर्ग व लिस्बन यांच्या दरम्यान चटसारी मंडळी चळचळ कांपत असे, त्याप्रमाणें शास्त्रीबुवांनीं लेखणी उचलली कीं, रावसाहेब, रावबहादुरे, रेवरंडे, सरस्वती यांची पांचावर धारण बसे.’ आणि आगरकर तरी काय होतें? ह्यांच्या लेखणीच्या फेकी एकदां सुरू झाल्या कीं, सोंगढोंगबोंग्यांना आणि निरर्थक रूढींना नेसूंचें धुवावयास टाकण्याची पाळी यायची! या वाक्यांत जो एक ‘पणा’ आहे त्याचेंच तेवढें गालबोट शास्त्रीबुवांशीं तोलून पाहतां आगरकरांच्या लिखाणाला केव्हां केव्हां बेडौल-पणानें लागलेलें आढळतें. इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची यातायात केली तरी निर्मळ मनानें हें कबूल केलेंच पाहिजे कीं, आगरकरांनीं म्हटल्याप्रमाणें शास्त्रीबुवांच्या निबंधमालेला ‘स्फुरत्कला अपविलास कोमला’ हें बाणकवीचें वर्णन हुबेहुब लागतें तर खुद्द आगरकरांनीं महाराष्ट्रभाषेवर चढविलेल्या लिखाणसाजाला “ललितललितै-र्ज्योत्स्नाप्रायैरकृत्रिमविभ्रमैः’ रंजविल्याबद्दल धन्यवाद दिले पाहिजेत.

इतक्या वेड लावणाऱ्या अमूल्य चिजा मायभाषेच्या पदार्थ-संग्रहालयांत चिपळूण-कर–आगरकरांना मांडतां आल्या याचें कारण त्यांत त्यांनीं आपलें अंतःकरण खर्चिलें होतें. आणि असें करणें अगदीं साहाजिक होतें. कारण चिपळूणकर–आगरकरांची योजना एकेका विशिष्ट कार्यासाठीं झाली होती. समाजाच्या माथीं दिमाखानें विरजणाऱ्या समंजस शहाणपणाच्या गंगेंत आंग्लाईच्या भुलाईची धुंदी मिसळून आपुलकीच्या अभिमानाचे झरे आटण्याची वेळ आली होती. शास्त्रीबुवांना त्याचें शुद्धिकरण करावयाचें होतें. त्यासाठीं ‘योग्य अभिमानपूर्वक जुन्या संस्कृतीचा

उद्धार करण्याकडे आणि राष्ट्राचा आत्मविश्वास वाढविण्याकडे' त्यांनीं आपल्या लेखणीचा उपयोग केला. त्याला इतकी कडेलोट फळें आलीं कीं, 'इंग्लिश लोकांच्या उत्कर्षाचाच नुसता हेवा करण्यापेक्षां त्यास कारणभूत जे त्यांचे अनेक गुण त्यांचा मत्सर करणें फार समंजस व हितावह आहे.' हा शास्त्रीबुवांचा संदेश लोक अजी विसरले, आणि म्हणूनच शास्त्रीबुवांच्या या संदेशाला चालना देऊन तदनुरोधानें सामाजिक सुधारणेचें कंकण आगरकरांना बांधण्याची प्रेरणा झाली कीं काय असा अनेक वेळ भास होतो. कसें कां असेना, 'स्वदेशाभिमान झाला तरी सत्याचा अपलाप करून आपलीच शेखी मिरवणें निंद्य आहे' हें मनीं पक्कें ठसल्यामुळें आपली कामगिरी आगरकरांनीं इतकी उत्कृष्ट बजावली कीं, पाश्चात्य संस्कृतीचे मराठी भाष्यकार या पदवीला ते चढले. स्वाभिमानपूर्वक सामाजिक पुनर्रचनेवर राष्ट्रीय स्वातंत्र्याची इमारत उभारली पाहिजे. अशा तऱ्हेचा विचारौघ जो तरुण महाराष्ट्रीय मनांतून वाहतांना आढळतो. त्याचा उगम इतिहासाच्या दृष्टीनें चिपळूणकर–आगरकरांच्या कामगिरींतच नाहीं काय?

देशोन्नतीची आपली कामगिरी करायला निघतांना 'अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून' शास्त्रीबुवा निघाले होते. त्यामुळें निबंधमालेच्या वाढत्या वयाबरोबर त्यांचीं मतें बाहेर पडतांच "स्वातंत्र्यशत्रू आणि स्तुतिप्रिय अशा अधिकाऱ्यांशीं त्यांचें तेढ पडूं लागलें" व त्यांना नोकरीवर उदक सोडावें लागलें याबद्दल दिक्कत वाटली नाहीं. हाच पीळदारपणा आगरकरांतही असल्यामुळें, नाहीं नाहीं ते सोहाळे झाले असतांही "इष्ट असेल तें बोलणार आणि साध्य असेल तें करणार" या ब्रीदवाक्यापासून ते रतिभरही चळले नाहींत.

पण हें सारें पुराण वाङ्मयात्मक कर्तबगारीच्या एक खांबी तंबूपुरतें. शास्त्रीबुवांच्या राजवटींत औद्योगिक चळवळीसाठीं आर्यभूषण, चित्रशाळा आणि किताबखाना यांची उभारणी म्हणजे त्यांच्या अवघ्या बत्तीस वर्षांच्या हयातींतील जातीवंत कर्तबगारीचा चालता बोलता चित्रपटच होय. दारिद्र्याच्या असिधाराव्रतामुळें असो कीं अन्य कांहीं कारणानें असो, चाळिशीची मजल मारीत आलेल्या आपल्या हयातींत आगरकरांना अशा तऱ्हेचें शास्त्रीबुवांसारखें 'गजांतलक्ष्मीचें ऐश्वर्य' राष्ट्रीयदृष्ट्या उभारतां आलें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय.

ही एवढी मुरड सोडून दिली, आणि कर्मभूमींतून धर्मभूमींत प्रवेश केला तर आपल्या हातीं काय लागतें? शास्त्रीबुवांसंबंधीं विचार करतां "ज्याला ज्याला म्हणून 'हिंदु' हें विशेषण लावतां येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे" हें खरें, आणि प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरेवरही त्यांनीं सडकून टीका केली हेंही खोटें नाहीं; तथापि शास्त्रीबुवांना तरी भटा-भिक्षुकांचा किंवा त्यांच्या कर्मठपणाचा अभिमान मनापासून कोठें वाटत होता? त्यांची इंग्रजी संस्कृतीवरील श्रद्धा व तिला साजेसें कृतीचें स्वरूप हीं लक्षांत आणलीं म्हणजे त्यांनीं केलेली प्रार्थनासमाजाची वगैरे निंदा "केवळ त्यांच्या देशसुधारणेच्या चुकीच्या मार्गासंबंधानें, मतांच्या संबंधानें नव्हे"

हा शास्त्रीबुवांच्या चरित्रकारबंधूंनीं दिलेला निर्वाळा पटतो आणि शास्त्रीबुवांच्या लेखांचें मार्मिक अध्ययन करणाराला तर शास्त्रीबुवांच्या एकेश्वरी मताचें विश्वरूप-दर्शन झाल्याशिवाय रहात नाहीं. शास्त्रीबुवांची ही कथा; तर आगरकरांचें कीर्तन अगदींच वेगळें. " हिंदुधर्मास जाहीर नोटीस " देणाऱ्या या बहाद्दराला हिंदुधर्मीचीं तत्वें अमान्य नव्हतीं. पण प्रचलित हिंदुधर्म मान्य नव्हता. आणि प्रार्थनासमाजा-सारख्या नव्या पंथावर जरी त्यांनीं टीकेचे कांटे पसरले नसले तरी तिकडे चुकूनही पाऊल फिरवल्याचें माहित नाहीं. " आम्हीं चालू हिंदुधर्मावर कितीही तीक्ष्ण प्रहार केले तरी आमचा देश ख्रिस्ती व्हावा ही नुसती कल्पनाही आम्हांस सहन होणारी नाहीं." या आगरकरांच्या वचनानें तर त्यांची 'धर्मप्रीति' विशेष स्पष्ट होते. तथापि इतकें खरें कीं, " कांहीं जगत्कारण " म्हणून आहे या पलिकडे त्यांचा फारसा विश्वास नव्हता आणि खुद्द ईश्वरासंबंधानें तर त्यांचा संशयवाद नास्तिक्याकडेच कलता होता.

"आपल्या देशांत जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं मोठीं कारणें झालीं आहेत. दुसरा प्रकार जातिभेदाचा; यानें तर या राष्ट्राची फूट अतिशयच पाडली आहे. अठरा पगड जातीस अठरा टोपकरांनीं गुंडाळून टाकलें व साऱ्यांच्या हातीं सारखींच करवंटी दिली. पण लोकांचे अजून डोळे उघडत नाहींत." शास्त्रीबुवांचें हें जातीभेदासंबंधाचें मत किंवा लोकभ्रमादि निबंधांतून ध्वनित झालेलीं त्यांची साजाजिक सुधारणेंसंबंधाचीं मतें काळजीपूर्वक टिपणारास शास्त्रीबुवा "वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते " हें कळून चुकेल. " इतकें खरें आहे कीं ते या विषयांच्यासंबंधानें फारसे कधीं लिहित नसत; पण लिहूं लागल्यास वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींही भीत नसत. " पण एवढ्यानेंच शास्त्रीबुवांच्या अंतरंगाचें प्रतिबिंब पुरें होत नाहीं. "आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्री-बोवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तीळतीळ तुटे. पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत. लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. " शास्त्रीबुवांच्या या आगरकरांनीं रेखाटलेल्या चित्राशेजारीं लोकमान्यांनीं रेखाटलेलें आगरकरांचें चित्र ठेवलें तर चित्तवृत्ती गुंग होऊन " हें चित्र पहा आणि हेंही चित्र पहा " असे सहज उद्गार निघतात. कारण लोकमान्य म्हणतात, " १८८८ सालापर्यंत केसरींत जे राजकीय विषयावर लेख आले ते बहुतेक आगरकरांचे आहेत आणि त्यानंतर सुधारकांतही अशा प्रकारचे बरेच निबंध आले आहेत; या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें दिसून येईल कीं, आगरकर हे पक्के स्वराज्य-वादी होते. . .राजकीय व औद्योगिक अवनति पाहून त्यांचें चित्त केशवपनादि चालींच्या निरीक्षणापेक्षांही अधिक संतप्त व दुःखित होत असे, व याला मिल्लस्पेन्सर यांनीं प्रति-

पादन केलेल्या स्वराज्याच्या तत्त्वाखेरीज दुसरा उपाय नाहीं अशी त्यांची पक्की खात्री झाली होती. जो तार्किकपणा समाजसुधारणेसंबंधानें त्यांच्या अंगीं वसत होता तोच तार्किकपणा त्यांनीं राजकीय बाबींवरील आपल्या लेखांतही पूर्णपणें उपयोगांत आणला आहे. . ज्यांना बाकीच्या बाबती पहावयाच्या नव्हत्या त्यांना सगळा आगरकर नको होता. किंबहुना तो त्यांच्या पचनींही पडला नसता. "

" ज्याप्रमाणें एखादा प्रचंड वृक्ष फळास येतो आहे नाहीं तोंच विद्युत्पात होऊन तो जमीनदोस्त व्हावा, त्याप्रमाणें शास्त्रीबुवांच्या बुद्धीचीं परिपक्व फळें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं तों त्यास करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग ! " हे शास्त्रीबुवासंबंधाचे आगरकरांचे दुःखोद्गार त्यांच्या स्वतःच्यासंबंधींही तितकेच खरे नाहींत काय ? हा जसा एक योयायोग तशीच त्यांच्या प्रकृतीची मूसही एकच पडली होती म्हटलें तरी चालेल; मग त्यांत थोडासा सृष्टिकर्त्याच्या हातगुणानें शिरकाव केला असल्यास विशेष लक्षांत घेणें नाहीं. कारण दोघांतही मताविषयीं अभिमान आणि कार्याविषयीं निष्ठा एका कसाच्या होत्या. अंतःकरणाची विशुद्धता आणि निर्व्याज देशभक्ति दोघांजवळही पहिल्या प्रतीच्या होत्या. शास्त्रीबुवांचें वाचन आणि आगरकरांचें मनन यांत कोण अधिक हेंच ठरविणें मुष्कील ! दोघेही निर्भय खरे, पण त्यांतल्यात्यांत शास्त्रीबुवा किंचित् भिडस्त, तर गुरुगौरवार्थही आगरकर स्पष्ट बोलण्यास न भिणारे. दोघांच्या प्रकृतीचे फांसे किंचित् कोन करून असे पडले असले तरी दोघांची विद्वत्ता, शुद्ध शील, कुरेंबाजपणा, लोककल्याणाची तळमळ, आणि उज्वल स्वार्थत्याग हीं कोणासही हार जाणारी नव्हत; या अमोलिक गुणांचा उपयोग आपल्या टीचभर हयातींत दोघांनींही देशोन्नतीच्या कामीं करून केला हें लक्षांत ठेवून दोघांच्याही चरित्राचें सार इमर्सनचे भाषेंत एवढेंच घ्यावयाचें कीं, " नाडीच्या ठोक्याबरोबर नवजीवन आणि रामपाऱ्याबरोबर नवा दिवस आपल्या पदरांत टाकणाऱ्या, झाल्या गेल्या भूतकालावर एक क्षणही न लवंडतां घंट्याघंट्याला टवटवणाऱ्या आणि आपणां सर्वांवर आपली छाप ठेवणाऱ्या निसर्गदेवतेच्या पावलावर पाऊल टाकून सत्याचा व कल्याणाचा संग्राहक खोड्यानाड्याचा नायनाट कर्ता, मानवी घटनेचा पुनर्रचनाकार असा सुधारक जर माणसानें बनावयाचें नाहीं, तर त्यानें जन्माला यावें तरी कशाला ? "

प्रकरण ४ थें

# लोकमान्य व आगरकर

Great men stamp their own mind upon their age and nation.
Smiles.

लोकमान्य आणि त्यांचे परम स्नेही गोपाळराव आगरकर या दोघांचे चरित्र-पट डोळ्यापुढें एकाच वेळीं उभे राहिले म्हणजे अगदीं पहिल्या प्रथम जी गोष्ट मनःपटावर चमक मारते ती म्हणजे टिळक हे अखिल भारतवर्षाचे होते व आगरकर महाराष्ट्राचेच तेवढे होते, ही होय. परंतु देवदयेनें त्यांतल्या त्यांत जें दीर्घायुष्य एकाला लाभलें तें दुसऱ्याला लाभतें तर कदाचित् भोळ्या नजरेला दिसणारा सकृद्विरोध आमूलाग्रच उडला असतां. तथापि त्या दोन महर्षींत मनावर ठाणें देऊन बसणारे विरोधही कांहीं कमी नाहींत. टिळक सुखवस्तु मातापितरांच्या पोटीं जन्माला येऊन साधारणपणें सुखांतच वाढलेले, तर आगरकर दारिद्र्याच्या दरींत जन्मून आमरण तेथलाच सुखसोहळा पाहिलेले. पुण्यासारख्या शहरांत, विद्वत्तेच्या छत्रांत टिळकांचें विद्यामृतपान झालें, तर कऱ्हाडसारख्या खेडेगांवीं तुटपुंजी विद्या करून तिच्या आकंठ पानासाठीं शागीर्दगिरीचीं दिव्येंहि आगरकरांना करावीं लागलीं. पुढें लोकशिक्षणाच्या एकाच व्यासपीठावर जरी दोघेहि देशभक्त होते, तरी टिळकांना, पुष्कळ अंशीं स्वतःच्या इच्छेविरूद्ध, आरंभीं हातीं धरलेला शिक्षकाचा सात्विक व एकमार्गी व्यवसाय सोडून राजकीय चळवळ्याचा अनेकरूप व्यवसाय पतकरावा लागला, तर आगरकरांचे शिक्षकत्वाचे मनोरथ परिपूर्ण झाले. वृत्तपत्रकार या दृष्टीनें पाहतां, टिळकांना प्रथम इंग्रजी मराठ्याचे संपादक होऊन नंतर प्रसंगवशात् केसरीचे संपादक व्हावें लागलें, तर आगरकरांनीं आमरण केसरी–सुधारकांचें मराठी संपादकत्वच केलें. शेवटीं टिळक आपल्या हयातींतच लोकमान्यतेची पूजा जनतेकरवीं आपल्या कर्तृत्वानें घेऊन बसले, तर आगरकरांच्या तेजस्वी कर्तृत्वाचें पारितोषिक म्हणून त्यांच्या हयातींतच त्यांची खोटी व हिडीस प्रेतयात्रा निघून हत्येच्या धमक्यांची पुष्पांजलीहि त्यांना मिळाली !

पण उपरिनिर्दिष्ट विरोध पेंचबाज परिस्थितीचा परिपाक होय असें तरी म्हणतां येईल. टिळक आणि आगरकर यांच्यांत निसर्गतःहि कांहीं भेद होतेच. दोघांनाहि हट्टी, क्वचित् हेकेखोरहि म्हणतां येईल; तरी पण तत्वाचरणाच्या व तत्वप्रतिपादनाच्याहि बाबतींत टिळक जनतेच्या चालीनें चालून व जनतेच्या बोलीनें बोलून तिला बरोबर घेऊन चालणारे, तर आगरकर “इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार” असें मानणारे होते; मग जनता बरोबर अगर मागून येवो कीं न येवो त्याची पर्वा नाहीं. सामान्य व्यवहारांत साधारणपणें सौम्य धोरण स्वीकारून टिळक व आगरकर दोघेहि

चालत असले तरी आपलें स्वतःचें वैशिष्ट्य किंवा कांहीं तरी शह म्हणून ठेवण्याची लकब एकाला, तर दुसरा वेळेला मूग गिळून बसावयालाही तयार. " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं " म्हणून एक चालणार, तर कसाही प्रसंग येवो आपलें दोरीसूत चालावयाचें एवढेंच दुसऱ्याला ठाऊक !

तथापि हें झालें प्रकृतिमानापुरतें. विरोधाच्या वर्तुळांत आणखीही कित्येक महनीय चिजा सांपडण्याइतकी प्रस्तुत चित्रपटांची जोडी सुसंपन्न आहे. शिक्षक या नात्यानें विचार केला तरी मोठी बहार पहावयास सांपडते. टिळक मुख्य विषय सोडून ठराविक वेळांत अवांतर गोष्टी फारशा बोलत नसत. विद्यार्थ्यांशीं थट्टामस्करीहि ते कधीं करीत नसत; " तर आगरकर " विषयाला सांभाळून पण हंसत खेळत आणि विनोद करीत शिकवीत. " शिक्षणविषयक शिस्तीच्या बाबतींत वामनरावजी आपट्यांपेक्षां दोघेंहि ढिले असले तरी आगरकर आपट्यांना जवळ तर टिळकांचा झोंक विष्णुशास्त्र्यांच्या वळणावर. टिळक " गणित विषय शिकवितांनाहि फळ्याकडे वगैरे न जातां स्मरणशक्तीच्या जोरावर लांब लांब उदाहरणेंहि तोंडानें सोडवीत, " यामुळें तरतरीत विद्यार्थ्यांस बौद्धिक मिटक्या मारावयाला मिळाल्या, तरी सामान्य विद्यार्थ्यांस टिळकांत एक प्रकारचा तुसडेपणा भासमान झाल्याशिवाय रहात नसे. तेंच, आगरकरांच्या शिकवणींत शास्त्रीबुवांसारखा दुरान्वय नसला तरी " वर्गांत वादविवाद करणें त्यांना आवडत असे व अशा वेळीं मुलांनीं कितीही आक्षेप घेतले, आणि कशींहि प्रत्युत्तरें दिलीं तरी ते कधींहि रागवत नसत. एकाद्या विद्यार्थ्याचें मत त्यांच्या मताविरुद्ध पडलें तरी ते निव्वळ आपल्या अधिकाराच्या जोरावर तें दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत नसत; तर युक्तीनें त्या मुलांस विचार करण्यास लावून त्याचें मत बदलण्याचा प्रयत्न करीत. " अशामुळें आगरकरांच्या वर्गांत सामान्य विद्यार्थ्यांना विषय समजावयाला जड जात नसे. तात्पर्य, टिळक बुद्धिमान विद्यार्थ्यांचे लाल, तर आगरकर सामान्य विद्यार्थ्यांचें प्रेमस्थान. बाकी परीक्षेच्या ताकापुरतेंच अभ्यासाचें रामायण वाचणाऱ्या विद्यार्थ्यांची दोघांवरही भक्ति नव्हती !

आतां शिक्षकत्वाचा शेजार सोडून वर्तमानपत्राचा लेखक म्हणून टिळक-आगरकरांकडे पाहिलें, तरीही रंगभेद दृष्टीस पडतोच. केसरी--मराठ्याच्या जन्मापूर्वी वृत्तपत्रांत लिहिण्यासाठीं म्हणून टिळकांनीं कधीं हातीं लेखणी धरल्याचें आढळत नाहीं. तर डेक्कन कॉलेजांतील शिक्षणाच्या तरतुदीसाठीं सहा महिनेपर्यंत का होईना, वऱ्हाड समाचाराचे थोडेफार रकाने आगरकरांनीं भरून काढले होते. महाराष्ट्रांत दोघांनींहि वृत्तपत्राच्या धंद्याला सन्माननीय स्थान प्राप्त करून दिलें असलें, तरी आगरकरांनीं नुसता मराठी संपादक म्हणून कीर्ति कमावली, तर टिळकांनीं मराठी व इंग्रजी संपादकत्वाबद्दलचा लौकिक आपलासा केला. दोघांचीहि लेखनशैली उच्च प्रतीची यांत शंकाच नाहीं, तरी पण टिळकांच्या लेखनाचें सामान्य गमक " तुटक व ठासलेलीं विधानें " तर आगरकरांच्या लेखनाचें " स्पष्टवक्तेपणा, विनोद व क्वचित् ग्राम्य शब्दरचना. " इष्टार्थाच्या तोलामोलाचे शब्द वापरण्यांत दोघेहि वाकबगार; परंतु टिळकांच्या

शब्दयोजनेंत खांचाखोचा फार, तर आगरकरांची शब्दयोजना सामान्येकरून माडी. प्रतिपक्षावरील हल्ल्यांत, प्रसंग पडल्यास मराठ्यांचा गनिमी कावा लढवूनही, मात करण्यास टिळक माघार न घेणारे, तर आगरकर धर्मराजाप्रमाणें सदासर्वदा सत्याचा व सरळपणाचा जप करणारे. दोघांचीहि भाषा जोरदार आणि सुसंस्कृत आहे खरी, तरी पण त्यांतल्या त्यांत बघणाराला टिळकांचे बहुतेक लेख बुडाशीं बुद्धि बाळगून बसलेले आढळतील तर आगरकरांच्या लेखांत बुद्धि व हृदय यांचा चित्ताकर्षक मिलाफ झालेला दिसेल ! ह्यामुळें, दोघांचेहि लेख जरी पढण्यासारखे असले तरी मराठी भाषेच्या अलंकाराच्या दृष्टीनें आगरकरांच्या निबंधसंग्रहांत विशेष स्वारस्य आहे.

लेखणीच्याच कर्तबगारींत आणखी फिरणें रमणीय आहे. टिळक व आगरकर या दोघांनींही जरी बहुधा सर्व विषयांवर निबंध लिहिले आहेत, तरी ग्रंथकर्तृत्वाच्या बाबत टिळक–आगरकरांत उत्तर–दक्षिण ध्रुवांइतकें अंतर आहे. आगरकरांच्या हातून ग्रंथकर्तृत्व झालें नाहीं असें नाहीं, पण पुष्कळसें परभृत. वृत्तपत्रीं निबंधांतील कांहीं जसे गद्यकाव्याचें उत्कृष्ट नमुने म्हणून दाखवितां येतील तसा प्रकार आगरकरांच्या एकाहि ग्रंथाचा नाहीं; आणि विश्वांतील विचारमय वातावरणाला चालना देणारा ग्रंथ त्यांच्या अल्पायुष्यांत झाला नाहींच नाहीं. आतां आगरकरी ग्रंथांच्या खुर्चांत ' सुरती ' नाहीं असें कोण म्हणेल ? ' वाक्यमीमांसा ' पुस्तकाची मांडणी अगर ' डोंगरींतील १०१ दिवस ' मनावर छाप ठेवतातच, पण ' विकारविलसित ' मनाला भजनीं लावतें आणि त्याची दुर्दैवानें अर्धवट राहिलेली प्रस्तावना कोणाहि मार्मिकास मान डोलवावयास लावते. तरी पण टिळकांच्या ग्रंथकर्तृत्वापुढें आगरकरी ग्रंथकर्तृत्व फिकेंच पडतें. ओरायन आणि आर्क्टिट होम इन दि वेदाज या दोन इंग्रजींत लिहिलेल्या टिळकांच्या ग्रंथांनीं पाश्चिमात्य पंडित नागासारखे डोलूं लागले. लोकमान्यांचा कीर्तिसूर्य त्रिभुवनांत तळपूं लागला आणि हिंदवी बुद्धिमत्तेची चमक पाहून सगळें जग दिपून गेलें. बरें, मराठींत झालेल्या गीतारहस्यानेंही कांहीं कमी गाजविली नाहीं. सदर ग्रंथ स्वतःच्या संग्रहीं नसल्यास महाराष्ट्रीय सुशिक्षितांस तो एक उणेपणा वाटतो; इतकेंच नव्हे, तर या अद्वितीय ग्रंथाचीं भाषांतरें आणि पारायणें परप्रांतांतहि प्रेमळपणानें होऊं लागलीं आहेत. तात्पर्य, आगरकर–टिळकांच्या ग्रंथ-कर्तृत्वासंबंधीं एकाच उपमेंत बोलावयाचें झाल्यास ' पर्वती–पर्वतां ' चे उपमेनें बोलतां येईल.

गीतारहस्याच्याच अनुषंगानें मनाभोंवतीं जें धार्मिक वातावरण उत्पन्न होतें तेथेंहि चमत्कृति आहेच. परमेश्वराच्या अस्तित्वावर लोकमान्यांचा पूर्ण भरंवसा, इतकेंच नव्हे, तर त्याचेंच अधिष्ठान आपल्या चळवळीला असलेंच पाहिजे असा श्रीसमर्थांच्या शिकवणीप्रमाणें त्यांचा आग्रह. मात्र आगरकरांचा खाक्याच सारा निराळा. बुद्धिवादाच्या भरीं भरून, परमेश्वराचें अस्तित्व अजीच उडवून लावणारे असें जरी आगरकरांना सर्वथैव म्हणतां यावयाचें नाहीं तरी पण त्यांच्या संशयवादाचा तोल एकंदरीनें ' नास्तिक्या 'कडेच. आतां धर्माच्या नांवाखालीं कित्येक वेळां जो सावळागोंधळ वावरतांना दिसतो, तो दोघांसहि पूर्ण असंमत आणि दोघेहि न

आचरणारे. तथापि आगरकर लोकांना सणसणीत शद्बांनीं त्यापासून परावृत्त करूं पाहणारे, तर टिळक लोक अज्ञान म्हणून तिकडे दुर्लक्ष करणारे.

वक्तृत्वाच्याहि बाबतींत तोच नमुना. म्हणजे विरोधाचा. निबंधलेखनाप्रमाणेंच विद्यार्थिदशेपासून आगरकरांना वक्तृत्वाची संवय. डेक्कन कॉलिजांत असतांना पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेकडून आगरकरांनीं पारितोषक मिळविल्याचें प्रसिद्धच आहे. पण त्यांनीं सार्वजनिक आयुष्याला आरंभ केल्यानंतर मात्र अवघे दोनदां जाहीर भाषण केल्याचें प्रसिद्धच आहे. पण आनुवंशिक दमा उमटला असल्यामुळें या वेळीं त्यांचा वाक्प्रवाह ' खडकांतून अडखळत अडखळत जाणाऱ्या ग्रीष्मऋतूं-तील ओहोळासारखा भासे. ' टिळकांनीं मात्र आपल्या सार्वजनिक आयुष्यांतच वक्तृत्वाचा अखंड उपयोग केला आणि आपल्या आत्मप्रत्ययाच्या ठसठशीत विधानांनीं देशांत विशेषतः होमरूलच्या वेळीं ' न भूतो न भविष्यति ' अशी जागृति केली. चिकित्सक दृष्टीनें पाहिल्यास अभिजात वक्तृत्व दुर्दैवानें देशाकारणीं लागलें नाहीं, तर आत्मसात् केलेल्या वक्तृत्वानें सुदैवानें अवघा देश हलवला.

नेतृत्वाच्या सिंहासनावर बसण्याचा मान मात्र एकट्या टिळकांचाच. आगरकरांना तो साधला नाहीं आणि सुदैवानें ते अधिक जगते तरी टिळकांच्यासारखा तो खास साधताना. याला कारण दोघांचीं धोरणें. आगरकर सरकारप्रमाणेंच लोकांवरही कडक शद्बांचे कोरडे ओढणार. यामुळें आगरकरांकडे लोकांचा ओढा साहजिकच कमी. तेच लोकमान्य लोकांना राखून परकीय सरकारावर तुटून पडणार. त्यामुळें लोक भजनी लागणार. देशाची दैन्यावस्था दूर करण्यासाठीं व्यापक लोकशिक्षण ही दोघांचीहि दृष्टि; परंतु त्यासाठीं परकीय राज्यकर्त्यांबद्दलच्या असंतोषाचें इंजेक्शन टिळक मारणार, तर आगरकर समाजपुरुषांवर टीकाशस्त्रानें ऑपरेशन करणार. जरा निराळ्या पण अन्वर्थक भाषेनें बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, हिंदभूमीच्या ललाटींचा स्वातंत्र्यतिलक पुसला असतां, आपल्या देशबांधवांवर लाथा झाडणाऱ्या झोंड परकीयांना पुरून उरण्याचा चंग टिळकांनी बांधला होता; तर आपलेच देशबांधव दणकट झाल्यावर त्यांचेकडे पाहण्याची तरी परकीयांची काय छाती आहे ? म्हणून स्वदेशबांधवांस दणगट करण्यासाठीं त्यांचेच कान उपटण्यास आगरकरांनीं कंबर खचली होती. महाराष्ट्राच्या दृष्टीनें पाहतां दोघांच्याही द्विविध कामगिरीची महाराष्ट्राला जरूरी होती, असेंच महाराष्ट्रांत वाहणाऱ्या विचारांच्या वाऱ्यावरून म्हणावें लागतें. दोघांसहि विजयश्रीनें माळ घातली आहे. आणि आगरकरांच्या नांवाखेरीज जसें महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचें एकहि पान उलटणार नाहीं त्याप्रमाणें राजकीय इतिहासांत टिळकांचे नांव पदोपदीं आढळेल.

आतां टिळक–आगरकरांमधील सामान्य छटाहि कांहीं रमणीय नाहींत असें नाहीं. वर येऊन गेले त्या भागांतहि बारीक नजरेच्या तडाक्यांतून त्या सुटावयाच्या नाहींत. पण त्याशिवायही आणखी कित्येक आहेत. दोघेहि विद्यार्थिदशेपासून बाणेदार असून दोघेहि स्वावलंबी, स्वातंत्र्यप्रिय, लोकहितेच्छु आणि अन्यायाची चीड

बाळगणारे होते. दोघांचीहि वृत्ति सदा आनंदी आणि देशाभिमान जाज्वल्य. दोघेहि स्वदेशी व्रतानें चालणारे आणि दिलदार व स्वार्थत्यागी. रामशास्त्री प्रभुण्यांचा निर्भीड स्पष्टवक्तेपणा दोघांच्याहि रोमरोमीं मुरलेला, आणि दोघेहि संसारांत असून निष्काम कर्मयोगामुळें विरक्तालाहि लाजविणारे. अंगीकृत कार्याकरितां डोक्यावर आभाळ कोसळून पडलें तरी दोघेहि न डगमगणारे; म्हणूनच एकानें सरकारी बहिष्काराला भीक घातली नाहीं, तर दुसऱ्यानें सामाजिक तुरुंगाची पर्वा केली नाहीं. दोघांसहि देशाची सर्वांगीण उन्नति हवी होती. आणि तत्प्रीत्यर्थ दोघांनीं जरी भिन्न भिन्न मार्ग पतकरून प्रसंगविशेषीं एकमेकांवर टीका केली असली, तरी दोघेहि एकमेकांची योग्यता जाणून होते. आगरकर टिळकांविषयीं म्हणतात कीं, " त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचंद्राकडून वदवलेल्या ' स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि । आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा । ' या श्लोकार्धाप्रमाणें होत आहे. " तर टिळक आगरकरांविषयीं म्हणतात कीं, " आपल्या कर्तबगारीनें व्यावहारिक उन्नति प्राप्त करून घेऊं असा निश्चित भरंवसा असतां, आगरकरांप्रमाणें मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटें, विपत्ति, हालअपेष्टा सोसूनहि मी आपलें देशकार्याचें मनोगत पूर्ण करीन असें म्हणणारे पुरुषच खरे धीर पुरुष होत. " अशा तऱ्हेनें टिळक व आगरकर एकमेकांची योग्यता जाणत होते; इतकेंच नव्हे तर दोघांची दोस्ती अकृत्रिम व असामान्य होती. यासंबंधांत खुद्द आगरकरच म्हणतात कीं, " जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल तेव्हां आगरकरांस, विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल. " आणि आगरकरांच्या मृत्युमुळें अखिल महाराष्ट्रांत जर एकादें अंतःकरण पिळवटून निघालें असेल तर तें लोकमान्य टिळकांचेंच. टिळक–आगरकरांची मैत्री रामलक्ष्मणांच्या बंधुत्वाच्या बरोबरीची होती.

टिळक–आगरकरांच्या चरित्रपटांचा तौलनिक अभ्यास करतांना, दोघांच्या कर्तबगारीकडे पाहून म्हणजे एकाच्या राजकीय व एकाच्या सामाजिक क्रांतीकडे नजर जाऊन हृदय कृतज्ञतेनें भरून येतें आणि टिळक–आगरकरांत श्रेष्ठ कोण व कां हा प्रश्नच मुळीं आत्मघातकीपणाचा वाटतो. महाराष्ट्राच्या सार्वजनिक चरित्रमंडलावर टिळक–आगरकर हे दोन दैदीप्यमान तारे असून त्यांनीं दाखविलेल्या तेजोमय मार्गांनीं जाणें हेंच सामान्य माणसाचें काम आहे. हें मत, किंबहुना टिळक–आगरकरांचीं मतेंहि कोणाला पटोत किंवा न पटोत, त्यांचें अप्रतिम धैर्य, त्यांची दृढ सत्यनिष्ठा, त्यांचा परमोच्च स्वार्थत्याग, त्यांची उत्कट देशभक्ति, स्वविचारानुसार वर्तन करतांना कोसळणारीं संकटें सोसण्याची तत्परता, त्यांचा अभंग निश्चय, त्यांची अप्रतिहत चिकाटी, अन्यायाबद्दलची जळती चीड इत्यादि गुण सर्व समाजाचे होऊन राष्ट्रीय चारित्र्याचे ते नैसर्गिक घटकावयव बनल्याशिवाय आपल्या राष्ट्राला तरणोपाय नाहीं हें मात्र अगदीं निश्चित आहे.


## प्रकरण ५ वें

# गोखले आणि आगरकर

"Do the right because it is right, in scorn of consequences."

Tennyson.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले आणि सुधारकाचार्य गोपाळ गणेश आगरकर यांचा परस्पर संबंध चंद्रसमुद्रासारखा होता. कोल्हापूरप्रकरणीं केसरीची गर्जना होऊन लोकमान्य टिळक व आगरकर यांस शिक्षेच्या शेलापागोट्याचा सरकारी आहेर चालला असतां त्या दोघांवर सक्रीय सहानुभूतिची पुष्पवृष्टी करणेंकरितां राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं "भ्रांतिकृत चमत्कार" केला होता; आणि त्यांत गोखल्यांनीं भूमिका घेतली होती. निबंधमालेच्या गरमाईनें निद्रित महाराष्ट्र जागा होऊन देशभक्तीचा 'लाव्हा' टाकण्याच्या बेतांत आला होता, त्याला केसरीवरील कोल्हापूरप्रकरणानें वाट करून दिली आणि त्या वाटेवरच गोखल्यांसारखा हिरा देशाच्या हातीं लागणार असा रंग दिसूं लागला. तथापि भोळ्या भावाची ही पायवाट एकपरी दृष्टीआड करणें जरूर आहे. टिळक–आगरकरांसारख्या पाणीदार मेघांकडे पाहून देशभक्तीचा मोरनाच रंगविण्याकडे गोखल्यांचें मन झुकलें होतें खरें; पण त्याला निश्चयाचा धर लागला नव्हता. त्याला कांहीं काळ मुरावा लागला. एक तर त्यावेळीं गोखले विद्यार्थी होते, आणि आपल्या शाळासोबत्यांप्रमाणेंच पुढील आयुष्याचा आराखडा त्यांनीं आपल्या मनाशीं बांधला नव्हता. शिवाय म्युनिसिपालिटीच्या कंदीलावर अभ्यास करण्याइतपत गरीबीच्या फोफाट्यांतून विद्याभ्यासाचा मार्ग कातरावा लागल्याकारणानें सुखाच्या छायेकडे गोखल्यांच्या मनाचा कांटा जरा ढळता असल्यास त्यांत मनुष्य स्वभावास सोडून काय आहे? बालपणच्या सीमेवरच वडिलांचें छत्र उडाल्यामुळें, वडीलकीची जबाबदारी ओळखून आपल्या बंधूंनीं व वहिनींनीं तोंडचा घांस देऊन आपला विद्याभ्यास केला. याची कृतज्ञ जाणीवही गोखल्यांना 'दामोदर' होण्याच्या शिष्टसंमत मार्गाकडे खेंचित असण्याचा पूर्ण संभव आहे. अर्थातच यंत्री होण्याचें फसलें तर, आय्. सी. एस्. कडे जाण्याचें व ते चकलें तेव्हां वकील होण्याचें गोखल्यांनीं मनावर घेतलें असलें तर नवल काय? मनाच्या 'चक्रम्' अवस्थेंतच शाश्वताचा मार्ग सांपडत असतो. धारेला लागलेलें पाणी भोंवरा करूं लागलें म्हणजे अकल्पित स्थित्यंतर घडत असतें. वकिलीच्या वर्तुळांत घोडा फेंकलेल्या गोखल्यांनीं टेसदार टांच देतां येण्यासाठीं न्यूस्कूलमधील नौकरीचा चढाव चढवला होता. गोखल्यांचा तो प्रबुद्ध रुबाब पाहून त्यांना आपल्या संस्थेंत सामील करण्याचा टिळक–आगरकरांनीं घाट घातला. सहवास आणि सन्निकर्ष यांचा



लोकमान्य टिळक



नामदार गोखले

☆

☆



न्यायमूर्ति रानडे

प्रभाव काय कमी असतो ? त्यांत टिळक–आगरकर म्हणजे " देशाभिमानानें प्रेरित होऊन ज्यांनीं पुढें चकाकत असलेल्या ऐहिक वैभवाला, अधिकारसंपत्तीला रामराम ठोकला होता " अशा विभूति ! त्यांची छाप गोखल्यांच्या संस्कारक्षम मनावर बसणें अशक्य नव्हतें. त्यामुळें " टिळक–आगरकरांच्या बरोबर न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांत आपण असणार हा मोठा मान आहे, असें त्यांना त्यावेळीं वाटलें असेल. " आणि आपल्यापेक्षांही हालांत विद्यार्जन करणाऱ्या आगरकरांचें वळण पाहून आपला मोर्चा त्या दिशेनें वळविण्याची इच्छा गोखल्यांना सहाजिक झाली असेल. आयुष्यांतील कार्यभागावर, जन्मसार्थक्यावर, भारतीयांच्या कर्तव्यावर, गोखल्यांचें व आगरकरांचें बोलणें होऊन " त्यांत आगरकरांच्या अंतर्यामाचा त्यांच्या अंतर्यामावर विशेष ठसा उमटे. आगरकरांच्या अंतःकरणाची ऋजुता, निरपेक्षता आणि साधुता गोपाळरावांच्या ( गोखल्यांच्या ) समानधर्म हृदयावर प्रतिबिंबित झाल्यावांचून रहात नसे. आणि त्यांच्याविषयीं गोखल्यांची पूज्यबुद्धि हरएक प्रसंगीं वाढल्यावांचून रहात नसे. " या सर्व सूत्रसमुच्चयांचा सहाजिक परिणाम असा झाला कीं, गोखले सोसायटीला मिळाले.

अशाप्रकारें आगरकरांच्या ओळीला गोखले बसल्यावर लोकशिक्षणार्थ त्यांचा वृत्तपत्रीय संचार सुरू होणें साहजिक होतें. वृत्तपत्रीय लेखक म्हणून आगरकरांप्रमाणें गोखल्यांचें नांव सर्वतोमुखीं नाहीं खरें, पण आगरकरी लेखणीजवळ गजान्त लक्ष्मीचें वैभव असलें तर, गोखल्यांची लेखणीही अगदींच भिकारदास–मारुती नव्हती. केसरीच्या आगरकरी अमदानींत एक वेळ गोखल्यांकडे भिंताळ चित्ररेखेप्रमाणें वर्तमानसार काढण्याचें काम असे; पण ते सुद्धां गोखल्यांनीं सोळा आणे इतबारीनें केलें. इतकेंच नव्हे तर पुढें सुधारकांतसुद्धां त्यांनीं 'आग्र्याहून सुटून आलेल्या शिवाजीची ' गोष्ट लिहिली होती, ती लोकप्रिय झाली. पण गोखले–आगरकरांच्या वृत्तपत्रीय लिखाणांचा विचार करतांना एवढें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, आगरकरांनीं आपलीं सारीं प्यादी मराठीच्या पटावर नाचविलीं तर गोखल्यांनीं तीं इंग्रजीच्या फलकावर नाचवलीं ! याचा अर्थ खास असा नव्हे कीं, गोखल्यांना मराठीचें वावडें होतें आणि आगरकरांनीं इंग्रजीशीं काडीमोड केला होता. गोखल्यांच्या मराठी लिखाणाचा उल्लेख वर आलाच आहे. आगरकरांनींही पांच वर्षें मराठ्यांत लिहिलें. पण इतकें बरीक खरें कीं, इंग्रजी कलम गोखल्यांहातीं जितकें सफाईनें चालें तसें आगरकरांहातीं नाहीं ! मराठी कलमाबाबत हाच डाव उलटा पडे. आगरकरांच्या उत्कृष्ट मराठी निबंधाच्या जोडीला बसविण्यासारखे गोखल्यांचें लिखाण म्हणजे त्यांची मराठ्यांतील General war in Europe ही लेखमाला, किंवा सुधारकांतील Shame, Shame, my Lord, Shame " यासारखे विरूद्ध पक्षासही क्षणभर डोलावयास लावणारे निबंध !! आगरकर–गोखल्यांच्या या लिखाणांत भाषाभेदांच्या पडद्यामागें मान उंचावल्यास तौलनिक चष्म्याच्या टापूंत काय येतें ? दोघांची पल्लेदार वाक्यें, अंतःकरणाची तळमळ, म्हणावयाच्या मुद्यावर रोंख सकृद्दर्शनींच डोळ्यांत भरल्याखेरिज रहात नाहीं. पण गोख-

त्यांच्या लेखांत शद्बसौष्ठवाबद्दलची सावधगिरी तर आगरकरांच्या लिखाणांत त्याबद्दलची बेफिकिरी; विरूद्ध पक्षाची व्यक्ति झाली तरी तिच्याबद्दलचा पूर्ण आदर एकजण राखणार , तर गुरुगौरवार्थही आपल्या स्पष्टपणाची धार यत्किंचित्सुद्धां दुसरा कमी करणार नव्हे! नुसती सणसणीतच काय, पण वेळेला शिवराळ वाणी वापरूनही, समाज अंगावर चिडून आला तरी बेहत्तर, पण त्याची ती मृतप्राय अवस्था आगरकरांना बिलकूल नको, तर विवेकें कार्यसाधन करण्यासाठीं शक्य तर " सकल लोक राजी राखण्याचें " कठीण व्रत आचारवयाचें हा गोखल्यांचा कटाक्ष !

तत्राप गोखल्यांनीं सार्वजनिक कार्यें करतांना वक्तृत्वाचा जितका उपयोग केला तितका लेखणीचा नाहीं! सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे ते स्वतः संपादक होते, तरी पुढें परिस्थितीला निराळें वळण मिळतांच गोखल्यांना वाणीवर भिस्त ठेवणें अपरिहार्य होतें. जगाचा मुत्सद्दी म्हणून गोखल्यांची त्रिखंड कीर्ति दुमदुमली ती त्यांच्या वाणीनेंच. गोखल्यांच्या वाणींत वर लिहिलेले त्यांच्या लेखणीचे गुण ओतप्रोत भरलेले असून शिवाय आवाजांत एक तऱ्हेची मंजुळ मोहनी होती. मुद्देसूदपणा, प्रमाणबद्धता आणि साधार विवेचन या त्रिदलाशिवाय गोखल्यांचें एकही भाषण सांपडणें कठीण! तळपणाऱ्या विजलीच्या वक्रीभवनानें संदेशसंवेदना होते, तोच नमुना गोखल्यांच्या वक्तृत्वाचा! वाग्वैजयंतीचें हें सोनफूल गोखल्यांना आकाशांतून मिळालें नाहीं! त्यासाठीं त्यांना तपही कमी करावें लागलें नाहीं. विश्वविख्यात वैभवशाली वाग्भटांचे वीणारव गोखल्यांनीं एकतानतेनें छेडले; अव्वल दर्जाची भाषा जिव्हाग्रीं खेळविण्यासाठीं टाइम्ससारख्या वृत्तपत्रांचे अग्रलेख डोक्यांत उतरून घेतले; बोलला बोल माणिक मोलानें विकला जावा म्हणून हृदयाच्या उचंबळत्या भावंना खोल विचाराच्या रसायनाशीं समरस केल्या! गोखल्यांचीं वाग्रत्नें असल्या श्रमसातत्याच्या मंथनामुळें लाभलीं होतीं; त्यामुळेंच गोखल्यांचें नांव निघालें कीं, जबाबदार जाणीवेची धीर गंभीर मूर्ति डोळ्यापुढें उभी राहून जगांतील कोणाही सुबुद्ध मनुष्याची मान अजूनही आदरानें लवते. शिकंदर भाग्याचा हा गौरीशंकर गोखल्यांप्रमाणें आगरकरांच्या वाट्यास नव्हता! विचार परावर्तनाची कांच गोखल्याहातीं इंग्रजी तर आगरकरांहातीं मराठी, हा मुळांतलाच फरक परिणामींच्या गिरक्यांत झाला असेल असें कोणास वाटणेचा संभव आहे; पण ती विनमाहितगार मनुष्याची फसवणूक आहे! विद्यार्थीदशेंत वक्तृत्वाची तडफ आगरकरांनीं ' मी ' म्हणण्यासारखी दाखविली, पण पुढें अनुवांशिक दम्याच्या ऊनतड्यानें आगरकरांच्या वक्तृत्वशक्तीचें पाणी पाणी झालें! राष्ट्रकार्याच्या पिकाचा विचार करतां, आगरकरी वाणीच्या फल्गुनदीपेक्षां गोखल्यांच्या वक्तृत्वाचे कालवेच जास्त उपयुक्त ठरले!

लेखणी–वाणीची कोनशिला शाळेंत बसविली जाते. शास्त्रीबुवांनीं म्हटल्या प्रमाणें ' इंग्रजी भाषा हें वाघिणीचें दूध आहे. ' आणि तें मनसुराद पिण्यासाठीं शाळा शिकत असतां गोखले–आगरकरांनीं जिवापाड मेहनत केली. पण अंगलट धरण्याकडे गोखल्यांच्या मनाचा ओढा; कणखरपणाकडे आगरकरांचें लक्ष! नेमलेल्या

पुस्तकांतील ठरावीक विषय पाठांतरानें आत्मसात् करण्याची गोखल्यांची टीप केवळ अद्वितीय! न्यू इंग्लिश स्कूलमध्यें व फर्ग्यूसन कॉलेजांत अध्यापकाचें काम करतांना सुद्धां ठराविक वर्तुळांतील ठराविक चकरांशीं शिस्तवार कसरत गोखल्यांइतपत कोणास साधली नाहीं! विषय हातखंडा असो नसो. कॉलेजचें काम नडूं द्यावयाचें नाहीं, या कर्तव्यबुद्धीनें, भाराभर पुस्तकें वाचून आणि रात्रीचा दिवस करून, उणी जागा लष्करच्या शिस्तीनें भरून काढण्यास गोखल्यांनीं कमी केलें नाहीं! "अनाथ विषयाचे प्रोफेसर" किंवा "परीक्षेपुरते पोपट" म्हणून गोखल्यांचा उपहास होण्यास चुकला नाहीं. पण, धिमी पाऊलटाक मैदान मारते; या अनुभविक सत्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल? शाळेच्या हौद्यांत आगरकरांची घाटणीच कांहीं निराळी होती. पाठांतराच्या जोरबैठकांपेक्षां मननाच्या मलखांबावर आगरकरांची मदार भारी; आणि त्यामुळें तर्काच्या झेपेनें त्यांनीं सगळे हात मारावयाचे! अध्यापनाच्या टाचक्या दुर्बिणींत विद्यार्थ्यांना ते विश्वरूपदर्शन देत असें म्हणतात, व त्याच्या बुडाशीं वर सांगितलेली आगरकरांची घाटणीच कारण!

स्वदेशबांधवांच्या उन्नतीसाठीं गोखले आगरकरांनीं आपलीं कार्यक्षेत्रें निरनिराळीं केलीं त्याला त्यांची परिस्थिती आणि स्वभावधर्म ही पुष्कळशी कारण आहेत. इंग्रजीच्या आरंभीं आरंभीं राजभाषेच्या पाव पुस्तकाला देखील डोक्यावर घेऊन नाचण्याइतका मान होता. त्यामुळेंच त्या विद्येचें वेड दोघांना लागलें; तें पचनीं पडत गेलें, तसतसा त्याचा उपयोग देशसेवेपायीं करावा अशी इच्छा मूळ धरूं लागली. पण परिस्थितीच्या शेकाप्रमाणें एका भट्टींत पुरणपोळी तयार झाली, तर दुसरींत घीवर झालें. दारिद्र्याच्या दऱ्याखोऱ्यांतून दोघांसही प्रवास करावयाचा होता; पण शागिर्दगिरीच्या अनवाणीपणानें आगरकरांस जितका कडवट अनुभव दिला होता तितका गोखल्यांस नाहीं! ठिकठिकाणीं ठेंचाळलेल्या आगरकरांना समाजाची घडी नूतन काळास साजेशी बसविण्यासाठीं जें करावेसें वाटे, तें गोखल्यांना पटत नसें असें नाहीं; पण तसें करण्यांत, अज्ञ व अविवेकी विरोधकांची जी निरर्गल टीका होते तिचा टणत्कार सोसण्याइतका चेंचवटपणा आगरकरांसारखा गोखल्यांच्या अंगीं नव्हता! समाजकारणाची कसलीही गोष्ट गोखल्यांच्या सहानुभूतीचे फवाऱ्याखालीं नांदे, पण तसल्याबाबत ते क्वचितच हात घालीत; भावजयीच्या शब्दाला मान देण्यासाठीं कां होईना, गोखल्यांनीं द्वितीय संबंध केला होता. त्यायोगें सामाजिक सुधारणेकडे बोटें करण्यास कुचाळकीला जागा सांपडेल, ती सांपडूं नये अशी आत्मनिरीक्षक गोखल्यांची पवित्र दृष्टी होती. याही उप्पर, न्यायमूर्ति रानड्यांच्या कसोटीला उतरतां उतरतां राजकारणाचा दुमाला घरण्याची हातोटी गोखल्यांना अशी साधली कीं ज्याचें नांव तें!

आगरकरांना हें भविष्य अंधुक तरी दिसलें असावें! गोखल्यांचा "उत्साह, कामाची हौस, उच्च मनोवृत्तींच्या स्फूर्तीनें प्रेरित होण्याचा त्यांच्या हृदयाचा धर्म, त्यांची धमक आणि गुरुजनांविषयीं त्यांचा आदर हे त्यांचे गुण रावसाहेब रानड्यांच्या

नजरेस आल्यास त्यांचें उत्तम चीज होईल, आणि त्यांच्या सहवासानें गोखल्यांची उपयुक्तता फार वाढेल व त्यांच्या हातून चांगली कामगिरी होईल, हें आगकरांच्या लक्षांत आलें, आणि रावसाहेबांशीं बोलतां बोलतां त्यांनीं गोखल्यांची गोष्ट कांढली." गोखल्यांची General war in Europe ही लेखमाला आणि कोल्हापुरास लीवार्नर साहेबांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें गोखल्यांचें व्याख्यान यावरून आगरकरां-प्रमाणेंच न्यायमूर्तींचा अभिप्राय गोखल्यांसंबंधीं बरा होता. तेव्हां आगरकरांनीं माहिती देतांच आबासाहेब साठ्यांच्या मार्फत न्यायमूर्तींनीं गोखल्यांस आपल्या कक्षेंत घेतलें! रानड्यांसारख्या सहस्रकराच्या पायीं गोखल्यांनीं स्वदेशसेवेचा इतका पाया-शुद्ध अभ्यास केला कीं नित्यशः त्यांचें तेज कलेकलेनें वाढत गेलें; आणि "चाळीस वर्षांच्या वयांतच गोखले हिंदुस्थानांतल्या पहिल्या रांगेतल्या कार्यकर्त्या पुरुषांच्या मालिकेंत जाऊन बसले!" शुक्राचार्यापासून संजीवनी प्राप्त करून घ्यावयास गेलेल्या कचदेवांनीं, किंवा त्याहीपेक्षां, डोईवर मोळ्या वाहून सांदीपनीची सेवा करणाऱ्या श्रीकृष्णांनीं जे गुरुभक्तीचें उज्वल उदाहरण घालून ठेवलें होतें त्याचीच सुधारलेली आवृत्ती म्हणजे गोखल्यांनीं केलेलें रानड्यांचें शिष्यत्व! कूस एवढीच कीं "गुरु बहुरंगी होते, शिष्यानें त्यांचा एकच रंग उचलला, पण तो गुरूला व साऱ्या देशाला भूषणभूत होईल अशा रीतीनें पुरा उचलला, व त्यांत कांहीं अंशीं गुरूवरहि ताण करून दाखविली." इतकी कीं, करडी सुलतानशाही गाजविणाऱ्या कर्झन साहेबांना गोखल्यांनीं पद्धतशीर पण टिच्चून विरोध केला होता तरी, ब्रिटिश साम्राज्यानें गोखल्यांच्या गुणांचें वर्णन केलें पाहिजे, म्हणून स्वत: कर्झनसाहेबांनीं शिफारस केली होती. फार कशाला? आंग्लभूपतीलाही गोखल्यांच्या दूरदर्शी मौत्सद्याबद्दल नितांत आदर असे. मग, ज्यांच्यासाठीं गोखल्यांनीं आपल्या त्यागमय आयुष्याचा एकएक क्षण आर्यत्वाच्या सौभाग्यानें वेचला, त्या हिंदी लोकांनीं आपल्या हातीं असलेला उच्चतम असा राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा सन्मान गोखल्यांना समर्पून आपली कृतज्ञता व्यक्त केली असली तर काय आश्चर्य होय? प्रांतिक व वरिष्ठ कौन्सिलांतील कामगिरी घ्या, किंवा राष्ट्रीय अगर प्रांतिक सभेंतील कर्तृत्वाकडे नजर टाका. गोखल्यांनीं आपलें वळण तेथें ठेवलें नाहीं असें झालें नाहीं! अर्थात् आपल्या विचारी कतृत्वाची सुधावृष्टी अविरत करीत गेलेले गोखले "चढती वाढती पदवी पावले" हें क्रमप्राप्तच होतें! देशभक्तीचा दूधभात गोखल्यांना घालणाऱ्या आगरकरांना गोखल्यांच्या त्रिखंड पराक्रमानें एवढी वत्सल धन्यता वाटली असती कीं, तिच्यापुढें 'स्थिरचर व्यापून दशांगुळे उरणारा पुरुष' खुजा झाला असता!

अशा तारांगणाचें आकाशवैभव आगरकरांच्या स्वप्नांतही आढळलें नसतें! रूढीच्या आणि "बाबावाक्यम् प्रमाणं"च्या खोल पाताळांत दडी देऊन बसलेली शुद्ध जीवनाची गंगा भगीरथ प्रयत्नानें अज्ञानाशीं झगडून त्यांना वर काढावयाची होती; आणि जाग्या शहाणपणाला कर्तें करण्याचा आणि तद्वारां लोककल्याण साधण्याचा खटाटोप गोखल्यांना आंवरावयाचा होता! विचार केला तर दोन्ही नंग्या तरवारी-

वरील नाच ! परंतु एकाची गति सुदर्शनचक्राची, तर दुसऱ्याची चक्रव्यूहाची ! शिवाय, आगरकरांना आपल्या क्षेत्रांत खडेवेंच, गवतकापणी वगैरे करून कुळवणी नांगरणी करण्याची होती, तर रुजू घातलेल्या बियाणाला मेहनतमशागतीनें बाळसें आणावयाचें काम गोखल्यांकडे आलें होतें. त्यामुळें युनिव्हर्सिटींत आणि डे. ए. सोसायटींत सुद्धां आगरकरांपेक्षां गोखल्यांच्या कामगिरीचा मनोरम उठाव झाला !

अशा व अशाच तऱ्हेच्या विचारयानांतून गोखले-आगरकरांच्या चरित्रांचें सिंहावलोकन करीत बसल्यास, क्षीरसागरांतून निघालेल्या चंद्राप्रमाणें, आगरकरांपासून स्फूर्ति मिळालेलें देशभक्त गोखल्यांचें चित्र भासतें ! आणि क्षीरसागराला जसें आपल्यापरी महत्व तसें चंद्रालाही त्याच्यापरी असतेंच असतें, व तें प्रत्ययालाही येतें ! दोघांच्याही शंभर नंबरी देशभक्तींचें कोडकौतुक देशांत चाललेलें उघड्या डोळ्यांच्या मार्मिकाला तेव्हांच दिसेल. सामाजिक जीवनांत आगरकरांनीं आणि राजकीय प्रणालींत गोखल्यांनीं नीतीचा अखंड झरा वाहविण्यासाठीं 'क्षणशः कणशश्चैव' आयुष्य वेंचलें; त्याचा विजयी रंग त्या त्या बावट्यावर आजकाल चढत चालला नाहीं काय ? गोखल्यांचे शिष्य म्हणून अभिमानानें जगांत मिरविणाऱ्या महात्मा गांधींच्या मूर्तीकडे पाहिल्याबरोबर गोखल्यांनीं राजकारणांत किती शुद्धि केली याची खास कल्पना येईल. आगरकरांसारखीच शुद्धमनस्कता आणि सहृदयता गोखल्यांच्या-जवळ असल्या कारणानें त्यांनीं भातभूची पायाशुद्ध सेवा करणाऱ्या कळकळीच्या माणसांसाठीं "सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी" काढली. आणि देशांतील राज-कारणाला एक प्रकारची अभ्यासू शिस्त लावून दिली. आगरकरांच्या हातून तसें कांहीं झालें नाहीं. तथापि अभ्यासू बुद्धिप्रामाण्य आणि तज्जन्य करारीपणा यांत कोणी कोणास मागें टाकलें असतें असें नाहीं ! अभंग नीति आणि मनाचा उदारपणा दोघां-जवळही ओतप्रोत होता. दोघांचेंही अंतःकरण कोमल होतें. पण आगरकरांच्या हातावर सदा पोलादी वाघनखें तर गोखल्यांच्या पोलादी मुठीवर मखमलीचा हात-मोजा चढविलेला ! पण सर्वांपेक्षां गोखले-आगरकरांत समानधर्म म्हणून कांहीं विशेष नजरेंत भरत असेल तर ती न्यायनिष्ठुर सत्यप्रीति ! आगरकरांच्या सहवासामुळें गोख-ल्यांच्या मनाचा कल कांहीं काल नास्तिक्याकडे झुकला होता, पण तो पुढें रानड्यांच्या-मुळें नाहींसा झाला. तथापि सत्यप्रीतिची वेल जी एकदां गोखल्यांच्या जीवनावर चढली ती दरपळाला टवटवत्या फुलांनीं दरवळतच गेली. त्या निष्कलंक सत्य-प्रियतेमुळेंच, दुसऱ्यावर विनाकारण अन्याय घडला तेव्हां गोखले-आगरकर या दोघांनींही प्रांजल माफी मागितली, आणि त्या सत्यप्रियतेमुळेंच खुनाच्या धमक्या मिळण्यापर्यंत दोघाही सत्पुरुषांचें छळ झाले ! पण यत्किंचितही न डगमगता आपल्या ब्रीदाकरितां तेलांत तळून घेणाऱ्या प्रल्हादाची, आणि बारा डोळे उघड-णाऱ्या सूर्याची आग सहन करणाऱ्या हरिश्चंद्राची, उज्जल परंपरा आगरकर गोख-ल्यांनीं नेटानें चालविली ! त्या सत्यप्रीतीचा आणि त्या परंपरेचा विजयध्वज आर्या-वर्तावर सारखा फडकत राहण्यांतच गोखले आगरकरांच्या स्फूर्तिप्रद चरित्रांचें व चारि-त्र्यांचें सार्थक नाहीं काय !

---

प्रकरण ६ वें

# युकिची फुकुझावा व आगरकर

समाजाच्या प्रगतीपर स्वास्थ्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य, तेवढीं खेरीजकरून व्यक्तिमात्रास पूर्ण स्वाभिमान व स्वातंत्र्य दिलें तरच जगांतील सर्व राष्ट्रीय चढा-ओढींत आपल्या मातृदेशाचा निभाव लागावा अशी पक्की खूणगांठ मनाशी बांधून लोकशिक्षणाच्या द्वारें आपलें ध्येय हस्तगत करण्यासाठीं जिवापाड खपणाऱ्या महा-भागांतच आगरकर–फुकुझावांची गणना केली पाहिजे. विचार, व्यवहार, व्याख्यान, वृत्तपत्र, व्याकरण आणि विद्यालय ही लोकशिक्षणाची षड्गुणैश्वर्यसंपन्नता साध्य करीत असतात. उदात्त मनाची मांडणी अथवा विचार व त्यांचा आचारांत उतारा अथवा व्यवहार यांच्या कसोटीवरच बाकीच्या साधनांचा सापेक्षतः तग लागत असतो. आगरकर–फुकुझावा यांचा याबाबत कोणासच हात धरतां येणें शक्य नव्हतें. व्याख्यान म्हणजे 'तोंडी उपदेश' इतकाच संकुचित अर्थ घेतला तर तो आगरकरांनीं फुकुझावा-इतका खात्रीनें केला; पण पद्धतशीर प्रमाणावर परिश्रमपूर्वक परिशीलनाचें प्रवचन अशी व्याख्यानाची व्याख्या घेतली तर तुलनात्मक दृष्टीला आगरकरांचें पारडें अंत-राळांत खेळत असल्याचें पाहण्याचा प्रसंग चुकणार नाहीं. सभांच्या आखाड्यांत उतरण्याइतकें आगरकरांच्या अंगीं अवसान नव्हतें असें नाहीं; पण अनुवांशिक दम्यानें त्यांचा दम असा उखडला होता कीं, विद्यार्थीदशेंतील या व्याख्यानवस्तादाची अदबी लोकशिक्षणाच्या फडावर नुसती रामरामापुरतीच राहिली होती.

फुकुझावाची बरोबरी आगरकर एवढ्या एकाच बाबतींत करूं शकत नसले तर त्यांनीं वृत्तपत्रांत फुकुझावावर ताणही केली आहे. एकतर लोकांत आपला थोडाफार बोलबाला झाल्यावर फुकुझावानें वृत्तपत्र काढलें; आणि तेही 'जी जी' म्हणजे Times म्हणजे "काळ" या नांवाचें! अर्थात् मुंबईकर टाइम्ससारखे एतद्देशीय लोकांस नामुष्कीच्या जीवनांत कवटाळण्याचा उपदेश करणारे असें 'जी जी' नव्हे. तसेंच माजी पुणेकर काळासारखे नियंत्रण सत्तेला नामोहरम करणारेंही तें नव्हतें. त्याची तशी जरूरही नव्हती. जपानसारख्या स्वतंत्र राष्ट्रांत प्रगतीच्या जोपासनेसाठीं तसल्या उपसाउपसीची काय गरज? तथापि रूढी आणि दुराग्रह यांच्या चाकोरींतूनच फिरणाऱ्या आपल्या बांधवांना पालटलेल्या जगाच्या चालीरीतीसाठीं नवीन मार्गाला लावावयास 'काळा' ची इषारत म्हणून फुकुझावानें सुधारणा प्रतिपादन केली. आगरकरांनीं याबाबत फारच धैर्यशाली पाऊल टाकलें. आगरकरांचा महाराष्ट्र फुकु-झावांच्या जपानप्रमाणें स्वतंत्र नव्हता. त्यामुळें आगरकर प्रतिपादित असलेली सुधारणा राज्यकर्त्या इंग्रजांच्या पावलावर पाऊल टाकण्याची अतएव, हांजी-हांजीपणाची व स्वाभिमानशून्यत्वाची आहे असें परंपरेला वाटण्याला पुरापुरा अवकाश होता

आणि त्यांचा फायदा परंपरेनें व्यावयासही कमी केले नाहीं. तथापि भारतीय आर्यत्व म्हणजे आपलें वैशिष्ठ्य कायम राखून पाश्चिमात्य संस्कृतीचा सकस भाग आपल्या गळी उतरला पाहिजे अशीच फुकुझावाप्रमाणें आगरकरांची खात्री होती. म्हणून त्यांनीं लोकनिंदेची पर्वा न करतां आपल्या पत्राला 'सुधारक' हें नांव दिलें व काळाच्या होकायंत्राबरहुकूम आपलें सुकाणु फिरविलें. हजारों वर्षांच्या परंपरेचा विरोध लोकपक्षाकडून तर सरकारी सहानुभूतीचा जवळ जवळ खडखडाट अशा गिरकींत पाश्चिमात्य संस्कृतीचें भाष्य आगरकरांनीं आपल्या पत्रद्वारां अशा कुशलतेनें केलें कीं, त्याची छाप जातिवंत विरोधकांवरही बसली. आतां तींत कांहींशी विरोधभक्ति कांहींसें कौतुक, कांहींसा गुरुगौरव, कांहींसा चारित्र्यादर याची मिसळ असे. आपलीं तत्वें साखरवून वाचकांच्या माथीं मारण्याचें कसब लोकांच्याच भाषेनें बोलणाऱ्या फुकुझावाइतकेंहि आगरकरांना साधलें नसतें; आणि करमणूककार हरिभाऊ आपट्यांशीं त्या दोघांपैकीं कोणीहि टिकला नसतां. फुकुझावानें आगरकरापेक्षां अधिक लोकप्रियता मिळविली. याचें बीज त्यांच्या लोकभाषेंत आहे. मातृभाषेचा अभिमान आगरकरांना म्हणजे फुकुझावापेक्षां काडीमात्रही कमी नव्हता; पण लोकातोंडीची बोलभाषा लिहिणें फुकुझावाप्रमाणें अगर अच्युतरावजी कोल्हटकराप्रमाणें त्यांच्या संपादकीय लेखणीला जमलें नाहीं. मोलकरणीला, टांगेवाल्याला सहज जमतील अशा भाषेंत फुकुझावानें आपले ग्रंथ लिहिले आणि 'अध्ययनाचें अमिष' यासारखीं त्यांचीं पुस्तकें लाखांनीं खपलीं. मातृभाषेची सेवा करण्याचा चिरस्थायी मार्ग म्हणजे ग्रंथ–निष्पत्ति लेखक आपल्या ध्येयाविष्करणार्थ करीत असेल तर त्या ध्येयाचें तें व्याकरण-ग्रंथच होत. शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें; त्याप्रमाणेंच ध्येयावर दृष्टी ठेवून लिहिलेल्या ग्रंथांची गत असते. लोक-शिक्षणार्थ झटणारे महाभाग आपल्या ध्येयाचीं व्याकरणें सांधि साधून तयार करीत असतात. फुकुझवानें तीं तयार केलीं तशीं आगरकरांनीं नाहीं. कदाचित् आयुष्याचा अपुरेपणाहि त्याला कारण असेल! फुकुझावाची हयात १८३५ ते १९०१ पर्यंत होती तर आगरकरांना पुरी चाळिशीहि दिसली नाहीं.

लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट बरीक इतकीच कीं, या जपानी व महाराष्ट्रीय लोकशिक्षकांना जवळ जवळ एका मुशींतच परमेश्वरानें ओतलें होतें; दोघांचाहि जन्म गरीब घराण्यांत व दोघांनाहि पोरकेपणें दिवस काढावे लागले. दोघांच्याहि शिक्षणाची तारांबळ एकाच ठोक्याची. परकी भाषा शिकणें हें पाप समजणाऱ्या जपानांत आत्मप्रतिष्ठ फुकुझावाला नागासाकीचा रस्ता सुधारून डच भाषा व विद्या साध्य करावी लागली; आणि देशांतील वातावरणांत किंचित फेर पडला म्हणून तिचा उपयोग करण्यासाठीं तो स्वदेशांत आला तर इंग्रजी भाषेशिवाय सत् ना गत असें पाहून त्याला ती डच–इंग्रजी–कोशावरून तयार करावी लागली. आगरकरी विद्वत्तेच्या भट्या किती खरखरीत होत्या हें फिरून फुंकर मारून दाखवण्यांत काय सुख! एवढें निश्चित कीं कमाविलेल्या विद्येच्या जोरावर आपल्या

देशबांधवांना शहाणें करून सोडण्याची तळमळ दोघांही जीवास लागली होती. उघडच स्वतःच्या तळमळीला कायम स्वरूप देण्याच्या दृष्टीनें त्यांनीं गुरुगिरी करण्याचा बूट काढला आणि विद्यालयें स्थापिलीं. फुकुझावाच्या "सीयो जी जी" या ग्रंथानें जशी जपानी लोकांना पाश्चात्य संस्कृति आणि श्वेत राष्ट्रें यांचें ज्ञान करून दिलें त्याचप्रमाणें त्यांच्या नूतन विद्यालयानेंहि शिक्षणाचा असा पायंडा पाडला कीं ते लोकप्रिय होऊन, १८९० सालीं तर त्याचें रूपांतर एका विश्वविद्यालयांत झालें. फुकुझावास आपल्या या विद्यालयीन कामगिरीबद्दल असा आत्मविश्वास असें कीं, तो नेहमीं म्हणें—"माझी ही संस्था जिवंत आहे तोपर्यंत सुधारलेल्या राष्ट्रांत जपानला कायमचें स्थान खात्रीनें आहे" आगरकरांच्या शिष्यप्रिय गुरुगिरीला आणि विद्यालयीन चळवळीला इतकें गोड फळ आलें नसलें तरी तत्कालिन महाराष्ट्रीय कर्तबगारीचा विचार करतां आगरकरांच्या शिक्षण संस्थांनीं महाराष्ट्राचा दर्जा जगाच्या डोळ्यांत भरवला व त्यांच्या कांहीं शिष्यांनीं मराठी कुवत वाढीला लावली हें निर्विवाद कबूल करावें लागेल.

तें कसेंहि असो, आगरकरांना आपल्या जीवनसंध्येसाठीं अनेक दिव्यांचें अर्घ्य द्यावें लागलें तसें फुकुझावास करावें लागलें नाहीं. आगरकरांच्या देशसेवेचा गौरव श्री. शिवाजीराव होळकरांनीं होईल तेवढा करण्याचा प्रयत्न केला, पण फुकुझावाच्या देशसेवेला जपानच्या स्वतंत्र बादशहानें पाऊण लाख रुपयांच्या प्रत्यक्ष देणगीची राजमान्यता दिली. तत्राप तत्वप्रियांना या मानापमानाच्या गौरवाचें विशेष नसतें आणि तात्विक अभ्यासहि त्यांची फारशीं पर्वा करीत नाहीं.

प्रकरण ७ वें

# ब्रॅडला, मिल्ल, बाळशास्त्री, गॅरिसन आणि आगरकर

राष्ट्रसभेचे एक आद्य पुरस्कर्ते चार्लस ब्रॅडला हे नुसत्या राजकारणांतच नव्हे तर धर्मकारणांतही स्वतंत्र विचाराचे धुरंदर होते. स्वमताभिमान आणि त्यासाठीं त्यांनीं उभारलेला खटाटोप, इंग्रज मिशनरी आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्यांतच धन्यता मानणारा बहुजनसमाज यांची डोळेफोड करीत असल्याकारणानें, ब्रॅडला साहेबांचा अनान्वित छळ झाला. रूढीच्या मळल्यारुळल्या चालू वाटेवर काळाच्या करडाईनें कितीही खांचखळगे पडले असले, तरी ते भरून काढून ती वाट ' चालचलाऊ ' करण्याची अगर अगदीं नवीनच पायंडा पाडण्याची कल्पनाही मनांत न आणणाऱ्या परंपरेला ब्रॅडलॉ साहेबांनीं अशी भिंगरींत धरली होती कीं, इ० स० १८६८ पर्यंत जरी ते हें काम " मूर्तिभंजक " या टोपण नांवानें करीत होते तरी त्यांना कंगालपणाला, लोकछळाला आणि परिश्रमातिरेकाला तोंड देतां देतां आपल्या निकोप व धिप्पाड प्रकृतीचा सरळ बळी द्यावा लागून अकालीं मृत्यु ओढून घ्यावा लागला.

नॅशनल रिफॉर्मरचे संपादक चार्लस ब्रॅडला आणि सुधारकाचे संपादक आगरकर यांच्यांत कार्यपद्धतीच्या दृष्टीनें व कार्यपरिणामाच्या दृष्टीनें कसें साम्य आहे, हें वरील ब्रॅडला साहेबांच्या छोटेखानी शब्द चित्राशीं आगरकरांचें चारित्र ताडल्यास ताबडतोब लक्षांत येईल. आतां मिल्लसाहेबांशीं आगरकरांचें कितपत जुळतें तें पाहूं.

डेक्कन कॉलेजांत शिकत असतांना आगरकरांचे ऐच्छिक विषय इतिहास आणि तत्वज्ञान हे होते. इतिहासाच्या अभ्यासासाठीं जशी गिब्बनशीं तशीच तत्वज्ञानाच्या अभ्यासासाठीं स्पेन्सर बरोबर मिल्लशीं आगरकरांचा ' ग्रंथपरिचय ' झाला. मिल्लवर गोपाळरावांची मर्जी म्हणजे बहाल ! मिल्ल म्हटला कीं, मानवतेसंबंधीं कल्याणबुद्धि, न्याय आणि स्वातंत्र्य याबद्दल गाढें प्रेम मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभी राहतात. हुकमी भाषा, शास्त्रशुद्ध तर्कपद्धति आणि विरोधपक्षगुणग्राहकता याबाबत मिल्लची बरोबरी करणारा जॉन स्टुअर्ट मिल्लच अशी त्याची योग्यता. या योग्यतेच्या जोरावर एकोणिसाव्या शतकाच्या माध्यान्हकालीं मिल्लनें न्याय आणि स्वातंत्र्य याविषयीं इंग्लंडांत भलती खळबळ उडवून दिली ! समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यासंबंधांत जॉन स्टुअर्टच्या सगळ्या गोष्टी टिकल्या नाहींत. त्याचीं कित्येक तत्वें आक्षेपार्ह ठरलीं, तो नास्तिक होता म्हणून त्यास कोणीं नांवें ठेवलीं किंवा एखादा सिद्धांत गृहित धरून अनुमानें काढीत बसण्याबद्दल त्याला कोणी नाक मुरडलें, तरी स्पेन्सरप्रमाणेंच त्यानें प्रचलित धर्मशास्त्राचा जो धुव्वा उडविला, त्यायोगें बुद्धिप्रामाण्याचा झेंडा वारेवेगानें उंच फडकत राहिला हें विचारी म्हणविणाऱ्या वाचकाला तरी नाकबूल करून चालणार नाहीं. एवंगुणविशिष्ठ मिल्लबद्दल आगरकरांस आदर वाटून ते त्यांस डोक्यावर

घेऊन नाचले तर नवल कसलें? आगरकरांचें चरित्रही थोडासा कोन करून मिल्लच्याच साच्यांत बसतें असें थोड्या विचारांतीं दिसेल; पण यापेक्षां थोडें खोल शिरूं. मिल्ल ज्याला न्याय म्हणत असे त्यांत स्नेहाकर्षण, करुणा व आदरभावना यांचा प्रामुख्यें-करून समावेश होई. माणसामाणसांतील परस्पर व्यवहाराचें हें नियामक तत्त्व! अशा नियामक न्यायाच्या जोडीला स्वातंत्र्य ऊर्फ 'मनःपूतं समाचरेत्' मनाला जें पवित्र वाटेल तें आचरण्याचा अखत्यार यच्चयावत् गोष्टींत हवा असा त्यांचा पुरस्कार असे. वाटेल त्या विषयासंबंधीं वाटेल तसले विचार डोक्यांत चालूं देण्याची आणि दुसऱ्याच्या हक्कावर गदा न आणतां, त्या विचाराबरहुकूम उच्चार व आचार करण्याची प्रत्येक व्यक्तिमात्रास मुभा पाहिजे असें मिल्लचें सांगणें असून, "शाहींत शाही लोकशाही" त्याला पसंत असली तरी तिच्यांतील दोष नाहींसे करण्याकरतां व्यक्तिस्वातंत्र्य हवें असें त्याचें प्रतिपादन असे. व्यक्तिस्वातंत्र्यावर त्यानें ग्रंथरचनाही केली आहे. याबाबत आगरकरांचे विचार मनन करण्यासारखे आहेत. ते म्हणतात "एखादी गोष्ट आपणांस कितीही चांगली वाटली तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे अशी सक्ति करण्याचा आपणांस अधिकार नाहीं." ही जी व्यक्ति-स्वातंत्र्याची तऱ्हा तीच न्याय व नीति यासंबंधांतही होती. कारण केसरींतील व सुधारकांतील आपल्या लेखांत बहुत ठिकाणीं आगरकरांनीं मिल्लचाच अनुवाद केला आहे. मिल्लचें म्हणणें असें कीं, मनुष्याचें सारें ज्ञान ज्ञानेंद्रियद्वारें होतें. अर्थातच बुद्धि-प्रामाण्य हा त्याचा आधार. आगरकरांनीं तरी दुसरा कोठला घेतला होता? मिल्लच्या हयातीनंतर प्रसिद्ध झालेल्या लेखांतून जरी बुद्धिवादाचा कल ईश्वर मानण्या-कडे होता, तरी हयातभर त्यानें मूकभाव धारण केला होता. "सत्यान्नास्ति परो धर्मः" असणारे आगरकरहि एखाद्या धर्मपंथाच्या निशाणाखालीं गेले होते असें नाहीं. तथापि मिल्लचे अगर स्पेन्सरचे आगरकर अंध भक्त नव्हते. त्यांनीं आपल्याकडील परिस्थिती-प्रमाणें मिल्ल–स्पेन्सरच्या तत्त्वांना निसणा लावला आहे. शिवाय मिल्लच्या लेखांतील धिमेपणा आगरकरांच्या लिखाणांत बिलकूल नाहीं. तसें असलें तरी मिल्लप्रमाणें भावी उन्नतीची आशा आगरकरांसही आहे. स्त्री जातीविषयीं दोघांसही नितांत आदर होता. आतां परिस्थितीच्या भोवऱ्यांत आपल्या साऱ्या उत्कृष्ट लेखनाचें श्रेय मिल्लप्रमाणें आपल्या पत्नीकडे देण्याचें भाग्य आगरकरांस नव्हतें, हा भाग निराळा! त्याचप्रमाणें मिल्ल यांस दारिद्र्य माहीत नव्हतें, तर तें आगरकरांच्या पांचवीला पुजलेलें! अज्ञान देशबांधवांशीं सहवाससंपर्क ठेवल्यानें आपल्या ज्ञानाला हिणकसपणा येतो, तेव्हां आपल्याहून थोर व्यक्तींशींच तेवढा सहवास ठेवावा, या मतामुळें मिल्ल मंडळींत मिसळत नसे, तर दम्यामुळें आगरकरांना कोठें जाणें येणें मुष्किलीचें पडे. बाकी, त्यांच्याकडे कोणी गेल्यास ते प्रेमळपणानें व मन मोकळे करून हास्यविनोद देखील करीत. शिवाय, अखंड ग्रंथवाचनाबरोबर मिल्ल चालू परिस्थितीचीही बरीच माहिती मिळवी; पण आगरकर प्रस्तुत परिस्थितीच्या ज्ञानासाठीं ठराविक तेवढेंच वाचन करीत.

या वाचनावरून आंग्लाईंतील पहिले वहिले सुधारक व लेखक बाळशास्त्री जांभेकर यांची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. बाळशास्त्री जांभेकर आणि गोपाळराव आगरकर हे दोघेही गरिबींतूनच वर आले आणि दोघांनाही पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयानेंच आपल्या समाजांतील दोष दिसले. दोघांनींही ते अनुक्रमें दर्शन–दिग्दर्शन व केसरी-सुधारक यांच्याद्वारां लोकांपुढें मांडले आणि दोघांनाही लोकापवाद व लोकछळ सहन करावा लागला. छळाच्या बाबतींत व वृत्तपत्राच्या बाबतींत बाळशास्त्र्यांपेक्षां आगरकरांची कडी एकपरी जास्तीच होती म्हणायची! म्हणजे स्वतःच्या डोळ्यांनीं आपली प्रेतयात्रा पाहण्याचा सोहळा बाळशास्त्र्यांच्या ललाटीं नव्हता आणि भाऊ महाजनींच्या दर्पण पत्रांतून लेख लिहितां लिहितां शास्त्रीबुवांनीं स्वतःचें दिग्दर्शन सुरू केलें तें मासिकरूपानें! आगरकरांनीं साप्ताहिकांतून साप्ताहिकांतच उडी घेतली! या झाल्या साम्याच्या गोष्टी! याशिवायच्या सर्व बाबतींत आगरकरापेक्षां शास्त्रीबुवा सर्व तऱ्हांनीं श्रेष्ठच होते. एल्फिन्स्टन इंस्टिट्यूटमध्यें चार वर्षेंच अभ्यास करून शास्त्रीबुवांनीं अशी ज्ञानाची पैदास केली होती कीं, त्याच्या जोरावर पुढच्या पांच वर्षांच्या अवधींत ते त्यावेळीं होऊं घातलेल्या नव्या शाळांसाठीं शिक्षक तयार करूं शकले. शास्त्रीबुवांची बुद्धिमत्ता तर इतकी विलक्षण होती कीं, इंग्रजी शब्दांच्या अर्थांचा गंध नसतांना, रस्त्यावर झालेल्या दोन 'सोजिरां'च्या बाचाबाचींतील शब्दन् शब्द त्यांनीं कोर्टांत सांगितला. तात्पर्य, असल्या एकपाठी बुद्धिमत्तेमुळें त्यांना कोणताही विषय अवघड जात नसे आणि म्हणूनच त्यांना लातिन, इंग्रजी, फ्रेंच, संस्कृत इत्यादि आठ भाषा चांगल्या अवगत होत्या. शिवाय इतक्या सगळ्या ज्ञानाच्या मानानें त्यांनीं, इतिहास, ज्योतिष वगैरे निरनिराळ्या विषयांवर पुस्तकेंही त्यावेळीं लिहिलेलीं आहेत. आंग्लाईच्या आरंभ–कालांतील हा बहुश्रुतपणा आणि त्याला साजेसें कार्य हीं पाहिलीं म्हणजे शास्त्रीबुवांस आदरानें कोण नमस्कार करणार नाहीं?

बाळशास्त्री जांभेकरांप्रमाणें आगरकरांस हिंदुसमाजांतील दोषच नुसते दिसले असें नव्हे, तर त्या दोषांच्या बुडाशीं असलेली गुलामी मनोवृत्तीहि त्यांच्या निदर्शनास आली! सारासार विचार ठार मारणाऱ्या मनुजप्रणित रुढीचाच, मनुष्य जसा गुलाम बनतो तसा दुसऱ्या कशाचाही बनत नाहीं. ही स्थिति कायमची कधीं नष्ट होईल कीं नाहीं याबद्दल जबरदस्त शंका शक्तिमंत विचारवंताच्याही मनांत धगधगत ठेवणारी जर कोणती जबरदस्त गुलामगिरी असेल तर ती रूढीची होय! या गुलामगिरीला मातीला मिळविण्याचा चंग आगरकरांनीं 'सुधारकाच्या' द्वारें बांधला होता. तेव्हां अमेरिकेंतील गुलामगिरीला आपल्या पत्रद्वारें कबरस्थानाप्रत पोचविण्याची जीवतोड करणाऱ्या गॅरिसन साहेबांचीहि आगरकरांच्या नांवाबरोबर साहजिकच आठवण होते. "मी सत्यासारखा कठोर व न्यायासारखा बेमुर्वत राहीन. मी दिलखुला आहे. मी दुटप्पी नव्हे; मी गय करणार नाहीं; एक इंचभर मागें सरणार नाहीं, आणि माझें म्हणणें ऐकलें जाईलच जाईल" या बाण्यानें गॅरिसन

साहेबांनीं अमेरिकेच्या गुलामांच्या मुक्ततेसाठीं लोकमत खुंटीला गुंडाळून ठेवलें, आणि आधिकार व संपत्ति यापुढें आपली मान न वाकवितां सत्त्याच्या जातिवंत प्रेरणेनें आपला उद्योग त्यांनीं चालविला. दुष्ट रूढींच्या गुलामगिरीमुळेंच आत्मवंचक बनलेल्या आपल्या देशबांधवांना विचारस्वतंत्र करतांना आगरकरांनीं " बांधवहो, विचारकलहाला कां भितां ? " असा प्रश्न करून " सुधारक व सुधारणा " यांचाच अखेर जय होणार, असाच आत्मविश्वास प्रगट केला नाहीं काय ?

प्रकरण ८ वें

# कार्लाइल आणि आगरकर.

" इंग्लंडमध्यें कार्लाइलनें जें कर्तृत्व केलें तेंच गोपाळरावजींचें. "

—बा. ब. पटवर्धन.

आपल्या महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनार्थ गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचविशींत ज्या महाभागांनीं आपलें तनुमनधन अर्पण केलें त्यांत गोपाळरावजी आगकरांची प्रामुख्यानें गणना होत असल्याकारणानें, त्यांच्या कामागिरीची बरोबरी करणारी कामगिरी आगरकरांच्या काळांतच इंग्लंडसारख्या स्वतंत्र देशांत करणाऱ्या टॉमस कार्लाइलकडे साहजिकच चित्त वेधतें, आणि या दोन कर्तबगारांच्या चारित्रांचा तौलनिक अभ्यास करण्याचा मोह अनावर होतो.

तशा दृष्टीनें पाहूं लागलें तर, कार्लाइल व आगरकर यांच्यांत अगदीं पहिला ढळढळीत विरोध दृष्टीस पडतो तो हा कीं, इंग्लंडच्या आगरकरानें ४ दिसेंबर १७९५ रोजीं जगांत प्रथम तोंड काढलें आणि ४ फेब्रुवारी १८८१ या दिवशीं त्याच जगाचा निरोप घेतला; तर महाराष्ट्राच्या कार्लाइलनें जगाच्या रंगभूमीवर अवघें एकूण चाळीस वर्षेंच काम केलें. एक दीर्घायुषी तर दुसरा अल्पायुषी. आईबापांच्या बाबतींतही तोच चमत्कार. टॉमस कार्लाइलचा बाप जेम्स पाथरवटाचा धंदा करून आपल्या कुटुंबाची उपजीविका करी, आणि त्यानें स्वतःच्या कमाईवर जातीच्या मालकीचें एक घरही बांधलें होतें. शिवाय तो दृढनिश्चयी आणि करारी असल्याकारणानें त्याचा मोठा दरारा असे. पण तेंच आगरकरांच्या घरीं कसलें चित्र दिसतें तें पहा! गणुआप्पांनीं नवी कमाई तर कांहीं केली नाहींच, पण वाडिलार्जित घरादाराची तन्दुरुस्ती नीटपणें राखण्याचेंही त्यांना रेटलें नाहीं. गणुअप्पांची स्वतांची प्राप्ति म्हणजे रोजच्या पोथीपुढें जमणारे तांदूळ, किंवा कधींमधीं केलेल्या कीर्तनाच्या आरतींत पडणारा आणा दोन आण्याचा खुर्दा होय. या व्यवसायापुरतें संस्कृताचें अध्ययन गणुअप्पांनीं केलें होतें खरें, पण ते जेम्स कार्लाइलसारखेंच अविद्वान वाटतात, आणि त्यांच्या सात्विक ढिलाईकडे लक्ष गेलें म्हणजे तर त्यांना सादर नमस्कार करून मूग गिळून बसावेसें वाटतें. भक्तिपरायणतेंत मात्र गणुअप्पा जेम्सपेक्षां सहस्रपटींनीं सरस होतें.

या स्कॉच आणि महाराष्ट्रीय संजीवनाचार्यांच्या मातांकडे पाहिलें तर त्यांच्यांत विलक्षण साम्य दिसून येतें. मार्गारेट कार्लाइलप्रमाणेंच सरस्वतीबाई आगरकरही गरीब, प्रेमळ आणि धर्मभोळ्या होत्या. आतां मार्गारेटप्रमाणें सरस्वतीबाईंनीं आपल्या मुलाला धर्मपुस्तकांचें अगर धर्मतत्त्वांचें शिक्षण दिल्याचें कोठें प्रसिद्ध नाहीं. तथापि सरस्वतीकाकूंनीं स्वकृतपद्यांनीं परमेश्वराला आळविलें. टॉमसनें धर्मोपदेशक व्हावें एवढी इच्छा करून मार्गारेटला शेवटीं हार खावी लागली, तर सरस्वतीकाकूंच्या

भक्तिपरायणतेचा एवढा विलक्षण प्रभाव होता कीं, त्यांचा थोरला मुलगा गोविंदराव यानें मॅट्रिकपर्यंत शिकूनही माटेबुवांचें ऐकून आमरण ब्रह्मचारी राहून सगळें आयुष्य ईश्वरचिंतनांत घालविलें. बाकी एवढें मात्र खरें कीं, दोघींचेंही आपल्या अपत्यांवर इतकें अलोट प्रेम होतें कीं, त्यांच्याकरितां त्या आपल्या इच्छा, आशा, आकांक्षांवरही पाणी सोडीत.

टॉमस कार्लाइल आणि गोपाळराव आगरकर यांचे जन्म मात्र भिन्न परिस्थितींतले! टॉमस आपल्या नऊ भावंडांत सर्वांत वडील, तर गोपाळ सात भावंडांत दुसरा मुलगा. टॉमस अनंडेल परगण्यांत आपल्या गांवीं–एकलफेकन येथें–आपल्या घरीं जन्मला, तर गोपाळचें टेंभू टॉमसच्या गांवासारखेंच खेडें असलें तरी तो आपल्या इतर भावंडांप्रमाणेंच आजोळीं जन्मला.

जी जन्माची तीच शिक्षणाचीही गत. टॉमस प्रथम आपल्या गांवच्याच शाळेंत शिकल्यानंतर त्याला त्याच्या आईबापांनीं अनंडेलच्या शाळेंत घातलें. तेथें तो १८०९ पर्यंत लाटिन, फ्रेंच, बीजगणित, भूमिति आणि थोडेसें ग्रीक शिकला. त्याला इतिहासाची गोडीही तेथेंच लागली. याच वर्षीं खुद्द टॉमसच्या वडिलांनींच टॉमसला एडिंबरोच्या विश्वविद्यालयांत घातलें. आतां इतकें खरें कीं, एडिंबरोपर्यंत ८० मैलांचा प्रवास टॉमसला पायीं करावा लागला, आणि घरच्या गरिबीमुळें त्याला काटकसरीच्या कात्रींत रहावें लागून घराहून येणाऱ्या ओटमील, बटाटे व लोणी यांच्यावर गुजारा करावा लागे आणि हालांत दिवस जात! पण गोपाळरावजी आगरकरांच्या चित्राकडे पाहिलें तर अंतःकरणाची किती कालवाकालव होते! सरळ शेंबूड काढतां येत नाहीं अशा चिमण्या वयापासून सरस्वतीच्या प्रसादासाठीं, आईबापांच्या प्रेमळ छत्राला मुकून गोपाळरावजींस कऱ्हाडास रहावें लागलें. टॉमस कार्लाइलला चवदाव्या वर्षीं जें ज्ञान होतें त्या मानानें गोपाळरावजींस काय होतें? अशा स्थितींत, पैशाचें पाठबळ नसतांना आप्तेष्टांचा आधार नसतांना, कऱ्हाडपासून रत्नागिरीपर्यंत त्या कोमल वयांत पायी प्रवास. रत्नागिरीस दुसऱ्यांचीं दुरुत्तरें सहन करून व शागिर्दी, त्यानंतर प्यादें मूळ घरांत येऊन कंपाउंडरीचा खल. पुढें चार लोकांनीं हात दिल्यामुळें अकोल्यास मॅट्रिकपर्यंत शिक्षण, परंतु फिरून कॉलेजच्या शिक्षणासाठीं निबंध लिहून आणि वक्तृत्व गाजवून पैसे मिळवणें, शिवाय एका सदऱ्यावर गुजराण करावी लागली. येथें हेंही नमूद करणें अत्यंत आवश्यक आहे कीं, वाङ्मय आणि इतिहाय यांची गोडी गोपाळरावजींना अकोल्यास महाजनींच्या हाताखालीं शिकत असतांनाच लागली होती. शिवाय 'कॉलेजांतील' शिक्षणानें, वाचनानें व विचारानें टॉमस कार्लाइलप्रमाणेंच गोपाळराव संशयवादी बनले. इकडे 'एंजीनीअरिंग' करतां म्हणून जर्मन भाषेचा अभ्यास करीत असतां कार्लाइलचा पुन्हां "आध्यात्मिक जन्म" झाला, परंतु गोपाळरावांचा संशयवाद आमरण कायमच होता. तथापि कार्लाइलइतकेंच काय, पण कोणत्याही महंताला साजेल असेंच गोपाळरावांचें वर्तन शुद्ध असे हें महशूरच आहे.

शिक्षणक्रम पुरा होऊन जवळ जवळ अर्धें तप उलटलें तरी टॉमस कार्लाइलच्या आयुष्याचें ध्येय-कार्य ठरलें नव्हतें. आगरकरांनीं तें कॉलेजांत शिकत असतांच ठरविलें होतें. अनण्डेल आणि कर्ककॅल्डी येथें टॉमसनें कांहीं दिवस शिक्षक म्हणून काम केलें खरें, पण तें गोपाळरावजींप्रमाणें आयुष्याचा संकल्प म्हणून नव्हे, तर केवळ प्रवाहपतित म्हणून! १८२१ मध्यें जर्मन वाङ्मयाच्या वाचनानें कार्लाइलचा आध्यात्मिक पुनर्जन्म झाल्यावर त्या भाषेंतील विचार इंग्रजींत आणणें हें त्याचें ध्येय बनलें आणि १८२४ पासून तर लेखनव्यवसाय हेंच कार्लाइलनें उपजीविकेचें साधन केलें. गोपाळराव आगरकरांचें मात्र "लोकशिक्षणा" चें ध्येय हें विद्यार्थीदशेंतच निश्चित होऊन तत्सिद्ध्यर्थ शिक्षकाचा व संपादकाचा पेशा त्यांनीं कर्तव्य म्हणून पत्करिला, आणि धनेच्छु कार्लाइलनें जितक्या तत्परतेनें तो पार पडला तितक्याच कांटेतोल तत्परतेनें तो गोपाळरावांनीं पार पाडून आपल्या स्वार्थत्यागानें त्याला पावित्र्याची गोड जोड करून दिली.

पुढील हकीगत सांगण्यापूर्वीं या 'प्रकरणाच्या' जन्माच्या जोडींचा उल्लेख केला पाहिजे. पहिली जोडी म्हणजे शारीरिक व्याधींची. १८१८ पासून चार-पांच वर्षें अनिश्चित ध्येयाच्या टॉमस कार्लाइलनें आपल्या स्वतांच्या हेळसांडीनें आपणांस अजीर्णाचा विकार जडवून घेतला, तर सार्वजनिक चारित्र्याच्या उंबरठ्यावर पाय ठेवायच्या अगोदरच गोपाळरावांचा आनुवंशिक दमा त्यांच्याशीं एकरूप झाला होता.

दुसरी जोडी म्हणजे अर्थातच गृहलक्ष्मीची. देशकालांचे भिन्नत्वामुळें टॉमस कार्लाइलचा प्रीतिविवाह झाला असला आणि गोपाळरावजींच्या लग्नसंबंधांत सगळें पालकांच्या मर्जीनुरूप ठरलें व झालें असलें, तरी त्या इंग्रजी दांपत्यापेक्षां कितीतरी पटीनें या महाराष्ट्रीय दांपत्यानें घराला स्वर्ग बनविलें होतें. कार्लाइलच्या प्रापंचिक सुखाबद्दल कितीतरी बभ्रा झाला होता! टॉमसला एकंदरीनें प्रपंचसुख बरें होतें आणि पत्नीच्या मृत्युनें त्याला हैराण झाल्यासारखे झालें होतें असा पुरावा जरी आतां बाहेर आला आहे, तरी कष्टाचे दिवसांत काम जास्त पडल्यामुळें जेनला वैतागल्यासारखे होई, आणि सदासर्वकाळ पुस्तकांत डोकें खुपसून बसणारा टॉमस पुढें पुढें चिडखोर आणि त्रासिक बनल्यामुळें त्याचे व जेनचे सारखे खटके उडत हे नाकबूल करण्यांत बिलकुल अर्थ नाहीं. आतां इकडे म्हणजे गोपाळरावजींचीं सगळीं मतें यशोदाबाईस पटत असें नव्हे, किंबहुना पुष्कळदां ती न पटणारींच असत. तथापि खुद्द गोपाळराव शांत व सहनशील आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्याकारणानें या प्रेमळ पतिपत्नीस पूर्वपश्चिमाभिमुख होण्याचा कधीच प्रसंग आला नाहीं, खुद्द यशोदाबाई जातिवंत हिंदु पतिव्रता असल्याकारणानें जळत्या दारिद्र्यांत–देखील त्यांनीं आपल्या अंगचा द्रौपदीपणा प्रगट केला.

शेवटीं, इतिवृत्ताच्या आखाड्यांत हात घालण्याचें फारच थोडें उरतें. टॉमस कार्लाइलनें एडिंबरो–रिव्ह्यू वगैरे मासिकांतून लेख लिहून आणि प्रसंगीं व्याख्यानें देऊनही पैसे मिळवले आणि आगरकरांना अवघा हातावरच प्रपंच करावा लागून

आमरण दारिद्र्याचें निर्वाण भोगावें लागलें. गोपाळरावजीप्रमाणें टॉमस कार्लाइलचें लिखाण लोकांना अप्रिय झालें खरें, परंतु शेवटीं तो विद्यार्थ्यांकडून एडिंबरो युनिव्हर्सिटीचा लॉर्ड रेक्टर निवडला गेला आणि त्यापुढें तर इंग्लंड व जर्मनी या देशांकडून त्याच्यावर पदव्यांचा आणि मानमरातबांचा वर्षाव झाला. आगरकरांचे विद्यार्थी त्यांना पित्यासमान लेखीत आणि निवडणूक हातीं असती तर त्यांनीं आगरकरांस कसल्याही उच्चस्थानासाठीं निवडून दिलें असतेंही. शिवाय आगरकरांचें वाङ्मय मराठी भाषेचें भूषण मानलें जातें खरें, पण त्यांच्या हयातींत त्यांना आमरण नव्या तरवारीच्या धारेवर मान ठेवून चालावें लागलें असें म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति व्हावयाची भीति नको.

पण याला कारण दोन देशांतील भिन्न स्थिति. वर म्हटल्याप्रमाणें टॉमस कार्लाइलचें लेखन लोकांस अप्रिय झालें खरें, पण याला पुष्कळ प्रमाणांत त्याचा तोच कारण होता. टॉमसची विचित्र भाषा, आपले विचार नमूद करण्याची त्याची भानगडीची पद्धति आणि इतक्याही उप्पर त्याचा जर्मन–वाङ्मयाचा अभ्यासू अभिमान यामुळें इंग्रज जनतेला त्याचें लेखन प्रथम कसेंसेंच वाटे. तेंच गोपाळरावजींचें अगदीं निराळें खातें पडतें. भाषेंत पांचपेंच नाहींत, विचार नमूद करतांना कधीं ब्रह्मघोटाळा व्हायचा नाहीं व भाषेचा ओघ भरल्या नदीप्रमाणें गंभीरपणें चालावयाचा. तरीपण आगरकरांच्या हयातींत त्यांच्या लेखनास मिळावा तितका व तसा मान मिळाला कांहीं. टीकात्मक, भाषांतरात्मक, तात्त्विक, राजकीय, सामाजिक, आर्थिक वगैरे बहुतेक सर्व विषयांवर आगरकरांनीं आपली लेखणी उत्तमप्रकारें चालविली असून जोरदारपणाच्या किंवा परिणामकारकत्वाच्या बाबत आगरकरांचें वाङ्मय टॉमस कार्लाइलचे वाङ्मयापेक्षां रतिभरही मागें सरणार नाहीं; तर उलट त्यासच रति–भर मागें टाकील. असें असूनही आणि टॉमस कार्लाइलाप्रमाणेंच गोपाळरावजी आगरकरांचा स्वभावही आधाराखेरीज उगाच मतें व विधानें दडपून देण्याचा नसतां, कार्लाइलप्रमाणेंच गोपाळरावजींस मान्यता मिळाली नाहीं याचें प्रमुख कारण तत्कालीन लोकस्थिति असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. दीर्घकालपर्यंत जगाच्या डोळ्याला डोळा द्यावयाचें भाग्य जर कार्लाइलप्रमाणें आगरकरांस लाभतें तर कार्लाइलच्या दांडग्या ग्रंथसंपत्तीसारखी मोलाची ग्रंथसंपत्ति त्यांनीं महाराष्ट्राला खास अर्पण केली असती असें 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायानें जसें बिनधोक म्हणतां येईल, तसेंच त्यांच्या अप्रियतेचा पाराही पुष्कळ खालीं उतरल्याशिवाय राहिला नसता, असेंहि बिनदिक्कत म्हणतां येईल.

ज्या लोकस्थितीबद्दल थोडासा तक्रारवजा उल्लेख केला आहे, ती कशी भिन्न होती हें आतां थोडक्यांत पाहूं. इंग्लंडांत एकोणिसावें शतक म्हणजे यांत्रिक शक्तीचें शतक! त्या वेळीं "यंत्राच्या प्राबल्यानें माणसांचीं यंत्रें झालीं होतीं." "माणसेंही घड्याळाप्रमाणें ठरीव गतीनें, ठरीव नेमानें चालणारीं यंत्रेंच बनलीं. ईश्वराचें–आदिकारणाचें–विश्वकर्म्याचें प्रयोजनच उरलें नाहीं." अध्यात्म्याचा नायनाट होऊन

आधिभौतिकाला लोक कवटाळत होते. अशा स्थितींत टॉमस कार्लाइलनें आरोळी ठोकली कीं, " हें नफ्यातोट्याचें शास्त्र, ही वाण्याची विद्या कीं, जिनें माणुसकीचा खुळखुळा केला आहे, ती पारखून घ्या आणि जें हिणकस असेल तें फेकून द्या. " टॉमसच्या या आरोळीचा मुद्देसुद अर्थ जरी इंग्रज जनतेच्या प्रथम लक्षांत येईना, तरी कार्लाइलच्या प्रयत्नसातत्यानें पुढें पुढें तो तिला पटूं लागला; आणि प्रॉटेस्टंट धर्माच्या ल्युथरच्या सुधारणेपासून योग्य प्रसंगीं रूढीची चाकोरी सोडायला शिकलेली आंग्ल जनता झपाट्यानें कार्लाइलचें म्हणणें मानूं लागली.

आगरकरांच्या वेळच्या महाराष्ट्राची स्थिति या शेवटच्या म्हणजे लवचिक-पणाच्या बाबतींत अतिशय निराशाजनक होती. खुद्द मार्टिन ल्यूथरलासुद्धां आगर-करांच्यासारख्या खडकाळ परिस्थितीशीं टक्कर मारावयाची नव्हती. मग कार्लाइलची तर गोष्टच बोलावयास नको! मार्ग काट्याकुट्यांचा असला, दगडधोंड्यांनीं खचल्या-मुळें पावलापावलास ठेंचा लागून पाय रक्तबंबाळ होत असले, आणि इतकेंही करून लभ्यांश–तथ्यांश बेताचाच किंवा मुळींच नसला तरी वाडवडील त्या वाटेनें जात आले एवढ्याच एका गुरुगौरवाच्या कारणावरून महाराष्ट्र तो मार्ग सोडायला तयार नव्हता. अशा स्थितींत रूढीच्या, शुष्क पद्धतीच्या, आणि वायफळ शिष्टाचारांच्या सोंगाड्या घाण्याभोंवतीं अंधपणें फिरणाऱ्या महाराष्ट्राला 'घाण्यांत दाणा नसल्याची व दाण्यांत तेल नसल्याची' पटणारी जाणीव करून देणें किती महाकर्म कठीण होतें याची कल्पनाच करणें बरें! पण हेंही काम थोड्या प्रमाणांत आगरकरांच्या हयातींत झालें होतें हें त्यांच्या 'सुधारका'नें मिळविलेल्या 'लोकप्रियतेवरून' म्हणतां येईल. कार्लाइलच्या देशबांधवांचा प्रसंगावधानी लवचिकपणा आगरकरांच्या महाराष्ट्रांत असता तर आगरकरांची कामगिरी कार्लाइलच्या कामगिरीवर कितीतरी पटीनें ताण करती!

मग त्यांतल्यात्यांत अनुकूल परिस्थितींत आजन्म वावरलेल्या व काम केलेल्या कार्लाइलपेक्षां सर्वथैव प्रतिकूल प्ररिस्थितीच्या पकडींत आजन्म वावरून तेंच काम करणाऱ्या आगरकरांना त्रिवार धन्यवाद द्यावेसें वाटत नाहीं काय? निष्कपट आचरण आणि सदय अंतःकरण या दोघांच्या सामान्य गमकांबरोबरच, भिडस्त आणि हळव्या मनाच्या कार्लाइलचा कडक रागीटपणा, बाणेदार ब्रीदाच्या जिवंत आस्थेच्या आगरकरांच्या धैर्यशील सहनशीलतेशीं तोलून पाहिला म्हणजे तर आगर-करांबद्दल अंतःकरण आदरानें उचंबळून येतें.

" हा एक खरा नरशार्दूल जन्माला आला! काय त्याचें तेज, कीं जगाला शतकेंच्या शतकें आणि युगेंच्या युगें त्याचा प्रकाश पुरेल. अंतःकरण म्हणजे सभ्य-त्वाचें पोवळें आणि त्यांत दया व प्रेम यांचा मध हा कसा तुडुंब भरलेला! जातिवंत धीर-हृदय याहून निराळें कधींच असणार नाहीं. अशा माणसाला मी मोठा म्हणतों—अल्पाइन पर्वतासारखा मोठा समजतों. इतका साधा, इतका सिधा, इतका प्रसंगस्फूर्त आणि वर मोठेपणाची झांकसुद्धां न मारणारा! "

हे कार्लाइलचे उद्गार आगरकरांसंबंधांत बहुतांशीं अन्वर्थक वाटल्यावांचून रहात नाहींत.

प्रकरण ९ वें

# साक्रेटिस आणि आगरकर

" निस्पृहस्य तृणं जगत् "

अनियंत्रित सत्ताधारी समुद्रापेक्षांही लहरी असतो अशी लौकिक समजूत आहे, पण इतिहास त्याच्यापेक्षांही लहरी आहे. केलेलेंच करण्यांत, गिरवलेलेंच गिरवण्यांत, आणि झालेल्याची उजळणी म्हणण्यांत त्याला लहान मुलाच्यावर मौज वाटते. प्रसंगानुसार मांडणीमोडणींत डोळ्यांत भरण्यासारखा फरक असतो ही गोष्ट खरी, पण मार्मिक नजरेला समान रंगाचे किरण प्रतीत झाल्याशिवाय रहात नाहींत. आत्मप्रतिष्ठेंत तल्लीन असणाऱ्या इतिहासाच्या त्या बाललहरीचा आस्वाद सुखसंवेदक आणि उद्बोधक असतो; नाहींतर, 'तौलनिक अभ्यास' हा शब्दप्रयोग तरी कोठून अस्तित्वांत येता ?

अभ्यासू मनाच्या तौलनिक चष्म्यापुढें, आगरकरी वातावरणाच्या कक्ष्यांत समान्तर चमकेच्या प्रभावळींत साक्रेटिस वावरतो तो तरी, घेतलेलीच चक्कर पुन्हा घेण्याच्या इतिहासाच्या लहरीमुळेंच. खिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या मध्यावर जन्मलेला ग्रीक साक्रेटिस आणि खिस्ती सनाच्या एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जगांत येणारे व वावरणारे महाराष्ट्रीय आगरकर यांच्यांत विलक्षण साम्य आढळावें हें केवढें आश्चर्य ! वृत्ति, परिस्थिती, कर्तबगारी, कार्य– कोणत्याही टेकावरून टेहळणी केली तरी, सव्वादोन हजार वर्षांच्या अंतरानें उगवलेल्या या ग्रीक आणि महाराष्ट्रीय तारकांवर समान गोडीचे सुधांशु झळकतांना दिसतात; इतके कीं, दरेकाची खास लज्जत निराळी असली तरी ती मनाची पकड तितकी करीत नाहीं.

तथापि केसाचा कीस काढण्याइतकें बारीक बघणाऱ्या चिकित्सेला त्याचें काय होय ? सागरमाप सारखवटपणांतूनसुद्धां निराळी झांक मारणारें पाणी किरण साधून बसणाऱ्या चिकित्सेच्या तडाक्यांतून सुटत नाहीं. मग साक्रेटिस–आगरकरांबाबत काय विचारावें ? डोळे चोळून मर्मभेद केला असतां तेथें निशाण्याच निर–निराळ्या दिसतात. महाकवि शेक्सपीअरप्रमाणेंच ग्रीक तत्त्ववेत्ता साक्रेटीस याचें नांव जगांतील कोणत्या देशास ठाऊक नाहीं ? पहिल्याच्या नाट्यसृष्टीप्रमाणें दुसऱ्याच्या तत्त्वज्ञानाचा आस्थापूर्वक अभ्यास सर्वत्र होत नाहीं, किंबहुना साक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाची तोंडओळखही क्वचितच असते; तथापि त्या महाभागाचें नांव सर्वत्र दुमदुमतें आहे. हें नुसतें नांवाचें वैभव तरी आगरकरांच्या नशिबीं कोठें आहे ? साक्रेटिसासारख्या 'चिंतामणी । दैवें लाधला आपणांलागुनी' अशी प्रचीति खुद्द ग्रीस देशाला आणि जगाला झेनाफन व प्लेटो यांच्या साक्रेटिसविषयक ग्रंथांनीं केली आणि त्या तत्त्ववेत्याच्या कीर्तिरूप आक्रोडाचें बी त्याच्या

मरणोत्तरच रुजलें, वाढील लागलें, व वृक्षरूप आणि विस्तार पावलें हें कबूल! त्याच निकषावर आगरकरी नाणें खणखणेल, ही अपेक्षाही वावगी नाहीं. पण चिकित्सेचें गणित तशी कुंडली तयार करीत नाहीं त्यास नाइलाज आहे. आगरकरांबद्दलच्या अवास्तव कल्पना धरणीकंपासारख्या दुभंग होत चालल्या आहेत, त्यांच्या विवेकप्रधान सुधारणेचे पाऊल पुढें पडत आहे, पंडित अण्णासाहेब कर्व्यांसारख्यांनीं त्यांची परंपरा उज्वल राखली आहे, आचार्य गो. चि. भाटयासारखे अधिकारी शिष्यवर आगरकरांवर मनोहर व सर्वमान्य भाष्य लिहितात. पण सॉक्रेटिसाप्रमाणें आगरकराचें नांव जगभर फडकेल असें दिसत नाहीं. दोघेही क्रांतिकारक खरे, पण तत्त्वज्ञानाचा—पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा मूळ प्रणेता म्हणून दुनियेच्या दरबारांत सॉक्रेटिसाला जो मान आहे, तसा पटकावण्यासारखे आगरकरांच्या बाजूस काय आहे? नाहीं म्हणावयास, "स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमान् एकःसतामग्रणीः" या दृष्टीनें आगरकरांचे नांव सॉक्रेटिसाच्या मालिकेंत झळकेल, पण सॉक्रेटिसाच्या वैशिष्ठ्यामुळें त्याला व ग्रीसला जो गौरव, तो आगरकरांच्या व त्यांच्या द्वारां महाराष्ट्राच्या वाट्याला नाहीं; कारण दुनियेच्या दाखलदारींत आगरकरांचे 'आपलेंपण' म्हणून कांहीं नाहीं.

पण प्रत्येक ग्रहाला सूर्याइतकी व्यापक कक्षा कोठून येणार? रंगभूमीवर सगळ्याच पात्रांना राजाचा पोशाख मिळत नसतो. तत्रापि 'प्रजानुरंजनांतील राजेपण' प्रत्येकाच्या हातीं असतें. या दृष्टीनें पाहतां आगरकर—सॉक्रेटिसांची तुलना होते खरी! तीमधील पंक्तिप्रपंचसुद्धां डोळेझांक करण्याइतका क्षुल्लक नाहीं. तथापि स्वदेशविषयक कळकळीच्या आणि स्वजनसेवेच्या वेदीवर दोहोंसही परिणामाच्या अक्षदा सारख्याच वाट्याला येतात.

परिस्थितीच्या फलाकांवर सॉक्रेटिस-आगरकरांकडे पाहिलें तर मनोरंजक देखावा दिसल्यावांचून रहात नाहीं. समाजांतील उचनीच भावनेच्या कक्षेंत सॉक्रेटिस जन्मानें आगरकरांच्या इतका वर लागत नाहीं. तथापि पाषाणमूर्तिकार साफ्रोनिस्कस आणि सुईण फेनारिती यांनीं आपला मुलगा सॉक्रेटिस याला आपल्या हातीं धरून इतका चालविला होता कीं, वडिलांचें वळण सॉक्रेटिसाचे हातीं चांगलें बसलें होतें. दुसऱ्याच्या मनांतील विचार वदवण्यांत सॉक्रेटिसानें आईचें 'सुईणपण' उचललें होतें आणि बापाचा पाथरवटी हातोडा त्याच्या हातीं असा बसला होता कीं, पाजेनियस राजाच्यावेळीं अथेन्समध्यें गाजत असलेल्या मर्क्युरी व ग्रेसच्या मूर्ती सॉक्रेटिसच्या होत अशी ख्याति आहे. व्यवहाराच्या अंगणांत आईबापांच्या बोटाला धरून "चाल चाल माते" आगरकरांनीं केलेंच नाहीं म्हटलें तरी चालेल आणि वडिलांप्रमाणें त्यांनीं कधीं पुराण सांगितलें नाहीं कीं कीर्तन केलें नाहीं. तथापि कवयित्री आईची रसिकता व व निष्ठा आणि वडिलांची वर्णनशैली आगरकरांनीं आत्मसात् केली होती. वडिलार्जित दोन एक हजारांचा कुणगा सॉक्रेटिसाच्या हातीं लागून तो तुकारामाप्रमाणें त्यानें उडविला; पण तशी अगर तशा पंखीं माया आगरकरांकडे वाहिली

नसतांनासुद्धां त्यांना साक्रेटिसाइतकाच आपल्या जन्मदात्याबद्दल आदर वाटत होता.

शिक्षणाच्या वळणावर वर मान करून पाहिलें तर साक्रेटिसाची पहिली व्यावहारिक दिशा बदलून त्यानें ज्योतिष, सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र वगैरेंचा अभ्यास केला तर आगरकरांचें नाटक मागील अंकावरूनच पुढें चालूं राहिलें. सरस्वतीचा हा उत्सव साक्रेटिसांबाबत केतोनें व आगरकरांबाबत नागपूरकर मुनसफांनीं साजरा केला. लोकशिक्षणाचें कार्य दोघांनींही केलें, पण एकानें नुसत्याच जिभेचा पट्टा चालवून, तर दुसऱ्यानें शाळेंत जीभ व वृत्तपत्रांत लेखणी यांचा उपयोग करून.

घरगुती वर्तुळांतसुद्धां हेंच रंग भरलेले आढळतात. साक्रेटिसाची गृहिणी जांतपी ही त्राटिकेची पूर्वकल्पना विधात्यानें उत्पन्न केली होती कीं काय देव जाणें ! ‘ गृहिणी गृहमुच्यते ’ हें यशोदाबाई आगरकरांनीं सार्थ केलें, तो मगदूर जांतपीचा नव्हता. शिवाय मिरतो नांवाचें आणखी एक ‘ कुटुंब ’ साक्रेटिसाचें होतें असा लोकप्रवाद क्वचित् ऐकूं येतो. साक्रेटिसाला जडलेलें ‘ तात्त्विक वेड ’ त्याच्या संसारविषयक उदासीनतेला कारण झालें असेल, पण दोन बायकांचें दादलेपण आणि त्यांतही जांत–पीची ‘ चंडी ’ प्रकृती कमी जबाबदार गणतां येत नाहीं. खुद्द गोपाळराव आगरकरही साक्रेटिसाइतकेंच संसाराविषयीं विरक्त होते; पण ते तयार झालेल्या मनोधैर्यामुळें. तथापि आपल्या संसारविषयक कर्तव्यांत आगरकरांनीं कधींच कसूर केली नाहीं, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

शिवाय वातावरणांतही तोच प्रकार आढळतो. स्वतंत्र लोकसत्तेखालीं नांदणाऱ्या ग्रीस देशाचा नागरिक साक्रेटिस प्रसंगानुसार न्यायदानासाठीं पंच बनूं शके, आणि प्रसंगोपात स्वदेशाच्या सेवेसाठीं रणांगणावर तलवार गाजवावयासही जाई. आगरकरांचा महाराष्ट्र निःशस्त्र होऊन आंग्लाईच्या ठोकरीखालीं चुरडला असतां, न्यायदानासाठीं सरकारी सहीशिक्यानिशीं लोकमतानुवर्ती ‘ पंचत्व ’ पावणें अगर धारातीर्थी नांव गाजविणें शक्यतेच्या आत्यंतिक टोंकांवर होतें.

दक्षिणोत्तर ध्रुवाइतपत एकमेकांकडे पाठ फिरवून बसलेल्या अशा व्यक्तिविषयक परिस्थितींत त्यांना ज्या मैदानावर काम करावयाचें होतें, तीं अगदीं सारखीं होतीं. जेथें तेथें अज्ञानाचीं अभ्रें गढून राहिलीं होतीं; तोऱ्याचा, घमेंडीचा काळोख दाटून राहिला होता; वडिलांच्या विहिरीचें पाणी खारें असलें तरी तें गोड म्हणण्याइतका समाज ‘ कापुरुष ’ बनला होता; आपण आहोंत कोठें, आपला धर्म काय याची जाणीव जागती नव्हती. ‘ बळी तो कान पिळी ’ होऊन बेबंदशाहीचा धुमाकूळ चालला होता. तोंददेखलेपणा–तोंडपूजेपणा सर्वत्र बोकाळला होता. स्वार्थाचें साम्राज्य होऊन परार्थांतील परमार्थ परागंदा झाला होता.

हे पेच उकलावयास लोकशिक्षणाशिवाय दुसरी किल्ली कोठली ? आगरकर-साक्रेटिसांनीं तीच हाताशीं धरली. झालेल्या, बनलेल्या, निढावलेल्या लोकांच्या वाटे ते गेले नाहींत; तर होऊं घातलेल्या आणि बनूं पाहणाऱ्या व उमलणाऱ्या मंडळीवरच

त्यांनीं आपली भिस्त ठेवली. वादपटुत्वाच्या नाना तऱ्हा कारणीं लावून "जेथें जेथें येईल संधि" तेथें तेथें "जें जें कांहीं आपणांस ठावें। तें तें हळूहळूं शिकवावें॥ शहाणे करून सोडावें। सकळ जन॥" हा समर्थधंदा साक्रेटिस–आगरकरांनीं चालवला होता. "ज्याप्रमाणें 'पिछेसे आई' या तत्त्वाचा साक्रेटिसानें निषेध केला, त्याप्रमाणें 'बाबावाक्यं प्रमाणम्' चा आकरकरांनीं उच्छेद केला. प्रत्येक बाबतींत हें का व कसें, याची जाणीव साक्रेटिसानें तरुण पिढींत उत्पन्न केली, त्याप्रमाणें आगरकरांनीं विचाररहित रुढीवर हल्ला करून लोकांना आपल्या संस्कृतीबद्दल विचार करावयास लावलें... ज्याप्रमाणें साक्रेटिसानें भोळसरपणाच्या पारलौकिक ध्येयापासून लोकांना पराङ्मुख करून ऐहिक संसारांतल्या ध्येयाकडे लोकांचें लक्ष वेधलें, त्याचप्रमाणें आगरकरांनीं वेड्या धार्मिक कल्पनापासून लोकांना सोडवून त्यांना आपल्या ऐहिक उन्नतीच्या मार्गावर आणलें."

लोकशिक्षणाचें असलें कार्य साक्रेटिसानें चाळीस वर्षें केलें आणि आगरकरांनीं फक्त पंधरा वर्षेंच केलें; पण त्यांत समान वैशिष्ट्य असें कीं, दोघांचें हें कार्य भवितव्यतेनें अशक्यतेची मोहोर करीपर्यंत सारखें चाललें होतें. त्याचा परिपाक शिष्यप्रेमरूपानें त्यांना असा मिळाला कीं, त्यांचे विद्यार्थी त्यांना वडिलासमान लेखीत. साक्रेटिसाच्या शिष्यमंडळींत दुक्लिद, अरिस्तिवस, झेनोफेन, प्लेटोसारखे एकापेक्षां एकेक हिरे आहेत, तर आगरकरांची शिष्यशाखा कांहीं कमी वजनदार नाहीं. रा. माधव हरि मोडक अगर ह. भ. प. पांगारकर अशी व्यासभिन्न मतांच्या टोंकावरील माणसेंही आगरकरांच्याबद्दल कृतज्ञतेचें अश्रु गाळत, आणि आचार्य गोविंदराव भाटे कर्ते सुधारक म्हणून गाजलेले आहेत. शाळेच्या चार भिंतींतील शिष्याविषयीं ही गोष्ट झाली, पण आगरकरांच्या लिखाणानें स्फूर्ति मिळालेले धोंडो केशव कर्वे आगरकरांच्या शिकवणीचा झेंडा किती उंच फडकविताहेत हें सांगण्याची जरूर नाहीं. इतकेंच काय, पण त्रिखंड कीर्ति दुमदुमवून आलेले नामदार गोखले पूर्वाश्रमीं आगरकरांचेपासून स्वदेशसेवेची स्फूर्ति मिळालेले होते, हें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं..

साक्रेटिस–आगरकरांच्या शिकवणीची ही सुंठसाखर दृष्टीस पडावयास, त्यांना स्वतांला लोखंडाचे चणे पचवावयास लागले. तरुण पिढीला बिघडविण्याच्या अपवादावरून लोकांची जळफळ आणि शिव्याशाप यांचा वर्षाव तर साक्रेटिस–आगरकरांना आनंदानें सहन करावा लागलाच; पण शिवाय आपल्या प्रामाणिक मतांबद्दल आगरकरांना आपली प्रेतयात्रा निघालेली पहावी लागली आणि साक्रेटिसाला हेम्लाकसारखें हालाहल प्राशन करावें लागलें.

हे सोहळे बेहोष आनंदानें दोघांनींही करून घेतले. सत्याच्या अभंग पायांवर दोघांच्याही ध्येयाची उभारणी झाली होती, त्यामुळें त्यांचीं हृदयें म्हणजे जातीवंत नीतीधैर्याचे अथांग सागर होते. व्यावहारिक ज्ञानावर दोघांच्याही शिकवणीचा भर असल्याकारणानें बाजारबाटगेपणा त्यांच्या सावलीलाही उभा रहात नसे. "ज्याप्र-

माणें साक्रेटिसानें आपल्या मोहक वाणीनें व वक्तृत्वानें जनमतावर छाप बसविली, त्याचप्रमाणें आगरकरांनीं आपल्या चटकदार लेखनकौशल्यानें लोकसमाजावर छाप बसविली. आणि म्हणूनच रूढिप्रियतेच्या व परंपरेच्या संतापांत तेल पडत गेल्याचा अनुभव आला. तथापि दोघांना इष्ट असलेली कर्तव्यजागृती जमीनीवर आपटलेल्या चेंडूप्रमाणें उसळून यावयाची राहिली नाहीं. कारण साक्रेटिसाच्या वाणीप्रमाणें आगरकरांच्या लेखणींत तर्कानें तत्त्व शोधून काढण्याची बुद्धि आणि वक्तृत्वशक्ति हे गुण कमालीचे वसत होते. मंडळींत बसले असतां दोघेही उल्हासवृत्ति, रसिक व विनोदी असल्याची साक्ष तावडतोब पटे. पण नेहमीं जिभेवरच भिस्त ठेऊन आपला कार्यक्रम चालविणाऱ्या साक्रेटिसापेक्षां, दम्यामुळें मंडळींत फार करून वक्तृत्व न गाजविणाऱ्या आगरकरांस त्या वृत्तीचा फायदा अजी झाला नाहीं. साक्रेटिसाबद्दलचे गैरसमज दूर होण्यास त्या वृत्तीचा जसा एक फायदा झाला त्याप्रमाणें स्वतांस झालेली स्फूर्ति " दिमन " नांवाच्या यक्षाकडून झाल्याचें साक्रेटिस सांगत असे त्याचाही फायदा श्रद्धाळू वातावरणांत झाल्याविना राहिला नाहीं. याबाबत आगरकरांची पेठच अगदीं निराळी पडते. सदसद्विवेकबुद्धि त्यांची स्फूर्तिमाता आणि सुधारणेचा वाण पाश्चिमात्य ! त्यामुळें सर्वथैव 'आपलेंपण' दाखविणारा साक्रेटिस रूढिप्रिय जगाला अंतःकरणांतल्या अंतःकरणांत तरी जितका जवळचा भासावयाचा, तितकी प्रतिष्ठा तरी परक्या सुधारणेचें कलम हिंदी संस्कृतीवर करूं चाहणाऱ्या आगरकरांच्या वाट्यास एकदम कोठून येणार ? अशा स्थितींत, लोकांवर वचक बसावयास कांहीं अमोघ उपयोगी पडलें असेल तर निष्कलंक चारित्र्य. आकाश कोसळून पडो, आपलीं विवेकप्रधान मतें न सोडण्याचा दृढनिश्चय आणि दांडगी सहनशीलता या त्या निष्कलंक चारित्र्याच्या चमकदार धारा. या कायम ठेवावयाच्या म्हणजे धनाचे दावेदार होऊन दारिद्र्याला दोस्त बनवावें लागतें. साक्रेटिस–आगरकरांनीं हा सारा सागर आचमनासारखा पचनीं पाडला होता. 'देवाचा धर्म' पाळला जावा म्हणून आपलें कर्तव्य करीत असतां साक्रेटिस, आणि कर्तव्याकरितां कर्तव्य बजावित असतां आगरकर मनाला स्पष्ट वाटेल तें खडखडीत बोलावयास डगमगत नसत. तथापि लोकप्रवृत्ति लक्षांत घेऊन आपल्या शाब्दिक हल्ल्याची लपेट फिरवण्यांत साक्रेटिसाचा हात जसा सफाईदार तसा आगरकरांचा नव्हे. विरुद्धपक्षाविषयीं न्यायबुद्धि दोघांच्याही जवळ पण साक्रेटिसाचा विनय इतक्या अतिरेकाला गेलेला कीं, स्वतां सर्व जगांतील ज्ञानकोश असतां अज्ञानाचें सोंग घेऊन तो आपलें कार्य साधी; आगरकरांचें तसें नव्हतें ! प्रतिपक्षाच्या पदरांत पुरेपूर माप घालण्यासाठीं ते जिथल्या तिथें आणि जितक्यास तितकें टणकावित.

खासगी व्यक्ति म्हणून तर साक्रेटिस–आगरकराइतकें साम्य क्वचितच आढळेल. दोघेही सोशिक होते, निर्भय होते, प्रेमळ होते; दोघांसही दांभिकपणाची आणि कर्मठपणाची चीड होती, परोपकारासाठीं, लोकहितासाठीं, लोकशिक्षणासाठीं स्वार्थावर काठी लावून " ब्रह्मानंदी लागली टाळी, कोण देहातें सांभाळी " अशी साधुवृत्ति

दोघांनींही धरली होती. उत्कृष्ट मित्र, सज्जन गृहस्थ, आणि जातिवंत देशभक्त या नात्यांनीं तर त्यांनीं जगाला उदाहरण घालून दिलें आहे. आपल्या हयातकामासंबंधीं तर, न्यायमूर्ति रानड्यांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास साक्रेटिस–आगरकरांना असा बळकट विश्वास असावा असें दिसतें कीं,—

" सुधारणा पाहिजे आहे ती स्वतां लोकांतच पाहिजे आहे; हृदयाची, मेंदूची, आत्म्याची सुधारणा झाली पाहिजे. आत्मसात् झालेल्या त्यांच्या पूर्वग्रहांचें उच्चाटन झालें पाहिजे; त्यांच्या भोळ्याभावड्या समजुतीची बोळवण होऊन धीरवृत्तीला दणगटपणा आला पाहिजे; कमीपणा म्हणून कसा तो उरताच कामा नये. खरोखर त्यांचें चारित्र्यच पुन्हां असें बनावयास पाहिजे कीं, कालचक्राशीं–युगचैतन्याशीं त्यांचें तेव्हांच सूत जमेल. "

[ The thing to be reformed is their ownself, heart and head and soul, their own prejudices were to be rewared, superstitions to be eradicated, their courage to be strengthened, their weaknesses to be conquered, in fact, their character to be formed again so as to suit the times, so as to fit with the spirit of the age. ]

## प्रकरण १० वें

# विवेकयुगाचे प्रवर्तक आगरकर

माणसानें प्रत्येक कृति बुद्धिप्रामाण्यानें केली पाहिजे असें प्रतिपादणाऱ्या आगरकरांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा जो [1]मृत्युलेख लिहिला आहे त्यांत आपल्या सार्वजनिक आयुष्याच्या निशाणाची बिरुदावली त्यांनीं दिली आहे. ती सांगतांना व तिचें स्पष्टीकरण करतांना आगरकरांच्या बुद्धिवादाला अस्तराप्रमाणें भावनात्मकता बिलगून बसलेली आढळते. मात्र ही भावना उदात्त आणि उद्दीपक आहे. उदात्त व उद्दीपक भावना चैतन्याची जननी असते. अर्थात् तिच्या सेवेला निर्भीड वर्तन आणि स्वार्थत्याग हे न्यायाधीश आणि सेनापति म्हणून बुद्धिवादासारखा मंत्री सादर करीत असल्यास आश्चर्य नाहीं.

राष्ट्रसभेचे चिटणीस [2]ह्यूमसाहेब यांना अँग्लोइंडियन पत्रांनीं भ्रमिष्ठ ठरविल्याबरोबर त्यांचीच री ओढणाऱ्या आमच्याइकडील " वृद्ध शहाण्यांना " फैलावर घेतांना

१ " आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रीबुवांच्या अंतःकरणाला जशीं खात, तसें दुसरें कांहीं खात नसे...... पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें असें ते म्हणत...... परकीय या नात्यानें त्यांना इंग्रजांचा अत्यंत कंटाळा असे; पण त्यांची करामत, दृढता, कौशल्य, आणि उद्योग हीं पाहून त्यांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटत असे...... ज्याला ज्याला म्हणून हिंदु हें विशेषण लावता येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे...... ते वास्तविक रीतीनें पुढें सरसावलेल्या सुधारकाप्रमाणें होते...... सारांश हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं सुखी होण्याचें कोणतेंही साधन असल्यास ते अडथळा करणारे नव्हते. "

२ " दादाभाई नौरोजी, सर एव्हालिंग वेटिंग, डॉक्टर हंटर, सर चार्लस डिल्क हे बहुश्रुत गृहस्थ तर राजद्रोही नाहींत ना ? पण त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हिशोबांवरूनही उघड दिसतें कीं ब्रिटिश अमलांतील मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें तीस रुपयांपेक्षां अधिक नाहीं; तसेंच हिंदुस्थानांतील निम्मे किंवा दोनतृतीयांश लोक अर्ध्या पोटीं सारा जन्म काढतात ! राजनिष्ठ लोकांनीं अशी जबानी दिली असून अँग्लोइंडियन पत्राबरोबर आमच्या लोकांनीं ह्यूमसाहेबांस वेड लागल्यासारखें झालें आहे असें बहकणें हा केवढा प्रमाद व कृतघ्नपणा होय ! चार साहेब लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठीं हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकावर अशा रीतीनें उलटून पडणें हें आम्हां भेकड, लोभी, अविचारी व स्वार्थी हिंदु लोकांशिवाय कोणाच्यानेंही होण्यासारखें कर्म नाहीं ! ज्यांनीं ह्यूमसाहेबांस भ्रमिष्ट ठरविलें, त्यांनाच तसें ठरविणें उचित होणार आहे ! ह्यूमसाहेबासारखी आमची आम्हांस

आगरकरांनीं " आमची आम्हांस कळकळ आणि धैर्य असतें तर आमची सांप्रतची दास्यावस्था आम्हांस कोठून आली असती ?" असे मोठ्या कळवळ्यानें उद्‌गार काढले आहेत. आमची आम्हांस कळकळ ऊर्फ कार्यनिष्ठा आणि धैर्य यांची जोड निर्भीड वर्तन आणि स्वार्थत्याग यांच्या बरोबरीनें भावनात्मक बुद्धिवादाला असावयाची तर आत्मविश्वासाचा खंबीर पाया हवा. शास्त्रीबुवांच्या मृत्युलेखांत मरणाबद्दलही बेफिकीर असणारा [3]आत्मविश्वास आगरकरांनीं प्रगट केला आहे. अशा आत्मविश्वासाला टणक ध्येयाचा धर लागत असतो.

सर्वांगीण राष्ट्रीय [4]स्वातंत्र्य हें आगरकरांच्या जीवनाचें ध्येय होतें. हें ध्येय साध्य होण्यास " हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जारीनें [5]चळवळ करून आपला इच्छित हेतु तडीस जाईपर्यंत ती अश्रांत चालू ठेवण्याचा निश्चय केला पाहिजे " अशी आगरकरांची सांगी होती. लोकांत हें निश्चयाचें बळ येण्यास [6]पुढा-

---

कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणावर ओढवून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालों असतों. "

३ " आम्हांपैकीं एकजण जरी तळावर असला तरी आम्ही सर्वांनीं चालविलेले उद्योग अविच्छिन्न चालविण्यांत होईल तितकी खटपट करील. "

४ " समाज व्यवस्थितपणें चालून त्याचें पाऊल एकसारखें पुढें पडत जाण्यास जेवढ्या पारतंत्र्याची आवश्यकता आहे तेवढेंच पारतंत्र्य ज्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीस भोगावें लागतें व अधिक भोगावें लागत नाहीं, तो देश अत्यंत सुखी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं...... आपलें मन एकीकडे ठेवून दुसऱ्याच्या तब्वेतीप्रमाणें वागावें लागणें यांतच मोठें दुःख आहे...... ज्याची त्याच्या शिरावर जबाबदारी असल्यानें त्याच्या बुद्धीस जें चांचल्य येतें, उद्योगनिमग्नत्वामुळें त्याच्या वृत्तींत जी प्रफुल्लता असते, कष्टांतीं जय आल्यास जो अनिर्वचनीय आनंद होतो तो दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारास कधींही व्हावयाचा नाहीं. "

५ " मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें त्या बुद्धीनें ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होणार नाहीं, हें धर्मतत्त्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत सुखाची परमावधी व्हावयाची नाहीं, याकरितां राजकीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्हीं केलें पाहिजे... हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सर्वांनीं जारीनें चळवळ करण्यास सुरवात करून आपला इच्छित हेतु तडीस जाईपर्यंत अश्रांत ती चालू ठेवण्याचा निश्चय केला पाहिजे. "

६ " हातीं घेतलेलें काम शांततेचें असो किंवा लढाईचें असो, आम्हांला चांगला अग्रणी मिळाला तर आमच्यासारखे अनुयायी मिळावयाचे नाहींत.

त्याच्या उज्वल चारित्र्याच्या उदाहरणाखेरीज दुसरें साधन आगरकरांच्या मतें तरी नाहीं. आदर्श पुढारी व निष्ठावंत अनुयायी यांनीं अश्रांत चळवळ केली तरी, ज्यांच्या हितसंबंधाशीं त्या चळवळीचे धागेदोरे पोंचतात, ते सहानुभूतीचें धोरण कितपत राखतील याची शंकाच असते; इतकेंच नव्हें तर ते आपलाच हेका वा हट्ट चालविण्याचा संभव असतो. अशा वेळीं चळवळीच्या उत्क्रांतिऐवजी असंतोषाच्या आचेनें [७]क्रांति होईल अशी आगरकरांची खात्री होती.

आचरट रूढीच्या शृंखला तोडून व्यक्तिस्वातंत्र्याच्या वेगवान् अश्वावर आरूढ झाल्याशिवाय आपली प्रगति होणार नाहीं. आजपर्यंत आपणांस व्यक्तिस्वातंत्र्य न मिळाल्यामुळें आमच्या मागें असलेलीं राष्ट्रें पुढें जाऊन त्यांनीं आपणांस दास्यत्व आणलें असें आगरकरांचें मत निरीक्षणात्मक चिकित्सेनें बनलें असल्याकारणानें, आपणांप्रमाणें सर्व लोक अश्वारूढ होत नाहींत यामुळें आपलीं प्रगति खुंटत आहे असें आगरकरांना वाटत होतें. तेव्हां आपण स्वतः स्वार होऊन, लोकांचें नेतृत्व करावें आणि आपल्या सैनिकांत सर्व समाजाचा अंतर्भाव करावा, अशी आकांक्षा उत्पन्न झाली होती. आपल्या राष्ट्रांत तत्त्वनिष्ठेचा आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा आविर्भाव आजपर्यंत झाला नसल्यामुळें, एकंदर समाजांत एक प्रकारची नीच सहलशीलता आणि भ्याड नम्रता दृष्टीस पडल्याचें आगरकरांनीं अनेकवार सांगितलें आहे. पोटासाठीं धंद्याची निवड, आयुष्यांतील जोडीदाराची निवड, धर्ममतांची निवड या सर्व गोष्टींत समाजांतील प्रत्येक व्यक्तीस दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय लागल्यामुळें खऱ्या स्वातंत्र्याची गोडी कोणासच लागलेली नाहीं. पारतंत्र्य आमच्या हाडींमासीं खिळून गेलें आहे, आणि कोणतेंही महत्कृत्य तडीस नेण्याची आपणांस ताकद उरली नाहीं. तेव्हां असल्या मनोवध करणाऱ्या पारतंत्र्याचें निरसन झालें नाहीं तोंपर्यंत पुन्हां स्वातंत्र्य मिळणार नाहीं अशी आगरकरांची समजूत होती.

रानडे-चिपळूणकर-टिळकांप्रमाणेंच आगरकरांच्या मतावर युरोपियन इतिहासाच्या अध्ययनाचा विशेष परिणाम झाला होता. त्यांना युरोपियन इतिहासांतील अठराव्या

---

एका धाडसी बाजीची आणि आमची गांठ पडली आणि आम्हीं साऱ्या हिंदुस्थानचें सार्वभौमत्व काबीज केलें."

७ "देशाच्या कालमानाचा विचार न करतां अंगीं असेल तेवढें सामर्थ्य दुसऱ्यावर जुलूम करण्यांत खर्ची घालणारांची दशा झाली नाहीं असें कधीं होत नाहीं. अशा लोकांना मागून मोठा पश्चात्ताप होतो पण त्याचा उपयोग काय? फ्रान्स देशांतील कुलीन घराण्यांतील लोक, धर्माधिकारी आपल्या जुलमाच्या काढण्या योग्य वेळीं ढिल्या करते तर १७८९ त त्या देशांत जी टोलेजंग राज्यक्रांति झाली ती कदाचित् त्यांना टाळतां आली असती असें कित्येक इतिहासकारांचें सांगणें आहे. पण योग्य वेळीं त्यांना तसें करणें प्रशस्त वाटलें नाहीं, म्हणून फ्रान्स देशांतील तो प्रचंड वणवा पेटला आणि त्याच्या भडक्यांत साऱ्यांसच दारूण यातना भोगाव्या लागल्या."

शतकाचा शेवटचा भागच अत्यंत स्पृहणीय वाटत होता. विचारस्वातंत्र्याच्या तत्त्वांचा पुरस्कार आगरकरांनीं जो केला तो फ्रेंच राज्यक्रांतीनंतर राजकारणांत, धर्मकारणांत व समाजकारणांत युरोपनें केलेल्या अनुकरणीय प्रगतीची छाप आगरकरांच्या मनावर होती म्हणूनच केला. अर्थात्, त्यांना राजकीय सुधारणा आणि सामाजिक सुधारणा यांची फूट पाडणें योग्य वाटत नव्हतें. स्वातंत्र्याशिवाय मनुष्यतेचें ऐहिक हित साधणें शक्य नाहीं आणि मनुष्यतेची प्रवृत्तिपर सेवा हाच जगाचा भावी धर्म अशी त्यांची खात्री होती. म्हणून स्वातंत्र्याच्या तत्त्वाला जे जे कोणी विरोध करतात ते खरे ८लोक-नायक नसून, त्यांच्या पाठीमागें लोकांनीं लागू नये असें ते लोकांस सांगत असत. उलट "जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्याला धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे अशानें आपल्या मनाला योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें, हेंच त्याला उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे." असे ते मानीत.

अशा मगदुराचा पुढारी लोकमत तयार नाहीं अशी रड कधींच गात नाहीं. भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें "अधिष्ठानं तथा कर्ता करणंच पृथग्विधं। विविधाश्च

८ "अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनीं अहर्निश परिश्रम करून पदार्थधर्माचें केवढें ज्ञान संपादन केलें आहे, किती साधनें शोधून काढलीं आहेत, राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत, हें ज्यांना ऐकूनसुद्धां ठाऊक नाहीं अशा गृहस्थांनीं आम्ही हिंदु लोक नेहमीं परतंत्रच असलों पाहिजे.... राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्हीं कधींसुद्धां मनांत आणतां कामा नये; अशा प्रकारचें प्रतिपादन केल्यास त्यास लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रु म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. तसेंच जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें घोर पातक आहे अशीच ज्यांची समजूत; आहे ही समाजस्थिति उत्तम, तींत फिरवाफिरव करण्यास कोठेंही अवकाश नाहीं, अशा ज्यांच्या समताविषयक कल्पना— असे लोकाग्रणी काय कामाचे? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा? लोकाग्रणींनीं हें काम पतकरलें नाहीं तर तें कोणी पतकरावयाचें? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल, तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं! इतकेंच नाहीं, तर चालू स्थितीसुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतां-तील दोषस्थळें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांना अप्रिय परंतु पथ्यकारक विचार त्यांच्यापुढें आणण्याचें अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे! असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तीं-च्या सुद्धां अंगीं नसेल, त्या समाजानें वर डोकें काढण्याची आशा कधींही धरूं नये."

पृथक्चेष्टाः " ही मानवी आटोक्यांतील कार्यसिद्धीची सोपान–परंपरा उभारल्याशिवाय ध्येयनिष्ठ पुढाऱ्याला चैनच पडत नाहीं. अर्थात् न्यायमूर्ति रानड्यांच्या सारख्या द्रष्ट्यानें राष्ट्राच्या समुन्नतिसाठीं राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक, शैक्षणिक वगैरे सर्व क्षेत्रांत एके काळींच एका कळकळीनेंच चळवळी झाल्या पाहिजेत असें जें प्रतिपादिलें ते त्या त्या क्षेत्रांच्या सीमा परस्पर समाकर्षक असल्याकारणानेंच होय. आणि समाजाचा नेता होण्यास ज्या तऱ्हेचा माणूस हवा असा आगरकरांचा आग्रह होता ती वरील न्यायमूर्तींच्या तत्वाला धरूनच होती यांत शंका नाहीं.

सर्व क्षेत्रांत सारख्याच नेटानें चळवळ व्हावयास तर हवी, आणि आगरकर म्हणत त्याप्रमाणें व्यक्तीला [९]मनःपूत तर वागूं द्यावयाचें, या दोन्ही गोष्टींचा मेळ बसतो काय? होय, बसतो. कारण, कोणत्याही विषयावरील सर्वसाधारण लोकमत व्यक्तीव्यक्तींच्या स्वतंत्र विचारांचा दृढभाजक असतो. हा दृढभाजक हातीं लागावयास समाजांतील विचारांच्या वाऱ्यांशीं समरूप झालें पाहिजे; आणि एरवीं अवखळ दिसणारे आंकडे घटकाभर तरी भाज्यभाजक होऊं शकतात कीं नाहीं, हें पडताळून पाहिलें पाहिजे. समर्थांच्या भाषेंत बोलावयाचें तर " लहान थोरें परीक्षून सोडून " व्यक्तीव्यक्तीच्या समान विचारांचे जास्तींत जास्त स्पष्टीकरण करणें, आणि वैयक्तिक व सामुदायिक लोकमताला राष्ट्रीय धारण-पोषण-प्रगतीकरणाचें वळण लावणें हें समाजाच्या नेतेपणाची जबाबदारी ज्यांच्यावर कालौघाप्रमाणें बौद्धिक तेजस्वितेमुळें अगर अंगच्या " कांहीं एक उत्कट गुणामुळें " पडली अथवा ज्यांनीं आपण होऊन पत्करली, त्यांचें [१०]कर्तव्य होय, असें आगरकरांचें ठाम मत दिसतें.

---

९ " कित्येकदां असें होतें कीं ज्याचें त्याला आपलें हित बरोबर कळत नाहीं. या रीतीनें एकीकडून अज्ञान व दुसरीकडून उपदेश वा तिरस्कार यांचा घरा पडून शेवटीं तो आपल्या खऱ्या कल्याणास मुकतो! असें जरी आहे तरी ज्याचें त्याला स्वातंत्र्य भोगूं देणें इष्ट आहे. कारण एकानें दुसऱ्याचें हित कशांत आहे, हें शोधून काढण्यांत जितक्या चुका होण्याचा संभव आहे त्यापेक्षां लक्षपटीनें कमी चुका ज्याचें त्यानें आपलें हित कशांत आहे हें शोधून काढण्यांत होणार आहेत. म्हणून राष्ट्राच्या राज्यरीतींत या गोष्टी–कडे होईल तितकें लक्ष देणें जरूर आहे...... स्त्रीपुरुष, स्वामीसेवक, गुरुशिष्य, राजाप्रजा, यांच्यामधील संबंध होतील तितके अन्योन्यांच्या इच्छेवर आणून ठेवणें या सगळ्यांच्या मुळाशीं वर निर्दिष्ट केलेलें तत्त्व आहे. होईल तितकें करून ज्याचें त्याला आपलें काम आपल्या मनाप्रमाणें करून द्यावयाचें. "

१० " एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीशीं व एका पोटसमुदायानें दुसऱ्या पोटसमुदायाशीं सलोख्यानें वागून श्रमसंयोग उत्पन्न होऊं द्यावा व तो होण्या–साठीं कोणाचा तरी सक्त अंमल चालावा, ही गोष्ट निर्विवाद आहे, व अशा प्रकारच्या सक्त अंमलापासून होणारा फायदा आम्हांस पूर्णपणें मान्य

स्वार्थनिरपेक्ष नैतिक आचरणाच्या आदर्शानें लोकांना विचारप्रवृत्त करून विवेकशुद्ध चळवळ सर्वच क्षेत्रांतून व्हावयास हवी असें न्यायमूर्तिप्रमाणें आगरकरांचेंही मत होतें आणि म्हणूनच त्यांनीं सर्व विषयांत स्वातंत्र्य, समता, नीति व न्याय यांचा पुरस्कार अव्याहतपणें करून " अंतरींचा ज्ञानादिवा मालवूं नको रे " असा कळवळ्यानें आदेश दिला. प्रत्येक क्षेत्रांत कांहीं कार्य उभें करावयास " लघुतम विरोधाच्या " तत्वांनेंच घ्यावें लागतें हें खरें; पण विवेकाधिष्ठित विकास व्हावयाचा तर ध्येयाची परिपूर्ण जाणीव प्रखरतेनें पहिल्यापासूनच असणें आवश्यक आहे. पुढारी झाला तरी तो मनुष्यच आहे, त्याच्या शक्ति मर्यादित आहेत आणि इतरापेक्षां तुलनेनें एखाद्या दुसऱ्या क्षेत्राची त्याला विशेष आवड आहे, अशीच वस्तुस्थिती बहुधा आढळावयाची. तेव्हां इतर सर्व क्षेत्रांत मुग्ध राहून किंवा फार तर " लघुतम विरोधाचा " मार्ग पत्करून आपल्या आवडत्या क्षेत्रांत कार्याचा कमालीनें उठाव केला तर बिघडलें कोठें? फक्त आपल्या आवडीच्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतून आपल्या इतक्याच कळकळीनें काम करणाऱ्या देशभक्तांच्या कार्यावर अगर त्यांच्या मार्गांत कोणत्याही कारणानें आपण अन्याय्य धोंड होऊं नये एवढी काळजी जनतेच्या जागृत विवेक-शक्तीवर राष्ट्राची सर्वांगीण प्रगति व्हावयास पाहिजे असें म्हणणाऱ्या प्रत्येक सुबुद्धानें घेतलीच पाहिजे. कारण विशिष्ठ राजकीय प्रगति झाल्याशिवाय, विशिष्ठ सामाजिक वा विशिष्ठ धार्मिक अगर औद्योगिक प्रगति होऊं शकत नाहीं. इतकीं हीं सर्व क्षेत्रें परस्परावलंबी आहेत. आणि म्हणूनच जनतेची मूळ मनोवृत्तीच स्वातंत्र्य, समता, न्याय,

---

आहे. पण यावरून असें समजतां कामा नये कीं सक्ति जेवढी अधिक करावी तेवढी समाजसुधारणेस अधिक मदत होते........... मनुष्याच्या अंगीं खरी योग्यता असेल व लोकांच्या कल्याणाबद्दल त्याला खरी कळ-कळ वाटत असेल, तर लोकांच्या रागाची पहिली लाट निघून गेल्यावर ते त्याच्या बोलण्याचा शांतपणें विचार करूं लागतात......... चार दोन गोष्टींत लोकांस न रुचणारे असे तुमचे विचार असले, आणि तुम्ही उघड बोललात तर कांहीं दिवस ते तुम्हांला त्रास देतील, तुमचा तिरस्कार करतील व तुमचें बोलणें ऐकून घेणार नाहींत. हें जरी खरें आहे तरी सत्य तुमच्या पक्षांत असेल, निदान कोणत्याही क्षुल्लक स्वार्थासाठीं हातीं घेतलेल्या पक्षाच्या वतीनें तुम्ही भांडत नसाल, लोकांच्या कल्याणाची खरी कळकळ तुमच्या अंतःकरणांत वसत असेल व तें कल्याण घडवून आणण्यासाठीं निरपेक्ष बुद्धीनें तुह्मी आपल्या जिवापाड मेहनत करीत असाल तर तुमच्या हातून तें कल्याण होवो अगर न होवो, तुमचे चांगले हेतु आणि तुमचे निर्लोभी कष्ट यामुळें लोकांच्या मनांत तुमच्या विषयीं उत्पन्न झालेला पीळ हळूहळू नाहींसा होत जाऊन अखेरीस त्यांना तुमच्या गुणांचें माहात्म्य समजूं लागेल व तुम्हांपासून होणाऱ्या फायद्याबद्दल त्यांच्या मनांत तुमच्याविषयीं कृतज्ञता व पूज्यबुद्धी उत्पन्न होईल."

नीति यांनीं मुसमुसून निघाली पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता. तसें करावयाचें तर ज्या क्षेत्रांत यत्किंचित् चलबिचल झाल्यास धरणीकंपाचा धक्का बसल्याचा भास जनतेला होतो, तेथेंच ऐन गुहेंत जाऊन सिंहाची आयाळ हलविली तर अत्यंत आवश्यक असें कणखर कार्य होईल या जाणीवेनेंच आगरकरांनीं सामाजिक चळवळीला प्रामुख्यानें हात घातला.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अशा सर्वच अन्यायाविरुद्ध अविरत झगडणारी, लोकांची व सरकारची सारखीच कदर न करणारी, रूढी व कायदा ह्या दोहोंच्याही अन्याय्य बंधनाविरुद्ध अंतःकरणपूर्वक सारखीच जळणारी, राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याबद्दल सारखीच तळमळणारी, लोकापवाद, सरकारी अवकृपा आणि जन्माची कंगाली यांना स्वमतांच्या आग्रहासाठीं आनंदानें कवटाळणारी अशी आगरकरांच्यासारखी विभूती विरळाच असल्याकारणानें, त्यांनीं प्रवर्तिलेल्या सर्वगामी विवेकयुगाला जागतिक महत्व आहे. येथें आर्जवी उन्नतिवाद, स्वाभिमानी राष्ट्रवाद, परंपराधिष्ठित उत्कर्षवाद, सुखलोलुप साम्यवाद, चट सारे शरणचिठ्ठी देतात आणि विश्वरूपापुढील अर्जुनाप्रमाणें आश्चर्यमूढ होतात; कारण, आर्थिक, सामाजिक वा राजकीय विषमतेप्रमाणेंच बौद्धिक विषमताहि आगरकरी विवेकयुगाला सर्वस्वी अमान्य आहे.

# आज आगरकर असते तर ?

एको ऽहमसाह्यो ऽहं कृशो ऽहमपरिच्छदः ।
स्वप्ने ऽप्येवंविधा चिन्ता मृगेन्द्रस्य न
जायते ॥

संख्याबळ हा भीरूंचा उल्हास आहे. आत्मतेजाचे वीर एकाकी संग्रामांत सुद्धां रमून जातात. आत्मतेजाचें तें वीरत्वच तुम्हा सर्वांना जोपासावयाचें आहे. एकटे असा वा बहु-संख्य असा हें वीरत्वच एक अस्सल वीरत्व आहे. बाकी सारें कमअस्सल आहे. आणि आत्मतेजाचें वीरत्व यज्ञाशिवाय, निश्चयावाचून, श्रद्धेविना आणि विनम्रता सोडून साध्य होणें शक्य नाहीं.

—म. गांधी

आज आगरकर असते तर? या प्रश्नाचा अक्षरशः अर्थ घेतला तर मोठी आपत्ती ओढवेल ! यांत कितीतरी गोष्टी गृहीत धरतों आहों आपण. सन १८५६ त जन्मलेले आगरकर आज हयात असते तर ते नव्वदीच्या घरांत असते. इंग्रजी राजवटींतील हिंदी हयातीची सरासरी पाहिली तर त्यांचा एव्हांना चवथा जन्म होता. आनुवंशिक दम्यानें चाळीशींतच अगोदर त्यांच्या जन्माची पुरेवाट झाली होती, तेव्हां नव्वदपर्यंत जगण्याचें त्यांना कितपत जमलें असतें कोणास ठाऊक ! एवढें बरीक खरें कीं , जगते तर फार फार म्हणजे ते शरीरानें जीर्ण झाले असते; मनानें म्हातारे होणें आगरकरांना स्वप्नांतही माहित नाहीं.

नुसत्या मनानेंच ते तरुण राहते, तरी "नवमता" ला ते बिलकुल बिचकले नसते. भगवद्गीतेंत दैवीसंपत्तीचें जें वर्णन आहे, तें आगरकरांच्या मनोवृत्तीस सर्वथैव लागू पडतेंच; पण त्यांतला पहिला गुण जो "अभय" तो तर आगरकरी मनोवृत्तीचा जीव कीं प्राण. "अभ्यासाच्या खोलीचें दार लावून घेऊन डोक्यांतील वाटेल त्या विचारास बाहेर जाऊं देण्यास व वाटेल त्या विचारास आंत येऊं देण्यास जो भितो, तो मनुष्य कस्पटापेक्षांही नादान होय." असें स्वतः आगरकरांनींच म्हणून ठेवलें आहे. हें जर खरें तर १८९५ सालींच दम्यानें बेजार केल्यावर, "मी आतां मरावयास तयार आहें; मला सांगावयाचें होतें तें मी लोकांना सांगितलें आहे." असें आगरकर म्हणाले होते, त्याची संगति कशी लावावयाची? तेव्हां १८९५ तच आगरकरांचा जीवनहेतु ( mission ) संपला होता असें म्हणावयास काय हरकत आहे ? शब्दपांडित्यानेंच बोलावयाचें तर, एकपरी आगरकरांना करावयाचें होतें तें संपलें होतें असें म्हटलें पाहिजे. कारण १८९५ पर्यंत विवेकजागृतीचा मुख्यत्वेंकरून काळ होता. त्याच्यापुढचा काळ विचाराच्या घडणीबरोबरच आचाराच्या चढणीचाही आहे. आगरकरांच्या मागील या पन्नास वर्षांत आगरकरांच्या अपेक्षा समाजाच्या तळापर्यंत मनोमन ( आणि पुष्कळ त्या आगरकरांचें नांवही माहित नसतां ) पोंचल्या असल्या तरी सर्रास त्या आचरणांत उतरल्या नाहींत. शिवाय सुधारणेचीं जीं तत्त्वें आगरकरांनीं प्रतिपादन केलीं तीं अबाधित आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांचें सूत्र जें "बुद्धिवाद" त्याचाच कस कोणत्याही नव्या-जुन्या मताला लावावयाचा असल्याकारणानें, "नवमताचा" कस बुद्धिवादावर लावून त्याचा ग्राह्य भाग स्वीकारावयास आगरकरांनीं कधींच कमी केलें नसतें. कारण "हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत आणि संस्कृत ग्रंथांच्या बाहेर विद्या आहे" ही जाणीव त्यांनीं जुन्या शास्त्रीमंडळीस दिली होती आणि ते ती कधींच विसरले नसते.

इतकें तर्कट तरी कशाला ? नवमतवाद म्हणून आज जें प्रतिपादन महाराष्ट्रांत होत आहे, त्याचा श्रीगणेशायनमः मूळ आगरकरांनींच लिहिला आहे, असेंही दाखवितां येईल. पहा. "दैव आहे कीं नाहीं, हा प्रश्न आपला आपणांस विचारण्याची कितीजणांची छाती होणार आहे? तसेंच वेद पौरुष आहेत कीं अपौरुष आहेत? जातिभेद अस्तित्वांत कशामुळें आले व ते चट सारे मोडून टाकले असतां काय

परिणाम होतील ? मुंज, लग्न वगैरे संस्कार केव्हां, कोणी व कशासाठीं स्थापिले आणि ते मुळींच नाहींसे केले तर काय होईल ? पुरुषांप्रमाणें स्त्रियांनीं अविवाहित राहण्यास किंवा वाटेल तेव्हां हवें त्याच्याशीं लग्न लावण्यास काय हरकत आहे ? पुरुषांप्रमाणें स्त्रियांस सारे राजकीय हक्क कां देऊं नयेत ? एका बायकोनें पांच-चार नवरे करण्यास अथवा दहा-पांच लोकांनीं पांच-चार बायका ठेवण्यास किंवा करण्यास प्रत्यवाय कां असावा ? जेवढीं रोगी व कुरुप मुलें अस्तित्वांत येतील, तेवढीं मारून टाकण्याबद्दल कायदा कां नसावा ? ज्या रोग्यांचे रोग वैद्यांच्या मतानें असाध्य ठरतील व ज्या रोग्यांचें जीवित रोगांच्या असह्य यातनांमुळें अत्यंत कष्टमय झालें आहे, अशांस वीष किंवा गोळी घालून यातनामुक्त कां करूं नये ? रक्तपितीच्या रोग्यासारखे रोगी मोठ्या नदींत किंवा समुद्रांत बुडवून त्या रोगांचा बीमोड करण्यास काय हरकत आहे ? पाहिजे त्याला पाहिजे त्या स्त्रीशीं समागम करण्याची सदर परवानगी दिल्यास काय परिणाम घडतील ? व्यक्तीचा अथवा कुटुंबाचा संपत्तीवरील हक्क नाहींसा करून देशांतील खऱ्या संपत्तीचे सारे लोक समाईक मालक कां न मानावे ? आळीपाळीनें साऱ्यांस सारीं कामें करावयास लावून उच्च-नीचत्वाचा भाव मोडून टाकण्याचा प्रयत्न कां करूं नये ? लोकसत्ताक राज्यपद्धतीशिवाय इतर प्रकारच्या राज्यपद्धती नाहींशा करण्यास काय हरकत आहे ? वगैरे प्रश्नांचा आपआपल्या मनाशीं शांतपणानें विचार करण्याची गोष्ट तर राहोच; पण असले प्रश्न कानांवर पडल्याबरोबर ज्यांचें धाबें गडगडणार नाहीं, असे किती लोक सांपडणार आहेत ? ”

वैयक्तिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक सर्व क्षेत्रांत अशा तऱ्हेचा बुद्धिवाद शिरकावणें हा आगरकरी सुधारणेचा ॐकार आहे हें वरील प्रश्नावलीवरून स्पष्ट होईल. नवमतवाद वरील प्रश्नावलीच्या भोंवतालींच घुटमळत नाहीं काय ? फार काय सांगावें, “ बौद्धिक विषमता ” जेथें आगरकरांना खपणारी नव्हती, तेथें बाकीच्या गोष्टीबद्दल बोलावयाचें कारणच नाहीं. आगरकर लिहितातः—

“ विचार करणें, सुखदुःखाचा अनुभव घेणें, क्रिया करणें या तीन गोष्टीपैकीं पहिलींत, दुसरींत किंवा तिसरींत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला दिसतो. तथापि निरपेक्ष बुद्धीनें आस्थापूर्वक परिश्रम केले असतां, ही असमता थोड्या वर्षांत बरीच दूर करतां येईल. ज्या देशांत ही असमता वाढत जाऊं लागली असेल, त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला आहे असें समजावें. जेव्हां या असमतेची परमावधी होते, तेव्हां घनघोर राज्यक्रांति होऊन समाजाचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात.... विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे, व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येऊं लागेल. ”

व्यक्तिस्वातंत्र्याचा संपूर्णाविष्कार आगरकरांना हवा होता तो असा होता; समता, स्वातंत्र्य, न्याय व नीति हे आगरकरी सुधारणेचे प्राणापान आहेत. अर्थात् नवमतवाद्यांच्या विचारांतील समाजसुधारणेच्या निर्भय लालसेबद्दल आगकरांनीं पाठच थोपटली असती यांत शंकाच नाहीं. छाव्याचा चेंदामेंदा करून तो सिंहिणीच्या अंगावर फेकावा म्हणजे घोरत असलेली सिंहीण चवताळून उडी घालते, असा शिकाऱ्याचा अनुभव आहे, तोच अनुभव आगरकरांना हवा होता. " बांधवहो, विचारकलहाला कां भितां ? " या त्यांच्या खड्या सवालांतील रहस्य वरीलप्रमाणेंच आहे. अर्थात् आगरकरांच्या मृत्युनंतर पन्नास वर्षांत जो जो आज नवमतवाद म्हणून विचारजागृतीचा दुंदुभि ऐकूं येतो, तो आगरकर हयात असते तर, यापूर्वीच ऐकूं येता ! ! कारण ते कुशल लेखक आणि यशस्वी सम्पादक होते; आणि म्हणून वंगभंग, त्यापूर्वीचा पुण्यांतील प्लेगाचा कहर व छळ, आणि रँडसाहेबांचा खून, वंगभंगानंतरचा नाशिकचा कटाचा खटला, लोकमान्य व शिवरामपंत परांजपे यांजवरील खटले, प्रेस ॲक्ट, पंचम जॉर्ज बादशहांचें राज्यारोहण, दिल्लीला राजधानी, कैसरीकंदनाची सुरुवात, स्वयंनिर्णयाचें तत्त्व, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वा सत्यसमाजी चळवळ, मॉंटफोर्ड सुधारणा, खिलाफतीचा प्रश्न, राष्ट्रसंघांतील हिंदुस्थानचें स्थान, हुंडणावळींतील रुपयाचे पौंडाशीं नातें, नेहरू रिपोर्ट, कॉंग्रेसनें केलेला स्वातंत्र्याचा ठराव, हसन निजामीनें केलेला शिवाजीवरील हल्ला, खान–मालिनी विवाह, शकुंतलाताई परांजप्यानीं केलेला अंतर्राष्ट्रीय विवाह व घेतलेला घटस्फोट आणि या सर्वांपेक्षांहीं १९३० व १९३२ चीं राजकीय आंदोलनें आणि त्यामुळें झालेला सामाजिक संघटन–सहवास–विकास, कॉंग्रेसचा विधिमंडळ–प्रवेश नि अधिकार–स्वीकार, हिटलरी होरपळीची झडप नि कॉंग्रेसचा अधिकारत्याग, वैयक्तिक युद्धविरोधी सत्याग्रह, पाकिस्तानचें पिशाच नि अखंड हिंदुस्थान, क्रिप्स योजना व फॅसिस्ट विरोधी कॉंग्रेसची "चलेजाव" चळवळ आणि आंबेडकरांचें गीतादहन हे विषयच असे आहेत व होते कीं, त्यांचा फायदा घेऊन आगरकरांनीं आपल्या लेखणीच्या जोरावर महाराष्ट्र व पर्यायानें बाकीचें राष्ट्र आज आहे त्यापेक्षां कमींत कमी पन्नास वर्षे तरी पुढें नेलें असतें.

पण हाही केवळ आगरकरांच्या कामगिरीचा बैठा भाग झाला असता. अनुवंशिक दम्यामुळें ते जातीनें " कमी चलनशील " होते खरे; पण रोगाची जाचणी छातींत नसती तर, आगरकर नुसते विचारजागृति करीतच बसते, असें वाटत नाहीं. " देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करून आम्ही तुमचीं माथीं भंडावून सोडूं " असा त्यांनीं सरकारास एकदां इषारा दिला आहे. आणि तोच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक वा औद्योगिक प्रतिपक्षास समजावयास हरकत नाहीं. तेव्हां वंगभंगाचे वेळीं, असहकारितेच्या काळीं, गेल्या पांच वर्षांतील दोनही आंदोलनांमध्यें अगर महात्मा गांधींच्या व त्यापूर्वीच्या विठ्ठल रामजी शिंद्यांच्या अस्पृश्यता निवारणाच्या मोहिमेंत, आणि अखिल भारतीय महिलाविद्यालयाच्या चळवळींत अथवा भारतसेवक समाजाच्या स्थापनेंत आगरकरांनीं शक्य तेवढा कमालीचा भाग

घ्यावयास कमी केलें नसतें. कारण आगरकरांना राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस जसें स्वातंत्र्य हवें होतें तसें राष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्यही हवें होतें.

तथापि यांस कोणी "परभृत" म्हणतील. म्हणेनात! कालाच्या ओघांत मनुष्य पोहत असतो. तेव्हां कालावर मात करून आपल्या राष्ट्रीय ध्येयाच्या दृष्टीनें कल्पना अगर चळवळी दुसऱ्याकडून सुरू झाल्या, म्हणून त्यांचा पुरेपुर फायदा घ्यावयास कर्तबगार कधींच सोडत नाहींत. त्या दृष्टीनें आगरकरांनीं कोणत्या चळवळींत भाग घेऊन राष्ट्राचें पाऊल प्रगतिपथावर खंबीरपणें पुढें पडण्यास भरीव मदत केली असती, त्याचा अंदाज वर केला. पण याउप्परही त्यांच्या त्यांनीं कांहीं चळवळी केल्या असत्या कीं नाहीं? होय, केल्याच असत्या. कारण त्यांची सुधारणेची व्याख्या संकुचित नव्हती. स्वयंपाक घरांतील धुरापासून, मोरींतील सांडपाण्यापासून कोणत्या चेहऱ्याला कसली हजामत शोभते, असल्या एरवी क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टीपासून तों मिश्रविवाह, प्रीतिविवाह, संततिनियमन, औद्योगिक उन्नति, राजकीय स्वातंत्र्य असे सारेच विषय त्यांच्या सुधारणेच्या व्याख्येंत बसत. पहा:–"सर्व मानवी प्राणी सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणें हें केवळ त्यांच्या बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे. या श्रेष्ठ तत्त्वाची या जगांत प्रस्थापना करण्याच्या कामीं सर्वकालीन व सर्व देशीय सुधारकांनीं आजपर्यंत अनेक दिशांनीं प्रयत्न केले आहेत, व त्या प्रयत्नांस उत्तरोत्तर सिद्धिही मिळत आहे." तात्पर्य "मानवतेचें ऐहिक सुखसंवर्धन" हा नव्या युगाचा धर्म कसोशीनें पाळण्याकरितां, "समाजाचें कुशल राहून त्याची दिवसेंदिवस अधिकाधिक उन्नति होण्याकरतां जेवढीं बंधनें अपरिहार्य तेवढीं कायम ठेवून प्रत्येक बाबतींत व्यक्तिमात्रास ( पुरुषास व स्त्रीस ) संपूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे" हें आगरकरी सुधारणेचें आद्य तत्त्व आहे. कारण "सुधारणा ही स्थिर वस्तु नाहीं." तेव्हां व्यक्तिव्यक्तींच्या वैशिष्ट्यांचें संपूर्णाविष्करण होतां होतांच राष्ट्र आपल्या वैशिष्ट्यानें जगूं शकेल आणि म्हणूनच आगरकर म्हणत कीं, "जीवनार्थ कलहांत भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागावा हें इष्ट असेल, तर ज्या उपायांनीं राज्यसत्ता प्राप्त झाली असतां तिचें संरक्षण व सदुपयोग करतां येईल असें शिक्षण त्यांस अगोदर दिलें पाहिजे, हें ध्यानांत आणून त्या कामास अगोदर लागलें पाहिजे."

अशी शिकवण आगरकरांनीं सुधारकाच्या द्वारा साक्षर जनतेला दिलीच असती; पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियमित नौकरींतून मुक्त झाल्यावर प्रथम त्यांनीं प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, सहकारी पतपेढ्या आणि स्वदेशी, व विशेषता सामाजिक विषमतेविरुद्ध मोहीम हातीं घेतली असती. नामदार गोखल्यांचें बिल, ना. परांजप्यांचा कायदा, प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारार्थ ना. खेरांचा प्रौढसाक्षरताप्रसार झाला तरी त्याच्या किंवा सहकारी पतपेढ्या यांच्या प्रत्यक्ष कार्यांत अगरकरांनीं कितीसा वेळ खर्च केला असतां, हें निश्चितपणानें सांगतां येत नाहीं. कारण हे

उद्योग झाले काय, किंवा शेअर काढून एकादा कारखाना उभारणें काय, आगरकारांना हवें होतेंच. त्यासाठीं त्यांनीं जरूर ती झीज सोसलीच असती. पण दिवसाकांठीं चोवीस तास या विषयांना वाहून घ्यावयास त्यांना सवडच नव्हती. एक तर लोकशिक्षणाकरतां त्यांनीं आजन्म दारिद्र्य पत्करल्यामुळें, वरील कार्यास लागणारा वा पुढाकार घेण्याइका त्यांच्याजवळ पैसा नव्हता. शिवाय, " मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः " हें त्यांना पक्कें ठाऊक असल्यामुळें खऱ्या लोकशिक्षणानें हें मत तयार करण्याकडेच त्यांनीं आपल्या समाजसेवेचा ओघ वेगानें धांवत ठेवला असता. ते म्हणतात—

"विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोंपर्यंत विश्वासानें किंवा श्रद्धेनें प्रत्येक गोष्टींत आपला अम्मल चालविला यांत कांहीं वावगें झालें नाहीं. जसा लोकांस तसा मनास कोणीतरी शास्ता पाहिजे व ज्याप्रमाणें मुळींच राजा नसण्यापेक्षां कसला तरी राजा असणें बरें, त्याप्रमाणें वर्तनाचें नियमन करणारें कोणतेंच तत्व नसण्यापेक्षां विश्वासासारखें एखादें स्खलनशील तत्व असणें देखील इष्ट आहे. पण हें कोठपर्यंत? अधिक चांगलें तत्त्व अस्तित्वांत आलें नाहीं तोपर्यंत! तें आलें कीं जुन्या प्रमादी तत्त्वानें आपलीं राजचिन्हें श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत. हें सरळ अधिकारान्तर येथून पुढें विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे, व तसें होण्यांतच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखें ऐहिक व परमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊं लागणार आहे."

आणि म्हणूनच प्रत्येक गोष्टीला विवेकाची आंच देऊन " विवेकयुगाचे प्रवर्तक " असलेल्या आगरकरांनीं आपल्या स्वधर्माप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं सामाजिक विषमतेवर लेखणीप्रमाणेंच वाणीनेंही टीका चालविली असती. अन्यायितांचा कैवार घेऊन अन्यायकावर तुटून पडणें हें तर आगरकराचें ब्रीदवाक्यच होतें. अर्थात् गेल्या पन्नास वर्षांत ते सामाजिक विषमतेच्या मागें हात धुवून लागले असते, तर अस्पृश्यता-निवारणाचा प्रश्न महाराष्ट्रांतून पार धुवून निघाला असता; सकेशा विधवांना पुण्यासारख्या शहरांत शंकराचार्यांच्या दर्शनाला मज्जाव होण्याऐवजीं शंकराचार्यांनीं विधवांनीं सकेशा, विकेशा, अर्धकेशा रहावें कीं न रहावें याची वाटाघाट अजिबात बंद करून आगरकरांप्रमाणेंच, आपल्या आचार्यपीठाच्या प्रतिष्ठेसाठींच असेंही सांगितलें असतें कीं, " स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी, आणि पाहिजे तेव्हां लग्न करून संसार करावा. "

स्त्रियांच्या बाबत होणारा "सांततिक जुलूम" ही आगरकरांच्या कामगिरीनें नाहींसाच झाला असता. " विवाहाच्या कामीं स्त्रीपुरुषांची संमति जितकी अवश्य आहे तितकीच संमति विवाहाच्या अमलांतही दृष्टीस पडूं लागली पाहिजे " असा रोख आगरकरांनीं समाजाच्या तळापर्यंत नेऊन पोंचविला असता. आतां हा "विवाहाचा अंमल" परस्पर संमतीनें झाला तरी " अन्नोत्पत्ति व प्रजोत्पत्ति यांचें समीकरण बसलेंच पाहिजे, " म्हणून " उभयतांच्या संयमानें " व अपरिहार्य पक्षीं कृत्रिम साधनांनींही

संततिनियमन करण्याला आगरकरांनीं आजच्या वाढत्या दारिद्र्यांत उत्तेजन दिलें असतें. पण "विवाहाचा अंमल" या त्यांच्या शब्दावरून लैंगिक स्वातंत्र्य ऊर्फ "संभोग स्वातंत्र्य" त्यांना रुचलें नसतें, असें स्पष्ट दिसतें. आगरकरांची सुधारणा राष्ट्राला सबळ करण्याकरतां होती. "बारीक सारीक गोष्ट देखील जाणून बुजून केली पाहिजे" असा त्यांचा कटाक्ष होता. तेव्हां लैंगिक स्वातंत्र्य हें महायुद्धासारख्या राष्ट्रीय आपत्तीनें प्रजाविनाश झाल्याशिवाय जबाबदारीचा अंशही स्वतांजवळ असल्याचें दाखवूं शकणार नाहीं. कौरवकुलाच्या नाशाचेच वेळीं नियोग महाभारतांत झाला, आणि मनुष्याच्या रानटी अवस्थेंतच संभोगस्वातंत्र्य होतें, या गोष्टी लक्षांत वागवून आणि व्यक्तीव्यक्तीच्या रक्ताचे गुण भिन्न भिन्न असल्याकारणानें संभोगस्वातंत्र्यानें रक्ताचा व त्यापासून होणाऱ्या शुक्राचा कस कमजोर व निर्गुणी होण्याचा संभव दाट असतो. पण हा विषय वैद्यकीय शास्त्राचा असल्याकारणानें जर अनुभविक डॉक्टरांनीं राष्ट्रीय दृढीकरणासाठीं संभोगस्वातंत्र्य अवश्य आहे असें आगरकरांस पटवून दिलें असतें, तर तें पुरस्कारण्यास आगरकरांनीं माघार मात्र कदापि घेतली नसती.

आगरकरांनीं स्त्रियांच्याच प्रश्नांला अधिक महत्त्व दिलें असतें. याला कारण असें आहे कीं, तो अर्ध्या राष्ट्राचा प्रश्न आजच्या पुरताच असला तरी उद्यांच्या उभ्या राष्ट्राची जबाबदारी स्त्रियांवरच असते. आगरकर म्हणतात, "आपल्या प्राणांपेक्षां ज्याला आपण पोर म्हणतों त्यास जपणें हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे." एवढ्यासाठीं घटस्फोटासुद्धां स्त्रियांच्या सर्व हक्कांची जाणीव देऊन राष्ट्राचें हें अर्धांग आगरकरांनीं खरोखरच उत्तमांग बनवून दाखविलें असतें.

याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, त्यांनीं मजूर विरुद्ध मालक या लढ्यांत लक्ष घातलें नसतें. अन्याय दिसला कीं तो नाहींसा करण्याकरतां जीवापाड झटणें एवढेंच त्यांना ठाऊक होतें. म्हणून "अरे जें बाप्पा झालेंच नाहीं, त्याची तूं वार्ता पुससी काई ?" हा विचार करून, आगरकर जर जगलेच नाहींत तर नुसतीं तर्कांचीं भेंडोळीं फेंकत राहण्यांत तरी काय किफायत ? कारण तें आगरकरांच्याच भाषेंत बोलावयाचें तर, "एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेप्रमाणें" व्हावयाचे ! ती जशी आपल्या एकुलत्या एक मुलाचें प्रेमभरानें चुंबन घेत, "आमच्यांतले पुरुष असे होते" असें म्हणत राहते, तसेंच आगरकर असते तर अमकें झालें असतें असें म्हणत बसणें होय.

तर खरा विचार म्हणजे—

(१) विचारासंबंधीं कोणी कोणाची मुरवत ठेवण्याची गरज नाहीं.

(२) लोकांना संतुष्ट करण्याकरतां स्ववंचन करणें हें महापातक आहे.

(३) एकादी गोष्ट आपणाला कितीही चांगली वाटली तथापि दुसऱ्यांनीं तिचा स्वीकार केलाच पाहिजे, अशी सक्ति करण्याचा आपणांस अधिकार नाहीं.

(४) स्वभूमींत, स्वलोकांत, स्वाचारांत व स्वधर्मात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नसून केवळ शृंखलांतर करतात.

(५) सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला, म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेचा आरंभ होतो.

या आगरकरांच्या सर्वांगीण सुधारणेच्या सूत्रांचा अंमल आपल्या वर्तनांत करावयास लागून, आपणच आपल्या काळचे आगरकर होण्याचा आटोकाट प्रयत्न करणें इष्ट आहे. मग सुधारणेचे विषय कोणतेही असोत.

---

## महत्त्वाची सूची


अब्राहिम लिंकन १५९

अरिस्तिवस २२१

अलिसुंदर / अॅलेक्झांडर ८८, ९०, १२०, १३१

अॅंजेलो मायकेल ९१

अॅडिसन ८८

असॅलिअन मार्क्स ९६

अॅशबर्नर ८३, ९९

आक्सनाम ४१

आगरकर गणुअप्पा ३, ९, १०, २९, ३४, ७०, ७१, ३८८, २१३

आगरकर गोपाळराव २ ते १०, १८, १९, २२, ते ५४, ५७ ते ७२, ७५ ते १००, १०२ ते १०४, १०६ ते १२७, १३०, १३२, १३३, १३५, १३६, १३८ ते १४०, १४३, ते १५१, १५५ ते १५९, १६१, ते १७९, १८३ ते २३८

आगरकर गोविंदराव ११, १२, ३४, २१४

आगरकर बच्चाजीपंत १०, २९,

आगरकर यशवंतराव २५

आगरकर यशोदाबाई ३, १८, १९, ३४, ५४, ६४, १७२, २१५, २२०,

आगरकर लक्ष्मणराव २९

आगरकर वामन कृष्णाजी ३१

आगरकर विष्णुपंत २९

आगरकर सरस्वतीबाई ३, ९ ते १२, २९, ३०, १७२, २१३

आपटे प्रिं. वा. शि. ४ ते ६, ९, २६, ३६, ६१, ६७, ६८, ७६, १९६

आपटे हरिभाऊ ९६, २०७

आर्क्टिक् होम इन् दि वेदाज् १९७

आर्किमिडिस ४१

आर्यभूषणकाकू १०

ऑरनॉल्ड ५०

इब्सेन ९१

इमर्सन १२०, १९४

इलॉबिलकाक्स १६८

इस्माईलखान १५२

इंडियन रिव्ह्यू ८३

इंदुप्रकाश ८१, १८४

उमरावती वाचनालय ७०

एलिड बुरीट ९४

एल्फिन्स्टन मा. स्कु. १४०

ओरायन १९७

ओरिएंटल विमा कं. २६

कणाद ४१

करमणूक २७

करंदीकर दा. र. १०, २६

कर्कव्हाइट ९५

कर्झन १३०, २०४

कर्वे धों. के. ६, १०, ८५, १६८, १७६, २१९

कानिटकर गोविंदराव ६, २५, ९५

काफीखान ८५

कांट २४, ६०

कार्लाईल २१३ ते २१७

कॉनन डॉइल ५१

कॉंग्रेस ( राष्ट्रसभा ) ५, ९, १४७

किंग पी. एस्. १६८

किर्लोस्कर अण्णासाहेब ६५

किर्लोस्कर कंपनी ९

किर्लोस्कर रामचंद्र सखाराम ६

किसासाटो ९६

कुईव्हिएर डॉ. ९२

कुलकर्णी कृष्णाजी विष्णु ७५

कृष्णाबाई कऱ्हाड ११
केतकर शीलवती १६७
केतो २२०
केप्लर ४१
केसरी ३ ते ६, ८, १०, ३५, ३६, ४७, ४८, ५० ते ५७. ७१ ते ७३, ७५ ते ७८, ८०, ८१, ८७, ९५, ९९, १७२, १७५, १७६, १८४, १९६, २००, २०१, २१०, २११
केळकर प्रा. ग. ह. १८३
केळकर न. चिं. ६७, १३६
केळकर विनायकराव ३४
कोपरनिकस ४१
कोलंबस ६९
कोल्हटकर अच्युतराव २०७
कोशे ९२
क्रप ९५
क्राफर्ड प्रकरण २४
करुकशांक ४४, ४६
करूक ५८
क्लोरा ॲनिस्टील १६८
खेर नां. बाळ गंगाधर २३५
गर्दे डॉ. २५
गॅरिसन २११
गॅलिलिओ ४१
गांधी महात्मा १८८, २०५, २३१, २३४
गार्गी १६०, १६४
गिब्बन १२, ६०, ९६, ९७, २०९
गिरोडेट १०२
गीतारहस्य १९७
गुप्ते ५
गुरुजी कृष्णाजी आबाजी १३
गोखले नां. गोपाळ कृष्ण ६, २२, २३, २६, २८, ३७, ५१, ८२, ८७, ११९, १३३, १७३, १८६, २०० ते २०५, २३५
गोगटे स. गो. १२४
गोडबोले कृष्णशास्त्री ४९
गोळे प्रा. म. शि. २५, ४८, ५६
ग्लॅडस्टन १२८
घमंडे नारायणबुवा ९
घाटे गंगाधरनाईक १३
चहा ग्रामण्य ६
चंद्रगुप्त १०७
चाटफील्ड ४१
चारुदत्त ९
चिटणीस चिंतामण सखाराम ४३
चिपळूणकर कृष्णशास्त्री १८८
चिपळूणकर सीताराम हरी ९
चिपळूणकर (शास्त्रीबुवा) विष्णुशास्त्री ३, ४, १९, २०, २७, ३४ ते ३६, ४२, ४३, ४५, ४८, ६१, ७३, ७६, ७७, ८१, ८४, ९०, ९१, ९७, ९९, १००, १११, १२८. १३१ ते १३३, १६९, १७५, १७८, १८३, १८८ तें १९४, २२४
चीन ८
छत्रपती राजाराम महाराज ४
छत्रपती ( करवीरकर ) शिवाजीराव महाराज ४, ३५, ७२
छत्रे केरूनाना ३, ३३, ४०, ४१, ५८, ६७, ९०, १०१
जगद्धितेच्छु २७
जगन्नाथपंडित ९०
जानकी ( सीता ) ५७, १६०
जॉनसन डॉ. १८९
जांभेकर बाळशास्त्री २११
जीनजेक्स हेनर ९१
जूल ४१
जोग ना. सी. २७
जोशी अप्पासाहेब ८, ५८
जोशी गणपतराव ९६

जोशी बळवंतराव ४
जोशी रामचंद्र भिकाजी ६
जोशी राघो गंगाधर १८
जोशी वामन मल्हार १२७
जोशी सत्यंकाकू १८
जोशी (सार्वजनिक काका) १२०
जोसेफ स्कॅलिंगर १०२
झेनाफन २१८, २२१
टॅटलर ८८
टाइम्स ८, १५६
टॉर्गाट ९७
टिळक (लोकमान्य) बाळ गंगाधर ३ ते ६, ९, १०, १९, ३४ ते ३८, ४०, ४४, ४८, ५२, ५३ ५९, ते ६१, ६९, ७४, ७५, ७७, ७९, ८०, ८५, ९६, १३५, १७४, १७५, १७७, १८५, १८६, १९३, १९५, ते २००, २३४
टिंडाल ४१
टेनिसन २००
डार्विन ९९
डेक्कन एज्युकेशन सोसायटी ५ ते ७, ३७. ३८, ५२, ६१, ६८, १७५, २३५
डेक्कन कॉलेज ३, ५, ३३, ३४, ४१, ४३, ५८, १८६, १९८
डोंगरींतील दिवस ९६, १९७
तय्यबजी बद्रुद्दीन १५२
तांबे ८
तुकाराम ८९, ९१, १०८, २१९
तेलंग न्या. का. त्र्यं. १०७, १२०
तोडरमल्ली पूर्णय्या १०७
त्राटिकाकर्ते केळकर ५, ७, ३८, ६६, ७६, ९०
थॅकरे ८८
दख्खन समाचार ८५
दयानंद सरस्वती स्वामी १२०
दर्शन २११
दादोबा पांडुरंग ४९
दिग्दर्शन २११
दीक्षित दत्तोपंत ४०
दुक्षिद २२१
देवधर गोपाळ कृष्ण २५, ८५
देवधर गोविंद कृष्ण २५
देवधर सीताराम गणेश ६, ५२, ७६, ८८, ९९, १७०
देशपांडे बुवा ६५
देशमुख वि. स. २७
द्रौपदी (पांचाली) ५७, १६०
धुलीपसिंग ९१
नटराजन् के. ८५
नागपूरकर अमृत श्रीपत ८, ९, १२, ३०, ३१, ५७, ५९, ७१, ९१, २२०
नाफड कोंडिबा २५
नामजोशी ३, ७५, ७६
नायडू सौ. सरोजिनी १६०
नीत्से १०५
नूलकर कृ. ल. ९, १२०
नेपोलियन १२८
नेल्सन १२८
नेविन्सन् १३५
नौरोजी दादाभाई १३५, २२४
न्यू इंग्लिश स्कूल ३ ते ५, ७, १०, ३५, ३६, ३८, ४३, ५२, ६८ ते ७०, ७२, ७५, ८१, १७२, २०१, २०३
न्यूटन ४१
पटवर्धन वा. ब. ८८, ९०, १७८, २१३
परमानंद नारायण महादेव १२०
पराशर ११६

परांजपे ( फॉरेस्ट ऑफीसर ) ६
परांजप्ये डॉ. र. पु. १०, २३५
परांजपे शिवरामपंत २३४
पंडित विष्णुशास्त्री १२०, १२१
पंडित शंकर पांडुरंग १२०
पाटणकर ५२, ६६
पाणिनी ४१
पातंजलयोग १५ ते १७
पामर्स्टन व्हायकौंट १४०
पावगी रा. सा. ९६
पास्कल १७७
पांगारकर ल. रा. ३८, ६१, ६३, ६९
२२१
पील ४१
पुणेंवैभवकार २४, ८५,
पोतदार द. वा. ९४
प्रातिथेयी १६४
प्लेटो ४१, २१८
फडके मोरभट ३४
फडके रामभट ३४
फर्गसन् सर जेम्स ४, ५
फर्ग्युसन कॉलेज ५ ते ७, ९, १३,
३७, ३८, ५२, ६८, २०३
फाटक नारायण गोपाळ ४७
फुले म० ज्यो. गो. १२०
फेलिक्स फ्लॅटर १०२
फ्रान्स ॲनाटूल १७१
बर्ट्रांड रसेल ९५
बर्वे रा. ब. माधवराव ४, ३५, ३६,
४५, ९५
बर्वे ( कोल्हापूर ) प्रकरण ३, ४३,
४५, ४७, ५२, ७२, ९६, २००
बाणकवी १९१
बेकन ९०, १०२, १८८
बेन ४९, ६६, ६७
ब्रह्मजया १६६
ब्रॅडलॉ चार्लस२०९
भडभडे ३२
भणगे कृष्णाजी नारायण ६४
भवभूति ५४, १०७, १७६, १९९
भाऊ महाजनी २११
भागवत अनंतराव ६१
भागवत दत्तोपंत १२, १३, ६०, ६१
भागवत भाऊसाहेब ३, १२, १३, ३०
३२, ५४, १७२
भागवत यज्ञेश्वर १३
भागवत विष्णुपंत ११
भागवत सदाशिवराव ३१, ३२
भाटवडेकर ८, २३
भाटे गो. चि. ६७, १७७, २१९, २२१
भानु प्रा. ७६
भास्कराचार्य ४१
भांडारकर डॉ. ४१, ९४, १०७, १२०
भिडे नाना ४
मनु ११६, १५९
मन्रो सर टॉमस ३३
मराठा ३ ते ५, ८, ३५, ३६, ५१,
५२, ७५, ८१, ९७, ९९,
१०२, १९५, १९६
मराठे वामनशास्त्री ४२
मलबारी शेठ ५
महाजनी वि. मो. १३, १८, ३२, ५७
ते ५९, ६१, ६५, ६७ ते ७०,
१७२, १८७
मंडलीक ३६, १०७
मॅक्समुल्लर १०९
मॅगिओमिली १०३
मॅझिनी ७२, ८७, ८८, १५९, १७१
१७७
माटे रामकृष्णबुवा ३४, १२०

मार्टिन ल्यूथर २१७
मिजरकर ६०
मिल्ल ९, २४, ३४, ६०, ९७, ९८, १९३, २०९, २१०
मिल्टन १६९
मुसोलिनी ६८
मेकॉले ६५, ९६, ९७, १५९, १९१
मेझल ५०
मेधा १६६
मेसन गुड ९५
मेसोफे कार्डिनल १०३
मेहता फेरोजशहा ४
मेहेंदळे ८, १०
मैत्रेयी १६०, १६४,
मोडक माधव हरी २२१
मोडक वामन आबाजी १२०
मोरेल ५०
यमी १६६
युकुची फुकुझावा २०६ ते २०८
रँडसाहेब २३४
राजवाडे वि. का. १३३, १३५
रानडे न्या. मा. गो. ५, ६, ३५, ६१, ६८, ८१ ८९, ९२, ९४, ९७, १२०, १३१, ते १३३, १७५, १८५ ते १८७, २०३ ते २०५, २२३
रानडे वामनराव ४५
रानडे विष्णु परशुराम १२०
रानडे शंकर मोरो ४८
रामजोशी ९१
रामतीर्थ स्वामी १६२
राय राममोहन १२०
रावबाजी १०७, १३०, १८३
रुक्मिणी १६०
रेमॉट ७८
रेंडॉटंट टिटिअन ९१
रोंधे मास्तर १३, ३०, ५७, ६७
लॅकेल १०२
लाला लजपतराय ७२, १२१
लिओनाड डिव्हेन्सी ९१
लिटन लॉर्ड १२९
लिटल सॉ. ४
लियार्नर १३५, २०४
लुसी बे १६८
लोकहितवादी ( गोपाळ हरी देशमुख ) ९२, १२०, १८३, १८४
लोकहितवादी ( पत्र ) १८४
वक्तृत्वोत्तेजक सभा ३, ३३, ७०, १९८
वडवा १६४
वर्ड्स्वर्थ ३६
वऱ्हाड समाचार ३, ५८, ५९, ९१, १९०, १९६
वाकू १६६
वाक्यमीमांसा ५, ९७, १९७
वाचक्नवी १६४
वाल्मीकी १८५
वॉल्ट विटमन ९८
विदुला १६०
विल्यम सिडने पोर्टर ९१
विविध विषयसंग्रह ९५
विवेकानंद १८८
विश्वनरा १६६
विश्वविद्यालय मुंबई ६
वीरसेन ९५
वृत्तवैभव १८४
वेब न्या. ४
वेलणकर १८
वेलिंग्डन ड्यूक १२८
वैद्य चिं. वि. ११९
व्होल्टेअर १०२, १९१
व्हिटने ५०

व्हिव्हॅनिटी ४
शकुंतला १६०
शंकराचार्य ६, १०३, १७५
शापसंभ्रम ९
शारदासदन ६, ७
शारदाश्रमवासी १२३
शालापत्रक १९०
शाश्वती १६६
शॉ ९६
शिवाजी ७६
शिंदे विठ्ठल रामजी २३४
शेक्स्पीअर २४, ३६, ४८, ९१, ९५ ते ९७, १०१, २१८
शेले ८९
श्रद्धा १६६
श्री १६६
समर्थ ( रामदास ) १०५, १२७, १५७ १९७
सरभा १६६
सहस्रबुद्धे कोंडो केशव १३
संमतिवयाचा वाद ६
सँढर्स्ट लॉर्ड ७
साक्रेटिस २१८ ते २२३
साने बाबाजी बापूजी ४३
सावित्री १६०
सिजविक २४
सीयो जी. जी. २०८
सीझर १२८
सुधारक ६ ते ८, १२, २० ते २३, ३७, ५० ते ५२, ८१ ते ८५, ८८, ९०, ९५ ते ९९, १७२, १७५, १८४, १९५, २०१, २०७, २१०, २११. २१७
सुधारणाभिमानी २८
सुभद्रा १६०
सुलभा १६४
सूर्या १६६
सेनेका १०२
सेल्वी प्रिं. डॉ. ३३, ५८
सेवासदन २५
स्टॅनले ९६
स्टॅन्ले हॉल १६८
स्टार ३
स्टॉक्लीज १०२
स्टील ८८
स्पेक्टेटर १३७
स्पेन्सर ९. २४, ६०, ९६. ९७, ९९, १७८, १९३, २०९,
स्माइल्स १३३, १९५
स्वाध्याय १८४
स्मिथ सिटी इ. १०
स्विफ्ट ८८
हरचेल·सर·जॉन ९२
हंटर डॉ. १४६, २२४
हॅम्लेट ( विकारविलसित ) ४, ३६, ४७, ९३ ते ९६, ९८, १०१, १९७,
हॅरिअटप्युडेचर १६८
हॅरिस लॉर्ड ६
हाथले ५०
हावर्ड ५७
हॉर्नब्रुक डॉ. १२२
हिंमतबहाद्दर ९५
हेन्री आयर्व्हिंग ९६
होळकर श्रीशिवाजीराव ५, ५३, ६८, ९७, १७५
ह्यूम ८४, २२४
ह्यू मिलर ९४
ज्ञानचक्षु ७६
ज्ञानप्रकाश ८, २७, ७६, ८१